ADDRESS *v*. (*-dirigere*, to direct) speak to बोलणें, हटकणें, संबोधून बोलणें; to a. a superior विनंती -अर्ज क.; —respectfully आहो जाहो ह्मणणें; prepare तयार क.: he *addressed* his men to fight;—one's self for प्रवृत्त -उद्युक्त होणें, कंबर बांधणें; direct words शब्दांची-भाषणाची योजना क., बोलणें लावणें; put on a direction पत्ता लिहिणें; direct in writing, as a letter पत्र लिहिणें-पाठविणें; court लग्न करितां आर्जव क.; consign to the care of दिम्मतीस पाठवणें -देणें: the ship was *addressed* to a merchant in Bombay.—*n*. बोलणें *n*, भाषण *n*; petition अर्जी *f*, अर्ज; message of respect मानाचा निरोप, मानपत्र *n*; dexterity चातुर्य *n*, युक्ति *f*, ओज *f*; *pl* लग्न करितां स्त्रीचा समाचार -ची बरदास्त *f*; manner of speaking to another बोलण्याची ढब *f*; direction of a letter पत्राचा पत्ता; name, title, &c., of the person addressed मायना.

ADDUCE *v*. (*-ducere*, to lead) bring forward पुढें क. -आणणें, लावणें: a witness was *adduced* to prove the fact; cite बोलण्यांत आणणें, उपन्यास क. (a reason, an argument, &c.)—ADDUCED पुढें उभा केलेला -आणलेला, उपन्यस्त.

ADEPT *n*. & *a*. (*-apisci*, *Skr*. *âp*, to pursue) पटाईत, वस्ताद, प्रवीण, निपुण, पुरा.

ADEQUATE *a.* -LY *ad.* (*-æquus,* equal) sufficient पुरा, पुरता; equal to तुल्य, समान; proportionate बराबर, योग्य; that is barely a. चुटपूट, जितक्यास तितका, तावन्मात्र [to].

ADHERE *v. i.* (*-hærere,* to stick) चिकटणें, डकणें; remain fixed बिलगून -लगटून -जडून अवलंबून -धरून राहणें: men a. to a party. —ADHERENT चिकटून असणारा मनुष्य, अनुयायी, आश्रयी, अनुषंगी, अवलंबी.—*a.* चिकटणारा; बिलगून असणारा, in comp. परायण, सक्त, निष्ठ.— ADHERENCE, ADHESION, चिकटणें *n,* लगटणें *n,* अनुषंग; आसक्ति *f,* एकनिष्ठता *f.*—ADHESIVE *a.* चिकटणारा, चिकण, चिकट. -NESS चिकटपणा, चिकटाई *f,* धर.

ADIEU *F.* शेवटचा सलाम, -आशीर्वाद, 'देव तुमचें बरें करो' अशा प्रकारचें शेवटल्या भेटीचें भाषण *n.*

ADJACENT *a.* (*-jacere,* to lie) लगत्याचा, जवळचा, समीपस्थ: a field a. to the highway. —ADJACENCY लगत *f,* लगता, समीपता *f.*

ADJECTIVE (*-jacere,* to throw) विशेषण *n,* गुणवाचक *n.* -LY *ad.* विशेषणाच्या अर्थानें, विशेष्यरूपानें.

ADJOIN *v.* (*-jungere,* to join) जोडणें [to].—*i.* लगत -जवळ -पास असणें. -ING *a.* जवळचा, शेजारचा, संसक्त.—ADJUNCT *n.* & *a.* जें कशास तरी लागून -जोडलेलें असतें तें *n,* अनुषंगिक गुण -वस्तु *f* -धर्म; *Gram.* an indicatory affix to verbs अनुबंध; *Metaph.* a quality of the body or the mind गुण; as *color* in the body; *thinking* in the mind. -ION मिळविणें *n,* संयोजन *n,* जोडलेली वस्तु *f.*

ADJOURN *v. F.* तहकूब क., दुसऱ्या दिवसा पर्यंत -बैठकी पर्यंत ठेवणें [from, to, for].—*i.* तहकूब होणें. -MENT तहकुबी *f,* महकुबी *f.*

ADJUDGE *v.* (*-judicare,* to judge) दंडास नेमणें, शिक्षा सांगणें; award मनसुबी -निवाडा करून देवविणें [to].—ADJUDICATE *v. i.,* See ADJUDGE [upon, from].

ADJUNCT, See under ADJOIN.

ADJURE (*-jurare,* to swear) शपथ -द्वाही घालणें [by].

ADJUST *v.* (*-justus,* just) put in order सुधारणें, ताळ्यावर आणणें, नीट क. (affairs, schemes); make exact बराबर-सोयीचा क., बसता क.: to a. a garment to the body; settle तोडजोड पाडणें, -क., चुकवणें (accounts, differences, &c.); bring to a true relative position, as the parts of an instrument लावणें, बसवणें (a telescope). -MENT सुधारणूक *f,* निटावणी *f,* दुरुस्ती *f;* तोडजोड *f;* लावणें *n,* बसवणें *n.*

ADJUTANT (*-juvare,* to help) an officer whose business it is to assist the superior officers by receiving and communicating orders, &c. सैन्याचा कारभारी, नकीब, 'आजिटन.'

AD LIBITUM *ad.* (*L.*) मनास येईल तसें, मनसोक्त.

ADMINISTER *v.* (*-ministrare,* to serve) afford गरज पुरविणें;—medicine देणें, पाजणें, चारणें; manage वहिवाटणें, चालवणें;—justice न्याय क.;—alms घालणें, वाढणें;—an oath देणें, घालणें.— *i.* contribute अनुकूल होणें, सहाय होणें: a fountain *administers* to our comfort; *Law,* perform the office of administrator वहिवाट क.: B *administers* the estate of D. — ADMINISTRATION देणें *n,* समर्पण *n;* सेवा *f,* काम *n;* वहिवाट *f,* कारभार, कार्य *n,* निर्वाह; अमल, कारकीर्द *f;* rigorous a. करडा अमल; executive government राज्यकारभारमंडळी *f;* — of the law धर्माधिकरण *n.*—ADMINISTRATOR (*L.*) कारभारी; —of a government राज्यकारभार चालवणारा, सचिव; officiator in divine rites आचार्य;—of the law न्यायाधीश, धर्माधिकारी; to an estate वहिवाट चालविणारा, वकील; one who manages the property of an intestate मृत्युपत्र केल्याशिवाय मरण पावले-

ल्याच्या मालमत्तेचा वहिवाटदार, मृतद्रव्यनिरूपणाधिकारी ; tutor, curator बालाधिकारी, बालद्रव्याधिकारी.—ADMINISTRATRIX कारभारीण *f*; वहिवाटदारीण *f*.

ADMIRAL *F*. commander-in-chief of a fleet आरमाराचा सरदार, अमीर उल्बहार ; the ship which carries the admiral ज्यावर तो सरदार असतो तें गलबत *n*. -TY त्या सरदाराचें काम *n*, –हुद्दा ; त्या कामाची मंडळी *f*, सामुद्रकार्याधिकारी ; त्या कामदाराची कचेरी *f*.

ADMIRE *v*. (*-mirari*, to wonder) regard with wonder आश्चर्य -कौतुक -प्रशंसा वाटणें, -क.; regard with love आवडणें, स्नेहदृष्टीनें पाहणें [for].—ADMIRATION विस्मय *n*, आश्चर्य *n*; point of a. आश्चर्य चिन्ह *n*.—ADMIRABLE *a*. उत्तम ; आश्चर्य मानण्याजोगा.—ADMIRABLY *ad*. उत्तम रीतीनें, आश्चर्य वाटायाजोगा.

ADMIT *v*. (*-mittere*, to send) suffer to enter आंत घेणें, प्रवेश होऊं देणें; give evidence of a right of entrance प्रवेश करण्याचा हक्क -अधिकार देणें : a ticket *admits* one into a playhouse ; receive as true खरें मानणें, ग्रहण करणें: the argument is *admitted*; be capable of योग्य -शक्ति -अवांका असणें : the words do not a. of such a construction. -TANCE, ADMISSION, प्रवेश, आंत जाण्याची मोकळीक *f*, -परवानगी *f*; स्वीकार. —ADMISSIBLE *a*. आंत येऊं देण्याजोगा, येऊं द्यायाचा ; घेण्याजोगा, ग्राह्य, पत्करण्याजोगा.

ADMONISH *v*. (*-monere*, to warn) reprove with mildness कान उघडणें, तोंडची शिक्षा -निषेध क. (2 Thess. iii. 15); advise उपदेश -बोध क., शिकविणें (Col. iii. 16) ; direct सूचना -ताकीद देणें, प्रबोधित क. (Heb. viii. 5) [for, of].—ADMONITION कानउघडणी *f*, निषेध ; उपदेश, बुद्धिवाद ; ताकीद *f*, सूचना *f*.

ADO* (*a* & *do*) bother खटपट *f*, दगदग *f*, कष्ट *pl*; bustle गोंधळ, कोलाहल ; with much a. मारून कुटून ; 'much a. about nothing' डोंगर पोखरून उंदीर काढणें.

ADOLESCENCE, -CY (*adolescere*, to grow up) वाढती दशा *f*, पराई *f*; youth यौवन *n*, जवानी *f*.—ADOLESCENT *a*. वाढते -चढते पराईचा, यौवन.

ADOPT *v*. (*-optare*, to choose) take into one's family as son and heir दत्तक घेणें, मांडीवर घेणें ; — a measure, custom, आदरणें, ग्रहण क. ; select and take निवडून घेणें : which mode will you a. ? -ION दत्तक घेणें *n*, दत्तकग्रहण *n* ; of a name नामग्रहण *n*, आदर, स्वीकार ; ceremonies of a. दत्तविधान *n*. -IVE *a*. पोसणा -दत्तक घेणारा : an a. father, a. son ; पत्करणारा.

ADORE *v*. (*-orare*, to pray) worship with profound reverence पुजणें, भजणें ; love intensely परम प्रीति -लोभ क. : the people a. their prince [for].—ADORABLE *a*. पूज्य, वंद्य, सेव्य, अर्चनीय ; सन्माननीय, प्रीतिपात्र.—ADORATION पूजन *n*, भजन *n*, पूजा *f*, अर्चा *f*, आराधना *f*, वंदन *n* ; भक्ति *f*, प्रेम *n*.

ADORN *v*. (*-ornare*, to deck) भूषित क., शृंगारणें, शोभविणें (body, speech, virtue, doctrine) [with]. -ED *a*. साजरा, अलंकृत, मंडित. -ING, -MENT, अलंकारणें *n*, अलंकारभूषण *n*, शोभा *f* (1 Pet. iii. 3).

ADOWN* *prep*. (*a* & *down*) खालीं, वरून ; downward उतरत.

ADRIFT* *ad*. वाहता, मोकळेपणीं, तरता, इतस्ततः ; to be a., lit. fig. तरंगणें, वाहणें ; to cast a. ओघावर टाकणें ; fig. वाऱ्यावर टाकणें; to get a., lit. ओघांत पडणें ; fig. वाऱ्यावर पडणें. As an *a*. it always follows its noun : the boat was a.

ADROIT *a*. *F*. skilful कुशल, चतुर, सुगर ; active चपळ, हुशार. -NESS कौशल्य *n*, सुगराई *f*, दक्षता *f* ; हुशारी *f*, पटाईतपणा.

ADULATION (*adulari*, to flatter) खुशामत *f*, हांजी हांजी *f*.—ADULATORY *a*. खुशामतीचा, आर्जवाचा, अतिप्रशंसक.

ADULT *a*. (*-olere*, to grow) वयांत -पणांत आलेला; प्रौढ, पोक्ता ; to be a. वयांत येणें.—

n. पोक्ता माणूस, झाड *n*, इ० [*Law*, this term is applied to males after the age of fourteen, and to females after twelve].

ADULTERATE *v.* (*-alter*, other) भेळ -मिसळ-हीण घालून बिघडणें (coins &c.).—ADULTERATION अशुद्धिकरण *n*, मिश्रण *n*.—ADULTERY, violation of the marriage vow व्यभिचार, जारकर्म *n*;—of the male परस्त्रीगमन *n*, परद्वार *n*; — of the female शिंदळकी *f*; idolatry मूर्तिपूजा *f* (Jer. iii. 9).—ADULTERER व्यभिचारी, जारकर्मी; मूर्तिपूजक (Ezek. xxiii. 45).—ADULTERESS व्यभिचारिणी *f*, जारिणी *f*.—ADULTERINE व्यभिचारांत जन्मलेलें लेंकरूं *n*, जारज *c*, अठरा धान्याचें कोडबुळें *n*.

ADUMBRATE *v.* (*-umbra*, shade) छाया उतरणें -काढणें.—ADUMBRATION प्रतिछाया काढणें *n*, प्रतिछाया *f*.

ADUST *a.* (*-urere*, to burn) जळून गेलेला, दग्ध, रुक्ष.

ADVANCE *v. F.* bring forward पुढें आणणें, —क.; promote पदवीस चढविणें, वाढविणें, सरफराजी क., रूपास -उदयास आणणें; improve सुधारणें, अधिक चांगला क., संवृद्धि क., propose उहू -उपक्रम काढणें; supply beforehand अगाऊ देणें; lend उसणें देणें.— *i.* move forward पुढें येणें; — daringly, boldly, सरसावणें; against -वर चढून जाणें -येणें, चाल क.; make progress in any respect गुणानें -ज्ञानानें -वयानें -महत्वानें वाढणें; in, raise in rank पदवीस चढणें.—& -MENT पुढें येणें *n*, अग्रगमन *n*, चढवणें *n*, वर्द्धन *n*, बढती *f*, सरफराजी *f*; additional profit जास्ती नफा; in a. पुढें, मोहरे; अगाऊ, आगप; a. guard बिनी *f*. —ADVANCED पुढें केलेला -आणलेला &c.; in life वयस्क, वयातीत; a plant in growth जोगावलेला.

ADVANTAGE *F.* gain फायदा, लाभ, अर्थ; superiority over वर्चस्व *n*, आधिक्य *n*: the a. of a good constitution; to have the a. of थाप -छाप असणें; to obtain an a. over आपला दशक -वर्चस्व चढविणें, जिंकणें; opportunity सवड *f*, संधि *f*, अवकाश: the general took a. of the enemy's negligence; convenience सोय *f*, अनुकूलता *f*; students enjoy great a. for improvement.—*v.* लाभणें, साधणें (Luke ix. 25).—ADVANTAGEOUS *a.* सोयीचा, उपयुक्त; नफ्याचा, लाभदायक, -प्रद. -LY *ad.* सोयीवार, नफेवार, हित होईल अशा रीतीनें.

ADVENT (*-venire*, to come) येणें *n*, आगमन *n*; [the first or second coming of Christ; a season of devotion including four Sundays before Christmas.]—ADVENTITIOUS *a.* accidental बाहेरून नवा आणलेला, आगंतुक; *Med.* not hereditary आईबापा पासून न जडलेला (disease).—ADVENTURE *F.* a chance दैवयोग, दैवगति *f*; enterprise जोखीम *n*, धोक्याचें काम *n*; remarkable occurrence चरित्र *n*, चमत्कारिक घडलेली गोष्ट *f*: a. of one's life; [a thing sent to sea at the risk of the person sending it].—*v.* जोखिमांत घालणें; दैवावर घालणें, -ठेवणें.—*i.* जोखीम अंगावर घेणें.—ADVENTURER दैवावर भरवसा ठेवून उद्योग करणारा, मोठा उद्योगी.—ADVENTUROUS *a.* अचाट उद्योगी, साहसी, खटपट्या. -LY *a.* जोखीम सोसून, साहसपूर्वक.

ADVERB (*-verbum*, a word) क्रियाविशेषण *n*, अव्यय *n*. -IAL *a.* क्रियाविशेषण संबंधी; क्रियाविशेषणाच्या अर्थाचा, क्रियाविशेषणरूप. -LY *ad.* क्रियाविशेषणाच्या अर्थानें, -रूपानें.

ADVERSE *a.* (*-vertere*, to turn) counteracting आडवा, उलटा, विपरीत (winds); opposing desire वांकडा, अननुकूल, विपरीत, प्रतिकूल (circumstances) [to]. -LY *ad.* आडवा, उलटा; शत्रुबुद्धया, विरोधपूर्वक.—ADVERSARY वैरी, शत्रु; antagonist वादी,

प्रतिस्पर्धी.—ADVERSITY विपत्ति *f*, संकट *n*, दुर्दैव *n*; season of a. आपत्काल.

ADVERSARIA (*L.*) गबाळग्रंथ, बाड *n*.

ADVESPERATE *v. i.* (*-vesper*, evening) draw towards evening सांजळणें.

ADVERT *v. i.* (*-vertere*, to turn) लक्ष -मन देणें -लावणें, डोळा -नजर असणें -ठेवणें [to]. -ENCE, -ENCY, लक्ष *n*, अवधान *n*, ध्यान *n*. -ENT *a.* सावध, लक्षदेणारा.—ADVERTISE *v.* inform जाणविणें, निवेदन क.; give public notice of जाहीर क., दंवडी पिटविणें, वर्त्तमानपत्रांतून जाहीर क. इ० [in, for]. -MENT जाहीर क. *n*, सूचना *f*; वर्त्तमान *n*, समाचार; —in the public papers जाहिरात *f*, जाहीरनामा. —ADVERTISER जाणवणारा, खबरदेणारा; समाचारपत्र *n*.

ADVISE *v.* (*-videre*, to see) counsel मसलत-सल्ला देणें, बुद्धिवाद क.; inform कळविणें, खबर देणें: the merchants were *advised* of the risk; deliberate विचार पाहणें, मसलत क. —*i.* विचार -मसलत क.; with दुसऱ्याशीं विचार क., सल्ला घेणें.—ADVICE मसलत *f*, सल्ला, उपदेश; bad a. कुमंत्र, कुबोध; good a. हितोपदेश; *pl* खबर *f*, बातमी *f*; *advices* from emissaries at foreign courts अखबार *f*; commercial a. पेंठ *f*.—ADVISABLE *a.* prudent योग्य, उचित, लायक.—ADVISEDLY *ad.* विचारपूर्वक, बुद्धिपुरस्सर, मनन करून.—ADVISER मसलत -अक्कल -बुद्धिवाद सांगणारा; political a. मंत्री, अमात्य; spiritual a. गुरु; in a bad sense कुमंत्री, गुरु.—ADVISORY *a.* मसलत सांगण्याच्या अधिकाराचा (council).

ADVOCATE *v.* (*-vocare*, to call) plead in favour of दुसऱ्याचा पक्ष धरून बोलणें; —in the court वकिली क.—*n.* पक्ष धरून बोलणारा, वकील; defender कैवारी, प्रतिपादक; Christ, considered as an intercessor for His people मध्यस्थ, अनुवादक (1 John ii. 12).—ADVOCACY मध्यस्थि *f*, वकिली *f*, इ०.

ADZE* तासणी *f*, वाकस *n*.

AERIAL *a.* (*aër*, air) belonging to the air वायुसंबंधी, आकाशीय (regions); consisting of air वायुरूप -मय (particles); produced by air वायु पासून उत्पन्न झालेला, वायुज (honey); inhabiting the air आकाशांत राहणारा, नभस्थ (songsters); frequenting the air आकाशगामी; placed in the air उंच, अंतरिक्षस्थ (flight).— AERIFORM *a.* वातरूप, वायुरूपी.—AERIFY *v.* आंत वारा सोडणें, -भरणें; वाऱ्यानें भरणें; वायुरूप क.— AEROLITE (*Gr. -lithos*, stone) हवेंतून पडलेला धोंडा, उल्का *f*. — AEROLOGY वायुविद्या *f*, -विवरण *n*.— AEROMETER (*Gr. -metron*, measure) वायुमापक यंत्र *n*.— AERONAUT (*Gr. -naus*, ship) विमानांत बसून आकाशांत फिरणारा, आकाशचर.—AERONAUTICS आकाशसंचारविद्या *f*.—AEROSTATION (*Gr. -statos*, placed) वायुमापन करण्याची विद्या *f*, वायुमापनविद्या *f*; विमानांत बसून फिरणें *n*, आकाशयान *n*.

AFAR* *ad.* (*a* & *far*) at a distance दूर, लांब; to a distance दूर पर्यंत; from a. लांबून, दुरून; a. off दूरचा, दूरस्थ.

AFFABLE *a.* (*-fari*, to speak) courteous बोलण्यास घळबळीत, सुजन; usually applied to superiors.—AFFABLY *ad.* भलमाणसाईनें, हळबळीतपणानें, सौजन्यपूर्वक.—AFFABILITY बोलण्यांत घळघळीतपणा, भलेपणा, सौजन्य *n*.

AFFAIR (*-facere*, to make) business काम *n*, कार्य *n*; confused a. भानगड *f*; a delicate a. नाजूक काम *n*; a pressing a. निकडीचें काम *n*; engagement of troops कचाकची *f*, चकमक *f*, फाटफूट *f* [an a. of honor, duel].

AFFECT *v.* (*-facere*, to make) act upon -वर कार्य -गुण लागणें -क. -चालणें, विकार उत्पन्न होणें: cold *affects* the body; move the passions वेधणें, सद्गदित क., गहिंवर आणणें: *affected* with grief; make a show of

डौल दाखविणें, दंभ क.: to a. friendship; aim at इच्छा धरून डोळा ठेवणें, अभिलाषपूर्वक दृष्टि ठेवणें: this proud man *affects* imperial sway; love प्रीति -आवड क.; tend to by affinity or disposition स्वाभाविक गुणानें वळणें -कलणें: the drops of every fluid a. a spherical form. -ED ज्यावर लागू झालेला तो, गुण लागलेला; गळा भरून -दाटून आलेला, सद्गदित; to be a. तडतड तोडणें (पोटांत); not natural, आणलेला कृत्रिम, वरकर्मी, डौलाचा; a. kindness मिथ्योपचार; given to false show अकडबाज, मिजाजी;—esp. of females नखरेबाज, गमजेखोर. -EDLY *ad.* अकडीनें, डौलानें, नटून थटून. -ING कळवळा -करुणा उत्पन्न करणारा, वेधक (address). -ATION तोरा, डौल, अकड *f*, स्तोम *n*;—esp. of females नखरा, विलास, ठाम.— AFFECTION, fondness आवड *f*; love स्नेह, प्रेम *n*, ममता *f*, माया *f*; disengagedness of the affections मनसुटका *f*; empty a. कोरडी ममता *f*; true a. ओली ममता *f*; maternal a. पोटची आग *f*; overflowing a. प्रेम, पान्हा, गहिंवर; paternal a. पुत्रलोभ, वात्सल्य *n*; platonic a. पाकदोस्ती *f*; single a. अनन्यभाव; conjugal a. दंपत्यस्नेह; to pretend great a. for तोंडांत तोंड घालणें; attribute गुण;—of the mind मनोधर्म-भाव-विकार, मनोभावना-वृत्ति *f*; —of the body विकार, रोग; propensity कल, झोंक, ओढ *f*; rheumatic a. वातरोग [for, towards]. -ATE *a.* माया करणारा, ममताळु; ममतेचा, करुणेचा (countenance). -LY *ad.* आवडीनें, प्रेमानें.

AFFIANCE (*-fides*, trust) the marriage contract वाग्निश्चय, लग्नाचा ठराव, -करार; trust विश्वास, भरवसा. —*v.* वाग्निश्चय करणें; भरवसा देणें.

AFFIDAVIT (*L.*) शपथेवर जबानी *f*, क्रियापत्र *n*.

AFFILIATE *v.* (*-filius*, a son) adopt दत्तक घेणें; receive into a society मंडळींत घेणें.

AFFINITY (*-finis*, limit) relationship by marriage सोयरीक *f*, शरीरसंबंध, पालव, पदर; resemblance सारखेपणा, सादृश्य *n*; relation संबंध; *Chem.* attraction आकर्षण *n* [to, for].

AFFIRM *v.* (*-firmare*, to make firm) काईम -बहाल क.: the court *affirmed* the judgment; assert positively निश्चयानें बोलणें, -सांगणें.—*i.* testify under affirmation प्रतिज्ञापूर्वक सांगणें, -साक्ष देणें; निश्चयानें -खातरीनें सांगणें. -ABLE *a.* काईम -खरा करायाजोगा [of]. -ATION, that which is asserted जें खचीतपणें सांगितलें तें *n*; confirmation निश्चय, दृढीकरण *n*; *Law*, प्रतिज्ञेवर सांगणें *n*, प्रतिज्ञेवरची जबानी *f*.— -ATIVE *a.* आहेपणाचा, अस्तिपक्षाचा; पक्षानुकूल, निर्णायक. — *n.* होयपक्ष, अस्तिपक्ष; word expressing affirmation होकार, होकाराचा शब्द.

AFFIX *v.* (*-figere*, to fix) add at the end शेवटास जोडणें, -बसविणें; attach लावणें, आरोपणें: names *affixed* to ideas.—*n.* *Gram.* a syllable or letter added at the end of a word प्रत्यय.

AFFLATUS (*L.*) a blast of wind वाऱ्याचा झटका *n*; communication of divine knowledge, or the power of prophecy वारें *n*, घुमारा, अवसर; subject of a. (देवाचें) झाड *n*; *Med.* a term applied to a current of air which strikes the body and produces disease वारा, झटका, झपाटा.

AFFLICT *v.* (*-fligere*, to strike) give pain दुःख -क्लेश -पीडा -त्रास देणें; strike down हाणून पाडणें [by, with]. -ED दुःखित, पीडित; a. with disease रोगपीडित; an a. person दुःखाचा प्राणी; to comfort the a. रडत्याचें आंसू पुसणें. -ION पीडा *f*, क्लेश, दुःख *n*; partner in a. समदुःखी, दुःखाचा सोबती. -IVE *a.* क्लेशकारक, दुःखकर.

AFFLUENCE (*-fluere*, to flow) plenty पुष्कळपणा, समृद्धि *f*, महामुरी *f*, abundance of

property संपत्ति *f*, दौलत *f*.—AFFLUENT *a*. द्रव्यवान्, श्रीमान्.—AFFLUX वाहवण *n*, वाहणी *f*.

AFFORD *v*. (*-aforare*, to value) yield उत्पन्न -पीक देणें: the earth *affords* grain; grant देणें: a good life *affords* consolation in old age; expend with profit or without loss खर्चण्याचें सामर्थ्य असणें: a man can a. a sum yearly in charity; sell with profit or without loss विकण्याचें सामर्थ्य असणें: A can a. rice at a lower price than B.

AFFRAY *F. Law*, the fight of two or more persons, in a public place, to the terror of others तंटा, दंगा, मारामारी *f*; a tumultuous quarrel कलागत *f*, भांडण *n*.—AFRAID भ्यालेला, भयभीत; to be a. of -ला भिणें, -चें भय वाटणें; to be a. शंका असणें.

AFFRIGHT* *v*. भय दाखविणें [with, by].

AFFRONT *v*. (*-frons*, front) offend by some manifestation of disrespect, as would be done by crossing a person's path in *front* तोंडावर अपमान -अवज्ञा क. —*n*. तोंडावर अपमान -अप्रतिष्ठा *f*.

AFFUSE *v*. (*-fundere*, to pour) ओतणें, घालणें, धार सोडणें. — AFFUSION ओतणें *n*, अभिषेक.

AFIELD* *ad*. (*a* & *field*) शेतांत, शेतास.

AFIRE* *ad*. (*a* & *fire*) जळत, जळत असतां.

AFLOAT* *ad*. (*a* & *float*) तरंगतां, तरंगत असतां, वाहतां; moving हालत, चालत; पसरत, फांकत, उडत (बातमी इ०).

AFOOT* *ad*. (*a* & *foot*) पायीं, पायानें; in action चालू, सुरू: a design is a.; to set a. उठवणें, आरंभणें, मांडणें.

AFORE* *prep*. before पुढें, समोर.—*ad*. पूर्वी, गतकाळीं.

AFRAID, See under AFFRAY.

AFRESH* *ad*. (*a* & *fresh*) नव्यानें, दुसऱ्यानें, फिरून.

AFRICAN *a*. आफ्रिकेचा, आफ्रिके संबंधी. —& AFRIC आफ्रिकेंतला मनुष्य, काफ्री.

AFRONT* *ad*. (*a* & *front*) पुढें, समोर, मोहरे.

AFT* *ad*. (*Skr. apa*) गलबताच्या मागल्या बाजूस; fore and a. गलबताच्या एका शेवटा पासून दुसऱ्या शेवटा पर्यंत.

AFTER* *ad*. मग, पश्चात्, नंतर.—*prep*. behind in place पाठीमागें, मागून; immediately a. मागोमाग, लागोपाठ, पाठोपाठ; later in time मागून, नंतर: a. supper; following पाठीमागें, पाठीवर; in pursuit of पाठीमागें, शोधार्थ; according to प्रमाणें, सारखा, अनुरूप (Rom. viii. 13); in imitation of वाणी, परी, अनुलक्षून, पाहून: to make a thing a. a model; to inquire a. पुसणें, समाचार घेणें, विचारपूस क.— *a*. पाठीमागचा, उत्तर, पश्चिम; a. ages पुढचे लोक *pl*, पुत्रपौत्रादि, वंशपरंपरा *f pl*; a. all शेवटीं, निदानीं, सर्व गोष्टींचा विचार करून पाहतां; a. dinner भोजनोत्तर. -BIRTH वार *f*, गर्भवेष्टन *n*, जार *m*, *n*. -CROP एकाच वर्षांतलें दुसरें पीक *n*, पश्चिमधान्य *n*, गिमवस *f*. -GAME काल होऊन गेल्यावरचा उपाय -युक्ति *f*, उत्तरोपाय. -HOURS *pl* काम झाल्यावरची वेळ *f*. -INGS *pl* चिटून काढलेलें दूध *n*. -MATH एकाच ऋतूंतली गवताची दुसरी फूट *f*. -MOST *ad*. सर्वांच्या पाठीमागचा. -NOON *n*., *a*. दोन प्रहरानंतरचा वेळ, तिसरा प्रहर, उतरती वेळ *f*. -PAINS *pl* बाळंत झाल्यावरचें दुःख *n*, जरायुवेदना *f*. -THOUGHT मागून सुचलेली बुद्धि *f*, -कल्पना *f*, -विचार, पश्चात् विचार. -WARD, -WARDS, *ad*. मागून, मागाहून, नंतर.

AGAIN* *ad*. another time दुसरेंदा, अणखी; once more पुनः, पुनरपि; a. and a. पुनःपुनः, वारंवार; as much a. अणखी, इतका, दुप्पट; back पुनः, परत, माघारीं-रा.—AGAINST *prep*. in opposition to विरुद्ध, आडवा, प्रतिकूल:

I act a. him; opposite to समोर, सन्मुख: a ship is a. the mouth of a river; in provision for लक्षून, धोरण धरून, साठीं, करितां: one should store up money a. misfortune; bearing upon -शीं, -ला: he leans a. a wall.

AGAPE* *ad.* (*a* and *gape*) तोंड -आ पसरून.

AGATE (*Gr. achates*) गोमेद, अकीक.

AGE (*ævum*) whole duration of a being आयुष्य *n*; that part of the duration of a being which is between its beginning and any given time वय *n*, उमर *f*, शीण *f* (Luke iii. 23); period of time काळाची ठेप *f*;—of the world युग *n*, कल्प; lapse of ages कालगति; generation पिढी *f*; seniority वडीलपण *n*; old age म्हातारपण *n*, वृद्धत्व *n* (Gen. xviii. 11); imbecility of old a. म्हातारचळ; maturity प्रौढदशा *f*, भरज्वानी *f*, यौवन *n* (John ix. 21); that is of mature a. वयस्क; that is of a. व्यवहारप्राप्त, व्यवहारज्ञ; that is under a. अप्राप्तकाल; to come of a. वयांत येणें; century शतक *n*, शेंकडा; the time of life for conceiving children गर्भधारणकरण्याचें वय *n* (Heb. xi. 11).—*v. i.* म्हातारा होणें.—AGED *a.* म्हातारा, वृद्ध, वयस्क; a. and infirm जखड; contemptuously थेरडा; middle a. पोक्ता, मध्यम वयस्क; the a. म्हातारे *pl*, वृद्ध मनुष्यें *pl*.

AGENT (*agere*, to act) one who has the power to act कर्त्ता; a factor गुमास्ता, मुनीम; a. with full powers कुलकारभारी; *Com.* अडत्या; an active power or cause व्यापारक: heat is a powerful a.—AGENCY कर्तृत्व *n*; गुमस्तेगिरी *f*, वकिली *f*; अडत *f*; instrumentality हात, मारफत *f*, द्वार *n*.

AGGLOMERATE *v.* (*-glomus*, a ball of yarn) गोळा -पिंड क.—*i.* गोळा -पिंड होणें.

AGGRANDIZE *v.* (*-grandis*, grand) make great or greater in power, rank, or honor बढती क., वाढविणें, थोरपणा देणें: to a. a family; enlarge मोठा -विस्तृत क.; पसरणें, वाढवणें; applied to things. -MENT बढती *f*, सरफराजी *f*, भरभराट.

AGGRAVATE *v.* (*-gravis*, heavy) make worse अधिक वाईट क. (the evils of life); to be *aggravated* विकोपास जाणें; enhance अधिक जड -कठीण क. (a crime); give coloring to in description मीठमिरची लावून -बतावणी करून सांगणें: to a. circumstances. —AGGRAVATION पीडन *n*, प्रकोपन *n* (of pain or grief); अतिशयोक्ति *f* (of features).

AGGREGATE *v.* (*-grex*, flock) एकवट -एकत्र क. —*a.* एकवट केलेला, समुच्चित, राशीकृत.— *n.* एकूण जमा *f*, एकंदरी *f*; समुदाय, समूह. -LY *ad.* एकंदर, एकवट.—AGGREGATION एकगोळा, एकपुठा.

AGGRESS *v. i.* (*-gradi*, to go) make a first attack आगळीक -कज्जा -कुरापत काढणें. -ION आगळीक *f*, कुरापत *f*. -OR कुरापत्या, आगळीक काढणारा, चढाई करून जाणारा.

AGGRIEVE *v.* (*-gravis*, heavy) give sorrow to दुःख -क्लेश देणें; oppress गांजणें, जाचणें [by].

AGHAST* *a.* or *ad.* struck with horror घाबरा झालेला, भिऊन गेलेला, भयव्याकुल; struck with amazement विस्मयाकुल, चकभूल.

AGILE *a.* (*agere*, to act) चपळ, चंचल, सुटसुटीत.—AGILITY अंगचपळाई *f*, चलाखी *f*, सुटसुटीतपणा.

AGIST *v. F.* चारणाबळ घेऊन चारणीस घेणें.

AGITATE *v.* (*agitare*, to drive) stir violently हालवणें, खळबळविणें: to a. water in a vessel; discuss घोळणें, वाटाघाट क.; घुसळणें (a question); —the mind घाबरा -व्याकुल -व्यग्र क.; क्षोभविणें [with, by, for]. —AGITATION हालवणें *n*, खळबळ *f*; हैराणगत *f*, तळमळ *f*, संताप; वाटाघाट *f*.

AGNAIL* नखुरडें *n*.

AGNATE *a.* (*-nasci*, to be born) *Law*, akin by the father's side गोत्रज, पितृकुलाचा. —AGNATION गोत्रसंबंध.

AGO* *ad.* पूर्वी, मागें, गतकालीं; a month a. एक महिना झाला; a while a. आतां, नुक्ता; long a. फार दिवस झाले. -ING चालता, चालू.—AGOG *ad. F.* हुरहुरलेला, उत्कंठित दशेंत; to be all a. हुरहुरणें; to set a. चढीं देणें, भर देणें घालणें.

AGONY *n.* (*Gr. agon,* contest) extreme pain of body or mind अतिव्यथा *f,* तीव्रवेदना *f,* प्राणांत दुःख *n;* a. of death अंतस्ताप; the sufferings of our Savior in the garden of Gethsemane आमचा तारणारा येशू ख्रीस्त यानें गेथ्सेमेनी बागेंत जें प्राणांत दुःख सोसिलें तें (Luke xxii. 44).—AGONIZE *v.* त्रास दुःख देणें, हाल क. [by, with].— *i.* तळमळणें, कळवळणें; at कुंथणें, अति यत्न करणें.—AGONIZING *a.* ऊरफोडीचा, अट्टाहासीचा; कळवळ्याचा, अळुक्यापिळुक्याचा.

AGRARIAN *a.* (*ager,* a field) काळी संबंधी, जिराइती, शेतजमीन संबंधी.

AGREE *v. i.* (*-gratus,* pleasing) be of one mind सम्मत एकमत होणें, एकविचार होणें: all the parties a.; to, in, on, concur अनुमत-सम्मत-रुकार देणें; with, stipulate खंड करार क.; with, suit मिळणें, जमणें, मेळ पडणें; with, be adapted in its effects सोसणें, जिरणें, मानणें: the same food does not a. with every constitution; resemble सारखा असणें उतरणें: the picture does not a. with the original; *Gram.* correspond in gender, number, case, or person, लिंग, वचन, विभक्ति, यांप्रमाणें असणें. -ABLE *a.* suitable जमाचा, मिलाफाचा, बेताचा, समर्पक, संभूत, अनुसार री: the practice of virtue is a. to the law of God and our own nature; pleasant मनासारखा, प्रिय, आवडता, मनोरम (manners; fruit a. to the taste); in pursuance of प्रमाणें, अनुरूप, बरहुकूम, माफक: a. to the order of the day. -NESS मेळ, उपयुक्तता *f,* अनुकूलता *f;* आवडतेपणा, गोडी *f,* रम्यता *f;* सारखेपणा, तुल्यता *f.* -ABLY *ad.* प्रमाणें, बरहुकूम, अन्वयें, अनुसार: सुखानें, सुखरूपें.—AGREED *a.* मान्य, अनुमत *n,* सम्मत *n* (Amos iii. 3); संकेतित, ठरलेला: the terms were a. to, or upon. -MENT बनाव, एकोपा, जुळणी *f;* अनुमत *n,* सम्मत *n; Law,* करार, बोली *f;* मिलाफ, जम; see the verb; agreements and engagements करारमदार, कौलकरार; a. for a year सालबोली *f;* written a. करारनामा, कौलनामा; — of different books, statements, एकवाक्यता *f,* ताळा, उतारा; *Gram.* concord सामानाधिकरण्य *n.*

AGRICULTURE (*ager,* a field, *cultura,* cultivation) शेतकी *f,* कृषिकर्म *n;* farming शेतपोत *n,* शेतभाती *f.*—AGRICULTURAL *a.* शेतकामाचा, कृषिकर्मसंबंधी.—AGRICULTURIST शेतकाम करणारा, शेतकरी, कुळंबी.

AGROUND * *ad.* (*a* and *ground*) जमिनीस तळास लागून टेंकून (जहाज इ०); to be a. लागणें, लागून असणें.

AGUE *F.* chillness थंडी *f,* सरदी *f; Med.* intermittent fever attended by hot and cold fits हिवताप, शीतज्वर; shivering fit कुडकुडी *f,* हुडहुडी *f.* -CAKE, enlargement of the spleen produced by ague कीलू *f.* -SPELL *n,* हिवतापाचा मंत्र, तोडगा.

AH, *int.* (*âh, Skr. â, âh*) exclamation, expressive of contempt हांहां! छी!; of exultation हा! आहा!; of compassion हाय, हाय, हाहा!; as under great pain हायहूय, हुंहुं.—AHA *int.* (*Skr. hâ, ahaha*) आहाहा, हाहा.

AHEAD* *ad.* (*a* and *head*) पुढें, मोहरे; to get a. पुढारणें [of]; headlong अविचारानें, अनिवारपणानें.

AID *v.* (*-juvare,* to help) मदत कुमक क.— *n.* सहाय *n,* मदत *f,* उपकार.

AIDE-DE-CAMP *F.* an officer selected by a general officer to assist him in his military duties नकीब.

AIL* *v.* दुःख -इजा देणें: what ails thee? तुला काय झालें? -MENT दुःख *n*, चालतें बोलतें दुखणें *n*, विकृति *f*.

AIM *v. i.* (*æstimare*, to value) point with a missive weapon नेमणें, रोखणें; attempt to reach -कडे धोरण-लक्ष्य-रोख असणें-ठेवणें: to a. at distinction.—*t.* point, as a weapon नेम धरणें, शिस्त बांधणें.—*n.* नेम, शिस्त *f*; point aimed at टिपण *n*, निशाण *n*: he missed his a.; purpose मतलब, आशय; unerring a. अचूकसंधान *n*.

AIR (*aër*) the fluid which we breathe and which surrounds the earth वायु; particular state of the atmosphere as respects heat, cold, &c. हवा *f*; any aëriform body वायुरूप पदार्थ; as a humor of the body वात, वायु; vital a. प्राणवायु; a light breeze झुळूक *f*, मंदवायु; publicity उघडीक *f*, पुकारा; mien मुद्रा *f*, चर्या *f*, ढब *f*; general aspect ठेव *f*, डौल, घाट, रंग; tune ताल, राग; *pl* अक्कड *f*, पत्राज *f*; in the a. अंतरिक्षांत, अधांतरीं; to sniff the a. वारा घेणें -पिणें; to take the a. वारा -हवा खाणें, सहल करणें; फुटणें. —*v.* expose to the air वाऱ्यांत -वाऱ्यावर घालणें, ऊन देणें (clothes); expose to heat, fire, उनांत -विस्तवावर सुकविणें (linen). -BLADDER, -BAG, वायूनें भरलेली पिशवी *f*. -GUN दारू शिवाय हवेच्या दाबानें उडणारी बंदूक *f*. -HOLE झरोका. -INESS हवाशीरपणा. -ING सहल *f*, हवाखायास फिरणें *n*. -PUMP *n*. a machine for exhausting the air from vessels वाताकर्षक यंत्र *n*. -TIGHT *a*. हवा आंत न शिरे असा गच्च बसविलेला, वाताभेद्य.—AIRY *a*. वायुमय -रूपी; वायूचा, वायुसंबंधी; हवाशीर, हवादार; पोकळ, वावकळ, शून्य; रंगेल, मौजी.

AISLE (*ala*, wing) सभामंडपाच्या दोहों बाजूंचें दालन *n*.

AKIN *a.* (*a* and *kin*) related by blood नातलग, आप्त; partaking of the same properties समान, एकजातीय, सहधर्मक: envy and jealousy are near a. [to].

ALABASTER (*Gr. alabastron*) एकजातीचा नरम व पांढरा संगमरवर पाषाण.—*a.* आलाबास्त्राचा केलेला; आलाबास्त्रा सारखा.

ALACRITY (*alacer*, lively) उत्साह, हौस *f*: the soldiers advanced with a. to meet the enemy.

ALARM *F.* a summons to arms हत्यारबंद होण्यास बोलावणें *n*; sudden surprise with fear धस *n*, दचका, धसका: we felt an a. *at* the cry of Fire!; a cry of danger भयाचा ध्वनि, हूल *f*: to sound an a.; [a mechanical contrivance for awakening persons from sleep, or rousing their attention].— *v.* भयाची खबर देऊन हुशार क.; भिवविणें, भय दाखविणें (an army); कमरबंद क.; to sound the alarm हूल क. -BELL, -GUN, -POST, भयसूचक घंटा *f* -तोफ *f*. -स्थान *n*. (हुलीचा नगारा, जंघट इ०). -CLOCK इशारत देणारें घड्याळ *n*. -ING भीति उत्पन्न करणारा, भयप्रद. -IST भय भाकणारा, भयभाक्या.

ALAS, *int.* (*-lassus*, weary) हायहाय!, हाहा!

ALB (*albus*, white) धर्मोपदेशकाचा पांढरा झगा. —ALBUGINOUS *a.* अंड्यांतील पांढऱ्या बिलासारखा.—ALBUGO डोळ्यांतलें फूल *n*, कवडा.—ALBURNUM झाडांच्या आंतल्या व बाहेरल्या सालीच्या मधली साल *f*, मध्यत्वक् *f*; नवें किंवा कोंवळें लांकूड *n*.—ALBUM, a book for inserting autographs (मित्रादिकांचे) हस्तलेख रक्षण करून ठेवायाचें पुस्तक *n*.

ALBEIT* *ad.* (*all, be, it*) जरीं, यद्यपि.

ALCHEMY *Ar.* किमया *f*, रसायण *n*.—ALCHEMICAL *a.* किमयासंबंधी.—ALCHEMIST किमयागार, रसायणी.

ALCOHOL *Ar.* दारूचा अर्क, मद्यार्क.

ALCORAN *Ar.* कुराण *n.*

ALCOVE *Ar.* दिवाणखान्यांतील गादीची अथवा बागांतील बसायाची जागा *f.*

ALDERMAN* शहरच्या लोकांनीं नेमलेल्या मंडळीचा कारभारी अथवा फौजदार.

ALE* एक प्रकारची दारू *f,* बोझा. -HOUSE कलालाचें दुकान *n.*

ALEMBIC *Ar.* दारू -अर्क काढण्याचें यंत्र *n,* भबकारा.

ALERT *a.* (*-regere,* to lead straight) watchful सावध, जागता; upon the a. टेहळणीवर; nimble चपल, चलाख. -NESS सावधगिरी *f,* चपळाई *f.*

ALEXANDRINE, (from *Alexander*) बारा अक्षरांचें एक वृत्त आहे.

ALGEBRA *Ar.* बीजगणित. -ICAL *a.* बीजगणित संबंधी. -IST बीजगणित जाणणारा, बीजगणिती.

ALIAS *ad.* (*L.*) otherwise ऊर्फ: Simon a. Smith.—*n.* दुसरें नांव *n.*

ALIBI (*L.*) elsewhere दुसऱ्याजागीं, अन्यत्र [*Law,* when a person, on trial for a crime, shows that he was in another place at the same time when the act was committed, he is said to prove an *alibi*; the plea or defense under which this proof is made.]

ALIEN *a.* (*alienus,* another) विदेशी; adverse विरुद्ध: principles a. to our religion. -ATE *v.* transfer to another, as property or right दुसऱ्याच्या हातीं देणें -हवालीं क.; estrange प्रीति -मन उठवणें, स्नेह तोडणें, विरजण घालणें: to a. a man from the friends of his youth. —*a.* मन उडालेला, विरक्त, विमनस्क. -ATION एकाकडून दुसऱ्याकडे देणें *n* -करणें *n;* वैमनस्य *n,* विरक्ति *f.*

ALIGHT* *v.* get down उतरणें, खालींयेणें (गाडी, घोडा वगैरे वरून); descend and settle उतरून बसणें -राहणें -ठरणें [from, upon.]

ALIKE* *a.* (*a* and *like*) एकसारखा, सारखा, समान.—*ad.* एकाच रीतीनें, तसाच, सारखा.

ALIMENT (*alere,* to feed) पौष्टिक अन्न *n,* आहार, खुराक. -AL *a.* पौष्टिक, पोषक, पुष्ट. -ARY *a.* खाण्याचा, खाद्यसंबंधी (substances.)—ALIMONY, allowance made to a wife out of her husband's estate, or income for her support, upon her divorce or separation from him, or during a suit for the same बायको नवऱ्यापासून वेगळी झाल्यावर तिला जें पोटासाठीं मिळतें तें *n,* जीतरोटी *f.*

ALIQUANT *a.* (*alius,* other, *quantus,* how great) सशेष विषम भाजक: 5 is an a. part of 16.

ALIQUOT *a.* *L.* निश्शेष भाजक: 5 is an a. part of 15.

ALIVE* *a.* (*a* and *live*) जीवंत, सजीव; in a state of action चालता, जागृत, चालू, जागता: to keep the process a.; cheerful उल्लासी, आनंदी: the company were all a.; all a. गजबजीत, जागता: the city was all a.; having susceptibility ग्राहक, ग्रहणपात्र: he is a. to Nature's laws; of all living, in all the world, सर्व माणसांपेक्षां, सगळ्या जगांत: he was the proudest man a.

ALKALI *Ar.* एक क्षार आहे त्याच्या योगानें पदार्थांचा अंबटपणा जातो; क्षार, खार.—ALKALINE *a.* क्षाराच्या गुणाचा, क्षारगुणक.

ALL * *a.* अवघा, सगळा, सर्व; a. without exception, a. whatsoever झाडून, सगळा, यावत्.—*n.* the whole number सर्व, अवघा समुदाय; a. along मुळापासून: a. at once एकाएकीं; a. alone केवळ, एकला; a. through भर (in comp. दिवसभर); at a. कांहींच, किमपि; one's all सर्वस्व.—*ad.* अगदीं, सर्व; a. one एकूण एक; a. hollow अगदीं, सफा: to beat one a. hollow.

ALLAY * *v.* make quiet विझविणें, उपशमन -थंड क.: to a. civil commotions, tumult

of the passions; mitigate हलका -नरम क., शमवणें (grief or pain); repress रग मोडणें -उतरणें [by, with].

ALLEGE *v.* (*-legare,* to send) affirm निश्चयपूर्वक -खचीत बोलणें-सांगणें, इकरार क. (a fact); produce, as an argument, plea, or excuse निमित्त -कारण -सबब सांगणें: to a. the authority of a judge [against].—ALLEGEABLE *a.* सांगण्याजोगा, वचनीय.—ALLEGATION खचीतपणें सांगणें *n,* निश्चितकथन *n,* इकरार; निमित्त *n,* कारण *n,* प्रमाण *n.*

ALLEGIANCE (*-ligare,* to bind) प्रजाधर्म, राजसेवा *f,* बंदगी *f.*

ALLEGORY (*Gr. allos,* other, *agora,* assembly) a figurative sentence or discourse, in which the principal subject is described by another subject resembling it in its properties and circumstances दृष्टांतरूप कथा *f,* रूपक *n,* अप्रस्तुत प्रशंसालंकार.—ALLEGORICAL *a.* दृष्टांतरूप, लाक्षणिक.

ALLELUIA *Heb.* परमेश्वराची स्तुति कर अशा अर्थाचा शब्द, 'हालेलुया.'

ALLEVIATE *v.* (*-levis,* light) हलका-नरम-कमी क., शमवणें (pain, care, punishment, a burden, &c.).—ALLEVIATION उपशमन *n,* शांति *f.*

ALLEY *F.* a walk in a garden बागेंत फिरण्याची वाट *f,* उपवन मार्ग; a narrow passage आळी *f,* गल्ली *f,* बोळ.

ALLIANCE, See under ALLY.

ALLIGATION (*-ligare,* to bind) एकत्र बांधणें *n,* सयोजन *n*; *Arith.* मिश्रगणित *n.*

ALLIGATOR (*-lacerta,* lizard) मगर, सुसर, नक्र.

ALLITERATION (*-litera,* letter) the repetition of the same letter at the beginning of two or more words immediately succeeding each other, or at short intervals प्रास, अनुप्रास.

ALLOT * *v.* distribute by lot चिठ्या टाकून वांटून देणें, distribute in portions विभाग करून वांटणें, वांटणी करणें, वांटणें; give देणें: let every man be contented with that which Providence *allots* to him [to].—वांटणें *n,* वांटणी *f*; thing allotted वांटा; that which is assigned by the act of God भोग, अन्नोदक *n,* दाणापाणी, शेर, भोगतृत्व *n.*

ALLOW *v.* (*-locare,* to place) give देणें: to a. a servant his liberty; admit मान्य -कबूल क. (a claim); permit परवानगी देणें, साहणें, -ऊं देणें: to a. a son to be absent; deduct मजुरा -वजपा घालणें -धरणें: to a. a sum for tare; approve, justify, पसंत -मंजूर क. (Luke xi. 48). -ABLE *a.* मानायाजोगा, ग्राह्य; lawful मोकळीक देण्याजोगा, उचित, योग्य: a certain degree of freedom is a. among friends. -ANCE परवानगी *f*; दरमहा, वेतन *n*; food allowed सिधा, भत्ता, शेर; a portion appointed रतीब, चंदी *f*; indulgence सूट *f,* माफी *f*; admission अंगिकार, मान्यता *f*; *Com.* customary deduction from the gross weight of goods वजपा; annual a. वर्षासन *n*; extra a. खेरीज मुशारा; monthly a दरमहा; for the maintenance of temples देवस्थान *n.*

ALLOY *v. F.* reduce the purity of by mixing with a less valuable substance हीण घालून बिघडविणें, हीण घालणें, हीणकस क.; corrupt बिघडणें, कलंक लावणें, विरजण घालणें. —*n.* हीण *n,* भेळ *f*; न्यूनता *f,* विरजण *n.* -ED हिणकट केलेला, हिणकस, खोटसाळ, मिसळीचा, सकलंक, डागील.

ALLSPICE शितळचिनी *f,* कंकोळ *n.*

ALLUDE *v.* (*-ludere,* to play) बोलण्याचें धोरण असणें, सुचविणें, लक्ष्य -धोरण ठेवून बोलणें [to]. —ALLUSION -कडे बोलण्याचें

धोरण *n*, इंगित *n*, सूचना *f*, इशारत *f*.— ALLUSIVE *a*. सूचनेचा, संज्ञिक, व्यंगोक्तीचा.

ALLURE *v*. *F*. attempt to draw to मन वळविण्याचा यत्न क.; entice मोहणें, भुलवणें, गूळखोबरें देणें [by, to, with]. -MENT मथणें *n*, मोहन *n*; लालूच *f*, खाऊ, आमिष *n*.

ALLUVIUM, ALLUVION (*-lavare*, to wash) *Law*, gradual increase of earth on a shore, or bank of a river, by the force of water, as by a current or by waves मळी *f*, होर *f*. [The owner of the land thus augmented has a right to the alluvial earth].—ALLUVIAL *a*. मळीचा, मळईचा; मळीच्या जमिनीचा.

ALLY *v*. (*-ligare*, to tie) connect by marriage सोयरीक -शरीरसंबंध क., घर जोडणें; —by treaty or league सख्यसंबंध क.; कट -जूट क.; form a relation between by similitude सारखेपणा वरून संबंध जोडणें -क. [to, with]. —*n*. तहाच्या योगानें मित्र झालेला राजा; जुटींतला राजा -लें संस्थान *n*; मित्र, सहकारी.—ALLIANCE सोयरिकीचें नातें *n*, शरीरसंबंध; राजांमध्यें परस्परांचा एकोपा-बनाव, सख्यसंबंध; जूट *f*, संधि *f*, संगनमत *n*, the persons allied जूट *f*.

ALMANAC *Ar*. पंचांग *n*.

ALMIGHTY* *a*. & *n*. (*all* and *mighty*) सर्वसमर्थ -शक्तिमान; सर्वशक्तिमान ईश्वर, परमेश्वर.—ALMIGHTINESS अनंतशक्ति *f*, सर्वसामर्थ्य *n*.

ALMOND *F*.—the nut बदाम *m*, *n*; —the tree बादामी *f*, बादाम *f*; — the kernel बादामगोळा; *pl* the glands of the throat अमृतकला *f pl*.

ALMOST* *ad*. (*all* and *most*) बहुतकरून, प्रायः, जवळ;—best rendered by other constructions: my work is a. done माझें काम संपत आलें आहे: it is a. ten o'clock दाहा वाजायास आले: he had a. reached the village तो गांवाजवळ पोंचला होता.

ALMS* भीक *f*, भिक्षा *f*, धर्म. -MAN भिक्षोपजीवी.— ALMONER भिक्षेचा कारभारी, भिक्षाध्यक्ष.—ALMONRY धर्मपोई *f*, अन्नसत्र *n*.

ALOE *L*. कोरफड *n*, *f*.—*pl Med*. the inspissated juice of several species of aloe एलिया, बोळ.— ALOESWOOD, a precious wood अगरू *n*.

ALOFT* *ad*. (*a* and *loft*) उंच, वर, वरतें; at the mast-head डोलावर.

ALONE *a*. (*all* and *one*) solitary एकटा, एकला (Gen. ii. 18); to let a. असूं देणें, राहूं देणें, जाऊं देणें, वाटेस न जाणें: let me a. for that मला त्याविषयीं विचारूं नको -बोलूं नको.—*ad*. वेगळा, एकटा.

ALONG* *ad*. by the length लगतीनें, बाजूनें; forward पुढें: let us walk a.; get a. चल, नीघ; all a. दोनीं शेवटें धरून, पहिल्या पासून, सार्धंत, वाटभर; in company मिळून, संगतीनें; with बरोबर, सहवर्त्तमान, सहित.—*prep*. बाजूनें. -SIDE *ad*. जवळून, बाजूनें.

ALOOF* *ad*. & *prep*. (*all* and *off*) कांहींसा -अमळसा दूर: stand a.

ALOPECY (*Gr*. *alopex*, fox) केंस झडण्याचा रोग, चाई *f*, उंदरी *f*.

ALOUD* *ad*. (*a* and *loud*) मोट्या स्वरानें, मोठ्यानें.

ALPACA *Sp*. a camel-like beast उंटासारखें एक जनावर आहे; cloth made of the wool of the alpaca त्याच्या केशाचें कापड, 'आलपाका.'

ALPHA (*Gr*.) the first letter in the Greek alphabet ग्रीक वर्णमालेचें पहिलें अक्षर *n*; beginning प्रथम, आदि, मूळ, आरंभ (Rev. i. 8). -BET मूलवर्ण *pl*, अक्षरमाला *f*. -ICAL *a*. अक्षरानुक्रमाचा, वर्णक्रमानुसारी.

ALREADY* *ad*. (*all* and *ready*) पूर्वीच, मागें; —best rendered by चुकणें: मीं सांगून चुकलों I have told you a.

ALSO* *conj*. likewise तसेंच, तद्वत; too ही, पण, देखील.

ALTAR (*altus*, high) an elevated place on which gifts and sacrifices are offered to some deity वेदि *f*, स्थंडिल *n*; in Christian churches, the communion table प्रभुभोजनाचें मेज *n*.

ALTER *v.* (*alter*, another) change entirely फिरवणें, रूपांतर क., बदलणें; make some change in कांहींसा -थोडासा फेरफार क.— *i.* पालटणें, बदलणें, फिरणें. -ABLE *a.* बदलायाचा, -जोगा, फेरफार करण्याजोगा, परिवर्त्तनीय. -ATION पालट, विकार; अधिकउणें *n*, न्यूनाधिक्य *n*.—ALTERCATE *v. i.* contend in words तोंडास तोंड देणें, वाग्युद्ध क.; dispute with zeal, heat, or anger निकरानें भांडणें, तकरार क.—ALTERCATION झटपट *f*, हंबेतुंबे *f*, कटकट *f*, कलागत *f*; controversy विवाद, तकरार *f*, वाद.—ALTERNATE *a.* being or acting by turns आळीपाळीचा, पर्यायाचा, एकांत्रा.—*n.* पाळीपाळीनें घडणारा; a substitute बदली.—*v.* आळीपाळीनें -वारगीपारगीनें क.; change reciprocally -चा परस्पर पालट -फेर मुबदला क.—*i.* आळीपाळीनें घडणें, -होणें; -च्या एका आड एक होणें -येणें. -LY *ad.* आळीपाळीनें, आलटून पालटून.— ALTERNATIVE *n.* choice between two things दोन गोष्टींतून एकीची निवड *f*, विकल्प, इलाज, आवडनिवड *f*; [the word cannot be applied to more than *two* things; when one thing only is offered, it is said there is no a.].

ALTHOUGH* *conj.* (*all* and *though*) however जरीं, यद्यपि; notwithstanding तरीं, तथापि.

ALTITUDE (*altus*, high) उंची *f*, उच्चत्व *n*; —of a heavenly body उन्नति *f*, उन्नतांश.

ALTOGETHER* *ad.* (*all* and *together*) अगदीं, केवळ, निस्तुक, निःशेष.

ALUM (*alumen*) फटकी *f*, तुरटी *f*. -INOUS *a.* फटकीचा, स्फटीमय.

ALUMNUS (*alere*, to nourish) pupil, as of a university महाविद्यालयाचा विद्यार्थी.

ALWAYS* *ad.* perpetually नित्य, सर्वदा, सर्वकाल: God is a. the same; continually निरंतर, अखंड, सदां (John viii. 29); regularly at stated intervals नेमलेल्या वेळीं, नित्य नेमानें (2 Sam. ix. 10).

AMAIN* *ad.* (*a* and *main*) with force जोरानें, बळ करून; suddenly एकाएकीं, एकदम.

AMALGAM (*Gr. -malassein*, to soften) compound of mercury with another metal पारदमिश्रधातु *f*; a compound of different things मिश्रण *n*, मिसळ *f*. -ATE *v.* पारा आणि दुसरी धातूची मिसळ क.; मिश्र क. [with].—*i.* मिळणें, जमून जाणें. -ATION पारदान्यधातुमिश्रण *n*; मिसळ *f*.

AMANUENSIS (*-manus*, hand) दुसरा सांगत असतां लिहिणारा, लेखक, मदतनीस, अन्यकथितलेखक.

AMARANTH (*Gr. -marainein*, to decay)— globe a. गुलमखमल *f*; yellow a. आबोली *f*; the plant आबोलें *n*; eatable a. तांदुळजा; hermaphrodite a. राजगिरा; round-headed a. माठ; *Poet.* न कोमणारें फूल *n*, अम्लान पुष्प *n*. -INE *a.* आबोलीचा, -सारखा &c.

AMASS *v.* (*-massa*, a heap) गोळा -रास -संचय क., जोडणें (a treasure); collect in great numbers सांठविणें, मिळवणें (words or phrases).

AMATORY *a.* (*amare*, to love) शृंगाराचा, शृंगारिक; causing love मोह उत्पन्नकरणारा, मोहक (potions).

AMAZE *v.* (*a* and *maze*) confound with fear घाबरविणें, व्याकुल क., पांचावर धारण बसवणें; astonish चकभूल -चक्क -विस्मित क.; to be *amazed* तोंडांत बोट घालणें [with, by]. -MENT घाबरेपणा; त्रेधा *f*, गडबड *f*, तिरपीट *f*; चकभूल *f*, आश्चर्य *n*, विस्मय *n*.—AMAZINGLY *ad.* विस्मय वाटायाजोगा, अद्भुत; excessively अतोनात, अजब, अतिशयः a. covetous अतिलुब्ध.

AMAZON (*Gr. -mazos*, the breast) पटाईत बायको *f*, शूरविक्रमा *f*.

AMBASSADOR, see EMBASSADOR.

AMBER *Ar.* a mineral highly electric तृणग्राहीमणि, तैलस्फटिक. -GRIS an animal perfume अंबर.

AMBIDEXTER *n.* & *a.* (*ambo*, both, *dextra*, the right hand) ज्याचे दोनी हात सारखे कामास लागतात तो, उभयहस्तकुशल, सव्यसाची; one equally ready to act on either side दोन्ही पक्षांकडला, द्विपक्षपाती, दोहों मांडवांचा वऱ्हाडी, दोहों दरडीवर हात ठेवणारा; *Law*, a juror who takes money from both parties for giving his verdict दोनी पक्षांकडून लांच खाणारा पंच.

AMBIENT *a.* (*amb*, around, *ire*, to go) वेढणारा, वेष्टक.

AMBIGUITY (*ambiguus*) दुटप्पीपणा, दुग्धा *f*, *m*, संदेहार्थ.— AMBIGUOUS *a.* दोन अर्थांचा, द्व्यर्थी, दुटप्पी, भ्रांतिवट, संदिग्ध.

AMBITION (*ambire*, to go around) a desire of preferment, honor, superiority, or power हौस *f*, महत्त्वेच्छा *f*, तृष्णा *f*, उत्कृष्टपदवांच्छा *f*, राज्यलोभ [for, of].— AMBITIOUS *a.* हौसदार, महत्त्वेच्छु, दीर्घसंधानी; महत्त्वेच्छेचा (style).

AMBLE *v. i.* (*ambulare*, to walk) सात्रकचालीनें चालणें.—*n.* सात्रकचाल *f*, टाकणचाल *f*.

AMBROSIA (*L. Skr. mri*, to die) *Myth.* food of the gods देवांचें अन्न *n* -खाद्य *n*, देवान्न *n*.—AMBROSIAL *a.* अमृतासारखा, अमृततुल्य, अमृतोपम; मधुर, सुवासिक.

AMBUSH *F.* ambuscade दबा धरण्याची जागा *f*; troops posted in a concealed place, for attacking by surprise दबा धरून राहिलेली फौज *f*; act of attacking an enemy unexpectedly from a concealed station दबा धरून हल्ला क. *n.* —AMBUSCADE दबा धरण्याची जागा *f*, दडण *f*.

AMELIORATE *v.* (*-melior*, better) बरें क., सुधारणें [by].—*i.* बरें -नीट होणें, सुधरणें. —AMELIORATION सुधारणूक *f*.

AMEN *Heb.* so be it तथास्तु, स्वस्ति.

AMENABLE *a.* (*F. -mener*, to lead) मोसबेदार, जबाबदार [to]; submissive आज्ञांकित, हुकमी.

AMEND *v.* (*-menda*, a fault) चूक काढणें, शुद्ध क.;—as moral conduct सुधारणें, ताळ्यावर -वाटेवर आणणें; supply a defect दुरुस्त क., सुधारणें [by, with].—*i.* सावरणें, नीट होऊं लागणें, निटावणें. -MENT शोधन *n*, शोध; दुरुस्ती *f*, सुधारणा *f*, सावर; *Law*, शोध. AMENDS *pl* recompense केलेलें कर्म निस्तरणें *n*, प्रतिफल *n*; compensation वजपा, मोबदला; *v.* to make *amends* निस्तरणें.

AMENITY (*amœnus*, pleasant) जाग्याची रमणीयता *f*; रम्यता *f*, प्रियता *f*.

AMERCE *v.* (*-merces*, wages) द्रव्यदंड क., दंड करणें [in].

AMERICAN *a.* अमेरिका खंडांतला.—*n.* अमेरिकेंत राहणारा मनुष्य.

AMETHYST (*Gr. amethustos*, without drunkenness) a precious stone याकूत.

AMIABLE *a.* (*amare*, to love) प्रीतीस योग्य, प्रीतिपात्र, भला.—AMIABILITY भलेपणा, प्रियता *f*.—AMIABLY *ad.* भलेपणानें, प्रीतिपूर्वक.

AMICABLE *a.* (*amicus*, friend) मित्रपणाचा, मैत्रीचा, गोडीचा.—AMITY मैत्री *f*, सख्य *n*, स्नेह;— between nations संधि, सलुका, दोस्ती *f*.

AMID, AMIDST, * *prep.* among मध्यें, माजीं; in the midst मध्यभागीं, मध्यवर्ती, मध्यें; surrounded by घेरलेला, मध्यें, वेष्टित: a. the waves.

AMISS *a.* (*a* and *miss*) अयोग्य, अनुचित: it may not be a. to ask advice. —*ad.* वांकडें, अन्यथा, भलतें (James iv. 3.)

AMITY, see under AMICABLE.

AMMONIAC (*Ammon*, a title of Jupiter) नवसागर.

AMMUNITION (*-munire*, to fortify) दारूगोळा, युद्धसाहित्य *n*.

AMNESTY (*Gr. amnestos*, forgotten) gene-

ral pardon of the offenses of subjects against the government सरमाफी *f*, राजक्षमा *f*; the proclamation of such pardon सरमाफीचा जाहीरनामा, माफीनामा, क्षमापत्र *n* [for].

Among, Amongst, *prep.** मध्यें, आंत; from a. पैकीं; making part of the number of -च्यांतला, -च्या मधून (Luke i. 28).

Amorous *a.* (*amor*, love) inclined to love कामेच्छु, सकाम, स्त्रीलंपट, इष्कबाज; enamored भुललेला, रत, मोहित; relating to love इष्की, शृंगाराचा, शृंगारिक.

Amorphous *a.* (*Gr. -morphè*, shape) ज्यास नियमित आकार नाहीं तो; without crystallization in the ultimate texture of a solid substance जो स्फटिकरूप नाहीं तो; anomalous नियमास सोडून, विलक्षण.

Amount *v. i.* (*-mons*, mountain) go up वर जाणें -चढणें; come in the whole एकंदर होणें, भरणें: the interest on the several sums *amounts* to ten rupees; be equivalent निघणें, अर्थ -हांसल निघणें: the testimony of these witnesses *amounts* to very little.—*n.* sum total जमा *f*, रकम *f*, बेरीज *f*; original a. असल जमा *f* -बाब *f*; adventitious a. असबाब *f*, अजबाब जमा *f*; the result हांशील *n*, फळ *n*, सार *n*, अर्थ.

Amphibious *a.* (*Gr. amphi*, on both sides, *bios*, life) जमिनीवर व पाण्यांत राहणारा, जलस्थलवासी; adapted for living on land or water जमिनीवर किंवा पाण्यांत राहण्याजोगा; of a mixed nature मिसळीचा, भेळीचा (a breed).

Amphibology (*Gr. -logos*, discourse) दुटप्पी बोलणें *n*, द्व्यर्थक भाषण *n*.

Amphisbæna (*Gr.-bainein*, to go) महांडूळ *n*, दुतोंडें *n*.

Amphitheatre (*Gr. amphi*, about, *theatron*, theatre) अर्धचंद्राकार रंगशाला *f* -तालीमखाना.

Ample *a.* (*amplus*, wide) लांबरुंद, प्रशस्त, अघळपघळ (room) ; abundant पुष्कळ, पुरून उरेसा, चळचळीत: a. provision; a. justice प्रशस्तन्याय; liberal उदार, प्रशस्त (promises); diffusive सविस्तर, पाल्हाळाचा: an a. narrative.—Amplify *v.* (*-facere*, to make) enlarge विस्तारणें, वाढविणें; treat copiously पाल्हाळ करून -फुगवून -वाढवून -लांबवून सांगणें [on].—*i.* वाढणें, विस्तारणें; on, upon विस्तारानें सांगणें, विस्तारणें.—Amplification विस्तार, वृद्धि *f*; पाल्हाळ, अर्थवाद, तांडव *n*. —Amplitude, extent लांबीरुंदी *f*, विस्तीर्णता *f*; greatness मोठेपणा, महत्व *n*: the a. of the earth; capacity आकलनशक्ति *f*, धारणशक्ति *f*, आवांका: a. of the mind; abundance घळघळीतपणा, विपुळता *f*, प्रचुरत्व *n*.—Amply *ad.* प्रशस्तपणानें; विस्तारानें, सविस्तर; घळघळीत, सढळपणानें.

Amputate *v.* (*amb*, about, *putare*, to prune)— a limb अंगछेदन क., अंग कापणें. —Amputation अंगछेदन *n*.

Amulet *Ar.* ताईत, तोडगा, तापाचा दोरा, यंत्र *n*, वगैरे.

Amuse *v. F.* entertain agreeably रंजवणें, रमवणें, करमणूक क.; one's self रमणें, रतणें; keep in expectation नादीं लावणें, भुलथाप देणें; deceive फसविणें [with]. -ment रंजन *n*, रमणूक *f*, विनोद; that which amuses गमत *f*, मौज *f*, तमाशा. —Amusing रमवणारा, मौजेचा, कौतुकाचा, मनोरंजक.

An *art.* कोणता तरी एक, एखादा.

Anabaptist (*Gr. ana*, again, *baptizein*, to baptize) one who denies the validity of infant baptism, and who of course maintains that those who have been baptized in their infancy ought to be baptized again प्रौढपणीं मात्र बाप्तिस्मा करावा व ज्याचा बालपणीं बाप्तिस्मा झाला

असेल त्याला पुनः बाप्तिस्मा द्यावा असें मत बाळगणारा, पुनर्जलसंस्कारमतावलंबी.

ANACHRONISM (*Gr. -chronos,* time) कालगणनेंत चूक *f,* कालगणनाविपर्यय, कालविरोध.

ANAGRAM (*Gr.-gramma,* letter) transposition of the letters of a name, by which a new word is formed नांवाचीं अक्षरें फिरवून त्यांपासून नवा शब्द करणें *n,* नामाक्षरविपर्यासिद्धशब्द : *William Noy* may be turned into *I myol in law.*

ANALOGY (*Gr. -logos,* proportion) agreement or likeness between things in some circumstances or effects, when the things are otherwise entirely different सारखेपणा, सादृश्य *n,* उपमा *f.*—ANALOGICAL *a.* सादृश्यतेवर स्थापिलेला, उपमान.—ANALOGOUS *a.* सारखा, सदृश, अनुरूप.

ANALYZE *v.* (*Gr. -luein,* to loose) resolve into its elements -चीं तत्वें निराळीं क.—ANALYSIS मूलतत्वीकरण *n,* मूलतत्वविवेचन *n,* पृथक्कृति *f;* a brief, methodical illustration of the principles of a science सार *n* : वेदांतसार.

ANAPEST (*Gr.-paiein,* to strike) a metrical foot containing two short syllables and one long सगण.

ANARCHY (*Gr. -archè,* government) want of government अंधाधुंदी *f,* अराज्य *n,* बदअमल; political confusion बंडाळी *f,* झोटिंगपाच्छाई *f;* confusion धांदल *f,* गोंधळ, घोंटाळा.—ANARCHICAL *a.* बेबंद, अराजक, अंधाधुंदीचा, निर्नायकीचा.

ANASARCA (*Gr. -sarx,* flesh) dropsy of the cellular tissue नळगूत *n.*

ANATHEMA (*Gr.*) an ecclesiastical curse वाळीत *n,* बहिष्काराभिशाप; person or thing anathematized शापित मनुष्य किंवा वस्तु *f.*

ANATOMY (*Gr. -temnein,* to cut) doctrine of the structure of an organized substance, learned by dissection; art of dissecting the different parts of any organized body शरीरव्यवच्छेदनविद्या *f;* fig. act of dividing anything व्यवच्छेदन *n;* a skeleton सांपळा.—ANATOMICAL *a.* शारीरशास्त्र संबंधी.—ANATOMIST शरीरव्यवच्छेदनकर्त्ता. —ANATOMIZE *v.* शरीरव्यवच्छेदन क.; पृथक्करण क.

ANCESTOR (*-cedere,* to go) a forefather वडील, पूर्वज, पितर; *pl.* वाडवडील *pl,* बापदादे *pl;* acquired by one's *ancestors* वडिलोपार्जित; through one's *ancestors* वडिलोवडलीं; to abuse one's *ancestors* सात-बेताळीस पिढया उद्धरणें.—ANCESTRAL *a.* वडीलांचा, पैत्र; descending from *ancestors* वडील परंपरागत.—ANCESTRY, lineage कुल-वृद्धपरंपरा *f,* पितर *pl,* वाडवडील *pl;* birth or honorable descent कुलीनता *f,* खानदानी *f.*

ANCHOR *n.* (*anchora*) an iron instrument for holding a ship or other vessel at rest in water नांगर, लंगर; that which gives stability धीर, आधार, आश्रय (Heb. vi. 19).—*v.* नांगरणें, नांगर टाकणें;—for a season बंदर-ओरवा क.; fix or fasten बसविणें, जडविणें : to a. the cables of a suspension bridge. -AGE गलबतें नांगरण्याची जागा *f,* नांगरवाडा; duty imposed on a ship for anchoring in a harbor खुटवा. -ING नांगरणी *f;* mooring ओरवा.

ANCHORITE (*Gr. ana,* up, *choros,* place) a hermit वनवासी, तपस्वी, गोसावी; Brahman of the third order वानप्रस्थ.

ANCIENT *a.* (*ante,* before) old जुना, पुरातन, प्राचीन (authors); of great age वयोवृद्ध, जुना, पुरातन (forest); known from ancient times जुना, प्राचीन -जुन्या काळा पासून ठाऊक असलेला : the a. continent.—*n. pl* very old men वृद्ध मनुष्यें; *pl* governors, rulers, &c. अधिकारी, सत्ताधीश (Is. iii. 14); God is called the "Ancient of Days," पुराणपुरुष, from His eternal existence (Dan. vii. 9). -LY *ad.* जुन्याकाळीं, पूर्वी प्राचीनकाळीं.

AND *conj.* आणि, व; a. so forth इत्यादि, वगैरे.

ANECDOTE (*Gr. -didonai,* to give) an incident of private life कुळकट *n,* कुळकथा *f;* a particular or detached incident or fact of an interesting nature फुरडुकें *n,* चुटका.

ANEW* *ad.* (*a* and *new*) over again पुनः, पुनरपि; in a new form नव्यानें, पुनः : to create a.

ANGEL,* a messenger जासूद, दूत, चार; a spiritual being, employed by God to communicate His will to man दूत, दिव्यदूत, ईश्वराचा दूत (Heb. i. 14); an evil spirit दुष्टआत्मा, भूत *n* (Rev. ix. 11); a. of death (Hindu term) यमदूत; recording a. चित्रगुप्त. -IC, -AL, *a.* दुताचा, दुतासंबंधी.

ANGER (*angere,* to choke) a strong passion or emotion of the mind excited by a real or supposed injury to, or intent to injure, one's self or others राग, क्रोध, कोप; to vent a. upon -वर रागें भरणें.— *v.* enrage राग आणणें; smart खिजवणें, चिडवणें, खाजवणें.—ANGRY *a.* रागावलेला, क्रुद्ध, कोपायमान: God is a. with the wicked every day; to be a. रागें भरणें; to become a. रागावणें; showing anger रागीट, क्रोधाचा, क्रोधयुक्त (words); inflamed, as a sore खिजविलेला, विकोपास गेलेला; red लाल (hue); stimulated प्रदीप्त, चेतलेला (appetite).—ANGRILY *ad.* रागानें, रागें भरून.

ANGLE (*angulus,* a corner) कोपरा, कोन; fishing tackle गळ; *Geom.* कोन;— acute a. लघुको.; obtuse a. विशाळको.; right a. काटको.; rectilineal a. वक्ररेषाको.; contiguous a. समीपको.; external a. बाह्यको.; oblique a. लघुको.; vertical *angles* समोरासमोरचे कोन.—ANGULAR *a.* कोनाचा, सकोन.—ANGLE *v.* गळ टाकणें, गळानें मासे धरणें; use some bait गूळखोबरें दाखविणें.—*n.* गळ.—ANGLER गळकरी, गळानें मासे धरणारा.

ANGLICAN *a.* (*Angli,* the Angles, a German tribe) इंग्लंड देशाचा -संबंधी.—ANGLICIZE *v.* make English इंग्लिश लोकांच्या चाली वगैरेचें रूप देणें; render conformable to the English idiom इंग्लिश भाषेच्या चाली प्रमाणें रूप देणें -लिहिणें.—ANGLICISM इंग्लिश भाषेची शैली *f* -पद्धती *f.*

ANGUISH (See ANGER) extreme pain;—of body शरीरपीडा *f,* यातना *f;*—of mind मनस्ताप, मनोवेदना *f.*

ANIMADVERT *v.* (*animus,* mind, *advertere,* to turn to) मन लावणें, विचार क.; remark by way of criticism or censure गुणदोष दाखवून बोलणें, दोष ठेवून -काढून बोलणें, बोल लावणें [upon]. —ANIMADVERSION, बोल, दोषारोपक भाषण *n.*

ANIMAL (*anima,* breath; *Skr. an,* to breathe; *anil,* wind) an organized living being endowed with sensation and the power of voluntary motion सदेह प्राणी, प्राणी, शरीरी, जीव; an irrational being हैवान, पशु; a rational a. सुबुद्ध प्राणी.—*a.* प्राण्यासंबंधी, जीवसंबंधी, जीव (in comp.); consisting of the flesh of animals मांसाचा, मांस in comp. (food). -CULE लहान प्राणी, जीवजंतु, क्षुद्रजंतु. -CULAR *a.* क्षुद्रजंतुसंबंधी.— ANIMATE *v.* give natural life to -ला जीव देणें, सजीव -सचेतन क.: the soul *animates* the body; heighten the powers or effects of -स रंग जीव आणणें (a lyre); give spirit चेव आणणें, उचल -उठावणी क., प्रोत्साहन क. [with, by].—*a.* सजीव, सचेतन; उत्तेजित; रसिक.—ANIMATION सजीव क. *n;* उचल *f,* उठावणी *f,* उत्तेजन *n;* पाणी *n,* तेज *n,* जीव; रंग, उत्साह. —ANIMOSITY, active enmity वैर *n,* अतिशत्रुत्व *n,* द्वेष, अदावत *f.*

ANISE (*anisum*) शेपू *f,* बडीशेप *f.*

ANKLE* (पायाचें) मणगट *n*, गोंफा. -BONE पायाचा डोळा, घोटा, खुबा.

ANNALS *n. pl* (*annus*, year) दरवर्षाचा-प्रतिवार्षिक इतिहास -वृत्तांत; relation of events in chronological order कालानुक्रमाप्रमाणें इतिहास; periodical publication, containing records of discoveries &c. विद्येसंबंधी शोधाचें वगैरे नियमित काळीं निघणारें पुस्तक *n*.

ANNATS *pl* (*annus*, year) प्रथम फल *n*, नवधान्य *n*.

ANNEAL * *v*. heat in order to fix colors रंग स्थिर करण्यासाठीं (कांच वगैरे) तापविणें; temper glass कांच नरम क.

ANNEX *v*. (*-nectere*, to tie) connect जोडणें; unite at the end शेवटास जोडणें, दुमाल्यास लावणें; add as a smaller thing to a greater मोठ्या वस्तूस लहान वस्तु जोडणें, सामील क., मिळवणें: to a. a province to a kingdom; connect जोडणें: to a. a penalty to a prohibition. -ATION जोडणें *n*, संयोग; नवीन देश -प्रांत (स्वराज्यास) जोडणें *n*, खालसा क. *n*.

ANNIHILATE *v*. (*-nihilum*, nothing) reduce to nothing नाहींसा क., लय क.; destroy the form or peculiar distinctive properties of नाश -उच्छेद -भंग क.: to a. a forest.—ANNIHILATION क्षय, लय; नाश, विध्वंस, भंग, फन्ना.

ANNIVERSARY (*annus*, year, *versum*, to turn) a day celebrated as it returns each year वर्षाचा दिवस, प्रतिवार्षिक दिवस, वर्षी *f*; a. of a birth वाढदिवस;—of a death मृततिथि *f*, वर्षी *f*;—of the incarnation of a Hindu deity जयंति *f*; the act of celebration वाढदिवस पाळणें *n*, जयंतीचा उत्साह.—*a*. प्रतिवर्षाचा, प्रतिवार्षिक (a feast).

ANNOTATE *v. i*. (*-nota*, mark) make marks टिपण -विवरण क.; comment टीका -भाष्य क. [upon].—ANNOTATION टीका *f*, भाष्य *n*; टिपण *n*, विवरण *n*.—ANNOTATOR टीकाकार, भाष्यकार.

ANNOUNCE *v*. (*-nunciare*, to report) publish जाहीर -प्रसिद्ध -विदित क.: the birth of the Lord Jesus Christ was *announced* by an angel; declare by judicial sentence न्यायाचा ठराव जाहीर क. [to]. -MENT खबर देणें *n*, निवेदन *n*, घोषणा *f*; advertisement जाहिरात *f*; publication प्रसिद्धि *f*.

ANNUNCIATE, See ANNOUNCE.—ANNUNCIATION,— of the Virgin Mary कुमारी मारया हिला निरोप आल्याचा दिवस.

ANNOY *v*. (*-nocere*, to hurt) त्रास -उपद्रव -तसदी देणें, छळणें [by]. -ANCE इजा *f*, तसदिया *f*, नड *f*, त्रास, उपद्रव.

ANNUAL *a*. (*annus*, year) coming yearly वार्षिक, सालाबाद, दरसाल (a feast); lasting only one year एक वर्ष मात्र वांचणारा, एकवर्षजीवी (a plant); performed in a year एक वर्षांत केलेला -करायाचा -होणारा, वार्षिक (the motion of the earth).—*n*. a small book published yearly वार्षिक पुस्तक *n*; a plant that lives but one summer एक वर्ष वांचणारें झाड *n*. -LY *ad*. वर्षाचे वर्षास, दरसाल, सालोसाल, प्रतिवर्षी.—ANNUITY, a sum of money, payable yearly, to continue for a given number of years, for life, or for ever, साल *n*, वर्षासन *n*, वार्षिक वेतन *n*, तहाहयात वर्षासन *n*. [Governments often borrow money upon annuities; that is, for a certain sum advanced on loan, the government contracts to pay the lender a specific sum, for life, or for a term of years.]

ANNUL (*-nullus*, none), See ABROGATE.

ANNULAR *a*. (*annulus*, ring) वाळ्याच्या -कड्याच्या आकाराचा, वलयाकार, कंकणाकृती.

ANNUNCIATE, See under ANNOUNCE.

ANODYNE (*Gr. -odunè*, pain) दुःख कमी करणारें औषध *n*, दुःख उपशमक औषध *n*.

ANOINT *v.* (*-ungere*) pour oil upon -वर तेल ओतणें; smear over with oil or unctuous substances चोपडणें, माखणें, तैलाभ्यंग क.; daub लेथडणें, भरवणें, चोपडणें (John ix. 6); consecrate, esp. a king, priest, or prophet by unction, or the use of oil तैलाभिषेक क.; — the eyes अंजन घालणें [with]. -ED माखलेला, चोपडलेला, अनुलिप्त; अभिषेक केलेला, अभिषिक्त: our blessed Lord Himself, who united in his own person the threefold character of king, priest, and prophet, was distinguished by the name of the Messiah, which, in the Hebrew language (*Gr. Christos*), signifies *the anointed.*

ANOMALY (*Gr. -homalos,* even) deviation from the common rule अनियम, व्यभिचार: *oxen,* the plural of *ox,* is an a. in grammar.— ANOMALOUS *a.* नियमविरुद्ध, असंप्रदायी, विलक्षण, विधिभंजक.

ANON* *ad.* quickly लागलाच, लवकर, तत्क्षणीं; again पुन:, अणखी; ever and a. वरचेवर, नेहमी.

ANONYMOUS *a.* (*Gr. -onoma,* name) बिननांवाचा, निनांवी, अनामक (a pamphlet, petition).

ANOTHER *a.* (*an* and *other*) not the same दुसरा, निराळा, वेगळा, अन्य, इतर, अंतर; (in comp. भाषांतर); one more अणखी एक: grant one request, they will ask a.; any other दुसरा कोणी, अणीक: let a. man praise thee, and not thy own mouth.

ANSWER* *v.* speak in return to परतून-उलटून बोलणें; respond to उत्तर-जाब देणें; satisfy पुरवणें, निर्वाह क.: money *answereth* all things; refute उत्तर देणें, उत्तर देऊन खंडण क. (a pamphlet); act in return उलटून -परतून क.,-देणें, प्रतिकार क.: the enemy *answered* our fire; to, bear a due proportion to, प्रमाणानें असणें, -होणें, बेतास उतरणें: the success does not a. our expectation.— *i.* उत्तर-जाब देणें -क.: there is none to a.; be accountable जाब-हिशेब देणें: we cannot a. to God for our sins; for, vindicate दोष उडवणें: a man cannot a. for his friend; solve, as a proposition in mathematics उलगडणें; to, suit with जुळणें, गांठ पडणें (Prov. xxvii. 19); echo प्रतिध्वनि होणें -उठणें: the voice seems to fly away, and a. at a great distance; stand as opposite or correlative बरोबरीचा असणें: allegiance in the subject *answers* to protection on the part of the prince; effect the object intended लागू पडणें, कामीं पडणें: gypsum *answers* as a manure on a dry soil; to a. to a call ओ-हजीर ह्मणणें;—back saucily उलटी -फेर गोष्ट सांगणें.—*n.* उत्तर *n,* जाब; प्रतिउत्तर *n,* उलटजबाब; दोषखंडन *n*; पडसाद, प्रतिध्वनि; उलगडा, किल्ली *f,* उत्तर *n.* -ABLE *a.* उत्तर देण्याजोगा; मोसबेदार, धनी; जुळण्याजोगा, जमण्याजोगा, योग्य, अनुसारी. See the verb.

ANT * मुंगी *f*; black a. मुंगळा, मुंगळी *f*; red a. चांचड *n*; white a. वाळवी *f,* उधई *f;* swarm of ants हुरण *n*; train of वऱ्हाड *n,* साईर *f.*

ANTAGONIST *n.* & *a.* (*Gr. -agonistes,* combatant) विरोधी, प्रतिपक्षी; [*Anat.* a muscle which acts in opposition to another].

ANTARCTIC *a.* (*Gr. -arctos,* bear) दक्षिण ध्रुवाकडचा -संबंधी; a. circle दक्षिण ध्रुववृत्त *n.*

ANTE *prep.* (*L.*) पूर्वी, मागें, अगोदर.

ANTECEDENT (*-cedere,* to go) मागली -पूर्वीची गोष्ट *f* -ला -चा विषय; *Gram.* the noun to which a relative refers तत्पद *n,* वाच्य *n; Logic,* the first of two propositions in an enthymeme प्रतिज्ञावाक्य *n*; *Math.* the first of two terms of a ratio प्रमाणांतलें पहिलें पद *n,* अग्रपद *n*; the *antecedents* of a person or matter पूर्ववृत्तांत -वृत्त *n,*

प्राक्संबंध.—*a.* पूर्वीचा, मागला, अग्रगामी; प्राक्संबंधी.

ANTECHAMBER दिवाणखान्यांत जाण्याची खोली *f*, सदरेची खोली *f*, पशदालन *n*.

ANTEDATE *v.*(*ante* and *date*) date before the real time खऱ्या मितीच्या अगोदर तारीख घालणें.— *n.* पूर्वीची तारीख *f*.

ANTEDILUVIAN (*-diluvium,* deluge) one who lived before the Flood जलप्रलया पूर्वीचा रहिवासी.— *a.* जलप्रलया पूर्वीचा; in Noah's time नोहाच्या वेळचा.

ANTELOPE हरण, मृग; black a. काळवीट.

ANTEMETIC *a.* (*anti* and *emetic*) उलटी बंद-करणारा, वांतिशमक.— *n.* वांतिशमक औषध *n*.

ANTENNÆ *pl* (*L.*) the feelers of an insect किड्याच्या मिशा *f pl*, -चे तंतू *pl*, -ची सोंड *f*.

ANTEPENULT (*-pæne,* almost, *ultimus,* last) शब्दाच्या शेवटील दोन वर्ण सोडून जो वर्ण तो, उपांत्यवर्णापूर्वीचा वर्ण. -IMATE *a.* उपांत्यवर्णापूर्वीचा.

ANTERIOR *a.* (*L.*) before in time पूर्वीचा, अगोदरचा; in front पुढला, अग्रवर्त्ती [to].

ANTHEM (*Gr. -thonè,* sound).

ANTHER (*Gr. anthos,* a flower) the tip of the stamen in a flower फुलांतील केसरावरची गोळी *f*, परागकोश.—ANTHOLOGY, discourse on flowers फुलांवर व्याख्यान *n*, पुष्पविद्या *f*; collection of flowers पुष्पसंग्रह; a garland पुष्पहार; a collection of beautiful passages from authors ग्रंथांतील सुंदर वेंच्यांचा गुच्छ.

ANTHROPOPATHY (*Gr. anthropos,* man, *pathos,* suffering) ascription of human passions to the Supreme Being मनुष्याचे विकार देवास लावणें *n* -वर आरोपणें *n*.

ANTHROPOPHAGI *pl* (*Gr. -phagein,* to eat) मनुष्यभक्षक, नरभक्षक. — ANTHROPOPHAGY नरभक्षण *n*.

ANTIC *a.* (*antiquus*) मस्करीचा, थट्टेचा, माकड-चेष्टेचा.—*n.* a buffoon मस्कऱ्या, भंड; चाळे *pl*.

ANTICHRIST (*Gr. anti,* against, *Christ*) a great adversary of Christ ख्रीस्तविरोधी. See 1 John ii. 18; 2 Thess. ii.

ANTICIPATE *v.* (*-capere,* to take) take before the proper time वेळे अगोदर घेणें, अगाऊ घेणें, अपकर्षण क.; take before another अवली -अघाडी साधणें -मारणें; foretaste पूर्वभोग -पूर्वानुभव घेणें; have a previous impression of होऱ्यांत -धोरणांत -लक्षांत येणें, अगा असणें: to a. the evils of.— ANTICIPATION अपकर्षण *n*, अप्राप्तकालग्रहण *n*; अवली *f*, अगपाई *f*: the a. of the joys of heaven; अगा *f*, होरा.

ANTI-CLIMAX (*anti* and *climax*) a sentence in which the ideas fall or become less important and striking at the close सारालंकार विपक्ष:

> And thou, Dalhousie, thou great god of war,
> Lieutenant-colonel to the Earl of Mar.

ANTIDOTE (*Gr. anti,* against, *didonai,* to give) remedy against poison विषावरचें औषध *n*, प्रतिविष *n*, विषभंजक *n*, जेहरमोहरा; whatever tends to prevent mischievous effect बस्ताद, धगड, गोहो.

ANTIMONY (*Gr. -monos,* alone) सुरम्याचा धातु; sulphuret of a. खरा सुरमा.

ANTINOMY (*Gr. -nomos,* law) a contradiction between two laws दोन नियमांत परस्पर विरोध; a law or other thing opposite विरुद्ध नेम.—[ANTINOMIAN, one of a sect who were charged with maintaining that, under the Gospel dispensation, the moral law is of no use or obligation.]

ANTIPATHY (*Gr. -pathos,* suffering) स्वाभाविक द्वेष, वैर *n*, विषमभाव; contrariety in the properties of matter वैगुण्य *n*.

ANTIPHRASIS (*Gr. -phrasis,* way of speaking) the use of words in a sense opposite to their proper meaning विपरीत लक्षणा *f*; as when a court of justice is called a *court of vengeance.*

ANTIPODES *pl* (*Gr.* *-podos,* foot) the people who live on the opposite side of the globe, and whose feet are, of course, directly opposite to the feet of those who live on this side परस्पराभिमुखपादलोक *pl.*

ANTIQUATE *v.* (*antiquus,* old) माजी-रद्द-निरुपयोगी क.— ANTIQUATED *p.a.* जुना झालेला; माजी, रद्द, बातल (law, words).— ANTIQUARIAN *a.* relating to antiquity, or to antiquaries प्राचीनकाळ संबंधी, अथवा प्राक्कालिक द्रव्यसंग्रह संबंधी; [a technical term for a large-sized drawing paper measuring 56 by 38 inches]. — *n.* one versed in antiquities प्राचीन काळच्या वस्तूंचा जाणता -शोध करणारा, प्राचीनकालिक द्रव्यसंग्रही.—ANTIQUE *a.* ancient जुना, प्राचीनकाळचा; of old fashion जुन्या चालीचा; See ANTIC. — ANTIQUITY, ancient times प्राचीनकाळ: the people of old times जुन्या काळचीं माणसें *n pl,* वाडवडील *pl*; ancientness जुनेपणा, प्राचीनत्व *n*; *pl* remains of ancient times प्राचीनकाळची अवशेष वस्तु *f,* कृत्यें *n pl* (coins, inscriptions, weapons, manners, &c.).

ANTISPASMODIC *a.* (*Gr.* *-span,* to draw) resisting convulsions अंगग्रहनाशक.—*n.* अंगग्रहनाशक औषध *n.*

ANTITHESIS (*Gr.* *-thesis,* a setting) opposition of words or sentiments occurring in the same sentence अर्थांतरन्यास: when our vices *leave us,* we flatter ourselves we *leave them.*

ANTITYPE (*Gr.* *-tupos,* type) प्रतिबिंब मूल *n,* बिंब *n,* दर्शक विषय, आदर्श: the Paschal lamb, in Scripture, is the type, of which Christ is the a.

ANTLER *F.* हरणाच्या शिंगाची शाखा *f,* मृगशिंगशाखा *f.*

ANUS (*L.*) the orifice of the alimentary canal गांड *f,* मलद्वार *n,* गुद *n.*

ANVIL* ऐरण *f*; to be on the a. घाटत असणें.

ANXIETY (*angere,* to cause pain) concern or solicitude respecting some event, future or uncertain, which disturbs the mind, and keeps it in a state of painful uneasiness काळजी *f,* चिंता *f,* फिकीर *f,* घोर.—ANXIOUS *a.* solicitous काळजी लागलेला, चिंतातुर, उद्विग्न; काळजी धरून करणारा -चालणारा;—app. to persons; accompanied with anxiety काळजीचा, दगदगीचा (labor); उत्सुक, उत्कंठित: a. to please; *for,* desirous इच्छु (in comp. as कल्याणेच्छु) [for, about]. -LY *ad.* काळजीनें, काळजी धरून.

ANY* *a.* one out of many कोणीही, कोणताही; some कांहीं; a. how, a. wise भलतासा, कसेंही, कसेंतरी; a. one भलता, हरकोणी; a. thing कांहींही; a. where कोठेंही; a. more अणखी, शिवाय.

AORTA (*L.*) great artery of the heart रक्ताशयाची (काळजाची) मोठी धमनी *f.*

APACE* *ad.* (*a* and *pace*) जलदी, सत्वर, शीघ्रगतीनें.

APART *ad.* (*a* and *part*) separately, as to place एकीकडे, एकेबाजूस, दूर (Matth. xiv. 13); in a state of distraction, as to purpose, use, or character अलग, पृथक, वेगळा, उद्देशानें अ० उपयोगार्थ निवडून काढलेला (Ps. iv. 3); in two or more parts निरनिराळा, वेगळाला: consider the two propositions a. -MENT, a room खोली *f,* कोठडी *f,* women's a. अंतःपुर *n,* जनाना *f*; divisions of building खण, घई *f*: as दुघई having two *apartments.*

APATHY (*Gr.* *-pathos,* suffering) want of feeling जाड्य *n,* मांद्य *n,* बेपर्वा *f,* विराग.—APATHETIC *a.* जड, मंद; free of passion विरागी, बेपर्वेचा.

APE* (*Skr.* *kapi*) a kind of monkey माकड, वानर, प्लवंग; one who imitates servilely,

in allusion to the manners of the ape नकल्या.— *v.* वानरासारखी नकल क., ठेवण -धाटणी उतरणें -साधणें.— APISH *a.* माकड-चेष्टा, नकल्या; मर्कटस्वभावाचा.

APERIENT (*aperire,* to open) सुखाचा ढाळ, सौम्यरेचक *n.*— *a.* रेचक, ढाळक.— APERTURE भोंक *n,* रंध्र *n,* खिंड *f.*

APETALOUS *a.* (*Gr. -petalon,* leaf) पाकळी-शिवाय, पुष्पपत्ररहित, दलहीन.

APEX (*L.*) शिखर *n,* अग्र *n,* कळस, अणी *f;* mark of a long syllable दीर्घ अक्षराची खूण *f.*

APHELION (*Gr. -helios,* the sun) point of a planet's orbit which is most distant from the sun कोणत्याही ग्रहाच्या कक्षेंतील सूर्यापासून अतिदूर बिंदु, उच्च *n.*

APHORISM (*Gr. -horos,* a limit) a precept or principle expressed in a few words सूत्र *n,* वाक्य *n,* वचन *n,* नियम, ह्मण *f.*

APIARY (*apis,* a bee) मधमाशा राखून ठेवण्याचें घर *n,* मधुमक्षिकालय *n.*

APIECE* *ad.* (*a* and *piece*) एकएकास, प्रत्येकास, एकएकाच्या वांटयास: here is an orange a.; each by itself एकएकास, दरएकास: they cost a shilling a.

APOCALYPSE (*Gr. -kaluptein,* to cover) revelation प्रगटविणें *n,* प्रगटीकरण *n;* name of the last book in the New Testament प्रगटविण्याचें पुस्तक *n,* प्रगटविणें *n.*

APOCOPE *Gr.* शेवटच्या अक्षराचा लोप, अंत्य-वर्णलोप.

APOCRYPHA (*Gr. -krutein,* to hide) books whose authenticity, as inspired writings, is not admitted, and which are therefore not considered a part of the sacred canon of the Scripture ज्यांस ईश्वरप्रेरित ह्मणण्यास कांहीं प्रमाण नसल्यावरून ज्यांची गणना ख्रिस्ती शास्त्राच्या संहितेंत केली नाहीं अशीं कित्येक पुस्तकें आहेत. यहुदी लोकांनी जेव्हां आपलीं धर्मपुस्तकें प्रसिद्ध केलीं तेव्हां त्यांस ईश्वरप्रणित शास्त्रसंहिता असें नांव दिलें, व जीं पुस्तकें अप्रसिद्ध राहिलीं त्यांस "शास्त्रसंहिताबाह्य" असें नांव दिलें.— APOCRYPHAL *a.* अप्रसिद्ध; शास्त्रसंहिता-बाह्य; बनावट, खोटा. See the noun.

APOGEE (*Gr. -ge,* the earth) that point in the orbit of the moon which is at the greatest distance from the earth उच्च *n.*

APOLOGY (*Gr. -logos,* word) something said or written in defense of what appears to others wrong दोषनिवारक भाषण *n,* -लेख; an excuse माफीची विनंति *f* [for].— APOLOGIZE *v.* माफी मागणें, चुकलों ह्मणणें [for].

APOLOGUE (*Gr. -logos,* speech) कल्पितगोष्ट *f,* कहाणी *f.*

APOPLEXY (*Gr. -plexis,* striking) a sudden disorder of the brain सुनबहिरी रोग, अर्धांग *n,* पक्षघात, सन्यास.—APOPLECTIC *a.* सुनबहिरी रोगाचा, पक्षघाती.

APOSTASY (*Gr. -stenai,* to stand) departure from one's faith, principles, or party स्वमत -पक्षत्याग.—APOSTATE ज्यानें आपल्या धर्माचा -मताचा -पक्षाचा -मंडळीचा त्याग केला आहे तो, स्वधर्म -पक्षत्यागी.—*a.* स्वमत -स्वपक्ष-त्यागी, पतित.—APOSTATIZE *v.* स्वधर्म -पक्ष-त्याग क.

APOSTLE (*Gr. -stellein,* to send) a person deputed to execute some important business गुमास्ता, मुतालीक; one of the twelve disciples of Christ sent forth to preach the Gospel प्रेषित.—APOSTOLIC, -AL *a.* प्रेषित संबंधी; delivered or taught by the Apostles प्रेषितानीं सांगितलेला -आज्ञापिलेला, प्रेषितस्थापित -उक्त (rules, doctrines).

APOSTROPHE (*Gr. -strophè,* a turning) a turning away from the real auditory and addressing an absent or imaginary one कांहीं बोलणें चाललें असतां मध्येंच

बवळ नाहींत त्यांस किंवा कल्पित श्रोत्यांस संबोधून बोलणें *n*, संबोधितान्यसंबोधन *n*; *Gram.* contraction of a word by the omission of a letter or letters शब्दाचा संक्षेप; the mark (') used to denote that a word is contracted शब्दाच्या संक्षेपाची एक खूण आहे; as *call'd* for *called*.

APOTHECARY (*Gr. -theke*, chest) one who prepares and sells drugs for medical purposes औषधें तयार करून विकणारा, गांधी, 'पातिकेरी.'

APOTHEOSIS (*Gr. -theos*, god) act of elevating a mortal to the rank, and placing him among the number of gods देवत्व देणें *n*, देवगणांत जागा देणें *n*, देवगणप्रविष्टीकरण *n*.

APPALL *v.* (*-pallere*, to look pale) भय-धाक -दहशत घालणें -बसविणें [by].— *i.* दहशत इ० बसणें.

APPARATUS (*-parare*, to prepare) things for any art or trade provided as means to some end साज, सरंजाम, संच.

APPAREL (do.) dress पोषाक, वस्त्रें *pl.* —*v.* पोषाक घालणें, वस्त्रें नेसविणें; embellish अलंकार -भूषण घालणें, भूषित -मंडित क.

APPARENT *a.* (*-parere*, to come forth) visible to the eye डोळ्यास दिसता, दृष्टिगोचर; plain स्पष्ट, उघड, व्यक्त; seeming दिसण्यांत मात्र खरा, दर्शनी; heir a. युवराज. -LY *ad.* उघड, स्पष्ट; बाहेरून दिसायास, दिसण्यांत मात्र.— APPARITION, visibility दृष्टिगोचरता *f*; the thing appearing दृश्यवस्तु *f*; a ghost भूत *n*, छाया *f*, संबंध; *Astron.* the first appearance of a star or other luminary after having been obscured उदय.—APPEAR *v. i.* be in sight दृष्टीस पडणें, दिसणें (Gen. i. 9); stand in presence of -च्या समोर उभें राहणें, हजीर -रुजू होणें (2 Cor. v. 10); be manifest समजणें, प्रगट होणें (1 John iii. 2); be clear प्रमाणानें -पुराव्यानें सिद्ध होणें (Rom. vii. 13); seem भासणें, वाटणें, -वरून दिसणें (Matth. vi. 16). -ANCE दिसणें *n*, दर्शन *n*; आविर्भाव, प्रादुर्भाव, उद्भव; उमग; हाजिरी *f*; आभास; आकार, रूप *n*; पोकळ डौल, सोंग *n*; phenomenon चमत्कार: an a. in the sky; *Law*, कोर्टापुढें हजीर होणें *n*; mien चर्या *f*, ढब *f*, डौल; to save *appearances* फड राखणें -संभाळणें, फड संपादणें क. [to, from, in].

APPEAL *v. i.* (*appellare*, to call upon) *Law*, remove a cause from an inferior to a superior judge or court वरच्या न्यायाधिशाकडे खटलें नेणें, "अपील" क.; refer to another for the decision of a question controverted तिऱ्हाईताकडे नेणें, पंचाच्या निवाड्यावर सोपणें; call on one for aid मदतीस बोलावणें.—*n.* अपील *n*; साक्ष *f*; साक्षीस बोलावणें *n*.—APPELLANT अपील करणारा. — *a.* अपिलासंबंधी.

APPEAR, See under APPARENT.

APPEASE *v.* (*-pax*, peace) शांतवणें, सांत्वन क. [by].

APPELLATION (See APPEAL) नाम *n*, संज्ञा *f*.

APPELLATIVE सामान्य नाम *n*.—*a.* सामान्य.

APPEND *v.* (*-pendere*, to hang)—to टांगून -लगटून देणें, अवलंबणें; add जोडणें, लावणें. -AGE जें दुसऱ्या वस्तूस -गोष्टीस जोडलें असतें तें *n*, अनुषंगी पदार्थ, उपांग *n*, दुमाला! -ANT *a.* टांगलेला; जोडलेला, लगत्याचा, संबंधी. —APPENDIX ग्रंथाची पुरवणी *f*, शेषसंग्रह.

APPERTAIN *v.* (See PERTAIN) See BELONG [to].

APPETENCE, -CY, (*-petere*, to seek) fixed and strong natural longing वासना *f*, इच्छा *f*.—APPETITE, desire इच्छा *f*, वासना *f*, कामना *f*; hunger भूक *f*, क्षुधा *f*.

APPLAUD *v.* (*-plaudere*, to clap the hands) टाळ्या वाजवून शाबसकी देणें, वाहवा क.; commend वाखाणणें, स्तुति -प्रशंसा क.— APPLAUSE शाबासकी *f*, वाहवा *f*.

APPLE * एक फळ आहे;—of the eye पुतळी *f*, डोळ्यांतली बाहुली *f*; a. of one's eye नाकाचा बाल, जिवाचा कलिदा; to prize as the a. of one's eye साताकाळजांच्या पलीकडे ठेवणें.

APPLY *v.* (*-plicare*, to fold) place ठेवणें; put लावणें; bring or carry नेणें; use for a particular purpose कामास -उपयोगास लावणें; incline लावणें, वळवळणें, मन लावणें: a. thy heart unto instruction;— as an epithet लावणें, ठेवणें.—*i.* लागणें, लागू होणें; make request विनंती -अर्जी क.— APPLICABLE *a.* लावायाजोगा, लायक, लागू पडण्याजोगा.— APPLICABILITY लायकी *f*, लावायाची योग्यता *f*, लाग.—APPLICANT योजणारा, प्रयोजक; मागणारा, याचक; अर्जदार.—APPLICATION लावणें *n*, योजणें *n*, प्रयोग, योजना *f*;— the thing applied लावलेली वस्तु *f*, लेप वगैरे; मन -लक्ष्य लावणें *n*, व्यासंग, अभिनिवेश, अभ्यास; अर्ज, अर्जी *f*; प्रार्थना *f*; याचना *f*.

APPOINT *v.* (*-punctum*, a point) establish नेमणें, स्थापणें; decree ठरविणें, विधान क.; equip सज्ज -तयार क.; nominate अधिकारावर नेमणें -योजणें;—a time वायदा क. [to]. —*i.* ठरविणें, नेमणें (2 Sam. xvii. 14). -ED स्थापित, नेमलेला; सोपून दिलेला, नियुक्त; an a. duty नियोग; a. time कालावधि, वायदा. -EE नेमलेला मनुष्य. -MENT नेमणें *n*; कामावर नेमणूक *f*, योजना *f*; stipulation ठराव, संकेत; decree नियम, विधि *f*; सज्जा, सरंजाम, सामग्री *f*; post जागा *f*, असामी *f*; allowance मुशारा.

APPORTION (*-portio*, portion) विभागून -वांटून देणें.

APPOSITE *a.* (*-ponere*, to put) योग्य, समर्पक, लायक, युक्त [to]. -LY *ad.* प्रसंगानुसार, यथोचित.—APPOSITION, *Gram.* the state of two nouns put in the same case without a connecting word between them एकविभक्तिकता *f*; act of adding मिळविणें *n*.

APPRAISE *v.* (*-pretiare*, to prize) मोल लावणें, किंमत ठरवणें: to a. goods [at, for].

APPRECIATE *v.* (do.) value किंमत क.; मोल -गुण जाणणें; one who knows how to a. गुणज्ञ, मर्मज्ञ, गुणग्राही.

APPREHEND *v.* (*-prehendere*, to seize) धरणें, पकडणें; conceive in the mind समजणें, उमजणें, बोध होणें; entertain fear of -ची भीति बाळगणें; entertain suspicion of -चा संशय-अंदेशा धरणें.—APPREHENSIBLE *a.* मनांत येण्याजोगा, बोधगम्य, उपलभ्य, ग्राह्य.— APPREHENSION धरणें *n*; पकड *f*, धरपकड *f*; समज, उमज, ग्रह, बुद्धि *f*; वहमा, संदेह, शंका *f*, अभिप्राय, बुद्धि *f*, मत *n*; conception कल्पना *f*.— APPREHENSIVE *a.* समजणारा; quick of understanding लवकर समजणारा, तैलबुद्धि; भयभीत, भयशंकित; संशययुक्त.

APPRENTICE *n.* (do.) one bound for a time to learn an art or trade करारी विद्यार्थी -चेला -शागिर्द, संकेतपत्रबद्ध विद्यार्थी.— *v.* करारनाम्यानें बांधून विद्या किंवा धंदा शिकायास ठेवणें -घालणें [to]. -SHIP विद्यार्थीपणा, शागिर्दी *f*; शागिर्दपणाची मुदत *f*.

APPRIZE *v. F.* See INFORM [of].

APPROACH *v. i.* (*-propiare*, to draw near) —in place जवळ येणें-जाणें;—in time काळवेळ जवळ येणें (Heb. x. 25); approximate जवळ येणें, सारखा -बरोबरीस उतरणें: it *approaches* to his character.—*n.* जवळ येणें *n*, आगमन *n*; एकाद्या घराकडे जाण्याचा मार्ग [*pl* works thrown up by besiegers to protect them in their advances towards a fortress]. -ABLE *a.* जवळ जायाजोगता, अभिगम्य, गम्य. -ING *a.* जवळ येणारा; near at hand जवळचा, उपस्थित, आसन्न.

APPROBATION (see APPROVE) मान्य करणें *n*; अनुमोदन *n*; approval पसंती *f*, मान्यता *f*; to meet the a. of मनास -मर्जीस येणें.—APPROBATORY *a*. अनुमोदक.

APPROPRIATE *v*. (*-proprius*, one's own) set apart for -करितां वेगळा -नोवानें काढून ठेवणें; claim or use, as by an exclusive right दुसऱ्यास वर्जून आपणच हक्कानें आपला -खासगत क.: let no man a. the use of a common benefit; to a. unlawfully डल्ला मारणें, खाणें, गिळंकृत क.; assign to some particular use विशेष कामाकडे योजणें -लावणें [to].— *a*. See PROPER.—APPROPRIATION उपयोग, विनियोग; काढून ठेवलेला पैसा;—fraudulent तनाखोरी *f*, हरामखोरी *f*.

APPROVE *v*. (*-probare*, to prove) be pleased with आवडणें, पसंत -मान्य होणें; commend वाखाणणें, स्तुति क. (Ps. xlix. 13); sanction officially मंजूर -काईम क. [of]. -ED पसंत, मंजूर केलेला; मान्य (Acts ii. 22); पटलेला (2 Tim. ii. 15).

APPROXIMATE *v*. (*-proximus*, nearest) जवळ नेणें [to].— *i*. जवळ येणें.—*a*. जवळ, समीप. —APPROXIMATION, See APPROACH.

APPURTENANCE (*-pertinere*, to reach to) जें नेहमीं दुसऱ्यास लागून असतें तें, आनुषंगिक.

APRICOT (*præcox*) एक फळ आहे, अलबुर्क *Ar*.

APRIL (*Aprilis*) इंग्रजी वर्षाचा चवथा महिना, चैत्र-वैशाख.

A PRIORI (*-prior*, former) *Logic*, reasoning à p. is that which deduces consequences from definitions formed, or principles assumed, or which infers effects from causes previously known कारणावरून कार्याची सिद्धि *f*, किंवा अनुमान *n*.

APRON (*Ir*.) कामाच्या वेळीं आंगावरचीं पांघुरणें मळूं नयेत ह्मणून जें मळवस्त्र पुढून बांधतात तें *n*; बगींत बसतांना पाऊस धूळ वगैरे लागूं नये ह्मणून जें कातडें पायावर घेतात तें *n*.

APROPOS *ad*. *F*. प्रसंगानुरूप, प्रसंगवशात्; to come a. प्रसंगास येणें.

APT *a*. (*apere*, to fit) योग्य, यथोचित; liable जोगा, जोगता, शील : a. to break फुटण्याजोगा, भंगशील; — of persons, inclined -शील, -लु : a. to sleep निद्रालु; ready तयार: men are a. to slander others; quick हुशार, चपळ, पटु; qualified लायक, उपयोगी, कामाचा [for, to]. -ITUDE योग्यता *f*, उपयोग; ओढ *f*, प्रवृत्ति *f*, कल; सुजाणपणें *n*, पटुत्व *n*, चणचणीतपणा. -LY *ad*. ठीक, यथायोग्य; हुशारीनें, चातुर्यानें.

AQUATIC *a*.(*aqua*, *Skr*. *ap*, water) पाण्याचा, पाण्यासंबंधी, in comp. जल : a. animal जलजंतु; inhabiting water पाण्यांत राहणारा, जलस्थायी; frequenting water जलचर.—*n*. पाण्यांतील वनस्पति *f*, जलवनस्पति *f*.—AQUEOUS *a*. पाण्याच्या गुणाचा, जलरूप; made by means of water पाण्यानें केलेला(solution). —AQUEDUCT नळ, नहर, सारणी *f*.—AQUAFORTIS, nitric acid आगपाणी *n*.—AQUARIUS कुंभरास -शि *f*.

AQUILINE *a*. (*aquila*, an eagle) गरुडासारखा, गृध्राकार; hooked अंकडीदार, वक्र; that has an a. nose गरुडनाक्या.

ARABIC *a*. आरबी.— *n*. आरबी भाषा *f*.

ARABLE *a*. (*arare*, to plough) लागवड करण्यासारखी (जमीन), जिराईत; a. land नांगरलेली -लागवडीची जमीन *f*.

ARBITER (*L*.) *Law*, तिऱ्हाईत, मध्यस्थ, पंच.—ARBITRABLE *a*. depending on the will इच्छाधीन; determinable ठराव करण्याजोगा, निर्णनीय.— ARBITRARY *a*. absolute स्वतंत्र, मुखत्यार; मनास येईल तसा, ऐच्छिक; capricious लहरी; not governed by any fixed rules बेकायदा, बेबंद.—ARBITRARILY *ad*. मनास येईल तसें, मनःपूत.—ARBITRATE *v*. पंचाईत -मनसुबी क.—ARBITRATION तिऱ्हाईती *f*, मनसुबी *f*, लवादी *f*, पंचाईत *f*, मध्यस्थी *f*; निर्णय, विचार. —ARBITRATOR तिऱ्हाईत, पंच.

ARBOR (*arbor*, a tree) वेल किंवा फांद्या पसरून केलेली छाया *f*, गुफा *f*, पर्णमंडप. -EOUS *a*. वृक्षसंबंधी; growing on trees झाडांवर वाढणारा: moss is a. -OUS *a*. झाडांचा केलेला, वृक्षमय, झाडांचा (roof).

ARC (*arcus*, a bow) segment of a circle परिघाच्या वर्तुलाचा भाग, कौंस. -ADE, a series of arches मंडपश्रेणी *f*.—ARCH कमान *f*, मेहराब *f*; the vault of heaven नभोमंडल *n*. See ARC.— *v*. कमानदार क.— *a*. (*Gr. archos*, chief) cunning धूर्त, बिलंद, अट्टल, इरसाल; chief मुख्य, प्रधान, श्रेष्ठ. -ANGEL पहिल्या प्रतीचा दूत, महादूत. -BISHOP मुख्य धर्माध्यक्ष, सरपाद्री. -DEACON बिशप पाद्रीचा सहकारी. -DUKE युरोपांत कित्येक मांडलिक राजांची पदवी आहे.—ARCHER (*arcus*, a bow) तीरकमानवाला, तिरंदाज, धनुर्धर.—ARCHERY धनुर्विद्या *f*, तिरंदाजी *f*.—ARCHETYPE (*Gr. -tupos*, a form) मूलप्रत *f*, असल *n*.— ARCHIPELAGO (*Gr. -pelagos*, sea) ज्यांत बहुत बेटें असतात असा समुद्र किंवा जलाशय, 'आर्किपिलेगो.' —ARCHITECT (*Gr. tekton*, workman) professor of the art of building घर वगैरे बांधण्याची विद्या जाणणारा, शिल्पशास्त्री. -URE शिल्पशास्त्र *n*; workmanship कारागिरी *f*, रचना *f*, घटना *f*: the formation of the first earth being a piece of divine a.

ARCHIVES *pl* (*Gr. archè*, government) दफतरखाना, जुने लेख ठेवण्याची जागा *f*, दफतर *n*.

ARCTIC *a*. (*Gr. arktos*, a bear) उत्तर ध्रुवाकडील.

ARDENT *a*. (*ardere*, to burn) hot or burning जलाल, कडक, उष्ण, तलख, चणचणीत (spirits, fever); having the appearance of fire विस्तवा सारखा लाल (eyes); zealous हौसदार, उत्सुक, उत्कंठित. -LY *ad* उत्साहानें, उत्कंठेनें, कडकावून [in, for]. — ARDENCY, ARDOR, आंच *f*, तलखाई *f*; आग *f*, गरमी *f*; हौस *f*, उत्साह.

ARDUOUS *a*. (*arduus*, high) उंच (paths); difficult कठीण, मेहनतीचा, दुर्घट (task). -LY *ad*. मेहनतीनें, श्रमपूर्वक.

AREA (*L*.) any plane surface, as the floor of a room, of a church or other building, or of the ground मोकळी जागा *f*; *Geom*. superficial contents of a figure क्षेत्रफळ *n*, गर्भ; sunken space around the basement of a building अंगण *n*; [*Med*. disease of the hair, in which it changes color, but does not fall off].

AREFY *v*. (*arere*, to be dry, *facere*, to make) सुकवणें, वाळवणें.

ARENA (*arena*, sand) area in the central part of an amphitheatre, in which the gladiators fought and other shows were exhibited रंगभूमि *f*, मल्लभूमि *f*, तालीमखाना; fig. any place of public contest अंगण *n* (in comp. रणांगण *n*); the middle of a temple or other enclosed place चौक; [sand in the kidneys]. -CEOUS *a*. रेतीचा, रेंवाळ, रेंवट.

ARGENT *a*. (*argentum*, silver) रुप्याचा, रौप्य; रुप्यासारखा चकचकीत (fields).

ARGIL (*argilla*, white clay) कुंभारमाती *f*, पांढरी माती *f*. -LACEOUS *a*. चिकणमातीचा.

ARGONAUT (*-nauta*, a sailor) आर्गो नामक गलबतांत बसून सोनेरी लोंकर शोधायास जे गेले होते त्यांतील एक असामी. -IC *a*. आर्गोनाट संबंधी (story).

ARGUE *v*. (*arguere*, discuss) घाटणें, मथणें, वादविवाद क.: the counsel *argued* the cause before a full court; prove सिद्ध क., कारण-प्रमाण दाखवणें: the order visible in the universe *argues* a divine cause; persuade by reasons कारणें दाखवून खातरी क., मन वळवणें: to a. a man into different opinions.— *i*. reason वाद क., तकरार घेणें: A *argues* in favor of a measure; with वाद -वादविवाद क.: you may a. with your

friend without convincing him ; idle or empty *arguing* काथाकूट *f.* —ARGUMENT, a reason offered in proof, to induce belief, or convince the mind प्रमाण *n*: a convincing a. of the existence of a Deity; the subject of a discourse भाषणाचा-संवादाचा विषय; controversy वाद, विवाद; abstract of a discourse, writing, &c. सार *n.* -AL *a.* वादसंबंधी, वादाचा. -ATIVE *a.* वादाचा, वादात्मक; given to argument वादी, तकरारी.

ARID *a.* (*arere*, to be dry) रखरखीत, रुक्ष, शुष्क: an a. waste. -ITY रखरखाट, रुक्षता *f.*

ARIES (*L.*) मेषरास *f.*

ARIGHT* *ad.* (*a* and *right*) नीट रीतीनें, नीट, बरोबर.

ARISE* *v.i.* ascend वर चढणें: a cloud *arose*; come above the horizon उगवणें, उदय पावणें -होणें; come up from one's bed or place of repose उठणें, निजून उठणें, बसल्या जाग्यावरून उठणें; originate उत्पन्न-उद्भव होणें ; come into action उद्युक्त-प्रवृत्त होणें, उठणें; be visible दिसणें, उठणें: the waves a.

ARISTOCRACY (*Gr. aristos*, best, *kratos*, strength) a form of government, in which the supreme power is vested in the principal persons of a state थोर लोकांचें राज्य *n*, कुलीनवर्ग प्रभुत्व *n*, उमराई हुकुमत *f*; the nobility or chief persons of a state बडेलोक *pl*, उमराव.—ARISTOCRAT, one who favors aristocracy बडे लोकांच्या राज्याचा पक्षधारी. -IC, -ICAL *a.* बडे लोकांच्या राज्या संबंधी ; बडे लोकांचा, उमरावांचा, उमराई (pride, manners).

ARITHMETIC (*Gr. arithmos*, number) गणित *n*, अंकगणित *n*, हिशेब *pl*;— of fractions अपूर्णांक ग.;—of integers पूर्णांक ग.;—of known quantities व्यक्त ग.;—of unknown quantities अव्यक्त ग. -AL *a.* गणित संबंधी, हिशेबाचा; गणितानुसार. -LY *ad.* गणिता प्रमाणें, हिशेबानें.—ARITHMETICIAN गणित्या, गणक, हिशेबी.

ARK (*arca*, a chest) पेटी *f*; a repository कोष, कोश ; the large floating vessel in which Noah and his family were preserved during the deluge जलप्रलयाच्या वेळीं नोहा व त्याचें कुटुंब यांचें जींत रक्षण झालें ती नौका *f* (Gen. vi.).

ARM,* the limb of the human body which extends from the shoulder to the hand बाहु, हात;—from the shoulder-joint to the elbow भुजदंड, दंड;—from the elbow to the wrist हात; the branch of a tree फांदी *f*, फांदडा, स्कंध;— of the sea खाडी *f*, समुद्राचा फांटा; navigable a. तरती खाडी *f*;— of a garment बाही *f*; fig. power सामर्थ्य *n*, बल *n* (Is. liii. 1);—of a math. figure भुज.— FUL, —of grass, &c. कवळ *f*, वेंग *f*, आडव *f*. -PIT बगल *f*, कक्ष *f*.

ARM *v.* (*arma*, arms) furnish with arms हत्यारबंद-सज्ज क. [with, against, for].—*i.* हत्यारबंद होणें.—*n. pl* हत्यारें *n pl*, शस्त्रें *n pl*; exploits of war युद्धाच्या कथा *f*; to be in a. लढाईस उठणें; to be under a. हत्यारबंद होऊन लढाईस तयार असणें. —ARMADA *Sp.* लढाऊ गलबतांचा समुदाय.—ARMAMENT (*armare*, to arm) force equipped for war सेनाभार, फौजबंदी *f*.—ARMISTICE लढाईची तहकुबी *f*, अवहार. — ARMOR, defensive arms for the body चिलखत *n*, कवच *n*; iron covering of ships of war लढाऊ गलबतांचे लोखंडी पत्रे *pl*. -ER maker of arms हत्यारें करणारा. -IAL *a.* शस्त्रसंबंधी.—ARMORY हत्यारें ठेवण्याची जागा *f*, शस्त्रागार *n*, शिलेखाना; a collection of arms शस्त्रसंग्रह -समूह. —ARMY फौज *f*, लश्कर *n*, सैन्य *n*; invading a. परचक्र *n*; a host समुदाय, सैन्य *n*.

ARMILLARY *a.* (*armilla,* a bracelet) कंकणाकृति.

AROMA (*L.*) सुगंध, सुवास. -TIC *a.* सुगंधित, सुवासिक; spicy मसाल्याचा, मसालेदार.—*n,* सुगंध द्रव्य *n.*

AROUND* *ad.* (*a* and *round*) circularly गरगरां, चक्रवत्; on every side आजूबाजूस, असमंतात्.—*prep.* भोंवतालीं, सभोंवतीं.

AROUSE* *v.* (*a* and *rouse*) जागा -जागृत -प्रबोधित क., चेतवणें, चेव आणणें.

ARRACK *Ar.* दारू *f.*

ARRAIGN* *v.* दोषारोपाचा जाब देण्यास कोर्टापुढें उभा क.

ARRANGE *v. F.* put in order व्यवस्थेनें रचणें, मांडणें, जुळणें; settle व्यवस्था -बंदोबस्त क. -MENT रचणें *n,* &c.; व्यवस्था *f,* बंदोबस्त; the state of being in order क्रम; settlement regular and systematic तोडजोड *f,* निकाल; classification वर्गीकरण *n,* वर्गावर्गी *f,* विल्हेवारी *f*: the Linnæan a. of plants.

ARRAY* *v.* place in order रचणें, रांगेनें -क्रमानें -व्यवस्थेनें उभें क. -बसविणें; deck पोशाकाचा थाटमाट क., अलंकृत क.; *Law,* set in order as a jury, for the trial of a cause खटल्याच्या चौकशी करितां जुरीस व्यवस्थेनें बसविणें.—*n.* रचना *f,* क्रम;— of troops सेनारचना *f,* विहू, व्यूह; थाटमाट, बनाव, पोषाक.

ARREAR *F.* बाकी *f,* शिलक *f*: the *arrears* of pay चढलेला पगार.

ARREST *v.* (*-restare,* to stay back) थांबवणें, अटकाव -स्तंभन क.; *Law,* take, seize, or apprehend by authority of law सरकारी हुकुमानें धरणें -पकडणें [for, in].—*n.* कैद *f,* नजरकैद *f* -बंदी *f,* अटकाव; an issue of a. पकड समान *n;* [a. of judgment, *Law,* the stopping of a judgment after verdict for legal cause.]

ARRIVE *v.* (*-ripa,* bank of a river) come in progress by water, or by travelling on land पोहचणें, पावणें; reach a point by progressive motion पर्यायानें येऊन पोहचणें, पावणें: to a. at a conclusion [from, at]. —ARRIVAL पोहचणें *n,* आगमन *n.*

ARROGATE *v.* (*-rogare,* to ask) नसता अभिमान -आढयता बाळगणें, पोम दाखविणें: the pope *arrogated* dominion over kings.—ARROGANT *a.* अहंकारी, गर्विष्ठ, मगरूर.—ARROGANCE, -CY, गर्व, अभिमान, मगरुरी *f.*

ARROW* तीर, बाण; the feathered end of an a. पीस *n*; practising a. तुक्का; barbed a. अकडीदार तीर. -ROOT तवकील *f.*

ARSENAL *Ar.* दारूगोळा वगैरे ठेवायाची जागा *f,* तोफखाना, दारूखाना.

ARSENIC (*arsenicum*) सोमल, सोमलखार; sulphuret of a. हरताळ; red sulphuret of a. मनशीळ; white oxide of a. शंख्या -फटक्या सोमल. -AL, ARSENIOUS, *a.* सोमलाचा.

ARSON (*ardere,* to burn) the malicious burning of a dwelling-house or outhouse of another man दाव्यानें घर जाळण्याचा अपराध.

ART (*ars*) employment of means to accomplish some desired end युक्ति *f,* हिकमत *f*; a system of rules serving to facilitate the performance of certain actions कला *f*; skill कसब *n,* हुन्नर *f,* जुगूत *f*: man has the a. of managing his business to advantage; cunning युक्ति *f,* कावा, कपट *n*; fine *arts* मानसिकश्रमसाध्यकला *f pl* (गायन, कविता इ०); mechanical *arts* शारीरश्रमसाध्यकला *f pl* (शिवणें, भांडीं घडणें इ०). -FUL *a.* कलेनें केलेलें, कृत्रिम; skilful निपुण, चतुर; cunning कावेबाज, धूर्त्त, कारस्थानी. -IST कारागीर, शिल्पी, हुन्नरबाज; professor of the liberal arts शिल्पशास्त्री. -LESS *a.* void of art अनाडी, मूर्ख; guileless साधा,

भोळा, निष्कपट, गरीब.—ARTIFICE कसब *n*, कृप्ति *f*, in a bad sense डाव, पेंच, फटवण *f*. —ARTIFICER कारीगर, शिल्पकार.— ARTIFICIAL *a*. कृतीनें केलेला, कृत्रिम, काल्पनिक; खोटा, कपटाचा; cultivated लागवडीचा, लावलेला (grasses).

ARTERY (*arteria*) one of the vessels or tubes which convey the blood from the heart to all parts of the body धमनी *f*, नाडी *f*.— ARTERIAL *a*. धमनी संबंधी, नाडीचा (action); contained in an artery धमनींतला, नाडीगत (blood).

ARTICLE (*artus*, a joint) *Gram.* one of the parts of speech उपपद *n*; a single clause of an account कलम *n*, बाब *f*, रकम *f*; a point of faith श्रद्धाविषय, सिद्धांत; a particular commodity जिन्नस *f*, चीज *f*; precise point of time क्षण, समय: in the a. of death;—in a magazine, newspaper मासिक वगैरे पुस्तकांतील किंवा वर्त्तमानपत्रांतील निबंध, कलमवार मजकूर, 'आर्टिकल' *n*; particular one of various things नग, डागिना; *pl.*—of war लढाईचे कायदे *pl.*— *v.* stipulate ठराव -करार क.; draw up in articles कलमबंदी क. — ARTICULATE *a.* jointed सांधेलेला, संधियुक्त; distinctly uttered साफ, स्पष्ट, वागिंद्रिययुक्त (sound.) —*v.* सांधे जोडणें, सांध्यानें जोडणें; स्पष्ट उच्चार क., मनुष्यासारखे शब्द सांधून बोलणें. -LY *ad.* कलमवार; स्पष्ट उच्चारानें, व्यक्त.—ARTICULATION सांधा, संधि; *Botany*, कांडें *n*, पेर *n*; स्पष्ट उच्चार.

ARTILLERY *F.* offensive weapons of war फेंकून मारायाचीं युद्धोपयोगी शस्त्रें *pl* (1 Sam. xx. 40); gunnery तोफेची विद्या *f*; ordnance तोफखाना; great guns मोठाल्या तोफा *f pl*; body of gunners गोलंदाज *pl.*

As* *conj.* similar to सारखा, प्रमाणें, जसा, तसा: ye shall be a. gods; do a. you are bidden; while जेव्हा, तेव्हां, असतां: he trembled a. he spoke; in the sense of proportion जसजसा, तसतसा, तितका तितका; for instance जसें, उदाहरणार्थ; a. if जसें काय, जणू काय; a. far a., a. to त्याविषयीं; a. well ही, सुद्धां; शिवाय; a. yet अजून, अद्याप.

ASAFŒTIDA (*-fœtidus*, fetid) हिंग;—the tree हिंगाचें झाड *n*; fine bright a. हिराहिंग.

ASCEND *v. i.* (*-scandere*, to mount) चढणें, वर जाणें, lit., fig.; as a star उगवणें, उदय होणें; rise, fig. उदय होणें, नांवारूपास चढणें [up, upon, from, to].—*t.* वर चढणें, चढणें. -ANT, superiority वरचढ *f*, वर्चस्व *n*; ancestor पूर्वज; *Astron.* उच्च *n.*—*a.* क्षितिजावर, उदयंगत; वर्चस्वी, उत्तम, प्रबल. -ANCY चढ, शह, उपर *f*, प्राबल्य *n*, प्राधान्य *n*. —ASCENSION चढणें *n*, आरोहण *n*; उदय;— to heaven स्वर्गारोहण *n*; right a. विषुवांश. -DAY, the anniversary of our Savior's ascension into heaven after His resurrection आमचा तारणारा मरून उठल्यावर आकाशांत सदेह चढून गेला त्याच्या स्मरणार्थ (कित्येक ख्रिस्ती मंडळ्या) जो दिवस पाळतात तो, "वर जाण्याचा दिवस."—ASCENT चढणें *n*, आरोहण *n*; the way by which one ascends चढाव, चढण *f*, *n*; the means of ascending चढण्याचे उपाय; a. and descent चढ उतार; steep a. उभासूळ.

ASCERTAIN *v.* (*-certus*, certain) खचीत क.; find out for a certainty by trial अजमासून खचीत क.: to a. the purity of a metal. -ABLE *a.* निर्धार करायाचा -जोगा, निर्धारणीय. -ED निर्धार केलेला, निर्णित, निश्चित. -MENT निर्धार क. *n*; शोध; निर्णय.

ASCETIC (*Gr. askein*, to exercise) one who practises undue rigor and self-denial in religious things विरक्त, तापसी; Hindu *ascetics* गोसावी, बैरागी, वानप्रस्थ.— *a.* विरक्त, तपोनिष्ठ.

ASCRIBE *v.* (*-scribere*, to write) attribute, as a cause -कडे कारण लावणें, आरोपणें, ठेवणें: losses are often to be *ascribed* to impru-

dence; attribute as a quality गुण लावणें -देणें: to a. perfection to God.—ASCRIBABLE *a.* लावायाजोगा, आरोपणीय.—ASCRIPTION *n,* आरोपणें *n,* आरोपण *n,* आरोप.

ASH * एक झाड आहे; आश झाडाचें लांकूड *n.*

ASHAMED *a.* (*a* and *shamed*) affected by shame ओशाळा, लज्जित; confused by guilt, or a conviction or consciousness of some wrong or impropriety हिरमुसून गोंधळलेला [of].

ASHES * *pl* earthy or mineral particles of combustible substances remaining after combustion राख *f,* रक्षा *f,* भस्म *n*; the remains of the human body when burnt चिताभस्म *n.*—ASHY *a.* राखेचा, भस्माचा; ash-colored भस्मरंगी; filled with ashes राखेनें भरलेला.

ASHORE *ad.* (*a* and *shore*) on shore किनाऱ्यावर; to the shore कांठाकडे, तडीस; on the land adjacent to water पाण्या जवळच्या जमिनीवर: the captain of the ship remained a.; on the ground भूमीवर -किनाऱ्यावर चढलेला: the ship was driven a.

ASIAN *a.* (*Gr. asia,* eastern land; *Skr. ushac,* aurora) आशियाचा.—ASIATIC आशिया खंडांतला मनुष्य.—*a.* आशीया खंडसंबंधी.

ASIDE *ad.* (*a* and *side*) on, or to one side एकीकडे, बाजूस, आडबाजूस; out of the way रस्त्याच्या बाहेर, मार्ग सोडून; to set a. रद्द -नामंजूर क.

ASININE, see under ASS.

ASK* *v.* (*Skr. ish,* to desire) request मागणें, विनंती क.: a. counsel of God: require मागणें: what price do you a.? inquire of विचारपूस क.; put a question पुसणें, विचारणें (John ix. 21).

ASKANCE, ASKANT, ASKEW, *D.,* ASLANT *a.* (*a* and *slant*) तिरकस, आडवा, ओझरता; to look a. काण्या डोळ्यानें पाहणें.

ASLEEP* *ad.* (*a* and *sleep*) झोंप लागलेला, निद्रिस्त.

ASLOPE* *ad.* ढाळता, उतरता.

ASP (*aspis*) एक विखारी सर्प आहे.

ASPARAGUS (*L.*) नागदवण *f* (एक झाड आहे).

ASPECT (*-spicere,* to look) look आकार, डौल, कटाक्ष, रूप *n*; particular appearance of the face चेहरा, मुद्रा *f,* वदन *n*; severe a. कठोर मुद्रा *f*; position तोंड *n,* लक्ष्य *n,* अभिमुख *n,* रोख: a house has a southern a.; *Astr.* the situation of one planet or star with respect to another दृष्टि *f,* दशा *f.*

ASPERITY (*asper,* rough) खरबरीतपणा; harshness of sound कर्कशपणा; sourness अंबटपणा; moral ruggedness कर्कशपणा, कडुस्वभाव; sharpness तीक्ष्णता *f,* तिखटपणा, कडकपणा.

ASPERSE *v.* (*-spargere,* to scatter) कुभांडघेणें, काजळी लावणें (a character).—ASPERSION तुफान *n,* अपवाद; a sprinkling शिंपडणें *n,* शिंचन *n.*

ASPIRE *v.i.* (*-spirare,* to breathe) desire with eagerness उमेद -आशा धरणें [to, after]; ascend चढणें.—ASPIRING *a.* आशा धरणारा, उमेदवार; हौसदार, महत्वाकांक्षी.—ASPIRANT *a.* इच्छु, अर्थी: विद्यार्थी, धनेच्छु.—ASPIRATE *v.* जोरानें उच्चार क., महाप्राणोच्चार क.: we a. the words *horse* and *house.*—*n.* जोराच्या उच्चाराचा वर्ण, महाप्राण वर्ण.—*a.* जोराच्या उच्चाराचा, महाप्राणाचा.—ASPIRATION जोराचा उच्चार, महाप्राण; आशा *f,* आस *f,* लालसा; दम, उमेद *f,* हाव *f.*

ASQUINT *ad.* See ASKANCE.

ASS (*asinus*) गाढव *m, n*; a stupid fellow गाढव, गद्धा, ढ.—ASININE *a.* गाढवाचा, गर्दभ संबंधी; गाढवाच्या गुणांचा.

ASSAIL *v.* (*-salire,* to leap) assault हल्ला क., घाला घालणें [with, for]; attack morally

आब्रूवर हल्ला क. -ABLE *a.* हल्ला करण्याजोगा, आक्रमणीय. -ANT हल्ला करणारा.

ASSASSIN *F.* one who kills, or attempts to kill, by surprise or secret assault मारेकरी, गुप्तघाल्या. -ATE *v.* घाल्यानें -दग्यानें मारणें -जीव घेणें. -ATION गुप्तघात.

ASSAULT *v.* (*See* ASSAIL) हल्ला क.—*n.* a violent onset with physical means, as blows, weapons, &c, हल्ला, उचल *f*; *Law*, a. and battery मारामार *f*, दंडपारुष्य *n*; a violent onset with moral means, as words, arguments, &c. आब्रूवर हल्ला क.

ASSAY *v.* *F.* परीक्षा क., कसोटीस लावणें [with, for].—*i.* यत्न क.: he *assayed* to go. —*n.* परीक्षा *f*, पारख *f*; of coin नाण्याची पारख *f*, नाणकपरीक्षा *f*; the substance to be assayed परीक्षेची वस्तु *f*; attempt यत्न, प्रयत्न. -ER, -MASTER धातूची परीक्षा करणारा, पोतदार.

ASSEMBLE *v.* (*-simul*, together) bring together एकत्र आणणें, एकवटणें; convene बोलावून जमवणें, मिळवणें.— *i.* जमा -गोळा होणें; एकत्र जमणें -मिळणें -येणें [at, in, for, together].—ASSEMBLAGE जमाव, मेळा, समुदाय.—ASSEMBLY जमाव, मेळा, जमात *f*; a heterogeneously composed a. पंचमिसळ *f*; a religious society convened मंडळी *f*, धर्मसभा *f*; a legislative body राजसभा *f*, राजकार्याची सभा *f*; an a. of the learned पट्टी *f*. [*Mil.* a beat of the drum or sound of the bugle as a signal to troops to assemble]. -ROOM सभागृह *n*.

ASSENT *v.i.* (*-sentire*, to think) संमत -रुकार -अनुमत देणें.—*n.* रुकार, होकार, संमत *n* [to].

ASSERT *v.* (*-serere*, to join together) affirm खचीतपणीं -प्रतिज्ञेनें बोलणें; maintain स्थापणें, प्रतिपादन क.: a system of doctrine, &c. उपपादन -उपपत्ति क., कैवार घेणें. -ION उपपादन *n*; ज्याविषयीं खातरीचें भाषण केलें तें; positive declaration निश्चित वाक्य *n*; position advanced प्रतिज्ञा *f*, पक्ष, मत *n*; संभाळ, रक्षण *n*: a. of our rights.

ASSESS *v.* (*-sedere*, to sit) set, fix, or charge a certain sum upon, as a tax पट्टी -कर बसवणें; fix the value of, for the purpose of taxation कर बसविण्या करितां किंमत ठरवणें; fix ठरवणें: to a. damages. -MENT पट्टी बसवणें *n*; सरकारी पट्टी *f*, कर; जुरीनें नुकसानीची किंमत -अजमास ठरविणें *n*. -OR पट्टी बसवणारा; जमाबंदी करणारा; one who sits by another, as next in dignity सभासद; an assistant and adviser मदतनीस, "आसेसर"; कर बसविण्या करितां जिनगीची किंमत ठरविणारा, "आसेसर."

ASSETS *pl* (*-satis*, enough) property of a deceased person, subject by law to the payment of his debts and legacies मैयताचें कर्ज वगैरे फेडण्यापुरती त्याची जिंदगी *f*, मैयत जिंदगी *f*, जायदाद *f*; effects of an insolvent debtor or bankrupt, applicable to the payment of his debts नादार मनुष्याची पुंजी *f*; entire property of all sorts, belonging to a merchant or to a trading association व्यापाऱ्याची किंवा व्यापाराच्या मंडळीची पुंजी *f*, भांडवल *n*, ठोकमाल.

ASSEVERATE *v.* (*-severus*, serious) शपथपूर्वक बोलणें.—ASSEVERATION शपथपूर्वक भाषण *n*.

ASSIDUITY (*-sedere*, to sit) उद्योग, व्यासंग, अभ्यास.—ASSIDUOUS *a.* उद्योगी, व्यासंगी, व्यवसायी; performed with constant diligence or attention झटून -लक्ष्य लावून केलेला (labor); attentive सावध, हुशार [at].

ASSIGN *v.* (*-signare*, to mark out) नेमून -लावून देणें (a limit); appoint for a particular purpose विशेष कामाकरितां नेमणें, नियोजणें; allot नांवानें वांटा काढून ठेवणें;

Law, make over to another दुसऱ्याच्या स्वाधीन क. -सोपणें; transfer to, and vest in, certain persons, called *assignees,* for the benefit of creditors सावकारांस वांटून देण्याकरितां (जिंदगी) मुखत्यारांच्या स्वाधीन क.;—a reason कारण लावणें -सांगणें [to]. -EE, a person to whom an assignment is made तैनाती; a person deputed by another मुखत्यार, वकील; नादार जिंदगीची व्यवस्था करणारा, मुतालीक, 'असैनी.' -MENT —of land जाहगीर *f*; on the revenues वरात *f*, तनखा *f*.

ASSIMILATE *v.* (*-similis,* like) सारखा -सादृश क.; convert into a like substance समपदार्थ क.: food is *assimilated* by conversion to animal substances.-*i.* सारखा होणें; जिरणीस पडणें, पचणें.—ASSIMILATION सारखा करणें *n*, समीकरण *n*; सारखेपणा, समता *f*, अनुगुण;—of food परिपक्वता *f*, विपाक.

ASSIST *v.* (*-sistere,* to stand) मदत क. -ANCE सहाय *n*, कुमक *f*, मदत *f*. -ANT मदतनीस, हस्तक.— *a.* मदतीचा, सहायकारी -कारक.

ASSIZE, ASSIZES *pl* (*-sedere,* to sit) tribunal न्यायसभा *f*, अदालत *f*; statute for determining weight or price निरखाचा कायदा; market rate बाजार निरख -भाव.— *v.* कायद्यानें दर -भाव ठरवणें -नेमणें; कराचा दर ठरवणें.

ASSOCIATE *v.* (*-sociare,* to join) join in company, as a friend संगत -सोबत करून देणें, जूट घालून देणें: to a. others *with* us in business; unite in the same mass मिळवणें: particles of matter *associated* with other substances.— *i.* संगत -सहवास क. -होणें: congenial minds are disposed to a.— *a.* संयुक्त; joined in interest or purpose मिलाफी, सामील, एकचित्त; confederate संगनमति; संगती, जोडीचा; an a. judge.—*n.* सोबती, भागीदार, साथी; a. in crime साग्या.—ASSOCIATION संयोग क. *n*, संयोजन *n*; connection गांठ *f*, प्रसंग, संबंध; संगत *f*, सोबत *f*; union संगम; union of persons in a company or society for some particular purpose सभा *f*, मंडळी *f*: a. for the advancement of science; a benevolent a.

ASSORT *v.* (*-sors,* lot) प्रत -वर्ग लावणें; to furnish with all sorts सर्व प्रकार पुरविणें. -ING विल्हेवारी *f*. -MENT प्रत लावणें *n*, वर्गीकरण *n*; variety of the same kind एकाच जातीचा निरनिराळा प्रकार, थर: an a. of goods.

ASSUAGE *v.* (*-suavis,* sweet) soften हलका -उपशम क. (pain, grief); mitigate शमवणें, थंडावणें, शांतवणें.— *i.* उपशमन -शांत होणें; उतार पडणें, ओसरणें (Gen. viii. 1). -MENT समाधान *n*, प्रशमन *n*; उतार.

ASSUME *v.* (*assumere,* to take) take upon one's self आपणाकडे घेणें, अंगिकारणें; take for granted, or without proof प्रमाणावांचून घेणें; take in appearance वेष धारण क., मिथ्याग्रह क.: to a. the garb of humility.—ASSUMING मगरूर, अभिमानी, आढ्यतेचा. — ASSUMPTION आपणाकडे घेणें *n*, स्वीकरण *n*; प्रमाणा वांचून घेणें *n*, प्रमाणव्यतिरिक्तग्रहण *n*; false a. मिथ्याग्रहण *n*; the thing supposed प्रमाणा वांचून सिद्ध मानलेली गोष्ट *f*, कल्पना *f*; *Logic* प्रतिज्ञा *f*; —of a disguise वेषधारण *n*; taking a person up into heaven स्वर्गारोहण *n*; [*Rom. Cath. and Gr. Churches,* a festival in honor of the ascent of the Virgin Mary into heaven.]

ASSURE *v.* (*-securus,* secure) make sure खचीत क.; render confident by a promise, declaration, or other evidence खातरी क., भरवसा देणें; embolden धैर्य -दिलासा देणें; insure तोटयाची हमी भरणें [to, for,

against]. —ASSURANCE अभयवचन *n*; अभयदान *n*, अभयप्रमाण *n*; promise भाक *f*, प्रतिज्ञा *f*, वचन *n*; firm persuasion दृढनिश्चय, निर्धार, धडा (Heb. x. 22); intrepidity धारिष्ट *n*: brave men meet danger with a.; impudence धिटाई *f*; trust in self उमेद *f*, दम, भरवसा: testimony of credit निशा *f*, खातरी *f*; तोटयाची हमी *f*. —ASSURED खातरी झालेला, निश्शंक, निभ्रांत. -LY *ad*. निश्चयपूर्वक, निःसंदेह, निश्चयें, खचित.

ASTERISK (*Gr. aster*, star) फुली *f*, चौफुली *f* [*].—ASTERISM नक्षत्रगण.

ASTERN* *ad*. (*a* and *stern*) गलबताचे पिछाडीस.

ASTEROIDS (*Gr. aster*, star, *eidos*, form) मंगल आणि बृहस्पति यांच्या कक्षेमध्यें जे उपग्रह आहेत त्यांतला एक.

ASTHMA (*Gr.*) दमा, श्वास, धाप *f*.—TIC *a*. दम्याचा *n*, दम्यासंबंधी; affected by asthma धापकरी.

ASTONISH *v*. (*-tonare*, to thunder at) strike dumb with sudden fear, terror, surprise, or wonder चकित -विस्मित -दंग क. [with, by, at]. -ING *a*. विस्मित करणारा, चमत्कारिक, आश्चर्यकारक. —MENT आश्चर्य *n*, विस्मय *n*, अचंबा.

ASTOUND, see ASTONISH.

ASTRAY* *ad*. (*a* and *stray*) आडवाटेनें, वाट चुकून: before I was afflicted I went a. (Ps. cxix. 67); to go a. बहकणें; to lead a. बहकावणें.

ASTRIDE * *ad*. (*a* and *stride*) दोहींकडे पाय टाकून -ठेवून, घोडेबसणी.

ASTRINGENCY (*-stringere*, to bind) तुरटपणा, स्तंभक गुण.—ASTRINGENT *a*. binding स्तंभक (medicines).—*n*. स्तंभक औषध *n*.

ASTROLOGY (*Gr. aster*, star, *logos*, a discourse) art of judging of the influences of the stars, and of foretelling future events by their position and aspects प्रश्न -मुहूर्त्त ज्योतिषविद्या *f*, दैवप्रश्न, फलज्योतिष *n*.—ASTROLOGER शकुन्या, गणक, दैवज्ञ.—ASTROLOGICAL *a*. फलज्योतिष संबंधी.

ASTRONOMY (*Gr. aster*, star, *nomos*, a law) the science which treats of the celestial bodies ज्योतिषशास्त्र *n*, खगोलविद्या *f*.—ASTRONOMER ज्योतिषी, खगोलवेत्ता.— ASTRONOMICAL *a*. ज्योतिष विद्येसंबंधी. -LY खगोल विद्येप्रमाणें, ज्योतिषशास्त्रानुसार.

ASTUTE *a*. (*astutus*, cunning) शहाणा, धूर्त्त, चतुर [in].

ASUNDER *ad*. (*a* and *sunder*) वेगळा, अलग, पृथक; in comp. विः विछिन्न.

ASYLUM (*Gr. -sulon*, plunder) a place of retreat थारा, आश्रय, ठाव; an institution for the protection of the unfortunate अनाथगृह *n*, धर्मशाळ *f*.

AT *prep*. near to जवळ, पासीं; noting time क्षणींच; towards कडे: to aim an arrow a. a mark; a. the house घरीं; a. the minute क्षणीं; a. this time तत्क्षणीं; a. last शेवटीं; a. least निदान; a. leisure रिकाम्या वेळीं; a. most फार केलें तर; a. night रात्रीं, रात्री; a. once एकदम; एकाएकीं; एकदां; a. pleasure खुशी प्रमाणें; a. present तूर्त, हल्लीं; a. random बेशिस्त; a. sight दर्शनी, देखत; a. the well विहिरीवर; a. war लढाईत गुंतलेला, लढाईवर; a. hand हाताशीं, हाजर; a. all times सर्वदा, हरघडीं.

ATHEISM (*Gr. -theos*, god) disbelief or denial of the existence of a God नास्तिक मत *n*, निरीश्वर वाद.—ATHEIST नास्तिक.

ATHIRST *a*. (*a* and *thirst*) तान्हेला, तृषार्त.

ATHLETE (*Gr. aethlos*, contest) पेहेलवान, जेठी, मल्लयोद्धा.—ATHLETIC *a*. पहिलवानाचा, मल्ल-

क्रीडासंबंधी; vigorous धट्टाकट्टा, जोरकस; a. exercise कसरत *f.*

ATHWART* *a.* (*a* and *thwart*) आडवा, मध्यें.—*ad.* उफराटा, गैरशिस्त, अन्यायानें.

ATLAS (*Gr.*) नकाशांचें पुस्तक *n.*

ATMOSPHERE (*Gr. atmos,* vapor, *sphaira,* sphere) whole mass of aëriform fluid surrounding the earth वातावरण *n,* मेघमंडळ *n.*—ATMOSPHERICAL *a.* वातावरण वाय्वावरण संबंधी.

ATOM (*Gr. atomos,* uncut) an *ultimate,* indivisible particle of matter परमाणु, अणु, fig. anything extremely small लव, लेश; अतिसूक्ष्म पदार्थ. -IC, -AL *a.* परमाणूचा, परमाणुमय; परमाणुसंबंधी; सूक्ष्म, फार बारीक. -ISM, the doctrine of atoms; a system which, assuming that atoms are endued with gravity and motion, accounted for the origin and formation of all things परमाणुवाद.

ATONE *v.* (*at one*) make reparation, compensation, amends, or satisfaction for an offense or a crime निस्तरणें, भरून देणें, बदला देणें. -MENT मिलाफ,समेट (Rom. v.11); निस्तरणें *n,* निष्कृति *f; Theol.* the expiation of sin made by the obedience and personal sufferings of Christ प्रायश्चित्त *n* [for].

ATRABILARIAN, ATRABILARIOUS, *a.* (*atra bilis,* black bile) affected with melancholy, which the ancients attributed to the black bile उदास, उदासवृत्तीचा.

ATRAMENTOUS *a.* (*ater,* black) शाईसारखा, काळा.

ATROCIOUS *a.* (*atrox,* cruel) अतिदुष्ट, घोर. -NESS उग्रता *f,* क्रूरता *f,* घोरपणा.—ATROCITY महापाप *n,* अतिदोष, घोरकर्म *n.*

ATTACH *v. F.* tie बांधणें; take by legal authority जप्त क., टांच लावणें;—to, win the heart of मन ओढणें, प्रीति -स्नेह जोडून घेणें; connect with जोडणें, लावणें; adhere चिकटणें; fig. apply लावणें, आरोपणें [to, for]. -ED जप्त केलेला, जप्त; स्नेही, अनुरक्त, तत्पर, परायण, आसक्त; जडीव, लावलेला; युक्त, सलग्न, आरोपित. -MENT जप्ति *f;* a. after judgment पक्की जप्ति *f;* प्रीति *f,* स्नेह, निष्ठा *f,* आसक्ति *f.*

ATTACK *v. F.* assault चढून -चालून जाणें, हल्ला क.;— insidiously गुप्तघाला घालणें; suddenly छापा घालणें; begin a controversy with (शब्दांनीं अथवा लिहिण्यानें) वाद -भांडण चालू क.; to a. in front आघाडीमारणें [with].—*n.* हल्ला, घाला;—of a band of robbers दरवडा; first invasion चढाई *f,* उचल *f.*

ATTAIN *v.* (*-tenere,* to hold) gain मिळवणें, संपादणें; equal बरोबरी क.—*i.* reach पोचणें, पावणें (Acts xxvii. 12); come or arrive, by an effort of mind संपादन -प्राप्त होणें (Ps. cxxxix. 6) [to,by]. -ABLE *a.* मिळवायाजोगा, प्राप्य; येण्याजोगा, आगम्य; संपादायाजोगा, साध्य. -MENT संपादणूक *f,* प्राप्ति *f,* उपलब्धि *f;* that which is attained लाभ, सिद्धि *f;* difficult of a. दुर्लभ; easy of a. सुलभ.—*pl* संपादित गुण.

ATTEMPER, -ATE *v.* (*-temperare,* to soften) moderate by mixture मिसळ घालून माफक क.: to a. heat by a cooling mixture; soften नरम -हलका क.: to a. rigid justice with clemency; regulate कायद्यांत ठेवणें: a mind well *attempered* with kindness and justice; adapt जम -जुवा बसविणें: arts *attempered* to the lyre.

ATTEMPT *v.* (*-tentare,* to touch) try यत्न -उद्योग क.; attack हल्ला क.: to a. the enemy's camp. —*i.* यत्न क. — *n.* यत्न, उद्योग; हल्ला.

ATTEND *v.* (*-tendere,* to stretch) be united to जडून -लागून असणें: a cold *attended*

with fever; go or stay with बरोबर जाणें किंवा राहणें; serve सेवा -चाकरी -खिजमत क.; be present हजीर -समीप -जवळ असणें; await बरोबर येणें -राहणें: happiness or misery *attends* us after death;—as a physician औषध देणें; शोध -समाचार घेणें.—*i.* listen ऐकणें, लक्ष्य देणें (Ps. lxxxvi. 6); on, upon, wait on भक्ति -चाकरी -सेवा -शुश्रूषा क. [to, upon, on]. -ANCE हाजर असणें *n*, सेवा करणें *n* &c.; ध्यान *n*; अवधान *n*; चाकरी *f*, परिचर्या *f*, सेवा *f*; हजिरी *f*; retinue जिलीब *f*. -ANT हुजऱ्या, खिदमतगार, अनुचर.—*a.* बरोबर असणारा.—ATTENT, -IVE *a.* सावधान, तत्पर, एकचित्त. -ION, लक्ष्य *n*, चित्त *n*, मन *n*;—to one object एकाग्रता *f*; act of civility बरदास्त *f*, ताजीम *f*, तवाजू *f*, समाचार, आगतस्वागत *n*: a. to a stranger.

ATTENUATE *v.* (*-tenuare*, to make thin) बारीक -पातळ -कृश क.; break into very minute parts फोडून बारीक तुकडे -चुरा क.—ATTENUATION बारीक करणें *n*, कृशीकरण *n*.

ATTEST *v.* (*-testis*, witness) साक्ष देणें -घालणें; give proof of -चा दाखला -चें प्रमाण देणें: the ruins of Palmyra a. its ancient magnificence; call to witness साक्षीस ठेवणें. -ATION साक्ष *f*, प्रमाण *n*.

ATTIRE * *v.* पोषाक घालणें, वस्त्र नेसवणें. —*n.* पोशाक, वेष, लिबास.

ATTITUDE (*aptus*, suited) posture ठाणमाण *n*, आसन *n*; position स्थान *n*, अवस्था *f*.

ATTORNEY *F.* one who is legally appointed by another to transact any business for him मुखत्यार, मुनीम; a. at law वकील; power of a. वकिलातनामा, मुखत्यारपत्र *n*.

ATTRACT *v.* (*-trahere*, to draw) ओढून घेणें, आकर्षण क.; allure मोहणें, भुलवणें [from, to, by, with]. -ION आकर्षण *n*; मोहन *n*, प्रलोभन *n*; a. of gravitation गुरुत्वाकर्षणशक्ति *f*; capillary a. केशाकर्षण *n*; *pl* मोहक गुण. -IVE *a.* आकर्षण करणारा, आकर्षक; मोहक.

ATTRIBUTE *v.* (*-tribuere*, to give) consider as belonging -चा आहे असें मानणें -आरोपणें, घालणें (power, quality); give as due यथान्याय देणें: a. to God all the glory of the redemption; impute as a cause लावणें, आरोपणें.—ATTRIBUTION गुण, धर्म. — ATTRIBUTABLE *a.* -कडे लावायाजोगा, आरोपणीय, आरोप्य.—ATTRIBUTIVE *n.* विशेषण *n.* — *a.* वाच्य, विशेषक -LY *ad.* *Gram.* विशेषणरूपानें.

ATTRITION (*-terere*, to rub) झिजणें *n*, घर्षण *n*; waste by a. झीज *f*, घस *f*; *Theol.* grief for sin arising only from fear of punishment or feelings of shame भय -लज्जामूलक पश्चात्ताप.

ATTUNE *v.* (*-tonus*, tune) सूर लावणें -मिळवणें; make accordant जम -मेळ बसवणें [to].

AUBURN (*albus*, white) reddish brown पिंगट, सोनसळा; bright a. गोरा, भुरका, पांडुवर्ण.

AUCTION (*augere*, to increase) लिलाव *n*, लिलाम *n*. -EER लिलाव करणारा -वाला.

AUDACIOUS *a.* (*audere*, to dare) impudent उद्धट, धीट, निर्लज्ज; bold in wickedness दुष्टाई करण्यांत धारिष्टवान -साहसिक; committed with, or proceeding from, daring contempt of law कायद्यास न जुमानून केलेला (crime). —NESS, AUDACITY उद्धटपणा, औद्धत्य *n*; धीटपणा, साहस *n*.

AUDIBLE *a.* (*audire*, to hear) capable of being heard ऐकायास योग्य, श्राव्य; loud enough to be heard ऐकूं येईसा, कर्णगोचर [to].— AUDIBLY *ad.* ऐकूं येईसा, कानीं पडेसा. — AUDIENCE ऐकणें *n*, श्रवण *n*; admittance to a hearing सुनावणीची मुलाखत *f*, कानावर मजकूर घालण्याची

भेट *f*; an assembly of hearers श्रोते *pl*, श्रोतेमंडळी *f*; a. chamber सुनावणीची जागा *f*, दिवाणखाना; श्रोते बसण्याची जागा *f*.—AUDIT *n*. examination तपासणी *f*; a final account हिशेबाची शेवटची तपासणी *f*.—*v*. हिशेब तपासून -रुजू पाहून बार क. -OR हिशेबाची तपासणी करणारा, तजकरनीस; ऐकणारा, श्रोता. -ORY *a*. श्रवण संबंधी; having the power of hearing श्रवणशक्तीचा.—*n*. an assembly of hearers श्रोतेमंडळी *f*; a lecture-room पाठ सांगण्याची जागा *f*, पाठशाला *f*.

AUGER* सामता, बरमा.

AUGHT * किंचित, कांहीं.

AUGMENT *v*. (*augere*, to increase) वाढविणें, वृद्धि क. [by, with]. —*n*. वृद्धि *f*, वाढ *f*; *Gram*. an increase of the quantity of the initial vowel आगम. -ATION वृद्धि *f*, वाढ *f*; *Med*. चढ, भरतें *n*.

AUGUR (*L*.) शकुनपाहणारा, शकुन्याजोशी.—*v*. पूर्वी सुचविणें -दर्शविणें.— *i*. शकुनावरून -चिन्हावरून समजणें -अनुमान क. -ED प्रदर्शित. — AUGURY शकुनविद्या *f*; an omen शकुन.

AUGUST *a*. (*augere*, to increase) majestic प्रतापशाली, प्रभावशाली.—*n*. (from *Augustus*) इंग्रजी सालाचा आठवा महिना, श्रावण भाद्रपद. -NESS प्रताप; magnificence वैभव *n*. -AN *a*. आगस्तस बादशहाचा -च्या वेळेचा (age).

AUNT (*amita*) sister of one's father आत *f*, मावळण *f*; of one's mother मावसी *f*.

AURICLE (*auris*, ear) the external ear कान, कर्ण; one of the two muscular sacs situated at the base of the heart रक्ताशयाचा एक अवयव आहे.—AURICULAR *a*. कानाचा, कर्ण संबंधी; told in the ear कानांत सांगितलेला, गुप्त (confession); known by the sense of hearing कर्णगोचर; a. evidence शब्दप्रमाण *n*; traditional कानोकानीं आलेला, कर्णपरंपरागत (traditions); आरिकल नामक रक्ताशयाच्या अवयवाचा.

AURORA (*L*.; *Skr. ushásâ, aurôra*) पहाट *f*, अरुणोदय; a. borealis उत्तरेकडील प्रकाश; a. australis दक्षणेकडील प्रकाश.

AUSPICE *a*. (*avis*, bird, *spicere*, to inspect) पक्ष्याच्या गतीवरून काढलेला शकुन; *pl* कृपादृष्टि *f*, नेकनजर *f*, आश्रय.—AUSPICIOUS *a*. शुभ, श्रेयस्कर; prosperous सभाग्य, यशस्कर (person); favorable प्रसन्न, अनुकूल; an a. moment शुभलग्न *n*.

AUSTERE *a*. (*austerus*) severe करडा, कठोर, खरमरीत, निष्ठुर (master, look); sour आंबटढाण, खट्टा (fruit).—AUSTERITY अंबटपणा, खट्टेपणा; करडेपणा, खरमरीतपणा: *pl* तप *n*, तपश्चर्या *f*, देहदंडन *n*.

AUSTRAL *a*. (*L*.) दक्षिणेचा -कडचा (ocean, land).

AUTHENTIC, -AL *a*. (*Gr. authentes*) having a genuine original authority सप्रमाण, प्रमाणसिद्ध; genuine खरा, असल, बित्तीम, (paper, register); trustworthy विश्वासू, खातरीचा (writer). -ATE *v*. खरा क., सप्रमाण -सत्य क.—AUTHENTICITY खरेपणा, असलपणा.

AUTHOR (*auctor*) creator उत्पन्नकर्ता, सृष्टा: God is the a. of the universe; the first mover प्रवर्त्तक; one who writes a book ग्रंथकर्ता -कार. -ESS ग्रंथकरणारी *f*, ग्रंथकर्त्री *f*.

AUTHORITY (do.) legal or rightful power सत्ता *f*, अखत्यार, अधिकार (Matth. xxi. 23); influence वजन *n*, चलती *f*, कदर *f*, भारदस्ती *f*: a magistrate of great a.; testimony साक्ष्य *f*, साक्ष *f*; the Gospels are our a. for the miracles of Christ; credibility खरेपणा, श्रद्धेयता *f*: an historian of no a.; received text आप्तवचन *n*; a precedent मागला दाखला -लेख -उदाहरण *n*; [a decision of a court, an

official declaration, or an opinion, saying, or statement worthy to be taken as a precedent; also a book that contains them, or the name of the author].— AUTHORITATIVE *a.* प्रमाणाचा, सप्रमाण; imperative दबदब्याचा, दराऱ्याचा, धनीपणाच्या डौलाचा. -LY *ad.* प्रमाण सांगून -दाखवून, सप्रमाणतः; दाबानें. — AUTHORIZE *v.* give right to act करण्याची अखत्यारी -मुखत्यारी देणें; make legal कायद्यानें स्थापणें, कायदेशीर क., विध्युक्त क. (a marriage); establish by authority विधि -आचार -प्रमाण -चाल इ० कडून स्थापणें, विहित क.: idioms *authorized* by usage; give authority, credit, reputation, or support to पुष्टीकरण क., पुरवणी क., संभाळणें (a report).

AUTOBIOGRAPHY (*Gr. autos*, self; and *biography*) आपणच आपला लिहिलेला वृत्तांत, आत्मचरित्र *n.*

AUTOCRACY (*Gr. -kratos*, strength) स्वतंत्रशक्ति *f*; एकाच्याच हातांत कुल मुखत्यार, स्वाधिपत्य *n*, मुखत्यारी *f*.—AUTOCRAT मुखत्यार राजा, सम्राट्;—a title assumed by the emperor of Russia.

AUTOGRAPH (*Gr. -graphein*, to write) स्वदस्तूरचा लेख, स्वहस्ताक्षर *n.*

AUTOMATON (*Gr. -maein*, to move) आपोआप चालणारें यंत्र *n*, स्वयंवह यंत्र *n.*

AUTUMN *n.* (*autumnus*) season between summer and winter खरिपाचे दिवस *pl*, शरत्काल; latter half उत्तरार्द्ध; third stage तृतीयावस्था *f*. -AL *a.* शरत्कालाचा.

AUXILIARY *a.* (*auxilium*, aid) सहायकर्त्ता, कुमकेचा.—*n.* साह्यकारक क्रियापद; *pl* foreign troops in the service of a nation at war युद्धप्रवृत्त सरकारच्या सहायार्थ परकी सैन्य *n*, कुमकी लष्कर *n.*

AVAIL *v.* (*-valere*, to be strong) profit फायदा क.; one's self आपला फायदा करून घेणें; aid सहाय क., कामीं -उपयोगीं पडणें: artifices will not a. a sinner in the day of judgment.—*i.* कामास पडणें -येणें: this scheme will not a.— *n.* फायदा, लाभ, फळ *n*; use प्रयोजन *n*, उपयोग; *pl* उत्पन्न *n*, विक्रीचा पैसा. -ABLE *a.* उपयोगी पडण्याजोगा, कामाचा (funds); नफ्याचा, लाभदायक; valid बळकट, प्रबल (plea).

AVALANCHE *F.* डोंगरावरून लोटत येणारी बर्फाची धोंड *f.*

AVARICE (*avarus*) द्रव्यलोभ, लोभ.—AVARICIOUS *a.* धनलोभी, लोभी, कृपण.

AVAUNT *int. F.* चलजा, नीघ.

AVENGE *v.* (*-vindicare*, to revenge) सूड उगवणें [by]. — AVENGER सूड उगवणारा; "a. of his people" भक्तकाजकैवारी.

AVENUE (*advenire*, to come to) a passage द्वार *n*, मार्ग; a walk in a park or garden दुतर्फा झाडांचा रस्ता.

AVER *v.* (*-verus*, true) प्रतिज्ञेनें -निश्चयानें सांगणें -बोलणें.

AVERAGE *F.* मध्यप्रमाण *n*, बस्तान *n*, शेरा.— *a.* सरस, मध्यप्रमाणाचा, सरासरीचा.

AVERT *v.* (*-vertere*, to turn) टाळणें, निवारणें, चुकवणें, फिरवणें [from].—AVERSE *a.* disliking कंटाळा -त्रास करणारा; not favorable प्रतिकूल, पाठभोरा, विन्मुख [to].—AVERSION *n*, कंटाळा, त्रास, तिटकारा; प्रतिकूलता *f*, पराङ्मुखता *f* [to, for].

AVIARY (*avis*, bird) पक्ष्यांचा शिकारखाना, पक्षिशाला *f.*

AVIDITY (*avere*, to long) अधाशीपणा, हवरेपणा, अतिलोभ.

AVOCATION (*-vocare*, to call) कामावरून बोलावणें *n*; the business which calls aside काम *n*, धंदा, बोलावणें *n.*

AVOID *v.* (*-vitare*) shun टाकणें, वर्जणें: a. bad company; *Pleading*, evade टाळणें, चुकवणें; annul रद्द क., खोडणें. -ABLE *a.*

टाळायाजोगा, परिहार्य. -ANCE त्याग, वर्जन *n*; रद्द क. *n*.

AVOIRDUPOIS *a.* & *n.* *F.* साकर, तूप, गवत, दाणा वगैरे तोलण्याचे विलायती वजनाचा, -चें वजन *n*.

AVOUCH *v.* (*-vocare*, to call), See AVER.

AVOW *v.* (*vovere*, to vow) confess frankly कबूल क., पदरीं घेणें; declare openly उघडपणें बोलणें [to]. -AL कबूली *f*, अंगिकार, स्वीकार.

AWAIT *v.* (*a* and *wait*) wait for वाट पाहणें, मार्गप्रतीक्षा क.; be in store for -करितां राखलेला असणें, -च्यासाठीं तयार असणें: a glorious reward *awaits* the good.

AWAKE * *v.* (*a* and *wake*) wake जागा -जागृत क.; put into action, or new life सचेतन क. —*i.* जागा -सावध होणें, उठणें.— *a.* जागृत, सावध, प्रबुद्ध.—AWAKEN *v.* उठवणें, जागा क. -ING जागाकरणारा, प्रबोधक (discourse, dawn).—*n.* जागा करणें *n*, उठवणें *n*; a revival of religion धर्मसंजीवन *n*.

AWARD * *v.* निवाडा -फैसला करून देवविणें.— *n.* निवाडा, फैसला, निर्णय; written a. हुकूमनामा.

AWARE * *a.* watchful सावध, हुशार; apprised माहितगार झालेला, विज्ञापित.

AWAY* *ad.* दूर, लांब; to go a. निघून जाणें; give a. देऊन टाकणें; I cannot a. with it माझ्यानें तें सोसवत नाहीं; a. with चल निघ, चल; to make a. with मारणें, ठार क.

AWE* reverential fear धाक, दरारा, वचक *f*, आदरप्रयुक्त भय *n*. (Ps. iv. 4); to stand in a. of वचकणें. — *v.* influence by reverential fear धाक -जरब बसविणें. -STRUCK *a.* धाक बसलेला, विस्मयाकुल. —AWFUL *a.* धाकाचा, जरबेचा; भयंकर, घोर; worshipful, आदरनीय, पूज्य.

AWHILE* *ad.* (*a* and *while*) कांहीं वेळ, अमळ, क्षणभर.

AWKWARD* *a.* —of persons अडाणी, हेंगाडा, अडमूठ, गवत्या; — of things ओबडधोबड, बेढब-डौल; disagreeable नडीचा, गैरसोईचा, अडचणीचा.

AWL* चांभाराची आरी *f*.

AWN* कुसळ *n*, कुसूं *n*.

AWNING *Goth.* चांदणी *f*, छत *n*, चांदवा.

AWRY* *ad.* तिरकस, तिरवा, वांकडा.

AXE, AX* कुऱ्हाड *f*.

AXIOM (*axioma*, that which is thought worthy) a self-evident and necessary truth प्रत्यक्ष प्रमाण *n*; maxim सूत्र *n*, वचन *n*. -ATICAL *a.* प्रत्यक्ष प्रमाण संबंधी.

AXIS (*L.*) AXLE, -TREE कणा, आंस, अक्ष, ध्रुव.

AY* *ad.* होय, बरें, हो.

AYE* *ad.* सर्वदा, सतत, निरंतर.

AZIMUTH *Ar.* समकोण, समांश.

AZURE *a.* *F.* आकाशवर्ण, नीलवर्ण, अस्मानी रंगाचा. — *n.* नीलवर्ण, अस्मानी रंग.

B.

BAA बें *n*.—*v. i.* बेंबावणें.

BABBLE *v.* *Ger.* prate like a child बोबडें बोलणें; talk thoughtlessly बकणें, दडबडणें; make a constant murmuring noise, as a small stream running over rocks खळखळणें. — BABBLER बडबड्या, वाचाळ, जल्पक; a teller of secrets जिभेचा हलका, लुतरा; a bird, Timalia Malcomi कोकाटी *f*; the Bengal b. सातभाई *f*.—BABBLING वटवट *f*, बकबक *f*.

BABE *Ir.* तान्हें मूल *n*, बाल *n*.—BABY *n.* तान्हें मूल *n*, अर्भक *n*; a doll बाहुली *f*. — *a.* लहान बाळासारखा, बाल (eyes).

BABEL *Heb.* the name of a city in the land of Shinar, where the confusion of languages took place (Gen. xi. 9) शिनार देशांतील एका शहराचें नांव *n*; तेथें भाषांची भेळमेळ झाली; confusion बलबलपुरी *f*, बलबल *f*.

BABOON माकडांची एक जात आहे.

BACCHANAL, -IAN *n.* (*Bacchus*, the god of wine) दारूबाज, छाकटा, मद्यपि.—*a.* धामधुमीचा, धुमश्चक्रीचा.—BACCHANALS, BACCHANALIA दारू पिण्याचा उत्साह, पानोत्सव.

BACHELOR *F.* a man of any age who has not been married अविवाहित पुरुष, बालब्रह्मचारी; person who has taken the first degree in the liberal arts, at a college or university पाठशाळेंतील पहिली पदवी ज्यास मिळते तो; [a young knight].

BACK* the upper or hinder part of an animal, from the neck to the loins पाठ *f*, पृष्ठ *f*; a broad high ridge पठार *n*; the part opposed to the front पाठ *f*, पृष्ठभाग: the b. of a book; hinder part of a thing पिछाडी *f*, पाठ *f*: the b. of an army; the thick and strong part of a cutting tool सुरी वगैरे हतेराची पाठ *f*; to turn the b. on one धिक्कारणें; to cast behind the b. विसरणें, क्षमा क. (Is. xxxviii. 17); to plough the b. पाठीवर धोंड -तुळई ठेवणें, काचणें; to bow the b. दबणें, बें द्मणणें (Rom. xi. 10); behind the b. पाठीमागें, परोक्ष; on the b. of पाठकुळी; to turn the b. on one पाठमोरा होणें, सोडणें; at the b. of, lit. fig. पाठीवर -मागें.—*ad.* पाठीमागें, परत: to go b.; to a former state पहिल्या स्थितीस: to go b. to poverty; away from contact मागें, उलट (Matth. xxviii. 2); behind मागें: to keep b. a part; in return परतून, परत: give b. the money; towards things or times past परत, मागें: to look b. on former ages.—*v.* पाठीवर चढणें, स्वार होणें; strengthen by aid पाठ देणें -राखणें -उचलणें, पाठबळ देणें; cause to retreat माघारीं फिरवणें (oxen); furnish with a b. पाठ क. -लावणें (books); up पाठबळ देणें. माघारा फिरणें -जाणें: a horse refuses to b.—*a.* मागला, मागचा (settlement); उलट, पाठीकडचा (action). -BITE *v.* censure, slander, reproach, or speak evil of, in the absence of the person traduced चहाडी -चुगली क. -सांगणें. -BITER चहाड, चहाडखोर. -BONE पाठीचा कणा -दांडा, पृष्ठास्थि, moral principle धैर्य *n*, दृढनिश्चय *n*. -DOOR परसूं *n*, मागलें दार *n*. -GROUND मागली जागा *f*; the space behind the principal figures of a picture, scene, &c. चित्रांच्या मागली जागा *f*; a place of obscurity गल्लीकुचींतली जागा *f*. -SIDE मागली बाजू *f*, पृष्ठभाग. -SLIDE *v.* सदाचाराचा मार्ग सोडणें, बिथरणें; [turn gradually from the faith and practice of Christianity]. -SLIDER पतित, सन्मार्गत्यागी (Prov. xiv. 14). -STAIRS *pl* आडजिना. -WARD -WARDS, *ad.* पाठमोरा, पाठसामोरा; पाठीकडे -मागें; मागल्या काळाकडे, गतकाळीं; by way of reflection चिंतन -मनन करून; from a better to a worse state बिचलत, बिथरत (in comp.); contrarily उलट्या क्रमानें, उलट. -WARD *a.* unwilling माघार -उलटघेणारा, नाराजी: b. to be slaves; dull मंद, मंदबुद्धि; coming after the usual time मागाहून येणारा, मागस (season); already past गेलेला, गत (year). -NESS नाखुशी *f*, माघार *f*; ढिलेपणा, सुस्ती *f*. -WATER धरून -कोंडून ठेवलेलें (धरणाचें) पाणी *n*.

BACON *F.* खारें केलेलें डुकराचें मास *n*; to save one's b. पागोटें बचावणें, अंगसुटका करून घेणें.

BAD *a.* (*Per. bad*) wanting good qualities, whether physical or moral वाईट, खराब, ओंगळ; injurious बाधक; unfavorable प्रतिकूल, अनिष्ट; vicious दुष्ट, दुर्गुणी, पापिष्ट; b. is often expressed in comp. by दुर, कु, कत; as दुर्जन, कुपथ, कदन्न; b. coin खोटें नाणें *n*; b. sign दुश्चिन्ह *n*. -LY *ad.* वाईट रीतीनें, वाईट. -NESS दुष्टपणा; वाईटपणा, वावडेपणा, बाधकता *f*, &c.

BADGE* चिन्ह *n*, लक्षण *n*, बिरीद *n*, निशाणी *f*.

BADGER* एक जनावर आहे; a person who is licensed to buy corn in one place, and sell it in another एका ठिकाणीं धान्य विकत घेऊन दुसऱ्या ठिकाणीं विकण्याची ज्याला परवानगी असते तो.—*v.* पाठीस लागणें, जीव-खाणें, त्रास देणें.

BAFFLE *v. F.* elude चुकवाचुकव -टाळाटाळ क.; defeat मोड क., लटपटविणें (a purpose) [by, with].

BAG* sack थैला, पोतें *n*;—of money कसा, पिशवी *f*; sac in animal bodies containing some fluid कोश, पिशवी *f*; two-mouthed b. पडशी *f*; four-mouthed b. झोळणा; b. with pockets चंची *f*, वाटवा; treasure-b. of Government पोतें *n*;—of musk मृगनाभ *f*; waterman's b. मसक *f*; [*Com.* a certain quantity of a commodity, such as it is customary to carry to market in a sack; as a b. of pepper.]—*v.* पिशवींत -पोत्यांत -गवसणींत घालणें; capture लढाईत धरणें (an army); load with bags पिशव्यांचें ओझें लादणें: a bee *bagged* with his honeyed venom.—*i.* झोल फुगारा येणें. -GAGE, the luggage of an army खेल-खाना, बाजारबुणगें *n*; — of any traveller बाडबिछाना, सामान *n*. -PIPE नागसुरासारखें एक वाद्य आहे, सनई *f* resembles it in sound, but not in appearance.

BAGNIO *It.* bath नहाणघर *n*, हमामखाना; brothel वेश्यालय *n*.

BAIL *v.* (*bajulare*, to bear a burden) set free on security जामीन घेऊन सोडणें; deliver, as goods in trust, for some special purpose विश्वासावर माल हवालीं क.: to b. goods to a carrier.—*n.* security given for the release of a prisoner जामीनकी *f*; person who procures the release of a prisoner from the custody of the officer arresting him, or from imprisonment, by becoming surety for his appearance in court जामीन; b. for appearance हजीरजामीन, दर्शनप्रतिभू; — for pecuniary surety मालजा०; — for good conduct फैल-खातरजा०. -ABLE *a.* जामीन घेण्याजोगा (an offence);—of persons जामीन घेऊन सोडण्याजोगा (a person).

BAILIFF *F.* a sheriff's deputy, appointed to make arrests, collect fines, summon juries, &c. नाझरच्या हाताखालीं एक कामदार आहे, वर्त्तक; overseer or under-servant on an estate कारभारी, चौकसनीस.

BAIT *v. Icel.* put on or in, as on a hook or in an enclosure, to allure fish, fowl, and other animals into human power घास -आमिष लावणें; give portion of food and drink to, upon the road वाटेवर (जनावरास) दाणापाणी देणें.—*i.* कुत्तरओढ -तोडातोड -हाल हाल क.—*n.* आमिष *n*, घास, लालूच *f*; temptation पेंढीचा खडा, प्रतिलोभन *n*, गूळ-खोबरें *n*

BAIZE (perhaps from Base) लोंकरी पट्ट.

BAKE* *v.* भाजणें;—by fire अग्निपुट देणें; by the sun सूर्यपुट देणें; harden by cold थंडीनें कठीण क.: the earth is *baked* by frost. —*i.* भाजणाराचें -भट्याऱ्याचें काम क., भाकरी भाजणें: she washes and *bakes*; dry and harden in heat उष्णतेनें वाळून कठीण होणें, भाजणें: the ground *bakes* in the hot sun. —BAKER भाजणारा, रोटीवाला.—BAKERY रोटी -तंदूरखाना, 'बेकरी' *f*.

BALANCE (*bis*, twice, *lanx*, scale) तराजू *f*, ताजवा; just proportion समतोलपणा: the b. of power; the excess on one side वरतवळा, शिलक *f*: the b. of an account; estimate अजमास; beam of a b. दांडी *f*; dish of a b. पारडें *n*; false b. दीडदांडी *f*; fraudulent turn of a b. in weighing झोका; tongue of a b. कांटा; inclination of an equal b. पासंग *n*;—of an account शिलक बाकी *f*; b. brought forward ओढण *f*; b.) for

or against) on a tradesman's books खाते-बाकी *f*; b. -sheet शिलकबंद ; dead b. बुडति बाकी *f*; to settle a b. बाकी पूज क., चुकविणें ; b. payable फाजील *f*; a sign of the zodiac तूळरास *f*; an impartial state of the mind in deliberating समान चित्तवृत्ति *f*, विवेचन *n*.—*v*. तोलणें, वजन क.;—an account शिलक -झाडा काढणें -उतरणें, जमाखर्च पाहणें ; scales पासंग बांधणें -क.; समतोल क. ; अजमास काढणें -पाहाणें : b. the good and evil of things.—*i*. समतोल असणें: the scales b.; hesitate गुटमळणें, नानू क.

BALCONY *It.* गच्ची *f*.

BALD *a*. *Sp.* destitute of the natural or common covering सुना, मुंडा, बुचा, उघडा, नागवा ; as of the hair टक्कल पडलेला ; inelegant अप्रौढ, असंस्कृत (translation). -HEAD टकल्या. -NESS टक्कल *n*; बुचेपणा, सुनेपणा. -PATE *n*. टक्कल *n*, डोई *f*, मुंडमस्तक *n*.—*a*. टक्कलडोयीचा, टकल्या.

BALE *F*. गठ्ठा, बस्ता, दिंड *n*; strap of a b. दाटणी *f*; wrapper of a b. बारदान *n*, बासन *n*.—*v*. गठ्ठा बांधणें ; free from water by dipping पाणी उपसणें (a boat)—*n*. अनर्थ, दुःख *n*. -FUL *a*. अनर्थाचा, संकटाचा ; destructive नाशकारक (enemies) ; full of grief दुःखभरित, खिन्न (eyes).

BALK * a ridge of land left unploughed between furrows, or at the end of a field वरळ *f*, खावडें *n*; a great beam बहाल *n*; disappointment निराशा *f*, आशाभंग.—*v*. नांगरण्यांत वरळ राखणें -सोडणें ; टोला देणें, ठकविणें, आशाभंग क.

BALL *Ger.* a round body पिंड, गोळी *f*, गोळा ;—of the eye बुबूळ *n*, अक्षिगोल ; a bullet गोळी *f*, गोळा ;—of the earth पृथ्वीगोल ; fire-b. अग्निगोल, उल्का *f* ;—of thread गुंडी *f*;— of medicine गुटिका *f*, गोळी *f*; a game चेंडू, कंदूक.—*v*. *i*. घोड्याच्या पायावर बर्फाचे -स्नोचे गोळे होणें : the horse-*balls*.

BALL (*Gr. ballein*, to toss) a social assembly for the purpose of dancing नाच, 'बाल.'

BALLAD *F*. लावणी *f*, ठुमरी *f*, ग्राम्यगीत *n*. -SINGER शाहीर. -MONGER लावण्या विकणारा.

BALLAST *D*. any heavy substance, as stone, iron, &c., placed in the hold of a vessel, to sink it in the water to such a depth as to enable it to carry sufficient sail without oversetting निलीम *f*, निरीम *f*; gravel, broken stone, &c. laid in the bed of a railroad लोखंडी रस्त्यावरली खडी *f*.—*v*. निलीम भरणें; खडी टाकून मजबूत कठीण क.

BALLOON *F*. a bag made of silk or other light material, and filled with hydrogen gas or heated air, so as to rise and float in the atmosphere आकाशयान *n*, विमान *n*, 'बलून'; *Chem*. कांचेचें ग्राहकपात्र *n*.

BALLOT *F*. a ball used in voting संमत गुटिका *f*, चिठ्यानीं संमत देणें *n*.—*v*. *i*. लेखनद्वारा गुप्त संमति देणें.

BALM (*Gr. balsamon*) एक सुगंधित झाड आहे; any fragrant ointment सुगंधित उटणें *n*; anything which heals, or which mitigates pain उपशमक औषध *n*.—BALMY *a*. सुगंधि ;—of slumbers गोड, सुखाचा; उपशमक.— BALSAM सुगंधिक उटणें *n*; common b. तेरडा.

BALUSTER *F*. कठड्यांतलागज, गराद *f*.—BALUSTRADE कठडा, कठारा.

BAMBOO *Malay*. वेळू, वंश, कळक, बांबू ; clump of *bamboos* बेट *n*; manna of the b. तवकीर *f*; efflorescence of the b. मेळ. —*v*. बांबूनें मारणें.

BAMBOOZLE *v* (?) फसविणें, धत्तुरा दाखविणें, नखांबोटांवर खेळविणें [Low].

BAN *F.* a public notice जाहीरनामा; interdiction मनाई *f*, निषेध ; a curse श्राप *pl*; notice of a marriage proposed, or of a matrimonial contract, proclaimed in a church, or other place prescribed by law, that any person may object, if he knows of any kindred between the parties, of any pre-contract, or other just cause why the marriage should not take place लग्नाचा जाहीरनामा.

BAND* a fillet पट्टा, पट्टी *f*, बंधन *n*; means of union between persons लगाबांधा, संबंध ; a company of persons united in any common design, especially a body of armed men जूट *f*, मंडळी *f*, थवा, तांडा ; हत्यारबंद लोकांची टोळी *f*; encompassing belt आटा, आळा, कडें *n*;—of musical instruments बाजा, नगारखाना ;—of dancing girls and musicians कळवंतणींचा ताफा.— *v.* पट्टीनें बांधणें, वेष्टणें ; जुटणें, जथणें. —*i.* एकहोणें, कट क. -AGE *n.* पट्टी *f*, बंधन *n*. —*v.* पट्टीनें बांधणें, पट्टी बांधणें.

BANDICOOT *Ger.* घूस *f*.

BANDIT *It.* दरवडेखोर, लुटारू, वाटमाऱ्या.

BANDY *F.* a club for striking a ball at play दांडू; — the play इटीदांडूचा खेळ. —*v.* beat to and fro इकडून तिकडे तिकडून इकडे फेंकणें, टोलवाटोलव क. ; exchange अदलाबदल क., देणें घेणें : to b. hasty words. -LEGGED *a.* फेंगडया पायांचा.

BANE* poison of a deadly quality जालीम विष *n*; any fatal cause of mischief, injury, or destruction नाशाचें मूळ *n* -घर *n* : vice is the b. of society. -FUL *a.* विखारा, विषयुक्त; नाशक, घातक.

BANG *D.* दणका, रपाटा, खणका.— *v.* beat, as with a club दणकावणें, कडकावणें; thump धडका -टक्कर मारणें.

BANIAN (*Skr. banik*, merchant) वाणी, बनिया ; the Indian fig tree वडाचें झाड *n*, वड ; a morning gown कुडती *f*, 'बन्यान' *n*.

BANISH *v. F.* condemn to exile हद्दपार करण्याची शिक्षा ठरवणें, देशपार क.; drive away हाकून -घालवून देणें, काढून टाकणें ; to b. all offence [from, to]. -MENT देशपार क. *n*, देशबहिष्कार.

BANK * a ridge of earth raised above the surrounding level बांध ; side of a watercourse तड, तीर ; shoal भाट, भाटी *f*, लाग ; *Com.* an establishment for the custody, or the loaning, exchange, or issue, of money, and for facilitating the transmission of funds सावकारी दुकान *n*, पेढी *f*, ठेवपेढी *f*, 'ब्यांक' *f*; company of persons concerned in a bank पेढीवाले *pl.* -ER सावकार, हुंडीवाला. -ING *n.* सावकारी *f*.—*a.* सावकारीचा, ब्यांकेचा (operations). -NOTE, a promissory note issued by a bank पेढीवाल्याची देखतहुंडी *f*, 'ब्यांक नोट' *f*. -RUPT (*-ruptus*, broken) दिवाळें निघालेला, नादार. -CY दिवाळें *n*, नादारी *f*.

BANNER *F.* a military ensign बावटा, झेंडा ध्वज ; a streamer पताका *f*.

BANQUET *F.* a feast मेजवानी *f*, भोजनोत्सव —*v.* मेजवानी क. — *i.* खाण्यापिण्याची चैन -घमंडी क. -ING-ROOM रंगमहाल.

BANTER *v. F.* ? उपहास -थट्टा क. — *n.* थट्टा *f* मस्करी *f*, विनोद.

BANTLING *Ger.* लहान मूल *n*, चिटलिंग *n*.

BAPTIZE *v.* (*Gr. baptein*, to dip in water) administer the sacrament of baptism to -ला बाप्तिस्मा देणें, -चा बाप्तिस्मा क.— BAPTISM, the application of water to a person, as a sacrament or religious ceremony, by which he is initiated into the visible church of Christ ख्रिस्ती

मंडळींत प्रवेश करणारास जो जलसंस्कार करितात तो, 'बाप्तिस्मा.' -AL *a.* बाप्तिस्म्या संबंधी. — BAPTIST बाप्तिस्मा करणारा; [applied to John, the forerunner of Christ; one who denies the doctrine of infant baptism, and maintains that baptism ought to be administered only to adults or believers by immersing the body in water]. -ERY बाप्तिस्मा देण्याची जागा *f.*

BAR *n. F.* a long piece of wood or metal, used for various purposes, but especially for a hindrance गज;—of metal कांब *f*, लगड *f*; a barrier अटक *f*, अडकाठी *f*; —of a door अडसर, अर्गळा *f*; of a railing, window गराद *f*; —a bank at the entrance of a harbor नस्त *n*, बारा, दांडा; place in court where prisoners stand कोर्टांत कैदी उभे राहण्याची कठडेबंद जागा *f*; the railing that incloses the place which counsel occupy in courts कोर्टांत वकील लोक बसण्याची कठडेबंद जागा *f*; [*at the b. of the court*, in open court]; the whole body of lawyers licensed in a court कोर्टांतील सनदी वकिलांची मंडळी *f*; any tribunal न्याय -धर्मसभा *f*: the b. of public opinion. —*v.* अडसर घालणें (a door); अटकाव क., अडविणें: b. the entrance of evil; the statutes b. my right; the laws b. the use of poisoned weapons. -BARRICADE, a fortification made in haste to keep off an attack कच्ची तटबंदी *f.*— BARRIER, a stockade मेढेंकोट, लकडकोट; a fortress or fortified town on the frontier of a country सरहद्दी वरला किल्ला किंवा तटबंदीचा गांव; obstruction अडकाठी *f*, अटकाव; boundary हद्द *f*, मर्यादा *f.*— BARRISTER कोर्टांतला वकील, 'बारिस्तर.'

BARB (*barba*, beard) a crooked point आंकडा, कांटा; beard कुसूं *n*, कुसळ *n.*— *v.* (तिरास -गळास) अंकडा -उलट कांटा लावणें; clothe, as a horse, with armor घोड्यास सशस्त्र -सज्ज क. -ER हजाम, न्हावी.

BARBAROUS *a.* (*barbarus*) savage रानटी, जंगली; cruel निर्दय, क्रूर; coarse हेंगाडा, अपशब्दाचा. — BARBARIAN रानटी माणूस; निर्दय, खाटीक.—BARBARISM रानटीपणा; निर्दयपणा; भाषेचा अशुद्धपणा; a b. कानडें *n*, रांगडें *n*, अपशब्द. — BARBARITY रानटीपणा; क्रूरपणा.

BARD, *Gael.* a poet and singer among the ancient Celts भाट, पोवाडे गाणारा, चारण; a poet कवि.

BARE* *a.* naked उघडा, नागवा, खुला; with b. feet अनवाणी; with the head uncovered from respect बोडका; unadorned सुना, मुंढा, साधा; empty रिकामा, रिता (treasury); mere नुस्ता, केवळ (words); much worn जीर्ण झालेला, जुना (liveries).— *v.* उघडा नागवा क. (the breast). -BONE *a.* रोडका, सुदामदेव; to become *barebones* सांपळा वळणें. -FACED *a.* not masked उघड्या तोंडाचा; shameless निलाजरा, निर्लज्ज. -HEADED बोडका. -LY *ad.* केवळ, मात्र, निस्तूक.

BARGAIN (*barka*, boat) an agreement between parties concerning the sale of property विक्रीचा ठराव; an agreement of any kind कबूलात *f*, बोली *f*, ठराव; a gainful transaction किफायतीचें काम *n*; to strike a bargain टाळी देणें, हातावरहात मारणें.—*v.* विकणें, खंडणें: A *bargained* away his farm.— *i.* करार क., ठरावणें [for, with].

BARGE *D.* a pleasure-boat क्रिडानौका *f*, ऐषआरामाची बोट *f*; a large boat for the conveyance of passengers or goods पडाव.

BARK *D.* the rind साल *f*, त्वचा *f*; inner b. अंतर्साल *f*; Peruvian b. एक औषधी आहे. —*v.* साल काढणें, सोलणें.

BARK * कुत्र्याचें भोंकणें *n.*— *v.* भोंकणें; clamor गलबला -कलकल क.

BARK, BARQUE, *F.* लहान गलबत *n*, 'बारकस' *n.*

Barley * जव, सातू. -corn सातूचा दाणा, जव; about the third part of an inch in length यव. -sugar कोरडी साकर उष्ण करून तिचा रस झाल्यावर तो तसाच निवूं दिला ह्मणजे तिचा जो पिवळा कांचरूप गोळा बनतो तो, 'बार्लिशुगर' *f.*

Barm * सातूच्या दारूवरची साय *f.*

Barn * धान्य, गवत, ताग इ०चें कोठार *n.*

Barnacle *F.* खुबा, खुबडी *f.*

Barometer (*Gr. baros,* weight, *metron,* measure) an instrument for measuring the weight of the atmosphere वायुभार-मापक यंत्र *n.*

Baron *F.* विलायतेंत एक बडे लोकांची पदवी आहे [*barons* of the exchequer, the five judges who try cases between the king and his subjects relating to the revenue); b. of beef गायीच्या कासेचें मास *n,* गोपृष्ठ भाग. -ess बारन पदवीच्या गृहस्थाची पत्नी *f.* -et बारनच्या खालची एक पदवी आहे.

Barrack *Sp.* शिपाई लोक राहण्याची चाळ *f,* 'बराक' *f, n.*

Barrel *F.* wooden cask पीप *n,* पिंप *n*; tube of a gun बंदुकीची नळी *f.*— *v.* पिपांत घालणें -ठेवणें -भरणें.

Barren * *a.* unprolific वांझ, वंध्या; —land नापीक, उखीर; unaffected उदास, निस्पृह (spectators). -ness वांझपणा, वंध्यत्व *n.*

Barricade, See under Bar.

Barrow* a small carriage moved by the hand हातगाडी *f*; a hog डुकर; a mould मातीची रास *f* -चा ढिगार.

Barter *F.* साटेलोटें *n,* मोबदला, विनिमय.—*v.* साटेलोटें क.

Basalt (*basaltes*) एक कठीण काळा पाषाण आहे.

Base (*basis*) the bottom तळ, पाया, बूड *n*;—the pedestal of a statue बैठक *f,* बसक *f,* पात्र *n*;—of a vessel पडघी *f*; *Mus.* the gravest male voice घोर, धूम; *Chem.* the principal element of a compound मिश्रपदार्थांतील मुख्य तत्व *n*; *Geom.* the line constituting that part of a figure on which it is supposed to stand भूमि *f*; *Mil.* a tract of country protected by fortifications, or by natural advantages, from which the operations of an army proceed युद्धप्रसंगीं सैन्याच्या रक्षणार्थ ज्या जागीं तटबंदी करून तेथून पुढें लढाईचें काम चालवितात ती जागा *f*; a rustic play वाघबकरी *f.*—Bass तंतुवाद्याचा खरजसूर, नीचसवन *f.* -relief, sculpture whose figures do not stand out far from the ground on which they are formed प्रतिछाया *f.*—Bassoon, a wind instrument भोंबारा.—Base *a.* (*basis*) mean हलका, नीच, उणा; of humble birth and low degree हलक्या कुळांत जन्मलेला; of illegitimate birth बटकीच्या पोटचा; low in value उणाख, हीन (metals); illiberal कृपण; not classical असंस्कृत, प्राकृत: b. Latin.

Bashful *a. F.* having a downcast look अधोमुख -दृष्टि; very modest लाजाळू, लाजरा, भिडस्त; sheepish मेंग्या, गायतोंड्या.

Basil (*Gr. basilikos,* royal) तुळस *f*; sweet b. सबजा; common b. रानतुळस *f.*

Basin *F.* a hollow vessel to hold water, for washing, and for various other uses तस्त *n*; any hollow place containing water हौद, कुंड *n,* खाडी *f,* इ०;—for ships गोदी *f*; a hollow place बसक *f.*

Bask *v. D.* ऊन देणें, उनांत ठेवणें.—*i.* उनांत बसणें, ऊन खाणें, तिरपेस बसणें.

Basket *W.* टोपली *f,* पाटी *f,* दुरडी *f,* पेटारा. -hilt, the hilt of a sword to protect the hand खोबळा.

Bass, See under Base.

BASTARD *F.* दासीपुत्र, अकरमाशा.—*a.* राखेच्या पोटचा, मंगळीचा; spurious कृत्रिम, खोटा; [*Print.* abbreviated, as the half-title on a page preceding the full title-page of a book].

BASTE *v. Sw.* cudgel चेंचणें, कुंदीकाढणें; [sprinkle flour and salt and drip butter or fat on, as on meat in roasting].

BASTE *v. F.* sew slightly टांचे मारणें.

BASTINADE *F.* सोटेमार, टोणपेमार.—*v.* सोटाळणें, चेंचणें, चोपणें.

BASTILE *F.* किल्ला, गढी *f.*

BASTION *F.* बुरूज; fortress of four *bastions* चौबुरजी *f.*

BAT* a heavy stick दंडूका, सोटा; in playing a ball दांडू.—BATON सोटा, दांडा, गदा *f.*

BAT *O. E.* पाकोळी *f*; wild b. वडवाघूळ *n.* -FOWLING रात्रीं पक्षी धरण्याचा एक प्रकार आहे.

BATCH * quantity of bread baked at one time घाणा, भट्टी *f*; any work dispatched at once एकरास *f*, एकहात.

BATE* *v.* abate कमी क., उतरणें; leave out सोडणें, गाळणें.—*i.* कमी होणें, उतरणें [of].

BATING *prep.* सोडून, वजा करून.

BATH * place to bathe in स्नानाची जागा *f*, न्हाणी *f*; a house for bathing न्हाणघर *n*, हमामखाना; immersion in a bath स्नान *n*; a Hebrew measure एक कैली माप आहे; [Order of the B., a high order of British knighthood, composed of three classes, viz., Knights Grand Crosses, Knights Commanders, and Knights Companions]; cold b. शीतोदकस्नान *n*; tepid b. कोष्णजलस्नान *n*; warm b. कवोष्णजलस्नान *n*; hot b. उष्णजलस्नान; shower-b. धारास्नान *n*; medicated b. औषधी वाफारा; hot-air b. उष्ण हवेची ऊब *f*.—BATHE *v.* न्हाणघरांत अंघूळ घालणें, नाहणें; suffuse with a liquid ओला क., नाहणें, माखणें: her bosom *bathed* in blood.—*i.* अंघूळ क.—BATHING अंघूळ *f*, स्नान *n*.

BATTALION, See under BATTLE.

BATTEN * पुष्ट क., खुराक चारून माजवणें;—land खत घालून सुपीक क.—*i.* पुष्ट होणें, माजणें.—*n.* a piece of board, or scantling, of a few inches in breadth, used for various purposes चिरखांब, कडी *f*.

BATTER *v. F.* beat with successive blows दणके देणें, खोमलणें, ठोकणें; attack with artillery तोफांचा मारा चालविणें. — BATTERY धक्के मारणें *n*; *Mil.* any place where cannon or mortars are mounted, for battering a fortification or attacking an enemy मोरचा; disposition of *batteries* मोरचेबंदी *f*; an apparatus for generating galvanic electricity विद्युत उत्पन्न करण्याचें यंत्र *n*; *Law*, the unlawful beating of another कायद्याविरुद्ध दुसऱ्यास मारणें. — BATTERING RAM धक्का देऊन भिंत वगैरे पाडण्याचें यंत्र *n*.

BATTLE *n. F.* लढाई *f*, युद्ध *n*; a drawn b. ज्या लढाईत कोणत्याही पक्षास जय मिळत नाहीं ती, कच्ची लढाई *f*; a pitched b. ज्या लढाईत सैन्य पूर्वीच बंदोबस्तानें उभें केलेलें असतें ती; to give b. लढाई देणें, भिडणें; mingled b. तुमुलयुद्ध; b.-cry सिंहनाद; field of b. रणभूमि *f*; brave in b. रणधीर; the tumult of b. रणधुमाळी *f*.—*v.* युद्ध क., लढणें, भिडणें [with, for, against]. -ARRAY सैन्यरचना *f*, व्यूह. -MENT जंग्यांची भिंत *f*. -AXE परशू, फरश.—BATTALION पलटण *n*, *f*.

BAUBLE *F.* नकली दागिना.

BAWD *F.* कुंटण्या, कुटीण *f*.

BAWL* *v. i.* cry out with a loud, full sound गळा काढून -शिरा ताणून बोलणें, मोठ्यानें ओरडणें; cry aloud हेल काढून रडणें, बोंबलणें, आक्रोशणें [out, to].— *t.* ओरडून प्रसिद्ध क.—*n.* ओरड *f*, पुकारा.

Bay *a.* (*badius*) dark b. तेलिया, कुमाईत, तेल्याबोर ; chestnut b. लाखी ; light b. सुरंग ; app. to the color of horses.

Bay *F.* आखात *n*, उपसागर. -salt समुद्राचें मीठ *n*. (also Bow) -window भिंतीच्या बाहेर आलेली खिडकी *f*.

Bay *v. F.* bark at -वर भोंकणें ; follow with barking भोंकत मागें जाणें -लागणें : to b. the boar.—*i.* भोंकणें.—*n.* शत्रूच्या वेढ्यांत आपली जागा धरून राहणें *n* ; to keep at b. दूर राखणें, जवळ येऊं न देणें.

Bay *F.* तज, लवंगेचें झाड *n* ; the bark of b. दालचिनी *f*, तज *n* ; the leaves of b. लवंगपत्र *n*.

Bayonet *F.* बंदुकीची संगीन *f*.— *v.* संगिनीनें भोंसकणें ; compel or drive by the bayonet संगीन रोखून पुढें चालवणें -हाकून देणें.

Bdellium (*L.*) गुगूळ, देवधूप.

Be* *v.* (*Skr. bhú*) exist असणें ; become होणें : to be large ; remain राहणें, असणें : let the garment *be* as it was made ; be present in a place असणें : where *was* I at the time ? -ing, existence अहेपण *n*, अस्तित्व *n*, स्थिति *f* ; to bring into b. जन्मास घालणें ; that which exists व्यक्ति *f*, वस्तु *f*, भूत *n* : a human b. ; a living existence प्राणी ; Supreme B. परमेश्वर.

Beach (?) समुद्रकांठ -किनारा ; strand वाळवंट *n*.

Beacon* a signal-fire to notify the approach of an enemy शत्रु जवळ आल्याची सूचना करण्यासाठीं पेटवलेला अग्नि ; a conspicuous mark erected on an eminence near the shore, or moored in shoal water, as a guide to mariners नावाड्यांस वाट दाखविण्याची खूण *f* (आकाशदिवा, दीपमाळ *f*, इ०) ; that which gives notice of danger भयसूचक चिन्ह *n*.

Bead* a little ball bored मणी, पोत *f* ;— as used to count prayers जपमाळेचा मणी ; to tell one's *beads* जप क. ; a bubble on spirit मद्यावरचा फुगा ; a drop of sweat घामाचा बिंदु -टिपूस ; a small piece of metal in a fire-arm, used for taking aim माशी *f* ; to draw a b. नेम धरणें -बांधणें ; *Arch.* गोलची *f*. -sman दुसऱ्याकरितां प्रार्थना करायास लावलेला मनुष्य, जप्या, अनुष्ठानी.

Beadle* a messenger of a court छडीदार, चोपदार ; an inferior parish officer पट्टेवाला, चपराशी ;—of a temple गुरव.

Beak *O.E.* bill of a bird चोंच *f*, चंचु *f* ; anything like a beak, as a promontory of land चंचुरूप -टोकदार वस्तु *f* -पदार्थ ; a process, like the beak of a bird, terminating the fruit in certain plants कित्येक (बदाम, आंबा इ०) फळांचा चंचुरूप भाग.

Beam * any large piece of timber or iron long in proportion to its thickness, and prepared for use सोटा, लाट *f* ; one of the principal horizontal timbers used in buildings तुळई *f*, बहाल *n* ; the width of a vessel गलबताची रुंदी *f* ; the part of a balance from the ends of which the scales are suspended दांडा, दांडी *f* ; pole of a carriage, which runs between the horses दांडा, 'पोल' ; part of a loom तुरी *f* ;—of a draw-well ओकती *f* ; a ray of light किरण *n*.—*v.* किरण पाडणें, प्रकाशणें ; — the countenance टवटवणें, लुसलुसणें [forth].

Bean * घेवडा, वारवा.

Bear* (*Skr. bhri*) *v.* hold up आधार-पुस्ती देणें, पेलणें ; convey वाहणें, नेणें (burdens) ; wear धारण क. (sword, name) ; exercise चालवणें, बाळगणें (sway) ; cherish मनांत बागवणें, धरणें, बाळगणें ; endure साहणें, सोसणें, कंठणें ; be answerable for अंगावर घेणें, पत्करणें (blame, expense) ; bring forward पुढें आणणें -क., देणें : your testimony b. ; carry on

चालवणें, चालू -सुरू ठेवणें : to b. a part in conversation ; be capable of योग्य असणें, शक्ति असणें : give his words the most favorable interpretation they will b.; behave वागणें, वर्तणें : hath he *borne* himself penitently ?; afford देणें, पुरवणें ; bring forth उपजविणें (fruit); give birth to जन्मदेणें, प्रसविणें (children); down जिंकणें, मोड क. (an enemy); off दाबांत ठेवणें, आकळणें; out शेवटपर्यंत संभाळणें; through चालवणें, वहिवाटणें; up आधार देणें; तरता ठेवणें; पडूं न देणें : religious hope *bears* up the mind under sufferings ; to b. date तारीख -मिती असणें.—*i.* be patient ऐकून घेणें, साहणें, सोसणें : I cannot b.; produce फळ येणें -लागणें ; on, upon, press निकड लावणें, आग्रह क.; succeed शेवटास -सिद्धीस नेणें : to bring matters to b.; have direction कलणें, रोंख असणें : the land *bears* N. by E.; on, upon, relate संबंध असणें : how does this b. on the question; take effect लागू होणें; against लगाव साधणें; with संभाळून घेणें, वागवणें. -ER नेणारा ;—of burdens हमाल ;—of a palanquin भोई ;—of a standard निशाणबरदार ; one who assists in carrying a body to the grave प्रेत वाहून नेणारा, खांद्या; [one who holds a check, note, draft, or other order for the payment of a sum of money]; a tree yielding fruit फळ देणारें झाड *n*: a good b. -ING, relation संबंध; behavior वर्तन *n*; direction रोंख, कल, झोंक.

BEAR* आस्वल, रीस; *Astron.* सप्तऋषि. -GARDEN अस्वल -रीसखाना ; a rude turbulent assembly वेड्यांचा बाजार ; to become a b. वेड्यांचा बाजार पिकणें.

BEARD * hair that grows on the chin, lips, and adjacent parts of the face दाढी *f*; —of corn कुसळ *n*, कूस *n*; barb of an arrow तिराचा उलटा कांटा, अंकडा ; [that part of a horse, underneath the lower jaw and above the chin, which bears the curb of a bridle].—*v.* set at defiance दाढी उपटणें, नाकावर पाय देणें ; oppose to the face तोंडावर अप्रतिष्ठा क., उलट जाब देणें.

BEAST (*bestia*) any four-footed animal which may be used for labor, food, or sport पशु, चतुष्पद (Prov. xii. 10); horned b. शिंगोटी *f*;—of burden पाठाळ *n*; —of draught वाहीम *n*;—of pasture गुरू *n*, ढोर *n* ; as opp. to *man*, any irrational animal पशु, हैवान *m, f, n.* -LY *a.* पशुसारखा, पशुतुल्य, पशूच्या आकाराचा; filthy मळीण.

BEAT * *v.* strike repeatedly मारणें, ठोकणें. बडवणें; pulverize by pounding कुटून भुगा क. (hemp); hammer हतोड्यानें ठोकणें -ठोकून वाढवणें; range over in hunting पारध करतांना फिरणें -हिंडणें; tread, as a path मळणें ; thrash झोडणें, मळणी क. (Ruth ii. 17); vanquish जिंकणें, पराजित क.; perplex गोंधळवणें, घोटाळ्यांत पाडणें, माथाकूट क.: why should any one b. his head about the Latin grammar ; brush, as water or wind थाप -धडक मारणें ; back मागें हटविणें ; out थकणें; लंघून जाणें; —an alarm नगारा वाजवून भयाची सूचना क.; down मारून -ठोकून -धक्के देऊन पाडणें, विध्वंस क. (a wall) ; पाण्याच्या ओघानें -थडकेनें अथवा वाऱ्याच्या झटक्यानें पाडणें -दाबणें ; किंमत कमी क.; पाडून घेणें (price or value); into मनांत-डोक्यांत भरविणें, ठसवणें ; off मागें हटविणें ; — the hoof पायीं चालणें ; the wing फडफडणें ;—time ताल धरणें ; up एकाएकीं हल्ला क.; घाबरविणें, भय घालणें : to b. up the enemy's quarters. — *i.* knock ठोकणें, ठोठावणें; move with pulsation उडणें, धडधडणें (heart) ; dash or fall with force आपटणें, थडकणें (tempests); to b. about धुंडणें, नाना उपायांनीं शोधणें.—*n.* stroke टोला, प्रहार ; pulsation धडधडी *f* ; थडक *f*; *Mus.* ताल, पावडा ; a watchman's b. फेरी *f*;

गस्त *f*; a place of resort फेरी टाकण्याची -जाण्या येण्याची जागा *f*, अड्डा, चवाठा;—of a watch घड्याळाची टकटक *f*, खटखट *f*. -EN ठोकलेला, मारलेला &c.;—a road राबत्याचा, मळलेला, धोपट.

BEATIFY *v.* (*beatus*, happy, *facere*, to make) सुखी क.; regard as happy सुखी मानणें; bless with the completion of celestial enjoyment स्वर्गसुख -मुक्ति देणें; [*Rom. Cath. Church*, declare, by a decree, that a person is received into heaven, and is to be reverenced as blessed, though not canonized]. — BEATIFIC *a.* सुखकर -प्रद. —BEATIFICATION मेलेला मनुष्य मुक्ति पावला असें आज्ञापत्राकडून प्रसिद्ध क.— BEATITUDE स्वर्गसुख *n*, परमसुख *n*; Hindu philosophical terms for b. मुक्ति *f*, सिद्धि *f*, मोक्ष, निर्वाण *n*.

BEAU *F.* अकडबाज, छानछूक. -ISH *a.* छानदार, चट्टीपट्टीचा.

BEAUTY *O. E.* an assemblage of graces or of properties which pleases the sight or any of the other senses, or the mind सौंदर्य *n*, लावण्य *n*, शोभा *f*, सुंदरपणा; a particular grace, feature, ornament, or excellence खुबी *f*, नोक *f*, टूम *f*; a beautiful person सुंदर पुरुष; a beautiful woman सुंदरी *f*, रूपवती *f*. — BEAUTEOUS, BEAUTIFUL *a.* सुंदर, सुदर्शन, रूपवंत. —BEAUTIFY *v.* सुशोभित क., शोभा आणणें.— BEAUTY-SPOT, a patch or spot placed on the face to heighten beauty सौंदर्यवर्द्धक तिलक.

BEAVER* एक जलस्थलचर प्राणी आहे.

BECALM *v.* (*be* and *calm*) स्थिर -शांत क., शमविणें; keep from motion, as a ship by want of wind गति खुंटविणें, थिरावणें.

BECAUSE *conj.* (*by* and *cause*) कारण कीं, कारण; b. of ज्यामुळें.

BECHANCE *v.* (*be* and *chance*) अकस्मात घडणें -येऊन पडणें, बितणें.—*ad.* अकस्मात, एकाएकीं.

BECK* *v. i.* डोक्यानें किंवा हातानें खूण क., हस्तशिरसंकेत क.—*t.* हाताच्या किंवा डोक्याच्या खुणेनें बोलावणें. —*n.* संकेत, इशारा, सूचना *f*; to be at the b. of अर्थावचनांत -कह्यांत असणें. -ON *v.* पालवणें, बोलावणें.

BECLOUD *v.* (*be* and *cloud*) मंद -अंधूक क.

BECOME *v. i.* (*be* and *come*) होणें, बनणें.— *t.* शोभणें, साजणें.— BECOMING *a.* शोभणारा, लायक, उचित. -LY *ad.* लायकीनें, साजेसा, शोभेसा.

BED* an article of furniture to sleep or take rest on बिछाना, शय्या *f*, अंथरूण *n*; marriage विवाह: George, the eldest son of his second b.; a plat in a garden वाफा, पाडगा; the bottom of a river, or of any body of water तास *n*, पात्र *n*; a stratum थर; — of straw to ripen mangoes अढी *f*; hold, seat घर *n*, पात्र *n*, खुरशी *f*, बसक *f*: the b. of an engine; foot of a b. पायतें *n*, पायतर *n*; head of a b. उसें *n*; to go to b. निजणें; to put to b. प्रसवविणें; to be brought to b. बाळंत होणें, कोनी निघणें; to make the b. अंथरूण क.— *v.* पेरणें.— *i.* cohabit नांदणें. -DING बिछाना, सुपेती *f*. -CHAMBER निजायाची खोली *f*, शय्यागृह *n*. -FELLOW बिछान्यांतला सोबती, सहशायी. -RID, -RIDDEN *a.* confined to bed by age or infirmity खाटलेकरी. -STEAD पलंग, मंचक, खाटलें *n*;—with a top छप्पर पलंग. -TIME निद्राकाल, निजायाची वेळ *f*.

DIURNAL *a*. (*dies*, day) दिवसाचा (heat); daily रोजचा, नित्याचा, नित्य (task); recurring every day नित्य येणारा (fever); constituting the measure of a day दिवसाच्या मानाचा: d. revolution of the earth पृथ्वीची दैनंदिनगति *f*.

DIVAN *Ar*. a book पुस्तक *n*; account-book हिशेबाची चोपडी *f*; a council मसलत करणारांची -मंत्रीसभा *f*; दिवाण *n*; council-chamber दिवाणखाना; a sofa मंचक.

DIVE* *v*. *i*. descend or plunge into water बुडी -डुबकी मारणें; study thoroughly पुरा अभ्यास क., निपुण -निष्णात् होणें; plunge into any business गर्क -चूर होणें, -च्या नादांत असणें; penetrate भेदणें, वेधणें [into, down, under].—DIVER बुडी मारणारा, पाणबुड्या; a bird एक पक्षी आहे, पाणडुबी *H*.

DIVERGE *v*. (*-vergere*, to bend) extend from a common point in different directions मध्यापासून -केंद्रापासून फांकणें -पसरणें [from].—DIVERGENT *a*. केंद्रापासून फांकणारा, केंद्रपराङ्मुख.

DIVERT *v*. (*-vertere*, to turn) फिरवणें, वळवणें, तोंड -मोहरा फिरवणें; amuse रमवणें, रंजवणें; draw away बहकावणें, भुलवणें; [from, with, by, to]. — DIVERS *a*. अनेक, नाना, कित्येक (examples). — DIVERSE *a*. भिन्न, निरनिराळे, तऱ्हेतऱ्हेचे; multiform बहुरूपाचा, बहुरूप.—DIVERSIFY *v*. बहुरूप -बहुगुण क., चित्रविचित्र -नानाविध क. — DIVERSION फिरवणें *n*, परिवर्त्तन *n*; sport क्रीडा *f*, खेळ, अनुरंजन *n*; pastime गमत *f*, करमणूक *f*; *Mil*. act of drawing the ac-

tion and force of an enemy from the point where the principal attack is to be made मूल *f*, बहकावणी *f*.—DIVERSITY निराळेपणा, भेद; variety नानाप्रकार, अनेक प्रकार; separateness of being व्यक्तिभेद.

DIVEST *v.* (*-vestis*, garment) नागवणें, हिरावणें, उघडा -सुना -बुचा क.; opp. to *invest*, deprive हरण क., मुकविणें, हिसकून घेणें: to d. one of his rights [of].

DIVIDE *v.* (*dividere*) विभागणें, छेदणें; cause to be separate वेगळा -निराळा -अलग क.; share वांटणी -वांटे क., वांटणें; disunite in opinion or interest फूट -बिघाड पाडणें; भागणें, भाग देणें; [separate into two parts, for ascertaining opinions for and against a measure: to d. a legislative house in voting]; graduate अंश -भाग पाडणें -मांडणें: to d. a sextant [from, into].—*i.* फुटणें, अलग होणें, भेगलणें; मित्रत्व -स्नेह तुटणें; सभेचे दोन भाग करून मत देणें.—DIVIDED *a.* छिन्नविछिन्न; वेगळा केलेला, विभक्त; भागलेला, भाजित.—DIVIDEND भाग, हिस्सा; division of assets among creditors दामाशाई *f*; *Arith.* भाज्यांक.—DIVIDER भेदक, छेदक; वांटणारा &c.—DIVISIBLE *a.* भेदायाजोगा; खंडनीय; वांटायाजोगा; भाज्य; DIVISIBILITY भेद्यत्व *n*.—DIVISION दुभागणें *n*, कापणें *n*; छेद, विभागलेपणा; that which divides छेदक, भेदक; a partition पडदा, पूड, खण; a distinct section भाग, वर्ग, कोटि *f*;—of an army टोळी *f*, तुकडी *f*; difference in opinion बेबनाव, फूट *f*, मतभेद; difference of condition भेद, स्थित्यंतर *n*; *Arith.* भागाकार; distribution of a discourse into parts प्रकरणें -खंडें पाडणें *n*; a part so distinguished प्रकरण *n*, खंड *n*, भाग.—DIVISOR भाजक.

DIVINE *a.* (*divus*, belonging to a deity) देवसंबंधी, ईश्वरी, दैवी; proceeding from God देवा पासून निघणारा, देवाचा, ईश्वरी (judgments); appropriated to God देवास वाहिलेला, देवसेवेस योजलेला, देवाचा (service); d. songs देवाचें भजन करण्याचीं गीतें; godlike देवा सारखा -समान, ईश्वरतुल्य; excellent in the highest degree अत्युत्तम, अत्युत्कृष्ट; relating to theology ईश्वरविद्येचा -संबंधी (learning).—*n.* a minister of the Gospel ख्रिस्ती धर्मोपदेशक, पाद्री; a theologian ईश्वरविद्या जाणणारा, ईश्वरविद्येंत अभिज्ञ, *Hindu* terms, वैदिक, ब्रह्मज्ञानी, वेदशास्त्रसंपन्न, शास्त्री.—*v.* predict भविष्य सांगणें, detect शोधून काढणें.—*i.* use divination शकुन पाहणें, जोसीपण क.; utter prognostications ठोका -भविष्य सांगणें; have forebodings पूर्वसूचना असणें, होऱ्यांत येणें; guess अटकळ -अनुमान क. -LY *ad.* सर्वोत्तम, लोकोत्तर: d. fair; by the agency or influence of God ईश्वरी कर्तृत्वानें, ईश्वरी सत्तेनें, ईश्वर, in comp.: d. inspired ईश्वरप्रेरित.—DIVINER शकुन पाहणारा, दैवज्ञ, शकुन्याजोसी.—DIVINATION शकुनविद्या *f*, चेटक *n*, दैवज्ञान *n*, रमल *n*; prediction भविष्य *n*, भाकीत *n*.—DIVINITY, the state of being divine देवत्व *n*, देवपण *n*; God ईश्वर, देव; a false god खोटा -कल्पित देव; a celestial being, inferior to the supreme God, but superior to man देव, सुर, दैवत *n*; supernatural power or virtue अलौकिक शक्ति *f*; awe-inspiring character प्रभव, दरारा; science of divine things ईश्वरी विद्या *f*, परमार्थ ज्ञान *n*.

DIVORCE (See DIVERT) a legal dissolution of the marriage contract by a court or other body having competent authority नवऱ्या बायकोची कायद्या प्रमाणें सुटासूट *f*; separation वियोग; writing by which marriage is dissolved सूटपत्र *n*, सोडचिठ्ठी *f*.—

[from].— *v.* सूटपत्र देणें, सूटपत्र देऊन संबंध तोडणें; वियोग पाडणें, संबंध तोडणें.

Divulge *v.* (*-vulgare*, to spread among the multitude) फोडणें, प्रसिद्ध क., पुकारा क., चौघांत -षट्कर्णी क.; *divulging* of a secret रहस्यभेद;—of counsel मंत्रभेद [to].

Dizzy* *a.* giddy घेरी -भोवंड आलेला; causing vertigo भोवंड आणणारा; heedless मूर्ख, अविचारी, डोकें फिरलेला.—Dizziness भोवंड *f*, घेरी *f*, गिरकी *f*.

Do* *v.* perform, as an action करणें; bring about घडविणें; finish समाप्त क., उरकणें, शेवटास नेणें: the battle *done*; make ready for an object, purpose, or use, as food by cooking शिजविणें, होऊं देणें, करणें: the meat is *done* on one side only; let होऊं देणें; to d. to death ठार मारणें; to d. away काढून टाकणें, दूर क.; to d. into आंत उतरणें, भाषांतर क.: the Pilgrim's Progress has been *done* into verse; deceive फसविणें, धत्तुरा दाखविणें; to d. one's best पराकाष्ठा- यथाशक्ति -होईल तितकें क.; to d. over पुनः -उलटून क.; आच्छादणें, लेपडणें, चोपडणें: boats *done* over with a kind of slimy stuff; up बांधणें, आवळणें; पुरतें क.; with कामीं लावणें: they know not what to d. with themselves; what have I to d. with you? मला तुम्हासीं काय करायाचें आहे, माझें तुझें काय आहे, मी तुझें काय लागतो? d. come अवश्य ये; I d. love him मी त्याला खरोखर -खचीत चाहतों.—*i.* चालणें, वागणें (2 Kings xvii. 34); how d. you d.? तुम्ही कसे आहां, तुमची प्रकृति कशी आहे इ०; manage चालवणें, लोटणें: if no better plan be found, he will make this d.; for चालणें, उपयोगीं येणें; put an end to शेवट क., निःपात क., नाश क.: a goblet is *done* for when it is broken;—without शिवाय-वाचून क. -er करणारा, कर्त्ता; आचरणारा, पाळणारा (Rom. ii. 13). -ings कृत्यें *n pl*, कर्मे *n pl*; आचरण *n*, वर्तणूक; stir गडबड, धांदल *f*.—Doing-up सांधासांध *f*.

Docile *a.* (*docere*, to teach) teachable शिकण्याजोगा; tractable ताब्यात -कह्यांत राहण्याजोगा; easily managed गरीब, सालस. —Docility शिक्षाशीलत्व *n*; सालसाई *f*, गरिबी *f*.

Dock* a plant वृद्धराज, रक्तसौगंधिक.

Dock *v. Ger.* cut off, as the end of a thing लांडा क.; deduct from बाद -वजा क. (an account). — *n.* (*doga*, a sort of vessel) place for building or laying up ships गोदी *f*; place where a criminal or accused person stands in a court कोर्टांत कैदी अथवा आरोपित उभा राहण्याची जागा *f*. -age गोदीचें भाडें *n*. -yard जहाजाचें सामन ठेवण्याची बंदराजवळची कोठी *f*, गोदी *f*.

Docket *f.* a summary गोश्वारा; a label चिठी *f*, बीजक *n*; [*Law*, an abridged entry of a judgment in an action].

Doctor (*docere*, to teach) शिक्षक; a learned man विद्वान, पंडित; a title in divinity, physic, law, &c. आचार्य, पंडित, शास्त्री, मौलवी ह्यासारखा एक किताब आहे; 'डाकतर' a physician वैद्य, 'डाकतर'; d. of divinity वेदशास्त्र -श्रुतिविद्यासंपन्न, मुरशीद, शेख *Pers.* —Doctrine, instruction उपदेश, शिक्षा *f*; what is held, put forth as true, and supported by a teacher, a school, or a sect मत *n*, सूत्र *n*, न्याय, सिद्धांत इ०; learning विद्या *f*, ज्ञान *n*; difference of d. शाखाभेद; received d. संप्रदाय.—Doctrinal *a.* शिक्षेचा, शिक्षेसंबंधी; मत -उपदेश संबंधी. — Document, original or official paper relied upon as the basis, proof, or support of any thing else दस्तऐवज, दाखला, कागदपत्र; original d. अस्सल दस्त-

ऐवज, कागदपत्र *n pl.* -ARY *a.* दस्तऐवज संबंधी.

DODDER *Ger.* आकाशवेल *m, f.*

DODECAGON (*Gr. dodeka,* twelve, *gonia,* angle) द्वादशकोणाकृति *f.*

DODGE *v. i.* ? shift place by a sudden start टणकर उठून जागा बदलणें; play tricks थट्टा मांडणें, ठकवणें, झोंका, देणें.—*t.* चुकविणें, टाळणें, वारणें [about].

DOE* हरिणी *f,* हरणी *f.*

DOG *D.* कुत्रा, श्वान; a mean, worthless fellow अधम, नीच, पाजी; a fellow गडी, माणूस: a lazy d.; give or throw to the *dogs* चुलींत -मातींत घालणें, उकीरड्यावर टाकणें; to go to the *dogs* चुलींत -मसणांत जाणें, नाश पावणें, सत्यनाश -वाटोळें होणें.—*v.* पाठपुरवणें -घेणें, पाठीस लागणें. -CHEAP *a.* cheap as *dogs'-meat* पैशापायली, मातीच्या मोलाचा. -DAY ज्या दिवसीं लुब्धक ताऱ्याचा उदयास्त सूर्याबरोबर होतो तो; [the *dogdays* commence in the latter part of July, and end in the beginning of September]. -FANCIER कुत्र्यांचा शोकी व कुत्रेविक्या. -FOX कोल्हा. -GED *a.* कुचर स्वभावाचा, कुरठा. -GISH *a.* कुत्राच्या (वाईट)स्वभावाचा, तुसडा. -GRASS एक जातीचें गवत *n,* कुत्र्याची चार *f,* पदें *n,* कुतरें *n.*? -LATIN धेडगुजरी लाटीन भाषा *f.* -ROSE सदागुलाब. -'S-EAR पुस्तकाच्या पानाचा दुमडलेला कोपरा. -SLEEP ढोंगाची झोंप *f,* कुतरझोंप *f.* -'S-MEAT उष्टेंपाष्टें *n.* -STAR लुब्धक. -TOOTH सुळादांत, सुळा. -TROT कुत्तर चाल *f.* -TRICK कुचेष्टा *f.* [-WATCH, *Naut.* a watch of two hours, of which there are two called respectively the first d. and second d., the first being from 4 to 6 o'clock P. M., the second from 6 to 8 o'clock P.M.]

DOGMA (*L.*) that which is held as an opinion मत *n*; a formally stated and authoritatively settled doctrine सूत्र *n,* सिद्धांत; a principle of doctrine that is asserted or taught without sufficient evidence मतबीज *n,* मततत्वमूल *n.* -TICAL *a.* मत संबंधी; magisterial दबदब्याचा, दाबाचा, मीपणाचा (philosopher); authoritative प्रमाणाचा, सप्रमाण, आप्त (opinion). -TISM, arrogance in opinion हटवाद, मताभिमान. -TIZE *v.* स्वमतानें -हटवादानें स्थापणें.

DOLE* *v.* वांटणें [out].—*n.* वांटा, हिस्सा.

DOLEFUL *a.* (*dolere,* to feel pain) दुःखभरित, उदास, दिलगीर.

DOLICHUS (*Gr.* long) Chinese d. चवळी *f*; two-flowered d. कुळीथ *f*; black-seeded d. वालपापडी *f*; d. pruriens कवच कुयरी *f.*

DOLL (from Dorothy) लेंकराची खेळायाची बाहुली *f,* पुतळी *f.*

DOLLAR *Ger.* सवादोन रुपयांच्या किमतीचें एक नाणें आहे, 'डालर.'

DOLT* मूर्ख, टोणपा, गाढव, ढ.

DOMAIN (*dominus,* master) dominion राज्य *n,* अधिकार; territory over which dominion is exerted राष्ट्र *n,* राज्य *n,* देश; landed property वतर *n,* वतनी जमीन *f*; *Law,* ownership of land जमिनीची मालकी *f,* वतनदारी *f,* फर्जिदारी *f.*

DOME (*domus,* house) घर *n*; a cupola घुमट, कळस. — DOMESTIC *a.* घरचा, गृह in comp.: d. affairs गृहकृत्य *n*; pertaining to a nation considered as a family, or home, or to one's own country आपल्या देशांतला, मुलखी, स्वदेशीय, घरगुती (dissensions); remaining much at home घर धरून राहणारा, घरकुबडा (man); tame माणसाळलेला, पाळलेला, ग्राम्य in comp.: d. animals ग्रामपशु; made in one's own house, nation, or country घरीं केलेला, घरगुती: d. chaplain कुलाचार्य; d. contentions गृहकलह; d. slave गृहदास; d. duties कुलकर्म *n.* —*n.* घरचा चाकर, घरअसामी. -ATE *v.* घरची सवयी लावणें: to d. one's self; tame माण-

साळवणें, बाळगणें (wild animals).—DOMICILE घर *n*.

DOMINATE *v.* (*dominus*, lord) अधिकार -सत्ता -जोर चालविणें. — DOMINANT *a.* जोराचा, प्रबळ, प्रधान; d. party प्रबलपक्ष. — DOMINATION हुकमत *f*, अमल, अधिकार, आधिपत्य *n*.—DOMINEER *v.* rule with insolence कडक -करडा अमल चालवणें, हुकमत चालवणें; bluster शेखी चालवणें -मिरवणें [over].—DOMINICAL *a.* indicating the Lord's day, or Sunday प्रभूचा दिवस अथवा आदितवार दाखविणारा; relating to, or given by, our Lord आमच्या प्रभूचा, अथवा आमच्या प्रभूनें (येशू ख्रिस्तानें) सांगितलेला (prayer).—DOMINION, supreme authority अधिकार, सत्ता *f*; empire राज्य *n*; preponderance वर्चस्व *n*, प्राधान्य *n*; territory सत्तेखालचें राज्य *n* -राष्ट्र *n* -चा देश; a governing power of very high rank प्रभुत्व *n* (Col. i. 16).

DONATION (*donum*, gift) act of giving देणें *n*; a grant दान *n*, बक्षीस *n*, देणगी *f*. —DONOR देणारा, दाता.

DOOM* judicial sentence शिक्षेचा हुकूम -ठराव; penalty शिक्षा *f*, दंड; unhappy fate नशीब *n*, होतव्य *n*.—*v.* शिक्षा सांगणें -ठरवणें; fine दंड घेणें -क.; destine दैवीं नेमणें -लिहिणें [to]. -SDAY शिक्षा ठरविण्याचा दिवस; day of the final judgment जगाच्या न्यायाचा दिवस.

DOOR* (*Skr. dvâr*) दार *n*, कवाड *n*; passage वाट *f*, दार *n* (John x. 9); entrance-way and the house to which it leads घरांत जाण्याचा रस्ता व ज्या घरास तो जातो तें घर *n*: his office is now the second d. in the street; from d. to d. दारोदार, घरोघर; in -*doors* घरांत; out -*doors* बाहेर; to be out of *doors* गमावणें; to lie at one's d. (दोष -पाप इ०) पदरीं येणें -घालणें इ०; private d. चोरदार *n*, अंतर्द्वार *n*; back d. मागला दरवाजा, परसदार *n*; front d. पुढला दरवाजा. -CASE दरवाज्याची चौकट *f*. -KEEPER द्वारपाळ, देवडीवरचा शिपाई. -POST बाही *f*, दारकस *f*.

DORMANT *a.* (*dormire*, to sleep) निजलेला, निद्रिस्त; quiescent शांत, स्वस्थ (passions); not disclosed गुप्त, अप्रकट (claims).—DORMITORY निजायाची खोली *f*, शय्यागृह *n*; burial-place मसणवट *f*.

DORSAL *a.* (*dorsum*, the back) पाठीचा, पृष्ठय.

DOSE (*Gr. dosis*, a giving) quantity of medicine prescribed to be taken at one time औषधाची मोताद *f* -ची मात्रा *f*; a portion मोताद *f*, रकम *f*; [any thing nauseous that one is obliged to take.]—*v.* परिमाणानें औषध देणें, मात्रा देणें.

DOT* टिंब *n*, पूज्य *n*, शून्य *n*.—*v.* टिंब देणें; mark or diversify with small detached objects बिंदुवत् अंकित -चित्रविचित्र क. [with, over].

DOTE *v. i. D.* have the intellect impaired, esp. by age, so that the mind wavers ह्यातारचळ लागणें, खुळावणें; be foolishly fond भुलणें, वेडा होणें, मरणें [on, upon]. —DOTAGE चळ, ह्यातारचाळे *n pl*, साठीबुद्धि *f*; अतिवेड *n*, नाद *f*. — DOTARD ह्यातारचळ लागलेला, साठ्या.

DOUBLE *a.* (*duo*, two, *plicare*, to fold) दुप्पट, द्विगुण; coupled जोडगीर, जुळा; divided into two दुभागलेला; deceitful दोन मनांचा, कपटी; d.-tongued दुतोंड्या; d.-edged दुधारी. —*ad.* दुप्पट; दुहेरी.—*v.* दुप्पट क., दुणावणें; दुमटणें, दुमडणें, मोडणें: to d. up a sheet of paper; be the double of -ची दुपटी होणें -असणें -भरणें; pass around भोंवतालीं फिरणें, प्रदक्षिणा क., वळसा घालणें. —*n.* दुपटी *f*, दुणी *f*; घडी *f*, पदर; a trick पेंच, डाव. -NESS दुहेरीपणा, द्वैगुण्य *n*; कपट *n*, द्वैत *n*, दुजाभाव; d.-dealing दुटप्पी व्यवहार -FACED *a.* दुतोंड्या, मनांत एक जनांत

एक, उभयतोमुख. -MINDED *a.* चंचल मनाचा, द्विमनस्क. -STAR [*Astron.* two stars so near to each other as to be seen separate by means of a telescope only].

DOUBT *v. i.* (*dubitare*) waver in opinion गुटमळणें, कांकू क., आशंकणें; fear भिणें, भय वाटणें.—*t.* question शंका काढणें -घेणें, संशय बाळगणें, पृच्छा क. [of].—*n.* a fluctuation of mind arising from defect of knowledge or evidence धरसोड *f*, दुग्धा *f*, अनिश्चय; uncertainty of condition अंदेशा, संधिग्धावस्था *f*; suspicion संशय, वहीम; dread भय *n*; objection शंका *f*, दिक्कत *f*, कांक्षा *f*. -FUL *a.* hesitating अस्थिर; dubious संशयाचा, संदेहाचा, संदिग्ध (expression); questionable संशय घेण्याजोगा, संशयात्मक (case); affected by fear भयाक्रांत; timorous भयशील. -LESS *ad.* निःसंशय, खचित, बेलाशक.

DOUGH* मळलेली -तिंबलेली कणीक *f*; a lump of kneaded d. उंडा; my cake is d. माझें काम अझून कच्चें आहे.

DOUGHTY* *a.* गाढा, मर्द, समशेर बहादर: a d. hero.

DOVE* खबुतर *n*, कपोत. [The d. is often employed as the emblem of innocence, gentleness, and affection; also in art and in the Scriptures as the typical emblem or symbol of the Holy Ghost]; a word of endearment प्यारा, लाडका, राघू, चिमणा इ०. -COTE खबुतरखाना. -TAIL, *Carp.* चाळा, कळासी *f*.—कळासी जोडणें.

DOWAGER (*dotare*, to endow) a widow having a jointure रांडरोटा मिळालेली विधवा, *f*, मृतभर्तृधनभागिनी *f*; [a title given in England to a widow, to distinguish her from the wife of her husband's heir bearing the same name; it is chiefly applied to the widows of personages of rank: queen d., the widow of a king].–DOWER, DOWRY, endowment वृत्ति *f*; gift दान *n* (Gen. xxxv. 12); property with which a woman is endowed स्त्रीधन *n*; esp. that which a woman brings to a husband in marriage अंदण *n*; that portion of the real estate of a man which his widow enjoys during her life, or to which a woman is entitled after the death of her husband बाईलवांटा, रांडरोट; d. given to a first wife on her supersession by a second marriage आधिवेदनिक *n*.

DOWN* *prep.* खालीं, खालतां; towards the mouth of a river नदीच्या मुखाकडे; d. the country समुद्राकडे.—*ad.* खालीं, खालती; from a higher to a lower condition निचावस्थेंत; from a higher antiquity प्राचीन काळापासून; below the horizon खालीं, क्षितिजाखालीं: the moon is d.; to boil d. आटविणें, जाळणें; d. in the mouth खिन्नवदन; d. with खालीं पाड -ओढ; up and d. मागें पुढें; इकडे तिकडे; to throw d. पछाडणें; to take d. उतरणें; to take d. a house &c. उस्तरणें, उधडणें; to take d. in writing लिहून घेणें; to go or sit d. बुडणें, खालीं जाणें; to throw d. पाडणें, खालीं पाडणें; to lay d. ठेवणें.—*a.* dejected खिन्न, म्लान; flat खसखसीत, साफ, निखालस (denial); downward खालचा (train). -CAST *a.* खिन्न झालेला, अधोमुख; लज्जित. -FALL खालीं पडणें *n*, पतन *n*, अधःपात; destruction पतन *n*, पराजय, मोड, नाश &c. -HILL उतरण *f*.—*a.* उतरता. -RIGHT *ad.* straight down नीट, धोपट; in plain terms साफ, निखालस, धडधडीत, उघड, धादांत, बजिन्नस.—*a.* साफ, उघड, सरळ: a man of d. character; unmixed नितळ, निवळ: d. atheism. -WARD, WARDS *ad.* खालीं, खालतीं; towards misery, humility, disgrace, or ruin दुःख, अपमान, नाश इ०, कांकडे; from a remote time बहु कालापासून.—*a.* खालचा, अधोगामी (course); declivious उतरता;

descending from a head, origin, or source वंशांतला, परंपरेनें आलेला; dejected उदास, खिन्न.

DOWN *D.* close hairy covering of birds under the feathers पक्ष्यांचे मऊ केंस *pl*, लंव *f*, मृदुलोम; pubescence of plants कापूस;—of cloth फूल *n*; soft hair of the face when beginning to appear तोंडावरची लंव *f*.—*माळजमीन *f*, रान *n*, माळ.

DOXOLOGY (*Gr. doxa*, praise) in Christian worship, a hymn expressing praise and honor to God ईश्वरस्तवनाचें गीत *n*, ईश्वरस्तुति गान *n*.

DOZE *v. i. D.* डुकली घेणें, डुकल्या देणें.—*n.* डुकली *f*, अल्प निद्रा *f*.—DOZY *a.* निद्राळु, डुकलीखोर.

DOZEN *F.* दोन छकड्या *f pl*, बारा 'डजन.'

DRAFT, See DRAUGHT.

DRAG* *v.* pull along the ground by main force जमिनी वरून जोरानें ओढणें -खेचणें, फरफरावणें, खरडीत ओढणें; harrow गुठाळणें; pass in pain or with difficulty रडत रखडत चालवणें -लोटणें [about, along].—*i.* रखडणें: the day *drags* through.—*n.* a kind of net महाजाळें *n*; [kind of sledge for conveying heavy bodies]; a heavy harrow, for breaking up ground कुळव *n*; a clog लोढणें *n*, खोडा; a heavy motion, as if dragged along ओढ *f*. -NET महाजाळें *n*, पाग.—DRAGGLE *v.* लोळवून -भिजवून मिळविणें.

DRAGON (*Gr. drakon*) एक कल्पित सपक्ष सर्प आहे.—DRAGOON, a soldier who is taught and armed to serve either on horseback or on foot करोल, 'द्रगुन.'

DRAIN* *v.* cause to flow gradually out or off ओसरविणें; cause the exhaustion of खपविणें, उपसणें, अटविणें, खर्चणें: this alone *drained* their treasure; exhaust of liquid contents by drawing them off निथळून -निचरून काढणें; empty of wealth, resources, &c. कोरडा पाडणें -क., रिकामा क.; filter गाळणें;—land पाट -पन्हळ बांधून पाणी काढणें [off].—*i.* हळूहळू वाहून जाणें, ओसरणें; निथळणें, निचरणें.—*n.* उपसा; a channel मोरी *f*, नळ; water-course पाट, पन्हळ.

DRAKE *Ger.* बदकाचा नर, हंस.

DRAM (*Gr. drachmè*) वैद्याच्या औन्स नामक वजनाचा आठवा हिस्सा; वाण्याच्या औन्साचा सोळावा हिस्सा; a mite गुंज *f*, रती *f*, मासा इ०; as much spirituous liquor as is drunk at once दारूचा घोंट, 'द्राम.'

DRAMA (*Gr.*) नाटक *n*, रूपक *n*; religious d. लळीत *n*; the science of— नाट्य *n*, भारतशास्त्र *n*. -TICAL *a.* नाटकाचा, नाटक संबंधी; d. representations नटचर्या *f*. -TIST नाटक कवि.

DRAPER *F.* कापडकरी -विक्या.—DRAPERY कापड विकण्याचें किंवा करण्याचें काम *n*; cloth कापड *n*, कापडी माल; clothing of the human figure in sculpture and painting पुतळ्याचा -चित्राचा पेहराव, लिबास.

DRAUGHT* act of drinking पिणें *n*; act of drawing ओढणें *n*; act of drawing a net जाळें ओढणें *n*; act of drawing men from a military band, army, or post, or from any company or society फौजेंतून अथवा कोणत्याही टोळींतून -मंडळींतून माणसें काढून घेणें *n*; act of delineating अंकणें *n*, बेतणें *n*, वर्णन क. *n*; that which is drawn ओढलेला पदार्थ, ओढा *f*; that which is taken by sweeping with a net जाळ्यांत एका खेपेस धरलेले मासे वगैरे, ओढ *f*; a potion घोंट, घुटका; detachment (लष्कराची) तुकडी *f*, टोळी *f*; a delineation वर्णन *n*; a sketch आराखडा, बेत, नकाशा; order for the payment of money चिठ्ठी *f*, हुंडी *f*; current of air moving through an inclosed place

वाऱ्याची धार *f* -चा नेट; a sink मोरी *f*; *Med.* a sinapism मोहरीचें पोटीस *n*: to apply *draughts* to the feet; capacity of being drawn ओढण *f*; depth of water necessary to float a ship बूड, ओंडी *f*: a ship of twelve feet d.; *pl* checkers सोंगट्या *f pl*; a piece or man at d. सोंगटी *f*; beast of d. वाहीम, खांद्याचा बैल.—*v.* आराखडा काढणें, अंकणें, बेतणें; compose and write मजकूर जुळून लिहिणें, मसूदा क. (a memorial); फौजेची तुकडी वेगळी काढणें [out, from]. -BOARD सोंगट्यांचा पट. -MAN नकाशा काढणारा, 'ड्राफ्टम्यान.'

DRAW * *v.* pull along ओढणें, खेंचणें; attract ओढणें, आकर्षणें; allure मोहणें, भुलवणें; pull from a sheath, as a weapon उपसणें, काढणें;—as water from a well &c. काढणें, शेंदणें; extract काढणें, निपसणें (spirits); deduce from premises अनुमानानें-तर्कानें काढणें: to d. moral lessons from history; take from a place of deposit काढणें, पेढीवरून -ठेवीच्या जाग्यांतून काढणें: to d. money from a bank; receive from a lottery by the drawing out of the numbers for prizes or blanks सोडतीच्या चिठ्या टाकून मिळवणें -घेणें; obtain by good fortune दैवानें-भाग्यानें मिळविणें; suck dry चोखून टाकणें (the breast); eviscerate पोट चिरणें, अंतडीं बाहेर काढणें (a fowl); inhale श्वासानें -श्वासाबरोबर ओढणें -घेणें, खाणें (air); extend in length as a piece of metal into wire लांबविणें, वाढविणें, काढणें; run, extend, or produce, as a line on any surface (रेघ) ओढणें, काढणें;—a picture चित्र काढणें; depict वर्णन क.; write in due form यथापद्धत -रीतीनें लिहिणें, रिवाजाप्रमाणें लिहिणें, तयार क., सजवणें (a memorial, deed); prepare a draught of खरडा -मसूदा तयार क.; sink in water पाण्यांत बुडणें: a ship *draws* ten feet of water; require a depth of, as water, for floating तरण्याकरितां (गलबतास) अमूक परिमाणाच्या ओंडीचें पाणी लागणें; [*drawn* butter, butter melted and prepared for use as gravy, to be poured on food]; *drawn* battle ज्यांत दोनी पक्षांस जय मिळत नाहीं असें युद्ध *n*, कच्ची लढाई *f*; to d. a bow धनुष्य ताणणें -ओढणें; a curtain पडदा पाडणें किंवा सारणें: night *draws* the curtain which the sun withdraws: to d. back परत मिळणें -घेणें (duties on goods for exportation); in आंत ओढणें -आणणें; गोळा -जमा क.; भुलवणें, मथवणें; interest व्याज उत्पन्न क. -मिळवणें -खाणें; व्याज घेण्याचा अधिकार देणें; off परत -माघारा घेणें; on घडविणें, बनवून आणणें; out लांबवणें, ताणणें, वाढवणें; up यथापद्धत लिहिणें, मजकूर जुळणें; खरडा तयार क.; रांगेनें उभें क., रांग लावणें: *drawn* up in battle to receive the charge.—*v. i.* ओढणें: a horse *draws* well; मोहणें, आकर्षणें: watch the bias of his mind that it may not d. too much; आकृति -चित्रें काढणें: he *draws* with exactness; म्यानांतून -गवसणींतून काढणें (तरवार) उपसणें; *Med.* पिकविणें, वाहविणें; shrink अखूडणें, अवळणें; move, come, or go चालणें, येणें, जाणें; off पाठीमागें सरणें, माघार घेणें; on भिडणें, नेटणें, जवळ येणें; up रांगेनें उभें राहणें, सजणें; -वर तनखा -वरातचिठ्ठी देणें, चिठ्ठी पाठवून मागणें क.: you may d. on me for the expenses of your journey; undergo draught ओढला जाणें. -BACK, hindrance अडथळा, अटकाव; *Com.* money remitted सूट *f*, माफीचा पैका. -BRIDGE काढाया -घालायाचा पूल. -EE हुंडीचे पैसे देणारा. -ER ओढणारा, काढणारा; चित्रें -नकाशा काढणारा, चितारी; हुंडीचे पैसे घेणारा;—of a purse &c. ओढदोरा; box in a case खण, पूड *n*, ओढखण; secret d. चोरखण; *pl* a close under-garment इजार *f*, पायजामा; short d. चोळणा, चड्डी *f*. -ING ओढणें *n*, आकर्षण *n*; चित्र *n*; नकाशा. -ING-ROOM,

room appropriated for the reception of strangers बैठकीची जागा *f*, सदर *f*, दिवाणखाना; company assembled in such a room सदरेची मंडळी *f*. -WELL मोटेची विहीर *f*; land watered from a d. मोटस्थळ *n*.

DRAY* a low cart छकडा, छकडीगाडी *f*.

DREAD* terror excited by the prospect of great evil दहशत *f*, जरब *f*, धास्ती *f*; reverential fear वचक *f*, अदब *f*; object of terrified apprehension, or of reverential fear भय धरण्याचा विषय, सन्मानाचा विषय, भय -सन्मानपात्र.—*a*. भयंकर, जरबेचा; पूज्य, बुझरुग.—*v*. धास्ती -वचक बसणें. -FUL *a*. भयंकर, दारुण (storm); धाकाचा, दराऱ्याचा, इजतीचा.

DREAM* thought, or series of thoughts, of a person in sleep स्वप्न *n*; sleeping vision दर्शन *n*, दृष्टांत? an idle fancy वृथा मनोरथ -कल्पना *f*, अभास.—*v. i*. स्वप्न पडणें -पाहणें; वृथा कल्पना क., मनांत मांडे खाणें. —*t*. स्वप्नांत पाहणें; away, out, through वृथा विचारांत घालविणें -खर्चणें (life). -ER स्वप्न पाहणारा -दर्शी; वृथा वासना -मनोरथ बाळगणारा.— DREAMY *a*. स्वप्नवत्, वृथा; full of dreams स्वप्नांचा, स्वप्नमय.

DREARY* *a*. शून्य, भयाण, भणभणीत.—DREARINESS शून्यता *f*, उदासपणा.

DREGS *Ger. pl* sediment गाळ, रेंदा, मळ; vilest and most worthless part of any thing खरवड *f*, गाळ: the *dregs* of society.

DRENCH* *v*. put a potion down the throat of, as of a horse धोटयानें पाजणें; purge violently by physic ढाळ देणें; wet thoroughly चिंब भिजवणें, थबथबीत क., उपळविणें [with].—*n*. घोंट; धोटयानें पाजायाचें औषध *n*: d. horn घोटें *n*, धोटें *n*.

DRESS *v. F*. make straight नीट -सरळ -उजू क.; [*Mil*. arrange, as soldiers, in a straight line and at proper distances]; get ready तयार क.;—food शिजविणें, पाक क.;—a garden मशागत क., ओजवणें;—leather कमावणें; — ground कमावणें, कारवणें; a lamp नीट -चकपक क.;—hemp or flax विंचरणें;—a horse शिकवणें, वठणीस आणणें;—a wound जखम धुणें -बांधणें, मलमपट्टी बांधणें;—a slain animal (पिसें -अंतडीं -केंस वगैरे काढून) साफ -नीट क.; clothe वस्त्रें नेसविणें; deck शृंगारणें, सजवणें; up, out मोठ्या थाटाचा पोशाक क. [to d. up a ship, to ornament her with colors] [in, with, for].—*i*. शिपायांच्या रांगेंत जाग्यावर नीट उभें राहणें; वस्त्रें नेसणें, पोशाक -कपडे क.—*n*. पोशाक, वस्त्रें *n pl*, लिबास; a lady's gown सभ्य स्त्रीचा पेशवाज, झगा. -ING वस्त्र *n*, पोशाक; मलम, पट्टी *f*, इ०; manure spread over land जमिनीवर पसरलेलें खत *n*; gum, starch, and other articles used in stiffening or preparing silk, linen, and other fabrics गोंद, खळ, इ० मालमसाला. -ROOM वस्त्रें नेसण्याची खोली *f*, वस्त्रपरिधानशाला *f*.

DRIBBLE* *v. i*. fall in drops थेंब थेंब पडणें, ठिपकणें; slaver लाळ गळणें.—*t*. थेंब थेंब पाडणें -गाळणें.—DRIBLET लहान रकम *f*; to pay in *driblets* अधेल्या दमडीनें देणें.

DRIFT* that which is driven along लोंढा, लोट;— of dust वावधूळ *f*;— of rain वावझड *f*; a drive, as of cattle तांडा; — of birds झुंड *f* झांक *f*; force which impels ओढ *f*, ओढण *f*; course along which any thing is driven धोरण *n*, ओढ *f*, झोंक: our d. was south; tendency कल, रोंख: the d. of a poem.—*v. i*. ओघा बराबर वाहून जाणें, वाहणें, तरंगत जाणें: a raft *drifted* ashore वाऱ्याच्या जोरानें जमणें -गोळा होणें, ढीग -रास होणें: snow *drifts*.—*t*. रास -गोळा -ढीग क.: a current of wind *drifts* sand [away,

about].—*a.* वाऱ्यानें -ओघानें चालाया -हलाया जोगा (ice).

DRILL* *v.* bore with a drill सामऱ्यानें भोंक पाडणें, विंधणें; sow, as seeds, in rows काकरींत पेरणें; train in the military art शस्त्रविद्येंत निपुण क., कवाईत शिकविणें; instruct in the rudiments of any art कोणत्याही विद्येचीं मूळतत्वें शिकविणें; waste away by degrees हळूहळू खर्चणें -उडवणें -दवडणें.—*n.* सामता; कवाईत *f*, शस्त्राभ्यास; मूलतत्वाभ्यास; implement for making holes for sowing seeds पाभर *f*; drilled seed-box of d.-plough चाडें *n*; furrow dug along by the plough तास *n*, काकरी *f*.

DRINK* *v.* swallow as liquids पिणें -प्राशन क.; absorb शोषणें, पिणें; receive within one, through the senses ऐकणें, पाहणें (words); —off, up घोटासरसें पिऊन टाकणें; [—the health, or, to the health of, to drink while expressing good wishes for the health or welfare of] [with].—*i.* तहान भागविणें, पिणें: to d. from a brook दारू पिणें; दारू पिण्याची सवयी असणें, दारूबाज होणें; पानोत्सव क.—*n.* प्यायाचें *n*, पेय *n*. -ABLE *a.* प्यायाजोगा, पेय.—*n.* पिण्याचा पदार्थ. -ER पिणारा; छाकटा, दारूबाज. -MONEY, a gratuity to one who has rendered a service पोस्त *n*, चिरीमिरी *f*, बक्षीस *n*. -OFFERING पेयार्पण *n*.

DRIP* *v. i.* थबथबणें, गळणें.—*t.* गळूं देणें, थबथबूं देणें.—*n.* ठिपकणी *f*, गळती *f*; the eaves वळचण *f*, पागोळ्या *f pl*. -PING, from a tree and after a shower उथळे *pl*, ओथळे *pl*; as fat from meat in roasting मांसवसा *f*. -PAN भाजलेल्या मांसाची चरबी धरायाचें पात्र *n*. -STONE पाऊस वारायाची दारापुढली -खिडकी पुढली ताटी *f*.

DRIVE* *v.* push forward ढकलणें, लोटणें;—a nail &c. खिळा इ० मारणें -ठोकणें -रोवणें -खुपसणें -खोवणें;—cattle गुरें हाकणें, हाकून लावणें -नेणें; hunt पारध क., पारधीसाठीं पाठीस लागणें;— a carriage हाकणें, चालवणें; hurry forward पिटाळणें, दामटणें, दवडणें; urge निकड -नेट लावणें; carry on चालवणें, वाहणें (trade).—*i.* ओढवणें: a ship *drives* before the wind; go by carriage गाडींत बसून फिरणें -जाणें; strive झटणें, यत्न क.—*n.* excursion in a carriage गाडींत बसून फिरणें *n*, रथविहार; a road prepared for driving गाडींत बसून फिरायाचा रस्ता; a place suitable for driving रथविहाराची जागा *f*.—DRIVER हाकणारा, पिटणारा, लोटणारा इ०; one who drives beasts गुरेंहाक्या; coachman गाडीवान, गाडी हाकणारा; one who runs or regulates the operation of a locomotive आगगाडीच्या पुढचें वाफेचें यंत्र चालविणारा, 'ड्रैवर'; [the driving wheel of a locomotive].

DRIVEL* slaver लाळ *f*; nonsense बडबड *f*. —*v.* लाळ गळणें; dote खुळावणें, ह्यातारचाळे क.

DRIZZLE *Ger.* पावसाची बुरबूर *f*, बुरंगट *n*. —*v.i.* बुरबूर पाऊस पडणें, रिपरीप लागणें.

DROLL *a. F.* मौजेचा, कौतुकाचा, हसविण्याजोगा. —*n.* मस्कऱ्या, मौज्या, विनोदी. -ERY थट्टा *f*, मस्करी *f*; a comic picture थट्टेचें चित्र *n*.

DROMEDARY (*Gr. dromas*, running) एक जातीचा उंट आहे.

DRONE* male of the honey-bee मधमाशीचा नर; one who lives on the labors of others फुकटखाऊ, तुकडेमोड्या; humming or low sound गुणगुण *f*, गुंजारव;— of the bagpipes सूर.

DROOP* *v.i.* sink or hang down, as an animal, plant, &c., from physical inability मान खालीं टाकणें, लुंघणें, गळणें, थकणें; be dispirited धैर्य खचणें, ग्लानि येणें, ग्लान होणें.

DROP* a liquid globule थेंब, बिंदु, ठिपका; the smallest easily - measured portion of a fluid बिंदुइतकी जिन्नस *f*, बुंद, थेंब, लेश; that which resembles, or that which

hangs like a liquid drop, as an earring, a glass pendant लोलक, चमकी *f*, इ० बिंदुसारखा पदार्थ; whatever is arranged to drop or fall from an elevated position उंच जाग्यावरून खालीं पडण्याजोगें केलेलें दार *n*, फळी *f*, पडदा, झडप *n*, इ०; any medicine the dose of which is measured by drops बिंदूंनीं मोजायाचें औषध *n*.—*v*. थेंबथेंब गाळणें -पाडणें -ओतणें; let fall सांडणें, पाडणें, सोडणें (anchor, line in fishing); let go जाऊंदेणें, राहूंदेणें, सोडणें (controversy); to d. an acquaintance ओळख सोडणें-टाकणें; communicate by a suggestion, or an indirect, cautious, or gentle manner युक्तीनें सुचविणें, दर्शविणें, नोक दाखविणें (a hint); to d. a word शब्दटाकणें; lower, as a curtain or the muzzle of a gun खालीं क., उतरणें, पाडणें; send by dropping into the post-office box, as a letter टपालांत पाठविणें, टपालांत टाकणें: please d. me a line मला एक बोटभर चिठ्ठी लिही, मला चार ओळी पाठीव इ०; speckle ठिपकेदार -चित्रविचित्र क.; bedrop टिकल्यांनीं शृंगारणें [from, to].—*i*. थेंबथेंब गळणें -पडणें, ठिपकणें: the dew *drops* from the tree; let drops fall गळणें, स्रवणें, पाझरणें (Ps. lxviii. 8); descend suddenly, abruptly, or spontaneously एकाएकीं -आपोआप पडणें, गळून पडणें: ripe fruits d. from a tree; die मरणें; die suddenly एकाएकीं -तडकातडकीं -बोलतां चालतां मरणें; राहणें, पडणें, तहकूब होणें: the affair *dropped*; come unexpectedly एकाएकीं -अवचित येणें; खालीं उतरणें -होणें [in, into]. -PING गळणें *n*, सांडणें *n*, सांड *f*; गाळणें *n*, गाळण *f*; matter falling in drops गळती *f*, गळ *f*.

DROPSY (*Gr. hudor*, water, *ops*, face) [an unnatural collection of serous fluid in any cavity of the body, or in the areolar texture];—of the belly जलोदर;—of the body जलत्वक, सर्वांगामध्यें पाणी भरणें *n*;—of the chest जलपिंजर, उरामध्यें पाणी भरणें *n*.—DROPSICAL *a*. उदररोगी; उदररोगाचा; उदररोगा सारखा.

DROSS* scum of metals किटण *n*, कीट; rust जंग, तांब *f*; refuse गाळ, मळ, रेंदाड *n*: all the world's glory is but d. unclean.

DROUGHT* want of rain or water अवर्षण, *n*, अनावृष्टि *f*; dryness of the throat and mouth कोरड *f*, शोष, प्यास; scarcity तंचाई *f*, कमताई *f*, वाण *f*.

DROVE* a number of animals driven in a body तांडा, काफला, खिल्लार *n*; crowd of people in motion लोकांचा चालता थवा -रव *f*.

DROVER खिल्लारी, हेड्या.

DROWN* *v*. overwhelm in water पाण्यांत बुडविणें, बुडविणें; deluge जलमय क., पूर आणून बुडवणें; deprive of life by immersion in water or other liquid बुडवून मारणें; overpower, extinguish, overcome;—said esp. of sound दाबणें, मारणें, विझवणें, निमविणें [in, with].—*i*. बुडून मरणें; बुडणें.

DROWSE* *v*. *i*. झोपेंत गुंग होणें, गुंगी येणें.—DROWSINESS झोपेची गुंगी *f*, तार *f*, तंद्री *f*; sluggishness सुस्ती *f*, आळस.—DROWSY *a*. झोंपाळू, निद्रालु; आळशी, जड, सुस्त; disposing to sleep झोंप -गुंगी आणणारा (hours); heavy with sleepiness गुंगी आलेला, निद्राग्रस्त.

DRUB *v*. *Sw*. काठीनें -वेतानें मारणें -ठोकणें, कुमकणें. -BING कुट्टा, कुंदी *f*.

DRUDGE * *v*. कबाडकष्ट क., हाडें झिजविणें.—-RY कबाडकष्ट *pl*, दगदग *f*.

DRUG* any substance used in medicine औषधी द्रव्य *n*, औषध *n*, दवादारू *f*; article of slow sale, or in no demand in the market सांदोरीस पडलेला माल, पडीत माल.—*v*. औषध देणें. -GIST औषधें विकणारा, गांधी.

DRUID* प्राचीन ब्रिटन, गाल व जर्मन लोकांचा उपाध्या, 'द्रुद.' -ICAL *a.* द्रुदा संबंधी, द्रुदाचा. -ISM द्रुदाचा धर्म; -विद्या *f*; -ज्ञान *n*.

DRUM * *Mus.* मृदंग, नगारा, ताशा; *Mil.* पडघम *n*, तंबूर, नगारा; tympanum of the ear कानाचा पडदा; a small cylindrical box in which figs &c. are packed मृदंगाकार बांधलेला पुडा; [d.-head court-martial, a court - martial called suddenly, or on the field]. -MER तंबूरजी, ढोलवाजविणारा, 'ड्रमर'; sorts of—ढोलक्या, ताशेकरी, तबलजी, &c.—*v.* मृदंग -तबला -ढोल इ० वाजविणें.

DRUNK *a.* (See DRINK) झिंगलेला, कैफ चढलेला, मस्त. -ARD *a.* दारूबाज, मद्यपी. -EN *a.* छाकटा, मस्त. -NESS दारूची निशा -तार *f* -अमल.

DRY * *a.* not wet कोरडा, सुका; —as the weather उघाडीचा; the vegetable matter सुका, कोरडा, शुष्क;—animals not giving milk भाकड, उडालेली, अटलेली : the cow is d.;—persons, thirsty तान्हेला, कोरडे पडलेला;—the eyes, not shedding tears कोरडा; lacking pathos अळणी, निरस (a fable); sarcastic तिखट, वर्मी, टोमण्याचा (a remark); shrewd हुशार, चाणाख्य; d. cupping फासण्या टाकल्या शिवाय तुंबडी लावणें *n*; d. goods कापड, सूत, रेशीम, कलाबतू इ० (कोरडा) माल; d. measure गल्ला, फळें, कोळसें, मीठ इ० मोजायाचें माप *n*; d. wine ज्या मद्यांत साखरेचा अंश समभाग असतो म्हणजे तो समजण्यांत येत नाहीं तें *n*, फिकीदारू *f*.—*v.* वाळविणें, कोरडा -निर्जल क.; up शोषणें, अटवणें; बोलणें बंद क., बोलायाचा राहणें.—*i.* सुकणें, वाळणें; अटणें, सुकून जाणें, कोरडा पडणें. -NESS कोरडेपणा, सुकेपणा; रखरखीत -रूक्षपणा. -NURSE जी दाई लेंकरास आपलें दूध पाजल्या वांचून त्याचा संभाळ करिते ती, दाईखिलाई (*H.*) -SHOD *a.* कोरड्या पायांनीं, पाय भिजल्या शिवाय.

DUAL *a.* (*duo*, two) दोघांचा, द्वि. -ISM दुभागणें *n*; a system which is founded on double principle द्वैतमत *n*; a system of the universe which accepts two gods द्विदेवमत *n*; d. member द्विवचन *n*.

DUBIOUS *a.* (*dubius*) not settled in opinion संदिग्धमति, भ्रांतिवट; occasioning doubt भ्रांतिकारक, संशय उत्पन्न करणारा; of uncertain issue संदिग्ध, नरोवाकुंजरोवा (battle); [of].

DUCAL, See under DUKE.

DUCK *Ger.* बदक; to make *ducks* and drakes, to throw a flat stone, tile, or the like, obliquely, so as to make it rebound repeatedly from the surface of the water, raising a succession of jets भाकरीचा खेळ, भाकऱ्या; to play at *ducks* and drakes with property संपत्तीचे द्रव्याचे धुडके उडविणें; an inclination of the head resembling the motion of a duck in water पाण्यांत पोहणाऱ्या बदकासारखी मुंडी डोलविणें *n*; wild d. हंस; Brahmin d. चक्रवाक्.—*v.* बुडवून -बुचकळून बाहेर काढणें: to d. a seaman; plunge the head of in water immediately withdrawing it पाण्यांत डोकें बुचकळून लागलेंच बाहेर काढणें; गटंगळी -गचकळी खायास लावणें: d. the boy [under]. —*i.* बुडणें, बुटकुळी मारणें.

DUCT (*ducere*, to lead) नळी *f*, वाहिनी *f*, नळें.—DUCTILE *a.* flexible लवचीक, मृदु; obsequious आर्जवी; capable of being drawn out into wire तार काढण्याजोगा, तार निघण्याजोगा, प्रसारक्षम.— DUCTILITY लवचीकपणा, प्रसारक्षमता *f*.

DUE *a.* (*debere*, to owe) owed लागता, हक्कहलाल, द्यायाचा; proper योग्य, उचित, लायक; appointed नेमलेला, नेमका (time); rightly expected to arrive यायाचा,

पोंहचायाचा : the mail is now d. [to]. *ad.* थेट, नीट : d. east course.—*n.* देणें *n*, घेणें *n*, येणें *n*, हक्क ; *dues* paid in cash हक्कटक. —Duly *ad.* वाजवी, रास्त, बराबर.—Duty, that which a person is bound, by any natural, moral, or legal obligation, to do, or refrain from doing कर्त्तव्य *n*, धर्म ; service rendered चाकरी *f*, काम *n* ; military service लष्करी चाकरी *f* ; — of a soldier चौकी *f*, पाहरा ; respectful obedience आज्ञाधारण *n*, -पालन *n* ; respect मुजरा, ताजीम *f* ; tax कर ; excise जकात *f* ;— upon exports थळभरीत *n*, बरामद *f* ;— upon imports थळमोड *f* ; upon chattels or commodities सायर *f* ; daily d. नित्यकर्म *n* ; discharge of d. धर्मनिष्पत्ति *f*, कृतकृत्यता *f* ; appointed d. नियोग, अधिकार ; to become the d. of -ला भाग होणें.—Dutiful *a.* आज्ञाधारक, हुकमी, सेवातत्पर ; आदरयुक्त (affection) ;—to a parent पितृभक्त ;—to a husband पतिव्रता *f* ;—to a master प्रभुभक्त. -ness आज्ञाधारकता *f*, हुकमीपणा, आज्ञानुवर्तन *n*, आज्ञापालन *n*.

Duel (*duellum*, contest between two) दोघांचें युद्ध *n*, द्वंद्वयुद्ध *n* ; [a premeditated fight between two persons to decide some private difference, or establish some point of honor]. -ist द्वंद्वयोद्धा.

Duet, Duetto (*duo*, two) दोघांनीं गायाचें गीत *n*, जोडीचें गाणें *n* -वजावणें *n*.

Dug* सड, आंचूळ, गुराचें थान *n*.

Duke (*dux*, leader) नायक, सरदार ; one of the highest order of nobility next below the Prince of Wales इंग्लंदांत कुलीन राजपुरुषाची एक पदवी आहे ; [a sovereign prince, in some European countries, without the title of King : the D. of Savoy ; to dine with D. Humphrey, to go without dinner]. -dom युकाचें राज्य *n* -अधिकार इ० ; युकाचा किताब.—Ducal *a.* युकाचा -संबंधी.—Ducat युकाचें -युकाच्या शिक्याचें नाणें *n* ; चांदीच्या यु० ची किंमत सुमारें सवा दोन रु० आहे व सोन्याच्या यु० ची त्याच्या दुप्पट आहे.

Dulcet *a.* (*dulcis*, sweet)—to the taste गोड, मधुर ; to the ear सुस्वर, मधुर.— Dulcimer सितार *f*, तंबुरा (Dan. iii. 5).

Dull* *a.* stupid जड, मंद, मंदबुद्धि ; slow in action सुस्त, थंडा, मंद ;—of motion मंदगति, जड, धिम्या ; blunt बोथट ; dim अंधक, निस्तेज, फिकट, मजीत (fire, color, lamp) ; gross जड, स्थूल (earth) ; sad उदास, खिन्न, विषण्ण ; —of places उदासवाणा, भणभणीत ;—trade मंद, मंदीचा ;— weather धुंद, अंधारीचा ;— a story मळमळीत, विरस. — *v.* सुस्त -जड -मंद क. ; निस्तेज -बोथट क. ; मळीण -मजीत क. ; खिन्न -उदास क.—*i.* मंद -सुस्त इ० होणें. -head टोणपा, जड डोक्याचा, मंदबुद्धि. -ard *a.* मूर्ख, टोणपा.

Dumb* *a.* destitute of the power of speech मुका ; silent मुका, निःशब्द, मोना ; to strike d. तोंड बंद क., बोबडी वळविणें. -bells मुदगल *n*. -ness मुकेपणा ; मौन्य *n*.— Dummy पोटगडी, दगड्या, अंधळा तिरवा.

Dumpy *a. D.* टिल्लू, थबकडा, ठेंगू.

Dun* *a.* of a color partaking of brown and black जरद्या रंगाचा.—*n.* urgent demand for payment तगादा ; one who duns तगाददार, मागणेकरी.—*v.* तगादा लावणें -क. -ner तगाददार.

Dunce *a. Ger.* जडबुद्धीचा, टोणपा, दगड.

Dung * विष्ठा *f*, मल ;—of man गू ;—of cattle शेण *n* ;—of elephants लेंड *n* ; of horses &c. लीद *f* ; of sheep, deer लेंडी *f* ;— of birds शीट *f*.—*v.* शेण वगैरेचें खत घालणें.—*i.* मलविसर्जन क., हगणें. -hill, heap of dung उकिरडा, शेणखाई *f* ; mean situ-

ation or condition नीच स्थिति *f*, दशा *f* (1 Sam. ii. 8). -YARD उकिरड्याची जागा *f*, नरकाड *n*, शेणखाई *f*.

DUNGEON *F.* strongest tower of a castle किल्ल्याचा सर्वांहून बळकट बुरूज, गढी *f* ? a secure prison बंदोबस्तीचा बंदीखाना; a dark, subterranean place of confinement अंधारकोठडी *f*, कोंडी *f*.

DUODECIMALS *pl* (*duodecim*, twelve) द्वादशांश *pl.* — DUODECIMO *a.* द्वादशपत्री सांच्याचा, द्वादशपत्री.—*n.* द्वादशपत्री सांच्याचा ग्रंथ -चें बूक *n*; द्वादशपत्रांचा सांचा.

DUPE *a. F.* भोळा, फशा.—*v.* फसविणें, ठकविणें [with].

DUPLICATE *a.* (*duplex*, double) दुहेरी; द्विगुण; दुप्पट.—*n.* प्रत *f*, नकल *f*; *Law*, दस्तऐवजाची दुसरी नकल *f*.—*v.* द्विगुण -दुप्पट क.; दुसरी प्रत -नकल उतारा क.— DUPLICATURE दुमड *f*, दूण *f*.—DUPLICITY दुटप्पीपणा, दुजाभाव, कपट *n*; *Law*, एका जबाबाच्या ठिकाणीं दोन जाब *pl*.

DURABLE *a.* (*durare*, to last) टिकाऊ, खंबीर, चिरस्थायी.—DURABILITY टिकाऊपणा, स्थिरता *f*, स्थिति *f*.—DURANCE बंद, अटक *f*; See ENDURANCE.—DURATION टिकणें *n*; continuance in time स्थिति *f*, टिकाव.—DURING *prep.* मध्यें, असतां, आंत, भर: d. life.

DUSK *a. Ger.* tending to darkness औंधट, धुकट, अंधारीचा; darkish काळसर.—*n.* काळोखी *f*, अंधारी *f*; twilight झुंजेंमुंजें *n*; d. of the evening गोधूल *m*, *n*; color partially black काळानिळा, धूसर.—DUSKY *a.* औंधट, धुकट; काळसर, धूसर; gloomy उदास, भयाण.

DUST * earth or other matter reduced to powder धूळ *f*, धुरळा, माती *f*; the grave मेताची खळी *f*, माती *f* [Job vii. 21]; low condition कंगाली *f* -गरीब स्थिति *f* [1 Sam. ii. 8]; gold dust सोन्याची माती *f*.—*v.* धूळ काढणें -झाडणें -झटकणें: to d. a table; sprinkle with dust धूळ टाकणें -घालणें.—DUSTY *a.* धूळ बसलेला, धुळीनें भरलेला; धुळीच्या रंगाचा.

DUTCH *a. Ger.* हालंद देश संबंधी; वलंदेजी लोकांचा.

DUTY, See under DUE.

DWARF* *a.* ठेंगणा, खुजा, वामनमूर्त्ति *f*. -ISH *a.* ठेंगू, टिल्लू.

DWELL *v.i. D.* राहणें, वस्ती क.; —on, upon एकच गोष्ट पुढें चालवणें -लांबवणें; -ईत चूर-गुंग होणें; -वर जाणें: d. not on her beauty, but mention her accomplishments तिच्या सौंदर्यावर जाऊं नको इ० [in, at, with, upon]. -ING घर *n*, निवासस्थान *n*, राहण्याचें ठिकाण *n*.

DWINDLE* *v. i.* कमी -न्यून -क्षीण -जीर्ण -खराब होणें [to, into].

DYE* *v.* रंग देणें, रंगवणें.—*n.* रंग.—DYER रंगारी.

DYING, See under DIE.

DYKE, See DIKE.

DYNAMICS (*Gr. dunamis*, power) science of moving forces पदार्थगतिशास्त्र *n*.

DYNASTY (*Gr. dunastes*, a lord) राजवंशावळी *f*, राजावळी *f*, राजांचें घराणें *n*, राजवंश.

DYSENTERY (*Gr. dus*, ill, *enteron*, entrails) inflammation of the rectum or colon, attended with griping pains, constant desire to evacuate the bowels, and discharges of mucus and blood आंवरक्ताची हगवण *f*, आमरक्त *n*, आमातिसार; acute d. उग्रातिसार.

DYSPEPSIA, DYSPEPSY (*Gr.-peptein*, to cook) difficulty of digestion अजीर्ण *n*, अग्निमांद्य *n*, अन्नकोशविकार, अन्नविकार.

DYSPHONY (*Gr. -phonè*, sound) धाप *f*, श्वासावरोध.

DYSURY (*Gr.-ouron*, urine) difficulty in discharging urine, attended with pain

and a sensation of heat उन्हाळें *n*, मूत्रकृच्छ्र.

E.

EACH* *a.* प्रत्येक, दरएक ; e. other एकमेक ; e.—his, her, its आपापला.

EAGER *a.* (*acer*, sharp) excited by desire in the pursuit of any object उत्सुक, उत्कंठित ; earnest कळकळीचा, मनापासूनचा. -LY *ad.* उत्सुकतेनें ; hastily उतावळीनें. -NESS उत्कंठा *f*, उत्सुकता *f*, हौस *f* ; उतावळी *f*, हुटहुटी *f*, हुरहुर *f*.

EAGLE (*aquila*) गरुड, पक्षिराज ; एक नाणें आहे. -EYED *a.* बारीक-तीक्ष्ण दृष्टीचा. -WINGED *a.* गरुडा सारखा चपळ.

EAR* the organ of hearing कान, कर्ण ; the sense of hearing कर्णेंद्रिय *n*, कान ; attention लक्ष *n*, कान ;—of a dish कान ;—of wheat ओंबी *f* ; spike of corn कणीस *n* ; to poison one's *ears* कान फुंकणें -भरणें ; to give e. कानदेणें, ऐकणें ; to set one by the *ears* लावालावी क., भांडण लावणें ; to turn a deaf e. to कानावेगळा -कानाबाहेर क. ; कान झाडणें, न ऐकणें ; to disabuse the *ears* of कानाचे किडे झाडणें ; to whisper in the e. of कानांत जपणें, कानीं लागणें [for, to]. —*v. i.* कणसें येणें, पसवणें. -DROP कर्णगोल, लोलक. -DRUM कानाचा पडदा. -LOCK झुलूप *n*. -RING कर्णभूषण *n*, कुंडल *n*. -SHOT हाकेचा टप्पा. -WAX कानांतला मळ. -WITNESS, one who has the testimony of hearing as to any matter ऐकींव साक्षी, श्रुतसाक्षी.

EARL* इंग्लंदांत बडे लोकांची एक पदवी आहे. [The rank of an e. corresponds to that of a *count* in France]. -DOM अर्लाचा हक्क -अमल वगैरे.

EARLY *a.** in advance of the usual or appointed time वेळेच्या अगोदरचा, सकाळचा, लवकर ; prior in time प्रथम, पूर्व ; in good season सुवेळीं, सकळ, वेळेवारचा ; e. dawn प्रातःकाळ.—*ad.* लवकर, सकाळ ; वेळेवारीं (Prov. viii. 17).

EARN* *v.* acquire by labor, service, or performance कमावणें, मिळवणें, कष्टानें -चाकरी -काम करून मिळवणें, उपार्जन क. -ING मिळकत *f*, कमाई *f* ; —used com. in *pl.*

EARNEST* *a.* intent upon acquiring उत्सुक, उत्कंठित ; intent तल्लीन, एकाग्रचित्त [in, for, about].—*n.* reality खरेपणा, सत्यभाव ; eagerness उत्कंठा *f*, हौस *f* ; token of what is to come विसार ; *Law*, some thing given by the seller, by way of token or pledge, to bind the bargain and prove the sale सचकार, विसार, बयाणा ; pledge तारण *n*, हडप *n*. -LY *ad.* उत्कंठेनें, आस्थेनें, झटून ; warmly कळकळीनें, पोटागीनें ; तत्परतेनें, एकाग्रतेनें. -NESS आस्था *f*, उत्कंठा *f* ; पोटाग *f*, कळकळ *f*, तिडीक *f*.

EARTH* the globe which we inhabit पृथ्वी *f*, भूगोल ; dry land कोरडी भूमि *f*, भूमि *f*, (Gen. i. 10); soil जमीन *f*, माती *f* ; a country देश, प्रदेश ; people on the globe जग, *n*, दुनिया *f*.—*v.* जमिनींत लपविणें -पुरणें. -EN *a.* मातीचा, मृन्मय. -LY *a.* मातीचा ; इहलोकींचा, ऐहिक ; carnal दैहिक, विषयसंबंधी, संसारिक ; possible व्हायाजोगा, शक्य : what e. benefit can be the result ? base नीच, हलका. -NUT भुईमूग. -QUAKE भूमिकंप, धरणीकंप. -WORK मातीचा कोट. -WORM गांडूळ, गांडवळ ; niggard कंजूस, कंगाल.—EARTHY *a.* मातीचा, मृन्मय ; ऐहिक, संसारिक ; gross स्थूल.

EASE *F.* freedom from pain, disturbance, trouble, toil, &c. चैन *n*, आराम, विसावा ; leisurely indolence सुस्ती *f* ; quiet समाधान *n*, स्वस्थता *f* ; peace सुख *n*, शांति *f*, विश्रांति *f* (Ps. xxv. 13) ; facility अनायास, सौगम्य *n* ; at e. सुखानें, स्वस्थ (*v.* नीज, बस, अस).— *v.* आराम क., सुखास पाडणें : to e. the body; mitigate कमी -हलका क.,

उपशमन क.;—the mind चिंता -काळजी वारणें -हरण क.; release from pressure दाबांतून काढणें, भार -ओझें उतरणें [by, with, off, from].—*ad.* सहज, अनायासें; सुखानें, स्वस्थतेनें खुशालींत: to pass life well and e.; readily खुशीनें, संतोषानें: he e. forgives; without violent shaking or jolting संत, निवांत, सावकाशीनें: a carriage moves e.; gracefully छबीनें, ढबीनें; gently हळू, हलक्यानें, अचानक. —EASY *a.* सुखरूप, स्वस्थ, आराम, खुशाल: the patient is easy; स्वस्थ, निकाळजी, शांत (mind); मृदु, सरळ, सुगम्य, सुबोध (style); खळबळीत, साबडा (manners); not requiring labor हलका, सोपा, सोयीचा (ascent, roads); not difficult सोपा, सुलभ, सुसाध्य (a task); furnishing comfort सुखकर -प्रद -दायक: he is in e. circumstances तो खाऊन पिऊन -घरचा सुखी आहे; complying भिडस्त, नरम, कोवळा (heart); not straitened as to money matters आबादान, भरपूर: the market is e.

EAST* the quarter where the sun rises पूर्व *f*, पूर्वदिशा *f*, उगवत *f*; — eastern parts of the earth पूर्वेकडील प्रदेश, पूर्वदेश. —*a.* पूर्वेकडला, पूर्वेचा; the e. wind मतलई *f*.—*v.* पूर्वेकडे चालणें -वाहणें -फिरणें. -ER कित्येक ख्रिस्ती मंडळ्यांचा एक सण आहे; खीस्त मरून पुनः उठल्याच्या आठवणी करितां हा पाळतात. -LY *a.* पूर्वेकडून आलेला; पूर्वेकडून येणारा; पूर्वेकडला, पूर्वस्थ [side, course].—*ad.* पूर्वेकडे, उगवत. -ERN *a.* पूर्वेचा, प्राचीन, प्राच्य; पूर्वेकडे जाणारा.

EAT* *v.* (*Skr. ad*) partake of as food खाणें, भक्षणें; corrode खाणें, चरणें; out खाऊन चट क., फन्ना क.; prey upon खाणें, धुपवणें, झिजवणें; to e. one's words बोलला बोल परत घेणें, बोलणें फिरवणें.—*i.* जेवणें, भोजन क.; taste रुचि लागणें; into चरणें. -ABLE खाणें *n*, भक्ष्य *n*.—*a.* खाण्याजोगा, खाद्य, भोज्य.

EAVES* *pl* the edges of the roof of a building वळचण *f*, पागोळ्या *f pl*. -DROP *v. i.* वळचणी खालीं उभें राहून घरांतल्या माणसांचें बोलणें ऐकणें, वळचणीस लागणें; गुप्त गोष्टी ऐकण्या करितां जपणीस लागणें -बसणें. —*n.* वळचणीचें पाणी *n*.

EBB* reflux of the tide ओहटी *f*, सुकती *f*.—*v.* क्षय -ऱ्हास होणें: the hours of life e. fast.

EBONY (*ebenus*) टेंबुरणीचें झाड *n*, टेंबुरणी *f*, अबनूस *n*.

EBRIETY (*ebrius*, intoxicated), See DRUNKENNESS.

EBULLIENT *a.* (*-bullire*, to bubble) कढत.—EBULLITION कढ, ऊत, अधण *n*;—of grief, anger, &c. उमाळा, कढ, ऊत, उकळी *f*.

ECCENTRIC, -AL *a.* (*-centrum*, centre) केंद्राकडे न जाणारा, केंद्रपराङ्मुख; pertaining to eccentricity मध्याचा, केंद्राचा; no having the same centre विषमकेंद्र; anomalous तऱ्हेवाईक, विलक्षण, एक तऱ्हेचा (conduct).—ECCENTRICITY केंद्रपराङ्मुखता *f*; *Geom.* विषमकेंद्र; विलक्षणपणा, तऱ्हेवाईक चाल *f*, लोकाचारविरोध.

ECCLESIASTIC, -AL *a.* (*ecclesia*, assembly) (ख्रिस्ती) मंडळी संबंधी, ख्रिस्ती धर्मप्रकरणीं. —ECCLESIASTIC धर्मोपदेशक, पाद्री.

ECHO (*Gr.*) पडसाद, प्रतिशब्द-ध्वनि; [a vault so formed as to produce an echo]. —*v.* प्रतिध्वनि उठणें-निघणें, दुमदुमणें; adopt पत्करणें, स्वीकारणें; respond उत्तर -जाब देणें

ECLAT (*F.*) splendor शोभा *f*, बहार *f*, रंग; applause वाहवा *f*, प्रशंसा *f*.

ECLECTIC *a.* (*Gr. ek*, from, *legein*, to choose) निवडून -वेचून काढणारा, विवेचक.

ECLIPSE (*Gr. -leipein*, to leave) ग्रहण *n*; —of the moon चंद्रग्र० *n*;—of the sun सूर्यग्र० *n*; duration of e. स्थिति *f*; total

e. मीलन *n*, खग्रास; obscuration तेजोऱ्हास, प्रभा -कांतिक्षय.—*v.* ग्रासणें, ग्रहण लागणें; तेजोऱ्हास -कांतिक्षय क., माजी पाडणें [by].—ECLIPTIC कांतिवृत्त *n* -मंडल *n*.—*a.* कांतिवृत्त संबंधी.

ECONOMY (*Gr. oikos*, house, *nomos*, law) management of domestic affairs घरजुगूत *f*, घरजोगवणी *f*; internal management of any thing निर्वाह, वहिवाट *f*; system of rules and regulations by which any thing is managed नीति *f*, व्यवस्था *f*, विधान *n*, मार्ग; thrifty and frugal housekeeping काटकसर *f*, काटकसरीचा खर्च; political e. व्यवहारशास्त्र *n*, अर्थशास्त्र *n*.—ECONOMICAL *a.* व्यवस्थित, बेताचा;—of persons बेतबातानें चालणारा, काटकसर करणारा, दक्ष, मितव्ययी;—of expenses काटकसरीचा, बेताचा; घरजोगवणीचा, गृहकर्मनिर्वाह संबंधी; व्यवहारशास्त्र संबंधी.—ECONOMIZE *v.* काटकसरीनें -बेतबातानें -टापटिपीनें वापरणें -खर्च क. (time, money).

ECSTACY (*Gr. ek*, from, *stasis*, a standing) a being beside one's self so far that the primary functions, particularly of the senses, are suspended समाधि *f*, तन्मयावस्था *f*; frenzy उन्मत्तवायु, उन्माद; rapture अत्यानंद, प्राल्हाद.

EDDY* current water running back पाण्याचा उलटा ओघ, घोटाळा, फुगें *n*;—of air वाऱ्याचा उलटा ओघ; whirlpool भोंवरा; whirlwind वावटळ *f*.

EDEN *Heb.* the garden in which Adam and Eve first dwelt एदेन बाग; a delightful region सुखस्थान *n*, सौख्यभुवन *n*.

EDGE* the thin cutting side of the blade of an instrument धार *f*; margin कड *f*, कोर *f*, काठ; raised e. as around wells &c. पाळ *f*;—of fields मेर *f*, दर *f*, बाजू *f*; sharpness पाणी *n*, तेज *n*; acrimony तीव्रता *f*, तिखटपणा: e. of our indignation; beginning तोंड *n*, आरंभ: in the e. of evening; to be set on e.;—the teeth अंबणें.—*v.* धार लावणें -काढणें, शेवटणें, पाणी देणें; काठ -किनारा लावणें;—a dress मगजी -झालर इ० लावणें; incite टोचणी -उठावणी देणें; a person *edged* on खंडेराव, हणगोबा; move by little and little हळू हळू खिचविणें -सरकवणें: to e. a chair along.—*i.* बाजूस सरकणें -वळणें -फिरणें, खिचणें, सरणें.

EDIBLE *a.* (*edere*, to eat) खायाचा, भक्षणीय, खाद्य.

EDICT (*-dicere*, to say) that which is uttered or proclaimed by authority as a rule of action आज्ञा *f*, शासन *n*; order issued by a prince to his subjects, as a rule or law requiring obedience राजाज्ञा *f*, आज्ञापत्र *n*, फरमान.

EDIFY *v.* (*ædes*, building, *facere*, to make) बांधणें, रचणें; instruct and improve in knowledge generally, and particularly in moral and religious knowledge, in faith and holiness तालीम -शिक्षा देणें, नीति -परमार्थज्ञान स्थापणें -वाढविणें -वृद्धिंगत क. [by]. -ING *a.* निष्ठा -ज्ञानवर्द्धक.—EDIFICATION शिक्षा *f*, तालीम *f*, ज्ञान -सद्गुणवृद्धि *f*.—EDIFICE इमारत *f*, हवेली *f*, इमला.

EDIT *v.* (*edere*, to give out) superintend the publication of ग्रंथ वगैरे प्रसिद्ध करण्याची -छापण्याची देखरेख क.; prepare for publication, as a book, or paper, by writing, correcting, or selecting, the matter पुस्तक किंवा पत्र प्रसिद्ध करण्या करितां किंवा छापण्या करितां मजकूर -विषय लिहिणें -तपासणें किंवा निवडणें. -ION, whole number of copies of a work published at once आवृत्ति *f*; also -ING, publication of any literary work ग्रंथप्रसिद्धि *f*, छापणी *f*, आवृत्ति *f*. -OR ग्रंथप्रसिद्ध करण्यासाठीं तयार करणारा, ग्रंथप्रकाशक;—of a newspaper, &c. (वर्त्तमान-

पत्राचा) कर्त्ता, 'एडीटर.' -ORIAL *a.* ग्रंथप्रकाशकाचा; एडिटारनें लिहिलेला.—*n.* एडिटरानें लिहिलेला मजकूर -निबंध, 'एडिटोरियल' *n.* -SHIP ग्रंथप्रकाशकाचा हुद्दा; पत्रकर्त्याचें काम *n*, एडिटराचें काम *n*.

EDUCE *v.* (*-ducere*, to lead) बाहेर काढणें -आणणें: the eternal art *educes* good from ill [from].—EDUCATE *v.* bring up, as a child वाढविणें, पाळणें, लहानाचा थोर क.; inform and enlighten the understanding सुशिक्षित -सुबुद्ध क.; form and regulate the principles and character of सद्वर्त्तनास लावणें, नीति शिकविणें, वळण देणें; prepare and fit for any calling कामाधंद्यांत तरबेत क., लिहिणें पुसणें सांगणें [for, by].—EDUCATED शिक्षित; व्युत्पन्न;—well e. सुशिक्षित.—EDUCATION पालन *n*, प्रतिपालन *n*; शिकवण *f*, शिक्षा *f*; result of educating in knowledge, skill, or discipline of character, acquired विद्या *f*, व्युत्पत्ति *f*, अध्ययन *n*; सुशिक्षण *n*. -AL *a.* विद्येचा, विद्येसंबंधी, in comp. विद्या: e. department विद्याखातें *n*; सुशिक्षे संबंधी.

EEL* बाम *f*, वांव *f*, बाममासा.

EFFACE *v.* (*-facies*, face) remove from the surface पुसून टाकणें, पुसणें; scratch out खोडून टाकणें, खरडून काढणें; remove from the mind मनांतून काढणें, विसर पाडणें [from].

EFFECT (*-facere*, to make) that which is produced by an agent or cause कार्य *n*, सिद्धि *f*, उत्पत्ति *f*; consequence फल *n*, परिणाम; impression produced छाप *f*, थाप *f*: the e. of a piece of music; importance वजन *n*, महत्त्व *n*, भारदस्ती *f*: to speak with e.; purpose अभिप्राय, अर्थ: he spoke to that e. तो असें बोलला; *pl* मालमत्ता *f*; to take e. गुणास येणें; to take e. upon लागू होणें; cause and e. कार्यकारण *n*; for an e. भपका दाखविण्यासाठीं, छाप उठविण्यासाठीं; of no e. निर्फळ, व्यर्थ; to give e. to बळकट -दृढ क.; बजावणें, कामास लावणें; to destroy the e. of निष्फळ क.; in e. वस्तुत: [of].—*v.* produce उत्पादणें, करणें, साधणें; bring to pass घडवून -बनवून आणणें. -ED सिद्ध, साधित; one who has e. his object कृतार्थ. -IVE *a.* कार्यसाधक, फलोत्पादक, गुणावह, गुणकारी; operative कामकरणारा, उपयोगी, कामाचा. -UAL *a.* सफळ, सार्थ, उपयोगी; adequate पुरता पुरायाजोगा.

EFFEMINATE *a.* (*-femina*, woman) नामर्द, बायल्या, रांड्या; womanlike स्त्रीसारखा, जनानी, नरम, भिडस्त; tender निर्बल, दुर्बल.

EFFERVESCE *v.i.* (*-fervere*, to boil) खतखतणें, उतणें; exhibit feelings that cannot be repressed उमाळा -आंवढा -उकळी येणें.—EFFERVESCENCE ऊत, खतखत *f*.—EFFERVESCENT *a.* खतखतणारा, उतणारा.

EFFETE *a.* (*-fœtus*, progeny) वांझ, निष्फळ; worn out with age वयोजीर्ण, गलित, जर्जर.

EFFICACIOUS *a.* (See EFFECT) गुणाकारी, प्रबल, समर्थ, कार्यसाधक. — EFFICACY सत्व *n*, तेज *n*, गुण; power of producing the effect intended कार्यसाधकता *f*, कार्यसिद्धिक्षमता *f*. — EFFICIENT *a.* कार्यसाधक, फलदायक.—*n.* कार्यसाधक, कर्त्ता.

EFFIGY (*-fingere*, to form) an image प्रतिमा *f*, बाहुली *f*; impression upon a coin representing the head of the prince by whom it was issued नाण्यावरील मुखवटा [to burn or hang in e., to burn or hang an image or picture of the person intended to be executed, disgraced, or degraded].

EFFLORESCENCE (*-flos*, flower) फुलें येण्याचा काळ, पुष्पोत्पत्तिकाल; *Med.* eruption, as in measles &c. पुरळ, उगवण *n*; *Chem.* formation of the whitish loose powder on the

surface of efflorescing bodies, as salts, &c. फूल *n*? बुरशी *f*?—EFFLORESCENT *a*. फुलां सारखा उतणारा, आर्द्रताविसर्जक; पुरळानें भरलेला.

EFFLUVIUM (*effluere*, to flow out) exhalation perceived by the sense of smell गंधपरमाणु, वाफ *f*, बुखार. — EFFLUX बाहेर येणें *n*, निघणें *n*, प्रस्राव, प्रवाह, निर्गम.

EFFORT (*-fortis*, strong) प्रयत्न, आयास, प्रयास.

EFFRONTERY (*-frons*, the forehead) impudence or boldness in confronting or transgressing the bounds of duty or decorum उद्धटपणा, औद्धत्य *n*, धिटाई *f*; shamelessness निर्लज्जपणा, निलाजरेपणा.

EFFULGENCE (*-fulgere*, to shine) प्रभा *f*, दीप्ति *f*, चमक *f*.—EFFULGENT *a*. तेजस्वी, देदीप्यमान, चमकणारा.

EFFUSION (*-fundere*, to pour) ओतणें *n*, उत्सर्ग.—EFFUSIVE *a*. ओतणारा, स्रावक.

EGG* a spheroidal body, formed in the female of animal species containing the germ of a new individual of the species, within a shell or firm membrane अंडें *n*, कवट *n*, अंड *n*; any thing resembling an egg in form अंडाकार वस्तु *f*. -PLANT वांगी *f*.

EGOTISM (*ego*, I) practice of too frequently using the word I मी मी ह्मणण्याची सवयी *f*; self-praise अहंता *f*, आत्मस्तुति *f*, मीपणा. — EGOTIST बोलण्यांत किंवा लिहिण्यांत जो मी मी असें वारंवार आणतो तो, मीपणा बाळगणारा, बढाईखोर, आत्मश्लाघी.

EGREGIOUS *a*. (*-grex*, herd) लोकोत्तर, विलक्षण; in a bad sense बिलंद, अट्टल, इरसाल, अति: e. rascal.

EGRESS (*-gradi*, to step) बाहेर जाणें *n*, निर्गमन *n* [from]. -ION निर्गति *f*, निगर्म.

EIGHT* *a*. (*Skr. aschtan*) आठ, अष्ट. -EEN अठरा. -IETH *a*. ऐंशीवा.—EIGHTH *a*. आठवा. —EIGHTY *a*. ऐंशी.

EITHER* *a*. or *pron*. one or the other हा किंवा तो, कोणताही; each of two दोहोंतून एक. —*conj*. अथवा, किंवा, नाहींतर.

EJACULATE *v*. (*-jacere*, to throw) उद्गार टाकणें.—EJACULATION उद्गार; उद्गाराची प्रार्थना *f*, प्रार्थनेचा उद्गार.

EJECT *v*. (do.) काढून-हाकून देणें; banish देशपार-हद्दपार क.; dismiss from an office कामावरून काढणें; dispossess of ownership or occupancy, as of land, dwellings, &c. वतनावरून-घरांतून इ० काढणें [from]. -ION घालवणें *n*, बहिष्कार; —of devils in possession भूत काढणें *n*, प्रसारण *n*; dispossession नागवणूक *f*, सत्तानिवृत्ति *f*.

EKE * *v*. increase वाढविणें; supply what is scanty पुरविणें, भर घालणें [out].

ELABORATE *v*. (See LABOR) श्रमानें-कष्टानें तयार क.; improve by successive operations of nature or art कमावणें, मशागत क, सुधारणें. — *a*. श्रमानें तयार केलेला, संस्कृत, परिष्कृत, कमावलेला.

ELAPSE *v.i*. (*-labi*, to fall) होणें, लोटणें, गुदरणें, app. chiefly to time.

ELASTIC *a*. *F*. लवचीक, स्थितिस्थापक.—ELASTICITY लवचीकपणा, स्थितिस्थापकता *f*; power of recovery from depression or overwork सावरण्याची शक्ति *f*, सावर.

ELATE *v*. (*-latum*, to carry) हर्षानें फुगविणें-चढविणें; puff up गर्वानें फुगविणें, हरभऱ्याच्या झाडावर चढविणें [with].—*a*. हर्षानें फुगलेला.

ELECTUARY (*Gr. -leichein*, to lick) medicine mixed with conserve अवलेह.

ELBOW * the outer angle made by the bend of the arm कोपर; an angle कोन, कोपरा; to be at the e. जवळ-हातासीं असणें; to be up to the e. गुंग-चूर-निमग्न होणें.—

v. कोपरानें ढकलणें -लोटणें.—*i.* कोपरा निघणें, बांक येणें.

ELDER *a.* * वडील, थोरला, जेष्ठ.—*n.* वडील, पुरखा, गुरुजन; an ancestor वडील, पूर्वज; *pl* वाडवडील; [in modern Presb. churches, *elders* are officers who, with the pastors or ministers, compose the church session with authority to inspect and regulate matters of religion and discipline; in some churches, pastors or clergymen are called *elders* or *presbyters*]. -LY *a.* उतार वयाचा, आडह्यातारा. —ELDEST *a.* सर्वांत वडील, ज्येष्ठ.

ELECT *v.* (*-legere,* to choose) निवडणें, निवडून घेणें, पसंत क.; select for an office कामावर योजण्याकरितां निवडणें; *Theol.* select, as an object of mercy or favor कृपा करण्यासाठीं निवडणें, कृपापात्र होण्यास निवडणें; set apart to eternal life सर्वकालिक जीवनासाठीं निवडणें [from].—*a.* निवडलेला; तारणासाठीं निवडलेला; कामावर योजण्यासाठीं निवडलेला: bishop e.—*n.* निवडलेला (Is. xlii. 1); *pl.* तारणाकरितां निवडलेले लोक (Luke xviii. 7). -ION निवडणें *n,* निवड *f*; [act of choosing a person to fill an office or employment, by any manifestation of preference, as by ballot, uplifted hands, or *vivâ voce*: the e. of a president]; power of choosing निवडण्याची सत्ता *f* -चा अधिकार; discernment तारतम्य-भेद जाणण्याची शक्ति *f,* विवेक; those who are elected निवडलेले लोक (Rom. xi. 5) [of, from]. -IVE *a.* निवडण्याचा; निवड करण्याच्या सत्तेचा, वरणाधिकारविशिष्ट; depending on choice निवडीवरचा, पराश्रयाधीन, दुसऱ्याच्या खुशीचा; bestowed by election निवडून दिलेला. -OR निवडणारा; निवडण्याचा अधिकारी; [one of the princes of Germany formerly entitled to choose the emperor]. -ORATE इलेक्तराचें राज्य *n* -संस्थान *n* -चा किताब. -RESS इलेक्तराची बायको किंवा विधवा *f.*

ELECTRIC, -AL *a.* (*Gr. elektron,* amber) विजेचा, विद्युत् संबंधी (power); विजेपासून उत्पन्न झालेला, विजेचा (spark); containing electricity विद्युतानें -विजेनें भरलेला (jar); capable of occasioning electrical phenomena विजेचा चमत्कार उत्पन्न करणारा, विजेच्या चमत्काराचा (machine).—ELECTRICITY वीज *f,* विद्युत् *n*;—the science विद्युद्विद्या *f.*—ELECTRIFY *v.* विजेनें भरणें, वीज भरणें (a jar); विजेचा धक्का देणें; -च्या मधून वीज नेणें; give a sudden shock to एकाएकीं धडकी बसविणें, दचकवणें; surprise, esp. by means of something pleasing or inspiring दंग क., चकवणें: the whole assembly was *electrified.*

ELEEMOSYNARY *a.* (*Gr. eleos,* pity) धर्मादाय संबंधी, धर्माचा; given in charity धर्मार्थ दिलेला, दरिद्री पोषणार्थ दत्त.—*n.* भिकेवर पोट भरणारा, भिक्षोपजीवी.

ELEGANT *a.* (See ELECT) pleasing by acquired or imparted grace and beauty सुंदर, मनोरम, सुशोभित; an e. woman रूपवती; as manners प्रौढ, सभ्य, शिष्ट; as literature, style, &c. प्रौढ, अलंकारी, प्रशस्त, सुरस; sensible to beauty अभिज्ञ, रसिक. —ELEGANCE शोभा *f,* कांति *f,* लावण्य *n*; —of furniture सफाई *f*;—of speech, &c. पदलालित्य *n,* वाग्विलास.

ELEGY (*Gr. elegos,* a lament) शोकसूचक कविता *f,* शोकगीत *n*; as sung by the Mahomedans during the Moharam मरशा.

ELEMENT (*elementum*) a first or constituent principle तत्त्व *n,* मूल *n,* बीज *n*; an ingredient अंश, भाग, अवयव; that which ancient philosophy supposed to be simple and undecomposable तत्त्व *n*; the five *elements* पंचमहाभूतें *n pl,* पृथिव्यादि *n*; *pl*

outline अराखडा, कच्चा आकार, वस्तुमात्र: the e. of a plan; *pl* rudiments मूळपीठिका *f*, आरंभ; *pl* the whole material composing the world पृथ्वी *f* (2 Pet. iii. 10); *pl* the bread and wine used in the Eucharist प्रभुभोजनांतील भाकर व द्राक्षारस. -AL. *a.* तत्वांसंबंधी, भौतिक, पंचभूतात्मक, मूलद्रव्यासंबंधी; मूलपीठिके संबंधी, मूलतत्वांविषयींचा. -ARY *a.* simple शुद्ध, निर्भेळ (substance); rudimental प्रारंभक, मूलतत्वविषयक. -प्रतिपादक (treatise, writer).

ELEPHANT (*Gr. elephas, Skr. ibhas*) हत्ती, गज, हस्ती. -IASIS वारूळ *n*, त्वग्रोग. -INE *a.* हत्तीचा, हत्ती संबंधी.

ELEVATE *v.* (*-levare*, to raise) उंच क., चढवणें; promote मोठ्या पदवीस आणणें, सरफराजी क., चढवणें; cheer धैर्य -धीर -उत्तेजन देणें (the mind); exalt श्रेष्ठ -थोर क., प्रतिष्ठित क. (the character); raise to a higher pitch उंच नेणें -क. (the voice); from a low state उदयास आणणें [from, to].-ELEVATED उंच केलेला, उन्नत, अभ्युन्नत.—ELEVATION उंच क. *n*, सरफराजी *f*; condition of being elevated उदय, उत्कर्ष; an elevated place उंचवटा, उंची *f*; दीर्घ स्वर, दीर्घोच्चार; [e. of the host (*Rom. Cath. Church*) that part of the mass in which the priest raises the host above his head for the people to adore].

ELEVEN* *a.* अकरा, एकादश. — ELEVENTH *a.* अकरावा.—*n.* अकरावा भाग -हिस्सा.

ELF* एक कल्पित पिशाच आहे.

ELICIT *v.* (*-lacere*, to entice) बाहेर काढणें, उजेडीं आणणें, निष्पन्न क.: to e. truth by discussion [from, by].

ELIGIBLE *a.* (See ELECT) -स -ला -साठीं निवडण्यास योग्य -लायक: e. to office; desirable इष्ट, आवडता; preferable पसंत, ग्राह्य, योग्य, उपयोगी: an e. situation for a house. —ELIGIBILITY कामासाठीं निवडून घेण्याची -निवडला जाण्याची लायकी *f*, -चा अधिकार; quality of a thing which renders it preferable to another पसंत होण्याचा गुण, ग्रहणीयता *f*.

ELIMINATE *v.* (*-limen*, threshold) काढून टाकणें, गाळणें, वगळणें; deduce तर्कानें काढणें, अनुमान क. (an idea) [from].

ELISION (*-lædere*, to strike off) *Gram.* cutting off or suppression, for the sake of metre or euphony, of a vowel or syllable, especially a vowel at the end of a word standing before another vowel in the following line लोप.

ELIXIR *Ar.* रसायण *n*; cordial पौष्टिक -तेजवर्द्धक औषध *n*.

ELK * सांबर.

ELL * पंचेताळीस इंच लांबीचें एक (इंग्रजी) मेज आहे.

ELLIPSE (*ellipsis*) *Geom.* दीर्घवर्तुल *n*.

ELLIPSIS (*Gr. -leipein*, to leave) *Gram.* वाक्यांत शब्दाची कमताई *f*, पदन्यूनता *f*: the heroic virtues I admire, for, the heroic virtues, *which* I admire.—ELLIPTICAL *a.* पदन्यूनतेचा; pertaining to an ellipse अंडाकृति. -LY *ad.* दीर्घवर्तुलानुसार; शब्द सोडून, न्यूनतेनें.

ELOCUTION (*-loqui*, to speak) mode of utterance or delivery, accompanied with gesture, of any thing spoken, esp. of a public or elaborate discourse or argument वक्तृत्व *n*, शब्दचातुर्य *n*; manner of speaking in public सभापांडित्य *n*.

ELONGATE *v.* (*-longus*, long) लांब क., वाढवणें.

ELOPE * *v.* run away, or escape privately, from the place or station to which one is bound by duty पळून जाणें, पळ काढणें. -MENT of, a married woman नवऱ्या पासून पळून जाणें, हात धरून जाणें, घर निघणें;—of

an unmarried woman [अविवाहित स्त्रीनें] आईबापां पासून पळून जाऊन यारा बराबर राहणें [from, to].

ELOQUENCE (See ELOCUTION) expression or utterance of strong emotion, in a manner adapted to excite correspondent emotions in others वक्तृत्व *n*, सुप्रलाप, वाक्पटुता *f*.—ELOQUENT *a*. वक्ता, बोलका; an e. person (male) बृहस्पति; (female) सरस्वती *f*; वक्तृत्वाचा, पांडित्याचा (address).

ELSE* *a*. & *pron*. other दुसरा, अन्य; some thing beside अणखी.—*ad*. beside शिवाय, खेरीज; otherwise नाहींतर, नाहींपेक्षां. -WHERE *ad*. any other place दुसऱ्या ठिकाणीं, अन्यत्र: these trees are not to be found e.; in some other place अणखी कोठें, दुसरीकडे: it is reported in town and e. -WISE *ad*. परभारां.

ELUCIDATE *v*. (See LUCID) उघड -स्पष्ट -व्यक्त क. [by].—ELUCIDATION स्पष्टीकरण *n*, व्यक्तीकरण *n*; illustration दृष्टांत, दाखला.

ELUDE *v*. (*-ludere*, to play) avoid by artifice, stratagem, or dexterity युक्तीनें -हिकमतीनें -डावपेचानें चुकवणें, टाळा -झोका देणें; remain unexplained or undiscovered by -पासून गूढ -गुप्त -दृष्टिआड राहणें, थांग नलागणें: to e. the efforts of philosophers [by].—ELUSIVE *a*. चुकांडीचा, झोका देण्याचा, पळपट्या.—ELUSORY *a*. deceitful कपटी, छद्मी; evasive चुकवणारा, टाळणारा.

ELYSIUM (*L*.) a dwelling-place assigned to happy souls after death स्वर्ग *n*; any delightful place सुखस्थान *n*, सौख्यभुवन *n*.—ELYSIAN *a*. स्वर्गाचा, स्वर्गीय; अत्यानंदकारक, मनोरम.

EMACIATE *v*. *i*. (*-maciare*, to make lean) रोड -कृश होणें, रोडावणें, वाळणें.— *a*. रोड, क्षीण, सुकटा, कृश.

EMANATE *v*. *i*. (*-manare*, to flow) निघणें, सुटणें, वाहणें (fragrance); take origin उपजणें, निपजणें [from].—EMANATIVE *a*. निघणारा, निसृत, निर्गत.

EMANCIPATE *v*. (*-mancipare*, to transfer ownership in) set free from servitude or slavery by voluntary act बंदखुलास क. मोकळीक देणें; in Hindu theology, deliver from migratory existence मुक्ति -मोक्ष देणें [from].—EMANCIPATION मोकळीक *f*, बंदखुलास; state of being set free सोडवणूक *f*, सुटका *f*, मुक्ति *f*; मोक्ष, मुक्ति *f*.

EMASCULATE *v*. [*-masculus*, male) castrate खसी -नपुंसक क.; deprive of masculine strength पुरुषत्व भंग -नष्ट क., नष्टवीर्य क. (mind).

EMBALM *v*. (See BALM) anoint with balm उटणें लावणें; preserve from decay by means of balm or other aromatic oils, or spices, as a dead body प्रेत कुजूं नये ह्मणून त्यांत सुगंधद्रव्य भरून ठेवणें; fill with sweet odor सुवासानें भरणें, सुवासिक क.; cherish tenderly the memory of प्रीतीनें -कृतज्ञतेनें आठवण धरणें.

EMBANKMENT (See BANK) बंधारा, बांध, धरण *n*, इ०.

EMBARGO *Sp*. गलबतास जाण्यायेण्याची मनाई *f*, प्रतिबंध, अटकाव.

EMBARK *v*. *F*. put on board a vessel गलबतावर चढवणें; engage हात घालणें, हातीं धरणें; upon प्रवर्त्तणें [from, in].

EMBARRASS *v*. *F*. confuse घोटाळ्यांत पाडणें -घालणें, गळफटणें; incumber with debt कर्जानें जेरीस आणणें. -MENT घोटाळा, गळफाटा, घालमेल *f*; तारंबळ *f*, त्रेधा *f*; difficulty लचांड *n*, लिगाड *n*.

EMBASSADOR, See AMBASSADOR.—EMBASSY, राजाच्या वकिलाचें काम *n*, राजदूतकर्म *n*, वकिली *f*, वकिलात *f*; the person or persons sent

as embassador वकील किंवा वकीलसमूह; dwelling or office of an embassador वकिलाचा वाडा किंवा कचेरी *f*.

EMBATTLE *v*. (See BATTLE) फौज रांगेनें उभी क., रांग बांधणें, व्यूह रचणें.

EMBELLISH *v*. *F*. सुंदर -सुशोभित क.;—as a story or matter बनावून -पाल्हाळ करून सांगणें [with, by]. -MENT भूषण *n*, मंडन *n*, अलंकार; बतावणी *f*, पाल्हाळ, पालव.

EMBER* अंगार, राखेंतला जळता कोळसा; *pl* फुपाटा, मुमीर, आहार.

EMBEZZLE *v*. *F*. appropriate fraudulently to one's own use, as that which is entrusted to one's care दिमतीस ठेवलेली जिन्नस खाणें, गिळंकृत क., तनाखोरी क.; -MENT तनाखोरी *f*, हरामखोरी *f*, खाद *f*.

EMBLAZON * *v*. decorate शृंगारणें, मंडित क.; adorn with figures of heraldry कुलीन चिन्हानीं मंडित क.

EMBLEM (*Gr*. *-ballein*, to throw) प्रतिमा *f*, खूण *f*, चिन्ह *n*, लक्षण *n* [of]. -ATIC, -AL *a*. खुणेचा, सांकेतिक; लाक्षणिक (worship); दर्शक, सूचक: white is e. of purity.

EMBODY *v*. form into a body सदेह -देहविशिष्ट क.; concentrate एके ठिकाणीं आणणें -मिळवणें [in, with].

EMBOLDEN *v*. (*en* and *bold*) धीर -दिलासा देणें [by].

EMBOSS *v*. (*en* and *boss*) cover with bosses गोंडेदार क.; cut prominent figures on उठाव आकृति कोरणें -खोदणें. -ED *a*. उंच, उठाव, गोखुराकार.

EMBRACE *v*. (*-brachium*, the arm) enclose in the arms विळख्यांत धरणें, कवटाळणें; press to the bosom उरापोटासीं धरणें, मिठी मारणें; hug आलिंगणें, भेट देणें -घेणें; regard with deep interest आस्थेनें -कळकळीनें पाहणें -लेखणें -मानणें; encompass घेरणें, वेढा घालणें; comprehend आकळणें, समावेश क., व्यापणें: natural philosophy *embraces* many sciences; admit ग्रहण क., स्वीकारणें (a religion); as an opportunity साधणें, गांठणें; [*Law*, to attempt to influence corruptly, as a jury].—*n*. विळखा; मिठी *f*, आलिंगन *n*.

EMBRASURE (*F*.) opening in a wall through which cannon is pointed and discharged जंगी *f*, तोफेची खिडकी *f*.

EMBROIDER *v*. *F*. कशीदा -वेलबुटी काढणें [with]. —EMBROIDERY कशीदा *f*, वेलबुटी *f*.

EMBROIL *v*. *F*. throw into perplexity पेचांत घालणें -पाडणें; entangle गोंवणें, गुताडा क.—*n*. पेच, गुताडा, गुतागुत *f*.

EMBRYO (*Gr*. *-bruein*, to be full of) first rudiments of an organized being गर्भ, पिंड;—of a plant मुलांकुर; in e. गर्भी, पिंडीं.

EMENDATION (*-menda*, fault) चुकी दुरुस्त क. *n*, शोध, शोधन *n*.

EMERALD (*F*. *Skr*. *markata*) a precious stone of a rich green color पाच *f*, हिरन्मणी.

EMERGE *v*. (*-mergere*, to dip) rise out of a fluid उन्मज्जन होणें, वर येणें; issue and appear निघणें, प्रादुर्भाव होणें, उद्भवणें;—from poverty, obscurity डोकें वरतीं काढणें, उदयास -नांवारूपास येणें [from]. — EMERGENCE, -CY वर येणें *n*, उदय;—of a planet उदय; exigency निकड *f*, जरूरी *f*, प्रयोजन *n*; a sudden occasion अवचित आलेलें काम *n*, अवसर *f*, प्रसंग, वेळ.—EMERGENT *a*. वर येणारा, उन्मज्जन; निकडीचा, जरुरीचा.—EMERSION उदय; *Astron*. उदय, पुनर्दर्शन, *n*, दर्शन *n*.

EMERODS *pl* (corrup. from *hemorrhoids*) piles मूलव्याधि *f*, गुदरोग.

EMETIC (*Gr*. *emein*, to vomit, *Skr*. *vam*) वांतीचें -उलटीचें औषध *n*, उलटी *f*.—*a*. उलटीचा, वमनकारक.

EMIGRATE *v*. (*-migrare*, to migrate) एक देश सोडून दुसऱ्या देशीं राहण्यास जाणें, दे-

शांतर क. [from, to].—EMIGRANT *a.* & *n.* देशांतरास गेलेला, -ला मनुष्य.—EMIGRATION एक देश सोडून दुसऱ्या देशीं वास करायास जाणें *n,* देशांतर *n,* देशत्याग; a body of emigrants देशांतर करणारे लोकांचा समुदाय.

EMINENT *a.* (*eminere,* to stand out) high उंच; exalted in rank थोर, श्रेष्ठ, उंच; remarkable प्रख्यात, नामांकित, प्रसिद्ध.—EMINENCE उंचवटा, उंची *f;* मोठेपणा, प्रतिष्ठा *f,* नांवलौकिक; श्रेष्ठता *f,* उत्कृष्टता *f;* a title of honor हुजूर, महाराज, हजरत, असा एक किताब आहे; [esp. app. to a Cardinal in the R. C. Church.]

EMIT *v.* (*-mittere,* to send) पाठविणें, सोडणें, देणें, पाडणें, निघणें: fire *emits* heat and smoke: boiling water *emits* steam: sun and moon e. light [from].—EMISSARY, person sent on a mission दूत, जासूद, बातमी नेणारा; a secret agent employed to advance, in a covert manner, the interest of his employers हेर, भेद्या, चार, गुप्त दूत.—*a.* शोधणारा, हेरणारा; *Anat.* conveying excretions मलवाहक, मलवाहिनी (vessels).—EMISSION सोडणें *n,* टाकणें *n,* निरसन *n;* issue निकाल: e. of bank notes.

EMMENAGOGUE (*Gr. -men,* month, *agogos,* leading) *Med.* ऋतुत्पादक औषध *n.*

EMMET* मुंगी *f.*

EMOLLIENT *a.* (*-mollis,* soft) मऊ करणारा, मवाळाचा, स्निग्ध.—*n.* मवाळीचें औषध *n,* अभ्यंग *n.*

EMOLUMENT (*-moles,* a huge mass) profit arising from employment मिळकत *f,* प्राप्ति *f;* advantage नफा.

EMOTION (*-movere,* to move) a moving of the mind or soul मनोविकार, भाव, रस, चित्तवृत्ति *f;* agitation क्षोभ, मनस्ताप, व्यग्रता *f.*

EMPALE *v.* (*-palus,* stake) shut in कोंडणें; put to death by fixing on a stake सुळावर -सुळीं देणें; fasten beyond the possibility of escape पळून न जाई असा बांधणें, खिळणें [on].

EMPANEL, See IMPANEL.

EMPHASIS (*Gr. -phainein,* to show) stress upon utterance, or force of voice, given to the words or parts of a discourse, whose significance the speaker intends to impress specially upon his audience स्वरस; vivid representation स्पष्ट -चित्रवत् वर्णन *n.*

EMPIRE (*imperium,* command) supreme power or authority in governing मुखत्यारी *f,* श्रेष्ठ अधिकार *n,* कुल अखत्यार; dominion of an emperor सार्वभौमराज्य *n* -राष्ट्र *n,* राज्य *n.*—EMPEROR सार्वभौमराजा, महाराज, छत्रपती, बादशाह.—EMPRESS महाराणी *f,* मलिका *f.*

EMPIRIC *a.* (*Gr. -peira,* trial) अनुभवाचा, परिक्षेचा; founded upon experience अनुभवसिद्ध.—*n.* quack नाकाडोळ्याचा वैद, वैदू; बाडी वैद्य; one who follows an empiric method अनुभवावर चालणारा, जाणता.

EMPLOY *v.* (*-plicare,* to fold) involve in action of body or mind कामास -उद्योगास लावणें; use लावणें, खर्चणें (time); use वापरणें, कामीं लावणें (a pen in writing); use as a servant चाकरीस ठेवणें;—as a consul वकील करणें;—as an agent गुमास्ता ठेवणें [in, at].—*n.* काम *n,* उद्योग. -ABLE *a.* कामास लावण्याजोगा, वापरायाजोगा, चाकरीस ठेवण्याजोगा. -ER चाकरीस ठेवणारा; वापरणारा. -MENT उपयोग क. *n;* काम *n,* चाकरी *f,* उद्योग, रोजगार, धंदा.

EMPORIUM (*L.*) place in which merchandise is collected, exchanged, or traded in उतारपेंठ *n,* पेंठेचा गांव, व्यापाराची जागा *f.*

EMPOWER *v.* (*en* & *power*) शक्ति -बळ देणें; give legal or moral power or authority to अधिकार -मुखत्यारी देणें.

EMPTY* *a.* containing nothing रिकामी, रिक्त, खाली; destitute of effect, sincerity, or sense व्यर्थ, पोकळ, वायकळ, वावगा, निरर्थक (words, threats, civilities); unable to satisfy पोकळ, फांका, भुकड (pleasures); desolate ओस, ओसाड, शून्य (place); unfruitful वांझ, पोकळ: an e. blossom वायफूल *n*; destitute of sense, knowledge, &c. पोकळ, ज्ञानहीन, झळझळीत; destitute of real existence पोकळ, काल्पनिक.—*v.* रिकामा -रिता क.; pour out रिचवणें, उपसणें [out]. —EMPTINESS रिकामेपणा; पोकळपणा, शून्यता *f*.

EMPYREAL *a.* (*Gr.* *-pur*, fire) अग्निमय, तेजोमय; pertaining to the highest and purest region of heaven दिव्यलोक संबंधी.—EMPYREAN, highest heaven, where the pure element of fire was supposed by the ancients to subsist दिव्यलोक, सत्यलोक -भुवन *n*.

EMULATE *v.* (*æmulari*) vie with बरोबरी क. -लावणें, तोलास तोल देणें, स्पर्धा क. [in].—EMULATION, act of attempting to equal or excel in qualities or actions सरोबरी *f*, चढोवढी *f*; rivalry स्पर्धा *f*, प्रतिस्पर्धा *f*; desire of superiority attended with efforts to attain it ईर्षा *f*, ईर्ष्या *f*.—EMULOUS *a.* ईर्षेचा, इरेचा; स्पर्धालु, चढोवढीचा, सरोबरीचा.

EMULSION (*-mulgere*, to milk) *Med.* दुधें *n*.

ENABLE, See EMPOWER.

ENACT *v.* decree ठराव -कायदा -निबर्ध क.; act करणें, साधणें [by]. -MENT स्थापना *f*, स्थापन *n*; ठराव, कायदा, शासन *n*.

ENAMEL (*F.*) a substance used in enameling मिना; smooth hard covering of the teeth दांतावरचा बुरा.—*v.* मिना चढवणें -लावणें.

ENAMOR *v.* (*-amor*, love) मोहित क., भुलवणें. -ED मोहित, लंपट, in comp. आसक्त: कामासक्त.

ENCAMP *v. i.* तळ पडणें, डेरे देणें [on, at].—*t.* छावणी -गोट जमवणें, तळ पाडणें. -MENT तळ देणें *n*; तळ, छावणी *f*, गोट.

ENCHAIN *v.* सांखळीनें बांधणें; confine गुंतविणें (attention); link together सांगडणें, जडणें, अडकविणें.

ENCHANT *v.* (*-cantare*, to sing) charm by sorcery मंतरणें, भारणें; charm मोहणें, भुलवणें [by, with]. -ED भारलेला, अभिमंत्रित, मोहित, भुललेला; possessed by enchanters मंत्र्याच्या स्वाधीन असलेला: an e. castle. -ER मंत्री, जादूवाला, पंचाक्षरी. -MENT, act of producing certain wonderful effects by the invocation or aid of demons, or the aid of certain supposed spirits जादुची करामत *f*, असुरी माया *f*; incantation मंत्र, चेटक *n*, मोहिनी *f*. -RESS चेटकाळी *f*, योगिनी *f*.

ENCIRCLE *v.* कडें घालणें, वेष्टणें; embrace कवटाळणें: go or come round वळसा -प्रदक्षिणा घालणें; गराडा घालणें: the army *encircled* the city.

ENCLOSE *v.* surround वेढा -गरका घालणें; shut up कोंडणें, कुडणें, आवार घालणें;—as a letter भिडणें, मलफूप क., घालणें [in, with].—ENCLOSURE कुपण *n*, कूड, मेढा, आवाराची भिंत *f*, इ०; लखोट्यांत भिडलेला कागद वगैरे;—of arable or meadow ground वाडी *f*, कुडलेलें कुरण *n*.

ENCOMIUM (*L.*) स्तुति *f*, प्रशंसा *f*, तारीफ *f*.

ENCOMPASS, See ENCIRCLE [with, by].

ENCOUNTER (*-contra*, against) meeting face to face भेटाभेट *f*; interview भेट *f*, गांठ *f*; meeting with hostile purpose युद्धार्थ भेट *f*, सामना *f*; battle लढाई *f*, चकमक *f*.—*v.* भेटाभेट होणें, गांठ पडणें; चकमक झडणें;— obstacles or difficulties -शीं भिडणें -टक्कर देणें -झोंबी घेणें.

ENCOURAGE *v.* धीर -दिलासा -दम -धैर्य देणें [by, with]. -MENT धीर देणें *n*, प्रोत्साहन *n*, उठावणी *f*; that which serves to incite, support, promote, or advance हिमायत *f*, दिलदिलासा.

ENCROACH *v. F.* enter by gradual steps into the rights and possessions of another दुसऱ्याच्या अधिकारांत -मालमत्तेंत हळूहळू शिरणें -घुसणें; trespass मर्यादे बाहेर जाणें, आक्रमण क. [on, upon].

ENCUMBER *v. F.* impede the motion or action of, as with a burden ओझ्यानें अवघडविणें, खोडाघालणें; obstruct अडवणें, अटकावणें; load with debts कर्जभरू क., कर्जाचें टोपलें डोईवर ठेवणें [with].—ENCUMBRANCE पायखोडा, गुंता, लोढणें *n*, बेडी *f*.

ENCYCLICAL *a.* (*Gr. -kuklos*, circle) sent to many persons or places बहुतांस -बहुत जागीं पाठविलेला, सर्वसाधारण, वट: the e. letter of the pope.

ENCYCLOPEDIA (*Gr. enkuklios, paideia*, instruction in a circle) सर्वविद्यासंग्रह कोश, विद्याचक्र *n*, विद्याकल्पतरु.

END* (*Skr. anta*) extreme or last portion शेवट *m, n*, टोंक *n*, अग्रभाग; conclusion परिणाम, अवसान *n*, शेवट, फळ *n* (Rom. vi. 21); extermination शेवट, अंत, लय (Gen. vi. 13); aim अभिप्राय, आशय, मतलब, उद्देश: private *ends*; limit अवधि *f*, मर्यादा, सीमा *f*; remnant अवशेष, बाकी *f*. — *v.* समाप्त क., संपविणें, शेवट क.; नाश -लय -अंत क.—*i.* समाप्त -शेवट होणें, अटोपणें [with, at]. -ING समाप्ति *f*, शेवट. -LESS *a.* अपार, अनंत; incessant निरंतर, वारंवार, सदाचा (clamor). — ENDANGER *v.* संकटांत -धोक्यांत घालणें.

ENDEAR *v.* आवडता -प्रिय -गोड क. [to]. -MENT लळा, लाड, प्यार.

ENDEAVOR *F.* प्रयत्न, यत्न.—*v.* यत्न क., झटणें.

ENDORSE *v.* (*-dorsum*, the back) (हुंडीच्या वगैरे) पाठीवर लिहिणें, सकारणें; give currency to पसरणें, प्रसार क., फैलावणें [on, with]. -MENT कागदाच्या पाठीवर सही क. *n*; शेरा, सही *f*, इ०.

ENDOW *v.* (*-dotare*) settle an income upon नेमणूक-वृत्ति करून देणें: to e. a wife, a college; indue गुणी -गुणसंपन्न क., गुण देणें [with]. -MENT नेमणूक *f*, वृत्ति *f*, सरंजाम, वर्षासन *n*, इ०; religious e. धर्मादाय, अग्रहार; gift of nature ईश्वरी देणें *n*, गुण, वर, प्रसाद.

ENDUE *v.* (*induere*) invest विशिष्ट -युक्त क.; supply with पुरविणें, भरती क. [with].

ENDURE *v.* (*-durare*, to harden) remain firm under -खालीं -पुढें टिकणें -निभणें; bear with patience सोसणें, कंठणें, साहणें, भोगणें. —*i.* remain firm and abiding टिकणें, निभणें, तगणें (Job viii. 15); remain firm under trial स्थिर -धीर धरून राहणें, वश न होणें, टिकाव -निभाव होणें (Ezek. xxii. 14) [for]. -ANCE टिकाव, संस्थिति *f*; patience सहनशक्ति *f*, शांति *f*, धीर, सहनता *f*.

ENEMY (*in*, negative, *amicus*, friend) one who is actuated by unfriendly feelings वैरी, शत्रु, रिपु; the E. *Theol.* सैतान; *Mil.*, विरुद्ध पक्षाचें लष्कर *n*, शत्रु.

ENERGY (*Gr. -ergon*, work) internal or inherent power हिम्मत, धमक *f*, उत्साह; power exerted शक्ति *f*, प्रभाव, तडाखा: the e. of a magistrate; strength of expression दम, शक्ति *f*, गौरव [of, in]. —ENERGETIC, -AL *a.* हिमतीचा, हिमतदार, उत्साही; शक्तिमान, प्रबल; efficacious गुणकारक, गुणावह;—as style पोक्त, वजनदार.

ENERVATE *v.* (*-nervus*, nerve) weaken निर्बल -शक्तिहीन -कमजोर क.; cut the nerves of -ची शीर तोडणें (a horse).

ENFEEBLE *v.* निर्बल -कमजोर क.

ENFORCE *v.* compel बळजोरीनें करवणें; — a passage जोरानें -जबरीनें शिरणें -रिघणें; वाट फोडणें; give force to बळ-शक्ति देणें, सदृढ क.: put in force चालू क., प्रवृत्त क.; execute with vigor झटून बजावणें -क.; recommend strongly शिफारस -तारीफ क. -MENT बलात्कार; बजावणें *n*, प्रवर्त्तन *n*; that which gives force बळकटी *f*, पुष्टीकरण *n*, पुस्ती *f*.

ENFRANCHISE *v. F.* set free मोकळा क.; liberate from slavery दास्यत्वांतून -गुलामगिरींतून मोकळा क., बंदखुलास क.; naturalize देशीय मंडळींत घेणें, आपल्या देशचा क.

ENGAGE *v. F.* put under pledge वचनांत बांधून घेणें -गोवणें; gain for service चाकरीस ठेवणें; gain over मन वळविणें, आपल्या पक्षाचा क.; employ the attention of मन गुंतविणें; encounter हल्ला क., लढाई देणें, लढणें. —*i.* वचन-भाक देणें, करार क.; हात घालणें, प्रवृत्त होणें; लढाई देणें -क. [to]. -ED ठेवलेला, प्रवृत्त; promised in marriage वागदत्त, मागणी घातलेला -ली *f*. -MENT करार, संकेत; काम *n*, उद्योग; वाग्निश्चय; लढाई *f*.—ENGAGING *p. a.* मनोहर, मोहक, मनोरंजक.

ENGENDER *v.* (*-generare*, to beget) produce by the union of the sexes जन्म देणें, जनन क., उत्पन्न क.; produce उत्पन्न क.; sow the seeds of पेरणें [from].

ENGINE (*ingenium*, natural capacity, invention) a machine यंत्र *n*; instrument साधन *n*, हत्यार *n*, उपकरण *n*.—ENGINEER यंत्र चालविणारा, 'इंजनेर'; यंत्रविद्या जाणणारा, यंत्री; [civil e., person skilled in the science of engineering, who designs and superintends the construction of public work or machinery; royal e., one who constructs fortifications or attacks them]. -ING इंजनेराचें काम *n*.—ENGINERY यंत्रें *n pl*; यंत्रें चालविणें *n*.

ENGLISH *a.* * इंग्लंद देशाचा -संबंधी, 'इंग्लिश'; इंग्लिश लोकां संबंधी.—*n.* इंग्लिश लोक *pl*; इंग्लिश भाषा *f*, इंग्रेजी *n*.

ENGRAVE *v.* carve figures, letters, or devices upon -वर कोरणें, खोदणें; mark with incisions कातरे -खांडे पाडणें; impress deeply ठसा उठविणें, बिंबविणें [in, with].—ENGRAVER खोदणारा, खोदकाम करणारा.—ENGRAVING खोदणी *f*, कोरणी *f*; an engraved plate नकसकाम *n*, नकशा.

ENGROSS *v.* copy in a large hand मोठ्या अक्षरांनीं प्रत क. (a deed); absorb गरक क., ग्रासणें; purchase either the whole or large quantities of, for the purpose of making a profit by enhancing the price साट्याचें साटें घेणें, खरीद क. -ED गरक, निमग्न, चूर.

ENGULF *v.* गरक क., ग्रासणें.

ENHANCE *v. F.* increase वाढविणें, चढविणें; aggravate दोष वाढविणें.—*i.* वाढणें, चढणें. -MENT वाढ, वृद्धि *f*.

ENIGMA (*L.*) a riddle कोडें *n*, कूट *n*; an action, or mode of action, which cannot be satisfactorily explained गूढ *n*, कोडें *n*, गूढ कर्म *n*; a statement, the hidden meaning of which is to be discovered or guessed गूढ भाषण *n*.—ENIGMATICAL *a.* गूढ कुटाचा, संदिग्ध अर्थाचा.

ENJOIN *v.* अधिकारानें आज्ञा -हुकूम क., ताकीद देणें; *Law*, prohibit by a judicial order or decree कायद्यानें बजावणें, ताकीद देणें [on].

ENJOY *v. F.* take pleasure or satisfaction in the possession or experience of भोगणें, सुख घेणें; have, possess, and use with satisfaction भोगवटा घेणें, वहिवाटणें; have sexual intercourse with भोगणें, संग क. -ABLE *a.* भोगायाजोगा, भोग्य; capable of giving joy भोग -आनंद देण्याजोगा, सुखद, रमणीय. -MENT भोग, उपभोग, भोगवटा, अनु-

भव ; pleasure सुख *n*, आनंद, संतोष.

ENKINDLE *v.* पेटविणें ; excite चेतविणें. See KINDLE.

ENLARGE *v.* मोठा क.; expand पसरणें, विस्तारणें, फैलावणें ; dilate, as with joy फुलवणें, खुलवणें ; amplify पाल्हाळ क. ;—the heart मन उदार -प्रशस्त -प्रगल्भ क. —*i.* वाढणें, मोठा होणें ; विस्तारणें, फैलावणें ; पाल्हाळ करून सांगणें -बोलणें [by, with]. -MENT वाढ *f*, वृद्धि *f*, विस्तार, फैलाव ; पाल्हाळ ; चित्ताची -मनाची प्रशस्तता *f*, मनाचा उदारपणा; release from confinement, servitude, distress बंद -गुलामगिरी -दुख यांपासून सुटका, *f*, बंदखुलास, सुटका *f*.

ENLIGHTEN *v.* प्रकाश पाडणें -देणें (Ps. xcvii. 4) ; make clear to the intellect or conscience प्रबोधित क., उपदेश क., शिकविणें (the mind).

ENLIST *v.* पटावर मांडणें, पटांत नांव मांडणें, नमूद -दखल क.; engage in public service, by entering the name in a register पटांत नांव लिहून सरकारी चाकरीस ठेवणें; unite firmly to a cause पक्षास जडणें -मिळणें, पक्षास अवलंबून राहणें [for, in].—*i.* पटांत नांव दाखल करून चाकरीस राहणें, भरती क.

ENLIVEN *v.* जीव घालणें ; सजीव -जिवंत क. ; give spirit or vivacity दम -तेज -रंग आणणें -देणें, हुशारी आणणें ; make gay आनंदी -उल्लासित क. [by, with].

ENMITY (See ENEMY) quality of being an enemy वैर *n*, शत्रुत्व *n*, द्वेष ; state of opposition विरोध [to].

ENNOBLE *v.* थोर -श्रेष्ठ क., योग्यतेस चढविणें, वाढविणें; raise to nobility अमीर क., उमरावाची पदवी देणें [by, for].

ENORMOUS *a.* (*enormis*, out of rule) मर्यादे बाहेरचा, अमर्याद; great beyond the common measure अपरिमित, अतिशय, जबर, अवाढव्य ; exceedingly wicked अति दुष्ट, अघोर, महापातकाचा.—ENORMITY अमर्यादपणा, अघोरपणा ; महापातक *n*, अति दुष्टता *f*.

ENOUGH* *a.* पुरायाजोगा, पुरता.—*n.* पुरवठा, पुरवण *n*, पर्याप्ति *f*.—*ad.* पुरे, बस ; in a tolerable degree बराच ; to be e. and to spare पुरून उरणें.

ENQUIRE, See INQUIRE [of, for, about].

ENRAGE *v.* रागें भरविणें, कोपवणें, संताप आणणें. —ENRAGED कोपलेला, संतप्त, क्रुद्ध ; to be e. पेटणें, संतापणें.

ENRAPTURE *v.* आनंद मावेनासा क., आनंदमय क. ; to be *enraptured* आनंदानें भानरहीत होणें.

ENRICH *v.* सधन क., संपत्तिवान क. ; adorn मंडित -अलंकृत क. ; make rich with manure खत घालून मातबर क. ; fertilize सुपीक क. ; store with knowledge ज्ञान -विद्यासंपन्न क. (the mind) [by, with].

ENROLL *v.* See ENLIST [in].

EN ROUTE *ad.* (*F.*) -वाटेवर, वाटेनें जात असतां [for, to].

ENSAMPLE, See EXAMPLE.

ENSHRINE *v.* पेटींत-संपुटांत घालून ठेवणें -रक्षणें ; preserve with care and affection जतन क., बाळगणें, पाळणें.

ENSIGN (*-signum*, sign) flag of a regiment बावटा, निशाण *n* ; a signal निशाणी *f*, खूण *f* ; a commissioned officer, who formerly carried the flag of a regiment निशाणबरदार, पताक्या.

ENSLAVE *v.* दास -गुलाम -अंकित क.

ENSNARE *v.* जाळ्यांत -फाशांत धरणें -पकडणें ; deceive फसविणें, फशी पाडणें.

ENSUE *v.* (See SUE) पाठीमागून जाणें, अनुसरणें (1 Pet. iii. 11).—*i.* निघणें, फळ -परिणाम होणें, मागून येणें [from]. -ING येणारा, येता, पुढला.

ENTABLATURE (*-tabula*, board) खांबाच्या पुढें आलेला तुळयीचा भाग.

ENTAIL *v. F.* settle inalienably on a person or thing, or on a person and his descendants वंशपरंपरा करून देणें -ठेवणें; to fix inalienably on a thing न निघेसा क., जडणें [on].—*n.* वंशपरंपरा -अक्षय करून ठेवलेली वस्तु *f.*

ENTANGLE *v.* interweave in such a manner as not to be easily separated गुतागुत क. (thread); involve in complications पेचांत पाडणें, गुतवणें; perplex घोटाळ्यांत -भ्रमांत पाडणें -घालणें [with, in, by]. -MENT गुतागुत *f*, गुंताडा; पायगोवा, गळफाटा; intricacy भानगड *f*, पेंच *f*.

ENTER *v.* (*intrare*) come or go into आंत जाणें -येणें, शिरणें; unite in मिळणें, शिरणें, आंत जाणें: to e. a college, army, association; attain लागणें, पावणें, -प्रत येऊन पोंचणें: to e. one's teens; insert शिरवणें, खोवणें, घालणें: to e. a knife into a log; enroll पाटावर मांडणें -दाखल क., नमूद क.; begin पाऊल टाकणें, प्रवृत्त होणें; take possession of;—said of a devil संचरणें, शिरणें; —into a system भिनणें, भेदणें, संचरणें [at, by].—ENTERITIS (*Gr.*) an inflammation of the intestines अंत्रदाह.—ENTRANCE आंत जाणें *n*, प्रवेश, रीघ; permission to enter आंत जाण्याची परवानगी *f*; door, passage, avenue द्वार *n*, वाट *f*, मार्ग; commencement आरंभ, तोंड *n*.—ENTRY आंत येणें -जाणें *n*, प्रवेश; act of entering in a record बारनिशी *f*; द्वार *n*, मार्ग.

ENTERPRISE *F.* a bold, arduous, or hazardous attempt जोखमाचें काम *n*, कचाट *n*, जोखीम *n*, साहसकर्म *n*; willingness to engage in labor which requires boldness, energy, &c. साहसकर्म करण्याची इच्छा *f*.—ENTERPRISING *a.* साहसी, खटपट्या, व्यवसाई.

ENTERTAIN *v.* (*-tenere*, to hold) sustain in one's service चाकरीस ठेवणें; give hospitable reception and maintenance to आदरआतिथ्य -पाहूणचार -मेजवानी क.; engage agreeably the attention of मन रमवणें, रंजवणें, करमणूक क.; harbor मनांत धरणें -बाळगणें: to e. charitable sentiments toward our fellow-men [by, with]. -MENT पाहूणचार, मेजवानी *f*, आदरआतिथ्य *n*; करमणूक *f*, मनरंजन *n*; a feast भोजनसमारंभ, मेजवानी *f*, मोठें जेवण *n*, भोजनोत्साह.

ENTHRALL* *v.* गुलाम क., वश क.

ENTHRONE *v.* राजासनावर -गादीवर बसविणें, राजपद देणें, राजपदारूढ क.

ENTHUSIASM (*Gr. enthousiazein*, to be inspired or possessed by the god) inspiration as if by a divine or superhuman power देवपिसें -वारें *n*; extravagant hope and expectation अति आशा *f*, अति इच्छा *f*; complete possession of the mind and energies by a cause, subject, fancy, &c. आवेश, अनुराग, शौक [for].—ENTHUSIAST देवपिसा; आवेशी.

ENTHYMEME (*Gr. -thumos*, mind) *Rhet.* लुप्तन्याय.

ENTICE* *v.* allure लोभ दाखवणें, मोह घालणें; induce to evil कुकर्म करण्यास फूस देणें, शिकवणें, भरवणें [by, to]. -MENT मोह, मोहिनी *f*; फूस *f*, भर *f*, शिकवणी *f*; alluring object मोहक वस्तु *f*, गूळखोबरें *n*.

ENTIRE *a.* (*integer*) complete in all parts सगळा, संबंध, अखंड; whole पुरा, पुरता, संपूर्ण, in comp. कुल: e. control of the business; pure शुद्ध, निर्मल (a heart); without defect निकोप, अव्यंग, धड (horse). -LY *ad.* अगदीं, झाडून, तमाम; sincerely खरेपणानें, विश्वासानें, एकनिष्ठेनें: to highest God e. pray.

ENTITLE *v.* give a title to नांव -संज्ञा देणें (a book); give a claim to अधिकार -हक

देणें: an officer's talents e. him to command [to].

ENTITY (*ens*, thing) existence आहेपणा, अस्तित्व *n*; an e. वस्तु *f*, अर्थ.

ENTOMB *v.* थडग्यांत घालणें -पुरणें, गाडणें [in].

ENTRAILS *pl* (*intra*, within) viscera अंतडीं *n pl*, अंत्रमाळा *f pl*; the internal parts अंतर्भाग: the e. of the earth.

ENTRANCE, See under ENTER [to, on].

ENTRANCE *v.* (*en* and *trance*) put into a trance तन्मय-मूर्च्छित क., देहभान नाहींसें क.; put into an ecstacy हर्षमोहित-आल्हादित क.

ENTRAP *v.* catch, as in a trap सांपळ्यांत -पाशांत धरणें; catch and involve in contradictions अडकित्यांत धरणें, पेचांत पाडणें, पकडणें [in].

ENTREAT *v.* deal with -शीं वागणें, वर्त्तणूक क. (Jer. xv. 11); beseech विनंती क., विनवणें, काकळूत क.; persuade by entreaty विनवणी करून मन वळविणें, समजी क., समजावणें (Luke xv. 28).—*n.* विनंती *f*, मिन्नत *f*, याचना *f*.

ENTRY, See under ENTER.

ENUMERATE *v.* (*-numerare*, to count) गणणें, मोजणें, गणना क.—ENUMERATION गणना *f*, गणती *f*, संख्या *f*; detailed account कच्ची हकीकत *f*, तपसील; *Rhet.* recapitulation उपसंहार.

ENUNCIATE *v.* (*-nunciare*, to announce) प्रसिद्ध -प्रगट -जाहीर क.; utter उच्चारणें, ऐकूं जाईसें बोलणें (a word).—ENUNCIATION प्रसिद्धीकरण *n*, प्रसिद्धि *f*; उच्चार, उच्चारण *n*; mode of utterance उच्चार करण्याची रीति *f*; statement हकीकत *f*, इकरार.

ENVELOPE *v. F.* surround as a covering वेष्टणें, लपेटणें; enclose within a case, wrapper, &c. लिफाप्यांत घालणें [in].—*n.* वेष्टन *n*, आवरण *n*, वासन *n*; लिफापा, पोलक, गलीचा [for].

ENVENOM *v.* taint with venom विष घालून बिघडणें, विष घालणें, विखारी -विषयुक्त क. (meat, an arrow); render hateful द्वेषयोग्य क., द्वेषपात्र क.; taint with malice द्वेषानें बिघडविणें, द्वेषयुक्त क.: *envenomed* tongue of calumny.

ENVIRON *v. F.* surround घेरणें, वेढणें: *environed* with mountains; envelop वेष्टणें, लपेटणें, ग्रासणें: *environed* with darkness, difficulties.—*n. pl* parts or places which surround another place आसपासचा प्रदेश -जागा, भोवरदेश -गांव *pl*.

ENVOY (*F.*) एका राजानें दुसऱ्या राजाकडे तह वगैरेचें बोलणें करायास पाठविलेला वकील, राजदूत, वकील.

ENVY *v.* (*invidere*, to see against) look with grudging or invidious eyes upon मत्सर दृष्टीनें पाहणें; regard with discontent and malevolent longing, as some enjoyable thing which a person dislikes to see another have possession of, and would have himself -चा हेवा क., पोटांत दुखणें, डोळ्यांत सलणें: तो मनुष्य त्याच्या डोळ्यांत सलतो; desire strongly अति लोभ -वांछा धरणें [for], — *n.* पोटदुखी *f*, देखदुखी *f*, हेवा *f*, मत्सर; emulation ईर्षा *f*; malice द्वेषभाव, चुरस *f* [of].—ENVIABLE *a.* हेवा उत्पन्न करणारा -करण्याजोगा, स्पृह्य; इच्छिण्याजोगा, ईर्षणीय. — ENVIOUS *a.* हेवेखोर, मत्सरी; insidious काव्याचा, पकडीचा.

ENWRAP *v.* वेष्टणें, गुंडाळणें.

EPHEMERAL *a.* (*Gr. ephemerios*, for a day) एका दिवसाचा, एक दिवस जिवंत राहणारा, एकाहजीवी; short-lived अल्पायुषी, अल्पायु.

EPIC (*Gr. epos*, a word, song) विरांच्या चरित्राचें गीत *n*, पोवाडा.—*a.* वीरमाहात्म्य -चरित्र संबंधी.

EPICENE (*Gr. -koinos*, common) *Gram.* उभयलिंग *n*, द्विलिंग *n*.—*a.* उभयलिंग.

EPICURE (*Epicurus*, the famous Greek philosopher who assumed pleasure to be the highest good) एपिक्युर पंथी; one who indulges in the luxuries of the table गोडघाशा, पोटबाबू, कुक्षिंभरी; one who is devoted to sensual enjoyments विषयलुब्ध -लंपट.—EPICUREAN *a.* एपिक्युराचा; एपिक्युर पंथाचा; चोखंदळा, खादाड, गोडघाशा. —*n.* एपिक्युर पंथी; खादूनंदन, पोटभरू.

EPIDEMIC *a.* (*Gr. -demos*, people) सर्वांचा, साधारण (sin); affecting great numbers बहुतांस लागणारा: e. disease महामारीचा रोग.—*n.* महामारी *f*, सांत *f*, पटकी *f*, धाम *f*.

EPIDERMIS (*Gr. -derma*, skin) बाहेरील कातडी *f*, त्वचा *f*; *Bot.* बाहेरील साल *f*.

EPIGASTRIC *a.* (*Gr. -gaster*, belly) pertaining to the upper and anterior part of the abdomen पूर्वबस्ति संबंधी.

EPIGRAM (*Gr. -graphein*, to write) a short poem treating only of one thing, and ending with some lively, ingenious, and natural thought नोकीची कविता *f*, कवितेचा चुटका [on, upon, by].

EPILEPSY (*Gr. -lapbanein*, to take besides) the falling sickness, so called because the patient falls suddenly to the ground फेंपरें *n*, मरगी *f*, अपस्मार.—EPILEPTIC फेंपरेकरी, अपस्माररोगी.

EPILOGUE (*Gr. -legein*, to say) *Dram.* speech or short poem at the end of a play नाटकाच्या शेवटचें भाषण *n*, किंवा कवन *n*; *Rhet.* a conclusion भाषणाचा उपसहारं, अंत्यवाक्य *n* -वचन *n*.

EPIPHANY (*Gr. -phainein*, to show forth) दर्शन *n*; (ज्ञानी लोकांस खीस्ताच्या ताऱ्याचे किंवा खीस्ताचे) दर्शनाचा सण (कित्येक ख्रिस्ती मंडळ्या हा सण पाळतात).

EPISCOPACY (*Gr. episkopos*, overseer) government of the church by bishops ख्रिस्ती मंडळींवर बिशपांचा अधिकार.—EPISCOPATE धर्माध्यक्षाचें पद *n*; धर्माध्यक्षसमूह.

EPISODE (*Gr. -hodos*, way) an incidental narrative फरडूक *n*, फांटा, उपकथा *f*.

EPISTLE (*Gr. -stellein*, to send) पत्र *n*, पत्रिका *f* [from, to, by].—EPISTOLARY *a.* पत्रांचा; carried on by letters पत्रोपत्रींचा, कागदोपत्रींचा; suitable to letters पत्र लिहिण्यायोग्य, पत्राचा (style).

EPITAPH (*Gr. -taphos*, tomb) थडग्यावरचा लेख; थडग्यावर कोरण्याजोगा लेख [on, by].

EPITHALAMIUM (*Gr. -thalamos*, bridal bed, marriage) लग्नाच्या वेळीं वधुवरांची स्तुति करून त्यांसाठीं दुवा मागण्याचें गीत *n*, लग्नगीत *n*.

EPITHET (*Gr. -thetos*, placed) गुणदर्शक शब्द, विशेषण *n*, नांव *n*.

EPITOME (*Gr. -temnein*, to cut) संक्षेप, सारग्रंथ [of, by].

EPOCH (*Gr. epochè*, a check on the reckoning of time) शकाचा आरंभ, शकादि.

EQUAL *a.* (*æquus*) alike सारखा, सम, समान (size); adequate पुरेसा, पुरता; fit योग्य, लायक: he is not e. to the task; uniform एकसारखा, सम, समान: e. temper समानवृत्ति *f*; equitable रास्त, यथान्याय, नीतीचा: e. judge; indifferent सारखा, समान: it is e. to me [to].— *n.* बरोबरीचा -तोलास तोल देणारा, एका दरजाचा मनुष्य; equal quantity समपरिमाण *n*, प्रमाण *n* [of].—*v.* सारखा, -समतोल -बराबर क.; recompense fully भरून देणें; compare or regard as equals सारखें -सम मानणें, भेद न पाहणें. -ITY सारखेपणा, बरोबरी *f*; समानता *f*, समभाव; plainness सपाटी *f*: e. of surface; *Math.* बरोबरी *f*. -IZE *v.* सारखा -सम क.; सारखा मानणें, भेद न पाहणें. — EQUATION, *Math.* समीकरण *n*. EQUATOR, a great circle on the earth's surface, everywhere equally distant from the two poles, and dividing

the earth's surface into two hemispheres मध्यरेषा *f*, विषुववृत्त *n*. -IAL *a*. विषुववृत्ताचा -विषुववृत्त संबंधी.—EQUITY, justice न्याय, इनसाफ, नीति *f*; equitable claim न्यायाचा -वाजवी हक्क -दावा; [a system of jurisprudence administered in courts of equity, supplemental to law, properly so called, and complemental to it]. —EQUITABLE *a*. यथान्याय, उजू, रास्त;—of persons प्रमाणिक, इनसाफी; इक्विटि कोर्टाचा; इक्विटि कोर्टानें निवाडा -फैसला केलेला.—EQUANIMITY समानप्रकृति *f*, शांत स्वभाव, धिमा स्वभाव.—EQUIANGULAR *a*. समकोण.—EQUIDISTANT *a*. सारख्या अंतराचा, समांतर.—EQUILATERAL *a*. सारख्या बाजूचा, समभुज.—EQUILIBRATE *v*. समभार -समतोल क. -राखणें. — EQUILIBRIUM, equality of weight समभारता *f*, समतोलपणा; just poise or balance in respect to an object, so that it remains firm तोल: the e. of the body;—of the mind समानचित्तवृत्ति *f*.—EQUINOX, the precise time when the sun enters one of the equinoctial points विषुवकाल; vernal e. मेषाविषुव; autumnal e. तुलाविषुव.—EQUINOCTIAL *a*. विषुव संबंधी; pertaining to the regions or climate of the equinoctial line विषुवरेखाप्रदेश संबंधी अथवा विषुवरेखेचें शीतउष्ण संबंधी; विषुवकाल संबंधी; e. points क्रांतिपात.—EQUIPOISE समतोल -भार; सारखा, समान. — EQUIPONDERANCE वजनाची बरोबरी *f*, भारसाम्य *n*.— EQUIPONDERATE *v*. *c*. समभार होणें -क.— EQUIVALENCE मोलाची -किमतीची बरोबरी *f*, बरोबरी *f*.— EQUIVALENT *a*. एकमोलाचा -वजनाचा; alike in significance एका अर्थाचा, समानार्थक [to].—*n*. बरोबरीचा पदार्थ, विषय इ०; *Chem*. मेलन -मिश्रणपरिमाण *n*.

EQUIVOCAL *a*. (*-vox*, word) having different significations equally appropriate दुटप्पी, दोन अर्थांचा (words); doubtful अळमटळम, संशययुक्त (actions).—EQUIVOCATE *v*. *i*. दुटप्पी बोलणें, पेंचपाच -फट ठेवून बोलणें.

EQUESTRIAN *a*. (*equus*, horse) घोड्यांसंबंधी; घोड्यावर बसण्याच्या विद्येसंबंधी; riding on horseback habitually घोड्यावर बसणारा, अश्वारूढ; representing a person on horseback अश्वारूढदर्शक (a statue); performed by one who is riding on horseback घोड्यावर बसून केलेला-करायाचा (feats). —*n*. घोड्यावरचा स्वार, घोडेस्वार.

EQUIP *v*. *F*. fit out सजवणें, सज्ज क.; provide with arms, &c. हत्यारबंद क. [in, with]. -AGE, retinue स्वारी *f*, इतमाम, लवाजिमा; लष्कराचें -लढाईचें सामान *n*, असबाब, युद्धसामग्री *f*; सामग्री *f*, साहित्य *n*. -MENT सजवणें *n*, सज्जीकरण *n*, सजवणूक *f*; साजसंरजाम.

ERA (*æra*) शक, संवत, सन इ०.

ERADICATE *v*. (*-radix*, root) मुळासुद्धां उपटून टाकणें; destroy thoroughly निर्मूळ क., समूळ नाश क., निःपात क.— ERADICATION निर्मूल *n*, समूलोत्पाटन *n*; निःपात.

ERASE *v*. (*-radere*, to scrape) खोडणें, खरडून टाकणें; blot out बोळा फिरविणें, पुसून टाकणें. —ERASURE खोडणें *n*, लोप.

ERE * *ad*. & *prep*. पूर्वी, अगोदर. -LONG *ad*. लवकर, फार वेळ न लावतां.

ERECT *v*. (*-regere*, to lead straight) उभा क., उभारणें; build बांधणें, रचणें उभारणें; exalt वाढविणें, उंच पदावर बसविणें; cheer धैर्य -धीरदेणें; institute स्थापणें: to e. a new commonwealth.—*a*. उभा, नीट, सरळ; raised उभारलेला, उन्नत; bold धीट, छातीचा. -ION उभें क. *n*, उभारणें *n*; बांधणें *n*, बांधणी *f*, इमला.

ERGO *ad.* (*L.*) यास्तव.

ERR *v.i.* (*errare*) wander from the right way बहकणें, भटकणें, मार्ग चुकणें, भ्रमणें; blunder चूक क., चुकणें; fail morally सन्मार्ग सोडणें, सन्मार्गभ्रष्ट होणें. -ANT *a.* भडकणारा, फिरणारा, भ्रमणशील; wild बेबंद, बेताल (fool). -RY भ्रमण *n*; [employment of a knight-errant].—ERRATIC *a.* भ्रांत, चुकीचा (conduct); moving फिरणारा, भ्रमणारा, अस्थिर, चंचल (planet).—ERRATUM (*L.*) an error in writing or printing अशुद्ध *n*, चूक *f*. —ERROR, wandering or deviating from the right course or standard भ्रम, भ्रांति *f*; mistake चूक *f*, चुकी *f*; inaccuracy अशुद्ध *n*, चूक *f*; fault दोष, चूक *f*, अपराध (Ps. xix. 22).— ERRONEOUS *a.* भ्रमाचा, चुकीचा; चुकलेला, अशुद्ध. -LY *ad.* चुकून, भ्रांतीनें, चुकत चुकत.

ERRAND* message निरोप, संदेश; one's purpose in going any where काम *n*, कार्य *n*; to go on a fruitless e. पायाचा वळ भागविणें.

ERRHINE (*Gr.* *-rhin*, nose) *Med.* a medicine designed to be snuffed up the nose, to promote discharges of mucus नथ *f*, नस्य *n*.

ERUCTATION (*-ructare*, to belch) ढेंकर; [a violent bursting forth or ejection, as wind or other matter from the earth.]

ERUDITE *a.* (*-rudis*, rude) पढलेला, पढीक, विद्वान.— ERUDITION विद्या *f*, व्युत्पत्ति *f*, ज्ञान *n*.

ERUPTION (*-rumpere*, to burst) फुटणें *n*, स्फोटन *n*;—on the skin उतणें *n*, पुरळ, कोंडा, खरूज *f*, इ०; as of ants, gnats, &c. पेंव -वारूळ फुटणें *n*; as of a volcano फवारा.

ERYSIPELAS (*Gr.* *-pella*, hide) *Med.* a febrile disease accompanied with a diffuse inflammation of the skin, which, starting usually from a single point, spreads gradually over its surface धावरें *n*, दद्रू.

ESCALADE *v.* (*-scala*, ladder) *Mil.* शिडया लावून किल्यावर चढणें.

ESCAPE *n.* *F.* flee from and avoid चुकवणें, टाळणें; evade दृष्टि -नजर चुकवणें.—*i.* पळणें, निभावणें, पारपडणें; to be passed without harm धड -सुधा -कोरा राहणें [from, to].—*v. t.* बचाव, सुटका *f*, निभाव.

ESCHEAT *F.* बेतुल -बेहतन माल, बेवारीस जिंदगी *f*.

ESCHEW *v.* *Ger.* टाकणें, वर्जणें, त्यागणें, सोडणें.

ESCORT *n.* *F.* वाटेनें रक्षणा करितां दिलेला पाहरा, वलावा.—*v.t.* शिपाई बराबर देऊन पोंचविणें, बोळवणें.

ESCULENT *v.t.* (*esca*, food) खाण्याजोगा, खाद्य. —*n.* खाण्याजोगा पदार्थ.

ESPECIAL *a.* (*-species*, kind) विशेष; chief मुख्य.

ESPLANADE *F.* किल्ला व गांव यांच्या मधलें मैदान *n*, किल्ल्याचें मैदान *n*, 'काप.'

FLORA (*flos*, flower) goddess of flowers पुष्पदेवता *f*; complete system of vegetable species native in a given locality अमूक एका प्रदेशांत उत्पन्न होणाऱ्या वनस्पति *f pl*; a description of such plants स्थानिक वनस्पतिवर्णन *n*. —FLORAL *a.* फुलांचा पुष्पसंबंधी (game); फुलांचा (bud).—FLORID *a.* flushed with red लालबुंद -भडक (countenance); embellished with flowers of rhetoric अलंकारिक, पुष्पित (style); -ITY तोंडाची लाली *f* -टवटवी *f*. -NESS लाली *f*, भडक *f*; अलंकारप्राचुर्य *n*.—FLORIN एक नाणें आहे; [the English f. is one-tenth of a pound sterling].—FLORIST फुलमाळी, फुलारी, माळी; पुष्पवर्णनकर्त्ता.

FLOUNCE, FLOUNDER *v. D.* धडफडणें, तडफडणें, हातपाय अपटणें -झाडणें [about].—*n.* झडफड *f*, तडफड *f*; *Ger.* [part of a lady's dress, a loose trimming].

FLOUR (See FLOWER) finely ground meal of grain पीठ *n*, पिष्ट *n*; wheaten f. कणीक *f*; gram f. बेसन *n*; fine wheaten f. सोजी *f*, मैदा; coarse wheaten f. रवा, सांजा; fine rice f. पिठी *f*; fine and soft powder of any substance पीठ *n*, भुकटी *f*, पूड *f*.

FLOURISH *v. i.* (*florere*, to bloom) grow luxuriantly पोसणें, तरतरणें, फोफावणें; be prosperous भरभराट -चलती -उत्कर्ष -चालता काळ असणें;—as a town, country आबादानी -आबाद असणें; use florid language बतावणी क.; make ornamental strokes with the pen भरकांडे -फरकांडे मारणें; vaunt बढाई सांगणें -क.; play with fantastic and irregular motion परजणें, खेळणें.—*t.* बतावून सांगणें, बतावणी क.; अलंकृत-वेलबुट्टेदार क.; परजणें, चमकावणें; विरखडणें, भरकांडे मारणें.—*n.* beauty सौंदर्य *n*, लावण्य *n*; बोलण्याचा भरकांडा, अर्थवाद; भरकांडा, फरगडा; *Mus.* गत *f*, परजणें *n*. -ING टवटवीत, तरतरीत; समृद्ध, संपन्न, आबाद.

FLOUT *v. D.* झिडकावणें, हिडसावणें, तिरस्कारणें.

FLOW* *v. i.* move by the power of gravity, and with a continual change of place, among the particles or parts, as a fluid वाहणें, ओघ चालणें; melt पाझरणें, गळणें, वितुळणें; glide smoothly सुरळीत-अस्खलित चालणें, सरणें; be full, so as to run or flow over भरून चालणें, वाहणें, लोट येणें; hang loose and waving रुळझुळणें, लोंबणें (mantle, locks); rise, as the tide भरती -जोर लागणें; proceed निघणें, येणें; discharge blood in excess from the uterus गर्भाशया पासून अति रक्तस्राव होणें [from, to, in].—*n.* ओघ, प्रवाह, धारा *f*; रेळचेळ *f*, चंगळ *f*;—of tears अश्रुधारा *f*, अश्रुपात;—of words वाक्चापल्य *n*, वाक्सरणी *f*; भर, पूर, भरतें *n*.

FLOWER (*flos*) a circle of leaves or leaflets on a plant, usually of some other color than green फूल *n*, पुष्प *n*; blossom मोहर, फूल *n*; that part of a plant destined to produce seed फूल *n*;—as of grain फुलोरा; the fairest, freshest, and choicest part of any thing निवड *f*, उत्तमांश, शेलका भाग;—of youth भरज्वानी *f*, तारुण्य *n*; a figure of speech वाक्यालंकार; *pl.* menstrual discharges पुष्प *n*, रज *n*;—as carved, painted फुली *f*, बुटे; *Chem.* फूल *n*. —*v.i.* फुलणें, फुलें येणें, विकसणें; भरास येणें.—*t.* फुलें -बूट काढणें, बुट्टेदार क.—FLOWERY *a.* पुष्कळ फुलांचा; पुष्पमय; अलंकारी, अलंकारयुक्त (style): [the f. kingdom, China].

FLUCTUATE *v. i.* (*fluere*, to flow) move as a wave हेलकावा खाणें; be irresolute धरसोड क.; be unsteady एका स्थितीवर नसणें [from, to].—FLUCTUATION हेलकावा, अन्दोलन *n*; धरसोड *f*; चढउतार, अस्थैर्य *n*.

FLUE *F.* धुराडें *n*.

FLUENT *a.* (*fluere*, to flow) वाहता; fluid पातळ; voluble बोलका, जिभेचा चपळ (speaker); flowing सरळ, सुरळीत, अस्खलित (speech). -LY *ad.* चुरचुर, खडखडीत, भराभर (बोलणें-वाचणें).—FLUENCY जिभेचा चपळपणा, वाक्चापल्य *n*; सरळ-सुरळीतपणा.—FLUID *a.* प्रवाही, पातळ, द्रवरूप.—*n.* पातळ-द्रव-प्रवाही पदार्थ. -ITY द्रवता *f*, पातळपणा.

FLUKE, *Ger.* the part of an anchor which fastens in the ground पावडा, कांटा, फाळ.

FLURRY *Provl. Eng.* a sudden blast वाऱ्याचा झटकारा; bustle गडबड *f*, लगबग *f*, धांदल *f*.—*v.* गडबडविणें, धांदल क.

FLUSH* *v.* redden suddenly एकदम लाली आणणें, तांबडालाल क.; elate चढवणें, फुगवणें.—*i.* भडभड -भळभळ वाहणें: blood *flushes* into the face; लाली येणें, तांबडालाल होणें; to f. up joints दरजा क.—*n.* लोंढा, ऊत, लहर *f*; ardor उकळी *f*, हुरशी *f*, कढ; लाली *f*; भय, लाज, राग इ० विकारांचा क्षोभ झाल्यानें तोंडावर उत्पन्न होणारी लाली *f*, काळिमा *f*.—*a.* fresh टवटवीत, तुकतुकीत; affluent संपन्न, श्रीमंत; liberal उदार; prodigal उधळ्या, उडाऊ.

FLUTE (*flatus*, a blowing) a musical wind instrument मुरली *f*, पोंवा; a channel in a pillar खांचणी *f*.

FLUTTER *v. i. D.* flap the wings rapidly फडफडणें, पंख झाडणें; be in agitation व्याकूल होणें, गडबडणें.—*t.* पंख झाडणें; गडबडविणें, धांदल क.

FLUX (*fluere,* to flow) वाहणें *n*; ओघ, प्रवाह; change पालट; concourse जमाव, मेळा; the tide setting in toward the shore भरती *f*; fusion आटणें *n*, गाळणें *n*;—for metals टाकणखार, सवागी इ० धातूचा रस करणारा पदार्थ; *Med.* आमातिसार, रक्तातिसार इ०; to have a f. हगवण लागणें.

FLY* *v. i.* move in the air with wings, as a bird उडणें; float in the air, as the clouds, the sparks तरंगणें, उडणें; — as a flag उडणें, फडफडणें; hasten away जाणें, लवकर निघून जाणें: time *flies*; flee (संकटा पासून) पळून जाणें: the enemy *flies*; part फुटणें, तुकडे होणें; to come off with flying colors जय मिळविणें, फत्तेहोणें, विजयध्वज मिरवीत येणें; at अंगावर तुटून पडणें, घसरणें;—in the face of बेअदबी क.; off तुटणें, तुटून मोकळा होणें; on अंगावर तुटून पडणें, हल्ला क.;—open जोरानें उघडणें; out उधळणें, उसळणें; रागावणें, कातावणें; to let f. सोडणें; जाऊंदेणें [from, to, against].— *n.* a winged insect of various species माशी *f*, मक्षिका *f*. -BLOW, egg of a fly सडी *f*. -CATCHER शिपाई (एक पक्षी आहे). -ING-FISH एक उडणारा मासा आहे. -LEAF बुकाच्या आरंभीचें किंवा शेवटचें कोरें पान *n*. -TRAP माशा धरणारें झाड *n*, मक्षिकाकर्त्तरी झाड *n*.

FOAL* शिंगरू *n*, शिंगी *f* (गाढवाचें -घोड्याचें).

FOAM* (*Skr. phêna*) फेंस, फेण.—*v. i.* फेणणें, फेसळणें; फेंसानें भरणें.—*t.* फेंसळून काढणें -टाकणें [out].—FOAMY *a.* फेंसाळ, फेणयुक्त.

FOB *Ger.* घड्याळ ठेवण्याचा लहानसा खिसा.

FOCUS (*L.* fireplace) point in which the rays of light meet किरण एकत्र मिळण्याचें स्थान *n*, तेजस्संकर्ष देश; a central point मध्यकेंद्र *n*.—FOCAL *a.* केंद्रसंबंधी.

FODDER* वैरण *f*, चारा.—*v.* वैरण घालणें.

FOE* वैरी, शत्रु.

FŒTUS, See FETUS.

FOG *Icel.* धुकें *n*, धुकट *n*. -GY *a.* धुक्याचा, धुक्यानें भरलेला; dull मंद, स्थूल.

FOH *interj.* इश्श, इश्शो.

FOIBLE *F.* वर्म *n*, छिद्र *n*, उणें *n*; *pl* कर्मे वर्मे *n pl*.

FOIL *v. F.* मोडणें, थकणें, चालेनासा क. [by, in].—*n.* मोड, पराभव; a blunt sword used in fencing बुळी तरवार *f*, पट्टा, बोथाटी *f*, इ०; (*folium*) a leaf or thin plate of metal वर्ख, पत्रा, पान *n*; a coat of metal on a looking-glass आरशाची कल्हई *f*; [a thin leaf of metal, placed under precious stones by jewelers, to increase their brilliancy, or to give them a particular color]; any thing of another color, or of different qualities, which serves to adorn, or set off another thing to advantage कांतिवर्द्धक वस्तु *f*.

FOIST *v. F.* खुपसणें, लाटणें, घुसडणें [on, off, in]. -ER घुसड्या, खुपशा.

FOLD* *v.* lap or lay in plaits घडी क.; double दुमडणें; lay together, as the arms or the hands हात पोटाळणें; envelop गुंडाळणें, वेष्टणें, लपेटणें; confine in a fold कोंडवाड्यांत कोंडणें -घालणें;—a letter लखोटा क., मलफूप क. [together].—*i.* घडी होणें, दुमटणें.—*n.* घडी *f*, पदर; पट: four-f.; embrace मिठी *f*, वेंग *f*; कोंडवाडा. -ING पदर, घडी *f*;—of doors दुतलफी *f*.

FOLIAGE (*folium,* leaf) पानें *n pl*, पालव, पल्लव; new f. पालवी *f*.—FOLIATE *v.* पारा चढविणें, पाऱ्याची कल्हई क.—FOLIO, a sheet of paper once folded दुबंदी कागद; book made of sheets of paper each folded

once दुंड्याचें पुस्तक *n*; page in an account-book चोपडीचें पान *n.*—*a.* दुबंदी, दुबंदी कागदाचा.

FOLK* लोक *pl*, आलमदुनिया *f.*

FOLLOW* *v.* go or come after मागून जाणें -येणें -चालणें; go in pursuit of पाठीस लागणें;—accept, as authority आदरणें, प्रमाण मानणें; obey मानणें, ऐकणें; embrace स्वीकारणें, आदरणें; imitate अनुसरणें, अनुकरण क., कित्ता घेणें; succeed in order of time मागून -नंतर येणें -होणें; accompany संगती -बराबर जाणें; result from, as an effect from a cause निष्पन्न होणें, निघणें; understand the meaning, connection, or force of, as a course of thought or argument अर्थ -अन्वय -संदर्भ समजणें; attend upon closely, as a profession धंधा क., वृत्ति चालविणें [from, to, in, after]. -ER मागून जाणारा येणारा, अनुगामी; disciple शिष्य; dependant चाकर, सेवक; ताबेदार; अनुयायी, अनुसारी. -ING *a.* पुढचा, पुढील.

FOLLY, See under FOOL.

FOMENT *v.* (*fovere*, to warm) apply warm lotions to शेक देणें, शेकणें; abet वाईट कामांत मदत क., फूस देणें. -ATION शेकणी *f*, शेक; फुसलावणी *f*, शिकवणी *f*, उठावणी *f*.

FOND *a.* *Icel.* relishing highly -चा आवडता, शौकी, लंपट; much pleased संतुष्ट, खुश; tender ममताळू, स्नेहाळू [of]. -NESS प्रीति *f*, ममता *f*, लळा; आवड *f*, चाड *f*.—FONDLE *v.* गोंजारणें, कुरवाळणें, लाड क.—FONDLING फार लाडका.

FONT (*fons*, fountain) झरा; बाप्तिस्म्याचें पाणी ठेवण्याचें पात्र *n*; [a complete assortment of printing types of one size].

FONTANEL *F.* vacancy in the infant cranium ताळू *f*; issue for the discharge of humors from the body पोत *f*.

FOOD* अन्न *n*, भक्ष्य *n*, खाणें *n*; undressed f. शिधा; heavy f. जडान्न; —of granivorous animals चारा; coarse or bad food कदन्न *n*; the usual quantity of f. आहार; f. and raiment पोटभर अन्न अंगभर वस्त्र [for].

FOOL *F.* an idiot वेडा, वेडगळ; a dunce मूर्ख, टोणपा, मंदबुद्धि; *Scrip.* wicked person दुष्ट मनुष्य; a professional jester मस्करा, हंडीबाग; *fool's* errand हिसका; to go on a f.'s errand पायांची वळ भागविणें; to put on the f. वेडा ठरविणें, वेड्यांत काढणें; a learned f. पढतमूर्ख; to make a f. of झकवणें, भोंदणें, धाब्यावर बसवणें; to make a f. of one's self नकशा गमावणें, झकमारणें; to play the f. वेडेचार क. -ISH *a.* मूर्ख, वेडा, खुळा; मूर्खपणाचा, बेवकुबीचा (act); दुष्ट; ridiculous थट्टा करायाजोगा, उपहासास्पद. -HARDY *a.* उफराट्या काळजाचा. — FOOLSCAP [so called from the water-mark of a *fool's cap and bells* used by old paper-makers] एक जातीचा कागद आहे, 'फुलीसकेप.'

FOOT (*Gr. pous, Skr. padas*) the extremity below the ankle पाय, चरण, पाद;—of a table पाय, खूर; foundation पाया, तळ, बुडखा; a measure of 12 inches 'फूट' *f*; foot-soldier पायदळ *n*, प्यादा;—of a verse चरण; on f. पायीं; cubic f. घन फूट; to set on f. चालू क., उभारणें. -BALL पायानें उडवून खेळायाचा चेंडू. -BOY खिदमतगार, पोऱ्या, पोरगा. -FALL पायरव, चरणपात. -ING, ground for the foot पाय टेकणें *n*, पावठा; firm foundation to stand on थारा, आधार; permanent settlement व्यवस्था *f*, बंदोबस्त; firm position पगडा, पायशीरकाव; condition स्थिति *f*; tread to measure पाऊल *n*, कदम *n*; act of putting a foot to any thing पाय लावणें -जोडणें *n*; act of adding up a column of figures बेरीज क. *n*; to get f. पगडा पडणें,

घालणें, जडणें. -MAN प्यादा; खिदमतगार, चाकर. -MARK पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -NOTE पृष्ठाच्या तळाचें टिपण *n*. -PAD वाटमाऱ्या. -PATH पाऊलवाट, पायवाट *f*. -PRINT पाऊल *n*, पदचिन्ह *n*. -STALK देट, डेंख. -STEP पाऊल *n*; token खूण *f*, चिन्ह *n*. -STOOL पीठ *n*, पादासन *n*.

FOP *Ger.* अकडबाज, कुरेंबाज. -PERY अकडबाजी *f*, छानछुकी *f*.

FOR *prep.* (*pro, Skr. pra*) in the place of जागीं, स्थानीं, बदल; concerning विषयीं; because of मुळें, साठीं, करितां, स्तव; toward कडे: a ship is bound f. China; for the sake of करितां, स्तव, प्रीत्यर्थ: is the world made f. me? in spite of; generally followed by all, aught, anything, &c. हटकून, न ऐकतां: he will do what she pleases *for* all me; notwithstanding असें असतांही, जरी: f. any thing that legally appears to the contrary; during a certain time पर्यंत, आंत, मध्यें, भर: f. a day; f. life ताहयात, जन्मभर, आमरण; in favor of पक्षाचा, वांटचा: he is f. a free government; noting meeting: I am ready f. you मी तुह्यास भेटायास तयार आहें; as if जसा, सारखा: he showed himself f. dead; he looks f. me तो माझी वाट पाहतो; f. my part मला जर विचारल; f. as much ज्यापेक्षां, ज्या अर्थी; f.-ever निरंतर, सर्वकाल; O f. जर असतें तर किती बरें होतें; मिळो; O f. a muse of fire!—*conj.* साठीं, करितां, म्हणून; ज्या अर्थी -पेक्षां.

FORAGE *F.* घांसदाणा, वैरण *f* [for]. — *v.* घांसदाण्यासाठीं फिरणें; घांसदाण्यासाठीं देश लुटीत फिरणें, कही घेणें -क., लुटून खाणें.

FORBEAR* *v. i.* refrain from proceeding थांबणें, राहणें; refuse न मानणें, न ऐकणें.—*t.* give up सोडणें, टाकणें: to f. the use of a word; bear with सोसणें, वागविणें, संभाळून घेणें. -ANCE थांबणें *n*, राहणें *n*; long-suffering सहनशीलता *f*, क्षमा *f*; exercise of patience धीर धरणें *n*, धीर, दम, गम.

FORBID* *v.* prohibit मनाई -बंदी क.; command not to enter आंत जाण्याची -येण्याची मनाई -प्रतिबंध क.: I have *forbidden* him my house; oppose आडवा येणें, अडळा -प्रतिबंध क.; God f. ईश्वर न करो. -DEN मना केलेला, निषिद्ध. -DING *a.* त्रासजनक, कंटाळवाणा, अनिष्ट.

FORCE (*fortis*, strong) बळ *n*, जोर *n*, *f*; an unusual degree of strength or energy तेज *n*, वीर्य *n*, शक्ति *f*; violence बळजोरी *f*, जुलूम; special signification विशेष अर्थ; validity बळकटी *f*, जीव, वजन *n*: f. of an argument; *pl* troops फौज *f*, सैन्य *n*; *Law*, strength or power exercised without law, or contrary to law, upon persons or things जुलूम, जबरी *f*, बलात्कार; *Physics*, any action between two bodies which changes, or tends to change, their relative condition as to rest or action वेग, शक्ति *f*: the f. of gravity;—of habit कर्मवेग; moral f. बुद्धिबळ *n*;—of a disease, of winds, &c. झपाटा, वेग, बळ *n*, रग *f*;—in f. चालू, उपयोगी.—*v.* जुलमानें -जबरीनें करायास लावणें, जबरी क.: masters f. their slaves to labor; ravish बलात्कार क., दपटणें, हटसंभोग क.; capture by assault हल्ला करून घेणें; drive, wrest, get, &c. by violence दामटणें, दपटणें, ढकलणें [along, away, from, into, through, out, &c.]; strain ओढून ताणून आणणें -काढणें -क. (conceit);—a passage दपटून शिरणें -रिघणें, घुसणें.—FORCIBLE *a.* बळकट, जोराचा, प्रबल; जुलमाचा, जबरीचा; जबरीनें मिळविलेला.—FORCIBLY *ad.* जोरानें, बळानें; जुलमानें.—FORCING, *Gardening*, अवकाळीं -कृतीनें फळफळावळ उत्पन्न क. *n*.

FORCEPS (*L.*) चिमटा ;—of the goldsmith सवाणा.

FORD * a shallow part of a river उतार, पायउतार ; a stream ओहळ. -ABLE *a.* पायांनीं उतराया जोगता.

FORE * *a.* advanced in place पुढला, पुढील, समोरचा, अग्र ; advanced in time अगोदरचा, पूर्वीचा, पूर्व ; advanced in order पहिला, प्रथम, पूर्व : f. part of a writing.—*ad.* पूर्वभागीं. -ARM कोपर आणि मणगट यांच्या मधला हाताचा भाग, हात. -BODE *v.* पूर्वी सांगणें, भविष्य सांगणें ; be prescient of, as of a calamity which is to happen येणार संकटा विषयीं प्रबोधित होणें, अरिष्टाची अगा असणें. -CAST *v.* plan before execution अगोदर बेत करून ठेवणें ; foresee अगोदर पाहणें, तजवीज क.—*n.* पूर्वीचा बेत, पूर्वयोजना *f* ; तजवीज *f*, दीर्घदृष्टि *f*. -CASTLE गलबताचा समोरचा भाग. -FATHER पूर्वज, वडील. -FINGER हाताच्या अंगठ्या जवळचें बोट *n*, तर्जनी *f*. -FOOT जनावरचा पुढला पाय. -GO *v.* quit सोडणें ; relinquish the enjoyment or advantage of -चा उपभोग -लाभ सोडणें ; go before पुढें जाणें. -HEAD कपाळ *n*, ललाट *n*. -LOCK टाळूवरचे केंस *pl* : to take time by the f., to make prompt use of any thing ; not to let slip an opportunity वेळ साधून घेणें. -MAN प्रमुख, पुढारी ; overseer कारभारी, चौकसनीस ;—of a jury सरपंच, जुरीचा पुढारी, मीर मजलीस *f*. -MAST पुढली डोलकाठी *f*. -MOST *a.* सर्वांपुढचा, अग्रवर्ती. -NAME, name that precedes the family name or surname आड नांवाच्या पूर्वीचें नांव *n*. -NAMED *a.* पूर्वोक्त, मशारनिल्हे. -NOON सकाळ *f*, दुपारचे पूर्वीची वेळ *f*, पूर्वान्ह *f*. -RUNNER पुढें धावणारा जासूद, अग्रदूत ; prognostic पूर्वचिन्ह *n*, लक्षण *n*. -SEE *v.* अगोदर पाहणें -समजणें ; भविष्य समजणें. -SHADOW पूर्वी प्रतिरूप दर्शविणें. -SIGHT दूरदृष्टि *f*, दीर्घदृष्टि *f*, दूरवरचा विचार. -SKIN अग्रत्वचा *f*, टोपी *f*, शफा *f*. -STALL, take in advance पूर्वी घेणें ; anticipate अगा-अवली साधणें ; preoccupy दुसऱ्याच्या अगोदर किंवा दुसऱ्यास वर्जून अगोदर उपभोग घेणें ; to f. the market बाजारांत येण्यापूर्वी खरीद क. (महाग विकण्यासाठीं माल). -TASTE पूर्वानुभव, पूर्वरूचि *f*. -TELL *v. i.* भाकीत क. -सांगणें, भाकणें.—*t.* -चें भाकीत सांगणें, होण्यापूर्वी सांगणें. -THOUGHT पूर्वविचार ; anticipation अटकळ *f*, अगा *f*. -TOOTH चौकटीचा दांत. -WARN *v.* पूर्वी सुचविणें, अगोदर ताकीद देणें -क.

FOREIGN (*foras*, abroad) not of one's country परदेशचा, परकीय ; remote दूरचा ; extraneous बाहेरचा, बहिर्भूत. -ER परदेशीं, परदेशाचा मनुष्य, परकी.

FOREST *F.* an extensive wood रान *n*, अरण्य *n* ; a royal hunting-ground राजक्रीडा वन *n*, राजाच्या शिकारीची जागा *f*. — *a.* वनाचा, वन्य, अरण्य ; f. law बनरक्षण करण्याचा कायदा. -ER वनरक्षक, बनकरी ; a sylvan वनवासी ; a forest-tree वनवृक्ष.

FOREVER *ad.* निरंतर, सर्वकाल, नित्य ; at all times सर्वदा, हमेश, रोज.

FORFEIT *v.* (*foris*, out of doors, *facere*, to do) अपराध करून गमावणें, दंड देणें, दंडास जाणें.—*n.* दंड, गुन्हेगारी *f*. -URE दंड -गुन्हेगारी देणें *n* ; an estate forfeited दंडांत गमाविलेली जिनगी *f* ; a fine दंड [for].

FORGE *F.* a smithy लोहाराची भट्टी *f* ; a workshop दुकान *n*, साळ *f*.—*v.* form by heating and hammering तावून व ठोकून घडणें, घडणें ; form घडणें, डौल -रूप देणें ; make falsely बनाऊ -खोटा क.—FORGED *a.* खोटा, बनावट.—FORGERY, the crime of fraudulently making or altering a writing, to the prejudice of another's right बनावट कागद करण्याचा अपराध ; the making of a thing in imitation of another thing

with a view to deceive and defraud बनावट नाणें वगैरे क. *n*.

FORGET* *v.* lose the remembrance of विसरणें, विसर पडणें: bless the Lord, O my soul, and f. not all His benefits (Ps. ciii. 2); neglect उपेक्षा -अव्हेर क., विसरणें; [to f. one's self, to be guilty of that which is unworthy of one; to commit an oversight]. -FUL *a.* विसराळू, विसऱ्या; careless गफलत्या, धांदल्या; causing to forget विसर पाडणारा, विस्मृतिकारक -जनक (wine) [of]. -NESS विसराळूपणा, विसर, विस्मृति *f*; गफलत *f*, धांदल *f*.

FORGIVE *v.* * give up resentment or claim to requital on account of, as an offence or wrong -ची माफी क., सूट देणें, अपराध क्षमा क.: f. old faults, cease to feel resentment against on account of wrong committed क्षमा क., माफ क., -ची क्षमा क.: I f. you. -NESS सूट *f*, माफी *f*; क्षमा *f*, क्षमाशीलता *f*.

FORK (*furca*) forkation नांगें *n*, दुबेळकें *n*, बेचकें *n*; table f. कांटा;—of a road फांटा; —of a river, the place where separation takes place फांटा;—the place where union takes place संगम; a point टोंक *n*, नोक *f*.—*v. i.* फांकणें, फांदीस येणें; दोन फांटे फुटणें.—*t.* नांगीनें उचलणें; dig and break with a fork, as ground बेळक्यानें जमीन खणून फोडणें, कुळवणें! -ED *a.* दुफाट्यांचा, बेळक्याचा, द्विशाख.

FORLORN* *a.* deserted सोडलेला, टाकलेला, त्यक्त; helpless निराश्रित, अनाथ.

FORM (*forma*) shape आकार, आकृति *f*; the outline of the person शरिराची मूस *f*, रूपरेषा *f*; particular disposition of matter बांधा, घडण *f*; external appearance डौल, आकार, रूप *n*; image प्रतिमा *f*; constitution नीति *f*, रीत *f*, प्रकार: a republican f. of government; formula पद्धत *f*, परिपाठ; conventional ceremony रीत *f*, संस्कार, उपचार, आदरसत्काराची रीत *f*; show without substance पोकळ डौल: f. of justice; beauty रूप *n*, सौंदर्य *n* (Is. liii. 2); mould सांचा, नमुना; bench बांक; rank of students in a school वर्ग; seat or bed of a hare सशाची बसायाची जागा *f*; *Print.* type from which an impression is to be taken, arranged and secured in a chase 'फर्मा'; as of an official paper दस्तूर;—of a verb or noun रूप *n*.—*v.* घडणें, रूप देणें, आकारणें, करणें (Gen. ii. 7); train शिकविणें, वळण लावणें; education *forms* the mind; go to make up करणें, असणें, अंशभूत असणें: they *formed* the majority;—as an estimate आकारणें, अजमासणें [out of, into, from]; रूप घेणें;— as the hand in writing, &c. वळणें. -AL *a.* आकृतीचा, रूपाचा; essential स्वाभाविक, मूळचा; done in due form यथापद्धत -मार्ग; according to form रीतीचा, दस्तूरमाफक, यथाविधि; वरवरचा, बाहेरचा, कोरडा, वरपंकी (worship, duty). -IST *a.* कर्मनिष्ठ; बाह्योपचारी. -ALITY कायदेशीरपणा, यथामार्गता *f*; रीत *f*, चाल *f*; आदर, सत्कार; essence तत्त्व *n*, अवयवभूत पदार्थ. -ALLY *ad.* रीतीनें, यथापद्धत; आदरसत्कारानें; नीट, बराबर. -ER करणारा, कर्त्ता, घडणारा, रचणारा.—FORMULA पद्धति *f*, रीत *f*. -RY पद्धति -सूत्रग्रंथ; prescription रोग्यास देण्याच्या औषधाची याद *f*.

FORMER* *a.* preceding in order of time पहिला, प्रथम, पूर्व; long past प्राचीन, जुना, पूर्वीचा, गत (ages); first mentioned पूर्वोक्त, मागला. -LY *ad.* मागें, पूर्वी, जुन्या काळीं; पहिल्यानें, अगोदर.

FORMICATION (*formica*, ant) *Med.* a sensetion of the body resembling that made by the creeping of ants on the skin मुंग्या *pl*, हुळहूळ *f*.

FORMIDABLE *a.* (*formidare,* to fear) भयंकर, भयउत्पादक -जनक [to].

FORNICATE *v.* (*fornix,* a brothel) शिंदळकी क. —FORNICATION, the incontinence of an unmarried person, male or female अविवाहित स्त्रीचें किंवा पुरुषाचें जारकर्म *n*; criminal conversation of a married man with an unmarried woman अविवाहित स्त्रीशीं विवाहित पुरुषाचा सदोषसंग; lewdness शिंदळकी *f*, जारकर्म *n*; *Scrip.* adultery व्यभिचार; incest अगम्यगमन *n*; idolatry मूर्त्तीपूजा *f*.—FORNICATOR अनूढागामी; शिंदळ, रांडबाज.—FORNICATRESS, -TRIX अनूढव्यभिचारिणी *f*; शिंदळ बायको *f*.

FORSAKE* *v.* सोडणें, टाकणें, त्यागणें, वर्जणें.

FORSOOTH* *ad.* तर खरा, तर होय, खचीत.

FORSWEAR* *v.* reject upon oath शपथ घेऊन -वाहून सोडणें; deny upon oath शपथ वाहून नाकारणें;—one's self खोटी शपथ क. -खाणें -घेणें.—*i.* खोटी शपथ घेणें.

FORT (*fortis,* strong) किल्ला, कोट, दुर्ग; town belonging to a f. पेठ *f*; wall of a f. कोट. -RESS कोट, गढी *f*.—FORTIFY *v.* तटबंदी -कोटबंदी क.; add strength to बळकट क., जोर आणणें; confirm स्थिर -दृढ क. [with, by, against]. —FORTIFICATION तट -कोटबंदी *f*; the art of fortifying दुर्ग प्राकारादि रचनाविद्या *f*; a fortified place कोट.

FORTITUDE (do.) that strength or firmness of mind which enables a person to encounter danger with coolness and courage, or to bear pain or adversity without murmuring, depression, or despondency मनस्थैर्य *n*, धैर्य *n*, धीर, छाती *f*.

FORTH* *ad.* forward पुढें; out बाहेर; abroad बाहेर; so f. इत्यादि, वगैरे [from]. -COMING *a.* तयार, सिद्ध, हाजीर. -WITH *ad.* लागलाच, तक्षणीं, तव्हांच.

FORTNIGHT (contracted from *fourteen nights*) पंधरवडा, पक्ष.

FORTUITOUS *a.* (*fors,* chance) दैववटित, आगंतुक.—FORTUITY दैवयोग.—FORTUNE, personified or deified power regarded as determining human success, sharing happiness and unhappiness, and distributing arbitrarily or fortuitously the lots of life दैव *n*, नशीब *n*; that which falls to one as his lot in life दैवप्राप्त वस्तु *f*; estate मत्ता *f*, वित्तविषय; great wealth संपत्ति *f*, दौलत *f*, गजांतलक्ष्मी *f*; appointed lot in life दैवाचा वांटा, लाभालाभ, भोग; good f; सुदैव *n*; bad f. दुर्दैव *n*. -BOOK शकुनवंती *f*, -HUNTER धनवान स्त्रीशीं लग्न करून सधन होऊं इच्छिणारा. -TELLER दैव सांगणारा, डाकोता जोशी, दैवज्ञ, पिंगळा.—FORTUNATE *a.* भाग्याचा, दैववान्; coming by good luck दैवानें प्राप्त झालेला, सुभाग्याचा; auspicious शुभ, मंगलदायक. -LY *ad.* दैवानें, दैवयोगानें.

FORTY* *a.* चाळीस.—*n.* चाळीसाचा अंक; चाळिसाची संख्या *f*; an aggregate of f. चाळिसी *f*.—FORTIETH *a.* चाळिसावा.

FORUM (*L.*) न्यायाधिशाची कचेरी *f*, कोडत *n*; [a market-place in Rome, where causes were judicially tried, and orations delivered to the people].

FORWARD -S* *ad.* पुढें. —FORWARD *a.* पुढचा; less reserved or modest than is proper उद्दाम, निर्भीड, धीट; ardent उत्कंठित, उत्सुक; advanced beyond the usual degree पुढें गेलेला, सारलेला; too hasty उतावळा, अधीर. —*v.* send onward पुढें पाठविणें, पेंड पोंचवणें; advance वाढविणें, वृद्धि क., योग्यतेस चढविणें [from, to]. -NESS उत्कंठा *f*, उत्सुकता *f*; निर्भिडपणा, धिटाई *f*; prematureness काळाच्या पूर्वीची पक्वता *f*.

FOSSE (*F.*) खंदक.

Fossil *a.* (*fodere*, to dig) जमिनींतून खणून काढलेला; जमिनींतून काढलेल्या पदार्था सारखा; changed into stone दगड झालेला (shells). —*n.* जमिनींतून खणून काढलेला पदार्थ, उत्खात द्रव्य *n.*

Foster* *v.* nourish पोसणें, पाळणें; cherish बाळगणें, वागवणें (passion). -brother, a male nursed at the same breast, or fed by the same nurse, but not the offspring of the same parents दूधभाऊ. -child पोसणा मुलगा -मुलगी *f.* -er पोसणारा, पोशिंदा, पालक. -father पालक बाप, धाता. -mother पालक आई *f*, धात्री *f*; nurse दाई *f.* -son पालक पुत्र, पालक बेटा.

Foul* *a.* (*Skr. puj*, to be putrid) filthy मळका, मळीण (cloth); obscene बिभत्स, अभद्र, अवाच्य (words); cloudy वाऱ्यावादळाचा, अभ्रें आलेला, ओंधट (weather); loathsome ओंगळ, घाणेरडा (disease); not favorable अप्रतिकूल, उलटा (wind); dishonest अप्रामाणिक, कपटी, कुटिल (play); entangled गुरफाटलेला, गुतागुत झालेला: a rope is f.; a f. copy खरडा, मसुदा; to fall f. भांडणें, हमरीतुमरीवर येणें; to run or fall f. of एकमेकावरं घसरणें -पडणें.—*v.* मळवणें, मळकट क.; गुतविणें, गुतागुत क.—*i.* गुंतणें, गुरफाटयांत पडणें; आदळणें, आपटणें, घांसणें: the two boats *fouled*. -mouthed *a.* तोंडाचा फटकळ, तोंडाळ, तोंडास कुत्रें बांधलेला.

Found *v.* (*fundare*) lay the basis of पाया घालणें; establish स्थापणें; fix firmly घट्ट बसविणें, कायम क.; take the first step in erecting or building up पाया घालणें, बांधणें, उठवणें; establish on a basis पायावर स्थापणें, प्रतिष्ठा क. [on]. -ation स्थापना *f*, स्थापन *n*; पाया; footing आधार, थारा, आश्रा; endowment धर्मादाय, सदोदित धर्मादाय चालण्यासाठीं जमविलेलें द्रव्य *n.* -er स्थापणारा, संस्थापक;—of a family मूळपुरुष.

Found *v.* (do.) धातूचा रस करून सांच्यांत ओतणें, ओतणें. -er ओतारी. -ry धातु ओतण्याची कला *f* -क्रिया *f*; धातूचा रस ओतण्याचा कारखाना.

Founder *v. i.* (do.) पाणी भरून बुडणें, पाण्यांत गर्क होणें; stumble and go lame, as a horse अडखळून पडून लंगडा होणें -लंगडत जाणें -चालणें. — *t.* (घोड्याचा) पाय सुजवून अधू क. -लंगडा क.

Fount, -ain (*fons*) a spring झरा; a jet कारंजें *n*, फवारा; first cause मूल *n*, आदिकारण *n*, खाण *f*, उगम, झरा.

Four* *a.* चार. -fold *a.* चौपट, चतुर्गुण. -footed *a.* चार पायांचा, चतुष्पाद. -score चारविसा, ऐंशी. -square *a.* चौकोनी. -teen *a.* चौदा. -teenth *a.* चौदावा—Fourth *a.* चौथा, चतुर्थ. -ly *ad.* चौथ्या वेळीं, चौथ्यानें, चौथेंदा.

Fowl* a bird पांखरुं *n*, पक्षी; a cock or hen कोंबडें *n.*—*v. i.* पांखरांची पारध क. -ing पांखरपारधी, फासेपारधी, व्याध. -ing-piece पांखरांच्या शिकारीची बंदूक *f*, शिकारी बंदूक *f*.

Fox* कोल्हा, खोकड; a cunning fellow धूर्त्त गडी -माणूस. -hound कोल्ह्याची पारध करणारा कुत्रा.

Fraction (*frangere*, to break) तुकडा, अंश; *Arith.* अपूर्णांक; compound f. प्रभागजाति अ०; vulgar f. व्यवहारी अ०; proper f. सम अ०; decimal f. दशांश अ०. -al *a.* अपूर्णांकाचा.—Fractious *a.* तुसडा, तुटसाळ (man).—Fracture फुटणें *n*, भंग; भेग *f*, फूट *f*, चीर *f*; *Surg.* breaking of a bone अस्थिभंग; [compound f., a f. in which there is an open wound from the surface down to the f.; simple f., a f. in

which only the bone is divided].—FRAGILE *a.* फुटीर, नाजूक, भंगशील. — FRAGILITY फुटीरपणा, भंगुरता *f.*—FRAGMENT तुकडा, खंड, चूर ; an imperfect part अपूर्ण अंश, भाग.

FRAGRANT *a.* (*fragrare,* to emit a smell) सुवासाचा, सुवासिक.—FRAGRANCE सुवास, सुगंध.

FRAIL *a.* (*frangere,* to break) easily broken फुटीर, तुटीर, फुसका ; weak अशक्त, नबला ; weak in resolution अस्थिर, चंचलबुद्धि. —FRAILTY फुटीरपणा ; अस्थिरबुद्धि *f* ; अशक्तता *f,* दौर्बल्य *n* ; a f. चूक *f,* चुकून घडलेली गोष्ट *f.*

FRAME* *v.* construct रचणें, करणें, बांधणें (a house); plan बेत क., योजना क. ; fabricate थोतांड रचणें, रचणें ; adjust जम -जवा बसविणें ; regulate बेतानें चालवणें, वर्त्तवणें ; provide with a frame चौकट बसविणें -घालणें.—*n.* बांधणी *f,* रचना *f,* घटना *f* ; —as of a picture, window, door, &c. चौकट *f,* घर *n,* सांचा ;—of a building मांडणी *f* ;—of a drum, &c. गाडा, खोड *n* ; the bodily structure शरिराची काठी *f* ; skeleton सांपळा, सांगाडा, खटारा ; scheme बेत, रचना *f,* बंधारण *n* ; particular state, as of the mind तबियत *f,* प्रकृति *f.* -WORK चौकट *f,* सांचा.

FRANCHISE *F.* particular privilege conferred by grant from a sovereign or a government सरकारानें दिलेला हक्क ; an immunity from ordinary jurisdiction सूट *f,* माफी *f* ; limits of an immunity माफीची हद्द *f* ; an asylum आश्रय, आसरा. —*v.* मोकळा क., सूट देणें.

FRANGIBLE *a.* (*frangere,* to break) तुटीर; फुटीर, भंगशील.

FRANK *a. F.* मोकळ्या मनाचा, प्रांजल, साफ ; licentious बेकैद, स्वच्छंदी.—*v.* send by public conveyance free of expense सरकारी जहाज -गाडी वगैरेंतून फुकट पाठविणें: to f. a person to London ; exempt from charge for postage, as a letter पत्राच्या हाशिलाची माफी क. -LY *ad.* निष्कपटानें, मन मोकळें करून. -INCENSE ऊद, धूप.

FRANTIC *a.* (*Gr. phren,* mind) mad वेडा, कावराबावरा, तग्रवग्र ; wild वेडावांकडा, भलताच, स्वच्छंदाचा (abuse).

FRATERNAL *a.* (*frater,* brother) भावांचा, बधूचा, बंधु, in comp.: f. love बंधुप्रीति *f.*— FRATERNITY भाऊपणा ; a community of men of the same class एका वर्गाचे लोक *pl,* मंडळी *f,* शाई *f.*—FRATERNIZE *v.* बंधुप्रीतीनें -भाऊपणानें एकत्र जमणें -मिळणें.—FRATRICIDE बंधुहत्या *f.*

FRAUD (*fraus*) deception deliberately practised with a view to gaining an unlawful or unfair advantage कपट *n,* ठकबाजी *f,* दगलबाजी *f* ; fraudulent procedure दगलबाजीचा व्यापार, कपटी वर्त्तणूक *f.* -ULENCE ठकबाजी *f,* कापट्य *n.* -ULENT *a.* कपटी, दगेखोर ; कपटाचा, दगाबाजीचा (bargain) ; कपटानें मिळविलेला (conquest).

FRAUGHT *a. Ger.* भरलेला, पूर्ण, भरपूर.

FRAY (See AFFRAY) भांडण *n,* कलागत *f,* कलह. —*v.* (*fricare,* to rub) घांसणें, घर्षणें ; wear off by rubbing घांसून झिजविणें -जीर्ण क.

FREAK * लहर *f,* हुक्की *f,* तरंग. -FUL, -ISH *a.* लहरी, छंदी, तबियती.

FREE* *a.* (*Skr. prija,* beloved) exempt from subjection to the will of others स्वाधीन, स्वतंत्र, स्वेच्छ ; not under an arbitrary or despotic government मोकळा, सुटा, व्यवहार -धर्मसंबंधी गोष्टींत राजापासून मोकळीक भोगणारा ; liberated, by arriving at a certain age, from the control of parents, guardian, or master मोकळा, स्वतंत्र, वयांत आलेला, दास्यत्वांतून सुटलेला,

इ० ; not confined, liberated सुटा, मुक्त, मोकळा, खुला ; endowed with moral liberty ;—said of the will स्वतंत्र, स्वेच्छाधीन ; guiltless निर्दोष, दोषरहित, मुक्त : my heart is f. ; frank, familiar मनाचा मोकळा, खळबळीत : he was f. only with a few ; licentious स्वच्छंदी, बेकैद, मोकळा ; liberal मोकळ्या हाताचा, सढळ, उदार ; separated अलग, मोकळा, विभक्त, सुटा ; exempt मोकळा, रहित [from, of] ; easy सुलभ, हलका ; thrown wholly open or made entirely accessible सर्वांस मोकळा, सर्वांनीं वापरायाचा, मुक्त : the streets are f. for me ; gratuitous फुकट, बिन पैशाचा (admission) ; not arbitrary or despotic कायदा प्रमाणें चालणारा, निर्बंधाचा (government, institution) ; defending individual rights against encroachment by any person, or class मनुष्याच्या हक्काचें रक्षण करणारा (government);—as land माफी ;—as letters बेमहसूल.—*v.* मोकळा क., बंदखुलास क.; सोडणें, माफी क.; प्रतिबंधांतून -अटकावांतून काढणें [from, of]. -BOOTER लुटारू, पुंड. -BORN जन्मापासून स्वतंत्र. -DOM मोकळेपणा, स्वातंत्र्य *n*; franchise मुभा *f*, सूट *f*, माफी *f*; मनाचा मोकळेपणा, प्राशस्त्य *n*; खळबळीत -घळघळीतपणा; हातवटी *f*, कसरत *f*; बेकैदपणा, अमर्यादपणा, निरंकुशता *f*. -HOLD वतन *n*, मिरास *f*. -LY *ad.* मोकळेपणानें ; सढळपणानें ; खळबळीतपणानें ; पुष्कळ, अतिशय ; फुकट, मोलावांचून (Matth. x. 8) ; खुशाल, स्वस्थ, बेलाशक. -MAN जो दुसऱ्याचा दास किंवा ताबेदार नव्हे तो, स्वतंत्र मनुष्य ; one who enjoys or is entitled to a franchise or peculiar privilege विशेष हक्क भोगणारा मनुष्य. -MASON एक गुप्त मंडळी आहे तिचा सभासद *n*. -MASONRY त्या मंडळीचे नियम, मतें इ०. -THINKER ईश्वरोक्त शास्त्र न मानणारा, नास्तिक, चार्वाक. -WILL, a will free from improper coercion राजी *f*, खुशी *f*, स्वतंत्र इच्छा *f*, स्वसंतोष ; the power asserted of moral beings of choosing or willing without the restraint of natural or physical necessity स्वेच्छाकर्तृत्व *n*, मुखत्यारी *f*; doctrine of f. पौरुषवाद.—*a.* आपखुशीचा, स्वसंतोषाचा.— FREEDMAN दास्यत्वांतून मुक्त केलेला मनुष्य.

FREEZE* *v. i.* become congealed by cold गोठणें, गारठणें, थिजणें ; become chilled with cold थंडीनें गारवठणें, थंड होणें.—*t.* गोठविणें ; थंडी भरविणें, सर्द क.

FREIGHT (See FRAUGHT) cargo भरताड *n*, बारदान *n*; that which is paid for the transportation of merchandise नोर, भाडें *n*. — *v.* गलबतावर किंवा गाडींत माल भरणें ; load लादणें, भरती क. [with].

FRENCH *a.* (*Franci*) फ्रान्स देशाचा, फ्रेंच लोकांचा.—*n.* फ्रेंचभाषा *f*; फ्रेंचलोक *pl*, फराशीस *pl*.

FRENZY (See FRANTIC) वेड *n*, उन्माद, कावरेबावरेपणा.

FREQUENT *a.* (*frequens*) often to be met with वारंवार भेटणारा -मिळणारा, वारंवारचा, नित्य ; inclined to indulge in any practice सराव -अभ्यास ठेवणारा, नित्य आचरणारा. *v.* वारंवार जाणें -येणें, जाण्याचा राबता असणें. -LY *ad.* वारंवार, पुनःपुनः.—FREQUENCY पौनःपुन्य *n*.

FRESH* *a.* new and strong ताजा, ताजातवाणा ; lately produced, gathered, or prepared for market नवा, कोरा, ताजा (goods);—as meats, vegetables ताजा, साजूक ; lately come or made public नवा, आलीकडचा, नवसर (news) ; recently taken from a well or spring ताजा, थंड (water) ; unpractised नवा, नवशिका, राबलेला नाहीं असा : a f. hand in a ship ; cool थंड, शितळ (wind) ; not salt गोडा (water) ; in distinction from that which is pickled,

as meat ताजा, न खारलेला; as plants टवटवीत, लुसलुसीत; brisk ताजा, हुशार.—*n.* a pool of fresh water गोडे पाण्याचा झरा -चें कुंड *n*; a flood पूर, लोंढा, रेल; [the mingling of fresh water with salt water in rivers or bays, as by means of a flood of fresh water flowing toward or into the sea]. -EN *v.* ताजा -गोडा क., खारटपणा काढणें (water). — *i.* गोडा होणें, खारटपणा गमावणें -जाणें. -MAN नवशीक, नवा; [a student during his first year's residence at a college]. -NESS ताजेपणा, साजूकपणा; गोडी *f*; टवटवी *f*, तुकतुकी *f*, पाणी *n*; हुशारी *f*, तेजी *f*;—of the air गुलाबी थंडी *f*.

FRET* *v.* rub चोळवटणें, घांसणें, चोळणें, (cloth); wear away झिजविणें, जीर्ण क.; variegate चित्रविचित्र क., नवा रंग देणें: gray lines that f. the clouds; ornament with raised work कशिदा -वेलबुट्टी काढणें; disturb ढवळणें, क्षुब्ध क.; हलवणें, चाळवणें: to f. the surface of water; tease चिढवणें, खिजवणें;—one's self कुसमुसणें [at, for]. —*i.* झिजणें, घांसटणें; क्षोभणें, ढवळणें; fume धुसमुसणें, चिवचिवणें; as the skin through a blister तडतडणें.—*n.* खळखळ *f*; चिरड *f*, खिजवणी *f*; कुसमूस *f*, कुरकूर *f*; कशिद्याचें -वेलबुट्टीचें काम *n*. -FUL *a.* चिरडखोर, पिरपिऱ्या.

FRIABLE *a.* (*friare*, to break) पिठूळ, पिठा, भुसभुसीत.—FRIABILITY पिठुळपणा, पिठेपणा.

FRIAR (*frater*, brother) सन्यासी, जोगी, गोसावी (रोमन क्याथोलिक पंथाचा.)

FRICTION (*fricare*, to rub) घांसणें *n*, घर्षण, *n*; *Med.* मर्दन *n*.

FRIDAY* शुक्रवार.

FRIEND* one who, entertaining for another sentiments of esteem, respect, and affection, from personal predilection, seeks his society and welfare मित्र, सखा, स्नेही; one not inimical मित्र; favorer पुरस्कर्त्ता, अनुकूल; [one of the religious sect usually called *Quakers* by those not of the sect]; a term of salutation गडी, मित्र. -LINESS मित्रत्व *n*, स्नेहभाव, -LY *a.* मैत्रीचा, स्नेहभावाचा; befitting a friend मित्रांस योग्य -गोड; not hostile मित्रत्वाचा, सख्यत्वाचा; अनुकूल, सुप्रसन्न [to]. -SHIP, attachment to a person, proceeding from intimate acquaintance and a reciprocation of kind offices, or from a favorable opinion of the amiable and respectable qualities of his mind मैत्री *f*, सख्यत्व *n*, स्नेहभाव; intimacy सलगी *f*, दाटमैत्री *f*; kindness उपकार, आभार; help सहाय [for].

FRIGATE *F.* लहान जातीचें लढाऊ गलबत *n*.

FRIGHT* *v.* भिवविणें, भेदरावणें [with].—*n.* वचक *f*, धास्ती *f*, धकधक *f*. -EN *v.* भिवविणें, भेडावणें. -FUL *a.* भ्यालेला, घाबरलेला, भयभरित, भयाभीत झालेला: see how the f. herds run from the wood; exciting alarm भयंकर, अकराळ विकराळ, घोर, भयोत्पादक (tempest).

FRIGID *a.* (*frigere*, to be cold) थंड, सर्द, शितळ; unfeeling शिथिल, निस्नेह. -ITY थंडी *f*; शिथिलता *f*, मंदी *f*, शैथिल्य *n*.—FRIGORIFIC *a.* (*-facere*, to make) शैत्यकारक, शितोत्पादक.

FRINGE *F.* झालर *f*, लकेरी *f*.

FRIPPERY *F.* old clothes जुनीं पुराणीं पांघुरणें *n pl*; place where old clothes are sold जुनीं पांघुरणें विकण्याची जागा *f*.

FRISK *v. i. Ger.* नाचणें, बागडणें;—as deer, horses, &c. ठिकणें, नाचणें;—dogs, kids, &c. बागडणें, नाचणें.—*n.* खिदडा, नाच; wild, boisterous f. थैथया, धिंगाणा.—FRISKY *a.* नाचरा, ठिकरा, मौज्या.

FRITH, FIRTH *Scot.* खाडी *f.*

FRITTER (*frigere,* to fry) मासाचा तळलेला तुकडा; fragment तुकडा, खंड *n.*—*v.* तळण्याकरितां (मासाचे) तुकडे कापणें -फोडी पाडणें.

FRIVOLOUS *a.* (*frivolus*) हलका, क्षुल्लक, पोकळ, छिचोर.—FRIVOLITY हलकट -पोकळपणा, छिचोरी *f.*

FRO* *ad.* पासून, हून; to and f. इकडे तिकडे, एथून तेथवर, तेथून एथवर.

FROCK *F.* an upper coat वरचा अंगरखा, डगला; a gown for children झबलें *n,* 'फ्राक.'

FROG* बेडूक, बेडकी *f;*—of a horse's foot पुतळी *f,* बेडकी *f.*

FROLIC *Ger.* खेळ, मौज *f,* कौतुक *n.*—*v.* खेळणें, मौजा मारणें, कौतुक क. [with]. -SOME *a.* खुशमौज्या, रंगेल, ख्याली.

FROM* *prep.* हून, पासून, कडून; f. house to h. घरोघर; f. above वरून; f. below खालून; f. behind मागून; f. far दुरून; f. fear भयानें; f. birth जन्मापासून, जन्मतः.

FRONT (*frons*) forehead कपाळ *n*; face तोंड *n;* a bold f. नाक *n,* तिखें *n*; fore part समोरचा भाग, तोंड *n,* पुरोभाग, अंग *n*;—of an army अगाडी *f,* बिनी *f*; in f. of समोर, मोहरे; f. to f. रुबरू; from in f. of समोरून, मोहरून; unblushing f. उघडामाथा. —*v.* समोर उभा राहणें, भेटणें; समोर -सम्मुख असणें: his house *fronts* the church; adorn in front समोर -दर्शनी -सुशोभित क.—*a.* समोरचा, दर्शनी. -AL *a.* कपाळाचा, ललाट संबंधी; समोरचा.—*n.* कपाळपट्टी *f*; *Med.* कपाळास लावायाचा लेप -चें औषध *n.* -IER सरहद्द *f,* सीमा *f,* लगता.—*a.* लगत्याचा, सरहद्दीवरचा. -ISPIECE दर्शनपट्टी *f,* इमारतीचें दर्शनी अंग *n*;—of a book ग्रंथाच्या आरंभीचें चित्र *n.* -LESS *a.* निलाजरा, बेशरम. -LET कपाळपट्टी *f*; रागाची क्रोधमुद्रा *f.*

FROST* act of freezing गोठणें *n*; severe cold गारठा, कडक हिंव *n*; frozen dew हिमतुषार.—FROSTY *a.* हिमउत्पादक; गारठ्याचा, हिंवाचा, हैम (night); पांढरा, शुभ्र, पिकलेला (head).

FROTH* foam फेंस, फेण; empty show फुशारकी *f,* फुशारी *f.*—*v.* फेंस आणणें; फेंसानें भरणें -भरिवणें: a horse *froths* his chain.—*i.* फेंस येणें, फेंसळणें, फेणणें; up दरदरणें.—FROTHY *a.* फेसाळलेला; पोकळ, शून्य, फोल (speaker); फुशारकीचा, फुशारीचा.

FROWARD* *a.* perverse करनकर, व्रात्य, वक्र (child); not willing to yield हट्टी, जिद्दखोर.

FROWN *v. F.* contract the brow in displeasure, severity, or sternness (रागानें) कपाळास अठी घालणें, भुवया चढवणें; manifest displeasure राग दाखविणें, रागें भरणें, खप्पा होणें [on, upon, at].—*v.* कपाळाची अठी *f,* खप्पा मर्जी *f,* राग.

FROWZY *a. Pro. Eng.* उबट, कुबट.

FROZEN *p. a.* गोठलेला, गारठलेला.

FRUCTIFY, See under FRUIT.

FRUGAL *a.* (*fruges,* grain) बेतानें खर्च -वापर करणारा, मितव्ययी, काटकसऱ्या. -ITY काटकसर *f,* मितव्यय.

FRUIT (*fructus,* product) whatever is produced for the enjoyment of man or animals by the process of vegetable growth फळ *n*; the juicy, pulpy product of certain plants फळ *n,* फळें *n pl,* मेवा; product फळ *n,* उपज; result फळ *n,* परिणाम; offspring संतान *n,* आपत्य *n.* -AGE फळफलावळ *f,* फळें *n pl,* मेवा. -ERER फळविक्या. -FUL *a.* सफळ, फळवान; सुबत्ता (season); rich मातबर, सुपीक, चिकण (soil); prolific बहुप्रसव, अवंध्य (wife) [of, in]. -LESS *a.* निष्फळ, व्यर्थ, निरर्थक. -TREE फळझाड *n.*—FRUITION भोग, उपभोग.—

FRUCTIFY *v.* फलप्रद क., पिकास आणणें, सुपीक क.—FRUCTIFICATION सफलीकरण *n.*

FRUSTRATE *v.* (*frustra,* in vain) मोडणें, निर्फळ -निरर्थक क. (a plan); nullify रद्द क., मोडणें (a deed) [by, in].

FRY *v. t.* & *i.* (*frigere*) तळणें; undergo the action of fire or extreme heat तळतळणें, पोळणें [in].—*n.* तळलेला पदार्थ, तळण *n.*—*F.* लहान मास्यांचा -चिंगळ्यांचा थवा. -ING-PAN कढई *f,* तळणी *f*; to fall out of the f. into the fire फुपाट्यांतून निघून आगींत पडणें.

FUDGE (?) गप्प *f,* कहाणी *f.*

FUEL (*focus,* hearth) सरपण *n,* जळण *n*; any thing that serves to feed or increase flame, heat, or excitement आगीवर तेल *n,* पेटवण *n*; to add f. to fire आगीवर तेल ओतणें *n.*

FUGITIVE *a.* (*fugere,* to flee) पळणारा, पळका; volatile उडून जाणारा, अस्थिर; tender and f. parts of vegetables; uncertain चंचल, क्षणिक, अशास्वत; flying or escaping, from duty, service, danger, &c. भटक्या, पळपट्या, हिंडफिऱ्या.—*n.* पळपट्या, फरारी; दुसऱ्याच्या राज्यांत आश्रयार्थ पळून जाणारा; शासन चुकविण्या करितां पळून जाणारा.

FUGH *interj.* इश्श, इश्शो.

FULCRUM (*L.*) टेंकू, तरफ *f.*

FULFIL * *v.* पूर्ण क., शेवटास नेणें;—as a prophecy, promise, &c. खरा -सत्य करून देणें, प्रत्ययास आणणें;—as a term भरणें, मुद्दत पुरी क. [by]. -ED पूर्ण; संपूर्ण, साधित; one whose wishes are f. पूर्णकाम, कृतार्थ. -MENT पूर्णता *f,* सिद्धि *f,* पूर्त्ति *f*; बोलल्या प्रमाणें पार क. *n,* उक्तनिर्वाह: the f. of a promise.

FULL * *a.* filled up भरलेला, पूर्ण; copious पुष्कळ, भरपूर, विपुल, चघळ, भक्कम (supply, meal); abounding in व्याप्त, मय, in comp.: चिंतामय *f*; f. of cares; entire सगळा, समग्र;—as ears of corn भरदार;—as voice भरपूर, उद्दाम; f. moon पूर्णचंद्र; f. stop पूर्ण -पूर्णविराम चिन्ह *n* [of].—*n.* भर *f,* भरती *f*; utmost extent सीमा *f,* पराकाष्ठा *f.*—*ad.* तंतोतंत, टांकोटांक; exactly बरोबर, थेट; completely पुरतेपणीं, तब्बल, ताठ. -BLOWN *a.* पुरा फुललेला, पूर्ण, विकसित; fully distended with wind तटतटीत -तट्ट फुगलेला. -GROWN *a.* पुरे वाढीचा, भरदार.—* *v.* कापडास कांजी पाजणें -देणें. -ER कापडास कांजी पाजणारा, परीट, रजक;—fullers' earth खारमाती *f.*

FULMINATE *v. i.* (*fulminare,* to lighten) thunder गडगडणें, गरजणें; thunder forth menaces गरजून -धमकीच्या वाटेनें सांगणें [at, against].

FULSOME * *a.* ओंगळ, किळसवाणा.

FUMBLE *v. i. D.* grope about चांचपणें, चांचपडणें; seek awkwardly अडाण्यावाणी क.; handle much हातानें चाळवणें -शीं खेळणें [about].

FUME (*fumus*) vapor वाफ *f,* बफारा; smoke धूर, धूम; vain imagination वृथाकल्पना *f.*—*v. i.* धुमसणें, धुमणें; be in a rage धुसफुसणें, मुसमुसणें, फुणफुणणें.—FUMIGATE *v.* धूर -धुरी -वाफारा देणें [with].—FUMIGATION वाफारा, धूर, धुकटी *f.*

FUMITORY (do.) पित्तपापडा.

FUN* sport मौज *f,* खेळ, कौतुक *n*; wanton amusement चेष्टा *f,* विनोद, मस्करीचा खेळ. -NY *a.* विनोदाचा, थट्टेचा, मौजेचा.

FUNCTION (*fungi,* to perform) office काम *n,* हुद्दा; duty कर्म *n,* व्यापार; natural or assigned action of any power or faculty of the soul, or of the intellect शक्ति *f,* कर्मशक्ति *f*; activity appropriate to any business or profession कामाची चपळाई *f,*

चलाखी *f.* -ARY कामदार, अमलदार, अधिकारी.

FUND (*fundus,* bottom) a deposit of resources from which supplies are drawn, out of which expenses are provided for, &c. पुंजी *f,* भांडवल *n,* 'फंड' *n*; a full provision of resources पुंजी *f,* भांडवल *n*: f. of good sense; stock of a national debt सरकारास कर्जी दिलेला पैका.—*v.* फंडांत पैसा भरणें; -चें व्याज उत्पन्न होई इतकें फंड जमविणें. -AMENT गुदप्रदेश, अधःप्रदेश, गांड *f.* -AL *a.* मूल -आधारभूत.—*n.* मूलभूत विषय.

FUNERAL (*funus*) ceremony of burying a dead human body प्रेतसंस्कार -क्रिया *f,* मूठमाति *f*; procession of persons attending the burial of the dead प्रेतयात्रा *f,* मसणबोळावा.—*a.* प्रेतयात्रेचा; प्रेतसंस्कार संबंधी; f. fire चिताग्नि, भडाग्नि *f*; rite प्रेतकर्म *n.*

FUNGUS (*L.*) a large natural order of plants, comprehending mushrooms, toadstools, &c. अळंबें *n,* कुतऱ्याचें मूत *n*; excrescence अंगावर वाढलेलें मांस *n,* अवाळू *n.*

FUNNEL (*infundere,* to pour in) an inverted cone with a pipe गळणी *f,* नरसाळें *n*; shaft of a chimney धुरांडें *n.*

FUR (*furra*) skin with soft hair लोंकरीची कांतडी *f*; soft hair लोंकर *f,* लव *f*;—as upon the tongue बुरा, बुरसी *f.*

FURBISH *v. F.* उजळणें, ओप -झिलई देणें [up]. -ER उजळणारा, सिकलगार.

FURIOUS, See under FURY.

FURL *v. F.* गुंडाळणें, सुरळी क. [up].

FURLONG* मैलाचा आठवा भाग.

FURLOUGH *D. Mil.* रजा *f,* लष्करी रजा *f.*

FURNACE (*fornax*) धातु वगैरेचा रस करण्याची भट्टी *f.*

FURNISH *v. F.* provide पुरवणें; afford देणें; equip सज्ज क.;—as the mind संपन्न -विशिष्ट क.;—a house तयार क., सामान लावून सजविणें -भरणें, संजोगणें [with].—FURNITURE सामन *n,* साहित्य *n.*

FURROW* a trench in the earth made by a plough तास *n,* हरळ; a groove खांचणी *f,* कोरणी *f.*—*v.* तास पाडणें, पाळ्या घालणें [with].

FURTHER* *a.* more remote अधिक दूर, दूरतर, दूरचा; additional अणखी, शिवाय, जास्ती;—*ad.* अधिक लांब; अणखी, खेरीज.—*v.* advance मोठा क., वाढविणें; help सहाय क. [by]. -ANCE वृद्धि *f,* संवर्द्धन *n*; बढती *f,* सरफराजी *f.* -MORE *ad.* or *conj.* अणखी, शिवाय. -MOST *a.* सर्वांच्या पलिकडचा.

FURTIVE *a.* (*fur,* thief) चोरीचा, चोरलेला, चोरीनें मिळवलेला.

FURY (*furere,* to rage) तैष, त्वेष, जाळ; violent passion उन्माद, आवेश, महावेग; a stormy, turbulent, violent woman चंडिका *f,* हडळ *f.*—FURIOUS *a.* आवेशी, साहसी; जबरा, अनर्थाचा, झपाट्याचा (wind); दारुण, तुमल (fighting); उन्मत्त, मदोन्मत्त (animal) [against, at, with].

FUSE *v.* (*fundere,* to pour) वितळणें, रस क.,—*i.* रस होणें, वितळणें [with].—FUSIBLE *a.* वितळायाजोगा, द्राव्य, गलनीय. —FUSIBILITY द्राव्यत्व *n,* रस होण्याचा गुण -धर्म.—FUSION आटणें *n,* द्रावण *n*; रस, द्रव; एकीकरण *n* -भवन *n.*

FUSEE *F.* (*fusus,* spindle)—of a watch or clock घड्याळांत सांखळी गुंडाळायाचा एक खिळा असतो तो.

FUSIL लहान बंदूक *f.* -EER लहान बंदूकवाला शिपाई, 'फुजलीर.'

FUST (*fustis,* stick) shaft of a column स्तंभदंड.—*F.* उबट वास, दुर्गंध.

FUTILE *a.* (*futilis,* that easily pours out) trifling हलका, क्षुल्लक, पोकळ; f. in effect निरर्थक, निष्फल.—FUTILITY हलकेपणा, &c.

FUTURE *a.* (*futurus*) पुढला, पुढील, होणारा. —*n.* पुढला -येणार काळ; events that are to happen in time to come होणार गोष्टी *f pl*, होतव्य *n*, भवितव्य *n*.—FUTURITY पुढील काळ, भविष्यकाल; होणार गोष्ट *f*.

FY *F. int.* छी, धिक्, छीछी.

G.

GAB *D.* mouth तोंड *n*; prate बडबड *f*. -BLE *v.i.* बरळणें, बडबड क.—*n.* बडबड *f*, बरळणें *n* (over, about).

GABLE *Ger.* चांदई *f*.

GAD* *v. i.* भटकणें, हिंडणें [about]. -ABOUT पंचाळ. -FLY गोमाशी *f*.

GÆRTNERA RACEMOSA (*L.*) कस्तुरीमोगरा, मधुमाधवी *f*, वासंती *f*.

GAG* *v.* stop the mouth of, by thrusting in some thing तोडांत बोळाघालणें, तोंड कोंडणें; silence by authority or by violence अधिकारानें किंवा जबरीनें तोंड बंद क. -बोलण्याची बंदी क.; hold open by means of a gag बोळा घालून उघडा ठेवणें; keck उमाळा आणणें [with].—*n.* तोंड कोंडण्याचा बोळा; उमाळा आणणारा घांस.

GAGE *v. F.* पैजेचा विडा -ची खूण *f*; परिमाणमापक यंत्र *n*, परिमाण *n*.

GAIETY, See under GAY.

GAIN *v. F.* get, as profit मिळवणें, मिळकत -कमाई क., नफा मिळवणें; come off victor in मिळवणें, जय मिळवणें, जिंकणें; win to one's side पक्षास मिळवणें; reach पावणें, पोंचणें, सई क.;—ground पाय शिरकवणें, वाढणें; over मन वळवणें, आपल्या पक्षाचा क. [by, at, from]. —*i.* have advantage फायदा -लाभ असणें; grow rich वाढणें (Ezek. xxii. 12);—on, upon दुसऱ्याच्या अधिकारांत शिरणें; वर्चस्व असणें; चालणें, चलती असणें.—*n.* मिळकत *f*, प्राप्ति *f*, फायदा; accumulation संग्रह, संचय, सांठा: the lust of g.

GAINSAY *v.* (*against* and *say*) दुसऱ्याचें बोलणें खंडणें, वाद क., उलट सांगणें.

GAIT* जाणें *n*, चालणें *n*; manner of walking चालण्याची ढब *f*, चाल *f*; solemn or stately g. गजगति *f*.

GALA *Sp.* आनंद, उत्सव; g. day आनंदाचा -सणाचा दिवस.

GALINGAL (*L.*) कोष्टकोलिंजन *n*.

GALAXY (*Gr. gala*, milk) the Milky Way आकाशगंगा *f*, स्वर्गंगा *f*, दूधगंगा *f*; assemblage of splendid persons or things शोभिवंत पुरुषांचा किंवा वस्तूंचा समुच्चय.

GALBANUM (*L.*) गंधबिरूजा, हिंगड्याची एक जात आहे.

GALE *Ir.* (*Skr. djala*, cold) वावटळ *f*, महावात.

GALL* the bitter, alkaline, viscid liquid found in the gall-bladder, beneath the liver पित्त *n*?; spite दावा, अकस.—*v. F.* fret and wear away by friction चोळवटणें, घांसणें; vex छळणें, जाचणें, काचणें; annoy त्रास -उपद्रव देणें [with, by].—*n.* (*galla*) मायफळ *n*; black g. काळामाजा; white g. गोरामाजा.

GALLANT *a. F.* showy भडक, छानदार; high-spirited छातीचा, मर्द, प्रतापशाली; courteous to women स्त्रीसन्मानी, स्त्र्युपासनशील. —*n.* हौसी, विलासी, खुशालचंद; one who woos लग्नासाठीं स्त्रीची खुशामत करणारा; in a bad sense, a seducer धगड, यार, जार. -LY *ad.* शूरपणानें, मर्दाईनें. -RY शौर्य *n*, मर्दाई *f*, पराक्रम; स्त्रीयांचा सत्कार, स्त्रीसन्मान; इष्कबाजी *f*.

GALLERY *F.* a long and narrow place for walking दालन *n*?; a room for the exhibition of works of art कळाकुसरीचे पदार्थ दाखविण्याची खोली *f*; covered terrace outside of a house सज्जा; in churches &c.

देऊळ, नाटकगृह इ० स्थळीं पायऱ्या प्रमाणें चढती व उंच असी बसायासाठीं केलेली जागा *f.*

GALLEY (*galea*) शिडें व वल्हीं यांनीं हकारायाचें गलबत *n*; *Print.* a frame which receives the types from the composing stick 'ग्याली' *f*; cookroom of a ship of war लढाऊ गलबताची स्वयंपाकाची खोली *f.* -SLAVE 'ग्याली' जहाजावर चाकरी करण्याची शिक्षा पावलेला अपराधी -चा कैदी.

GALLINACEOUS *a.* (*gallus,* cock) गृहकुक्कुट संबंधी, घरकोंबड्याचा.

GALLON *F.* पातळ पदार्थ मोजण्याचें पुणेरी पांच शेराचें किंवा साधारण चार बाटल्यांचें माप *n.*

GALLOP *v. i. F.* भरधांव चालणें -पळणें [off, about].—*n.* भरधांव *f,* दौडचाल *f.*

GALLOWS * फांशी देण्याचा -फांशीचा खांब.

GAMBLE, See under GAME.

GAME* sport खेळ *f,* कौतुक *n*; amusement मौज *f,* गमत *f,* खेळ; a single match at play डाव, हात; that which is gained, as the stake in a game पैज *f,* पण; animals pursued and taken by sportsmen शिकार *f,* पारध *f*; plan बेत, मसलत *f.*—*v.* खेळणें, क्रीडा क.; gamble जुवा खेळणें [for, with]. -KEEPER वनपशु -पक्षी पाळणारा. -STER पैज लावून खेळणारा; जुवेबाज, जुगारी.—GAMBLE *v.i.* जुगार -जुवा खेळणें.—GAMBLER जुवेबाज, जुगाऱ्या.—GAMING-HOUSE शिकारखाना.

GAMBOGE (from *Cambodia*) रेवाचिनीचा शिरा.

GAMUT (*Gr. gamma,* third letter of the Greek alphabet, *ut,* name of a musical note) ग्राम, सरिगम *f.*

GANDER * हंस.

GANG * थवा, गट्टा, टोळी *f.* -WAY रस्ता, वाट *f*; गलबतावर जाण्याचें दार *n.*

GANGRENE (*Gr. -grainein,* to gnaw) एक रोग आहे, याकडून शरिराचें मांस नासकें, मऊ, ओलसर, थलथलीत व दुर्गंधयुक्त होतें, मांसपूति *f.*—*v.* सडणें, मांस कुजणें.

GANTLET, GANTELOPE, a military punishment. The offender is made to run between two files of men facing one another, who strike him as he passes एक प्रकारची लष्करी शिक्षा आहे; [to run the g., to suffer the punishment of the g.; to go through severe criticism or controversy, or ill treatment].

GAOL *F.* तुरंग, बंदिखाना. -ER तुरंगावरचा अधिकारी, 'जेलर.' -DELIVERY, *Law,* a clearing the jail of persons confined in it for trial by trying them बंदखुलास, 'जेल डिलिवरी' *f.*

GAP *Icel.* खिंड *f,* भगाड *n*;—in the teeth खांड *f.*

GAPE *v.* open the mouth wide तोंड पसरणें -विचकटणें;—as for food आ पसरून -करून अन्न मागणें; yawn जांभई देणें.—*n.* खिंड *f,* खांड *f.* -TOOTHED दांतपडका, बोथरा, बोथरखिंड्या.

GARB *F.* पोषाक, लिबास.

GARBAGE* गाळसाळ, गदळ *n.*

GARBLE *v.* (*cribellum,* sieve) गाळणें, गाळून लिहिणें.

GARDEN* बाग *m, f,* बगीचा, उपवन *n*; flower-g. पुष्पवाटिका *f,* फुलबाग; kitchen-g. मळा. -ER माळी, बागवान; a g. who cultivates cumin and other aromatic seeds जिरिमाळी; a g. who grows flowers फुलमाळी. -GROUND बागाईत *n,* बागाइती जमीन *f.* -PLOT वाफा, तक्ता. -STUFF माळवें *n.*

GARDENIA LATIFOLIA (*L.*) पित्तपापडा.

GARGLE *Ger.* गुळणा करायाचें औषध *n*; गुळणी *f,* गुळण्या *f pl.*—*v.* गुळणा क.

GARLAND *F.* माळा *f,* हार;—of flowers पुष्पहार; — of pearls मुक्ताहार; — of wild

flowers वनमाला *f*; a collection of little printed pieces ग्रंथमाला *f*.

GARLIC* लसूण *m*, *f*.

GARMENT *F*. पांघरूण *n*, वस्त्रप्रावर्ण *n*.

GARNER. (See GRAIN.) See GRANARY.

GARNET (do.) a gem of a red color याकूत.

GARNISH *v*. *F*. सजवणें, सुशोभित क. [with].

GARRET *F*. शेवटल्या मजल्यावरची -छपराच्या खालची खोली *f*, पोटमाळा.

INTERPRET *v.* (*interpres,* interpreter) explain the meaning of अर्थ -उलगडा क.; तरजुमा क. (language); define व्याख्या क.; unfold the intent or reason of आशय -अभिप्राय सांगणें, -चें कारण दाखविणें, सांगणें, अर्थ सांगणें (dreams); as an enigma सांगणें, जिंकणें [between].—INTERPRETATION अर्थ करणें *n,* व्याख्यान *n,* विवरण *n;* अर्थ, उलगडा, खुलासा;—of dreams स्वप्नविचार; exposition व्याख्या *f,* टीका *f.*—INTERPRETER अर्थकरणारा, अर्थप्रकाशक;—of dreams स्वप्नप्रकाशक; translator भाषांतर करणारा, दुभाषी.

INTERREGNUM (*-regnum,* reign) पहिला राजा मेल्यापासून किंवा गादी सोडून गेल्यापासून त्याच्या जागीं दुसरा होई पर्यंतचा मधला काळ; राज्यकारभार चालविणाऱ्या प्रधानमंडळीच्या बदलीचा काळ.

INTERROGATE *v.* (*-rogare,* to ask) रीती प्रमाणें सवाल क., प्रश्न विचारून चौकशी क., विचारपूस क.—INTERROGATION प्रश्न -सवाल करणें *n;* सवाल, प्रश्न; note [?] that marks a question प्रश्नचिन्ह *n.*—INTERROGATIVE *a.* प्रश्नाचा, प्रश्नरूप.—*n. Gram.* प्रश्नार्थक शब्द -सर्वनाम *n,* क्रियाविशेषण इ०.

INTERRUPT *v.* (*-rumpere,* to burst) भंग -खंड क.; interfere with the current or motion of मोडा घालणें, अडथळा क.; break the order of क्रमभंग क. [in]. -ION मोडा, व्यत्यय, हरकत *f,* अडथळा; खंड, भंग; गतिभंग, क्रमभंग.

INTERSECT *v.* (*-secare,* to cut) छेदणें, दुभागणें. —*i.* परस्पर छेदून जाणें. -ED दुभागलेला, परिछिन्न. -ION परिच्छेद, विच्छेद.

INTERSPERSE *v.* (*-spargere,* to scatter) मध्यें मध्यें टाकणें -पसरणें, फेंकणें [among].

INTERSTICE (*-sistere,* to stand) फट *f,* चीर *f,* सांध *f,* भेग *f.*

INTERTWINE *v. t & i* गुंतविणें -गुंफणें, गांठविणें, गाठणें; गुतणें.

INTERVAL (*-vallus,* stake) space between two things पदार्थांमधलें अंतर *n,* अवकाश; space of time between any two points or events अवकाश, अवधि, कालांतर *n,* फुरसत *f*; remission खंड, तुट *f*: i. of peace; without i. निरंतर; at *intervals* राहून राहून, वारंवार.

INTERVENE *v. i.* (*-venire,* to come) दोन वस्तूंच्या मध्यें येणें, आड येणें; occur, fall, or come between points of time or events काळाच्या -गोष्टीच्या मध्यें येणें -घडणें -पडणें; happen in a way to disturb, cross, or interrupt विघ्न -अडथळा -व्यत्यय -मोडा येणें [between].—*t.* -च्या मध्यें येणें इ०.—INTERVENTION मध्यें येणें *n,* व्यवधान *n*; mediation मध्यस्थी *f.*

INTERVIEW, mutual sight अन्योन्यदर्शन *n,* दृष्टादृष्ट *f*; formal meeting for some conference on an important subject भेट *f,* मुलाखत *f*; a conference बैठक *f,* प्रसंग, सभा *f.*

INTERVOLVE *v.* (*-volvere,* to roll) एकमेकांत गुंतविणें -गांठवणें.

INTERWEAVE *v.* विणणें, गांठणें.

INTESTABLE *a.* (*-testis,* a witness) मृत्युपत्र करण्यास अयोग्य -नालायक.—INTESTACY मृत्युपत्र केल्याशिवाय मरणें.—INTESTATE *a.* मृत्युपत्र केल्याशिवाय मरणारा; मृत्युपत्रहीन; मृत्युपत्रानें न दिलेला (estate).—*n.* मृत्युपत्र केल्याशिवाय मेलेला मनुष्य -ली असामी *f.*

INTESTINE *a.* (*intus,* within) आंतला, आंतील (disease); depending upon the internal constitution of a body आंतल्या व्यवस्थेवर अवलंबून राहणारा; domestic घरगुती, घरांतला, अपसांतला (war, enemies, troubles). —*n.* आंतडें *n pl*; आंतडीं *n pl.*—INTESTINAL *a.* आंतड्यांचा, अंत्रसंबंधी.

INTHRAL, See ENTHRALL.

INTIMATE *v.* (*intimus,* the inmost) आंतला, अंतरींचा; near जवळचा, सन्निध; familiar सलगीचा, घसणीचा, दाट, जिवलग: i. acquaintance, friendship सलगीचा मित्र, सखा [with].—*v.* खबर -सूचना देणें, सुचवणें; [to]. — INTIMACY सलगी *f,* जिवलगपणा, सख्य *n.*—INTIMATION सूचना *f,* कच्ची बातमी, खबर *f.*

INTIMIDATE *v.* (*-timidus,* fearful) भेडसाविणें, दटावणें [by, with]. — INTIMIDATION भेडावणी *f,* दटावणी *f*;—the state दहशत *f.*

INTO *prep.** आंत, मध्यें.

INTOLERABLE *a.* सोसवेनासा, असह्य (pain); not right to be allowed अक्षमनीय, क्षमा करवेनासा. INTOLERABLY *ad.* सोसवेना असें. —INTOLERANT *a.* असोशिक, अक्षम; not enduring difference of opinion or sentiment, esp. in relation to religion दुसऱ्याचें मत, अथवा धर्मभेद न सोसणारा, परमतासह.

INTONATION (*tonus,* sound) स्वरभेद; deep i. गंभीर स्वर.

INTOXICATE *v.* (*-toxicum,* poison) make drunk (दारूनें) गुंग -मस्त क., कैफ -अमल आणणें; elate to enthusiasm, frenzy, or madness मस्त -गुंग क., उन्मत्त क. [with].—INTOXICATION निशा *f,* गुंगी *f,* कैफ, अमल; मस्ती *f,* उन्माद, माज.—INTOXICATING *p. a.* माज आणणारा, उन्मादक, मादक, अमली; i. liquors or drugs अमली जिन्नस.

INTRACTABLE *a.* अडेल, अनिवार, दंडेल (temper); indocile शिकवण -शिक्षा न घेण्या-

जोगा,अशिक्ष्य, दुःशास्य (child).—INTRACTABILITY अडेलपणा, हट्टीपणा, दंडेली *f*.

INTRANSITIVE *a*. *Gram*. अकर्मक.

INTRAMSMUTABLE *a*. ज्याचा पालट होत नाहीं किंवा करितां येत नाहीं तो, अविकार्य.

INTRENCH *v*. भोंवतालीं खंदक खणणें -क.; fortify with a ditch and parapet खंदक खणून मोर्चा बांधणें, मोर्चेबंदी क.; furrow तास -हरळ पाडणें [on, upon]. -MENT खंदक, मोर्चा; protection आश्रय, रक्षण *n*; encroachment आक्रमण *n*, उल्लंघन *n*.

INTREPID *a*. (*-trepidus*, trembling) छातीचा, धाडस, निर्भय. -ITY छाती *f*, धारिष्ट *n*.

INTRICATE *a*. (*-tricæ*, hindrances) गुतागुतीचा, भानगडीचा, घोटाळ्याचा.—INTRICACY गुतागुत *f*, भानगड *f*.

INTRIGUE *v*. (do.) a complicated plot intended to effect some purpose by secret artifices कुलंगडें *n*, कंत्राट *n* कारस्थान *n*; a secret understanding or commerce of forbidden love between two persons of different sexes कामचरित्र *n* [with, against].—*v*. कंत्राट -कचाट रचणें; कामचरित्र चालविणें.—INTRIGUER कचाट्या, कारस्थानी, कपि.

INTRINSIC, -AL *a*. (*-secus*, side) आंतला-genuine खरा, जातीचा, असल, मुळचा (merit, value).

INTRODUCE *v*. (*-ducere*, to lead) आंत नेणें, प्रवेश करविणें; conduct and make known by formal announcement, proclamation; or recommendation भेट-मुलाखत क.; bring, to be acquainted ओळख करून देणें -देण्यासाठीं आणणें; bring into notice or practice रुढींत -प्रवृत्तींत आणणें, चालू क. (a fashion); begin आरंभ क., चालू क., सुरू क. (a subject) [in, into].—INTRODUCTION चालू करणें *n*, प्रवर्त्तन *n*; भेट करून देणें *n*, मुलाखत *f*; आरंभ; a formal and elaborate preliminary treatise उपोद्घात.—INTRODUCTIVE, -TORY *a*. पूर्वीचा; आरंभींचा; प्रस्तावनारूप (remarks).

INTRUDE *v*. *i*. (*-trudere*, to thrust) कामा वांचून -बोलावल्या वांचून आंत जाणें -येणें, न बोलावतां जाणें -शिरणें; encroach उल्लंघन -आक्रमण क., मर्यादा सोडून जाणें.: to i. on the lands of others.—*t*. कामा वांचून -सत्ते वांचून शिरवणें -खुपसणें [on, upon, into].—INTRUDER न बोलावतां जाणारा, आगंतुक, घुशा.—INTRUSION बोलावल्या वांचून येणें -जाणें *n*, अनधिकारपूर्वक प्रवेश.

INTRUST *v*. हवालणें, सोपणें, विश्वासणें [with, to].

INTUITION (*-tueri*, to look) an act of immediate knowledge, as in perception or consciousness; distinguished from "mediate" knowledge, as in reasoning अंतर्ज्ञान *n*, साहजिक ज्ञान *n*, विचारनिरपेक्षज्ञान *n*; any object or truth discerned by direct cognition अंतर्ज्ञानानें समजण्याची गोष्ट *f* -चा विषय.—INTUITIVE *a*. स्पष्ट पाहणार (vision); पाहतांच कळण्याजोगा, प्रमाणनिरपेक्ष (knowledge); अंतर्ज्ञानानें जाणणारा, अंतर्ज्ञानी.

INUNDATE *v*. (*-undare*, to rise as waves) पूर आणणें, बुडवणें, जलमय क.; fill with an overflowing abundance रेलचेल क., ऊत -पूर -लोट आणून भरणें,-चें पेंव फोडणें [with].—INUNDATION पूर, लोंढा, जलप्रलय; पूर, ऊत, रेलचेल *f*.

INURE *v*. *F*. सवयींत -घसवटींत आणणें, राबवणें; be or get *inured* घसवटणें, घटणें [to].

INVADE *v*. (*-vadere*, to go) enter, as an enemy, with a view to conquest or plunder स्वारी क.; attack हल्ला क., चढून -चालून जाणें; encroach on उल्लंघन -आक्रमण क.—INVASION हल्ला, चढ; स्वारी *f*, दौड *f*.

INVALID *a.* निर्जीव, निर्बळ; *Law,* void पोकळ, रद्द, निरुपयोगी (contract).—*n.* रोगेला, रोगी मनुष्य; soldier or seaman worn out in service बहुत दिवस नोकरी करून जर्जर झालेला -थकलेला शिपाई किंवा खलाशी. -ATE *v.* रद्द क., माजी पाडणें, व्यर्थ -निर्बळ क.; overthrow मोड -खंड -भंग क. (an argument). -ITY निर्बळता *f,* पोकळपणा; कायद्याच्या बळाची कोताई *f* -कमजोरी *f.*

INVALUABLE *a.* अमोलिक, अमूल्य.

INVARIABLE *a.* एकसारखा, स्थिर, निर्विकल्प.—INVARIABLY *ad.* नित्य नेमानें, एकसारखा, सतत.

INVEIGH *v.* (*-vehere,* to carry) utter censorious and bitter language against निंदा -निर्भर्त्सना क., ठोमणे मारणें [against].—INVECTIVE निंदा *f,* निर्भर्त्सना *f,* निंदात्मक भाषण *n,* ठोमणा.—*a.* निंदेचा, निंदात्मक.

INVEIGLE *v. F.* फुसलावणें, भुलथाप देणें [into].

INVENT *v.* (*-venire,* to come) discover, commonly by study or inquiry शोधून काढणें; contrive युक्ति -हिकमत काढणें; fabricate रचणें, बनावणें; in a bad sense खोटा -बनावट क., रचणें. -ION नवी युक्ति *f,* कल्पना *f,* क्लृप्ति *f*; रचलेली गोष्ट *f,* कल्पना *f*; discovery नवीन काढलेली गोष्ट -वस्तु *f*; —of one's own brain स्वकपोलकल्पित; the power of invention कल्पनाशक्ति *f,* युक्ति *f*; i. to deceive, injure, &c. थोतांड *n,* बालंट *n.* -OR युक्ति काढणारा, कल्पक; नवा बनावणारा. -ORY, catalogue याद *f,* फेरिस्त *n*; catalogue of all the goods and chattels of a deceased person मयताच्या जिंदगीची याद *f*; to take an i. कलमबंदी क., फेरिस्त क., याद क.

INVERT *v.* (*-vertere,* to turn) उलटा-पालथा क., अधोमुख क.; फिरवणें. -ED विपरीत, व्यतिक्रान्त; अधोमुख.—INVERSE *a.* उलटा, उफराटा; *Math.* व्यस्त.—INVERSION उलटणें *n*; व्यतिक्रम, व्युत्क्रम.

INVEST *v.* (*-vestire,* to clothe) नेसवणें, पांघरवणें; confer देणें, दान क.; clothe, as with office or authority अधिकार देणें; *Mil.* surround वेढा -गराडा घालणें; surround with, or place in, as property in business व्यापारांत घालणें, व्याजीं वगैरे लावणें. [with, in]. -ITURE प्रतिष्ठा *f,* पदस्थापना *f.* -MENT—with the sacrificial cord उपनयन *n*;—of goods साटें *n,* खरिदी *f*; *Mil.* वेढा -गराडा घालणें *n,* व्यापारांत -पेढीवर -व्याजीं पैसा गुंतविणें *n*; to buy up the whole of an i. साटें मारणें -घेणें; deed of the purchase of an i. साटेंखत *n.*

INVESTIGATE *v.* (*-vestigare,* to track) शोधणें, तपासणें, चौकशी क. [into].—INVESTIGATION शोध, तपास, तलाश.

INVETERATE *a.* (*-vetus,* old) जुनाट, बहुत दिवसांचा, जडलेला, बद्धमूल (disease); habitual सवयीचा, परिपाठाचा, घटलेला (idler).

INVIDIOUS *a.* (See ENVY) हेवा उत्पन्न करण्याजोगा, मात्सर्यजनक (affair).

INVIGORATE *v.* पुष्टी -बळकटी -तेजी आणणें [by, with]. — INVIGORATING *a.* पौष्टिक, धातुपुष्ट, बलवर्द्धक.—INVIGORATION पुष्टिकरण *n,* तेजोवर्द्धन *n*; बलोवृद्धि *f.*

INVINCIBLE *a.* (*-vincere,* to conquer) अजिंक, दुर्जेय; insuperable दुस्तर, अनिवार्य, जबरदस्त (habit) [in, by].

INVIOLABLE *a.* अबाध्य, अपकारायोग्य; not to be profaned अनुलंघनीय (a shrine); not to be broken अभंग, अलंघ (promise, vow).—INVIOLATE *a.* अभंग, अबाध.

INVISIBLE *a.* अदृश्य; i. green काळ्यारंगासारखा हिरवा रंग जो दिसण्यांत येत नाहीं तो.—INVISIBILITY अदृश्यता *f,* दृष्ट्यगोचरता *f.*

INVITE *v.* (*invitare*) ask बोलावणें; ask to an entertainment or visit बोलावणें, लग्नकार्यास -मेजवानीस -भेटीस पाचारणें, आमंत्रणें; allure चित्त ओढणें -ओढून घेणें [to].—INVITATION आमंत्रण *n*, पाचारणें *n*, बोलावणें *n*. —INVITING *a.* आकर्षक, मोहक.

INVOCATE *v.* (*-vocare*, to call) address in prayer हाकमारणें, प्रार्थना -धावा क. -मांडणें. —INVOCATION धावा, आवाहन *n*.

INVOICE *F.* a written account of the particulars of merchandise shipped or sent to a purchaser, consignee, factor, with the value or price and charges annexed थेटपट्टी *f*, बीजक *n*, चुलान *n*.

INVOKE, See INVOCATE.

INVOLUNTARY *a.* not having will अस्वाधीन, अस्वेच्छ; independent of will or choice इच्छेबाहेरचा, इच्छानधीन: the motion of the heart is i., but not against the will; opposed to the will इच्छेविरुद्ध, गैर खुशीचा, नाखुशीचा: an i. submission to a master.

INVOLVE *v.* (*-volvere*, to roll) गुंडाळणें, लपेटणें; envelop वेष्टणें, लपेटणें; to i. in darkness; entangle गोवणें, गुंतविणें; connect by way of natural consequence कार्यकारण संबंधानें जोडणें; contain असणें; include by rational or logical construction गर्भित क., अनुमाना वरून निघे असा क.; overwhelm बुडविणें, गर्क क.: to i. in debt; *Arith.* घात देणें [in, by, with].—INVOLVED गुंडाळलेला, वेष्टित; ध्वनित, गर्भित; गुंतलेला, गोवलेला; to be i. सांपडणें; गुरफटलेला, गुंताड्याचा.—INVOLUTION गुंडाळणें *n*, वेष्टन *n*; ध्वनन *n*; जोडणें *n*, ओढून घेणें *n*, आकलन *n*; गुंताडा, गुतागुत *f*; घातकर्म *n*; —of speech लपेट *f*.

INVULNERABLE *a.* incapable of being wounded, or of receiving injury वज्रदेही, वज्रशरीर.

INWARD* *a.* आंतला, आंतील; seated in the mind मनांतला, पोटांतला, अंतस्थ. -LY *ad.* आंतून, आंतल्या बाजूस; मनांत, पोटांत.—*n pl* अंतर्डी *n pl*.

INWROUGHT *a.* जडित, खचित, भरित.

IOTA (*Gr.*) लवलेश, तिलमात्र *n*, अणु.

IRE (*ira*) राग, क्रोध, द्वेष.—IRASCIBLE *a.* रागीट, तापट, शीघ्रकोपी.

IRIS (*L.*) the rainbow मेघधनुष्य *n*; circle round the pupil of the eye बुबूळ *n*, कनिकामंडळ *n*; a plant श्वेत दुर्वा *f*.

IRISH *a.* ऐर्लंद देशाचा; ऐर्लंद देशांत होणारा.—*n.* ऐर्लंद देशचा राहणारा; ऐरिश भाषा *f*.

IRK *v. Scot.* दमवणें, शिणवणें. -SOME *a.* कंटाळा -त्रास येण्याजोगा, त्रासदायक.

IRON* one of the metallic elements लोखंड *n*; utensil made of iron लोखंडाचा डागिना; *pl* fetters बिड्या *f pl*; शृंखला *f pl*; strength शक्ति *f*, बळ *n*, पराक्रम; cast i., or pig i. बीड *n*; malleable i. घावडी लो० *n*; i. filings लो० चा कीस; sulphate of i. हिराकस; oxide of i. लो० चा कीट; wrought i. शुद्ध -निर्भेळ लो० *n*; bar i. कांबीचें लो० *n*.—*a.* लोखंडी, लोहमय; resembling iron in color लोहवर्ण; hard कठीण, कडक (age); i. age of the Hindus कलियुग *n*; inflexible हेकड, दुराग्रही (will); robust बळकट, जोरदार (constitution); not to be broken अभंग (sleep); stupid जड, मंद: i.-witted fools.—*v.* smooth with an instrument of iron इस्त्री क.; बेड्या घालणें -ठोकणें; furnish with iron लोखंड -लोखंडी सामान बसविणें (wagon). -BOUND *a.* लोहबद्ध; rugged खडकाळ,

खडबडीत (coast). -CLAD *a.* लोखंडी पत्र्यांनीं मढविलेला.—*n.* लोखंडी पत्र्यांनीं मढविलेलें जहाज *n.* -FOUNDER लोखंडाचा रस ओतणारा. -FOUNDRY लोखंडी रस ओतण्याचा कारखाना. -GRAY धूसर रंग. -MONGER लोखंडी सामान विकणारा. -MOULD, a spot on cloth made by applying rusty iron to the cloth when wet कापडावरला लोखंडाचा डाग. -SMITH लोहार. -WOOD अंजिनी *f.* -WORK लोखंडी काम *n*; *pl* लोखंडी कामाचा कारखाना.

IRONY (*Gr. eiron,* a dissembler in speech) a kind of ridicule which exposes the errors or faults of others by seeming to adopt, approve, or defend them व्याजोक्ति *f,* विपरीतलक्षणा *f.*—IRONICAL *a.* उपरोधिक, व्याजस्तुतीचा.

IRRADIATE *v.* (*-radiare,* to shine) प्रकाशित क.

IRRATIONAL *a.* void of reason ज्ञान -बुद्धिहीन; i. animal हैवान *c*; contrary to reason अयुक्तिक, वेडेपणाचा, बुद्धिविरुद्ध; *Math.* करणीपद *n.* -ITY अज्ञाणपणा, बुद्धिहीनता *f.*

IRRECLAIMABLE *a.* मार्गावर आणायास -परतून मिळवायास अशक्य.

IRRECONCILABLE *a.* असमजुतीचा, अशाम्य; inconsistent परस्परविरुद्ध, संदर्भविरुद्ध, विसंगत.

IRRECOVERABLE *a.* पुनः न मिळण्याजोगा, पुनरलभ्य; not capable of being remedied उपाया बाहेरचा, निरुपाय.

IRREFRAGABLE *a.* खंडन करायास अशक्य, अखंडनीय (proof).

IRREGULAR *a.* बेशिस्त, गैरशिस्त, बेडौल, वांकडा (building); not according to established principles or customs नेमाविरुद्ध, रीती -चाली विरुद्ध, गैरशिस्त, अव्यवस्थित (proceedings); not conformable to nature स्वभाव -सृष्टिनियम विरुद्ध : i. action of the heart; immethodical अव्यवस्थित, क्रमरहित -शून्य (verse); not in conformity to laws human or divine अनाचारी, आडमार्गी, गैरचालीचा; not straight वांकडा, असरळ (line); not uniform उंचनीच, विषम, असम (motion); *Gram.* व्यभिचारी, वर्जनीय (words);—in shape विरूप.—*n.* [a soldier not in regular service]. -ITY बेशिस्तपणा, अव्यवस्था *f,* क्रमविरोध; वांकडी चाल *f,* गैरवर्त्तणूक *f,* अनाचार, अधर्म; उंचनीचपणा.

IRRELEVANT *a.* अप्रासंगिक, अप्रस्तुत, अप्रयुक्त [to].—IRRELEVANCY अप्रासंगिकत्व *n,* अनन्वय.

IRRELIGION अधर्म, धर्मलोप, दुष्टाचार, अभक्ति *f.*—IRRELIGIOUS *a.* अधर्मी, अधार्मिक, दुराचारी, दुष्ट; profane धर्म -देवनिंदक, धर्मविरुद्ध (speech, conduct).

IREMEDIABLE *a.* बेइलाज, निरुपाय, सुधरायास अशक्य (disease, error).

IRREPARABLE *a.* सुधरायास अशक्य; irrecoverable परत मिळवायास अशक्य, पुनरालभ्य.

IRREPROACHABLE *a.* नांव ठेवायाजोगा, निर्दोष, निष्कलंक (conduct).

IRRESISTIBLE *a.* अनिवार, दुर्निवार.

IRRESOLUTE *a.* चंचळमनाचा, धरसोडीचा, अधीर.—IRRESOLUTION चंचल बुद्धि *f,* धरसोड *f.*

IRRESPECTIVE *a.* अनपेक्ष, अपेक्षाहीन, परिणाम न पाहणारा [of].

IRRETRIEVABLE, *a.* बेइलाज, निरुपाय; irrecoverable परत मिळण्यास अशक्य, पुनरप्राप्य.

IRREVERENT *a.* अनादर -अपमान करणारा; not entertaining or manifesting due regard to the Supreme Being ईश्वराचा अनादर करणारा, अपूजक; proceeding from irreverence अनादराचा, अपमानकारक, निंदेचा

(word).—IRREVERENCE अनादर, अपमान; थोरांचा अपमान -अपूजा *f*.

IRREVERSIBLE *a*. फिरवायास अशक्य; रद्द न करण्याजोगा, अलोप्य, अखंड्य (decree).

IRREVOCABLE *a*. न फिरवायाजोगा, अपरावर्त्तनीय (decree, promise).

IRRIGATE *v*. (*-rigare*, to water) पाणी घालणें; wet भिजवणें; water, as land, by causing a stream to flow upon and over it पाटानें पाणी देणें -सोडणें.—IRRIGATION पाट सोडणें *n*, पन्हळीचें शिंपणें *n*.

IRRITATE *v*. (*irritare*, to pluck) excite heat and redness in, as the skin or flesh of living animal bodies, as by friction खिजवणें, चिडवणें; inflame आग -दाह क.; provoke खिजवणें, चेतवणें, चिडवणें.—IRRITATION खिजवणी *f*, चिडवणी *f*, आग *f*, दाह.

IRRUPTION (*-rumpere*, to break) आंत फुटणें -येणें -पडणें *n*; sudden invasion दौड *f*, धाड *f*, स्वारी *f*.

ISLAM *Ar*. महमदी धर्म.

ISLE (*insula*), ISLAND* बेट *n*, द्वीप *n*, टापू. -ER टापूंत राहणारा, द्वीपवासी, द्वीपस्थ.—ISLET लहान बेट *n*, उपद्वीप *n*.

ISOLATE *v*. (*insula*, island) वेगळा -अलग ठेवणें

ISLE, See AISLE.

ISOCHRONAL, -OUS *a*. (*Gr. isos*, equal, *chronos*, time) समकालिक, समसंख्याकाल.

ISOSCELES *a*. (*Gr. isos*, equal, *-skelos*, leg) *Geom*. समद्विबाहु -भूज.

ISRAELITE *Heb*. इस्राएलाच्या वंशांतला मनुष्य, यहुदी.—ISRAELITISH *a*. इस्राएलाचा, इस्राएली.

ISSUE *F*. the act of flowing out बाहेर निघणें *n* -वाहणें *n* -पडणें *n*, निस्सरण *n*, निर्गम, स्राव; i. of blood, of air, of people from a house; act of sending out बाहेर पाठविणें *n* -काढणें *n*: i. of an order; result शेवट, परिणाम; progeny संतान *n*, संतति *f*; produce of the earth उपज; profits of land, tenements, &c. उत्पन्न *n*; a flux स्राव; *Med*. an artificial ulcer designed to promote a secretion of pus पोत *f*; any point made in debate वादाचा विषय -गोष्ट *f*, प्रस्ताव: i. of rations वांटणें, देणें.—*v. i.* निघणें, वाहणें, जाणें; बाहेर जाणें -पडणें: the troops *issued* from the town; proceed निघणें, पडणें: water *issues* from springs; light *issues* from the sun; उत्पन्न होणें, जन्मणें, संतति होणें; उत्पन्न होणें, मिळणें, नफा होणें -मिळणें: profits *issuing* from land; परिणाम -निकाल -गत -शेवट होणें.—*t.* पाठविणें; put into circulation चालू क. व्यवहारांत आणणें (notes from a bank); deliver for use वांटणें, देणें (provision); deliver by authority फरमावणें, जाहीर -जगप्रसिद्ध क. (an order)

ISTHMUS (*L*. a neck) संयोगीभूमि *f*.

IT* *pron*. (*L. id, Skr. it*) तें, हें *n*. -SELF *pron*. आपण, स्वतां.

ITALIAN *a*. इतली देशाचा.—*n*. इतली देशाचा राहणारा; इतालीयन लोकांची भाषा *f*.—ITALIC *a*. इतालीचा; [app. esp. to a kind of type in which the letters do not stand upright, but slope towards the right;—so called because dedicated to the States of Italy by their inventor, Aldus Manutius, about the year 1500.] —*n*. इतालिक किंवा तिर्कस अक्षर *n*: *the letters in which this clause is printed*.—ITALICIZE *v*. तिर्कस अक्षरानें लिहिणें किंवा छापणें.

ITCH* an eruption of small, isolated, acuminated vesicles, produced by the entrance of a parasitic animal, and at-

tende by severed irritation खरूज *f*; sensatioe in the skin occasioned by the disease खाज *f*, कंडू *f*; a constant, irritating desire खाज *f*, खवखव *f*.—*i*. साजणें, खाज सुटणें; खुरखुरणें, वळवळणें, फुरफुरणें.—ITCHY *a*. खरजुला, खरजेचा.

ITEM *ad*. (*L*.) देखील, अणखी, दुसरें, ही.—*n*. कलम *n*, रकम *f*, बाब *f*.

ITERATE *v*. (*iterò*, again) फिरून सांगणें किंवा क.—ITERATION पुनरुक्ति *f*, दुसऱ्यानें बोलणें *n*; दुसारणें *n*, पुनः क. *n*.—ITINERANT *a*. (*iter*, a walk) फिरस्ता, फिरता (a preacher).—*n*. फिरस्ता मनुष्य; गांवोगांव फिरून उपदेश करणारा.—ITINERARY मार्गवृत्तांत पुस्तक *n*, देशाटण वृत्तांत, सफरनामा.—*a*. फिरणारा, फिरस्ता.—ITINERATE *v*. गांवोगांव फिरणें, देश फिरणें; गांवोगांव उपदेश करीत -व्याख्यानें देत फिरणें.

IVORY (*ebur*, *Skr*. *ibha*) हस्तिदंत.

IVY* इशकपेच (वेल), तरुरोहिणी *f*.

J.

JABBER* *v*. *i*. वटवट बोलणें, बकणें.—*t*. चुरचुर -लबलब बोलणें.

JACK *F*. [a nickname or diminutive of *John*]; a seafaring man खलाशी; [a portable machine variously constructed, for raising great weights through a small space]; *F*. a coat of mail कवच *n*, चिलखत *n*; [male of certain animals, as of the ass]; a horse or wooden frame on which wood is sawed घडवंची *f*; a small flag, usually hoisted at the bowsprit cap जहाजाचा लहान बावटा; instrument to pull off boots पायांतून बूट ओढून काढायाचें हातेर *n*; j.-at-all-trades हरकामी, चौकोनी चिरा.—*Bot*. फणसाचें झाड *n*. [*Note*.—J. is sometimes used adj. to designate something cut short or diminished in size, as a j.-timber, j.-rafter.] -ASS गाढव. -DAW डोमकावळा. -FRUIT फणस. -PUDDING हंडीबाग. -WOOD फणसाचें लांकूड *n*.—JACKET *F*. बंडी *f*, कुडतें *n*, 'जाकीट' *n*.

JACKAL *F*. (*Skr*. *sringala*) कोल्हा.

JADE *Prov*. *Eng*. a mean horse घोडकें *n*; a mean woman रांडरूं *n*.—*v*. शिणवणें, भागवणें.

JAG *W*. खांडा, सड, कातरा.—*v*. खांडे पाडणें.

JALAP (from *Jalapa*, a town in Mexico) एक प्रकारचें ढाळक आहे, 'जुलाब.'

JAM *Orient*. a mass of people crowded together लोकांची गर्दी *f* -दाटी *f* -भीड *f*, हजिबा; a conserve of fruit मुरंबा.—*v*. चिरडणें, चेंगरणें, चेंदणें.

JANGLE *v*. *i*. *Ger*. sound harshly or discordantly कर्कश अथवा बेसूर वाजणें; wrangle कटकट -कलागत क.—*n*. कर्कशध्वनि; बेसूर; कलागत *f*, किलकिल *f*.

JANITOR (*janua*, door) देहुडीवाला, द्वारपाल.

JANTY, JAUNTY *a*. *F*. छानछुक्या, नटणारा.

JANUARY (from *Janus*, an old Italian deity) इंग्रजी सालाचा पहिला महिना, पौष-माघ.

JAPAN (from *Japan*, in Asia) रोगणकाम *n*.—*v*. रोगण लावणें -चढवणें -देणें.—JAPANESE जपानदेशचा मनुष्य; जापानी लोकांची भाषा *f*.

JAR *v*. *i*. *F*. vibrate harshly कर्कश वाजणें, करकरणें; act in opposition विजोड पडणें, नडणें; quarrel भांडणें.—*n*. कर्कश शब्द; बेबनाव; भांडण *n*.—*n*. *Ar*. घडा, बरणी *f*, वगैरे मातीचें भांडें *n*; a large j. माठ, रांजण.

JARGON *F*. हेंगाडी -रांगडी बोली *f*.

JASMINE *Ar*. जाई *f*, जाती *f*; the Arabian j. मोगरी *f*; eared j. जुई *f*; yellow j. सोनजुई *f*.

JASPER *Ar*. एक मणी आहे, याशेफ पाषाण.

JAUNDICE *F.* a disease, in its most common form characterized by yellowness of the eyes, skin, and urine, whiteness of the discharges from the intestines, uneasiness, referred to the region of the stomach, loss of appetite, and general langaur and lassitude कामीण *f*, कावीळ *f*, पांडुरोग.—JAUNDICED *a.* पांडुरोगी; prejudiced वक्रदृष्टि.

JAUNT *Scot.* सहल *f*, सफर *f*, रपेट *f*.—*v.* सहल क.

JAVELIN *F.* बरची *f*, सांग *f*.

JAW *F.* जबडा, दाभाड *n*. -TOOTH दाढ *f*.

JAY *F.*—the blue j. चाष, चात.

JEALOUS *a.* (*zelus*, zeal) filled with anxious apprehension शंकित, संशयी, भयाक्रांत; solicitous in a matter affecting character or honor अभिमानी, आवेशी (1 Kings xix. 10); uneasy through fear that good-will, interest, affection, or the like, regarded as belonging to one's self, is transferred to another प्रेमसंशयी, प्रेमशंकी; a husband of a wife परपुरुषाशंकी, जारशंकित;—a wife of a husband परस्त्रीशंकित; apprehensive of rivalship परोत्कर्षद्वेषी.—JEALOUSY संशय, शंका *f*; प्रीतीचा संशय, प्रेमसंशय;—of a husband respecting a wife परपुरुषाशंका *f*; — of a wife respecting a husband परस्त्रीशंका *f*; अभिमान, आवेश; परोत्कर्षद्वेष -भय *n*.

JEER *v. i. Ger.* टवाळी -थट्टा क.—*n.* टवाळी *f*, थट्टा *f*.

JEHOVAH *Heb.* a Scripture appellation of the Supreme Being, by which He was revealed to the Jews as their tutelary God or Sovereign of the theocracy 'यहोवा', परमेश्वर; the sacred unpronounceable name of the Eternal, usually interpreted as signifying self-derived and permanent existence स्वयंभू -सनातन परमेश्वर.

JEJUNE *a.* (*jejunus*, dry) रुक्ष, निरस, भुकड, भाकड.

JELLY *F.* a glutinous substance चिकी *f*;—of fruit मुरब्बा, फलपाक, 'जेली' *f*.

JEOPARD *v. F.* जोखमांत -धोक्यांत घालणें.—*n.* जोखीम *n*, धोका, प्राणसंकट *n*; to be in j. प्राणावर बितणें. -IZE *v.* जोखमांत घालणें.

JERK *v. O. Eng.* give a sudden pull हिसका -आसडा देणें; throw with a quick effort झटकारून फेंकणें -टाकणें; [cut into thin slices and dry in the sun: to j. beef].—*n.* हिसका, हिसडा, झटका.

JESSAMINE, See JASMINE.

JEST *O. Eng.* something done or said in order to amuse थट्टा *f*, मस्करी *f*, विनोद; a laughing-stock खेळवणा, उपहासपात्र *n*; in j. मस्करीनें, थट्टेनें.—*v.* मस्करी क. [with]. -ER थट्टेखोर -बाज; buffoon हंडीबाग, भांड.

JESUIT *F.* रोमनकाथोलिक धर्मांत एक पंथ आहे, त्यांतला एक; a crafty person कावेबाज -कपटी मनुष्य.

JET (*gagates*) एक खनिज पदार्थ आहे, कारदगड. -TY *a.* काळा.

JET (*jactus*, a throwing) a spouting stream उडती धार *f*, चिरकांडी *f*; a sudden rush, as of water from a pipe, or of flame from an orifice कारंजें *n*, फवारा.—*v.* धार सोडणें.

JEW (from *L. Judæa*) यहूदी.—*v.* फसवणें. ठकवणें. -ESS यहुदीण *f*. -ISH *a.* यहुद्यांचा, -'S HARP चंग, मोरचंग. -RY यहुद्यांचा महला -चकला.

JEWEL *F.* a gem रत्न *n*, जवाहीर *n*, मणी; an ornament of dress in which the precious stones form a principal part जडावाचा डागिना; an object regarded with

special affection and highly valued रत्न *n*, परीस, लाल, जिवडा; a setter of *jewels* जड्या—*v.* रत्नभूषित -मंडित क.; रत्न -मणी बसविणें : to j. the works of a watch; रत्नासारखा शृंगार क.: flowers *jeweling* the grass. -ER, -LER, one who deals in jewels, जवाहिरी; जड्या. -LERY, -RY रत्नें *n pl*, जवाहीर *n*.

JIB *Eng.* the foremost sail of a ship पोगी *f*.

JINGLE *v. i. Ger.* खळखळणें, झणझणणें. —*n.* झणकारा, खळखळ *f*; that which makes a jingling sound घुंगुरूं *n*, वगैरे.

JOB *Eng.* a piece of work काम *n*; any thing undertaken, whether of more or less importance अडकाम *n*, अडपझडप *n*; an undertaking with a view to profit प्राप्तीसाठीं -नफ्यासाठीं पत्करलेलें काम *n*; काम *n*; by the j. उक्ता, खंडून.

JOCKEY (dimin. of *jack*) a man who rides horses in a race शर्यतीचा घोडेस्वार; a dealer in horses घोड्यांचा सवदागर; a cheat ठक, लुच्चा, सोदा.

JOCOSE *a.* (*jocosus*) विनोदी, थट्टेबाज (a person); थट्टेचा, विनोदाचा (airs). — JOCULAR, *a.* थट्टेचा, मस्करीचा, विनोदात्मक (style); थट्टेबाज, विनोदी (a person).—JOCUND *a.* आनंदी, खुशमौजी. -ITY आनंद, खुशमौज *f*.

JOG *v. Ger.* धक्का -हिस्का देणें, हबकणें.—*i.* धिमे -हळूहळू चालणें.

JOIN *v.* (*jungere*, to yoke) connect जोडणें, जडणें, सांधणें;—unite with संगत जोडणें, सांगड घालणें, मिळवणें;—in league जूट जोडणें;—in marriage जोडा जोडणें [with, in]. — *i.* मिळणें, एकहोणें; लगत -संगत असणें; —in fight भिडणें. -ER जोडणारा, जडणारा; one whose occupation is to construct things by joining pieces of wood सांधकाम्या, जोडणारा; carpenter सुतार, बढई. -ERY सांधकाम *n*, जोडकाम *n*.—JOINT सांधा, संधि *f*;—in the limbs of an animal खीळ *f*, सांधा; — of cane or of knots पेर *n*, ग्रंथि *f*; to be out of j. सांधा उखळणें;—of meat रान *n H.*—*a.* जोडलेला, संलग्न; shared among more than one समाईक (property); sharing with another विभागी, भागीदार, पातीदार; not solitary in action जोडीनें काम करणारा, 'जाइंट.'—*v.* सांध्यांनीं जोडणें, संधिविशिष्ट क.; provide with a joint पेरें पाडणें; disjoint सांधे सोडविणें -उखळणें.—*i.* सांधे बसणें, सांध्यांत बसणें, बसणें. -ED सांध्याचा केलेला, संधिविशिष्ट; सांधे सोडविलेला, संधिभेदित. -LY *ad.* मिळून, जुटीनें. -URE *Law*, estate settled on a wife, and which she is to enjoy after her husband's decease for her own life at least, and in satisfaction of dower बायकोचा वांटा, बाईलवांटा, स्त्रीधन *n*, रांडरोटी *f*. -RESS जिला बाईलवांटा आहे ती स्त्री *f*.

JOKE (*jocus*) थट्टा *f*, मस्करी *f*; in j. थट्टेनें. practical j. हाताची थट्टा *f*.—*v.* थट्टा -मस्करी क. [with].

JOLLY *a. F.* full of life and mirth आनंदी, उल्लासी, मौजी; exciting mirth and gaiety मौजेचा, हसण्याचा; plump टुमटुमीत, गुबगुबीत.

JOLT *v. i. Ger.* हिंदुळणें, हिसकणें, धक्का बसणें; —*t.* हिंदुळणें, धक्का देणें.—*n.* धक्का, आचका. हबका.

JOSTLE *v. F.* धक्का -हिसका देणें, रेटणें, रेटारेटी क.

JOT (*Gr. iota*) a point काना, मात्रा *f*, फांटा; the least quantity लेश, अणु, तिळमात्र.—*v.* टांचून -टिपून ठेवणें [down]. -TING टिप्पण *n*, टांचण *n*.

JOURNAL (*diurnus,* belonging to the day) a diary रोजनामा, दिनचर्यालेख, दिनवृत्तपत्र *n*; *Com.* book in which every particular article or charge is fairly entered under the date of each day खतावणी *f*, पक्का खरडा; [also, a book in which is entered a condensed and grouped statement of the transactions of each month]; [a daily register of the ship's course and distance, the winds, weather, and other occurrences]; a paper published daily रोज निघणारें वर्त्तमानपत्र *n*; a periodical नियमित कालीं निघणारें पुस्तक *n*. -IST दिनवृत्तलेखक; वर्त्तमानपत्रकर्त्ता.—JOURNEY मजल *f*, सफर *f*.—*v. i.* चालणें, मुसाफरी क., वाटचालणें. -MAN रोजीनें कामास लावलेला मनुष्य, रोजिंदार; रोजीनें काम करणारा कारागीर (tailor, shoemaker).

JOVIAL *a.* (from *Jupiter*) चैनी, खुशमोजा. -ITY चैन *f*, मौज *f*.

JOY (*gaudere,* to rejoice) passion or emotion excited by the acquisition or expectation of good आनंद, हर्ष, संतोष; mirth विनोद, हास्य *n*; cause of joy आनंदहेतु, नंदन *n*.—*v. i.* आनंदित होणें, आनंद पावणें: I will j. in the God of my salvation (Hab. iii. 18).—*t.* आनंदविणें, खुशी -संतुष्ट क. -FUL *a.* आनंदी, हर्षयुक्त, खुश; ever-j. नित्यानंद, सदानंद [of]. -LESS *a.* उदास, निरुत्साह. -OUS *a.* आनंदी, उल्लासी, हर्षयुक्त [of].

JUBILEE *Heb.* [*Jewish Hist.* every fiftieth year, being the year following the revolution of seven weeks of years, at which time all the slaves were liberated, and all lands which had been alienated during the whole period reverted to their former owners]; season of great festivity महोत्सव, सण; joyfulness आनंद.

JUDAISM (from *Judæa*) यहुदी लोकांचा धर्म; conformity to the Jewish rites and ceremonies यहुदी धर्मांच्या विधीस अनुसरणें *n*.—JUDAIZE *v. i.* यहुदी धर्माप्रमाणें वागणें; reason and interpret like a Jew यहुदी मताप्रमाणें विचार व अर्थ क.

JUDGE (*jus,* law) *Law,* a civil officer who is invested with authority to hear and determine causes, civil or criminal, and to administer justice between parties, in courts held for that purpose, according to his commission, or according to law न्यायाधीश, 'जज्ज'; the Supreme Being परमेश्वर, सर्वांचा झाडा घेणारा (Gen. xviii. 25); one who has skill to decide on the merits of a question, or on the value of any thing परीक्षक, पारखी, चतुर, चिकित्सक; [(*Jewish Hist.*) a chief magistrate with civil and military powers, such as those who governed the nation more than three hundred years; the title of the seventh book of the Old Testament] न्यायाधिशाचें पुस्तक [of, for, between].—*v. i.* न्याय -इनसाफ क.; परीक्षा -पारख क.; determine ठराव क.—*t.* -चा न्याय क.; be censorious towards दोषदृष्टीनें पाहणें, दोष पाहणें -काढणें (Matth. vii. 1); reckon मोजणें, मानणें (Acts xvi. 15). -SHIP न्यायाधिशाचा हुद्दा, न्यायाधिशी *f*.—JUDGMENT विचार, विवेचन *n*; opinion मत *n*, अभिप्राय; faculty of judging truly, wisely, or skilfully परीक्षा, पारख *f*: you have good j. in horsemanship; the act or faculty of comparing objects of any kind, and discerning their relations, attributes, or properties बुद्धि *f*, समज, विवेक; the result of the act thus performed विचार, निवाडा; *Law,* sentence of the law, pronounced by a court, or a judge thereof, upon a matter in issue

in any cause before it ठराव, निर्णय; a calamity regarded as sent by God, by way of recompense for wrong committed ईश्वराचा गजब, अस्मानी चपेटा, अस्मानी *f* (Prov. xix. 29); *Theol.* the final punishment of the wicked दुष्टांचें शेवटचें शासन *n*, जगाचा शेवटचा न्याय.; to the best of one's j. यथामति विचार करून. -DAY, *Theol.* the last day, or day when final judgment will be pronounced on the subjects of God's moral government शेवटच्या न्यायाचा दिवस, न्यायदिन (on, against, for]. -HALL न्यायसभा *f*, कचेरी *f*. -SEAT न्यायासन *n*, धर्मासन *n*.—JUDICATORY न्यायसभा *f*.—*a*. न्यायाचा, न्याय करण्याचा.—JUDICATURE न्याय करण्याचा अधिकार; न्याय करण्याचा धंदा, न्यायाधिशी *f*; court of justice न्यायसभा *f*; extent of jurisdiction of a judge or court कोर्टाच्या अमलाची हद्द *f*, कोर्टाचा अमल, 'जुडिकेचर.'—JUDICIAL *a*. न्यायसभेचा; न्यायाधिशाचा, जज्जाचा (power); practised or employed in the administration of justice न्यायप्रकरणाचा, व्यवहारिक, व्यवहारविषयक, 'जुडिशल' (proceedings); ordered by a court कोर्टाच्या हुकमाचा -नें हुकूम केलेला (sale); कोर्टाचा, कोर्टानें केलेला, कोर्टाचा (determination); established by statute कायद्यानें स्थापिलेला, कायद्यानें ठराव केलेला, विधिस्थापित (law); inflicted, as a penalty or in judgment दंडरूप, दंडादाखल (punishment, hardness of heart).—JUDICIOUS *a*. according to sound judgment समजुतीचा, विवेकाचा; prudent उपयुक्त, उचित, सयुक्तिक, समर्पक (conduct); discreet समजदार, विचारवान, विवेकी (person).

JUG* चंबू, सुरई *f*, कुजा.

JUGGLE *v*. (*joculari*, to jest) amuse and make sport by tricks which make a false show of extraordinary powers हातचलाकी -गौडबंगाल -नजरबंदी क.; practise artifice or imposture गारुड-भानामती खेळणें -क.—JUGGLER गारुडी, गौडबंगाली; a cheat ठक, फसव्या.—JUGGLERY गारुड *n*, गौडबंगाल *n*, हातचलाकी *f*; ठकबाजी *f*, ठकविद्या *f*.

JUGULAR *a*. (*jugulum*, the collar-bone) गळ्याचा, कंठसंबंधी, कंठ्य (vein).

JUICE (*jus*, broth) रस, द्रव.—JUICY *a*. रसाळ, रसभरित, रसरसीत.

JUJUBE *Ar*.— the tree बोर *f*;—the fruit बोर *n*.

JULY (from *Julius*) इसवी सालाचा सातवा महिना, अषाढ-श्रावण.

JUMBLE *v*. *F*. ढवळाढवळ -गोंधळ -घप्पाघोळ क. (together).—*n*. गोंधळ, घोळ, संकर.

JUMP *v*. *i*. *Ger*. उडी मारणें, कुदणें; about खिदडणें, टिणटिण उड्या मारणें [up, down, from, off].—*n*. उडी *f*, उड्डाण *n*.

JUNCTION (*jungere*, to join) जोडणें *n*, संयोजन *n*; combination जोड, मिलाफ, संयोग; place or point of union सांधा, संधि—JUNCTURE सांधा, संधि, जोड: the j. of a vessel; a joint पेर *n*, संधि; a point rendered critical or important by a concurrence of circumstances संधि *f*, योग; perilous j. कच *f*; unseasonable j. आडसंधि *f*.

JUNE (from *Juno*) इंग्रजी सालाचा सहावा महिना, जेष्ठ-अषाढ.

JUNGLE *Hind*. जंगल *n*, रान *n*.

JUNIOR *a*. (*L*.) धाकटा, कनिष्ठ; धाकट्याचा; [j. is app. to distinguish the younger of two persons bearing the same name in the same family].

JUPITER (*L*.) रोमन लोकांचा मुख्य देव होता; *Astron*. बृहस्पति, गुरु J. of the Hindus इंद्र.

JURIDICAL *a.* (*jus,* law, *dicare,* to pronounce) न्यायाधिशाचा; कोर्टांतला, अदालतींचा. —JURISDICTION न्यायाचें काम पाहण्याचा अधिकार; कायदे करण्याचा किंवा अमलांत आणण्याचा अधिकार; अधिकाराची हद्द *f,* अमल, अमलदारी *f.*—JURISPRUDENCE (*-prudentia,* prudence) the science of law व्यवहार -धर्मशास्त्र *n.*—JURIST धर्मशास्त्र जाणणारा, धर्मशास्त्रज्ञ.

JURY (*jurare,* to swear) a body of men, selected according to law, impanelled and sworn to enquire into and try any matter of fact, and to declare the truth of it on the evidence given them in the case पंच *pl,* 'जुरी' *f,* सभासद. -BOX जुरी बसायाची जागा *f,* 'जुरी बाक्स' *n.* -MAN जुरीवाला, जुरींतली असामी *f.*

JUST *a.* (*justus*) upright नीट, सरळ; honest प्रामाणिक, न्यायी, इनसाफी, सचोटीचा (judge); regular नीट, सरळ (array); accurate शुद्ध, यथार्थ, बराबर, समर्पक (expression, description); conforming to rectitude रास्त, खरा, वाजवी (balances, weight).—*ad.* बराबर, नीट, थेट: he guided my hand j. to the heart of the beast; j. now आतां, आतांशीं, इतक्यांत; j. as तसाच; but j. नुस्ता, केवळ, मात्र: having but j. enough; closely थोडक्यांत, जवळून: I j. escaped drowning मी बुडतां बुडतां वांचलों. -LY *ad.* न्यायानें, इनसाफानें; ठीक, वाजवी, यथायोग्य. -ICE, the rendering to every one his due, right, or desert न्याय, धर्म, नीति *f;* integrity in commerce or mutual intercourse सचोटी *f,* प्रामाणिकपणा; impartiality समदृष्टि *f,* साम्यता *f,* निष्पक्षपात; equity उजूपणा, योग्यता *f*: the j. of a claim; merited reward or punishment योग्य बक्षिस *n,* किंवा दंड; a person duly commissioned to hold courts न्यायाधीश, 'जस्टिस.' -IFY *v.* prove or show to be just वाजवी -रास्त करून दाखविणें; defend or maintain प्रतिपादन क., संपादणूक क., प्रपादणें; pronounce free from guilt दोषमुक्त क., निर्दोष क., दोष उडवणें; *Theol.* pardon क्षमा क.; treat as just, though guilty and deserving punishment न्यायी ठरवणें (Acts xiii. 39); *Print.* form even or true lines of, as type, by proper spacing ठशाच्या अक्षरांच्या ओळी जोडणें, 'जस्टिफै क.'—*i.* ठशाच्या अक्षरांच्या ओळी बसणें -लागणें, 'जस्टिफै' होणें. -IFIABLE *a.* योग्य, वाजवी करून दाखवायाजोगा, प्रपादनीय; दोष उडवायाजोगा, दोषमोचनीय. -IFICATION निर्दोष करणें *n,* न्यायीकरणें *n,* दोषमोचन *n*; vindication प्रतिपादन *n,* स्थापन: our disobedience of God's commands admits of no j; absolution दोषमुक्ति *f*; *Theol.* the treating of sinful man as though he were just दोषी -अपराधी -पापी मनुष्यास न्यायी मोजणें *n,* न्यायीकरण *n.* -IFIER दोषमोचक, निर्दोष करणारा (Rom. iii. 26); दोष उडविणारा, प्रतिपादन करणारा.

JUT *v. i.* (See JET) बाहेर येणें -निघणें [out].

JUVENILE *a.* (*juvenis,* young) तरुण; तारुण्याचा, तरुण, तरण्यांचा (sports).—JUVENILITY तारुण्यावस्था *f,* तारुण्य *n,* यौवन *n.*

JUXTAPOSITION (*juxta,* near, *positio,* position) a placing, or being placed, in nearness or contiguity, as the parts of a substance or of a composition लगता, नैकट्य *n,* समीपता *f.*

K.

KAW *v. i.* कावकाव क.—*n.* कावकाव *f.*

KECK *v. i. Ger.* उमासा येणें, उमळणें, कळमळणें.

KEDGER *Scot.* लंगर, लोळी *f.*

KEEL* नावेचा कणा, अडें *n.*

KEEN* *a.* eager उत्सुक, हौसदार; sharp कडक, कडकडीत (appetite); sharp तेजदार,

पाणीदार, जलद (edge); severe कडकडीत, प्रखर (cold); bitter कडू, मनास लागाया -झोंबायाजोगा (sarcasm); penetrating हुशार, तीक्ष्णबुद्धि, कुशाग्रबुद्धि.

KEEP* *v.* retain ठेवणें, राखणें; detain खोळंबवणें, खोटी क.; maintain hold upon धरून ठेवणें; हातीं ठेवणें; preserve राखणें, ठेवणें: his loyalty he *kept;* have in custody of राखणें, खबरदारी क., दिमतीस ठेवणें, संभाळ क.: I will k. thee; preserve from publicity गुप्त ठेवणें; tend राखणें, बरदास्त ठेवणें (a garden); manage चालवणें, घालणें, वहिवाटणें (a school);—a house घरसंजोगणी क., घर चालवणें; entertain भोजनास ठेवणें (boarders); support in one's service चाकरीस ठेवणें; have and maintain, as a horse ठेवणें, बाळगणें: continue in, as a course or mode of action चालू ठेवणें, चालविणें; practise or perform, as a duty आचरणें, पाळणें;—as a word राखणें, पाळणें; observe, as a festival करणें, पाळणें (Ps. xlii. 4); —as one's bed, room, &c. -धरून राहणें. -च्या बाहेर न पडणें; back राखणें, मागें ठेवणें, चोरून ठेवणें (Jer. xlii. 4); आवरणें (Ps. xix. 13);—company with सोबत धरणें -क.; बराबर -संगतीं जाणें; down कह्यांत -दाबांत ठेवणें; आवरणें; अडथळा क., अडवणें; —good or bad hours नित्य लवकर किंवा उशीरां घरीं येणें किंवा निजायास जाणें; up कमी होऊं न देणें, न गमावणें, राखणें, संभाळणें, ठेवणें (prices of goods, one's credit).—*i.* राहणें, असणें: to k. at a distance; राहणें, निभणें, टिकणें, तगणें: apples that will k.; dwell राहणें, बिऱ्हाड असणें, रहिवास धरणें; from -पासून दूर राहणें, वर्जणें; on राहणें, चालणें, जाणें: he *kept* on singing; to चिकटून -धरून राहणें -असणें: to k. to old customs, to one's word, promise; up हिंडता -फिरता असणें; अजीत -मोकळा -अनधीन असणें. —*n.* स्थिति *f*; राखण *f*; case गवसणी *f*, संपुट *n*; provisions by which one is kept चंदी *f*, मोताद *f*: the k. of a horse; stronghold गढी *f*, किल्ला, वगैरे बळकट जागा *f*; a charge दिमतीस सोपलेलें काम *n* -ली वस्तु *f*. -ER राखणारा, ठेवणारा; दिम्मतदार, जिम्मेदार; रखवालदार, रक्षक, राख्या; पालन -रक्षणकर्त्ता, रक्षक, पालक; a ring serving to keep another on the finger अडकण *n*; one who retains in custody बंदिशाळेचा रखवालदार.—of the forests अरण्यरक्षक;—of the Great Seal मोहरबरदार. -ING राखणें *n*, धारण *n*; दिमत *f*, रखवाली *f*; संगोपन *n*, निगा *f*, जतन *f*; consistency जम, बनाव, घटाव. -SAKE आठवणीसाठीं दिलेली -ठेवलेली वस्तु *f*, यादगिरी *f*, आठवणूक *f*.

KEN* *v.* see at a distance दुरून पाहणें; know ओळखणें, जाणणें.

KENNEL (*canis*, a dog) कुत्र्याचें घरकुलें *n*; pack of hounds पारधी कुत्र्यांचा कळप; the hole of a fox or other beast बीळ *n*. —(*canalis*) रस्त्याचा गटार, पन्हाळी *f*.

KERNEL* single seed of a grain-bearing or other plant दाणा, बीं *n*; the edible substance contained in the shell of a nut गर, गीर, मगज, खोबरें *n*;—of a pulpy fruit अठी *f*, अठोळी *f*: a hard concretion in the flesh अठी *f*.

KETTLE* हांडी *f*, हांडा, कढई *f*, वगैरे पाणी वगैरे तापवायाचें भांडें *n*, 'केटली' *f*. -DRUM नगारा, डंका.

KEY* a fastener अडसर, अडकण *n*; instrument to shut or open a lock चावी *f*, किल्ली *f*; instrument by which some thing is screwed or turned कळ *f*, किल्ली *f*; part of a musical instrument which is struck with the fingers घर *n*; fundamental note in a piece of music घर *n*; the

highest central stone of an arch मेहराबीचा मधला दगड *n*, कमानीची चावी *f*; that which serves as a means to unlock a secret or mystery किल्ली *f*, घर *n*; false k. चोरकिल्ली *f*. -HOLE किल्लीचें घर *n*, कुलपाचें तोंड *n*. -NOTE कमानीचा मधला दगड.

KICK *v*. *W*. लात मारणें; to k. the beam वजनांत कमी भरणें;—up a row तारा नाचविणें. —*i*. लात मारणें -उचलणें, लाथा झाडणें; recoil;—said of a musket मागें सरकणें. —*n*. लात -थ *f*, लत्ता *f*. -SHAW *F*. भलत्याचें भलतें *n*, वेडेंविद्रें *n*.

KID *D*. करडूं *n* (Is. xi. 6); a fagot लांकडाची मोळी *f*; a small wooden tub or vessel कोटंबा, काथवट *f*.

KIDNAP *v*. *Ger*. steal and carry away or secrete, as a human being, man, woman, or child मनुष्य चोरून नेणें. -ER मनुष्य चोरून नेणारा, मनुष्यस्तेयी.

KIDNEY* मुत्रपिंड, गुर्द; disposition स्वभाव: men of the same k. -BEAN उडीद Rayed k. मूग.

KILL* *v*. deprive of life जीव घेणें, मारणें, ठारमारणें; calm शांत क., शमवणें: a shower of rain *kills* the wind;—time वेळ दवडणें -घालवणें -लोटणें.

KILN* भट्टी *f*;—of a potter आवा.

KIN* relationship नातें *n*, गोत्र *n*, संबंध; relatives भाऊबंध *pl*, गोतवळा, गोत *n*; of k. गोत्रज; सजात. —*a*. सजातीय: one touch of nature makes the whole world k.—*Shaksp*.

KIND* race जात *f*, जाति *f*: human k.; sort प्रकार, तऱ्हा *f*; native character स्वभाव, गुण. -RED *n*. See KIN.—*a*. नातलग, गोत्री, गोत्रज; of the like nature सजातीय, समगुण. —KINSMAN भाऊबंद, दाईज, कुटुंबी.

KIND* *a*. showing tenderness or goodness कृपाळू, दयाळू, परोपकारी;—as an act कृपेचा, मेहरबानीचा, परोपकारबुद्धीचा. -NESS दया *f*, कृपा *f*, मेहरबानी *f*; a kind act उपकार, दयेचें काम *n*. -LINESS गोडीगुलाबी *f*, प्रीति *f*, स्नेह. -LY *a*. kindred जातीचा, सजातीय; gracious कृपाळू, दयाळू.

KINDLE *v*. (*cendere*) set on fire पेटवणें, चेतवणें; inflame, as the passions चेतवणें, पेटवणें.—*i*. पेटणें, चेतणें; संतापणें, तापणें.

KINE, *pl* of *Cow*, गाया *f pl*, गाई *f pl*.

KING *Ger*. a chief ruler अधिपति, प्रभु; a monarch राजा, नृपति, भूप; a card having the picture of a king राजा; *king's* English शुद्ध इंग्लिश भाषा *f*. -CRAFT राज्यचातुर्य *n*, राज्यनीति *f*. -DOM राज्य *n*, प्रभुत्व *n*, राज्याधिकार (Ps. cxlv. 13); dominion of a monarch राज्य *n*, राष्ट्र *n*; principal division जाति *f*, कोटि *f*, वर्ग; animal k. जीवजाति *f*; vegetable k. तृणजाति *f*; mineral k. धातुजाति *f*. -FISHER पाणकावळा, डिचा. -LY *a*. राजाचा, राजकीय, राजास योग्य, पादशाही; grand अलिजाहा, मोठा (couch); directed by the king राजाचा, राजानें चालवायाचा, राज in comp.; k. government राजसत्ताक राज्य *n*. -'S EVIL, a disease of the scrofulous kind, formerly supposed to be healed by the touch of a king गंडमाळा *f pl*. -SHIP राज्यधिकार, राजपद *n*.

KIRK* (See CHURCH) ख्रिस्ती देऊळ *n*; [the regular or established Church of Scotland]; k. session, a petty ecclesiastical session in Scotland 'कर्क सेशन' *n*, वडील वर्गाची सभा *f*.

KISS* *v*. salute with the lips मुका -चुंबन घेणें; caress गोंजारणें, लाड क.; touch gently, as if fondly हळूच -ममतेनें -लाडानें स्पर्श क. -हात लावणें: when the sweet wind did gently k. the trees.—*n*. मुका, चुंबन *n*.

KIT *D.* a vessel of various kinds and uses भांडें *n*, पात्र *n*; the whole outfit खटलें *n*, चवाळें *n*, सामान *n*, बाडबिशात *f*.

KITCHEN* cook-room स्वयंपाकघर *n*; [utensil for roasting meat]. -GARDEN [शाकभाजीचा] मळा, परसांतली भाजी *f*, परसूं *n*. -WORK स्वयंपाकघरांतलें काम *n*.

KITE* a rapacious bird of the hawk kind घार *f*; a paper toy for flying in the air पतंग, वावडी *f*.

KITTEN (dim. of *cat*) मांजराचें पिल्लूं *n*.

KNACK *Ger.* a toy खेळ, खेळणें *n*; a nice trick कळ *f*, युक्ति *f*; adroitness हतोटी *f*, टूक *f*.

KNAG *D.* a knot in the wood गांठ *f*, गुळुंब *n*; a peg मेख *f*, खुंटी *f*; a shoot of deer's horn हरणाच्या शिंगाचा कोंब -फणगडा. -GY *a.* गांठाळ, गांठीचा; rough in temper खडतर स्वभावाचा.

KNAPSACK *D.*—of travellers पडशी *f*;—of soldiers थैली *f*, जामदानी *f*.

KNAVE* ठक, सोदा, काशीकर; at cards गुलाम; an arch-k. वाटोळा धोंडा, गोटा, पांढरा परीस, नाशीककर; a pack of *knaves* चांडाळचौकडी *f*.—KNAVERY ठकपणा, सोदेगिरी *f*; mischievous practices ठकबाजी *f*, दगलबाजी *f*, लुच्चेशाई *f*; to become an adept in k. पंख फुटणें, चौपायीं उडणें. —KNAVISH *a.* ठकाऊ, ठकडा, शठ; कुटाळ, कुचाळ.

KNEAD* *v* मळणें;—wheaten dough तिंबणें. -ING-TROUGH —of wood काठवट *f*; —of metal परात *f*, पितळी *f*.

KNEE* (*genu, Skr. janu*) गुडघा. -DEEP* *a* गुडघाभर, गुडघ्याइतका. -JOINT गुडघ्याची खीळ *f*, जानुसंधि. -PAN गुडघ्याची वाटी *f*, जानुफलक *n*.—KNEEL *v. i.* गुडघे टेकणें [down].

KNELL* stroke of a bell rung at a funeral or at the death of a person प्रेत नेण्याच्या वेळचा किंवा मनुष्य मेल्यावरचा घंटाध्वनि किंवा घांटेचा ठोका.

KNIFE* सुरी *f*; large k., सुरा; clasp-k. मोडसुरा; a sword तलवार *f*.

KNIGHT* सरदार बहादूर; एक कित्ताब आहे; —at chess घोडा. -HOOD सरदारबहादुरी *f*.

KNIT* *v.* tie बांधणें; weave without a loom मागावांचून हातानें विणणें; unite जोडणें, मिळवणें (hands); contract आठ्या घालणें (the brows) [together].—*n.* वीण *f*, विणकर *f*.

KNOB* a hard protuberance in the wood गांठ *f*, गुळुंब *n*;—in the flesh टेंगूळ *n*, गांठ *f*; a round ball at the end of any thing गोंडा, झुबका. -BY *a.* गांठाळ, गांठीचा.

KNOCK* *v. i.* strike or beat with some thing hard or heavy ठोठावणें, ठोकणें: drive against आपटणें, थडका देणें; up ठकणें, दमणें; off थांबणें, हात अटपणें; under दबणें, हात टेंकणें, कचकणें.—*t.* strike मारणें, ठोकणें; drive against आपटणें, आदळणें: to k. the head against a post; down पाडणें, लोळवणें, आपटणें; टोला -टोले -ठोसा -ठोसे मारून खालीं पाडणें; *Auctions,* assign to a bidder by a blow or knock लिलावांत (घेणाराच्या) माथीं मारणें, हडसणें; — in the head, or on the head मस्तकावर प्रहार करून मूर्च्छित क., किंवा ठार मारणें; मोडणें, पाणी ओतणें, लथडविणें, लटपटविणें;—off झपाटणें, फटकारणें; out हाणून -मारून बाहेर काढणें (the brains); up ठोकून -ठोठावून उठवणें; थकविणें, शिणवणें, भागवणें.—*n.* ठोका, प्रहार; a strike on a door intended as a request for admittance आंत घेण्याकरितां दारावर थाप *f* -ठोका, दार उघडण्याची थाप *f*.

KNOT* a complication of threads, cords, or ropes, formed by tying, knitting, or entangling, and resisting separation or loosing गांठ *f*, ग्रंथी *f*; a tie गांठ *f*, नातें *n*, धागादोरा; nuptial k. रेशमाची गांठ *f*; perplexity गांठ *f*, अठी *f*, कोंडें *n*; cluster झुबका, गुच्छ; band थवा, घोळका; joint in the stem of a plant गांठ *f*, कांडें *n*, पर्व *n*; protuberance occasioned by the outgrowth of a branch डाहळीचें मूळ *n*, गांठ *f*; [a nautical mile of 6086. 7 ft.: to sail ten *knots* an hour]; — in the mind मनांतली अट *f*, गांठ *f*.—*v.* गांठ बांधणें -देणें; जोडणें, मिळवणें; घोटाळ्यांत पाडणें, गोंधळांत घालणें.—*i.* गोंधळणें; पेर -कांडें धरणें; copulate जुगणें, लागणें. -TED *a.* गांठीचा, गांठाळ -TY *a.* गांठळ, गांठळगुठळ; गुतागुतीचा, खचरट (point); कठीण (head).

KNOW* *v.*(*-gnoscere, Skr. jna*) be aware of as true ठाऊक -माहीत असणें; perceive clearly जाणणें, समजणें; be acquainted with परिचय-ओळख असणें; possess experience of -चा अनुभव -ची -प्रचीत असणें (2 Cor. v. 21); distinguish भेद समजणें -पाहणें; approve मान्य -पसंत क. (Ps. i. 6); have sexual commerce with जाणणें, जवळ जाणें, भोगणें [of, about]. — *i.* जाणणें, समजणें; परीक्षा क. [of]. -ABLE *a.* जाणायाजोगता, ज्ञानगम्य. -ALL सर्वजाणता, चतुरशहाणा; wiseacre दीडशहाणा, चतुरसाबाजी. -ING *p.a.* जाणता; intelligent चतुर, समजदार, ज्ञाता. -INGLY *ad.* जाणून, समजून, अक्कलहुशारीनें. -LEDGE जाणणें *n*; clear and certain perception of truth and duty ज्ञान *n*, बोध; that which is known जाणीव *f*; a cognition ओळख *f*; acquaintance ओळख *f*, परिचय; learning विद्या *f*, ज्ञान *n*; practical skill वाकबगारी *f*, माहितगारी *f*: a k. of seamanship; information खबर *f*, माहिती *f*; within one's k. जाणोपरी; without the k. of नकळत; spiritual k. आत्मज्ञान *n*, परमार्थज्ञान *n*; sacred and profane k. ज्ञानविज्ञान *n*; eager after k. विद्यार्थी; gained by k. विद्यालब्ध; carnal k. भोग, संग; instruction in k., esp. in the k. of the Divine nature or of one's own soul ज्ञानोपदेश.

KNUCKLE* बोटाचा सांधा, पेर *n.* — *v. i.* ठोठावणें, ठोकणें;—to हात टेंकणें, बें म्हणणें; झटणें. —*t.* बोटांच्या पेरांनीं मारणें.

KORAN *Ar.* कुरान *n.*

L.

LABEL *W.* खुणेसाठीं जी चिठी मारतात ती *f*, खुणपटी *f*.—*v.* खुणपटी -चकती मारणें.

LABIAL *a.* (*labium*, lip) ओठांचा; formed by the lips ओष्ठ्य (letters).—*n.* ओष्ठ्यवर्ण —LABIODENTAL *a.* दंतोष्ठ्य.

LABOR (*L.*) physical toil or bodily exertion मेहनत *f*, श्रम, कष्ट; mental effort श्रम, मनाचा श्रम, मनोनिवेश; that which demands effort श्रमाचें काम *n*; travail प्रसुति वेदना *f*; forced l. बिगार *f*, वेठ *f*; day l. रोजमजुरी *f*.—*v. i.* श्रम -कष्ट क.; यत्न -प्रयत्न क., झटणें; श्रमी होणें, कष्ट भोगणें; प्रसुतिवेदना भोगणें, वेण येणें.—*t.* कमावणें, राबून तयार क, मशागत क.; श्रमानें क. [at]. -ATORY a chemist's workroom रसायनशास्त्राचें वैद्यक्रियेचे प्रयोग करण्याची जागा *f*, रसायनकर्मगृह *n*; place where any thing is prepared for use कारखाना, उद्योगगृह *n*. -ER मेहनत करणारा; as disting. from an artisan कामकरी, मजूर; a day l. मजूर. -IOUS *a.* मेहनतीचा, उरस्फोडीचा, कठीण; मेहनती, कष्टाळू, कामसू (mechanic). -IOUS, -LY *ad.* कष्टानें, श्रम घेऊन, श्रमपूर्वक.

LABYRINTH (*labyrinthus*) place full of intricacies गिरकांड्याची जागा *f* -वाट *f*; maze गूढ *n*, कूट *n*, चौऱ्यांशीचा फेरा.

LAC (*Skr. lâkschâ* and *râkshâ*, from *randj*, to dye) लाख *f*, अळता.

LAC *Hin.* लक्ष, लाख.

LACE (*laqueus*, noose) a delicate tissue of thread फीत *f*, नाडी *f*; a string often plaited or otherwise ornamented विणलेली जाळी, 'लेस' *f*; plaited cord विणलेला दोरा -जाळी *f*.—*v.* विणणें, नाडींनें -फितींनें बांधणें; जरीकांठ लावणें.

LACERATE *v.* (*lacerare*) tear फाडणें, विदारणें; afflict दुःख देणें, विदारणें (the heart).

LACK *v. Ger.* उणा -कमी असणें (James i., 5). —*i.* उणें पडणें. —*n.* कमताई *f*, वाण *f*. -LUSTRE *a.* निस्तेज (eyes); as a pearl खडेवजा, नरम.—*n.* निस्तेजपणा.

LACKER *Ger.* रोगण *n.* — *v.* रोगण लावणें -चढवणें.

LACKEY *F.* खिदमतगार, पोऱ्या.

LACONIC *a.* (from *Laconia* or *Sparta*) थोडक्यांत पुष्कळ बोलून दाखवायाचा, अल्पशब्दक, संक्षिप्त.—& LACONISM *n.* थोडक्यांत पुष्कळ बोलून दाखवायाची रीत *f*; a concise phrase संक्षिप्त वाक्य *n*, संक्षिप्तोक्ति *f*.

LACTAGE (*lac*, milk) दुभतें *n*, गोरस.—LACTARY दुभत्याची जागा *f*.—LACTEAL *a.* दुधाचा, दुग्धमय; conveying chyle अन्नरसवाहक.—*n.* अन्नरसवाहिनी *f*.—LACTESCENT *a.* दूध देणारा, दुग्धोत्पादक; चिकानें -दुधानें भरलेला. —LACTIFEROUS *a.* दूध नेणारा, दुग्धवाहक.

LAD* पोरगा, आडबाप्या, शिशु, कुमार.

NON-COMPLIANCE कबूल न करणें *n*, नाकबुली *f*, अस्वीकार.

NON-CONFORMIST अननुरोधी, अननुसारी; one who does not conform to an established church देशस्थापित राजधर्मविरोधी.

NON-CONDUCTOR ज्यांतून वीज किंवा उष्णता बाहेर जात नाहीं तो पदार्थ.

NON-DESCRIPT *a.* (*-descriptus*, described) अवर्णित, जाचा वर्ग लावितां येत नाहीं असा, विलक्षण.—*n.* विलक्षण पदार्थ, अवर्णित वस्तु *f*, अगडबगड *n*.

NONE* *a.* & *pron.* कोणी नाहीं, एकही नाहीं; not any अगदीं -सुतरां -कांहीं नाहीं.—NON-ENTITY, non-existence नाहींपणा, अभाव; thing not existing शून्य *n*, अवस्तु *f*. -EXISTANT *a.* न असणारा, अविद्यमान.

NON-PLUS (*-lus*, more) state in which one is unable to proceed or decide गोंधळ, घोळ, पेंच.—*v.* गोंधळांत पाडणें -घालणें निरुत्तर क., पछाडणें, मेख मारणें, कुंठित क.

NON-RESISTANCE अप्रतिकार.—NONSENSE कांहींचें बाहीं *n*, लटरफटर *n*, बडबड *f*; trifles सटरफटर *n*, अगडबगड *n*.—NONSENSICAL *a.* निरर्थक, अचावचा, बाष्कळ; to talk n. झकमारणें.

NONSUIT *v.* दावा रद्द क. -ED वादांत हरलेला.

NOOK *Ir.* कोपरा, कोन.

NOON (*nona*, the ninth hour) दुपारची वेळ *f*, दोनप्रहर; at n. दुपारीं; height of n. उभी -टळटळती दुपार *f*.—*a.* दुपारचा, माध्यान्हिक. -ING दुपारची वामकुक्षी *f*; a repast at noon दुपारचा फराळ.—NOON-TIDE दोनप्रहरचा, दुपारचा.—*n.* दुपार *f*, दोनप्रहर.

NOOSE *Ir.* सरफांस, निसरगांठ *f*; n. for the neck गळफांस; n. to entangle in नागपाश.

NOR* *conj.* हेंही -तेंही नाहीं, न.

NORMAL *a.* (*norma*, rule) नेमाप्रमाणें, नियमित; n. school पंतोजी तयार करण्याची शाळा *f*, 'नार्मल स्कूल' *n*.

NORTH* उत्तरदिशा *f*.—*a.* उत्तर, उत्तर दिशेकडचा, उत्तरेकडचा. -EAST ईशानी दिशा *f*.—*a.* ईशानी कडचा, पूर्वोत्तर. -ERLY *a.* उत्तरेचा.—*ad.* उत्तरेकडे; in a northern direction उत्तरेकडचा -ला, उत्तराभिमुख; proceeding from the northern point उत्तरेकडून निघणारा. -ERN *a.* being in the north उत्तरेस असणारा, उत्तरस्थ; in a direction towards the north उत्तर दिशेकडचा (course). -ING—of the sun उत्तरायण *n*. -POLE, -STAR उत्तर ध्रुव. -WARD उत्तरेकडे. -WEST वायव्य दिशा *f*.—*a.* वायव्य दिशेकडचा. -WIND उत्तरेकडचा वारा, उत्तरवायु, उतरण *f*.

NOSE* (*Skr. nâsâ*) the organ of smell नाक *n*; power of smelling वास घेण्याची शक्ति *f*; scent वास; snout मुसकाड *n*, मुसकट *n*; to blow the n. नाक शिंकरणें; to bore the n. नाक टोंचणें; to lead by the n. नाकीं वेसण घालणें; follow your n. नाकासमोर जा; to put one's n. out of joint नाक कापणें; to measure noses भेटणें, गांठ पडणें; to take pepper in the n. नाकांतले केंस जळणें; having the n. cut नकटा; to bleed at the n. नाक फुटणें; to thrust one's n. into लांडा -लुबरा कारभार क. -GAY फुलांचा झुबका -गुच्छ. -RING नथ *f*.—NOSTRIL नाकपुडी *f*.—NOZZLE सोंड *f*, तोंड *n*.

NOSOLOGY (*Gr. nosos*, disease, *logos*, discourse) science of diseases रोगनिदानशास्त्र *n*.

NOSTRUM (*nos*, we) quack medicine जडीबुट्टी *f*, वल्ली *f*, औषध *n*.

NOT* *ad.* नाहीं.

NOTCH *D.* nick सड, कात्रा, खांड *f*; as cut in

a tree, made in a wall, &c., for the foot पावडा; as cut to facilitate breaking तोड *f*; as made for or worn by a rope करकोंचा.

NOTE (*nota*) a mark खूण *f*, निशाणी *f*, चिन्ह *n*; mark to call attention इशारत *f*; memorandum टिपण *n*, टीप *f*; a brief remark टीप *f*, टीका *f*; short letter चिट्ठी *f*, 'नोट' *f*; promissory n. चिट्ठी *f*, दस्तऐवज; bank n. 'नोट' *f*, ब्यांकनोट' *f*; *Mus.* tune सूर, स्वर; notice धोरण *n*, लक्ष *n*; reputation आबरू *f*, प्रतिष्ठा *f*, नांव *n*.—*v.* लक्ष देणें, ध्यान देणें -लावणें; टिपणें, टांचणें, मांडणें; टीका लिहिणें -क. -BOOK स्मरणवही *f*.—NOTED *a.* प्रसिद्ध, महशूर, विख्यात.—NOTABLE *a.* लक्षांत ठेवण्याजोगा, स्मरणीय; प्रसिद्ध, विख्यात; smart हुशार, चलाख; plain स्पष्ट, उघड; a n. housewife सुगरण *f.* [for].—NOTARY करारनामे वगैरे कागदपत्रांवर शिक्का करणारा, दबीर. —NOTATION अंकन *n*; *Mus.* numerical n. प्रस्तर.—NOTICE नजर *f*, दृष्टि *f*; heed लक्ष *n*, अवधान *n*, ध्यान *n*; intelligence बातमी *f*, खबर *f*, सूचना *f*, इशारत *f*; writing containing formal, customary, or presented information प्रसिद्धिपत्र *n*, जाहिरात *f*, 'नोटिस' *f*; respectful treatment आदरसत्कार, सन्मान, संभावना *f*.—*v.* पाहणें, लक्षांत आणणें; pay attention लक्ष देणें, धोरण ठेवणें -राखणें; make observation on -विषयीं लिहिणें -बोलणें, गोष्ट काढणें: the plant deserves to be *noticed* in this place; treat with attention and civilities आदरसत्कार -संभावना क. -ABLE *a.* लक्षांत ठेवण्याजोगा, लक्ष्य.—NOTIFICATION जाहिरात *f*, जाहीरनामा; कळवणें *n*, ज्ञापन *n*, सुचवणें *n*, सूचना *f*; paper giving notice जाहिरात *f*, जाहीरनामा.—NOTIFY *v.* make known कळवणें, जाहीर क.; give notice to सुचवणें, खबर देणें [to].

NOTHING* not anything कांहीं नाहीं; nonentity नास्तित्व *n*, अभाव; not any thing of account किंमत *f*, कथा *f*, केवा (Is. xli., 24); trifle हलकी गोष्ट *f*, कस्पदार्थ *f*; a mere n. परसांतली भाजी *f*; for n. फुकट, फुकटवारी; to go for n. पोकळीस जाणें; to make n. of तृणवत मानणें; to serve for फुकट -पोट बांधून चाकरी क.—*ad.* कांहींच नाहीं, अगदीं नाहीं.

NOTION (*noscere*, to know) idea कल्पना *f*, तर्क, ग्रह; opinion मत *n*, बुद्धि *f*; high *notions* पत्राज *f*, मिजास *f*; तोरा, आढ्यता *f*; intention बेत, मनोदय. -AL *a.* कल्पित, काल्पनिक, कल्पनेचा (things); fanciful छांदिष्ट, तऱ्हेवाईक, लहरी.

NOTORIOUS *a.* (See NOTE) प्रसिद्ध, विख्यात जगजाहीर; in an ill sense डंका वाजलेला, बाजार महशूर -निरख; to be n. डंका वाजवणें, दिवा लावणें [for].—NOTORIETY प्रसिद्धि *f*, उघडीक *f*, लौकिक; in an ill sense बोभाटा, बभ्रा, धांडोरा.

NOTWITHSTANDING *prep.* असें असतांही, तथापि, तरी.

NOUGHT, See NAUGHT.

NOUN (*nomen*) *Gram.* नाम *n*; n. of agency कर्तृवाच्य *n*; n. animate प्राणिवाचक; abstract n. भाववाचक; gentile n. जातिवाचक; instrumental n. कारणवाच्य; simple n. भाववाच्य; verbal n. क्रियावाचक.

NOURISH *v.* (*nutrire*) feed and cause to grow पोसणें, पाळणें, वाढविणें; encourage धैर्य -दिलासा देणें; comfort सांत्वन -समाधान क.; instruct शिकविणें, बोध क. -ER पालनपोषण करणारा; that which nourishes पौष्टिक. -ING *a.* पौष्टिक, धातुपोषक. -MENT पालन *n*, प्रतिपालन *n*; food अन्न *n*, भक्ष्य *n*, आहार.

NOVEL *a.* (*novus*, new) नवा, नवका; strange नवा, अद्भुत.—*n.* कल्पित कथा *f*, गोष्ट *f*, कादं-

बरी *f*, 'नाव्हेल' *n*. -TY नवेपणा, नूतना *f*; new thing अपूर्व वस्तु *f*, नवल *n*, कौतुक *n*; विलक्षणता *f*, अपूर्वता *f*, नवलाई *f*. -IST कादंबरी लिहिणारा.

NOVEMBER (*novem*, nine) इंग्रजी सालाचा अकरावा महिना, कार्तिक-मार्गशीर्ष.

NOVICE (*novus*, new) नवशिका, नवीन अभ्यासी; [one newly received into the church, 1. Tim. iii., 6].—NOVICIATE नवशिकेपणा; time of probation नवशिकेपणाचा काळ, नूतनाभ्यासकाळ.

NOW* *ad*. at the present time आतां, सांप्रत, हल्लीं; in present circumstances असें असतां, तर; n. and then केव्हां केव्हां, कधींमधीं; till n. एथपावेतों, अद्याप. -A-DAYS *ad*. सांप्रतकाळीं, आजकाळ.

NOWAY, -WAYS, -WISE *ad*. कोणत्याही प्रकारें नाहीं, कसाही नाहीं, सर्वथैव नाहीं.—NOWHERE, See under No.

NOXIOUS *a*. (*nocere*, to harm) वावडा, अपकारक, दुष्ट [to].

NUCLEUS (*nux*, nut) गर, गीर lit. fig.; any thing about which matter is collected समुच्चायास्पद, हृदय *n*.

NUDITY (*nudus*) नागवेपणा, नग्नता *f*; the nude human figure नग्नमूर्त्ति *f*, दिगंबर.

NUGATORY *a*. (*nugax*, jesting) हलका, पोकळ, व्यर्थ, निरर्थक.

NUISANCE (*nocere*) उपद्रव, पीडा *f*; *Law*, that which annoys or incommodes पीडा करणारी वस्तु *f*, पीडा *f*, उपाधि *f* [to].

NULL *a*. (*nullus*, none) व्यर्थ, निर्जीव, रद्द, पोकळ. -IFY *v*. मोडणें, रद्द -बातळ क.

NUMB* *a*. सुस्त, जड, सुना, बधिर.—*v*. बेशुद्ध -सुना क.

NUMBER (*numerus*) assemblage made up of distinct things expressible by figures संख्या *f*, सुमार, गणती *f*, गणणा *f*; multitude समुदाय, मेळा, समूह; *Poet. pl* कविता *f*; *Gram*. वचन *n*; *Math*. अंकडा, अंक; what n.? किती? an odd n. विषमसंख्या *f*; even n. समसंख्या *f*.—*v*. मोजणें, गणणें, आंकडा घालणें; लेखणें, मानणें, मोजणें; amount to गोळाबेरीज होणें, एकंदर मिळून भरणें. -LESS *a*. असंख्य, अगणित.—NUMBERS the fourth book of the Pentateuch गणना नामक जुन्या करारांतलें एक पुस्तक *n*.—NUMERAL अंकडा, अंक; *Gram*. संख्यावाचक.—*a*. संख्येचा, संख्यासंबंधी; संख्यावाचक (letter).—NUMERATION अंकाची मांडणी *f*, संख्यापरिमाण *n*.—NUMERATOR गणणारा, गणक; *Arith*. अंश.—NUMERICAL *a*. संख्येचा, संख्येसंबंधी; अंकड्यांचा, अंकात्मक; identical तोच, एकरूप.—NUMEROUS *a*. मोठ्या संख्येचा, पुष्कळ, बहुत; musical सुस्वर गायनाचा.

NUN (*nonna*) a woman devoted to a religious life, who lives in a cloister or nunnery, secluded from the world, under a vow of perpetual chastity विरक्तस्त्री *f*, गोसावीण *f*. -NERY गोसाविणींचा मठ.

NUNCIO (*novus*, new) messenger दूत, जासूद; [ambassador from the pope to a king].

NUPTIAL *a*. (*nuptiæ*, marriage) लग्नसंबंधी, वैवाहिक; constituting marriage विवाहात्मक; *pl* लग्न *n*, विवाह.

NURSE (*nutrire*, to nourish) one who nourishes प्रतिपाळ करणारा, पाळक; woman who has the care of young children मुलें संभाळणारी बायको *f*, आया *f*; woman who suckles an infant not her own दाई *f*, थानकरीण *f*, दूधकरीण *f*; woman who has the care of sick persons रोग्याची सेवा -संभाळ करणारी स्त्री *f*, बिमारदार *f Hind.*; to put to n. दाईच्या स्वाधीन क.; wet n. दाईपिलाई *Hind.*—*v*. संभाळणें, राखणें; पालनपोषण क.; रोग्याची चाकरी-शुश्रुषा क. [up, in, at].—NURSERY

मुलांची खोली *f*, बालगृह *n*;—of young trees रोपांची जागा *f*; fostering place पालनस्थान *n*.—NURSLING तान्हें मूल *n*.—NURTURE food आहार, भक्ष्य *n*; education शिक्षा *f*, शिकविणें *n*, शिक्षण *n*.—*v*. पालन-पोषण क.; शिकवणें, सुशिक्षित क.

NUT* टणक कंवचीचें फळ *n*, सकवच फळ *n*. -CRACKER अडकिता. -MEG जायफळ *n*. -SHELL कंवची *f*.

NUTRIMENT (See NURSE) भक्ष्य *n*, आहार; पौष्टिक पदार्थ.—NUTRITION भक्ष्य *n*, आहार, जीवन *n*; पौष्टिक पदार्थ.—NUTRITIOUS *a*. पौष्टिक, धातुपुष्ट.

NYMPH (*nympha*) *Myth*. goddess of the forests, or waters वन किंवा जलदेवता *f*; maiden कुमारिका *f*, तन्वंगी *f*.

O

O *int*. अरे, रे; in respect अहो, हे, हो.

OAK* एक वृक्ष आहे, सिंदूरवृक्ष.

OAKUM* जुने दोरीचा काथा.

OAR* वल्हें *n*; blade of an o. चपणी *f*; staff of an o. पतिंगा.—*v*. वल्हें मारणें.

OASIS *Ar*. वाळवंटांतील ओलाव्याची जागा *f*.

OAT* एक धान्य आहे.

OATH* a solemn affirmation or declaration, made with an appeal to God for the truth of what is affirmed शपथ *f*, आण *f*; careless and blasphemous use of the name of the Divine Being, or any thing divine or sacred, either by way of appeal or as a profane exclamation or ejaculation]; to administer an o. शपथ देणें -घालणें; to substantiate by o. क्रिया क.; to take an o. शपथ वाहणें -खाणें -घेणें -क. -BREAKING शपथभंग, क्रियानाश.

OBDURACY (*-durare*, to harden) मनाचा कठीणपणा, पापनिग्रह.—OBDURATE *a*. पश्चात्ताप न होणारा, अनुतापपराङ्मुख, हट्टी.

OBELISK (*Gr. obelos*, a spit) मनोरा, सूच्याकारस्तंभ; *Print*.† या प्रकारची खूण *f*.

OBEY *v*. (*-audire*, to hear) give ear to ऐकणें, मानणें; submit to the government of अधिकारांत -सत्तेंत -कह्यांत वागणें; yield to the impulse, power, or operation of वश होणें; comply with the order of हुकूम बजावणें, आज्ञा पाळणें.—OBEDIENCE आज्ञापालन *n* -धारण *n* -सेवन *n* [to].—OBEDIENT *a*. आज्ञेंत वागणारा, आज्ञाधारक -पालक, आज्ञांकित, हुकमी [to].—OBEISANCE नमस्कार, नमन *n*; profound o. साष्टांग नमस्कार.

OBJECT *v. i*. (*-jacere*, to throw) अडचण सांगणें, तकरार -दिकत घेणें.—*t*. bring into opposition आडवा आणणें; offer in opposition आडवा क., दोषरूपानें पुढें क. [to, against]; reproach with दोष लावणें, हिणावणें.—*n*. that with which the mind is occupied in the act of knowing विषय; in comp. गोचर, पात्र *n*: इंद्रियगोचर, कृपापात्र; that to which the desire is directed आशय, अर्थ, हेतु, अभिप्राय; *Gram*. कर्म *n*.—OBJECTION शंका घेणें *n* -काढणें *n*; शंका *f*, आशंका *f*, हरकत *f*, बाध. -ABLE *a*. आशंका घेण्याजोगा, बाध्य.—OBJECTIVE *a*. वस्तूचा, विषय संबंधी; *Metaph*. outward बाहेरचा, मनाच्या बाहेरचा, स्थूल; *Gram*. कर्मपद विषयक.

OBLATE *a*. (*oblatus*) दोहों बाजूंस चपटा.

OBLATION (*offerre*, to offer) बळी, देवोपहार.

OBLIGE *v*. (*-ligare*, to bind) constrain by moral or legal force बांधणें, भाग पाडणें, नाप्राप्त क.; bind by some favor rendered उपकारानें बांधणें; do a favor to -वर कृपा -मेहरबानी क. [by, in, with].—OBLIGATION अवश्य कर्त्तव्यता *f*, उपकार.—OBLIGATORY *a*. आवश्यक, नाप्राप्त [on].—OBLIGED आभारी -उपकारी झालेला;—by a favor उपकारबद्ध;

भाग पडलेला.—Obliging *a.* उपकारशील -बुद्धि, परोपकारी.

Oblique *a.* (*obliquus*) slanting तिरकस, तिरपा; underhand उपरोधिक, उपरोधाचा, वक्र; collateral बाजूच्या नात्याचा, शाखा संबंधी; o. case, *Gram.* कारक विभक्ति *f*; o. speech वक्रोक्ति *f*; o. vision वक्रदृष्टि *f*.—Obliquity तिरकेपणा, वांक, वक्रता *f*; deviation from moral rectitude चळ, विपथगमन *n*.

Obliterate *v.* (*litera,* letter) blot out पुसून टाकणें, बोळा फिरवणें; wear out झिजवणें, जीर्ण क. (ideas); reduce to a very low state मंद -हलका क. (pulse) [from, with].—Obliteration लोप करणें *n*, लोप; extinction लोप, संहार, समूळनाश.

Oblivion (*oblivisci,* to forget) विस्मृति *f*, विसर; amnesty गुन्ह्याची माफी *f*, सूट *f*; in o. नांवनट; to bury in o. -वर माती टाकणें -धूळ लोटणें; to fall into o. सांडणीस पडणें; to cast into o. सांडणीस टाकणें.—Oblivious *a.* विसर -विस्मृति पाडणारा; forgetful विसराळू, विसऱ्या [of].

Oblong *a.* (*-longus,* long) लांबोडा, दीर्घचतुरस्र.

Obloquy (*-loqui,* to speak) language that casts contempt on men or their actions निंदा *f*, अपवाद, गर्हा *f*.

Obnoxious *a.* (*noxius,* hurtful) liable to censure दोष ठेवण्याजोगा, दोषपात्र; odious नावडता, अप्रिय, वीट येण्याजोगा; liable योग्य, पात्र, वश्य, अधीन; o. to punishment दंडयोग्य -पात्र;—to disease रोगाधीन [to].

Obscene *a.* (*obscenus*) offensive to chastity and delicacy अभद्र, बिभत्स, अवाच्य (language, picture);—of person विचकट, तोंडाचा फटकळ; filthy मळीण, हिडीस; inauspicious अशुभ, अमंगळ, अभद्रसूचक (birds).—Obscenity विचकटपणा, बीभत्सपणा; lewdness बदफैली *f*, दुर्भाषण *n*, दुरुक्ति *f*.

Obscure *a.* (*obscurus*) dark निस्तेज, निबिड; abstruse गूढ, खोल, दुर्बोध (inscription); living in darkness अंधारांत राहणारा (bird); retired आडवळणाचा, कुशीचा (place); unnoticed अप्रसिद्ध, सांदीकोंदीचा (person); not clear अस्पष्ट, अव्यक्त, पुसट, चुटपुट (view).—*v.* अंधक -मळकट -तेजहीन क.; अवघड -कठीण दुर्बोधक. [by, with].—Obscurity अंधकपणा, पुसटपणा; गूढता *f*, गहनता *f* अप्रसिद्धि *f*, अल्पप्रतिष्ठा *f*.

Obsequies *pl.* (*-sequi,* to follow) प्रेतकर्म *n*, -क्रिया *f*, क्रिया *f*, प्रेतसंस्कार, मूठमाती *f*, मरतीक *n*.—Obsequious *a.* आर्जवी, खुशामती [to].

Observe *v.* (*-servare,* to keep) be on the watch respecting पाहणें, लक्षिणें, निरेखणें; regard with religious or ceremonious care पाळणें, करणें, आचरणें; utter as a remark बोलणें, ह्मणणें; obey मानणें, ऐकणें, पाळणें [with, from].—*i.* बोलणें, ह्मणणें; लक्ष देणें, लक्षांत ठेवणें.—Observer लक्ष लावून -निरखून पाहणारा; पाळणारा, करणारा: an o. of the Sabbath; लक्ष्यपूर्वक अवलोकन करायास शिकलेला; पाळणारा, राखणारा: he is a strict o. of his word; पाळणारा, आचरणारा, चालविणारा: an o. of old customs.—Observance पाहणें *n*, निरेखणें *n*; rule of practice नेम, विधान *n*; व्रत -नियम पालन *n*, आचरण *n*, अनुष्ठान *n*; one who is liberated from ceremonial *observances* and worldly restraints अवधूत.—Observant *a.* पाहणारा, लक्ष लावणारा, नजरबाज; पाळणारा, मानणारा; आचरणारा, करणारा; आज्ञापालक, आज्ञांकित [to].—Observation पाहणें *n*, निरेखणें *n*; निरीक्षा *f*, अवलोकन *n*; बोलणें *n*, भाषण *n*, चर्चा *f*; पालन *n*, आचरण *n*; *Science,* आकाशांतील ग्रहादिकांचा यंत्रांनीं वेध घेणें *n*, -हवा वगैरे मापणें *n*;

religious o. व्रत *n*, नियम.—OBSERVATORY तारांगण *n*, वेधशाला *f*.

OBSOLETE *a*. (*-solere*, to use) उपयोगांतून गेलेला, रद्द, माजी, लुप्त (words, observances).

OBSTACLE (*-stare*, to stand) अडथळा, अटकाव, नड *f*, विघ्न *n*, [to].—OBSTERIC *a*. प्रसवकर्म संबंधी -कर्ममोचनविषयक.

OBSTINATE *a*. (*do*.) stubborn हट्टी, दुराग्रही; not easily subdued or removed खिळणीचा, जडलेला, दुःसाध्य (fever, cough) [in]. -LY *ad*. हट्ट -खळ घेऊन, दाटून, बळेंच. —OBSTINACY, fixedness in opinion or resolution that cannot be shaken at all, or not without great difficulty दृढता *f*, धैर्य *n*, निग्रह; a fixedness that will not yield to persuasion, arguments, or other measure हट्ट, दुराग्रह, हेका, खळ.

OBSTREPEROUS *a*. (*-strepere*, to make a noise at) गलबल्या, बोलभांड.

OBSTRUCT *v*. (*struere*, to pile up) block up बंद क., बुजवणें, कोंदणें; impede आडवणें, प्रतिबंध -अटकाव क. [in, by]. -ION प्रतिबंध क. *n*; विघ्न *n*, अटकाव, प्रतिबंध, नड *f*.

OBTAIN *v*. (*-tenere*, to hold) मिळवणें, संपादणें [from, by].—*i*. subsist असणें; become prevalent चालणें, चालू होणें, प्रचारांत येणें. -ABLE *a*. मिळवायाजोगा, लभ्य, प्राप्य. -ED संपादित, प्राप्य, उपार्जित.

OBTRUDE *v*. (*trudere*, to thrust) बळेंच देणें, पदरीं घालणें -बांधणें; one's self आपलें घोडें पुढें ढकलणें, पुढें पुढें क. [on, upon].—*i*. न बोलावतां जाणें, घुसणें.—OBTRUSION बळेंच घालणें *n* -देणें.—OBTRUSIVE *a*. बळेंच घालणारा -पुढें करणारा.

OBTUSE *a*. (*-tundere*, to strike) blunt बोथट, बोथा, बिनअणीचा; dull जड, मंदमति; o. angle विशालकोन.

OBVIATE *v*. (*-viare*, to go) निवारणें, टाळणें, चुकवणें [by].—OBVIOUS *a*. उघड, स्पष्ट [to].

OCCASION (*-cadere*, to fall) occurrence घटना *f*; opportunity समय, प्रसंग, अवसर, वेळ; incident गोष्ट *f*, वृत्त *n*; need कारण *n*, प्रयोजन *n*; accidental cause निमित्त *n*, कारण *n*, उपाधि *f*.—*v*. कारण -निमित्त होणें; produce उद्भवणें, उत्पन्न क. [by]. -AL *a*. कधींमधींचा, अनित्य; नैमित्तिक, प्रासंगिक; produced by accident आगंतुक (origin). -LY *ad*. कधीं कधीं, केव्हां केव्हां; प्रसंगानें, प्रसंगानुरूप -सार.

OCCIDENTAL *a*. (*do*.) western पश्चिमेचा-कडला (climate); setting after the sun सूर्यामागून अस्त पावणारा (planet); possessing inferior hardiness, brilliancy, or beauty न्यून -कठिन तेज -प्रभ (gems).

OCCIPUT (*-caput*, head) मस्तकाचा पृष्ठभाग. —OCCIPITAL *a*. मस्तकाचा, पृष्ठभागाचा, शिरपृष्ठ संबंधी.

OCCULT *a*. (*-colere*, to till) गूढ, गुप्त, अप्रसिद्ध (guilt); o. sciences, those imaginary sciences of the middle ages which related to the supposed action or influence of occult qualities, or supernatural powers, as alchemy, magic, necromancy, and astrology चोरविद्या *f pl*.

OCCUPY *v*. (*-capere*, to take) hold वहिवाटणें, धरून -बाळगून असणें, बाळगणें; take possession धरून ठेवणें, अटपणें, गुंतवणें, आपलासा क.: the better apartments were already *occupied*; cover or fill; व्यापणें, भरणें, अटवणें; the camp *occupies* five acres of ground;—one's self खपणें, राबणें, गुंतणें; to be *occupied* रमणें; follow, as a business उद्योग -व्यवहार -व्यापार क. [by, with].—*t*. व्यापार -व्यवसाय क.; वहिवाटणें.—OCCUPANT

a. वहिवाटणारा, भोगणारा.— OCCUPANCY वहिवाट *f*, भोग.— OCCUPATION अटपणें *n*; कबज *n*, व्यापणें *n*; वहिवाट *f*, भोगवटा; employment धंदा, उद्योग, काम *n*.—OCCUPIER वहिवाटणारा.

OCCUR *v. i.* (*-currere*, to run) be found here and there अढळणें, सांपडणें, पाहण्यांत येणें; meet or come to the mind आठवणें, मनांत येणें [to]. -RENCE घडणें *n*, उपस्थिति *f*; event गोष्ट *f*, वृत्त *n*.

OCEAN (*Gr. okos*, quick, *nacin*, to flow; *Skr. ogha*, stream) समुद्र, सागर; one of the large bodies of water into which the great ocean is regarded as divided महासागर; immense expanse सागर, अर्णव: o. of trouble.—*a.* समुद्राचा (stream). -IC *a.* समुद्राचा, सागर संबंधी; found in the ocean समुद्रांतला, समुद्रांत मिळणारा; formed in the ocean समुद्रांत झालेला, समुद्रोद्भव समुद्रोत्पन्न.

OCHRE, OCHER (*ochra*) काव *f*, गेरु *f*. -OUS *a.* गेरूचा, कावेचा; गेरूच्या रंगाचा.

OCTAGON (*Gr. octo*, eight, *gonia*, corner) अष्टकोन, अष्टकोनाकृति *f*. -AL *a.* अष्टकोन.

OCTAVO (*octo*, eight) अष्टपत्री पुस्तक *n*; अष्टपत्री पुस्तकाचा सांचा.

OCTOBER (*do.*) इंग्रजी सालाचा दाहावा महिना, आश्विन -कार्त्तिक.

OCTOGENARY *a.* (*octogeni*, eighty each) ऐंशीं वर्षाचा.

OCULAR *a.* (*oculas*, the eye) डोळ्यांचा, प्रत्यक्ष (proof); o. deception नजरभूल *f*.—OCCULIST डोळ्यांचा वैद्य, नेत्रवैद्य.

ODD *a.* *Sw.* not paired with another विजोड, विलग; not included with others फुटकळ, किरकोळ; not even विषम, विषम संख्येचा; peculiar विलक्षण, चमत्कारिक, अपरूप (phenomenon); queer तऱ्हेवाईक, विलक्षण. -ITY एकचिन्ह *n*, कौतुक *n*, एक प्रकार; विलक्षण गोष्ट *f*, नवल *n*.—ODDS *sing.* & *pl.* न्यूनाधिक *n*, विषमता *f*; advantage वर्चस्व *n*, उपराळा; o.-and-ends ऐलपैल सामान *n*; सटरफटर *n*.

ODE (*L.*) गीत *n*, कविता *f*, गजल *f*.

ODIOUS *a.* (*odi*, to hate) द्वेषपात्र -योग्य; causing hate द्वेषकारक -जनक; offensive ओंगळ, त्रासदायक (sight) [to].—ODIUM द्वेष; offensiveness वाईटपणा, त्रासदायकत्व *n*.

ODOR (*L.*) वास, गंध; fragrant o. सुगंध, सुवास; bad o. दुर्गंध, घाण *f*; to be put in bad o. मर्जीतून उतरणें. -IFEROUS *a.* सुवासिक सुगंधिक (flowers); bearing scent सुगंधवाहक, सुवासिक (gales).

ŒSOPHAGUS (*Gr.*) गळा, अन्नमार्ग -गति *f*.

OF* (*Skr. apa*) belonging to चा *m*, ची *f*, चें *n*; from पासून; noting subjection to, connection with चा *m*, ची *f*, चें *n*, कडे, विषयीं, संबंधी; denoting the material of anything चा *m*, ची *f*, चें *n*; o. late अलीकडेस; o. old पूर्वी.—OFF *ad.* from, noting distance लांब, दूर; noting departure: he went o. तो निघून गेला;—the action of separating: to cut o. कापून टाकणें; to take o. काढून टाकणें; from, not toward बाहेर, सोडून: to look o.; badly o. अनुपपन्न; well o. चार पैसे बाळगून, घरचा सुखी; o.-and-on धरून, सोडून, धरसोडीनें; to be o. करार मोडणें; बेत सोडणें; to come o. निभावणें, वाचणें, बचावणें; घडणें, होणें; to get o. उतरणें, निभावणें; to go o. बार होणें, सुटणें; निघून जाणें; सोडणें; to be o. मागें सरणें, हात काढणें. -*prep.* निराळा, वेगळा; o. the ground भुईसांड; o. the road एकीकडे.—*a.* पलीकडचा, बाहेरचा, दूरचा, आगल्या: the o. ox in a team.

OFFAL *n.* (*off & fall*) waste meat उष्टें *n*, उच्छिष्ट *n*; putrid meat कुजकें मांस *n*; refuse गाळसाळ, खेर *f*, गाळ, निवड *f*.

OFFEND *i.* (*-fendere*, to thrust) displease मर्जी मोडणें, नाखुश क., रुसवणें; shock चिळस आणणें, कंटाळा -त्रास देणें (the eye, conscience); cause to fall पडायास लावणें; cause to sin पापांत पाडणें, पाप करायास लावणें (Matth. v., 29-30) [by, in, against]. —*t.* पाप क., आज्ञा मोडणें (Jam. ii., 10); to o. against -चा अपराध क. -ER अपराधी, गुन्हेगार.— OFFENSIVE *a.* राग आणणारा, चिरडोचा, तुटक (words); कंटाळवाणा, त्रासकारक, ओखट (smell, sound); used in attack मारक, मारू (weapon); invading चढाईचा, आगळिकीचा (war).

OFFER *v.* (*-ferre*, to bear) present for acceptance or rejection पुढें ठेवणें -क.; present in words सांगणें, पुढें क., दाखवणें: I o. thee two things; undertake पत्करणें, हातीं घेणें: present, as an act of worship वाहणें, अर्पिणें; sacrifice बळी देणें, अर्पिणें [up]; bid, as a price बोलणें, सांगणें, घे ह्मणणें;—as a reward देऊं करणें; to o. violence बळजोरी -जबरी -बलत्कार क. [to, for]. —*i.* येणें, पुढें होणें, उपस्थित होणें; declare a willingness पुढें होणें, सरसावणें, तयार -सिद्ध होणें: he *offered* to go मी जाईन ह्मणून बोलला; make an attempt यत्न करून पाहणें.—*n.* पुढें करणें *n*, निवेदन *n*; बोलणें *n*, सांगणें *n*; ह्मटलेलें मोल *n*, मागणें *n*. -ING बलीदान *n*.

OFFICE (*-facere*, to do) duty काम *n*, कर्त्तव्य *n*, धर्म; public charge अधिकार, हुद्दा, असामी *f*; place of business कचेरी *f*, "हपीस" *n*; company whose place of business is their office व्यापाराची मंडळी *f*, पेढी *f*; *pl* kitchens, pantries, &c. पडशाळा *f pl*; *Eccl.* service appointed for a particular occasion पद्धति *f*, विधानमाला *f*; kind *offices* उपकार *pl.* [for].—OFFICER कामदार, हुद्देदार, अधिकारी; military o. लष्करी अमलदार, सरदार, 'हपिसर.'— OFFICIAL *a.* अधिकाराचा, अमलाचा; सरकारी नात्याचा, सरकारी, अधिकारप्रयुक्त (report). o. order दप्तरी हुकूम.—*n.* खालचा दुय्यम हुद्देदार. -LY *ad.* अधिकार परत्वें; सरकारी नात्यानें.— OFFICIATE *v.* काम -अधिकार क. -चालवणें; perform the appropriate official duties of another बदलीचें काम चालवणें -क.— OFFICIOUS *a.* लुडबुड्या, चोमड्या, लांडा कारभारी.

OFFSPRING (*off & spring*) संतान *n*, संतति *f*.

OFT, OFTEN* *ad.* वारंवार, वेळोवेळ, बहुत वेळां.

OGLE *v.* (*oculus*, the eye) डोळे मोडून पाहणें, डोळे मोडणें, तिरप्या डोळ्यानें पाहणें.—*n.* कटाक्ष, नेत्रपल्लवी *f*.

OH *interj.* आ, आय.

OIL* तेल *n*, तैल *n*; fixed o. स्थिरतेल *n*; volatile o. उडणारें तेल *n*.—*v.* तेल लावणें -मारवणें -चोपडणें; to be *oiled* तेलकटणें. -CAKE पेंढ *f*. -CLOTH मेणकापड *n*, तेलकापड *n*. -COLOR तेल्यारंग, तेलाचा रंग. -MAN तेली. -NUT -TREE उंडी *f*, उंडीचें झाड *n*.—OILY *a.* तेलाचा, तेलासारखा, तेल्या (appearance); fatty गुळगुळीत, तेलकट (man);—a smell मेणकट, तेलकट; supple आर्जवी, तोंडदेख्या

OINTMENT (*ungere*, to anoint) उटणें *n*, मारवण *n*.

OLD* *a.* not young ह्मातारा, जुना, वृद्ध; not new जुना (garment); formerly existing पूर्वीचा, पूर्वकालिक, जुना, प्राचीन (custom, law); a year o. एक वर्षाचा; experienced जाणता, पक्का, पुरा, जुना (offender); long cultivated बहुत दिवस वहिवाटलेला

-राबलेला (land); worn out जीर्ण, जुना, वापरलेला (clothes); wise शहाणा, जाणता, चाणाख्य (head); wanting in the mental vigor or other qualities belonging to youth खप्पड, खल्लड, थेरडा; old-fashioned जुन्या तऱ्हेचा -चालीचा; रिवाजाचा, चालीचा; jolly आनंदाचा, उल्लासाचा, सुखाचा; of o. मागेंच, फार दिवस झाले; पुरातन काळापासून; o. age ह्यातारपण *n*, वृद्धापकाळ; उतारवय *n*; o. bachelor जन्मसन्यासी, निंब; of o. school जुन्या शाळेचा, जुन्या मताचा पंथाचा; O. Testament, that part of the Bible which contains the collected works of the inspired writers previous to Christ जुनाकरार. -NESS जुनेपणा; जीर्णत्व *n*; बहुकालित्व *n*; ह्यातारपण *n*. -WIFE वटवटणारी ह्यातारी *f*.

OLEAGINOUS *a*. (*olea*, olive) चिकण, स्निग्ध.

OLIBANUM *Ar*. गंधाबिरोजा.

OLIGARCHY (*Gr*. *oligos*, few, *archein*, to rule) government of a small number अल्पजनप्रभुत्व *n*.

OLIVE (*oliva*) जैतून झाड *n*.

OMEN (*L*.) prognostic प्रश्न, शकुन; sign चिन्ह *n*, लक्षण *n*.—OMINOUS शकुन संबंधी; auspicious शुभसूचक; inauspicious अशुभसूचक, अभद्र लक्षणाचा, अभद्र.

OMENTUM (*L*.) पोटाचा पडदा, अंत्रवेष्टन *n*, मेदोधरा *f*.

OMIT *v*. (*mittere*, to send) drop गाळणें, सोडणें, सांडणें; neglect उपेक्षा -हयगई -आळस क. [from].—OMISSION सोडणें *n*, वगळणें, *n*, वर्जन *n*; that which is omitted कसर *f*, तकावत *f*, अंतर *n*.

OMNIPOTENT *a*. (*omnis*, all, *potens*, powerful) सर्वशक्तिमान; the O. सर्वशक्तिमान ईश्वर.—OMNIPOTENCE -CY, सर्वशक्ति *f*, अनंतशक्ति *f*.

OMNIPRESENT *a*. (*-præsens*, present) present in all places at the same time सर्वव्यापी, विश्वव्यापक, सर्वगत.—OMNIPRESENCE विश्वव्यापकता *f*.

OMNISCIENT *a*. (*-scire*, to know) having universal knowledge or knowledge of all things सर्वज्ञ, सर्वसाक्षी, त्रिकालज्ञ. —OMNISCIENCE the quality of being omniscient;—an attribute peculiar to God सर्वज्ञता *f*, सर्वज्ञान *n*.

OMPHALOTOMY (*Gr*. *omphalos*, the navel, *tomas*, cutting) नाभिछेदन *n*.

ON* *prep*. at, or in contact with, the surface of a thing and supported by it वर: o. the floor; toward and to the surface of वर, पाठीवर, पृष्ठतलावर: the rain falls o. the earth; upon; denoting the acting by contact with the surface of any thing वर: to play o. a harp; besides शिवाय, खेरीज, वर: loss o. loss; at or near स, ला, शीं, पाशीं, जवळ: o. each side; the fleet is o. the coast; reliance upon वर: to depend o. a person for assistance; at or in the time of स, ला, ईं: o. the Sabbath we abstain from labor; at the time of स, ला, ईं: o. public occasions; toward वर: have pity o. me; at the peril of: o. thy life तुझ्या जिवावर; by virtue of वर: he promised o. his word; to the account of वर, कडे: o. us be all the blame; in consequence of वर, नंतर: o. the ratification of the treaty; in reference to कडून: o. our part expect punctuality; to put shoes o. the feet पायांत जोडा घालणें; to put a ring o. the finger बोटांत अंगठी घालणें; concerning विषयीं, संबंधी, स, ला: he had come o. some business; o. a sudden एकाएकीं; o. fire जळत; जळत, रागांत; o. high उंचावर; o. the alert हुशारींत, सावध; o. the way वाटेंत, चालत; o. the wing उडत; जात;

to go o. foot पायीं जाणें; o. one occasion एकदां; o. another occasion दुसरेदां; to set o. foot आरंभणें, चालू क.—*ad.* in progress पुढें, म्होरे: move o.; forward, in succession पुढें, परंपरेनें: from father to son, from the son to the grandson, and so o.; in continuance पुढें: say o., sing o.; to go o.;—speaking, singing बोलत -गात चालणें -राहणें; adhering धरून, चिकटून: he is neither o. nor off, that is, he is not steady; attached to the body स, ला, वर: his clothes are not o. (डोईस पागोटें, अंगांत अंगरखा, अंगावर धोतर). -*interj.* चला, चल. -LOOKER तमासगीर, तमाशा पाहणारा -SET, -SLAUGHT हल्ला, चाल *f*; at the first o. पहिले तिडकेस -धडाक्यास -हिरिरीस. -WARD *a.* पुढें गेलेला, अग्रसर, अग्रगामी (course); improved सुधरलेला, वाढलेला, वर्द्धित.— & WARDS पुढें.

ONE* *a.* single एक, एकच (Gen. xli., 25); single in number एक; any o. कोणी एक, कोणी; o. another एकमेक; undivided एक, एकच: the church is therefore o. though the members may be many; single in kind एक -एकाच जातीचा: o. plague was on you all; noting diversity एक: बोलणें एक आणि करणें एक; such a o. अमूक, अमका, फलाणा; all o. एकून एकच; every o. जो तो; o. by o. एक एक; many a o. कित्येक; at o. एकीनें; in o. मिळून, जथून; o. day कोणी एक दिवशीं, कधीं तरी; only o. एकच, अनन्य; having o. only refuge अनन्य गति.—*n.* person मनुष्य, माणूस; the figure एकडा; *one's* self आपण; *one's* own आपला. -NESS एकी *f*, एकपणा, ऐक्य *n.*—ONCE *ad.* at one time एकदां: o. in two years; formerly मागें, पूर्वी: I had o. some foolish notions; ever कधीं: when wilt thou give thy Redeemer the possession of your soul? when shall it o. be? at o. एकदम, लागलाच, एकदांच; एकेवेळीं, एका तडक्यानें, एकदम: they all moved at o.; लागलाच, तेव्हांच, खडोखड: go at o.; all at o. एकदम, एकठोक; एकाएकीं, अकस्मात. —ONLY *a.* one alone एकच, केवळ; by itself एकच, एकुलता: an o. child; distinguished above all others एक, सर्वांहून श्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट: the o. art.—*ad.* केवळ, मात्र, शुद्ध, निखालस; entirely अगदीं, निस्तुक, निपट, फक्त: he being o. wicked. -SIDED *a.* एकतर्फी, एकपक्षी (statement); unfair गैरवाजवी; partial पक्षपाताचा.

ONEROUS *a.* (*onus*, a load) जड, भारी.

ONION (*unio*, oneness) कांदा. -EYED *a.* आसवांनीं भरलेल्या डोळ्यांचा.

ONTOLOGY (*Gr. onta*, the things which exist, *logos*, discourse) doctrine or science of beings प्राणिमात्राचा विचार, भूतमात्रविचार.

ONYX (*L.*) गोमेद.

OOZE* soft mud गाळ, राबडी *f*, राड *f*; soft flow पाझर, निचरा.—*v. i.* पाझरणें, निचरणें. [out].—*t.* पाझरविणें, थेंबथेंब पाडणें, गळती लावणें.

OPAL (*opalus*, *Skr. upula*, a rock, stone) क्षीरस्फटिक.

OPAQUE *a.* (*opacus*) not transparent किरणप्रतिबंधक, प्रकाशाभेद्य; dark न्यूनप्रभ, निष्प्रभ.—OPACITY प्रकाशाभेद्यता *f*; प्रकाशहीनत्व *n.*

OPEN* *a.* not shut up उघडा, मोकळा (door, road); not private सर्वांचा, सार्वजनिक, चौघांचा (library, letter); exposed उघडा (letter); expanded उघडा, खुला, विकसित (flower, hand); frank मोकळ्या मनाचा, खळबळीत, निष्कपट; generous उदार, प्रगल्भ; clear स्पष्ट, मोकळा, उघडा (plans); unobstructed मोकळा, चालू (river, canal);

not balanced चालू, ओढता (account); attentive उघडा, सावचित्त, सावध (eyes); not deaf उघडा, ऐकायाजोगा (Ps. xxxiv., 15); not covered over उघडा, उघड्या तोंडाचा (vessel): free to be discussed वाद करायास मोकळा, प्रतिबंधरहित (question); easily enunciated उदात्त (vowels); o. seam, joint, &c. उसू; in the o. air उघड्यावर; in o. उघडपणीं; in o. day दिवसा ढवळ्यां; o. to all comers मुक्तद्वार [to].—*v.* उघडणें; मोकळा क.; प्रसरणें, उमलविणें;—tumor, &c. फाडणें, फोडणें, चिरणें;—a vein सोडणें, काढणें; explain अर्थ सांगणें, फोड क., उलगडणें; used reflexively, फुटणें, बोलणें, वदणें: the king *opened* himself to some of his council that he was sorry for the earl's death; begin प्रारंभ -सुरू क., उपक्रम काढणें (a discussion, fire upon an enemy);—a road, passage, &c. पाडणें, करणें, मोकळा क.; split भेगलविणें, तडकविणें;—as a letter फोडणें, उघडणें;—one's mind पोट फोडणें, मन मोकळें क.—*i.* मोकळा होणें, उघडणें, उकलणें, उमलणें; चालू होणें; bark on view of the game शिकार पाहून भोंकणें. -ING उघडी जागा *f*; a hole भोंक *n*, छिद्र *n*, रंध्र *n*; a breach भगाड *n*, भोंक *n*; आरंभ, उपक्रम: the o. of a speech. -HEARTED *a.* मनाचा मोकळा, शुद्धमति. -HANDED *a.* उदार, उदारहस्त. -LY *ad.* उघडपणें, प्रसिद्धपणें. -MOUTHED *a.* तोंड वासलेला, आ पसरलेला; greedy खादाड, बुभुक्षित. -NESS उघडेपणा; प्रसिद्धपणा, प्रसिद्धि *f*; मनाचा मोकळेपणा, खळबळीतपणा, सरळ स्वभाव; mildness, as of the weather हवेची शितळाई *f*. -सौम्यता *f*.

OPERA (*opera*, pains, work) संगीत *n*.

OPERATE *v. i.* (do.) act कार्य क., चालणें, क्रिया -व्यापार क.; produce effect गुण क., लागू -चालू होणें; *Surg.* शस्त्रक्रिया क., शस्त्रोपचार क., कापणें, चिरणें, फोडणें इ०.—*t.* चालविणें, चालू क. (machine); गुण क. [with, in].—OPERATION कृति *f*, चेष्टा *f*, खेळ *f*, व्यापार; mode of action रीत *n*, कृति *f*; शस्त्राचा उपचार, शस्त्रक्रिया *f*; influence वजन *n*, भार; काम *n*, कार्य *n*, कृत्य *n*: military *operations*.—OPERATIVE *a.* कर्मकारी, क्रियाकारी (principles); efficacious गुणकारी, कार्यसाधक, गुणावह.—*n.* laboring man कामकरी, मोलकरी, गडी, मजूर.—OPERATOR करणारा, कार्यकर्त्ता; *Surg.* शस्त्रवैद्य [in, for].—OPEROSE *a.* कष्टाचा, श्रमाचा, डोईफोडीचा (proceedings).

OPTHALMY (*Gr. ophtahlmos*, the eye) नेत्ररोग, अभिष्यंद.

OPIATE, See under OPIUM.

OPINE *v. i.* (*opinari*) विचार क.—OPINION, a mental conviction of the truth of some statement founded on a low degree of probable evidence मत *n*, समजूत *f*; judgment समज, विचार, बुद्धि *f*; good esteem खातर *f*, खातरी *f*; *Law*, the formal decision of a judge ज्यडजाचा ठराव; public o. बहुमत *n*, लोकमत *n*; regard to public o. लोकलज्जा *f*. [of, on]. -ATE *a.* मतवादी, दुराग्रही. -ATIVE *a.* स्वमताभिमानी, दुराग्रही.

OPIUM (*L.*) अफू *f*, अफीम *f*.—OPIATE झोंपेचें औषध *n*.—*a.* निद्राकारी -जनक.

OPPONENT, See under OPPOSE.

OPPORTUNE *a.* (*-portus*, the port) समयोचित, प्रसंगोचित, समर्पक, योग्य [for]. -LY *ad.* प्रसंगोपात्त, प्रसंगास, वेळेस; to come o. प्रसंगास येणें. -NESS समयौचित्य *n*, समयानुकूल्य *n*.—OPPORTUNITY समय, प्रसंग, वेळ *f*.

OPPOSE *v.* (*-ponere*, to put) set opposite समोर -आडवा ठेवणें; set against आडवा आणणें, अडती -मोडा घालणें; strive against

भिडणें, ळढणें, विरोध क., स्पर्द्धा क.; resist effectually चालूं न देणें, कुंठित क. [to, by in, for, with].—Opponent विरोधी, वैरी; वादी, पूर्ववादी; प्रतिपक्षी, प्रतिवादी.—Opposite *a.* facing समोरचा, सन्मुख; hostile विरोधी, प्रतिकूळ; contrary उलटा, विपरीत [to].—*n.* शत्रु, प्रतिपक्षी; विपक्ष, विपर्यास.—Opposition आडवा येणें *n*, विरोध, प्रतिरोध; obstacle अडथळा, विघ्न *n*, अटकाव; contrariety विपर्यय, व्यत्यय; the collective body of opposers प्रतिपक्ष; repugnance विरुद्धता *f*, विरुद्धभाव.

Oppress *v.* (*-premere*, to press) दाबणें; press severely, unjustly, or cruelly काचणें, पीडणें, जाचणें; sit or lie heavy upon उरावर छातीवर बसणें: excess of food *oppresses* the stomach [with, by]. -ion जुलूम, जबरदस्त *f*; state of being oppressed जाच, कांच; sense of heaviness भार, जड वाटणें *n*, जाड्य *n*; injustice अन्याय, जुलूम; misery दुःख *n*, कष्ट *pl.* -ive *a.* जुलमी, जबरदस्त (taxes); जड, भारी कठीण, जबर (grief); जुलमाचा, जबरदस्तीचा (commands.)

Opprobrious *a.* (*-probrum*, reproach) निंदक, अपवादक, कुटाळीचा (words); despised तुच्छ, निंद्य (name) [to].—Opprobrium, reproach mingled with contempt धिःकारयुक्त निंदा *f*, हेटाळणी *f*.

Optative *a.* (*optare*, to wish for) इच्छासूचक.—Option निवडण्याचा अधिकार; preference अधिक आवड *f*, चहा *f*; wish इच्छा *f*, मर्जी *f*, खुशी *f*. -al *a.* खुशीचा, इच्छेचा; खुशीवर ठेवलेला -सोडलेला, इच्छाधीन.

Optic -al *a.* (*Gr. optomai*, to see) दृष्टीसंबंधी, नजरेचा; relating to the organ of sight चक्षुरिंद्रियाचा, नेत्रेंद्रियाचा (nerve); relating to the science of optics दर्शनानुशासनशास्त्र संबंधी.—Optics दर्शनानुशासन *n*.

Opulent *a.* (*ops, opis*, power) मातबर, श्रीमान, धनसंपन्न.—Opulence संपत्ति *f*, श्रीमंती *f*, मातबरी *f*.

Or* *conj.* अथवा, किंवा, नाहीं तर.

Oracle (*orare*, to speak) answer of a god or some person reputed to be a god, among the heathen to an enquiry made respecting some affair of importance शकुन, प्रश्न, प्रसाद; deity who was supposed to give the answer शकुनाचा देव, प्रसाददेव; place where the answer is given गाभारा, शकुनस्थान *n*; *pl* communications, revelations, or messages delivered by God to prophets ईश्वरी प्रगटविणें *n*, ईश्वराकडून आलेला निरोप, दृष्टांत; the entire Sacred Scriptures ईश्वरोक्त शास्त्र *n* (Heb. v., 12); *Jewish Antiq.* the sanctuary, or most holy place in the temple, in which was deposited the ark of the covenant गाभारा (1 Kings vi., 19); one who communicates a divine command, an angel, a prophet ईश्वराची आज्ञा कळविणारा, दूत, भविष्यवादी इ०; person whose opinion is to be regarded with great authority ठोक्याचा माणूस, खऱ्या बत्तीशीचा माणूस; wise sentence or decision of great authority अभियुक्त वचन *n*, प्रसाद -आप्तवचन *n*; to consult gods and *oracles* देवीं धर्मीं विचारणें; to give an answer,—an o. thus consulted कौल -प्रसाद देणें; to give a favorable answer,—an o. उजवी देणें; to give an unfavorable answer डावी देणें.—Oracular, Oraculous *a.* प्रसाद -कौल देण्याचा; like an oracle देव -प्रसादवाणीतुल्य.

Oral *a.* (*os, oris*, the mouth) तोंडचा, तोंडजबानीचा: o. answer तोंडजाब; o. inter-

course तोंडच्या तोंडीं व्यवहार; o. statement तोंडजबानी *f.* -LY *ad.* तोंडजबानीनें.

ORANGE *Ar.*—the tree नारंगी *f*, नारिंग *n.*—the fruit नारिंग *n.*

ORATION (*orare*, to speak) वक्तृत्व *n*, पांडित्य *n.*—ORATOR वक्ता, पंडित, बृहस्पति.—ORATORY सभापांडित्य *n*; eloquence शब्द -वाक्-चातुर्य *n*; a place of prayer esp. a chapel or small room set apart for private devotions प्रार्थनागार.

ORB (*orbis*) a globe गोल, गोलक; one of the celestial spheres आकाशगोल, सूर्य, चंद्र इ०; the eye नेत्रगोल; orbit कक्षा *f*, फेरी *f* (ग्रहाची). -IT कक्षा *f*, ग्रहपथ.

ORCHARD* फळांची बाग *f*, फलवृक्षवाटिका *f*, उपवन *n.*

ORDAIN *v.* (*ordo*, order) व्यवस्था क., स्थापणें, लावून देणें; set apart for an office नेमणें, योजणें, अधिकृत क.; introduce into the office of the Christian ministry, by the laying on of hands, or other appropriate forms ख्रिस्ती धर्माधिकाराची दीक्षा देणें.—ORDER regular arrangement क्रम, बेत, व्यवस्था *f*; proper condition सुस्थिति *f*, व्यवस्था *f*, बंदोबस्त: the muskets are all in good o.; fit appearance रंग, रूप *n*; customary mode of procedure रीत *f*, पद्धति *f*, क्रम, परिपाठ; regular government बंदोबस्त: preserve good o. in community; regulation कायदा: the rules and *orders* of a legislative house; command आज्ञा *f*, हुकूम, ताकीद *f*; commission to make purchases or supply goods मालखरिदी करण्याची किंवा पुरविण्याची वरदी *f*, मुखत्यारी *f*; a direction or order to pay money वरात *f*, वरातचिठ्ठी *f*, रोखा, 'आर्डर' *f*; free pass परवाना, दस्तक *n*; rank वर्ग, प्रत *f*: o. of nobles; religious fraternity मार्ग, पंथ, आश्रम; [*Episcopal Church.* office of the Christian ministry; to take *orders* that is, to become deacon or priest]; [*Arch.* one of the five principal methods, recognized by the ancients for constructing and ornamenting the columns of an edifice]; *Zool.* one of the well-marked divisions of a class गण, वर्ग; inverted o. व्यतिक्रम; directed o. अनुलोम; contrary to the natural o. प्रतिलोम; that is in regular and in reverse o. उलटापालटा, अनुलोम, विलोम; that is in o. रीतीचा, मार्गाचा; that is in good o. चांगला, नीट, यथास्थित (articles, affairs, &c.); as an animal ताजातवाना; to be in good o. नीट -साबीत -यथास्थित असणें; to get out of o. बिघडणें; head of a religious o. महंत; general o. वट -सदर हुकूम; made or done to o. फर्माशी; under the o. of कह्यांत; written o. लेखी हुकूम, हुकूमनामा; in o. साठीं, स्तव; o. of the day, *Legis. bodies* कायदे कौन्सलांत अमुक दिवशीं करायाचीं नेमलेलीं कामें *n pl*; natural o. of words अन्वय [for].—*v.* रचणें, व्यवस्था क.; हुकूम देणें धर्माधिकाराची दीक्षा देणें; regulate चालवणें, वागवणें. -LY *a.* बेतबाताचा, व्यवस्थेचा (proceeding); बेतबातानें चालणारा, ठाकठिकया, व्यवस्थित (a person); being on duty कामावरचा, 'आर्डरली' (officer).—*ad.* क्रमानें, बेतानें.—*n.* चिठ्ठीचपाटी नेणारा लष्करांतील कामदार, 'आर्डरली'; o. sergeant नकीब.—ORDINAL *a.* क्रमसूचक -वाचक.—*n.* क्रमवाचक संख्या *f*.—ORDINANCE कायदा, दस्तूर, कानू *m, f*;—of religion अनुष्ठान *n*, कर्म *n*, विधि.—ORDINARY *a.* चाली प्रमाणें, दस्तुरमाफक (forms of law); of common rank साधारण, मध्यम, प्राकृत (reader); usual नित्याचा,

साधारण (conversation) inferior रासवट, हलका; plain साधा, साधारण रूपाचा (face). —*n.* [*Law.* an officer who has original jurisdiction in his own right, and not by deputation; an ecclesiastical judge; *Naval Usage,* the establishment of the shipping not in actual service: a ship laid up in o.]; eating-house भटारखाना; that which is in common use रोज वापरायाचें सामान *n*; in o. नित्याचा, नित्यांतला; चाकरीवरचा, चाकरीवर नेमलेला: a physician in o.; [an ambassador in o. is one constantly resident at a foreign court].—ORDINATION स्थापणें *n*, नेमणें *n*, स्थापना *f*; योजना *f*, नेमणूक *f*; धर्माधिकारदीक्षा *f*; ख्रिस्ती धर्माधिकारदीक्षा *f*; o. of Providence घटितार्थ.—ORDNANCE तोफ *f pl*, तोफखाना.

ORDEAL* a form of trial to determine guilt or innocence, practiced by the rude nations of Europe, and still practiced in many parts of the East;—by fire तप्तदिव्य *n*, अग्निपरीक्षा *f*; to come safe out of an o. दिव्यास उतरणें; to take a piece of metal out of heated oil as an o. रवा काढणें; to undergo an o. दिव्य क.; severe trial कठीण परीक्षा *f*, अंत (*v.* पाह), कसोटी *f*; some of the forms of o. among the Hindus are: तुल, जल, अग्नि, विष, तंडुल, तप्तमाष, फाल, तुलसी.

ORDURE *F.* गू, विष्ठा *f*, मल.

ORE* (*Skr. ajas*) metal in its fossil state कच्ची -अशोधित -अशुद्ध धातु *f* (metal).

ORGAN (*organum*) instrument of action साधन *n*, उपकरण *n*, इंद्रिय *n*;—of action कर्मेंद्रिय *n*;—of sense or perception ज्ञानेंद्रिय *n*;—of the mind अंतरिंद्रिय *n*; means of communication द्वार *n*, साधन *n*, मार्ग; wind instrument मुखवाद्य *n*, वाद्य *n*. -IC *a.* इंद्रियाचा, इंद्रियसंबंधी; इंद्रियविशिष्ट -संपन्न, जीवनसाधनविशिष्ट (structure of the body). -ISM इंद्रियविशिष्ट रचना *f*; an organized being इंद्रियविशिष्ट प्राणी. -IST वंशवाद्य वाजविणारा. -IZE *v.* इंद्रियवान -जीवसाधनविशिष्ट क.; arrange in parts, each having a special function, act, office, or relation जमविणें, बेत बसविणें;—as government, army, &c. कामदार नेमून बंदोबस्त क., सैन्य उभारणें -रचणें इ०.—ORGANIZATION इंद्रियविशिष्ट क. *n*; बंदोबस्त, व्यवस्था *f*;—of the body शरीर -अवयवरचना -घटना *f*.—ORGANIZED संस्थापित, घटित, कल्पित; इंद्रियविशिष्ट.

ORGASM (*Gr. organ,* to swell) उकळी *f*, ऊत, कढ: o. of the flood;—of the spirit आवेश, उकळी *f*, ऊत.

ORIENT *a.* (*oriri,* to rise) उदय पावणारा, उदयमान (sun); eastern पूर्व, पूर्वेकडला; bright तेजवान, चकचकीत, सप्रभ.—*n.* पूर्व *f*, पूर्व दिशा *f*; पूर्वेकडले देश *pl.* -AL *a.* पूर्वेचा, पूर्व देशीय, पूर्व देशस्थ.—*n.* पूर्व देशांतला -एशिया खंडांतला राहणारा; पूर्वेकडल्या भाषा जाणणारा, प्राक्देशीय भाषापंडित.

ORIFICE (*osoris,* mouth, *facere,* to make) तोंड *n*, मुख *n*, दार *n*, भोंक *n*, छिद्र इ०.

ORIGIN (*oriri,* to rise) मूळ *n*, आरंभ, मुळारंभ; source उगम, उत्पत्तिस्थान *n*; birth जन्म, पैदास *f*; cause कारण *n*, हेतु. -AL *n.* मूळ *n*, आरंभ; archetype मूळप्रत *f*, आदर्श; text मूळग्रंथ, अस्सल *n*; one who has new and striking ideas नवी योजना करणारा, अपूर्वयोजक -कल्पक (writer).—*a.* मूळचा, आरंभीचा; primitive प्रथमचा, आद्यकालिक; not translated मूळचा, अस्सल, आद्यलिखित -रचित; अपूर्वकल्पक, हुनरी (genius); o. sin, *Theol.* the first sin of Adam आदामाचें पहिलें पाप *n*, hence, either the

imputation of Adam's sin to his posterity, or a natural corruption and tendency to sin, inherited from him मूळचें पाप *n*, स्वाभाविक पाप *n*. -LY *ad.* मुळा पासून, पहिल्यानें, आरंभीं; मूळ ग्रंथकर्त्यानें, मूळच्या कर्त्यानें. -ITY अस्सल -अव्वलपणा; अपूर्व कल्पना *f* -युक्ति *f* -शक्ति *f*, इ०. -ATE *v.* उत्पन्न -उपस्थित क. [with, in].—*i.* उत्पन्न होणें, उद्भवणें, उठणें.—ORIGINATOR उत्पन्न -आरंभ -उपस्थित करणारा, उत्पादक.

ORIOLE (*aurum*, gold) a bird,—the Indian पावशा, पावशा गुगूळ.

ORION (*L.*) a constellation मृगशीर्ष.

ORNAMENT (*ornare*, to adorn) शोभा *f*, अलंकार, भूषण *n*; trinket डागिना, नग.—*v.* शोभविणें, भूषित क. [with]. -AL *a.* शोभविणारा, शोभेचा.—ORNATE *a.* सुंदर, मंडित;—a style अलंकृत, प्रौढ, सालंकार, बनावट.

ORNITHOLOGY (*Gr. ornis*, bird, *logos*, discourse) पक्षीवर्णनविद्या *f*.

ORPHAN (*orphanos*) आईबापा वेगळा, पोरका, मातृपितृहीन; bereaved of one parent एकांगी उणा, मातृहीन किंवा पितृहीन, आईपोरका किंवा बापपोरका. -AGE पोरकेपणा; house for orphans अनाथ मुलांचें घर *n*, अनाथबालगृह *n*.

ORPIMENT *F.*—yellow हरताळ;—red रक्तधातु *f*; golden colored o. पऱ्याहरताळ.

ORRERY (named after the Earl of *Orrery*) ग्रहांची गति दाखविणारें यंत्र *n*, ग्रहगतिसूचक यंत्र *n*.

ORIS (probably corrup. for *Iris*)—the root वेखंड *n*.

ORT *Ger.* उष्टें *n*, उच्छिष्ट *n*.

ORTHODOX *a.* (*Gr. orthos*, right, *doxa*, opinion) sound in Christian faith ख्रिस्ती धर्मानुसार; according to the doctrines of Scripture ख्रिस्ती शास्त्रांतील उपदेशा प्रमाणें; यथाशास्त्र.—ORTHODOXY सतपथ, सन्मार्ग; यथाशास्त्रता *f*, सत्पथानुयायिता *f*.

ORTHŒPY (*Gr. epos*, a word) शुद्ध उच्चार.

ORTHOGRAPHY (*Gr. graphein*, to write) शुद्ध लिहिणें *n*; *Gram.* वर्णविचार.

OSCILLATE *v. i.* (*oscillum*, a swing) हेलकावे -झोके खाणें -घेणें [between].—OSCILLATION हेलकावा, झोका.

OSIER *F.* वाळंज *n*, वाळंजाचें झाड *n*.

OSSEOUS *a.* (*os*, bone) हाडांचा, अस्थिमय; हाडा सारखा.—OSSICLE हडकी *f*, हडूक *n*.—OSSIFY *v. i.* हाड -अस्थि होणें.—*t.* अस्थिमय क.—OSSIFIC *a.* अस्थिकर -कारक.—OSSIFICATION हाड होणें *n*, अस्थिभवन *n*.—OSSIVOROUS *a.* हाडखाऊ, अस्थिभोजी (quadrupeds).—OSSUARY, place where the bones of the dead are deposited अस्थागार *n*.

OSTENT (*ostendere*, to show) देखावा, दर्शन *n*; token चिन्ह *n*, लक्षण *n*.—OSTENSIBLE *a.* दिसण्याचा, दिसण्यांतला;—as implying insincerity वरकरणी, वरपंकी, कोरडा, बाह्याकाराचा.—OSTENTATION प्रतिष्ठा *f*, मिरवणूक *f*, डामडौल, आव;—as fraudulent दंभ, स्तोम.—OSTENTATIOUS *a.* डामडौलाचा, आवाचा; pretentious ढोंगी, दांभिक, अडुबाज.

OSTEOLOGY (*Gr. osteon*, bone, *logos*, discourse) अस्थिवर्णनविद्या *f*.

OSTRICH *F.* शहामृग.

OTHER* (*Skr. anya*) not the same दुसरा, इतर; opposite पलीकडला; the *others* दुसरे *pl*, वरकड *pl*; on the o. side पलीकडे; each o. परस्पर; the o. day परवां, कांहीं दिवसांमागें; every o. day एक दिवसाआड; the o. world परलोक; other's wealth परधन *n*. -WISE *ad.* दुसऱ्या रीतीनें; नाहीं तर.

OTTER* पाणमांजर *n*.

OUGHT, See AUGHT.

OUNCE (*uncia*, a twelfth) (साखर, तूप, वगैरे तोलायाच्या) पौंडाचा सोळावा भाग, अडीच तोळे *pl*; (औषध तोलायाच्या) पौंडाचा बारावा भाग, 'औन्स'; चित्त्यासारखें एक जनावर आहे.

OUR* *pron.* आमचा, आपला. -SELF, -SELVES आह्मी, आपण, स्वतः.

OUST *v. F.* बाहेर काढून टाकणें, बाहेर काढणें [from].

OUT* *ad.* without बाहेर; not at home बाहेर; in a state of disclosure उघडा, बाहेर, प्रसिद्ध: the secret is o.; in a state of extinction विझालेला: the fire is o.; in a state of exhaustion खपलेला; to be o. खपणें, उडणें, सरणें: the wine is o.; to be o. of fifty pounds; not in office निराळा, रिकामा, कामावेगळा; that is o. of employment रिकामा, बेरोजगार; to the end पार, सगळा, शेवट -अखेरपर्यंत: to sleep o. the whole morning; hear me o.; audibly मोठ्यानें: to laugh o.; not in the hands of the owner मालकाच्या हातांत नसलेला: the land is o. upon a lease; in error चुकींत, भ्रमांत: to be o. घसरणें, फसणें, चुकणें: wicked men are strangely o. in the calculating of their own interest; away निघ, चल: o. with the dog; o.-and-o. अगदीं, साफ, धडधडीत; o. of पासून, जवळून; आंतून, बाहेर: plants grow o. of the earth; (Prov. iv., 23); मुळें, स्तव, नें: a thing is done o. of envy; मुळावरून: to copy o. of Horace; o. of the house घराबाहेर; to be o. of favor मर्जीतून उतरणें; to be delivered o. of afflictions दुःखांतून सुटणें; o. of all rule सर्व नेमावेगळा; he goes o. of his way तो वाट सोडून जातो; o. of place भलत्याच जागीं, अप्रासंगिक; the mouth is o. of taste तोंडाची रुचि बिघडली आहे; the instrument is o. of tune तें वाद्य बिघडलें आहे; to be o. of sight दृष्टीआड होणें, अदृश्य होणें; o. of reach अगम्य; o. of hand लागलाच, तत्क्षणीं; to be o. of print विकत न मिळणें (a book); o. of season अकालिक, अवकाळीं; o. of fashion लोकव्यवहारविरुद्ध, चालीविरुद्ध; o. of temper किरकिऱ्या, रिपरिप्या; रागावलेला, संतापलेला; o. of tune बेसूर, बेताल, कर्कश; चिढलेला, खिजलेला.—*n.* बेरोजगारी मनुष्य; a nook कोन, कोपरा. -BALANCE *v.* दुसऱ्यापेक्षां वजनांत अधिक भरणें. -BRAVE *v.* शेरास सवाशेर होणें, अधिक धीट होणें. -BREAK जोरानें बाहेर फुटणें *n*, फुटणें *n*, स्फोट. -CAST *a.* जातिभ्रष्ट, बहिष्कृत, अपांक्त.—*n.* बहिष्कृत केलेला मनुष्य, चांडाळ; a vagabond भटक्या. -CRY आरड *f*, बोंब *f*, बोभाटा; clamor गलबला, गोंगाट; popular o. लोकापवाद. -DO *v.* मागें -पाठीमागें टाकणें, चढ क., कान कापणें. -DOOR *a.* घराबाहेरचा.—*ad.* घराबाहेर, बाहेर. -ER *a.* बाहेरचा, बाहेरल्या बाजूचा, बहिर्वर्त्ती; o. part बहिर्भाग; o. door बहिर्द्वार *n.* -FIT प्रवासाचें साहित्य *n* -सामान *n*; सफरीवर जाण्याची जहाजाची तयारी *f* -सामग्री *f* [for]. -GO *v.* पलीकडे जाणें, -च्याहून अधिक जाणें, -ला मागें टाकणें; excel वरचढ होणें, मागें पाडणें; circumvent फसविणें, कान कापणें.—*i.* संपणें.—*n.* खर्च, व्यय, जाव. -GOING बाहेर जाणें *n*; खर्च, व्यय. -GROW *v.* वाढीनें मागें टाकणें -पाडणें; -हून वाढीस चढणें; become too large to make use of वाढून अडस -दाट होणें; to o. clothing. -HOUSE पडशाळा *f*. -LANDISH *a.* परदेशचा, दूरदेशचा; barbarous हेंगाडा, रांगडा, अडाणी (speech, behavior). -LAST *v.* दुसऱ्यापेक्षां अधिक टिकणें. -LAW person excluded from the benefit of the law, or deprived of its protection राजरक्षणबाह्य.—*v.* राजरक्षणाबाहेर ठेवणें -क. -LAY खर्च, व्यय; that which is laid out पसारा.—*v.* खर्च क.; ex-

pose मांडणें, पसारा टाकणें. -LET वाट *f*, दार *n*, मार्ग. -LINE मर्यादेची -बाहेरची रेघ *f*, बाह्यरेखा *f*; sketch आकार, रूपरेखा *f*, आराखडा, बेत. -LIVE *v*. पाठीमागें वाचणें, -जगणें; to live better, or to better purpose अधिक चांगल्या अर्थासाठीं वांचणें. -NUMBER *v*. गणतींत -संख्येंत मागें टाकणें. -OF DOOR *a*. घरा बाहेरचा, वाऱ्यावरचा (exercise). -RAGE *v*. जुलूम -बलात्कार क.—*n*. कहर, जुलूम, अनर्थ. -RAGEOUS *a*. अनर्थाचा, कहराचा; furious कावराबावरा, तग्रव्यग्र. -REACH *v*. मागें टाकणें, पलीकडे जाणें. -RIDER, servant on horseback who attends a carriage जिलीबीचा स्वार. -RIGHT *ad*. immediately तत्काल, तेव्हांच, खडोखडी; utterly अगदीं, साफ, निस्तुक. -ROOT *v*. मुळासुद्धां उपटून टाकणें. -RUN *v*. धांवण्यांत मागें टाकणें. -SIDE बाहेरचें किंवा बाहेरील आंग *n*, बहिर्भाग; the utmost परमावधि, कड *f*, शेवट;—of an inclosure बहिःप्रदेश, बाहेरची जागा *f*.—*a*. बाहेरला -चा, बाह्य. -SKIRT शींव *f*, सीमा *f*, पालव. -STANDING वसूल न झालेला, उगवायाचा (debt). -STRIP *v*. मागें टाकणें -सांडणें. -WARD *a*. बाहेरचा, वरचा, बाह्य; adventitious नवा आणलेला, आगंतुक (honor); tending to the outward way बाहेर निघणारा, बाहेरच्या कलाचा. -WEIGH, See OUTBALANCE. -WIT *v*. फसवणें, पागोटें घेणें, तोंडाला पानें पुसणें. -WORK *Fort*. बाहेरचा कोट, बाहेरकोट.

OVAL *a*. (*ovum*, egg) अंडाकार, अंडाकृति.—*n*. अंडाकार, अंडाकृति *f*. -SHAPED अंडाकार. —OVARY *Anat*. organ of a female animal in which the eggs are formed अंडाशय. *Bot*. that part of the pistil which contains the seed बीजाशय.

OVEN* भट्टी *f*.

five वर्षपंचक *n*; p. of life वय *n*; in auspicious p. कालवेला *f*, काळवेळ, कुमुहूर्त; fixed p. बंदी मुदत *f*; unfixed p. कच्ची मुदत *f*. -ICAL *a*. नेमलेल्या काळाचा, नियतकालिक; happening by revolution फेरीनें होणारा, फेरीचा, परिवर्त्तनाचा.—*n*. नियमित काळीं निघणारें पाक्षिक -मासिक -त्रैमासिक पुस्तक *n* -पत्र *n*, इ०.

PERIPHERY (*Gr. pherein*, to bear) घेरा, परिधि; —as of a drum, &c. गाडा.

PERIPHRASE, PERIPHRASIS (*Gr. phrasein*, to speak) use of more words than are necessary to express the idea बोलण्याचा फेरा, गिरकांडा, द्राविडी प्राणायाम.

PERISH *v. i.* (*-ire*, to go) be destroyed नाश पावणें, नष्ट होणें, बुडणें; die मरणें, प्राणास मुकणें; decay gradually सडणें, नासणें, गळणें, झडणें [by]. -ABLE *a*. नाशवंत, नश्वर; p. goods नासकें केणें *n*.

PERITONEUM (*L.*) *Anat.* पोटाचा पडदा, अंत्रवेष्टन *n*.

PERIWIG *F.* केशाचा लहान टोप.

PERJURE *v.* (*-jurare*, to swear) render guilty of perjury खोटी शपथ वाहविणें, खोट्या शपथेचा दोषी क.; deceive by oaths and protestations खोट्या आणाभाका घेऊन फसविणें.—PERJURY खोटी शपथ *f*; crime of swearing falsely खोटी शपथ घेतल्याचा केल्याचा अपराध -दोष.

PERK *v. i. W.* नटणें, नखरा क.—*a*. नखरेबाज, मिजाजखोर.

PERMANENT *a.* (*-manere*, to remain) नेहमीचा, निश्चित, मुकरर, नित्य. -LY *ad*. जाथू, कायम, नित्य, मुकरर.—PERMANENCY शाश्वती *f*, स्थिरता *f*.

PERMEATE *v.* (*-meare*, to go) भेदून -मुरून पार जाणें.—PERMEABLE *a*. भेदून जायाजोगा, भेदनगम्य, व्याप्य.—PERMEATION व्याप्ति *f*, भेदन *n*, प्रवेश.

PERMISCIBLE *a.* (*-miscere*, to mix) मिसळायाजोगा, मिश्रणीय.

PERMIT *v.* (*-mittere*, to let go) देणें; give leave of -ची परवानगी -रजा -मोकळीक देणें; grant leave to -ला परवानगी देणें.—*n*. परवाना, परवानगीचिठी *f*, दस्तक *n*. -TANCE हुकूम, परवानगी *f*.—PERMISSION परवानगी *f*, आज्ञा *f*, हुकूम; full and free p. मुभा *f*, मुक्तद्वार *n*.—PERMISSIVE *a*. आज्ञादायक, परवानगी देणारा (will); granted दिलेला, परवानगी दिलेला (freedom).

PERMUTATION (*-mutare*, to change) अदलाबदल, विनियम; *Math.* अंकपाश.

PERNICIOUS *a.* (*-necare*, to kill) अपकारक, वाईट, दुष्ट, हिंसक.

PERPENDICULAR *a.* (*-pendere*, to hang down) नीट, उभा, सरळ, सुती; *Geom.* समकोनपाती [to].—*n*. लंब, लंबक. -LY *ad*. नीट, सरळ, लंबरूपानें. -ITY नीट -उभेपणा, सरळपणा.

PERPETRATE *v.* (*-patrare*, to perform) (वाईट) काम क., गुन्हा क., गुन्हेगार होणें.

PERPETUAL *a.* (*perpetuus*, continuous) नेहमीचा, नित्याचा, नित्य. -LY *ad*. नित्य, निरंतर, सतत, हमेशा.—PERPETUATE *v.* शाश्वत -नित्य -निरंतर -सतत चालेसा क., सदोदित राहेसा क.—PERPETUITY शाश्वती *f*, सातत्य *n*.

PERPLEX *v.* (*-plectere*, to plait) make intricate घोटाळा क., गुंतवणें, गुरफटणें; embarrass गोंधळवणें, घोटाळ्यांत पाडणें -घालणें, तारंबळ क.; vex त्रास -उपद्रव देणें [with]. -ITY गुरफटा, गोंधळ, गुंताडा; धांदल *f*, तारंबळ *f*, पंचाईत *f*, विचार.

PERQUISITE (*-quærere*, to seek for) a gift or allowance in addition to fixed wages शिवाय -अवांतर प्राप्ति *f*, दस्तुरी *f*; p. of hereditary village हक्क, कर.

PERSECUTE *v.* (*-sequi,* to follow) persue in a manner to injure, vex, or afflict छळणें, जाचणें, गांजणें; afflict, harrass or punish for adherence to a particular creed or system, or religious principles, or to a mode of worship धर्मासाठीं -मतासाठीं -भक्तीसाठीं पाठलाग क. -छळणें -छळ क. [with, for].—PERSECUTION जाच, काच, छळ, पाठलाग, उपद्रव.—PERSECUTOR छळ करणारा, छळणारा, छळक.

PERSEVERE *v. i.* (*perseverus,* very strict) persist in any business or enterprise undertaken कामांत -उद्योगांत टिकून राहणें, टिकणें, दीर्घप्रयत्न क.; not to give over what is undertaken दम धरणें, पाठपिच्छा न सोडणें [in, with].—PERSEVERANCE उद्योग, दीर्घप्रयत्न, आग्रह; दम, धीर, नेट; *Theol.* continuance in, or conservation of, the Christian character, and the consequent favor of God ख्रिस्ती सद्गुणांत व ईश्वरी कृपेंत टिकून राहणें *n*;—of the saints भक्तांचा टिकाव.

PERSIST *v.* (*-sistere,* to stand) चिकटून -दम धरून राहणें [in]. -ENCY दीर्घ प्रयत्न, व्यवसाय; आग्रह. -ENT *a.* स्थिर, दीर्घप्रयत्नी, व्यवसायी; आग्रही, चिकट.

PERSON (*persona,* mask) *Drama.* character सोंग *n,* रूप *n*; part or character which any one sustains नातें *n,* संबंध, अंग *n*; body शरीर *n,* आंग *n*; a living soul व्यक्ति *f*; a living human being माणूस, मनुष्य *n,* गडी; *Gram.* पुरुष; attendance on the p. शरीरशुश्रूषा *f,* खिजमत *f*; in person साक्षात्, प्रत्यक्ष, जातीनें, खुद; in one's own p. स्वतः. -ABLE *a.* सुरेख, देखणा. -AGE individual distinguished by rank, social position or reputation थोर -संभावित -प्रतिष्ठित मनुष्य; exterior appearance रूप *n,* आकार, डौल; character assumed सोंग *n.* -AL *a.* व्यक्ति संबंधी पुरुषांचा किंवा बायकांचा; रूपाचा; स्वरूपाचा (charms); peculiar or proper to private concerns खासगत, खासगी; done in person आंगचा, जातीचा, खुद; applying to the character and conduct of individuals in a disparaging manner लावून बोलण्याचा, घालून पाडण्याचा; *Gram.* पुरुषवाचक; *Law.* p. estate जंगममाल, अस्थावर मिळकत *f*; p. pronoun पुरुषवाचक सर्वनाम *n.* -ITY व्यक्ति *f,* स्वत्व *n*; लावून बोलणें *n* -लिहिणें *n.* -LY *ad.* व्यक्तीनें, व्यक्तितः; साक्षात्, प्रत्यक्ष, खुद, साक्षात्, जातीनें: to be p. present. -ATE *v.* सोंग -वेष -मिष घेणें.—PERSONATION वेष धरणें *n,* वेषधारण *n.*—PERSONIFY *v.* अचेतनावर सचेतन धर्माचा आरोप क.—PERSONIFICATION सचेतनधर्मारोप, पुरुषभावारोप;—of time कालमूर्त्ति *f,* कालपुरुष *f*;—of justice धर्ममूर्त्ति *f,* साक्षात् धर्म;—of wealth लक्ष्मी *f*;—of poverty आकाबाई *f.*

PERSPECTIVE *a.* (*-specere,* to look) यथार्थ दर्शन -चित्रलेखन विद्येसंबंधी.—*n.* a glass through which objects are viewed दुर्बीण *f*; the art of drawing objects on a plane so as to make them appear in their relative situation हुबेहुब चित्र काढण्याची विद्या *f,* यथास्थानदृष्ट चित्रलेखनविद्या *f.*—PERSPICACIOUS *a.* quick-sighted कुशाग्र -तीक्ष्णदृष्टि; of acute discernment तीक्ष्णबुद्धि.—PERSPICUITY clearness निर्मळता *f,* स्वच्छता *f*; easiness to be understood सुबोधपणा, सुबोधता *f.*—PERSPICUOUS *a.* निर्मळ, स्वच्छ, प्रांजळ; बाळबोध, सुबोध, व्यक्त.

PERSPIRE *v. i.* (*-spirare,* to breathe) sweat घाम येणें-निघणें-सुटणें; to be evacuated insensibly through the excretories of the skin रोमरंध्रांतून पाझरणें, स्रवणें.—*t.* रोमरंध्रांनीं सोडणें -विसर्जन क.—PERSPIRATION घाम येणें *n,* घर्मस्राव; sweat घाम, घर्म.

PERSUADE *v.* (*-suadere,* to advise) influence by argument or entreaty मनावणें,

मन वळविणें, मथवणें, समजावणें; convince by argument खात्री -समजूत क.—PERSUASION समजूत *f*, खात्री *f*, समजी *f*; मनावणी *f*, बधवणूक *f*; a creed or belief पंथ, संप्रदाय, मत *n*.—PERSUASIVE *a*. समजूत करणारा, मनावणारा, समजुतीचा.

PERT *a*. *W*. lively चपळ, चलाख; bold धीट, उद्धट. -LY *ad*. चपळाईनें; धिटाईनें. -NESS चलाखी *f*, चापल्य *n*; धिटाई *f*, उद्धटपणा.

PERTAIN *v*. *i*. (*-tenere*, to hold) belong -चा असणें; relate संबंध असणें -लागणें [to].—PERTINACIOUS *a*. obstinate हट्टी, दुराग्रही; steady निग्रही, नेटाचा, चिकट [in].—PERTINACITY हट्ट, दुराग्रह; नेट, धीर, दम.—PERTINENT *a*. समयोचित, समर्पक [to].

PERTURB -ATE *v*. (*-turbare*, to disturb) agitate संतापवणें, क्षोभवणें; confuse घोटाळा क. -ATION संताप, क्षोभ, तळमळ *f*; घोटाळा, गोंधळ.

PERUSE *v*. (*-uti*, *uses*, use) लक्ष लावून वाचणें, वाचणें.—PERUSAL *a*. वाचणें *n*, पठण *n*; —of a Purán पारायण *n*.

PERVADE *v*. (*-vadere*, to go) पार जाणें, भेदणें; spread through व्यापणें, वेढणें, ग्रासणें.—PERVASION व्याप्ति *f*, आक्रमण *n*.—PERVASIVE, PERVADING *a*. व्यापक, व्यापी; *pervading* the world जगद्व्यापी; p. all things सर्वव्यापी.—PERVADED व्याप्त [by].

PERVERT *v*. (*-vertere*, to turn) फिरवणें, उलटविणें; corrupt कुमार्गीत आणणें, भ्रष्ट क., बिथरणें [from, to].—*n*. बिघडलेला भ्रष्ट झालेला मनुष्य.—PERVERSE *a*. हेंकट, हेकेखोर, करनकर; devious वांकडा, वक्र, कुटिल; cross खोडकर, व्रात्य, द्वाड [in].

PERVIOUS *a*. (*-viâ*, a way) admitting passage भेद्य, प्रवेशनीय; capable of being penetrated by the mental sight शोधनीय, अर्थगम्य [to].

PEST (*pestis*) plague मरी *f*, धाम *f*; anything destructive व्याधि *f*, पीडा *f*. -ER *v*. पिडणें, छळणें; encumber खोडा -लोडणें घालणें; दाटी करून अवघडविणें [with].—PESTIFEROUS *a*. मरगी उत्पन्न करणारा, मरीचा; अपकारक, विषकारक; noxious to peace, to morals, or to society उपद्रवकारक, कुचाळ, कुटाळ.—PESTILENCE मरी *f*. धाम *f*, मरगी *f*.

PESTLE (*pistare*, to pound) मुसळ *n*, बत्ता, दस्ता; p. and mortar खलबत्ता.—*v*. मुसळानें -दस्त्यानें कुटणें.

PET *F*. रागाचा झटकारा.—*F*. लाडका, बगलबिल्ली *f*.—*v*. लाड क. -TISH *a*. चिरडखोर, तिरसट.

PETAL (*Gr*. *petalon*, leaf) पाकळी *f*, दल *n*. -OUS *a*. सदल, पाकळ्यांचा.

PETITION (*petere*, to beg) request विनंती *f*; prayer to the Supreme Being प्रार्थना *f*;—to a person or organized body having to grant the request अर्जी *f*, विनंतीपत्र *n*; paper containing such a request अर्जी *f*, याद *f*, अर्ज, अर्जदास्त; a p. to amend or amplify a preceding p. अर्जीमरमत.—*v*. अर्जी -विनंती क. -ER अर्जदार.

PETRIFY *v*. (*petra*, rock, *facere*, to make) दगड -पाषाण क.; make callous कठीण -निष्ठुर -पाषाणमय क.; fix स्तब्ध -काष्ठवत् क., थिजवणें.—*i*. पाषाणत्व पावणें, दगड होणें.—PETRIFACTION पाषाणीकरण *n*, पाषाण. परिणाम; पाषाण झालेला पदार्थ, कृत्रिमपाषाण.—PETROLEUM (*-oleum*, oil) मातीचें तेल *n*.

PETTICOAT *F*. लंघा, घागरा.

PETTIFOGGER *F*. हलका -छोटेखानी वकील.

PETTY *a*. *F*. small लहान; inferior हलका, क्षुद्र, येरशेर.

PETULANT *a*. (*petere*, to fall upon) peevish चिरडखोर, तिरसट; wanton छांदिष्ट,

लहरी.—PETULENCE तिरसटपणा, तिरतिरेपणा, खिसखीस *f.*

PEW *F.* inclosed seat in a church देवळांत बसायाची कठड्याची जागा *f.*

PEWTER *F.* जस्त *n*; जस्ताचीं भांडीं *n pl.*

PHAETON (*Phaethon*) एक प्रकारची गाडी *f*, 'फेटन' *f.*

PHALANX (*Gr.*) फौजेची एक प्रकारची रचना *f*, सेनाव्यूह, गट्ट.

PHANTOM (*Gr. phantacein*, to make visible) छाया *f*, आभास *f*; ghost भूत *n*, प्रेत *n.*

PHARISEE (*Heb. pârash*, to separate) यहुदी लोकांच्या एका पथांतील मनुष्य, परोशी. —PHARISAICAL *a.* परोशी लोकांचा, दांभिकभक्तीचा.

PHARMACY (*Gr. pharmakon*, medicine) औषधें तयार करण्याची विद्या *f*, औषधक्रिया *f.*—PHARMACOPŒIA औषधें तयार करण्याच्या विषयावरचा ग्रंथ, औषधक्रियाकल्प.

PHARYNX (*Gr.*) upper part of the gullet below the larynx सप्तपथ.

PHASE (*Gr. phasis*) appearance दर्शन *n*;—of the moon चंद्राचा प्रकाशित भाग, कला *f.*

PHENIX *F.* [a bird fabled to exist single, and to rise again from its own ashes, and hence used as an emblem of immortality].

PHENOMENON (*L.*) appearance देखावा, दर्शन *n*; unusual appearance अद्भुतदर्शन *n*, चमत्कार; any thing visible दृष्टिविषय.

PHIAL (*phiala*) शिशी *f*, कुपी *f.*

PHILANTHROPHY (*Gr. philos*, loving, friend, *anthropos*, man) जनप्रीति *f*; benevolence toward the whole human family लोकोपकारबुद्धि *f*, परनिष्ठा *f.*—PHILANTHROPIST परोपकारी, जगन्मित्र.

PHILIPPIC (*Gr. Philippikos*, belonging to Philip) discourse or declamation abounding in acrimonious invective निर्भर्त्सनात्मक भाषण *n.*

PHILOLOGY (*Gr. -philos*, loving, *logos*, speech) शब्दविद्या *f*, शब्द -भाषाशास्त्र *n.*—PHILOLOGIST भाषाशास्त्रज्ञ.

PHILOSOPHY (*Gr. -sophia*, wisdom) love or search after wisdom ज्ञानाची प्रीति *f* किंवा शोध; explanation of the reasons of things तत्वज्ञान *n*, विज्ञान *n*, ज्ञान *n*; moral p. नीतिशास्त्र *n*; natural p. पदार्थविज्ञान *n*; logical p. तर्कविद्या *f*, न्यायशास्त्र *n*; particular system or theory तत्वज्ञानाचा सिद्धांत -उपपत्ति *f* -मत *n.*—PHILOSOPHER तत्वज्ञानी, तत्वबोधक; *philosopher's* stone परीस. —PHILOSOPHIC *a.* तत्वज्ञानाचा, विज्ञानाचा, ज्ञानाचा (pride); skilled in philosophy तत्वज्ञाननिपुण.—PHILOSOPHIZE *v.* तत्वविचार क.—PHILOSOPHIST, See SOPHIST.

PHILTER (*Gr. philein*, to love) potion or charm intended to excite love वशीकरण औषध *n* किंवा मंत्र.—*v.* वश क., मोहिनी घालून वश क.

PHLEBOTOMY (*Gr. phlebos*, a vein, *temein*, to cut) शिरा तोडणें *n*, शिरावेध.

PHLEGM (*phlegma*, flame) watery humor of the body कफ, श्लेष्मा; dullness सुस्ती *f*, थंडाई *f*, जाड्य *n.* -ATIC *a.* कफाचा, कफविषयींचा; कफकारक, कफोत्पादक (meat); कफमय, कफाचा;—constitution कफप्रकृति *f*; cold थंड, -सुस्त (temper).

PHONICS (*Gr. phoné*, sound) ध्वनिशास्त्र *n.*

PHOSPHORUS (*Gr. phos*, light, *phorein*, to bring) the morning star शुक्र; an elementary substance एक तत्व आहे, 'फासफरस.'

PHOTOGRAPHY (*Gr. photos*, *graphein*, to write) science of the action of light on bodies पदार्थांवर प्रकाशाच्या क्रियेची विद्या *f*; art of producing pictures of objects by the action of light on chemically prepared surfaces; or the art of receiv-

ing and fixing on such surfaces the images formed by the camera 'फोटोग्राफी' -ची विद्या *f*, सूर्यकिरणाच्या योगानें चित्र काढण्याची विद्या *f*.

PHRASE (*Gr.*) *phrasein*, to speak) short, pithy expression वाक्य *n*, ह्मण *f*, चुटका; mode of speech भाषणसंप्रदाय. -OLOGY बोलण्याची धाटणी *f* -धरती *f*.

PHRENETIS (*L.*) inflamation of the brain, attended with acute fever and delirium सन्निपातज्वर; frenzy उन्माद, वेड *n*.

PHRENOLOGY (*Gr. phrenos*, mind, *logos*, discourse) the theory that the mental faculties are shown on the surface of the head or skull कपालसामुद्रिक *n*, कपाललक्षणविद्या *f*; [the science of the special functions of the parts of the brain].

PHTHISIS (*Gr.*) क्षयरोग.

PHYLLANTHUS LONGIFOLIUS हरपररेवडी *f*; P. Niruri भुईअंवळी *f*.

PHYSIC (*Gr. phusis*, nature) art of healing diseases वैद्यक्रिया *f*, वैद्यकी *f*; remedy for diseases औषध *n*, औषध उपचार; a purge जुलाबाचें औषध *n*, जुलाब.—*v.* औषध उपचार क., औषध पाणी देणें.—*pl* science of natural objects सिद्धपदार्थविज्ञान *n*. -AL *a*. सिद्धपदार्थविज्ञान संबंधी; corporeal शरीराचा, मूर्त्त, भौतिक; natural स्वाभाविक.—PHYSICIAN वैद्य; one who heals moral diseases पापहारक वैद्य, प्राणाचार्य.

PHYSIOGNOMY (*Gr. -gnomon*, a judge) art or science of discerning the character of the mind from the features of the face मुखसामुद्रिक *n*; the countenance, with respect to the temper of the mind मुख *n*, तोंडवळा, मुद्रा *f*.

PHYSIOLOGY (*Gr. -logos*, a discourse) the science which treats of the functions of animals and plants प्राणी आणि वनस्पति यांचे गुणधर्म जाणण्याची विद्या *f*, प्राणिगुणधर्मशास्त्र *n*.

PIAZZA *It.* covered walk supported by columns छावणीचा रस्ता, मंडप पथ.

PICK* *v.* peck at, like birds with their bills बोचणें, टोंचणें; pull off with the fingers खुडणें, तोडणें, खुटणें; clean by picking from निसणें, निवडणें; take up by a quick, pointedly directed movement वेंचणें, टिपणें; cull निवडणें; collect जमा क., उचलणें; up कोरणें (the teeth); उकरणें (the nose); सळईनें -खिळ्यानें उघडणें (a lock); सहज चालतां चालतां मिळवणें, उचलणें, सांपडणें, गवसणें;—a quarrel कज्जा उकरणें -विकत घेणें;—a hole in one's coat छिद्र -दोष पाहणें.— *i.* eat slowly चाखतमाखत खाणें; do any thing nicely चोख -बारकाईनें क.; steal चोरणें.—*n.* a sharp pointed tool कोरणें *n*; a tooth p. दांतकोरणें *n*; an iron tool पिकांव *n*; choice निवड *f*, आवड *f*. -AXE पिकांव *n*. -BACK *ad.* पाटकुळी. -ING खुडणें *n*, खुडणी *f*; खाणें *n*, हरामखोरी *f*; *pl* अवांतर प्राप्ति *f* -मिळकत *f*; illicit p. खाद *f*. -LOCK कुलूप काढायाची सळई *f*; person who picks locks सळईनें कुलपें उघडणारा. -POCKET खिसेकातरू -कातरणारा, भामट्या.

PICKET *F.* stake मेख *f*, खुंटा; guard placed before an army छबीना, वलावा; punishment which consists in making the offender stand with one foot on a pointed stake मेखेवर उभा करण्याची शिक्षा *f*.—*v.* खुंट्यांनीं -शीं खिळवणें; fence with narrow, pointed boards मेखांनीं कुडणें.

PICKLE *D.* solution of salt and water in which fish and meat may be preserved खार, खारवणी *f*; any article of food which has been preserved in vinegar लोणचें *n*; troublesome child बाल्य -त्रासदायक पोर; to be in a p. गळहाट्यांत पडणें,

चवचव होणें, फटफजिती होणें.—*v.* लोणचें-खार घालणें -क.; imbue highly any thing bad निसविवणें; a *pickled* rouge चोराचा अर्क.

PICNIC *F.* an entertainment carried by a party on an excursion of pleasure into the country वनभोजन *n*, रानजेवण *n*.

PICTURE (*pingere*, to paint) that which is painted चित्र *n*, तसबीर *f*; art of printing चित्रविद्या *f*; image प्रतिमा *f*, रूप *n*. —PICTORIAL *a.* चित्राचा, चित्रयुक्त, चित्रलिखित.—PICTURESQUE *a.* चित्रा सारखा, चित्रवत् -सदृश;—a country पर्वत, वन, नदीमिश्रित देश.

PIE *D.* एक पक्वान्न आहे.—*F.* एक पक्षी आहे. -BALD *a.* चित्रविचित्र, अबलक, कबरा.

PIECE *F.* fragment तुकडा, कुटका; portion भाग, वांटा, अंश; individual article डाग, डागिणा, नग; gun तोफ *f*; musket बंदूक *f*; coin नाणें *n*; a p. दर असामीस, प्रत्येकास; of a p. एकसारखा; of one p. एकसलग, अखंड; a p. of song गाण्याची चीज *f* -चा चुटका;—of work काम *n*;—of composition ग्रंथ, प्रबंध; *pl* तुकडेताकडे *pl*; चाराचुरा; to break in *pieces* तुकडे तुकडे -चुरा क.; to fall to *pieces* कोसळणें, ढासळणें, निखळणें (a building, &c.); ओघळणें, सुटणें (wreath, &c.); *apiece* तुकडे तुकडे करून; p. learning टाणाटोणा.—*v.* तुकडा जोडणें, सांधा देऊन वाढविणें; patch ठिगळ देणें; join जोडणें. -LESS *a.* अखंड, सलग, बिनजोड. -MEAL *ad.* तुकडे तुकडे करून, खंडशः; by piece थोडे थोडे, अंशतः.—*a.* तुकड्यांचा केलेला.—*n.* तुकडा, कुटका. -WORK खंडकाम *n*.

PIER* column to support the arch of a bridge मनोरा, धिरा, पुलाचा खांब; mole projecting into the sea धक्का.

PIERCE *v. F.* thrust into or transfix with a pointed instrument टोंचणें, भोंसकणें; penetrate शिरकवणें, भेदणें, प्रवेश क.; touch, as the affections लागणें, मनास लागणें, चित्त वेधणें; dive into, as a secret or purpose रहस्य पाहणें, गुज समजणें, मनांतील आशय जाणणें [through].—*i.* रुतणें, बोचणें, शिरणें; रहस्य समजणें.—PIERCING *a.* टोंचणारा, वेधक, भेदक; biting कडक, कडकडीत (cold); thrilling कर्कश, किर्र (sound).

PIETY (*pietas*) filial reverence मातापितृभक्ति *f*; affectionate reverence of friends, or country देशबांधवप्रीति *f*, स्वदेशभक्ति *f*; reverence of the Supreme Being and love of his character ईश्वरभक्ति *f*, धर्मनिष्ठा *f*, धर्मशीलता *f*.—PIETISM भक्तीचें देव्हारें *n*, पोम *n*.—PIETIST भक्तीचा अभिमानी, भक्तीचें पोम बाळगणारा, दांभिक.

PIG *D.* young sow डुकराचें पोर *n*, डुकुरलें *n*; [an oblong mass of cast iron or other metal, as first extracted from the ore, and weighing from 50 to 250 lbs]. -HEADED हेंकड, तेडा, बांका. -STY डुकरवाडा.

PIGEON *F.* कबुतर *n*, कपोत; milky white p. कागदी कबुतर *n*; grey colored p. पारवा. -HEARTED *a.* भित्रा, भ्याड. -HOUSE खुराडें *n*, खबुतराचें घर *n*. -HOLE खुराड्याचें दार *n*; little opening or division in a case for papers घर *n*, खण, पूड *n*.

PIGMENT (*pingere*, to paint) रंग; [wine that is highly spiced and sweetened with honey].

PIGMY (*Gr. pugmé*, fist) बुटबैंगण *n*, वामनमूर्त्ति *f*.

PIKE *F.* spear भाला, बर्ची *f*. -MAN बर्चीवाला, भालेकरी, शूलपाणि. -STAFF भालेकाठी *f*.

PILASTER (*pila*, pillar) चौकोनी खांब, चौधारी खांब, चतुष्कोनस्तंभ.

PILE (*pila*, ball) heap रास *f*, ढीग, गंज; a mass regularly formed by rows and layers थर, शेज; mass designed for a

special use, as for burning a corpse सरण *n*, चिता *f*; edifice इमारत *f*, वाडा; as of pitchers, shot, &c. उतरंड *f*, डाळा; *pl* मूळव्याधि *f*, मूळव्याध *f*.—(*pila*, pillar) large stake driven into the earth रोवलेला खांब, मेढ *f*, खुंट.—*v.* रास -ढीग क.; खुंट रोवणें -पुरणें; [to p. arms or muskets, to place three guns together in such a manner that they may stand upright steadily] [up, on].

PILE (*pilus*, hair) केंस, सड; nap फूल *n*.

PILFER *v. i. F.* भुट्टेचोरी क., उपटणें, उचलणें, ताव देणें, -वर हात -पट्टा मारणें. -ER भामटया, भुट्टेचोर.

PILGRIM (*peregrinus*, a foreigner) traveller प्रवासी, मुशाफर, पांथिक; one who travels to a distance from his own country to visit a holy place, or to pay his devotion to the remains of dead saints यात्रेकरू, तीर्थकरू. -AGE यात्रा *f*, तीर्थाटन *n*; periodical p. वारी *f*; one that performs it वारकरी; p. to Benares काशीयात्रा *f*.

PILL (*pila*, ball) औषधाची गोळी *f*, गोळी *f*. —*v. F.* लुटणें, नागवणें. -AGE लूट *f*.—*v.* लुटणें, बुचाडणें, धुऊन नेणें.

PILLAR (*pila*) column खांब, स्तंभ; that which resembles a pillar स्तंभाकार वस्तु *f*, सोट, लोळ: a p. of smoke or fire; a character which resembles such a pillar in stability and strength धीरपुरुष, धीर, आश्रय, खांब, हात.

PILLORY *F.* खोडा; हात आणि मान अडकविण्याचा खोडा, हात -मानखोडा.

PILLOW *F.* उसी *f*, तक्या, लोढ *n*. —*v.* उशीवर टेंकणें, टेंकणें, ओटंगणें. -CASE उशीची गवसणी *f*.

PILOT *F.* one who steers a ship जहाजास वाट दाखवून बंदरांत आणणारा, किंवा बंदरा बाहेर नेणारा, बंदरवाटाडी; guide वाटाडी, सारथी.—*v.* जहाजास वाट दाखविणें; अडचणींतून वाट दाखवून नेणें. -AGE बंदरवाटाड्याचें वेतन *n* -ची दस्तुरी *f*.

PIMENTO *Sp.* Myrtus p. कंकोळ.

PIMP *F.* कुंटन *f*, भडवा.

PIMPLE* पुळी *f*, पुटकुळी *f*.

PIN (*pinna*, pinacle) peg खुंटा, खुंटी *f*; small pointed instrument for fastening clothes टांचणी *f*; linch-p. चाकाची -आंसाची खीळ *f*, bolt खीळ *f*, सळई *f*; a trifle काडी *f*, कवडी *f*, नखभर माती *f*; *Med.* obscurity of vision dependent upon a speck in the cornea सडी *f*.—*v.* टांचणी -खीळ लावणें -घालणें, टांचणीनें अडकविणें [up, to].

PINCH *v. F.* squeeze between the ends of the fingers चिमटणें, चिमटा घेणें; squeeze between two hard bodies चेंगरणें, चिरडणें; distress अडचणींत -कातरींत घालणें -आणणें; the belly पोट मारणें -बांधणें, उपासमारा क.; as clothes दाटणें, अडस होणें.—*n.* चिमटी, चिमखुरा;—of snuff, &c. चिमूट *f*, चिमटी *f*; अडचण *f*, सकट *n*, चिमटा; to be *pinched* अडचणींत पडणें.—PINCHERS *pl.* चिमटा, सांडस.

PINE (*pinus*) एक वृक्ष आहे, देवदारू. -APPLE the plant अननस *f*;—the fruit अननस *n*.

PINE* *v. i.* languish झुरणें, खितपणें, धुपणें, झिजणें; languish with desire खंत घेणें -धरणें, टाहो -छंद घेणें.—*t.* झिजवणें, झुरवणें; -ची खंत धरणें -घेणें -बाळगणें; bemoan in silence आंतलें आंत -मनांत दुःख क.

PINION (*pinna*, feather) पंख *n*; joint of a bird's wing पंखाचा सांधा; band for the arms मुसक्या बांधण्याची काढणी *f*; a smaller wheel with teeth working into the teeth of a larger wheel मोठया चाकाच्या दात्यांत फिरणारें लहान चाक *n*.—*v.*

पंख बांधणें; cripple by cutting off the first joint of the wing पंखाचा सांधा कापून लंगडा -लुला क.; मुसक्या बांधणें, चतुर्भुज क.; chain सांखळणें, सांखळीनें बांधणें [down].

PINK *D.* a color गुलाबी -प्याजी रंग; [a plant and its flower] श्वेतरक्त वर्ण anything supremely excellent श्रेष्ठ, उत्कृष्ट, असल. —*v.* लहान लहान भोंकें पाडणें. -EYED *a.* लहान डोळ्यांचा, गजनयन.

PINNACLE (*pinna,* feather) high spiring point शिखर *n,* कळस;—of a building गृहशिखर *n.*—*v.* कळस -शिखर बांधणें.

PINT* १२ औंस किंवा ३० तोळे म्हणजे एक पैंट; half a quart अर्धी बाटली *f.* दीडपाव.

PIONEER *F.* one who goes before to clear the way for others दुसऱ्या करितां पुढें जाऊन वाट तयार करणारा, अग्रगामी;—of an army बेलदार, 'पायनेर.'

PIOUS *a.* (*pius*) having affectionate or filial reverence for parents पितृभक्तिशील -परायण; having reverence and love toward the Supreme Being धार्मिक, भक्तिवान, धर्मशील, ईश्वरसेवा -धर्मनिष्ठ; proceeding from religious feeling भक्तिभावाचा, धर्मनिष्ठेचा, भक्तिमूलक; practised under the pretence of religion धर्माच्या निमित्तानें केलेला, ढोंगाचा, दांभिक भक्तीचा. -LY *ad.* भक्तिबुद्धीनें, ईश्वरनिष्ठेनें.

PIPE* wind instrument of music पांवा, वेणु; long tube नळी *f*;—as a conductor of water पन्हळ, नळ, नळी *f*;—for smoking tobacco हुक्का, चिलीम *f n,* चुट्टा; cask पीप *n.*—*v.* पांवा वाजवणें. -CLAY खडू *f,* शाडू *f.* —PIPER पांवा वाजविणारा, मुरलीधर.

PIQUE *F.* feeling of annoyance or resentment awakened by a social slight or injury चीढ *f,* रुसवा; keenly felt desire खुरखूर *f,* खंत *f*; nicety बारीक गोष्ट *f.*—*v.* चिथवणें, चिरडीस आणणें; stimulate अभिमानास घालणें, हटास पेटवणें;—one's self upon अभिमान -बाणा बाळगणें.—PIQUANT *a.* stimulating to the tongue खमंग, चणचणीत; pungent चरमरीत, खारटतुरट (railleries).—PIQUANCY चणचणीतपणा, चरमरीतपणा.

PIQUET, See PICKET.

PIRATE (*Gr. peira,* to attempt) robber in the high seas समुद्रावरचा -समुद्रांतला लुटारू, चांचा; ship employed in piracy चांच्याचें -लुटारू गलबत *n*; one who infringes the law of copyright, or publishes the writing of other men without permission ग्रंथ -विद्याचोर.—PIRACY समुद्रावरचा दरवडा, चांचेपणा.—PIRATICAL *a.* चांच्याचा; चांचेपणा करून मिळवलेला.

PISCES (*piscis,* a fish) *Astron.* मीन रास *f.*—PISCIVOROUS *a.* मासे खाणारा, मत्स्याहारी, मत्स्यभक्षक.

PISH *int.* छीः, छ, छत्, फीस्.

PISMIRE *D.* मुंगी *f.*

PISS *v. i. D.* मुतणें.—*n.* मूत *m, n.*

PISTACHIO *Per.* पिस्ता.

PISTIL (*pistillum,* pestle) *Bot.* फुलांतील केसर, मध्य -स्त्रीकेसर.

PISTOL *F.* तमंच्या, 'पिस्तूल' *n.*

PISTON (*pinsere,* to pound) दट्टा.

PIT* large deep hole in the ground खळगा, खाडा, खांच *f*; hell नरक; grave प्रेताची खांच *f,* शवगर्त्ता *f*; snare for wild beasts, made by concealing a hole in the ground सावजें धरण्याचा खळगा; whatever ensnares सांपळा, फांस; hollow place under the arm काख *f,* बगल *f*; hollow of the stomach शिंप *f,* उराची खळगी *f*; mark left on the flesh by a postule of the small-pox देवीचा वण; lowest place in a theatre where spectators assemble अंगण *n*; as in a stone,

wood, &c. खोंच *f*;—as of chalk, stone, clay, &c. खाण *f*.—*v*. खळ्या -खांचा पाडणें. -A-PAT धडधड, धसधस, बाकबूक *f*, माटमूट *f*. —*ad*. बाकबूक, धडधड, &c. -COAL खनिज कोळसा. -FALL pit slightly covered for concealment, and intended to catch wild beasts and men चोरखळी *f*.

PITCH* राळ *f*.—*v*. राळ लावणें; blacken काळें क. -DARK *a*. (अंधार) गडत.

PITCH *F*. point टोंक *n*; degree of elevation उंचीचें मान *n*, महत्वमान *n*;—of a note or voice गळा, सूर, स्वर; slope उतरण *f*; a fall पडणें *n*, पतन *n*; highest p. पराकाष्ठा *f*, कळस; to such a p. एथवर -पावेतों.

PITCH* *v*. throw झुगारणें, फेंकणें;—a tent देणें, उभा क.;—tune सूर धरणें; fix the price of किंमत बसविणें; *pitched* battle, battle in which the hostile forces have a fixed position ठाणावरची लढाई *f*.—*i*. light उतरणें, बसणें, तळ देणें; fall headlong डोईकडून पडणें; fix choice पसंत क., निवडून घेणें: to p. upon the best course of life; encamp डेरा -तळ -तंबु देणें, राहुटी ठोकणें. -FARTHING a play in which copper coin is pitched into a hole गलकवड्या *f pl*, अगलइयाप (*H*). -FORK *a*. fork used in throwing hay or sheaves of grain in loading or unloading खाचेरा, टोंचणी *f*.

PITCHER *F*. घागर *f*, घडा, मडकें *n*.

PITH* the soft, spongy substance in the centre of many plants and trees गर, मोख, गीर; marrow मगज, मेंदू; strength बळ, बळकटी *f*; essence सार, *n* तत्व *n*, कस. -LESS *a*. गरावेगळा; निसत्व, फुसका, पोकळ.—PITHINESS बळकटी *f*, तेज *n*, सत्व *n*.—PITHY *a*. गाभाचा, गिराचा; जिवट, कसदार, रसिक (word).

PITTANCE *F*. charity, gift धर्मादाय; allowance of food, bestowed in charity सिधा, शेरपीठ *n*, मोताद *f*; any small allowance हलकी मोताद *f*; small quantity थोडा भाग, अल्पांश.

PITY (*pietas*) the feeling or suffering of one person, excited by the distress of another दया *f*, करुणा *f*, काकळूत *f*; ground of pity दयेस कारण *n*, दयाहेतु.—*v*. दया क., कींव -काकळूत येणें [for].—PITEOUS *a*. काकळुतवाणा, दीनवाणा; compassionate दयाळू.—PITIFUL *a*. कृपाळू, दयाळू, कनवाळू, (James v., 11); काकळुतवाणा, बापुडवाणा (condition); contemptible हलका, फुसका, नाकारा.—PITILESS *a*. निर्दय, दयाहीन.

PIVOT *F*. a pin on which any thing turns. कांटा.

PLACABLE *a*. (*placere*, to please) सांतवन करण्यास योग्य, सांत्वनीय; willing to forgive क्षमाशील.

PLACARD *F*. प्रसिद्ध ठिकाणीं (बाजारांत, चावडीवर वगैरे) चिकटवलेला -लावलेला जाहीरनामा. —*v*. प्रसिद्ध स्थळीं जाहीरनामा लावणें; post, as a libel निंदेचा जाहीरनामा लावणें.

PLACE *F*. open space मोकळी जागा *f*, मैदान *n*; broad way in a city चव्हाटा; site जागा *f*, ठिकाण *n*; rank जागा *f*, पदवी *f*; official post जागा *f*, असामी *f*, काम *n*; elegant dwelling वाडा, महाल, स्थान *n*; village, town, or city गांव: are you a native of this p.? country मुलूख, देश; stronghold गढी *f*, बंदोबस्ताची जागा *f*; opportunity प्रसंग, सवड *f*; passage of a written or printed document स्थळ *n* (Acts viii. 12); vacated space रिकामी -खाली जागा *f*, जागा *f*; reception; implying the making room for पैस जागा करणें *n*, जागा *f*; *Astron*. position in the heavens, as of a heavenly body स्थान *n*; to give p. जागा देणें; वाट देणें; दबणें, हात टेंकणें; to take p. घडणें; to take the p. of

-ची जागा घेणें, -चा बदली होणें-राहणें; in the first p. पहिल्यानें, मुळीं, पहिलें; in the second p. दुसऱ्यानें; in the next p. पुनः,अणखी; in this p. एथें, ह्या ठिकाणीं -जागीं; out of p. भलत्याच जागीं, अन्यस्थळीं; पदच्युत; in one p. एकत्र.—*v.* ठेवणें, स्थापणें; put in an office जागीं -जाग्यावर नेमणें, ठेवणें, नेमणें; put out at interest व्याजीं -व्याजावर ठेवणें; ascribe लावणें, आरोपणें: I *placed* them to a wrong motive.

PLACENTA (*L.*) *Anat.* the soft spongy disk which connects the mother with the fetus in the womb वार *f.*

PLACID *a.* (*placere,* to plead) शांत, सौम्य, सुमनस्क. -ITY सौमनस्य *n,* सौम्यता *f.*

PLAGIARY (*plagium,* kidnapping) thief in literature ग्रंथचोर, काव्यचोर.—PLAGIARISM ग्रंथचौर्य *n.*

PLAGUE (*plaga,* a blow) afflictive evil or calamity अनर्थ, अरिष्ट *f*; pestilence मरी *f,* मरगी *f,* धाम *f*; vexation पीडा *f,* खटराग *f,* पलिस्त *n,* कंटक.—*v.* मरीनें पिडणें; जाचणें, गांजणें [with, by].

PLAIN *a.* (*planus*) flat सपाट, सारखा; open साफ, उघडा; evident स्पष्ट, व्यक्त, उघड; simple साधा, साधारण रूपाचा, मध्यम (countenance); unsophisticated साधा, भोळा, बाळबोध (people); open सरळ बुद्धीचा, धोपट मार्गाचा, सरळ (character); not rich साधा (diet); not ornamented साधा (pattern of cloth).—*n.* level land मैदान *n,* पटांगण *n,* माळ; field of battle रणांगण *n,* रणभूमि *f.*—*v.* सपाट क. -DEALING उघड -धोपट मार्ग.—*a.* धोपटमार्गी, धोपटमार्गाचा, खरा, साबडा (man). -LY *ad.* साधे रीतीनें, साफ, स्पष्ट; खणखणीत, धडधडीत, निष्कपट.—PLAINT complaint रड *f,* फिर्याद *f*; private memorial tendered to a court पूर्वपक्ष -वाद. -IFF वादी, पूर्ववादी. -IVE *a.* बापुडवाणा, किलवाणा; indicative of grief दुःख -खेदसूचक.

PLAIT *W.* fold चुणी *f,* निरी *f,* घडी *f*; braid वेणी *f.*—*v.* चुणणें, निऱ्या क.; वेणी घालणें, विणणें [together].

PLAN *F.* draught बेत, नमुना, नकशा; scheme मसलत *f,* कल्पना *f,* तजवीज *f,* उपाय.—*v.* कल्पना -मसलत क.; बेत -नकाशा काढणें [out].

PLANE *a.* (*planus*) सपाट, समतल.—*n. Geom.* क्षेत्र *n,* तल *n,* पातळी *f*; inclined p. उतरण *f*; tool for smoothing boards रंधा, रोखणें *n*; bead-p. रंधागोलची *f.*—*v.* सारखा -सपाट क.; रंधणें, रंधा फिरविणें.

PLANET (*planeta*) a heavenly body which revolves round the sun ग्रह. -ARY ग्रहाचा; consisting of planets ग्रहमय, ग्रहांचा (system); *Astrol.* under the influence of a planet ग्रहवश, ग्रहाच्या दशेंतला (hour); having the nature of a planet ग्रहधर्मक, ग्रहाच्या गुणाचा; revolving फिरणारा, फिरता; produced by planets ग्रहांपासून झालेला (plague). -STRICKEN, -STRUCK *a.* ग्रहदशा लागलेला, ग्रहपीडित.

PLANK (*planca*) फळी *f,* फळें *n,* तक्ता.—*v.* पाटणें -तक्तपोसी क.

PLANT (*planta*) a vegetable झाड *n,* वनस्पति *f*; young tree रोप, रोपा.—*v.* put in the ground and cover, as seed for growth लावणें, रोपणें, रुझत घालणें, बीं लावणें -पेरणें; set in the ground for growth, as a young tree लावणें, रोपा लावणें; furnish with plants झाडें लावणें, बाग क. (a garden); settle वसाहत क., वसवणें (a colony); introduce and establish the principles of चालू क., स्थापणें: to p. Christianity among the heathens; set firmly रोवणें, पुरणें, नेमणें (a post); point रोखणें, लावणें (a cannon). -ATION place planted बाग, बन *n,* बाफा *n*;—of vegetables मळा;—of cocoanut or beetlenut trees आगर *n*;—of sugarcane, &c. थळ *n*; colony वसा-

हत *f.* -ER लावणारा, लावणी करणारा; रोवणारा, पुरणारा; one who owns a plantation फडकरी, बागवान -वाला, थळकरी.

PLANTAIN (*plantago*)—the tree केळ *f*, केळीचें झाड *n*;—the fruit केळें *n*.

PLASH *D.* डबका, डबकें *n*.—PLASHY *a.* डबक्याचा, पाणथळाचा.

PLASTER* composition used to cover walls or cast figures गिलावा; *Med.* मलमपट्टी *f*, 'पलास्तर' *n*.—*v.* गिलावा क., लेप देणें; मलम लावणें, पलास्तर मारणें [over].—PLASTIC *a.* having the power to give form to a mass of matter आकार -रूप देणारा, घडवणारा: the p. hand of the Creator; capable of being moulded वळण घेण्याजोगा, वळविण्याजोगा (material).

PLAT *F.* विणकाम *n*.—*v.* विणणें, गुंफणें.—(*Gr. platus*) piece of flat even ground तक्ता, वाफा. -FORM सपाटीचा -भुईचा नकाशा; flat floor raised above the ground माळा, मंचक, 'प्ल्याटफार्म'; *Mil.* मोर्चा.

PLATE (*Gr. platus*, broad) flat piece of metal पत्रा, तगट *n*; dishes, cups, &c., wrought in gold or silver रुपेरी सामान *n*, चांदीचीं -सोन्याचीं भांडीं वगैरे; metallic ware which is plated मुलाम्याचीं भांडीं *n pl*; small shallow vessel तबक *n*, ताट *n*, पितळी *f*, थाळी *f*;—of wood or earth परळ *n*;—of China बसी *f*; piece of metal on which anything is engraved कोरींव पत्रा; impression from an engraved piece of metal कोरींव पत्र्यावरून छापलेली प्रत *f*; printed picture छापलेलें चित्र *n*.—*v.* मुलामा चढवणें, रुपेरी -सोनेरी लेप देणें; beat into thin flat pieces ठोकून पातळ पत्रे क. [over].—PLATTER परात *f*;—of wood or earth परोळ *n*, परळ *n*.

PLATINA *Sp.* एका प्रकारची धातु आहे.

PLAUDIT (*plaudere*, to praise) शाबासकी *f*, वाहवा *f*.—PLAUSIBLE *a.* शाबासकी देण्याजोगा; superficially pleasing तोंडावर गोड, लाघवी; specious वरघडीचा, देखणाऊ, वरपंकी चांगला (doctrine); using specious arguments लाघवी, गोडगोड गोष्टी सांगणारा (a man).—PLAUSIBLY *ad.* चांगला, पसंत वाटायाजोगा.

PLAY* *v. i.* sport खेळणें, क्रीडा क; trifle गमणें, खेळणें, रमणें; contend in a game खेळणें; gamble जुगार खेळणें; perform on a musical instrument वाजवणें, वाद्य वाजवणें; act खेळणें, चालणें, व्यापार क.: engines p. against a fire; personate a character सोंग घेणें, सोंग घेऊन खेळणें -बतावणी क., -होऊन with another verb: to weep and p. the woman बायको होऊन रडणें; wanton खेळणें, नाचणें.—*t.* खेळवणें, चालवणें; वाद्य वाजवणें, बजावणें; सोंग आणणें, संपादणी -बतावणी क.; खेळणें (a game).—*n.* any exercise or series of actions intended for pleasure, amusement, or diversion खेळ; amusement करमणूक *f*, क्रीडा *f*, गमत *f*, खेळ; practice of contending for victory डाव, खेळ, हात; action क्रिया *f*, चेष्टा *f*, व्यापार; dramatic composition नाटक *n*; motion व्यापार, चलन *n*; room for free motion अवकाश, सवड *f*, अवसर; dramatic show नाटक *n*, खेळ, तमाशा. -BOOK नाटक *n*, चंपू. -DAY सुटीचा दिवस, सुटी *f*. -ER खेळणारा; सोंगआणणारा, सोंगाड्या; वाजविणारा, वाजंत्री. -FELLOW खेळगडी, सवंगडी. -FUL *a.* खेळकर, मौज्या. HOUSE नाटकशाळा *f* -गृह *n*. -MATE खेळगडी, सवंगडी.

PLEA (*placere*, to please) that which is advanced in pleading निमित्त *n*, कारण *n*, सबब *f*; *Law* उत्तरवाद, प्रतिवादीचा जबाब, उत्तर *n*; lawsuit खटला, कज्जा; urgent prayer आग्रहाची प्रार्थना *f*, मिन्नत *f*.—PLEAD *v. i.* पक्ष धरून बोलणें; urge reasons for

or against a thing पुरावा देणें, दाखविणें; *Law,* तकरार क. -सांगणें, वादीस उत्तर देणें; खटला चालविणें.—*t.* प्रमाण-पुरावा देणें, प्रमाणार्थ पुढें क. -सांगणें; प्रतिपादन क.; वाद -खटला चालविणें. -ER पक्ष धरून बोलणारा, वाद सांगणारा; वकील, 'प्लीडर.' -INGS *pl.* वादी प्रतिवादी यांची तकरार *f.*

PLEASE *v.* (*placere*) gratify संतोषविणें, खुष -रंजन क.; satisfy समाधान -संतोष क.; to be *pleased* in or with मान्य -पसंत क., आवडणें [by, with].—*i.* चहाणें, आवडणें, मर्जीस येणें -उतरणें;—in entreaty or courtesy कृपा-करून: p. to give me my book.—PLEASANT *a.* गोड, चांगला, मनोरम; cheerful आनंदी, रंगेला, विनोदी (fellow). -LY *ad.* आनंदानें, खुशालीनें. -RY थट्टा *f,* मस्करी *f,* विनोद; lively talk मस्करीचें भाषण *n,* विनोदोक्ति *f.*—PLEASING *a.* सुखकर, संतोषकारक, मनोरंजक.—PLEASURE, gratification of the senses or of the mind सुख *n,* आनंद, संतोष; frivolous or dissipating enjoyment ख्यालखुशाली *f,* ऐषआराम; sensual gratification विषयसुख -भोग; sexual p. अंगसुख *n;* choice मर्जी *f,* खुशी *f;* favor मेहेरबानी *f.* -GROUND ऐषआरामाची -विलास करण्याची जागा *f,* रमणा, क्रीडास्थळ *n.*—PLEASURABLE *a.* (See PLEASING).

PLEBIAN (*pleb, plebis,* common people) साधारण लोकांतला एक; साधारण लोक *pl.*—*a.* साधारण लोकांचा.

PLEDGE *F.* a pawn गहाण *n;* anything given as security for the performance of an act तारण *n,* हडप *n;* surety जामीन; hostage ओल *f.*—*v.* गहाण ठेवणें -लावून देणें; तारण ठेवणें; ओलीस लावणें-ठेवणें -देणें [to, for, against].

PLEIADES (*L.*) *Astron.* कृत्तिका नक्षत्र *n.*

PLENARY *a.* (*plenus*) पुरा, पूर्ण; [p. indulgence, (*R. C. Church*) an entire remission of penalties due to all sins; p. inspiration, inspiration in which there is no mixture whatever of error].—PLENITUDE पूर्णता *f,* पूर्त्ति *f;* abundance समृद्धि *f,* विपुलता *f,* चंगळ *f;* redundancy of blood and humors in the animal bodies रक्त-धातुपुष्टि *f.*

PLENIPOTENT *a.* (*-potens,* potent) पूर्ण शक्तिमान. -IARY person invested with full power to transact any business कुल कारभारी; an envoy to a foreign court furnished with full power to negotiate a treaty कुल मुकत्यार वकील.—*a.* कुल अकत्याराचा.

PLENTY (*plenus,* full) पुष्कळपणा, समृद्धि *f;* abundance सुकाळ, चंगळ *f,* सुबत्ता *f* [of, for].—*a.* पुष्कळ, बहुत, विपुळ.—PLENTEOUS, PLENTIFUL *a.* बहुत, पुष्कळ, भरपूर.

PLEONASM (*Gr. pleos,* full) redundancy of words in speaking or writing शब्दबाहुल्य *n.*

PLETHORA (*Gr. plethoria*) fulness of habit अतिपुष्टि *f,* रक्तातिशय.

PLIABLE, PLIANT *a.* (*plicare,* to play) flexible लवचीक, मृदु; flexible in disposition नरम, चलमति, मृदु.—PLIANCY, PLIABILITY लवचीकपणा, मृदुता *f;* नरम स्वभाव, चलमति *f.*

PLICATION (*plicare,* to fold). See FOLD.

PLIGHT* *v.* गहाण ठेवणें (word, faith, honor).—*n.* गहाण *n;* condition अवस्था *f,* गति *f;* exposed condition घाण *f,* दशा *f,* अवस्था *f,* हाल *pl;* miserable p. फटफजिती *f,* बुरे हाल *pl.*

PLOD *v. i. Gael.* travel with steady laborious diligence रेंरें करून जाणें -चालणें -शिकणें; drudge खपणें, कष्ट क.—*t.* कष्टानें चालणें.

PLOT *D.* जमिनीचा तक्ता-वाफा.—* scheme बेत, आकार; conspiracy कूट *n,* कंत्राड *n,* कट; design मसलत *f,* तजवीज *f,* युक्ति *f;*—of a poem, play, &c. वस्तु *f,* जमीन *f,* सांखळी

f; secondary p. प्रतिमुख *n*.—*v. i.* कंत्राड -लचांड क. -रचणें; तजवीज -मसलत क.—*t.* तजवीज -युक्ति क. [out].

PLOUGH *D.* नांगर.—*v.* नांगरणें, फोडणें;—for the first time उखळणें;—second time दुसारणें; to cross p. बेरणें. -BOY आगऱ्या, नांगऱ्या. -ING नांगरकी *f*, नांगरणी *f*, जोत धरणें *n*; —for the first time उखळ *f*, उखळी *f*; —second time दुसारणी *f*. -LAND नांगरवट *f*, नांगरड *f*. -MAN नांगऱ्या, जोत्या. -SHARE नांगराचा फाळ -दांत.

PLUCK* *v.* pull with sudden force हिसकावणें; pull off उपटणें, उपटून काढणें; strip by plucking बुचाडणें, बुचाडून (पिसें) काढणें (a fowl);—as fruits, vegetables, &c. खुडणें, तोडणें; up, out, &c. उपटणें, उपटून काढणें.—*n.* heart, liver, and lights of an animal जनावराचें काळीज, अंतडीं वगैरे; spirit जीव, पाणी *n*, दम.

PLUG *D.* दट्टा, बूच.—*v.* दट्टा लावणें -बसवणें, बूच मारणें [up].

PLUM* a fruit आलुबुखार; a raisin मनूक, बेदाणा; sum of £10,000 लाख रुपये *pl.* -CAKE एक पक्वान्न आहे.

PLUMB, PLUMMET (*plumbum*, lead) sounding lead बुडींद *n*, गळ;—of masons, carpenters, &c. ओळंबा, लंबक; weight वजन *n*; piece of lead used by children to rub their paper for writing मोहरा.

PLUMBAGO (*L.*)—Zeylamia चित्रक.

PLUME (*pluma*) feather पीस *n*, पर *n*; ornamental feather तुरा, कलगी *f*.—*v.* adjust the feathers of पिसें निटावणें -सुधारणें; strip off feathers पिसें उपटणें; adorn with feathers or plumes पिसांनीं किंवा तुऱ्यांनीं सजवणें -शृंगारणें; pride (one's self) अक्कड -शेखी -तोरा मिरवणें, आढ्यता बाळगणें.—PLUMAGE पिसारा.

PLUMP *a. Ger.* fat लठ्ठ, गुबगुबीत, भरदार, पुष्ट; complete पुरा, पक्का: a p. lie; p. and sleek तुंद. -LY *ad.* निखालस, निक्षूण, साफ; to refuse p. वाटाण्याची अक्षत लावणें.

PLUNDER *v. Ger.* लुटणें, नागवणें, बुचाडणें.—*n.* लूट *f*. -ER लुटारू.

PLUNGE *v. F.* immerse बुडवणें; baptize by immersion बुडवून बाप्तिस्मा देणें [in].—*i.* बुडी -डुबकी मारणें; fall or rush, as into distress संकटांत पडणें, आगींत उडी टाकणें. —*n.* बुडी *f*, डुबकी *f*; आगींत उडी *f*.

PLURAL *a.* (*plus*, more) अनेक, बहुत; p. number अनेक वचन *n*. -ITY अनेकत्व *n*. बहुत्व *n*. -LY *ad.* अनेक वचनांत.

PLUS (*L.*) *Alg.* अधिक, धन; याची ही + खूण *f*.

PLUTO (*L.*) god of the infernal regions; the Indian P. यम.

PLUTUS (*L.*) god of wealth; the Indian P. कुबेर.

PLY *v.* (*plicare*) lay on लावणें, लागोपाठ मारणें, लगावणें; employ diligently दामटणें, चोपून काम घेणें; practice diligently चालवणें, झटून क. [from, to, for].—*i.* work steadily खपणें, नेटानें काम क., झटणें; make regular trips खेपा टाकणें, येरझारा क.—*n.* fold चुनी *f*, निरी *f*; bent वांक, कल.

PNEUMATIC, -AL *a.* (*Gr. pnein*, to blow) consisting of air वायुमय; pertaining to air वायूचा; moved by means of air वायूचा, in comp. वायु: वायुयंत्र *n*; fitted to contain air वायु राहण्यास योग्य, वायूचा.—*n. pl* the branch of science which treats of air वायुशास्त्र *n*.

POACH *v. F.* cook, as eggs, by breaking them into a vessel of boiling water अर्धशिजा -बोबडा क.; pocket and convey away by stealth, as game पारध चोरून-नेणें; plunder लुटणें; stab, as fish भोसकणें, भाल्यानें भोसकणें.

POCK* देवीचा -कांजणीचा फोड. -HOLE देवीचा व्रण.—POCKY *a.* देवींच्या व्रणांचा, फोडेला.

Pocket *F.* a small bag in a garment खिसा; —as of a purse, bag, &c. पूड *n*, कप्पा.—*v.* खिशांत -पिशवींत घालणें -लपविणें; take clandestinely चोरणें, हातमारणें, तावदेणें; to p. an insult, affront गिळणें, पोटांत घालणें. -book खिशांत ठेवायाची वही *f*, टिपणवही *f*, 'पाकेट बुक' *n*. -knife खिशांत ठेवायाचा चाकू. -money खाऊचा पैसा.

Pod *W.* शेंग *f*.

Pœdaria *a.*—fœtida हरणवेल *f*, जीवंती *f* (*Sanskr.*).

Poem (*poema*) कविता *f*, काव्य *n*.—Poesy, art of composing poems कवित्व *n*, कविताशक्ति *f*; poetry कविता *f*.—Poet, author of a poem कवि, काव्यकर्त्ता; one skilled in making poetry कवन करण्यांत कुशल, काव्यकुशल, कवि; p. laureate, poet employed to compose poems for the birthdays of a prince, or other special occasions राजकवि, राजाच्या पदरचा कवि; a ready p. शीघ्रकवि. -ess कविता करणारीण *f*, कवयत्री *f*. -ic, -al *a.* कवितेचा, कविते संबंधी; expressed in poetry कवितारूप, श्लोकबद्ध; possessing the peculiar beauties of poetry काव्यरसाचा, रसिक.—Poetry कविता *f*, कवन *n*; imaginative composition कल्पित कवन *n*; art of writing verse कविता विद्या *f*, काव्यरचना *f*.

Poignant *a.* (*pungere*, to prick) pungent तिखट, तीक्ष्ण; acutely painful तीक्ष्ण, भेदक, तीव्र, अति वेदनाकारक.—Poignancy तिखटपणा, तीक्ष्णता *f*.

Point (do.) sharp end of a piercing instrument टोंक *n*, अग्र *n*, अणकुची *f*, कोंच *f*; mark made by the end of a sharp instrument टोंकानें केलेली खूण *f*; mere spot clearly indicated परमाणु, बिंदु: a p. in space; promontory भूशलाका *f*, टोंक *n*; critical moment टिपण *n*, अणी *f*; mark बिंदु; punctilio बारीक -सूक्ष्म गोष्ट *f*; degree पर्याय, पायरी *f*; a peculiarity विशेष गुण -गोष्ट *f* -लक्षण *n*: good or bad *points* of a man, horse, &c.; single subject विषय, प्रकरण *n*, गोष्ट *f*; *Geom.* बिंदु; punctuation विरामचिन्ह *n*; object लक्ष *n*, धोरण *n*; to know the world, not to love her, is thy p.; subject of discussion वादाचाविषय -गोष्ट *f*, विषय; wit खोंच *f*, नोक *f*, खुबी *f*; moment क्षण; that is on the p. of उन्मुख; on the p. of death मरणोन्मुख; to be on the p. of टेंकणें; highest p. पराकाष्टा *f*, सीमा *f*, कळस; lowest p. कडेची पायरी *f*; to such a p. एथवर-पर्यंत; a particular p. टूक *f*; a sore p. वर्म *n*; striking p. खुबी *f*, टूम *f*; a weak p. नागवें *n*; if you look at it on this p. असें पाहिलें असतां; that is to the p. प्रासंगिक.—*v.* sharpen अणी काढणें -क., शेवटणें; aim रोखणें, धरणें, नेमणें (a sword); direct attention toward लक्ष लावणें; विरामचिन्ह घालणें -क.;—a wall, &c. दरजागिरी क., दरजा भरणें; out बोटानें दाखविणें.—*i.* बोट क. -दाखविणें, रोख नेम असणें; दरजा भरणें. -blank *ad.* खुणेकडे -कडचा; plain खरमरीत, खसखसीत. -ed टोंकाचा, अणीदार; नोकदार, खोंचीचा. -edly *ad.* विशेष उद्देशानें -लक्षानें, नोकझोकीनें. -er बोटानें दाखविणारा; [variety of dog trained to stop, and with his nose point out the game to sportsmen]. -less *a.* बोथट, बुळा; खडाखडी, खसखसीत, निर्भीड (remark).

Poise (*pendere*, to weigh) वजन *n*; balance, कांटा, तराजू *f*, *m*; equipoise समतोल; a thing suspended on a poise कांट्यावर धरलेली वस्तु *f*.—*v.* वजन क., तोलणें; कांट्यावर धरणें; समतोल क.; examine, as by a balance कांट्यांत घालून -जोखून पाहणें -अजमासणें.

Poison (*potio*, a drink) any substance which, introduced into the animal

organization, is capable of producing a morbid, noxious, or deadly effect upon it विष *n*; any thing infectious or malignant विष *n*, रोग: the p. of pestilential diseases; that which destroys moral purity or health भ्रष्टकारक वस्तु *f*, विष *n*: the p. of sin; mineral and vegetable p. स्थावर विष *n*; animal p. जंगम विष *n*; application or use of p. विषप्रयोग; taking p. विषभक्षण -सेवन *n*; drinking p. विषप्राशन *n*; curing p. विषघ्न.—*v.* विष देणें-घालणें; बिघडणें, नासणें; —one's self विष खाणें; to be *poisoned* विखारणें; to p. the ears of कान फुंकणें, [with]. -OUS *a.* विषाचा, विखारी, जहरी.

POKE* खिसा, कप्पा; to buy a pig in a p. पाण्यांत ह्रैस आणि वर मोल.—*D. v.* भोसकणें; —as an ox हुंदाडणें, ढोसणें.—*i.* चांचपणें, चांपसणें; at दुसकणें.—POKER, instrument for stirring the fire खोरणें *n*, उकरणें *n*.

POLE (*polus*) one of the extremities of an axis, in which a sphere revolves कण्याचें टोंक *n*;—of the earth ध्रुव; heavens आकाश. -STAR ध्रुवतारा.—POLAR *a.* ध्रुवाचा, ध्रुवाकडला -चा. -ITY विवक्षित शक्ति दाखविण्याचा धर्म.

POLE* long staff दांडा, काठी *f*, सोट;—of a tent खांब;—of a palanquin दांडी *f*;—of a carriage दांडी *f*, 'पोल';—with a crook to pull down pods, fruits, &c. अकडी *f*, शेकाटी *f*; measure of length of five and a-half yards काठी *f*. -AXE फरशी *f*, फरस.

POLEMIC, -AL *a.* (*Gr. polemos*, war) controversial वादाचा, वादात्मक (treatise); disputatious वादकरणारा, प्रतिवादी, तकरारी (writer).—POLEMICS वाद; धर्मसंबंधी वाद; धर्मसंबंधी वादाची विद्या *f*, धर्मवादशास्त्र *n*.

POLICE (*Gr. polis*, city) government of a city or town शहरची -गांवची बंदोबस्ती *f* -व्यवस्था *f*; internal regulation and government of a kingdom or state राज्याचा -देशाचा बंदोबस्त; body of civil force by which a city or country is regulated पोलीसचें लष्कर *n*, गांवखान्याचें लष्कर *n*, पोलीस *n*; p. station पोलिसाचें ठाणें *n*, चौकी *f*.—POLICY, the art of government राजनीति *f*, राज्य चालविण्याची युक्ति *f*; dexterity of management चतुराई *f*, हतोटी *f*; prudence in the management of affairs काम करण्याची चतुराई *f*, व्यवहारचातुर्य *n*—POLITIC *a.* राजनीतीचा, नीतिज्ञ, नीतिकुशल; sagacious in promoting a policy मतलबी, कारस्थानी; prudent शहाणा, समजदार; cunning हिकमती, कावेबाज. -AL *a.* राजकारभाराचा, राजनीतीचा; लोकांचा, देशाचा; public सरकारी, सरकारी नात्याचा (character); p. economy व्यवहारशास्त्र *n*. —POLITICIAN *n* राजनीतिकुशल, राजनीतिज्ञ; a man of artifice लागलाव्या, कवायती, कारस्थानी.—POLITICS, science of government राजनीति *f*, राजशासनविद्या *f*; political trickery कारस्थान *n*.—POLITY राज्यव्यवस्था *f* -नियम, नीति *f*, बंधारण *n*.

POLISH *v.* (*polire*) make smooth and glossy जिल्हई देणें, उजळणें; make elegant and polite सभ्य -शिष्ट क. [up, with].—*n.* सफाई *f*, जिल्हई *f* ओप *f*; सभ्यता *f*, प्रौढि *f*, सौजन्य *n*. -ER उजळणारा, ओपदेणारा, सफाई आणणारा;—of weapons or tools शिकलकर. —POLITE *a.* elegant in manners सभ्य, शिष्ट; courteous आदरशील, सत्कारी. -NESS शिष्टता *f*, सभ्यता *f*, सौजन्य *n*; गृहस्थपणा, रीतरवेस *f*. -LY *ad.* सभ्यपणानें, शिष्टपणानें, ताजीम देऊन.

POLL *Ger.* the head of a person डोई *f*, डोसकें *n*; register of heads, that is, of persons डोईपट्टी *f*, माणूसपट्टी *f*; [entry of the names of electors who vote for civil officers; election of civil officers; place

where an election is held].—*v.* खडसणें, डुंखणें;—the head, &c. केंस कापणें -कातरणें; fleece लुचाडणें, नागवणें, लुटणें; enter, as polls, in a list मत देणारांचीं नांवें पटावर दाखल क.; [to p. a jury, to examine each member of the party individually as to his concurrence in a verdict which has been rendered by them.] -ARD tree having its top cut off डेंखन *n*, डुंखन *n*; stag that has cast his horns मुंढा काळवीट; clipped coin कापलेलें नाणें *n*. -TAX डोईपट्टी *f*, जिजिया.

POLEN (*L.*) फुलांतला बुका, पराग, रज *n*.

POLLUTE *v.* (*polluere*) make foul मळविणें, मळीण क.; defile morally मळीण -भ्रष्ट क., बिघडणें;—ceremonially विटाळविणें, बाटवणें, अशुद्ध -ओवळा क.; violate by illegal sexual commerce भ्रष्ट -खराब क. [with].—POLLUTION मळविणें *n*; अपवित्रता *f*, मळ; बाट, भ्रष्टाकार; [*Med.* emission of semen, or spern, at other times than in sexual intercourse].

POLLUX (*L.*) *Astron.* पुनर्वसु नक्षत्र *n*.

POLTROON *F.* भित्रा, फटलंडी, भागुबाई *f*.

POLYANDRY (*Gr. polus*, many, *andros*, man) एकाच वेळेस अनेक नवरे असणें *n*, बहुभर्तृत्व *n*.

POLYGAMY (*Gr. -gamos*, marriage) एकाच वेळीं अनेक बायका करण्याची चाल *f*, बहुपत्नीत्व *n*, अनेक बायका *f pl*.—POLYGAMIST ज्यास अनेक बायका आहेत तो; advocate for polygamy बहुपत्निवादी.

POLYGLOT *a.* (*Gr. glotta*, tongue) पुष्कळ भाषांचा, बहुभाष.—*n.* a man knowing many languages बहुभाषज्ञ; a book containing several versions of the same text बहुभाषग्रंथ; [the text of one of the versions in a proper polyglot, printed by itself].

POLYGON *a.* (*Gr. gonos*, angle) बहुकोण.

POLYMATHY (*Gr. mathein*, to learn) अनेक विद्याज्ञान *n*.

POLYPARIOUS *a.* (*Gr. polos*, many, *L. parere*, to produce) बहुत उपजविणारा, बहुप्रसव.

POLYTHEISM (*Gr. -theos*, god) doctrine of a plurality of gods or invisible beings superior to man, and having an agency in the government of the world बहुदेवमत *n*.—POLYTHEIST बहुदेवमतवादी.

POMEGRANATE (*pomum*, a fruit, *granatus*, grained)—the tree डाळिंब *f*, डाळिंबी *f*; —the fruit डाळिंब *n*, अनार *n*.

POMFRET सरगुटलें *n*, सरंगा; black p. हलवा.

POMMEL (*pomum*, a fruit) बोंड *n*, गोंडा, &c. —*v.* कुदळणें, बडवणें, कुंदी काढणें, बुंदकणें.

POMP (*pompa*) grand procession समारंभाची -थाटमाटाची स्वारी *f*; show of magnificence डामडौल, थाटमाट. -OUS *a.* थाटमाटाचा, छानदारीचा, समारंभाचा; boastful बढाईचा, शेखीचा. -NESS थाट, थाटमाट, डौल, बढाई *f*, पत्राज *f*.

POND* तळें *n*, तलाव. डबके *n*.

PONDER *v.* (*pondus*, a weight) विचार क., चिंतणें; मनांत ठेवणें.—*i.* -वर विचार -चें चिंतन क. [on, upon, over]. -ABLE *a.* वजन करायाजोगा; तुलनीय. -OUS *a.* वजनदार, जड, भारी; important वजनदार, भारी, ऐवट.

PONIARD *F.* कटार *f*, जंब्या.

PONTIFF (*pons*, a bridge, *facere*, to make, because the first bridge over the Tiber was constructed and consecrated by the high priest) मुख्य धर्माधिकारी, महा धर्माध्यक्ष; the pope रोमन क्याथोलिक धर्माधिकारी, 'पोप'; Mahomedan p. खलीफ, इमाम; Hindu p. शंकराचार्य, जगद्गुरु.—PONTIFICAL *a.* मुख्य धर्माध्यक्षाचा.

PONTOON (*pons*, a bridge) पूल बांधण्याची नाव *f*.

PONY (from *puny*) तट्टू *n*.

POOL* small collection of fresh water supplied by a spring, or occurring in the course of a stream कुंड *n*; puddle डबरा, डबकें *n*.

Pooh *int.* थत्, फु.

Poop (*puppis*) गलबताचा मागला भाग.

REMOVE *v.* (See MOVE) उठवणें, उचलणें, घेऊन जाणें; displace जागा पालटणें, स्थलांतर क.; take away दूर -परिहार क., घालवणें (a disease); carry from one court to another एका कोर्टांतून दुसऱ्या कोर्टांत नेणें (a cause or suit by appeal);—from a post जाग्यावरून काढणें -दूर क. [from, to]. —*i.* जागा पालटणें, स्थलांतर होणें.—*n.* स्थलांतर *n*, स्थानभेद; step in any scale of gradation पायरी *f*; act of putting a horse's shoes on different feet खोलबंदी *f*. [from].—REMOVAL स्थानांतर करणें *n*; स्थानपालट, स्थानांतर *n*; परिहार, निरसन *n*; दूर करणें *n*, दूरीकरण *n*;—of obstacles विघ्ननाशन *n*;—of ignorance अज्ञानखंडन *n*.—REMOVED काढलेला, उठवलेला; दूर केलेला, घालवलेला; remote दूरचा, लांबचा; (a dwelling); r. from office स्थानभ्रष्ट, पदच्युत. REMOVER काढणारा, स्थलांतर करणारा; in comp. नाशक, घ्न, अंतक: रोगांतक, रोगघ्न, &c.—

REMOTE *a.* दूरचा, लांबचा; foreign परका; separate वेगळा; primary मूळचा, अलग [from].

REMUNERATE *v.* (*-munerare*, to give) बक्षीस देणें.—REMUNERATION देणगी *f*, प्रतिफल *n*. —REMUNERATIVE *a.* फल देणारा, बक्षीस देणारा.

RENAL, See under REINS.

RENCOUNTER (*re* & *counter*) meeting of two persons or bodies भेटाभेट *f*, ठेप *f*; combat कचाकची *f*, चकमक *f*, झमाझमी *f*.

REND* *v.* tear asunder फाडणें, चिरणें, टरकावणें; split चिरणें, दुभागणें, विभागणें (1 Kings xi. 11) [into].

RENDER *v.* (*-dare*, to give) return परत देणें -क.; inflict, as a retribution शासन लावणें, सूड उगवणें -घेणें; give देणें; contribute करणें, पुरवणें (service);—as an account हिशोब -झडती देणें; cause to do करवणें: to r. a fortress more secure; translate भाषांतर क.; boil down and clarify कढवून निवळ क.; plaster roughly अस्तरगारी क. [to]. -ING भाषांतर *n*; गिलाव्याचा पहिला थर घालणें -रचणें *n*; अस्तरगारी *f*.

RENDEZVOUS *F. meeting जमाव; place of meeting संकेतस्थल *n*, जमण्याची जागा *f*, अड्डा.

RENEW *v.* नवा क.; restore to former freshness ताजा क., उजरणें; begin again पुनः आरंभ क.; do over again पुनः -नव्यानें -परतून क.; furnish again पुनः पुरवठा क., पुरवणें; *Theol.* make new spiritually नवें मन देणें, नवा स्वभाव देणें (Rom. xii. 2).—*i.* नवा होणें; पुनः आरंभणें. -AL नवा करणें *n*, नवीकरण *n*, जीर्णोद्धार; फिरून करणें *n*, पुनरारंभ.

RENOUNCE *v.* (*-nunciare*, to announce) disclaim टाकणें, सोडणें, नाकारणें (a title); reject, as a connection or possession

टाकणें, सोडणें, त्याग क., नांव सोडणें. -MENT. —RENUNCIATION आंगाबाहेर टाकणें *n*; अस्वीकार, नाकार; त्याग, उत्सर्ग, परित्याग;—of the world सर्वसंगपरित्याग, सन्यास, संसारत्याग.

RENOVATE *v.* (*-novare,* to make new) See RENEW.

RENOWN (*-nomen,* name) नांव *n,* कीर्त्ति *f.* -ED नामांकित, कीर्त्तिमान, प्रख्यात [for].

RENT* भाडें *n*;—of land धारा, सारा, वसूल. -AL, -ROLL तहशील *f n,* तनखा, वसूल बाकीची याद *f,* जमाबंदी *f.* -EE भाड्यानें -साऱ्यानें लावणारा; the tenant who takes an estate on rent भाड्यानें घेणारा, भाडेकरी; सारेकरी, धारेकरी.

RENT (See REND) चीरफळा.

REPAIR *v.* (*-parare,* to prepare) restore to a good state after injury or decay दुरुस्त क., सुधारणें.—as a house डागडुजी -'रिपेर' क.; supply loss भरणें, भरून देणें, तोटा भरणें.—*n.* डागडुगी *f,* 'रिपेर' *f,* सुधारणूक *f,* जीर्णोद्धार; keep in r. मरामत -उस्तवारी राखणें; to look after the *repairs* of मोडतोड पाहणें.—REPARATION डागडुजी करणें *n*; डागडुजी *f*; amends फेडणें *n*; प्रतिकार, वजपा, मोबदला [for].

REPAIR *v. i.* (*-rapatriare,* to return to one's country) जाणेंयेणें -येणेंजाणें क.

REPARTEE *F.* समयोचित्त उत्तर *n,* हजीरजबाब.

REPAST (*pascere,* to feed) भोजन *n,* जेवण *n*; meal अन्न *n,* आहार.

REPAY *v.* परत देणें -क., फेडणें; make return फेड क., प्रतिदान क.

REPEAL *v.* (*-appeler,* to call) रद्द क., मोडणें. —*n.* मोडणें *n,* भंग, लोप, उच्छेद.

REPEAT *v.* (*-petere,* to attack) फिरून -दुसऱ्यानें -उलटून क., दुसारणें; say again फिरून ह्मणणें; rehearse ह्मणणें, पाठ ह्मणणें [to]. -EDLY *ad.* वारंवार, पुनःपुनः—REPETITION पुनरावृत्ति *f,* दुसारणी *f,* पुनः -दुसऱ्यानें क. *n*; दुसऱ्यानें बोलणें *n,* पुनरुक्ति *f*; पठन *n,* अनुवाद.

REPEL *v.* (*-pellere,* to drive) मागें सरणें -लोटणें, हटवणें; oppose आडवा येणें, वारणें, निवारणें [from].

REPENT *v. i.* (*-pœnitere,* to make repent) feel pain, sorrow, or regret for what one has done or omitted to do पश्चात्ताप -खेद पावणें -क.; change the mind or course of conduct on account of regret or dissatisfaction with what has occurred मन -बुद्धि फिरवणें, वर्त्तन पालटणें; *Theol.* be sorry for sin as morally evil and to seek forgiveness पापाविषयीं खेद क., पश्चात्ताप क. (Luke xiii. 3).—*t.* -विषयीं दुःख क. [of]. -ANCE पश्चात्ताप, अनुताप [for]. -ANT *a.* & *n.* पश्चात्तापी, अनुतापी.

REPERCUSSION (See PERCUSSION) उलटविणें *n,* प्रतिसारण *n.*

REPERTORY (*-parere,* to procure) कोठी *f,* कोठार *n.*

REPETITION, See under REPEAT.

REPINE *v. i.* (*re* & *pine*) मनांत झुरणें, खंतघेणें, चुरमुरणें [at].

REPLACE *v.* पहिल्या जागीं -जागच्या जागीं ठेवणें, पूर्वस्थितीवर ठेवणें; repay परत देणें, भरणें; substitute an equivalent for बदला देणें; supply the want of -ची गरज पुरवणें [by, with].

REPLENISH *v.* (*-plenus,* full) पुनः भरणें; fill completely तंतोतंत भरणें, भरणें [with].

REPLETE *a.* (*-plere,* to fill) पूर्ण, परिपूर्ण [with]. —REPLETION पूर्णता *f,* परिपूर्ति *f*; *Med.* fullness of blood अतिपुष्टि *f,* रक्तवृद्धि *f* -बाहुल्य *n.*

REPLY *v.* (*-plicare,* to fold) उत्तर देणें; *Law,*

प्रतिवादीच्या उत्तराला उत्तर देणें [to].—*n.* उत्तर *n*, जाब; प्रत्युत्तर *n*;—in judicial proceedings उत्तरवाद; an evasive r. टाळाटाळीचें उत्तर *n*, उत्तराभास.

REPORT *v.* (*-portare*, to bear) bring back, as an answer जाब आणणें -नेणें; relate what one has discovered, as a person sent to examine, explore, or investigate वाका -हकीकत सांगणें -लिहिणें पाठविणें; tell सांगणें, बोलणें, कळवणें; give a formal or official account of हुद्याच्या नात्यानें खबर देणें, रपोट क.; make minutes of, as a speech, or the doings of a public body टिपण घेणें; to be *reported* वाजणें; to r. one's self आपल्या वरिष्ठाचे चाकरी करितां हाजर असणें. —*n.* वाका, अहवाल, हकीकत *f*, 'रपोट'; rumor बातमी *f*, अवाई *f*; reputation आबरू *f*, कीर्त्ति *f*, लौकिक (Acts x. 22); sound आवाज;—of a gun बार, आवाज; record of a judicial opinion निवाडापत्रक *n*, अभिप्राय, 'रपोट'; sketch of a speech, or a public meeting सभेंतील भाषणाचा सारांश, 'रपोट'; written r. हकीकतनामा *f*; loud r. धडाका; false r. कंडी *f*, नीळरांप *f*; flying r. हूक *f*; idle *reports* बाजारी -गटारी बातमी *f*; to spread a r. बातमी फुंकणें, पेरणें [of, on, upon, to]. -ER अकबरनवीस, वार्त्तिक; वर्त्तमानपत्राचा बातमीदार, 'रिपोर्टर.'

REPOSE *v.* (See PAUSE) lay at rest निजविणें, विसांवा देणें; place in confidence भरवशानें -विश्वासानें ठेवणें, हातीं सोपणें [on, upon, in].—*i.* निजणें, आंग टाकणें, लवंडणें; विश्वासावर राहणें, भरवशानें -वर राहणें.—*n.* आराम, विश्रांति *f*; झोंप *f*; rest of mind सुख *n*, चैन *n* [from].—REPOSIT *v.* lay up सांठवणें, साचवणें; lay up for safety जतनेस ठेवणें, पाळणें.—REPOSITORY सांठवण *n*, निधान *n*, निधि.

REPREHEND *v.* (*prehendere*, to lay hold of) दोष लावणें [for]—REPREHENSIBLE *a.* दोष लावायाजोगा, दूषणीय.—REPREHENSION दोष, ठपका, शब्द, बोल.

REPRESENT *v.* exhibit दाखविणें, दर्शविणें; delineate वर्णन क.; *Drawing*, चित्र काढणें -काढून दाखविणें; personate सोंग घेणें: to r. Ganpati; supply the place of स्थानीं -जागीं उभा राहणें, प्रतिनिधि होणें; stand in the place of, in the right of inheritance वारसाच्या जागीं राहणें -असणें; give one's own impression and judgment of -च्या विषयीं स्वमत -विचार दर्शविणें; serve as a sign of दर्शविणें, सूचक होणें -असणें: mathematical symbols r. quantities;—as a case सांगणें, निवेदन क., वाका सांगणें; [present a second time by a transcript of what was originally presented to the mind] [to, by]. -ATION दाखविणें *n*, दर्शविणें *n*; वर्णणें *n*, वर्णन *n*; चित्र *n*; सोंग *n*, वकिली *f*, प्रतिनिधित्व *n*; प्रतिमा *f*; r. against गिल्ला *n*. -ATIVE *a.* प्रदर्शक, प्रतिरूपक; वांटचा, प्रतिनिधीचा.—*n.* प्रतिनिधि, वकील [for, of].

REPRESS *v.* दाबणें, दडपणें; restrain आवरणें, निग्रह क.; आटोपणें [by].—REPRESSIVE *a.* नियामक, निग्रहकारी, दाबाचा.

REPRIEVE *v.* (*-probare*, to prove) delay the punishment of शिक्षेची तहकुबी क.; relieve for a time क्षणभर विसांवा देणें -चैन पाडणें.—*n.* शिक्षेची तहकुबी *f*; मरणाच्या शिक्षेची तहकुबी *f*; दम, अवसर, आराम [from].

REPRIMAND *v. F.* तोंडची शिक्षा क., धमकी देणें.—*n.* तोंडची शिक्षा *f*, धमकी *f*, शब्दमार, वाग्दंड [for].

REPRINT *v.* पुनः छापणें [from].—*n.* दुसरी छापणी *f*.

REPRISAL (*-prehendere*, to take) act of taking from an enemy by way of retaliation प्रत्यापहार; act of retorting on an

enemy by inflicting suffering or death on a prisoner taken from him, in retaliation for an act of inhumanity प्रतिपीडन *n*; that which is reprised अपहार [for].

REPROACH *v.* (*-prope,* near) abusive reflections निंदा *f,* अपवाद; shame लज्जा *f,* ठपका; object of blame, censure scorn, or derision निंदास्पद, ठपका, लाज *f* [for, with]. -FUL *a.* निंदेचा, निंदात्मक; लाजिरवाणा, लज्जाप्रद.

REPROBATE *v.* (*-probare,* to prove) नापसंद क., नाकारणें; abandon to punishment without hope or pardon सोडणें, टाकणें.—*a.* देवाधर्मानें टाकलेला, माणसांतून उठलेला.

REPROVE (do.) तोंडची शिक्षा क., शब्दाचा मार देणें; reprimand बोल -शब्द लावणें [for]. —REPROOF बोल, शब्दमार, वाग्दंड.

REPTILE *a.* (*repere,* to creep) सरपटत चालणारा; grovelling हलका, अधम, नीच.—*n.* पायाखालचा जीव, सरपटत चालणारा जीव, उरोगामी.

REPUBLIC (*res,* a thing, an affair, *publicus,* public) a state in which the sovereign power is exercised by representatives elected by the people लोकसत्तात्मक राज्य *n,* लोकाधिपत्य *n.* -AN *a.* लोकाधिपत्याचा, बहुनायकीचा; लोकप्रभुत्वानुसारी (manners).

REPUDIATE *v.* (*-pudere,* to be ashamed) reject नाकारणें; divorce बायकोला सोडचिठ्ठी देणें disclaim आंगावेगळें -बाहेर टाकणें (debt) [for].—REPUDIATION त्याग, परित्याग.

REPUGNANCE (*-pugnare,* to fight) विरुद्ध -वांकडेपणा; reluctance नाखुशी *f,* कंटाळा. —REPUGNANT *a.* वांकडा, प्रतिकूल; नाखुश, नाराजी, विमुख [to].

REPULSE *v.* (*-pellere,* to drive) मागें सारणें, हटवणें.—*n.* प्रतिसारण *n,* हटवणूक *f.*—REPULSION प्रतिसारकशक्ति *f* -गुण; प्रतिसारण *n,* मागें सारणें *n.*—REPULSIVE *a.* प्रतिसारक, निवारक; त्रासजनक -कारक; cold अप्रीतिजनक, निःस्नेह, कोरडा, थंड (manners).

REPUTE *v.* (*putare,* to count) मोजणें, गणणें, —*n.* आबरू *f,* प्रतिष्ठा *f*; credit derived from public opinion नांव *n,* कीर्त्ति *f.*—REPUTABLE *a.* आबरूचा, प्रतिष्ठित; कीर्त्तिप्रद, यशस्कर.—REPUTATION आबरू *f,* प्रतिष्ठा *f,* नांव *n.*

REQUIRE *v.* (*quærere,* to seek) demand मागणें, हक्कानें मागणें; make necessary गरज असणें -लागणें, अगत्य पाडणें [of]. -MENT सत्तेचें मागणें *n,* मागणी *f*; गरज *f,* जरूरी *f,* अगत्य *n.*—REQUEST *v.* विनंती क., मागणें, प्रार्थणें [of].—*n.* विनंती *f,* अर्जी *f,* प्रार्थना *f*; that which is asked for मागितलेली वस्तु *f,* इच्छा *f,* मागणें *n*; state of being desired or held in such estimation as to be sought after अपेक्षा *f,* इच्छा *f,* आकांक्षा *f*: knowledge and fame are in great r.—REQUISITE *a.* जरुरीचा, अगत्याचा, अवश्यक; to be r. लागणें, पाहिजे, असणें.—*n.* अगत्याची गोष्ट *f,* अवश्यक वस्तु *f.*—REQUISITION मागणें *n,* मागणी *f*; [a formal demand made by one state or government upon another for the surrender of a fugitive from justice]; that which is required by authority मागणें *n,* मागणी *f.*

REQUITE *v.* (*re & quit*) फेडणें, परत क., देणें [for].—REQUITAL प्रतिक्रिया *f,* फेडणें *n*; —in a bad sense प्रतिदंड, प्रतिकार, वजपा.

RESCIND *v.* (*-scindere,* to cut) रद्द क., माजी पाडणें, मोडणें.—RECISSION रद्द करणें *n,* खंडन *n,* उच्छेद.

RESCRIPT (*-scribere,* to write) आज्ञापत्र *n,* राजाज्ञा *f.*

RESCUE *v.* (*-excutere,* to drive out) सोडविणें, उद्धरणें, बचाव क.—*n.* सोडवणूक *f,* सुटका *f,* तारण *n,* बचाव; [*Law.* the forcible retaking or taking away, against law, of things

lawfully distrained; also the forcible liberation of a person from an arrest] [from].

RESEARCH शोधणें *n*, शोध, परीक्षा *f*, विवेचन *n* [into].

RESEMBLE *v.* (*-similis*, like) उपमा -तुलना क.; be like to सारखा -बराबर असणें.—RESEMBLANCE सारखेपणा, सादृश्य *n*; likeness प्रतिरूप *n*, प्रतिमा *f*, उपमा *f* [to, between].

RESENT *v.* (*-sentire*, to feel) take ill वाईट वाटणें -मानणें, मनावर घेणें; express resentment by word or action वाईट वाटलेलें बोलून किंवा करून दाखविणें. -FUL *a.* अकसी; शीघ्रकोपी, तापट. -MENT राग, संताप, क्रोध.

RESERVE *v.* (*-servare*, to keep) ठेवणें, राखणें, पुढल्या कामासाठीं -खर्चासाठीं ठेवणें; retain ठेवणें, राखणें, पोटांत ठेवणें, बाळगणें.—*n.* राखलेला पदार्थ, सांठा, उपराळा;—of an army राखून ठेवलेली फौज *f*, फाजल *f* (*H.*); backwardness लाज *f*, भीड *f*, संकोच, पडदा; ठेवणें *n*, राखणें *n*; in r. उपराळ्यास, सांठ्यास; to lay by as r. घर द्रणून ठेवणें [for].—RESERVATION ठेवणें *n*, राखणें *n*; withholding from disclosure मनांत ठेवणें *n*, गांठ *f*; सांठवण *f*, सांठपा; *Law*, a clause in an instrument in which some new thing is reserved out of the thing granted, and not *in esse* before सवड *f*, फट *f*; to speak without r. मन मोकळें करून बोलणें; to make a r. बोली सोडवणें.—RESERVED संकोचवृत्ति, आंतल्या गांठीचा, खोल मनाचा, मख्ख. -NESS संकोच.—RESERVOIR पाण्याचा खजीना -चें सांठवण *n*, टांकें *n*.

RESIDE *v. i.* (*-sedere*, to sit) राहणें, वसणें, नांदणें; inhere धरून -अधिष्ठून असणें, आंत राहणें: in such acts, virtue and duty r. [at, in].—RESIDENCE नांदणूक *f*, वस्ती *f*, रहिवास, अधिष्ठान *n*; an abode वस्ती *f*, ठिकाण *n*, घर *n*.—RESIDENT *a.* राहणारा, वस्ती करणारा, रहिवासी, in comp. वासी, स्थ: वनवासी, ग्रामस्थ.—*n.* राहणारा मनुष्य; a public minister who resides at a foreign court परराज्याच्या दरबारांत राहणारा वकील, 'रसिडेंट.'—RESIDENCY, See RESIDENCE; official dwelling of a government official in India 'रसिडेन्सी' *f*.—RESIDUE बाकी *f*, शेष *n*, उरलेला अंश, ऊर *f*; the balance of a debt or account बाकी *f*, शिलक *f*, शेंपूट *n*, खरकटें *n*.—RESIDUAL *a.* बाकीचा.

RESIGN *v.* (*-signare*, to sign) give up सोडणें, त्यागणें;—as an office सोडणें, राजीनामा देणें; withdraw as a claim सत्तानिवृत्ति क. [to]. -ATION त्याग, परित्याग, राजीनामा; state of being resigned मान्यतावृत्ति *f*; r. to the will of God ईश्वराच्या करण्यास -इच्छेस मान्य असणें *n*, ईश्वराज्ञा मान्यतावृत्ति *f*.

RESIN (*resina*) राळ *f*, धूप. -OUS *a.* राळेचा, राळेच्या गुणाचा.

RESIST *v.* (*-sistere*, to stand) विरोध -प्रतिकारक, अडती घालणें; oppose आडवा येणें, विरोध क., प्रतिकूळ होणें: God *resisteth* the proud.—*i.* अडथळा क., आडवा येणें. -ANCE अडती *f*, हरकत *f*, विरोध, प्रतिकार; unlawful or violent r. दंडेली *f* [against]. -IBLE *a.* विरोध करायाजोगा. -LESS *a.* अनिवार्य.

RESOLVE *v.* (*-solvere*, to loosen) द्रव -रस क.; reduce to the constituent elements मूळ तत्वें निराळीं क.; dissolve and reduce to a different form मोडून -विसर्जन करून वेगळें रूप देणें: the house *resolved* itself into a committee; disentangle उलगडा क., अर्थ सांगणें (a riddle); convince खातरी -समजूत क.; express, as an opinion, by resolution and vote ठराव क., ठरविणें; *Math.* solve, as a problem उलगडा क.; find the answer to -चें उत्तर काढणें -मिळवणें; *Med.* disperse

or scatter, as an inflammation or tumor बसवणें, जिरविणें, भिनविणें [on, upon]. —*i.* द्रवणें, रस होणें; जिरणें, मुरणें, मावळणें (a fever, tumor); संकल्प -निश्चय क. [into].—*n.* धैर्य *n,* धीर, नेट; ठराव, निश्चय, संकल्प.—Resoluble *a.* वितळायाजोगा, द्रवनीय.—Resolute *a.* धिराचा, नेटाचा, दृढनिश्चयी, निग्रही [against]. -ness दम, धैर्य *n,* नेट.—Resolution धैर्य *n,* नेट, हिमत *f;* ठराव, निश्चय, संकल्प; firm r. वज्र -दृढसंकल्प; r. of government सरकारचा ठराव.—Resolvable *a.* रस होण्यासारखा, द्रवनीय, मूळतत्वें निराळीं होण्यासारखा; उलगडण्यासारखा.—Resolvent द्रावकपदार्थ, द्रावण.

Resort *v. i. F.* repair जाणें, येणें; have recourse आश्रय धरणें -क., उपाय क. [to].—*n.* जाणें *n,* येणें *n,* आश्रय धरणें *n;* a haunt बसण्याचा अड्डा, बैठक *f,* जाण्यायेण्याची -बसण्याची जागा *f;* last r. निदानीचा उपाय.

Resound *v.* घुमणें, दणदणविणें, गाजणें; spread the fame of कीर्त्ति पसरणें, गाजविणें.—*i.* दणदणणें, घुमणें; गाजणें, पसरणें; sound loudly लांबवर आवाज जाणें; his voice *resounded* far; echo प्रतिध्वनि होणें -उठणें [with].—*n.* प्रतिध्वनि, नाद.—Resonant *a.* प्रतिध्वनि करण्याजोगा, घुमण्याजोगा, अनुनादी, सनाद. — Resonance अनुनाद, प्रतिनाद, प्रतिध्वनि.

Resource *F.* resort गति *f,* युक्ति *f,* उपाय, आश्रय; *pl* pecuniary means पैका, द्रव्यबल *n,* अर्थ; गत्यंतर *n,* अन्यगति *f;* having no other r. अनन्यगति; having no r. गतिहीन, निरुपाय; last r. निदानीचा -शेवटचा उपाय.

Respect *v.* (*-specere,* to look) relate to लागणें, लागू होणें, संबंध असणें; regard मानणें, सन्मान राखणें [for].—*n.* संबंध, धोरण *n;* मान, सत्कार, आदर, भीड *f;* that which respects to any person or thing प्रकरण *n,* बाबद *f,* गोष्ट *f;* r. of persons भेददृष्टि *f* -भाव; with respect to विषयीं, संबंधी; *pl* मुजरा, सलाम, रामराम; to pay one's *respects* दर्शन घेणें, मुजरा -सलाम क. [for]. -able *a.* अब्रूचा, अब्रूदार, प्रतिष्ठित, संभावित; moderate in degree of excellence or in number, but not despicable बरासा -च, जमेस धरायाजोगा, सरासरी, मध्यम. -ful *a.* मर्यादेचा, भिडेचा, मर्यादशील, आदबशीर. -fully *ad.* मर्यादेनें, आदरपूर्वक -पुरस्सर. -ibility अब्रू *f,* प्रतिष्ठा *f,* इजत *f,* मर्यादा *f;* family r. कुलमर्यादा *f.* -ing *prep.* विषयीं. -ive *a.* साक्षेप, ससंबंध; each to each आपापला, ज्याचा त्याचा, in comp. स्वस्व. -ly *ad.* ज्याचा त्यानें.

Respire *v. i.* (*-spirare,* to breathe) श्वास -दम टाकणें, दम घेणें.—Respiration श्वास, उश्वास, प्राण.—Respiratory *a.* श्वासोश्वासाचा, श्वासोश्वास संबंधी (organs).

Respite (See Respect) postponement तहकुबी *f;* pause विसांवा, अवकाश, विराम; *Law,* reprieve शिक्षेची तहकुबी *f* [from]. —*v.* तहकूब क.; विसांवा देणें; शिक्षेची तहकुबी क.

Resplendent *a.* (*splendere,* to shine) चकचकीत, तेजस्वी, प्रकाशमान [with].

Respond *v. i.* (*-spondere,* to promise) उत्तर -जबाब देणें; suit मिळणें, जमणें, जुळणें; render satisfaction तोटा भरून देणें, भरणें: the defendant is held to r. in damages. [to].—*t.* तोटा भरून देणें.—*n.* [a short anthem interrupting the reading of a chapter which is not to proceed until the anthem is ended]. -ent *Law,* प्रतिवादी-पक्षी; जुळणारा, बेताचा;—one who maintains a thesis in reply प्रत्युत्तर देणारा, स्थापन -मंडन करणारा. -ence उत्तर देणें *n.*—Response उत्तर *n;*—in disputation समाधान *n,* उत्तर *n,* प्रतिवाद;—in a litany

उत्तरवाक्य *n.* [to]. — RESPONSIBLE *a.* जबाबदार, मोसबेदार [for].—RESPONSIBILITY जबाबदारी *f*, जामीनकी *f*, जिम्मा *f*, मोसबा.—RESPONSIVE *a.* उत्तर देणारा; जुळणारा, जमविणारा: the vocal lay r. to the strings.

REST* state of quiet or repose स्थिरता *f*, निवांतपणा, शांति *f*, निश्चलता *f*; cessation from motion or labor विसांवा, आराम, विश्रांति *f*; tranquillity सुख *n*, समाधान, चैन *n*, शांति *f*, स्वस्थता *f*; that on which any thing rests or leans for support आधार, धोर, धिरा; a place where one may rest विसांव्याची जागा *f*, विश्रांतिस्थान *n*;—for porters धका, ओटा, तक्या इ०; sleep निद्रा *f*, निद्रावस्था *f*; death मरण *n*; देहावसान *n*; *Poet.* and *Mus.* a short pause in reading अवसान *n*, यति *f*;—as of a lance आधार, नेटावा, घोडा, लाग; to feel at r. सुखास -चैन पडणें; to lie down to r. निजणें.—*v. i.* आराम क., झोंप घेणें; स्थिरावणें, स्थिर होणें, थांबणें; स्वस्थ -सुखी -शांत असणें, सुख वाटणें; विसंबणें, विसांवा घेणें -पावणें, बसणें; आधार -आश्रय क., टेकावा असणें, राहणें: a column *rests* on its pedestal; अवसान पावणें, मरणें; rely टेकून राहणें, टेकणें, विश्वास ठेवणें: to r. on God's promises; to r. with -च्या हातीं देणें; it *rests* with him to decide [on, upon, in, from].—*t.* शांत -स्वस्थ क., बसवणें; ठेवणें, टेकणें. -LESS *a.* अशांत, शांतिहीन, बेआराम, व्याकूळ; passed in inquietness तळमळीचा, बेआरामीचा: the patient has had a r. night रोग्याला रात्रभर डोळ्यास डोळा लागला नाहीं चैन पडलें नाहीं; hard कठीण, अडचणीचा; discontented with one's lot, residence, &c. आपल्या भोगास -स्थितीस कंटाळलेला; not satisfied to be at rest चुळबुळ्या, चंचळ, घालमेल्या: a r. prince; disposed to be turbulent धांदल्या, धुमाळ्या, बंडखोर: a r. subject; sleepless निद्राहीन. -LESSNESS असमाधान *n*, तळमळ *f*, बेआरामी *f*, हळहळ *f*; चुळबुळ *f*, उठबैस *f*, चंचळपणा; घालमेल *f*, चडफड *f*; निद्राराहित्य *n*.

REST (*restare*, to stay back) शेष *n*, बाकी *f*; the remainder वरकड -बाकीचे -अवांतर जिन्नस -मनुष्यें इ०.—*v. i.* राहणें, उतरणें [with]. -OFF, IVE *a.* अडेल, खलेल. -NESS दंडेली *f*, खलेली *f*, अडेलपणा.

RESTITUTION (*statuere*, to put) परत देणें *n*, प्रतिदान *n*; तोटा भरून देणें *n*; पूर्वस्थितीवर आणणें *n*, उद्धार.

RESTORE *v.* (*restaurare*) bring back from the state of ruin निटावणें, पूर्वस्थितीवर आणणें, उजरणें; give or bring back, as that which has been lost (गमावलेला) परत देणें -आणणें; bring back to health or strength बरा -निरोगी क.; give in place of or as satisfaction for बदला -भरून देणें. [from, to, buy, with].—RESTORATION परत देणें *n*, प्रतिदान *n*; सुधारणें *n*, सुधारणूक *f*, जीर्णोद्धार; पुनःस्थापन *n*, पूर्वस्थितिस्थापन *n*, [to].—RESTORATIVE *a.* पूर्वस्थितीवर आणणारा; तेजोदायक. —*n.* तेजोदायक, तेजवर्धक औषध *n*, तेजबल *n*.

RESTRAIN *v.* (*stringere*, to draw together) आकळणें, आवरणें, दाबांत ठेवणें; confine अटकेंत ठेवणें -घालणें, बांधणें; withhold माघारा ठेवणें, राखणें, न देणें; abridge संक्षेप क. [from, by]. -ABLE *a.* आकळायाजोगा, आकलनीय, दमनीय. -ED आकळलेला, नियत, संयत, निगृहीत;—in desire जितेंद्रिय, बद्धकाम. -ER आकळणारा, नियामक, निरोधक.—RESTRAINT आकळणें *n*; आकलन *n*, नियमन *n*; आटोप, दाब, अवरोध, लगाम; self-r. आत्मसंयम;—of speech, action, &c. भीड *f*, संकोच, दाब; to feel under r. भीड पडणें -असणें, संकोच वाटणें; that

which restrains, as a law, a prohibition आसेध: r. of time कालासेध; r. of place स्थानासेध; a r. अटक *f*, दडपण *n*, आडकाठी *f*.—RESTRICT *v.* मर्यादा -हद्द क., आळा बांधणें: to r. a patient to a certain diet रोग्यास पथ्यावर ठेवणें [to]. -ED निबद्ध, परिमित;—as a word मितार्थ, योगरूढ. -ION मर्यादा *f*, आळा; आडकाठी *f*, अटकाव, दडपण *n*.

RESULT *v. i.* (*resultare*, to leap back) proceed निघणें, येणें, फळ होणें, होणें; end in परिणाम -शेवट होणें; *Logic* सिद्ध होणें [in, from].—*n.* फळ *n*, परिणाम; सिद्धांत, निश्चितार्थ; उपपत्ति *f*. -ING प्रयुक्त, उत्पन्न, प्रभव: pain r. from sin पापप्रयुक्त दुःख.

RESUME *v.* (*-sumere*, to take) परत घेणें; begin again पुनः आरंभ क., चालवणें.—RESUMABLE *a.* परत घ्यायाजोगा.—RESUMPTION परत घेणें *n*, प्रत्याहार;—of a grant दत्तापहार; [*Law*, taking again into the king's hands such lands or tenements as he had granted to any man on false suggestions].

RESUME *F.* सार, उपसंहार, सारार्थ, गोश्वारा.

RESURRECTION (*-surgere*, to rise) पुनः उठणें *n*; rising again from the dead मरून पुनः उठणें *n*; the future state पुनरुत्थिति *f*.

RESUSCITATE *v.* (*-suscitare*, to raise) revive, esp. to recover from apparent death फिरून जिवंत -सजीव क., जिवांत जीव आणणें -घालणें: to r. a drowned person; to r. withered plants.—*i.* जिवांत जीव येणें, पुनः जिवंत होणें, सजीव होणें.

RETAIL *v. F.* cut up and dispose of in small parcels फुटकळ -किरकोळ विकणें; sell in small portions थोडें थोडें सांगणें. -ER किरकोळ -फुटकळ विकणारा, घेवारी, फडकरी.

RETAIN *v.* (*-tenere*, to hold) ठेवणें, धरणें, राखणें; keep in pay पदरीं -जवळ ठेवणें, मुशारा देऊन -चाकरीस ठेवणें [in]. -ER ठेवणारा, राखणारा; a servant पदरचा माणूस, आश्रित; body *retainers* परिवार, सेवकवर्ग. -ING धारण *n*, धृति *f*. -TIVE *a.* धारणशक्तिविशिष्ट, दृढ (memory). -TION ठेवणें *n*, धारण *n*; धारणाशक्ति *f*, धारणा *f*; custody राखण *f*, रखवाली *f*; [*Law*, right of withholding a debt or of retaining property until a debt due to the person claiming this right be duly paid].—RETINUE स्वारी *f*, जिलीब *f*, इतमाम, खटलें *n*; light r. सडीस्वारी *f*.

RETALIATE *v.* (*-talis*, such) उलट -परत क., फेडणें, सूड उगवणें (injuries) [upon].—RETALIATION फेड *f*, उसणें फेडणें *n*, प्रत्युपकार, वाईटा बदल वाईट फेडणें *n*, सूड [for].

RETARD *v.* (*-tardare*, to delay) उशीर लावणें, खोळंबा -खोटी क., मंद -ढिला क.: to r. the march of an army; to r. the motion of a ship; to put off लांबणीवर टाकणें, उशिरानें क., दिवसगतीवर लोटणें: to r. a rupture between nations.

RETENTION, See under RETAIN.

RETICLE *F.* लाहान जाळें *n*; [net work dividing a telescope glass into equal squares].—RETIFORM *a.* जाळ्याचा आकाराचा, जाळीदार.—RETINA (*L.*) डोळ्याचा एक पडदा आहे.

RETIRE *v. i. F.* draw back or away मागें सरणें -हटणें -होणें -जाणें; go from company or from a public place into privacy सभेंतून -मंडळींतून उठून जाणें, निघून जाणें; retreat from danger संकटापासून निघून जाणें, पळणें; withdraw into private life घरीं बसणें, रोजगार सोडणें; recede मागें सरणें -हटणें: the sea *retires* in bays [from, with]. -MENT मागें सरणें *n*; घरीं बसणें; एकांतवास; एकांतवासाचें स्थल *n*.—RETIRED मागें सरलेला; घरीं बसलेला; sequestered आडवळणी, एकांताचा;—of

persons साबडा, भिडस्त, संकोचवृत्ति; a r. spot आडवळण *n.*

RETORT *v.* (*-torquere,* to turn) bend or curve back वळविणें, पीळ देणें; return, as an argument उलट -परत देणें; reverberate प्रतिध्वनि क. [in, upon].—*i.* उलटून बोलणें -सांगणें.—*n.* उलट गोष्ट *f,* फेरजबाब, जाबसाल, प्रत्युत्तर *n*; *Chem.* वक्रयंत्र *n.*

RETRACE *v.* (*re & trace*) परत जाणें -येणें; —one's steps मागें परतणें, मागें पाऊल टाकणें; trace back पत्ता लावणें; trace over again गिरवणें; reverse फिरवणें: to r. one's proceedings.

RETRACT *v.* (*-trahere,* to draw) draw back, as claws नखें आंत घेणें; recant बोलणें परत घेणें -फिरवणें.—*i.* बोलणें परत घेणें. -ION बोलणें फिरवणें *n,* बोलला बोल परत घेणें *n,* उक्तत्याग.

RETREAT *v. i.* (do.) मागें सरणें -हटणें; retire from an enemy शत्रूपुढून पळणें; शत्रूस पाठ दाखविणें; retire एकांत -अज्ञात वासांत जाणें, आश्रय धरणें [from].—*n.* मागें जाणें *n,* माघार *f*; एकांतस्थान *n,* शत्रूपासून पलायन *n,* पळणें *n*; मागें जाण्याची खूण *f* -इशारत *f*; *Mil. & Naval* संध्याकाळचा तंबूर; *Rom. Cath. Ch.* एकांतीच्या भक्तीची वेळ *f.*

RETRENCH *v. F.* कापणें, कमी क., तोडणें, छाटणें; furnish with a retrenchment चर खणणें -बांधणें.—*i.* कमी खर्चावर राहणें. -MENT कमी करणें *n,* तोडणें *n*; काटाकाटी *f,* काटकसर *f*; चर, खंदक.

RETRIBUTION (*-tribuere,* to bestow) प्रतिक्रिया *f,* प्रतिफळ *n,* फळ *n*; reward and punishment, as distributed at the general judgment जगाच्या न्यायकाळीं मिळणारें कर्मफळ *n.*—RETRIBUTIVE *a.* प्रतिफलदायक.

RETRIEVE *v. F.* पुनः मिळवणें; bring back परत -माघारां आणणें; repair सुधारणें, नीट क. [from, by].

RETROGRADE *v.* (*retro,* back, *gradi,* to step) परत जाणें -येणें, परतणें, उलटणें.—*a.* परतणारा, प्रतिगामी; contrary उलटा, विपरीत; *Astron.* वक्रगति, वक्र. —RETROGRESSION परत जाणें *n,* व्यक्तिक्रम; वक्रगति *f.*

RETROSPECT *v.* (*-specere,* to look) मागें परतून पाहणें.—*n.* मागें पाहणें *n,* गतावलोकन *n,* मागचा विचार. -IVE *a.* मागला पाहणारा, गतावलोकी, अनुदर्शी; having reference to what is past मागल्यास लागू पडणारा, गतकालापेक्षक.

RETURN *v. i.* (*-tornare,* to turn) परत -माघारां -फिरून येणें -जाणें; come again, as a visitor परतून भेटायास येणें, परत येणें; appear again after an interval कांहीं वेळानें -राहून -थांबून पुनः दिसणें -येणें, परत येणें: seasons r.; reply उत्तर देणें; retort उलटून दोष लावणें -वर घालणें.—*t.* परत आणणें; परत पाठविणें -क.; repay परत देणें, फेड क. (money); परतजाब देणें; report खबर देणें, कळवणें, जाहीर क.; report officially सरकारांत खबर देणें, सरकारी नात्यानें -अधिकारपरत्वें याद करून -तक्ता भरून पाठविणें; convey into official custody or depository सरकारी कोठींत -तिजोरींत वगैरे भरणें -नेणें.—*n.* परत जाणें *n,* पुनरागमन *n,* पुनरावृत्ति *f*; परतणें *n,* उलटणें *n,* परतणी *f*; उलट *f,* माघार *f,* प्रतिगमन *n*; परत करणें *n,* परतणी *f*; परत देणें *n,* प्रतिदान *n,* फेड *f*; उलटजाब, प्रत्युत्तर *n*; हकीकतनामा, 'रिटर्न' *n*; tabular r. तक्ता, 'रिटर्न' *n*; r. hire परत भाडें *n*; blank r. डौलपत्र *n*; profit on labor प्राप्ति *f,* मिळकत *f,* उपज [from, to]. -ABLE *a.* परत करण्याजोगा -देण्याजोगा; [*Law,* legally required to be returned, given or rendered].

REUNITE *v.* फिरून -पुनः जोडणें [with]. —*i.* पुनः मिळणें.—REUNION पुनर्योग; an assembly of familiar friends मित्रांची मंडळी *f*, बैठक *f*, मेळा, सभा *f*, इ०; पुनः मिळणें *n*, पुनर्मेलन *n*, मिलाफ.

REVEAL *v.* (*-velare*, to vail) उघडा क., पडदा -झांकण काढणें; show दाखविणें; disclose प्रसिद्ध क., फोडणें, सांगणें; communicate that which could not be known or discovered without divine or supernatural instruction ईश्वरी प्रेरणेनें -उपदेशानें प्रगट क. -कळविणें [to, by]. -ATION प्रगट करणें *n*, प्रगटीकरण *n*; प्रगट केलेली गोष्ट *f*; the act of revealing divine truth ईश्वरी ज्ञान *n*, उपदेश *f*, इ० प्रगट क.; that which is revealed by God to man ईश्वरानें प्रगट केलेली गोष्ट *f*, ईश्वरोक्त शास्त्र *n*, ईश्वरीवाचा *f*, शास्त्र *n*; the last book of the sacred canon, containing the prophecies of St. John प्रगटविण्याचें पुस्तक *n*, प्रगटविणें *n*.

REVEL *v. i.* (See REBEL) बहर -मौजा मारणें, धुमाळी -चैन क., धणंगणें.—*n.* चैन *n*, धुमश्चक्री *f*, बहर *f*. -RY घमंडी *f*, दिवाळी *f*, चंगळ *f*, रंग.

REVENGE *v.* (See VINDICATE) inflict punishment in vindication of सूड घेणें -उगवणें; inflict injury for, in a spiteful, wrong, or malignant spirit सूड घेणें, वैर उगवणें, दावा साधणें, वजपा काढणें [upon].—*n.* सूड उगवणें *n*, प्रतिफल *n*, सूड [for]. -FUL *a.* अकसखोर, खुनसी, काळा साप, कृष्णसर्प.

REVENUE (*-vinire*, to come) that which returns from an investment उत्पन्न *n*, वसूल, आदा; reward बक्षीस *n*, फळ *n*: a rich r. of praise; annual produce of taxes, customs, &c., which a nation or state collects and receives into the treasury for public use जमाबंदी *f*, वसूल, महसूल; arrears of r. सनदबाकी *f*; assignment for pay on the r. तनखा वरात or वरात *f*; collection of the r. कमावीस or कमाविसी *f*, कमाविसदारी *f*, तहसील *f*, खोतकी *f*; collection of r. due from the ryots तळाटी -ठी *f*; collectors of r. कमावीसदार, वसूलदार, खोत; extra r. खेरीज जमा *f*; fixed and regular r. ऐन जमा *f*, ऐन जमाबंदी *f*; full r. भरवसूल; general abstract of r. तरजमा *f*; gross r. भरजमा *f*, भरवसूल; maximum of the r. कमाल *n*; of or belonging to the r. महसुली; one employed in collection of r. वसुली or वसुल्या; remission of r. सूट *f*, एहसान *n*; r. and disbursements जमाखर्च; r. from the soil काळीचा वसूल, काळीचा पैका; r. police शिबंदी *f*; r. survey पाहणी *f*; r. surveyor पाहणदार or पाहणीदार; r. survey-report पाहणी खरडा; settlement of the r., assessment of the lands, &c. जमाबंदी *f*; shares out of the r. which belong to the head-officers बाबती *f pl*; sum in commutation of r. in kind तसर *n*; that has an assignment on the r. वरातदार; that yields good r. वसुली; that yields full r. भरवसुली; to collect r. वसूल करणें; settlement of *revenues* by instalments खिस्तबंदी *f*; r. year फसली साल *n*.

REVERBERATE *v.* (*verberare*, to lash) echo प्रतिध्वनि क., पडसाद उठवणें; reflect, as light or heat परावर्तन क.; send back मागें पाठविणें: flame *reverberated* in a furnace. —*i.* प्रतिध्वनि होणें; मागें हटणें -सरणें [with].

REVERE *v.* (*-vereri*, to fear) पूज्यबुद्धीनें मानणें, भीड धरणें, मान राखणें [for].—REVERENCE पूज्यबुद्धि *f*, श्रद्धा *f*, भीड *f*, सत्कार; act of revering नमस्कार, प्रणाम, अभिवंदन *n*; a person entitled to be revered पूज्य-शिष्ट जन -पुरुष; [a title applied to priests or ministers]; to do r. नमस्कार क. [for] *v.*

पूज्यबुद्धीनें मानणें, भीड राखणें [by, for].—Reverend *a.* पूज्य, शिष्ट, मान्य, बुद्धख; [this word often employed as a title of respect given to the clergy; a clergyman is styled r.; a bishop, right r.; an archbishop most r.; in England, a dean is styled very r].—Reverent *a.* भिडेचा, भिडस्त, आदरयुक्त (words); नम्र, आदरशील. -ial *a.* पूज्यबुद्धीचा, पूज्यबुद्धीनें मानणारा, अदब राखणारा, अदबशीर: r. esteem of sacred things. -ly *ad.* आदरबुद्धीनें, आदरानें, भिडेनें, मर्यादेनें.

Revert *v.* (*-vertere,* to turn) परतवणें, उलटवणें [to]—*i. Law,* return to the proprietor मालकाकडे परत येणें.—Reverse *v.* परत फिरवणें, फिरवणें; change totally उलटा क., बदलणें; turn upside down पालथा क., उकराटणें; subvert पाडणें, मोडणें; confound घालमेल क.; *Law,* overthrow by a contrary decision फिरवणें, रद्द क.; [to r. an engine, to cause it to perform its revolutions or action in the opposite direction].—Reversion returning of an estate to the grantor or his heirs पहिल्या देणाराकडे किंवा त्याच्या वारसाकडे परत जाणें *n*; right to future possession उत्तराधिकार. -ary *a.* उत्तरभोग्य, अन्य भोगोत्तरप्राप्य. —Review *v.* मागें पाहणें; go over and examine पाहणें, चौकसी क.; reconsider फिरून पाहणें -विचार क.; make a formal or official examination of the state of -ची पाहणी -चौकशी क.;—a book, &c. गुणदोष काढणें, गुणदोष विवेचन क.—*i.* पाहणी क. —*n.* फिरून पाहणें *n*, उलट पाहणी *f*, पुनर्विचार; पाहणी *f*, चौकशी *f*; गुणदोष विचार -विवेचन *n*; inspection of troops under arms लष्कराची पाहणी *f*, 'रवी' *f*; a periodical pamphlet containing examinations or analysis of new publications गुणदोषविवेचक पुस्तक *n*, 'रिव्यु' *f*.

Revile *v.* (*re & vile*) treat with opprobrious and contemptuous language निंदा क., निंदणें.—Reviler निंदक, कुटाळ, निंदाखोर.

Revise *v.* (*-videre,* to see) फिरून पाहणें, तपासणें: review, alter, and amend तपासून नीट क. -शुद्ध क.—Revisal तपासणी *f*, शोध. —Reviser तपासणारा, शोधणारा, तपासनीस; ग्रंथ तपासणारा, 'रिवैजर.'—Revision तपासणी *f*, शुद्धि *f*, शोध; that which is revised तपासलेली गोष्ट *f*, शोधलेलें पुस्तक *n*, वगैरे.

Revive *v. i.* (*-vivere,* to live) मरून उठणें, जिवंत -सजीव होणें, जिवांत जीव येणें; recover from a state of neglect, oblivion, obscurity, or depression जीव धरणें, सावरणें, फिरून उपस्थित होणें, उजेडीं येणें.—*t.* सजीव क., जिवांत जीव घालणें; जीव आणणें, उचलउठावणी क. [by, with].—Revival संजीवन *n*; पुनर्जीवन *n*; सावरणें *n*, सावर, पुनःसंस्थिति *f*; renewed interest in religion after indifference and decline धर्मसंजीवन *n*.

Revoke *v.* (*-vocare,* to call) रद्द क., फिरवणें.

Revolt *v. i.* (*revolvere,* to roll back) फिरणें, उलटणें; renounce allegiance or subjection फितणें, फितूर होणें, बदलणें, उलटणें; to be grossly shocked धडकणें, धडकी -दचका बसणें [against, from].—*n.* फितवा, फितूर.—Revolution फिरवणें *n*, आवर्त्तन *n*; return पाळी *f*, प्रदक्षिणा *f*; rotation परिभ्रमण *n*; —of a planet गति *f*; a fundamental change in political organization राज्याची उलटापालट *f*, उलथापालथ *f*, राज्यक्रांति *f*, राज्यांतर *n*, गर्दी *f*;—of Nadir Shah नादीरगर्दी *f*;—of Bhavoo भाऊगर्दी *f*.

Revolve *v. i.* (*-volvere,* to roll) फिरणें, परिभ्रमण क.—*t.* फिरवणें, परिभ्रमण करविणें; —in the mind मनांत घोळणें, मथणें [around]. —Revolver फिरणारा; एक प्रकारचें पुष्कळ बारांचें पिस्तुल आहे, 'रिवाल्वर' *n*.

REWARD *v. F.* give in return, whether good or evil परत -उलट देणें;—in a good sense बक्षीस देणें.—*n,* प्रतिदान *n,* उलट देणें *n,* इनाम, *n,* बक्षीस *n,* देणगी *f* [for, of].

RHAPSODY (*Gr. rhaptein,* to sew, *odé* a song) विसंगत -असंबद्ध भाषण *n,* पांटीभर बोलणें गुंजभर अर्थ.

RHETORIC (*Gr. rheo,* I speak) art of composition वाक्यरचनाविद्या *f*; art of elegant and accurate composition in prose अलंकारशास्त्र *n*; art of speaking with propriety, elegance, and force अलंकारिक व रसभरित शब्दांनीं भाषण करण्याची विद्या *f,* सुभाषित *n,* वक्तृत्व *n.*—RHETORICAL *a.* अलंकारिक; अलंकारशास्त्र संबंधी.—RHETORICIAN अलंकारशास्त्रज्ञ.

RHEUMATISM (*Gr. rhein,* to flow) a painful inflammation affecting muscles and joints of the human body वातरोग; chronic r. proceeding from affection of the bowels आमवायु; r. attended with fever वातपित्त; acute r. उग्रवायु; r. of the loins कटिवात, उसण *f,* शिलक भरणें *n*; r. in the joints संधिवात; to be affected with r. फुटणें (हात -पाय).—RHEUMATIC *a.* वातरोगाचा.—RHEUMY *a.* चिपडा, पिचका.

RHINOCEROS (*Gr. rhinos,* the nose, *kepas,* a horn) गेंडा.

RHOMB (*rhombus*) *Geo.* विषमचतुरस्र.

RHUBARB *Ar.* रेवाचिनी *f.*

RHYME*, harmony of language भाषेचा ताल -मेळ; poetry कविता *f,* काव्य *n*; correspondence of sound in poetry यमक *n*; a word answering in sound to another word यमक *n*; neither r. nor reason ताळ नाहीं तंत नाहीं.—*v. i.* यमक मिळणें -होणें; कविता -कवन क.—RHYTHM (*Gr. rhuthmos*) ताल.—RHYTHICAL *a.* तालबद्ध.

RIB*, one of the long bones inclosing the thoracic cavity फांसळी *f,* बरगडी *f*;—of leaf दांडा, हीर;—of an umbrella शलाका *f.* -WORT इसपगोल.

RIBALD *a. F.* तोंडाचा फटकळ, तोंडशिनळ. —RIBALDRY अभद्र -शिवरें -पचकळ बोलणें *n* -भाषण *n.*

RIBAND, RIBBON (*rubens,* red) फीत *f,* 'रिबन' *f*; shred चिंधी *f.*

RICE *F.* the grain in the husk भात *n,* साळ *f*;—as husked तांदूळ;—as boiled भात; r. with milk खीर *f.*

RICH* *a.* wealthy मातबर, श्रीमंत, धनवान्; abounding आढ्य, संपन्न, मय, प्रचुर, all in comp.: विद्यासंपन्न, गुणसंपन्न, &c.; fruitful पिकाऊ, मातबर (soil);—as a dish रसरसीत, मसालेदार, पक्वान्नाचा; bright घवघवीत, भडक (color); full of sweet and harmonious sounds मधुर, सुस्वर; abounding in beauty शोभिवंत, छान, देखणा (landscape); abounding in humor विनोदाचा, ख्याली (incident); r. from birth गर्भश्रीमंत; to get r. उखळ पांढरें होणें [in]. -ES संपत्ति, दौलत *f,* धन *n,* ऐश्वर्य *n*; lust of r. धनलोभ; puffed up by r. मालमस्त; r. of unrighteousness पापधन *n.* -LY *ad.* बहुत धनानें, बहुत पैसा देऊन; पुरतेपणीं, पुष्कळ; थाटानें, शोभा येईसा; truly खरोखर; fully पुरा, खूब. -NESS श्रीमंती *f,* सधनता *f*; रसरसीतपणा, मिष्टता *f*; मातबरी *f*; विपुलता *f,* भरपुरी *f*; भडक *f,* घवघवीतपणा; शोभा *f,* तेज *n.*

RICK* गंज, ठिकी *f*;—of unthreshed corn सुडी *f,* उडवी *f.*

RICKETS* *pl.* कुटिलवात.—RICKETY *a.* कुटिलवाताचा; feeble in the joints लटपटीत, डळमळीत, खिळखिळा; to be r. लटलटणें, डकडकणें, लडबड हलणें.

RID* *v.* सोडवणें, मोकळा क.; to get r. of टाळणें, वाट देणें, मोकळा होणें [of]. -DANCE सोडवणूक *f*, सोडवण *f*; वेंचणी *f* (Lev. xxiii. 22); सुटका *f*, मुक्ति *f*.

RIDDLE* मोठी चाळण *f*, घोळणा.—*v.* चाळणें, घोळणें; make many holes in चाळण क.: a house *riddled* with shot.

RIDDLE*, enigma उखाणा, आहणा, कूट *n*; anything puzzling कूट *n*; to find out a r. उखाणा जिंकणें.

RIDE* *v. i.* be carried on the back of any animal (घोडा, गाढव इ०) बसणें, स्वार होणें, -बसून जाणें; be borne in a carriage गाडींत बसून जाणें; be borne in or on fluid तरंगणें, पोहणें, तरणें; manage a horse well घोड्यावर मांडी -आसन साधणें; sit बसणें [from, to].—*t.* -वर बसणें; manage insolently at will मगरुरीनें मनास वाटेल तसें चालवणें, दामटणें, दपटणें.—*n.* घोड्यावरची रपेट *f* -सहल *f*; a road for riding घोडेवाट *f*. — RIDER घोड्यावर बसणारा, स्वारी *f*, स्वार; one who breaks a horse चाबुकस्वार; an addition to a manuscript or other document, inserted after its completion, on a separate piece of paper पुरवणी *f*.

RIDGE*, back पाठ *f*;—of a hill कणा, दांडा, रांग *f*;—of a roof पाटेस; as raised on a plantation to stop water कांडोळें *n*, दंड; r. pole आढें *n*.—*v.* दांड घालणें; wrinkle सुरकुती पाडणें. -TILE ढापा.

RIDICULE *v.* (*-ridere*, to laugh) हासणें, थट्टा -उपहास क. [for, by].—*n.* हसें *n*, थट्टा *f*, टेर *f*.—RIDICULOUS *a.* हसायाजोगा, उपहासास्पद.

RIFE *a.* चालू, चलतीचा, प्रवृत्त [with].

RIFLE *v. F.* carry off हिरावून नेणें, हरण क., हिरावणें; plunder लुटणें.—*n.* एक प्रकारची बंदूक *f*, 'रैफल' बंदूक *f*.

RIG* *v.* सजवणें, संज्ज क. -GING—of a ship दोरखंडें *n pl.*

RIGHT* *a.* straight उजू, नीट, सरळ (way); upright उभा, सरळ, खरा (a beam); conformed to the constitution of man and the will of God खरा, नेक, सत्य, यथार्थ; fit उचित, योग्य, लायक; unquestionable खचीत, निःसंशय: they manifested themselves to be r. barbarians; not wrong खरा, वास्तविक: you are r. तुम्ही बोलतां -करितां इ० तें खरें आहे; most favorable अनकूळ, उजू, सोयीचा (side); not left उजवा (hand); being on the same side as the right hand उजवीकडला, उजव्या हातचा, दक्षिण; well regulated सुव्यवस्थित, बंदोबस्ताचा; [being on the right hand of a person whose face is toward the mouth of a river]; designed to be placed or worn outward सुफराटा, सुलटा, उजू: the r. side of a piece of cloth; winding to the r. दक्षिणावर्त्ती; r. ascension विषुवांश; r. line सरलरेखा *f*; r. angle काटकोन; r. and left सव्यापसव्य.—*ad.* नीट, ठीक, बरोबर, यथामार्ग; खरा, यथार्थ; नीट, समोर, धडक, धोपट (Prov. iv. 25); in a great degree फारच, अति (sorry); [very;—prefixed to titles: r. honorable; r. reverend].—*n.* that which is right or correct न्याय, नीति *f*, उजूपणा; freedom from falsehood खराई *f*, खरेपणा; adherence to truth सत्यनिष्ठा *f*; a just judgment न्याय, इनसाफ, दाद *f*; integrity प्रमाणिकपणा; that to which one has a claim हक, हकमाल; legal power अधिकार, सत्ता *f*; a sheriff has a r. to arrest a criminal; claim दावा, हक; all *rights* कुलबाब *f*; immunity माफी *f*, सूट *f*; उजवी बाजू *f*, उजवें अंग *n*; सुफराटी बाजू *f*; one's own r. स्वाधिकार; might makes r. फांसा पडेल तो डाव राजा करील तो न्याय; to set to r. नीट क., सुधारणें; बंदोबस्तानें चालवणें.

—*v. t.* निटावणें, सुफराटणें, न्याय क., दाद देणें. —*i.* निटावणें, सुफराटणें. -FUL *a.* हक्कदार (heir); सत्तेचा, हक्काचा (property); रास्त, यथान्याय, वाजवी, in comp. धर्म (war). -HAND उजवा हात. -LY *ad.* नीट, उजू, बरोबर, न्यायानें; यथायुक्त, यथामार्ग; दुरुस्त, खरा. -NESS उजूपणा, सरळपणा: r. of a line; यथान्यायता *f*, लायकी *f*, न्याय.—RIGHTEOUS *a.* न्यायी, नीतिमान; holy पवित्र, पुण्यशील. -NESS न्यायीपण *n*, नेकी *f*, रास्तपणा; *Theol.* the work of Christ, which is the ground of justification ख्रीस्ताचें पुण्य *n*.

RIGID *a.* (*rigidus*, to be stiff) ताठ, ताठर; severe करडा, खरमरीत, जालीम;—account, &c. काडीकाडीचा, तिळानतिळाचा. -ITY ताठपणा, ताठरपणा; करडेपणा, जालीमपणा.—RIGOUR ताठपणा; करडेपणा, कठोरपणा;—as of heat or cold कडाखा, कडका; *Med.* as in the cold fit of fever कांटा, कांटे; sternness कठोर -कडकडीतपणा; stiffness of opinion कडकडीत मत *n*;—of temper करडी प्रकृति *f*. -OUS *a.* करडा, उग्र; कठोर, निष्ठुर; कडक, कडख्याचा (cold); minute काडीनकाडीचा, कवडी कवडीचा (account).

RILL (*rivulus*, a small brook) ओहळ, उपळी *f*.

RIM* कांठ, किनारा.

RIND* साल *f*, त्वचा *f*, सालपट *n*.

RING*, a circle कडें *n*, चक्र *n*, वेढा; as an ornament for the wrist तोडा; finger r. अंगठी *f*, मुद्रिका *f*, वळें *n*;—of metal कडी *f*, कडें *n*, वाळा; a circular group of persons घेरा, वेढा, कचोळें *n*;—of grass, cloth, &c. चुंबळ *f*, आहरा;—at top playing रंगण *n*; as of a bullock turning a mill भोंवार *f*; r. binding mallets, rammers, &c. मांडळ *f*, वसूं *n*;—of wire for the nose or ear वाळी *f*;—for the toe जोडवें *n*;—for the hand of a female पाटली *f*, चुडा;—of a male कडें *n*;—of a drum, sieve, nose-ring, &c. गाडा.—*v.* घेरा -वेढा घालणें; अंगठी -वाळी इ० घालणें;—a horse चक्रावर -मंडळावर धरणें. -BOLT, an iron bolt, with an eye at its head, and a ring through the eye हलकी *f*. -LEADER मोहरपी, पुढाईत. -LET झुलूप *n*. -WORM गजकर्ण *n*, दाद *f*, दद्रु.

RING* *v.* cause to sound, as a metalic body वाजवणें, घणघणावणें; produce by ringing, as a sound वाजवून नाद उत्पन्न क., नाद क.; repeat often, loudly or earnestly खणकावणें, शिरा ताणून -ठोठावून बोलणें; [to r. in or out, to usher, attend on, or celebrate, by the ringing of bells; to r. out the old year and r. in the new].—*i.* वाजणें, झणझणणें;—the ear झणझणणें, भणभणणें; be filled with a report or talk घुमणें, दणदणणें.—*n.* झणकार, झणत्कार.

RINSE* *v.* wash lightly विसळणें, धुणें;—as clothes खंगाळणें, खळबळणें; cleanse by the introduction of water, as hollow vessels खंगाळणें, विसळणें;—as the mouth गुळणा क. [out].

RIOT *F.* wanton or unrestrained behavior दंगा, हंगामा, गर्दी *f*; wild festivity धुमाळी *f*, धुमश्चक्री *f*; to run r. बावचळणें, वायकळणें, माजणें.—*v. i.* गर्दी -दंगा क. -उठवणें -माजवणें; धुमाळी -धुमश्चक्री क. [in]. -OUS *a.* धुमाळीचा, धुमश्चक्रीचा (Luke xv. 13); गर्दीचा, दंग्याचा, पुंडाईचा (assembly, proceeding).

RIP* *v.* tear or cut open चिरणें, फाडणें, विदारणें; open up उसवणें, उस्तरणें; discover उघाडीस आणणें, विचका क.;—faults उखाळ्या पाखाळ्या काढणें [off].

RIPE* *a.* ready for reaping पिकलेला, पक्व; advanced to the state of fitness परिपक्व,

तयार, झालेला (cheese); to be r. as a fruit पिकणें, होणें; matured पिकलेला, पक्व (tumor); perfected सिद्ध, परिपूर्ण, निपुण, निष्णात (scholar);—in years पोक्त, प्रौढ, वृद्ध; —prepared तयार, सिद्ध: things are r. for war; resembling ripened fruit in ruddiness and plumpness लाल व भरदार, तांबूस व गुबगुबीत (lips).—Ripen *v.* पिकवणें; पूर्णतेस आणणें, परिपक्व क.—*i.* पिकणें; पूर्णतेस येणें; as mangoes, tamarind, &c. गुळमटणें, पाडास येणें -लागणें;— a field of corn, &c. काळसरणें. -ness पक्वेपणा, पक्वता *f*, पक्वदशा *f*; प्रौढी *f*, पोक्तपणा;—of a crop पीक *n*.

Ripple *v. i. Ger.* खळखळणें, खळखळ वाहणें. —*n.* खळखळ *f*, खळाळी *f*.—Ripplingly *ad.* खळखूळ, खळखळ, खळकण.

Rise* *v. i.* ascend वर जाणें, वर चढणें; ascend or float in a fluid तरंगणें; grow upward वर -उंच वाढणें, वाढणें: a tree *rises* a hundred feet; become erect उठणें, उभा राहणें: to r. from a chair, or from a fall; leave one's bed उठणें, निजून उठणें; tower up उंच चढणें -दिसणें: the Alps r. far above the sea; slope upward चढणें, चढण लागणें: a path *rises* in this direction;— a heavenly body उगवणें, उदय पावणें -होणें;—a river, &c. चढणें, फुगणें, पाणी चढणें; increase in value or price, &c. दर -भाव -मोल चढणें -वाढणें; swell सुजणें, फुगणें (a boil); increase in intensity वाढणें, चढणें, बळावणें, जोर होणें (heat, the voice, debt); be promoted चढणें, वाढणें, मोठा होणें; come to mind आठवण -स्मरण -स्फूर्ति होणें, सुचणें: a thought *rose* in me; come to hands हातीं लागणें -येणें: there chanced to r. to my hand a book; revive मरून उठणें, सजीव होणें (Cor. i. 20); close a session सभा उठणें -बरखास -विसर्जन होणें; issue निघणें, उगम होणें, उद्भवणें (a river); break into rebellion उठणें, फिरणें, बंड क.—*n.* उभें राहणें *n*, उत्थान *n*; वर चढणें *n*, आरोहण *n*, ऊर्ध्वगमन *n*; चढती *f*, वृद्धि *f*, उदय; उगवणें *n*, उदय; मूल *n*, उगम, आरंभ; चढण *f*, चढाव; चढ, तेजी *f*.—Rising चढणारा, चढता, चढते कळेचा; वाढणारा, वर्द्धमान: चढत्या वयाचा; उगवणारा, उदयमान.—*n.* उठणें *n*, उत्थान *n*; पुळी *f*, फोड;—of measles, small-pox, &c. उगवण *n*.

Risible *a.* (*ridere*, to laugh) हसणारा, हसनसमर्थ; हास्यजनक, हसूं येण्याजोगा.

Risk *F.* जोखीम *n*, भय *n*, धोका; to run a r. तवकल क.; at all *risks* जरूर.—*v.* जोखमांत -धोक्यांत घालणें -पाडणें.

Rite (*ritus*) act of performing divine or solemn service, as established by law, precept, or custom अनुष्ठान *n*, व्रत *n*, विधि, संस्कार.—Ritual *a.* विधीचा, क्रिया संबंधी; संस्काराचा.—*n.* संस्कारपद्धति *f* -शास्त्र *n*.— Ritualist क्रियावान, अनुष्ठानी, कर्मठ.

Rival *v.* (*rivalis*, belonging to a brook) बराबरी -स्पर्धा क., झुंजणें, लढणें.—*n.* & *a.* स्पर्द्धा करणारा, प्रतिस्पर्द्धी. -ry स्पर्द्धा *f*, चढाचढी *f*, हेवा.

Rive* *v.* चिरणें, फाडणें, छेदणें.—*i.* चिरणें, फाटणें, तडकणें.

River (*ripa*, a bank) नदी *f*; copious flow ओघ, पूर, नदी *f*: *rivers* of blood; bank of a r. नदीतीर *n*; the mouth of a r. नदीमुख *n*; bed of a r. पात्र *n*; watered by *rivers* नदीमातृक; a sacred r. गंगा *f*; r. of heaven सुरनदी *f*;—of hell वैतरणी *f*.— Rivulet ओहळ, नाला, ओढा.

Rivet *v. F.* fasten with a rivet खिळा ठोकून -मारून बोळवणें, खिळ्यानें खिळणें -जोडणें; fasten firmly पक्की क., न हालेसा क.; clinch बोळवणें, वळवणें.—*n.* दोहों शेवटांनीं बोळवलेला खिळा, चुरसा.

Road* रस्ता, वाट *f*, मार्ग; —for ships नांगरवाडा; to be on the r. वाटचालणें; to take to the r. वाटमारणें, रस्त्यावर लुटणें; public r. हमरस्ता, राजमार्ग. -stead नांगरवाडा.

Roam *v. i. F.* रमणें, फिरणें, भटकणें, भ्रमणें [about].—*n.* भ्रमण *n*, हिंडणें *n*, विहार, परिचार.

Roan *a. F.* having a bay color चिताडा (horse).

Roar* *v. i.* cry with a full, loud, continued sound ओरडणें, आरोळी मारणें; as a beast डरकाळी फोडणें, गरजणें; as in pain ओरडणें, केंकणें, आक्रंदणें; cry in anger डरकावणें, डरकाळी फोडणें, गुरकावणें; make a loud confused sound, as wind, waves, cannon, passing vehicles, &c. दणाणणें, गरजणें, गडाडणें, धडधडणें; laugh out loudly and continuously मोठ्यानें खदखदां हासणें; make a loud noise on breathing, as horses having a certain disease घोरणें [out].—*n.* डरकणें *n*, डरकणी *f*, डरकाळी *f*; ओरडणें *n*, आरोळी *f*; गडगडाट, गर्जना *f*, दणका. -ing *a.* डरकणारा, डरक्याफोडणारा; गरजणारा, दणदणीत; ओरडणारा, आरोळी मारणारा.

Roast *v. F.* prepare, as meat, by exposure to heat भाजणें; parch भाजणें, होरपळणें (coffee); banter severely हुररेवडी उडवणें. —*n.* भाजण *n*, भाजप *n*.—*a.* भृष्ट.

Rob *v. Ger.* plunder लुटणें; take away by force हिरावणें, छिनावून घेणें; steal from चोरणें. -ber लुटारू. -bery, *Law*, the felonious taking of money or goods from the person of another, or in his presence, against his will, by force, or by putting him in fear लुटणें *n*; जबरीची चोरी *f*, चोरी *f*, लूट *f*; gang r. दरोडा; highway r. वाटमारा.

Robe *F.* जामा, झगा; r. of honor presented by a king, &c. खिलात *f*; r. and turban bestowed in honor शेलापागोटें *n*, शिरपाव.—*v.* पोशाक घालणें, वस्त्रें नेसवणें.

Robin *Ger.* एक गाणारा पक्षी आहे.

Robust *a.* (*robustus*) hard धट्टाकट्टा, जोरदार, बळकट; rough दांडगा; requiring vigor मेहनतीचा, बळाचा, दांडगा, घसमर (employment).

Rock *F.* a large mass of stony material खडक, धोंडा, दगड; refuge आश्रय: (2 Sam. xxii. 2); r. in the sea खराबा, कांटा; sheet of r. कातळ, खडक; ledge of r. दांडा, खडक; flat r. in the sea कांसा; a projecting r. बिंडा; to cause the r. to flow दगडास पाझर आणणें; r. salt शेंदेलोण *n*; r. oil मातीचें तेल *n*.—Rocky *a.* खडकाचा, खडकळ; खडका सारखा, कठीण, निर्दय, in comp. पाषाण.

Rock* *v.* move backward and forward as a body resting on a support beneath डोलवणें, झोका -झोके देणें; put to sleep by rocking पाळणा हालवून निजविणें [to and fro]. -ing *a.* डुलडुल हलणारा, डळमळीत; r. stone उलटा दगड.—*i.* डुलणें, डगमगणें. -et बाण, तारा.

Rod* (*Skr. ridh*, to grow) a long twig काठी *f*, दांडा; instrument of punishment काठी *f*, छडी *f*, दंड; sceptre छडी *f*, वेत्र; instrument for measuring काठी *f*; race कूळ *n*, जात *f*; a measure of length containing 16½ feet काठी *f*.

Rodomontade *F.* अरेरावकी *f*, तीनतेरा गोष्टी *f pl.*

Roe *Ger.* माशाचीं अंडीं *n pl.*

Roe* हरणी *f*; buck हरण *n*, *m*.

Rogue *F.* a knave सोदा, लुच्चा, ठक; vagabond भटक्या, उंडाणटप्पू; way गुलाम, गुंड. -ry लबाडी *f*, सोदेगिरी *f*, लुच्चेगिरी *f*, गुलामगिरी *f*.

Roll *v.* (*rotulus*, a little wheel) लोटणें, लोटून नेणें; make to revolve फिरवणें; wrap round on itself गुंडाळणें, लपेटणें;—cakes, &c. लाटणें, बळणें; along, over, in लोळवणें;

SHY* *a.* coy लाजाळू, बुजट, भित्रा; cautious सावध, हुशार; reserved संकोची, आंतल्या गांठीचा.—*v. i.* बुजणें, चमकणें [at].—*n.* घोड्याचें बिचकणें *n*.

SIBILANT *a.* (*sibilare*, to hiss) ज्यांत सकार फार येतो तो, सकारी, ऊष्म (letter).

SICK* *a.* inclined to vomit ओकायाजोगा, ओकायास आलेला: I feel s. माझे पोटांत or मला कळमळतें disgusted कंटाळा -वीट -त्रास

आलेला : s. of flattery; indisposed दुखणाईत, रोगी, आजारी; to be s. of -ची ओकारी -चा कंटाळा येणें. -EN *v.* आजारी क., दुखण्या पडणें; कंटाळा आणणें [of, with, by].—*i.* कंटाळा येणें, मन विटणें; ओकारी -कळमळ येणें; become languish ग्लानि येणें. -LY *a.* दुखणेकरी, आजारी, रोगी; रोगाचा, रोगी (climate); म्लान, ग्लान, कलाहीन: the moon grows s. at the sight of the day. -NESS रोग, दुखणें *n*, आजार; रोगदशा *f*, रोगीपणा, दुखणें *n*; वमनेच्छा *f*, ओकायास येणें *n*, ओकारी *f*.

SICKLE* विळा, कोयती *f*.

SIDE*, margin of a surface बाजू *f*, किनारा, कांठ, कड *f*; any part or position viewed as opposite to or contrasted with another बाजू *f*, अंग *n*, हात: this s.; one-half of the body बाजू *f*, कूस *f*, अर्धांग *n*, अंग *n*; declivity, as of a hill उतरण *f*, डोंगराची कड *f*; party पक्ष, बाजू *f*, तड *f*; favor नजर *f*, मर्जी *f*, कैवार; by the s. of जवळ; a line of descent traced through one parent पक्ष; to choose *sides* पक्ष निवडणें; to take *sides* पक्ष -कैवार घेणें; from all *sides* चहूंकडून; from s. to s. आरपार; fair s. दर्शनी अंग *n*; opposite s. प्रतिपक्ष; one who takes a s. पक्षपाती; one's own s. स्वपक्ष; being on the right s. सुफराटा; —on the wrong s. उफराटा; s. of a roof पाख.—*a.* बाजूचा, कडचा; indirect आडकुसीचा, आडबाजूचा.—*v. i.* पक्ष धरणें, कैवार घेणें. -LING *ad.* बाजूनें, बाजूकडून. -SADDLE बायका बसावयाचा घोड्याचा जीन. -VIEW कटाक्ष, अपांगदृष्टि *f*. -WAYS, -WISE *ad.* बाजूकडे, बाजूनें, एका बाजूनें.

SIDERAL *a.* (*sidus*, a star) तारांचा, नक्षत्रविषयक; measured by the apparent motions of the stars नक्षत्रमानाचा (day).

SIEGE (*sedes*, a seat) फौजेचा गराडा -वेढा; to raise a s. वेढा उठवणें.

SIEVE* चाळण *f*, चाळणी *f*;—for washing vegetables, rice, &c. रोवळा.—SIFT *v.* गाळणें, चाळणें, छानणें; grain, &c., in a fan घोळणें, पाखडणें, वेंचणें; examine चाळणें, कसणें, घोळणें.

SIGH* उसासा, सुसकारा.—*v. i.* उसासा देणें -टाकणें; lament दुःख क.—*t.* -च्या विषयीं दुःख क.; उसासा देऊन (दुःख वगैरे) दर्शविणें.

SIGHT* पाहणें *n*, दर्शन *n*; the power of seeing पाहण्याची शक्ति *f*, दृष्टि *f*; open view दर्शन *n*; examination परीक्षा *f*, निरीक्षा *f*, अवलोकन *n*, चौकसी *f*; to take s. नेमधरणें; after s. सकृद्दर्शनीं; at s. पत्रदर्शनीं; error of s. नजरभूल *f*; in the s. of देखतच्या दिसण्यांत; to be in s. दिसणें, दृष्टीस पडणें; to give a s. of देखावा दाखविणें; s. of a gun माशी *f*.—*v.* पाहणें; निरेखणें. -ED *a.* दृष्टीचा: long s. -LESS *a.* अंधळा, नेत्रहीन. -LY *a.* देखणा, दर्शनी, सुदर्शन.

SIGN* (*signum*) token खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; miracle चमत्कार; memorial खूण *f*, यादगारी *f*; signal संकेत, इशारा, खूण *f*; —of the zodiac राशि *f*; s. manual हस्ताक्षर *n*, सही *f*; [*Eng. Law*, the royal signature superscribed at the top of bills of grants and letters-patent].—*v.* सही क. -घालणें; खूण क. [with].—SIGNAL इशारा, इशारत *f*.—*a.* विशेष, नामी, मोठा. -IZE *v.* गाजवणें, मिरवणें; communicate with by means of a signal खुणेनें कळविणें;—one's self कीर्त्ति -नांव मिळवणें -संपादणें.—SIGNATURE सही *f*, स्वदस्तुर. —SIGNET मुद्रा *f*, मुद्रिका *f*.—SIGNIFY *v.* make known by sign खुणेनें कळविणें -सांगणें, खूण क.; indicate सुचवणें, कळविणें; mean अर्थ -आशय दाखविणें [to, by]. भारदस्ती -मुजाखा असणें.—SIGNIFICANCE अर्थ, अभिप्राय; भारदस्ती *f*, मुजाखा.—SIGNIFICANT *a.* अर्थाचा, अर्थयुक्त, अर्थसूचक;

expressive सांकेतिक, दर्शक, सूचक.—SIGNIFICATION अर्थ, अभिप्राय.

SILENT *a.* (*silere,* to be silent) perfectly quiet निःशब्द, निवांत; indisposed to talk मुका, मोना, उगा; calm शांत, स्तब्ध. -LY *ad.* उगा, गुपचूप; सामसूम, स्तब्ध.—SILENCE *v.* तोंड बंद क., उगा क.

SILK* रेशीम *n*; रेशमाचें कापड *n*; raw s. कच्चें रेशीम *n.*—*a.* रेशमाचा, रेशमी. -COTTON-TREE शेंवरीचें झाड *n*, सांवर. -EN *a.* रेशमाचा, रेशमी; soft मऊ, नरम; dressed in silk रेशमाचा पोशाक ल्यालेला. -WEAVER रेशमाचें कापड विणणारा, खत्री. -WORM रेशमाचा किडा, कोळीसरा.—SILKY *a.* रेशमाचा; मऊ, नरम; pliant अस्थिरबुद्धि, नरम, चलमति.

SILL*—of a door or window दरवाजाच्या किंवा खिडकीच्या चौकटीची खालची बाजू *f*, शिला *f*.

SILLY* *a.* मूर्ख, वेडगळ, भोळा; वेडेपणाचा, वेडेचाराचा (action).

SILVER* रुपें *n*; silver money रुप्याचें नाणें *n*, नाणें *n*; German s. खोटें रुपें *n*; native s. खाणींतलें रुपें *n.*—*a.* रुप्याचा, चांदीचा; precious मोलवान, चांदीचा; white रुप्याचा, शुभ्र, रौप्यवर्ण; bright चकचकीत, लकलकीत; sweet गोड (slumber); soft and clear मृदु आणि स्पष्ट, मंजूळ आणि मधुर (voice). —*v.* रुप्यानें मढीवणें, रुप्याचें पाणी देणें, रुपेरी मुलामा चढवणें; रुप्या सारखा चकचक क.; पांढरा -शुभ्र क.: his head was *silvered* over with age. -SMITH रौप्यकार, चांदीचें काम करणारा, सोनार.

SIMILAR *a.* (*similis,* like) सारखा, बराबर, सम [to]. -ITY सारखेपणा, साम्य *n*, सादृश्य *n*. -LY *ad.* त्याप्रमाणें, सारखा, तसाच. —SIMILE दाखला, दृष्टांत, उपमा *f*.—SIMILITUDE सारखेपणा, सादृश्य *n*; likeness आकार, रूप *n*, प्रतिमा *f*; comparison उपमा *f*, तुलना *f*.

SIMIOUS *a.* (*simia,* ape) माकडाचा, माकडा सारखा, मर्कटप्राय.

SIMMER *v. i. Eng.* boil gently, or with a gentle hissing चरचरणें, सणसणणें, चटचटणें.—*t.* मंदागीवर शिजवणें -उकडणें.

SIMONY (from *Simon* Magus, see Acts viii.) the crime of buying or selling ecclesiastical preferment धर्माध्यापकाची वृत्ति विकत घेण्याचा किंवा देण्याचा अपराध.

SIMPER *v. i. Ger.* वेड्या प्रमाणें किंवा दिमाखानें गालीं हसणें.

SIMPLE *a.* (*simplex*) single शुद्ध, निर्भेळ (sound); plain साधा (dress); sincere भावार्थी, निष्कपट, भोळा; clear स्पष्ट, उघड (statement); unaffected साधेपणाचा, साधा, उजू, सुरळीत (manners); foolish भोळा, साबडा, भोळसर; *Chem.*, elementary तत्वाचा, तत्वरूप -मय, एकाकी (substance); *Bot.*, entire अखंड, सबंध (stem); [s. contract; *Law,* any contract, whether verbal or written, which is not of record or under seal].—*n.* शुद्ध -निर्भेळ पदार्थ; a medicinal plant औषधि *f*, औषधि वनस्पति *f*. -MINDED *a.* मनाचा भोळा, भावार्थी. -NESS साधेपणा, शुद्धता *f*, निर्भेळपणा इ०. -TON वेडा, भोळाशंकर -नाथ.—SIMPLICITY शुद्ध -निर्भेळपणा; भावार्थ, खरेपणा; सरळ -बाळबोधपणा.—SIMPLIFY *v.* साधा क.; स्पष्ट क., अर्थ सांगणें, उमजविणें, सोपा करून सांगणें, सोपा क. —SIMPLY *ad.* निखालस, नुस्ता; फक्त, केवळ, शुद्ध.

SIMULTANEOUS *a.* (*simul,* at the same time) एकवेळचा, एककाळचा, एककालिक. -LY *ad.* एकाच वेळीं, एकसमयावच्छेदेंकरून, एकदम.

SIN*, transgression of the law of God पाप *n*, पातक *n*, अन्याय *n*: sin offering पापार्पण *n.*—*v.* depart voluntarily from the path of duty prescribed by God to man

पाप क.; trespass उल्लंघन -अपराध क. [against]. -NER पापी, दुष्ट. -FUL *a.* पापी, पातकी; पापाचा, दुष्कर्माचा (action). -LESS *a.* निष्पाप, निष्कलंक, निर्दोष.

SINCE* *prep.* & *ap.* from the time of पासून, नंतर; ago मागें, झाला, गेला; *conj.* जेव्हां; ज्या अर्थी.

SINCERE *a.* (*sine,* without, *cera,* wax, as if app. orig. to pure honey) pure शुद्ध, निर्भेळ; real खरा, वास्तविक, निष्कपट. -LY *ad.* मनोभावानें, जिवाभावानें.—SINCERITY खरेपणा, निष्कपटपणा; भावार्थ, शुद्ध भाव.

SINCIPUT (*L.*) टवळी *f,* टाळू *f.*

SINE (*sinus,* a curve) *Geom.* ज्या *f.*

SINECURE *a.* (*sine,* without, *cura,* care) बैठा रोजगार -चाकरी *f*; the stipend of a s. बैठा पगार.

SINEW*, tendon स्नायु; strength बळ *n.*—SINEWY *a.* स्नायूचा, स्नायुमय; बळकट, जोरदार.

SING* *v. i.* utter sounds with musical inflections गाणें, गायन क., चालीवर -स्वरावर म्हणणें; utter sweet sounds, as birds गाणें, मधुर स्वर काढणें; make a small, shrill sound झणझणणें, सणसणणें; celebrate something in poetry गाणें, वाखाणणें, पोवाडा गाणें, कवन करून वर्णणें;—a bee, top,&c. गुंगणें, गोंगावणें; —bad singing गद्धे -कुत्ते मल्हार; to s. badly तारे तोडणें.—*t.* गाणें, गाऊन वाखाणणें. -ER गाणारा, गवई.

SINGE* *v.* burn slightly वरवर भाजणें, होरपळणें, पोळणें.

SINGLE *a.* (*singulus*) one only एक, एकला, एकटा; individual विशेष, भिन्न, निराळा; alone एकला, एक; unmarried अविवाहित, सडा, सडी *f*; not twisted with others एकेरी, एकपदरी (thread); performed by one person एकानें केलेला, एकाचा (combat); pure शुद्ध, निर्भेळ; sincere खरा, भावार्थी, अनन्य (heart).—*v.* निवडणें, निवडून घेणें [out, out from]. -HANDED *a.* एकटा, एकाकी. -HEARTED *a.* एकनिष्ठ, एकचित्त, अनन्यवृत्ति. -NESS एकेरीपणा; एकले -टेपणा.—SINGLY *ad.* एकेरी; एकटा; एकएक.—SINGULAR *a.* एकटा; existing by itself अनुपम, अपूर्व, एक, अद्वितीय; uncommon असाधारण, विशेष; *Gram.*;—a number एकवचन *n*; eminent प्रसिद्ध, प्रख्यात, नामांकित, एक; language (address, or mention) in the s. number एकेरा शब्द; odd तऱ्हेवाईक, विलक्षण (zeal). -ITY एकटेपणा; असाधारणता *f,* अनुपमता *f,* अद्वितीयता *f*; विलक्षणपणा, एकाडपणा, तऱ्हेवाईकपणा.

SINISTER *a.* (*L.*) left डावा; inauspicious अशुभ, अभद्र; dishonest कपटाचा, कुटिल (aims).

SINK* *v. i.* fall gradually उतरणें, गळणें, घसरणें;—in water बुडणें;—into mud, &c. रुतणें, रुपणें; decrease in volume ओसरणें उतरणें (a river); fall in बसणें, खचणें, to be impressed ठसणें, बिंबणें, भरणें; —spirits खचणें, गळणें;—money बुडणें, थकणें, डुलणें.—*t.* नाश क., बुडविणें; make by digging खणणें (a well); conceal लपविणें (money); keep out of sight दृष्टिआड ठेवणें, चोरणें (truth); lower in value उतरणें (price of goods); reduce in amount कमी क., फेडणें, उतरणें (debt). —*n.* नाला, मोरी *f.*

SINUS (*L.*) a bay खाडी *f*; *Surg.* नाडीव्रण; नाडी *f.*

SIP* *v.* drink in small quantities चाखत चाखत पिणें; to s. water religiously आचमन घेणें; extract काढणें, काढून घेणें: a bee *sips* nectar from the flowers; drink out of -आंतून पिणें.—*i.* चाखत पिणें, घोट -भुरका घेणें.—*n.* घोट, भुरका.

SIR *F.* महाराज, साहेब, खुदावंत; [a knight or baronet].—SIRE महाराज; father बाप.

SIREN (*L.*) मोहक स्त्री *f*, मोहिनी *f*.

SIRIUS (*L.*) लुब्धक तारा.

SIRRAH *Ir.* माणसाच्या लेका -कांद्या, अरे, बेट्या.

SIRUP *Ar.* शिरा, पाक.

SISTER* (*Skr. swasri*) बहीण *f*; one of the same kind or of the same condition बहीण *f*, जोडी *f*: s. fruits. -HOOD बहीणपण *n*, भगिनीत्व *n*; community of women or sisters स्त्रीमंडळी *f*, स्त्रीसमाज. -IN-LAW, wife's sister मेहुणी *f*; husband's sister नणंद *f*: brother's wife भावजय *f*. -LY *a.* बहिणीचा -सारखा (kindness).

SIT* *v. i.* (*Skr. sad*) rest upon the hunches बसणें; perch पक्ष्या प्रमाणें बसणें, बसणें; rest बसणें; lie बसणें: a burden *sits* heavily upon him; fit बसणें, जमणें: a coat *sits* well; incubate बसणें, पाखर घालणें: the partridge *sitteth* on eggs, and hatcheth them not; hold a session बैठक -सभा बसणें -होणें; to s. at meat जेवायास -पानावर -मेजावर बसणें; down बसणें, खालीं बसणें; वेढा घालायास आरंभ क.: the enemy *sat* down before a town; बसणें, थिरावणें; उगा राहणें, तृप्त -संतुष्ट होणें, समाधान पावणें; to s. for a portrait आपली तसबीर काढून घेण्याकरितां चितारयाच्या पुढें बसणें; up उठणें, उठून उभा राहणें (Luke vii. 15); बसणें, बसून राहणें: to s. up late at night [on].—*t.* keep the seat upon बैठक संभाळणें, चिकाटी देऊन बसणें. -TING *n.* बैठक *f*, बसणें *n*, बसणी *f*; a seat बैठक *f*, बसणी *f*, आसन *n*; a session सभाकाळ, बैठक *f*, इ०

SITE (*sinere*, to lay down) situation जागा *f*, ठिकाण *n*, स्थळ *n*; a place fitted or chosen for any certain permanent use or occupation जागा *f*: a s. for a church. —SITUATED *a.* बसलेला, स्थित, ठेवलेला; अवस्थेचा, अवस्थापन्न; badly s. दुःस्थित [at, on].—SITUATION जागा *f*, स्थळ *n*; स्थिति *f*, अवस्था *f*, दशा *f*; office जागा *f*, असामी *f*: a s. under Government.

SIX* *a.* (*Skr. shash*) साहा.—*n.* साहाचा अंक; aggregate of s. छकडी *f*. -FOLD *a.* साहापट. -TEEN *a.* सोळा. -TEENTH *a.* सोळावा. —SIXTH *a.* साहावा.—SIXTY *a.* साठ.—*n.* साठाची संख्या *f*; साठाचा अंक.—SIXTIETH *a.* साठावा.

SIZE (See ASSIZE) bulk लांबीरुंदी *f*, परिमाण *n*, आकारमान *n*.—*v.* लहान मोठा पाहून रचणें -मांडणें, शेज लावणें.—*n. W.* एक प्रकारची पातळ खळ *f*; *Med.* रक्ताचा तवंग.

SIZE *W.* डकवण *n*, खळ *f*, चिकटवण *n*.—*v.* चिकटवणें, खळणें.

SKEIN *F.* कुकडें *n*.

SKATE *D.* बर्फावरून घसरत -झपाट्यानें चालत जाण्याचा जोडा.—*v. i.* बर्फावरून चालत -घसरत जाणें.

SKELETON (*Gr.*) bony structure in its natural relation हाडांचा पिंजरा, अस्थिपंजर, सांपळा; a very thin person सुकटा माणूस, कागदीज्वान; compages सांगाडा, खटारा, सांपळा.

SKEPTIC, See SCEPTIC.

SKETCH *D.* अंकणें *n*, अंकणी *f*;—of a subject अराखडा, मसुदा.—*v.* अंकणें, बेत -नकाशा काढणें -क. [out, in, off].

SKEWER *D.* सळई *f*, शलाका *f*.

SKIFF *F.* लहान होडी *f*, डिंगी *f*.

SKILL*, knowledge ज्ञान *n*, बुद्धि *f*; familiar knowledge with dexterity युक्ति *f*, हिकमत *f*, कौशल्य *n*, कसब *n* [in]. -FUL, -ED *a.* कुशल, कसबी, चतुर, निपुण, सुगर [at, in].

SKIM *v. Ger.* clear off from the surface छाटणें, छाटून काढणें; take off by skimming मलई -साई काढणें; pass near the surface of सरपटणें, -च्या वरून -सरसून -सरपटत जाणें [over, along].—*i.* सरपटत जाणें.—*n.* साई *f*, मलई *f*. -MER झारा, शिबें *n*. -MILK साई काढलेलें दूध *n*. -MING साई काढणें *n*.—SCUM साय *f*, मलई *f*; refuse खरवड *f*.

SKIN*, the external membraneous envelope of animal bodies चामडें *n*, कातडें *n*, चर्म *n*, कातडी *f*, चामडी *f*; the skin of an animal separated from the body कातडें *n*, चरसा, आधोळ; bark of a plant साल *f*, त्वचा *f*; exterior coat of fruits and plants सालपट *n*, टरफल *n*.—as of certain fruits, a sore, &c. कोशेटा;—of a tiger व्याघ्रांबर *n*.—*v.* कातडें -त्वचा -साल काढणें, सोलणें.—*i.* कातडें येणें: a wound *skins* over; [produce, in recitation or other school exercise, the work of another for one's own]. -DEEP *a.* वरवरचा, वरकर्मी. -FLINT कवडीचुंबक, लोहचुंबक. -NY *a.* कातड्याचा; wanting flesh सडसडीत, पातळ, सुकटा, हडक्या.

SKIP *v. Icel.* सोडणें, वगळणें, गाळणें.—*i.* उडी मारणें, ठिकणें; over वगळणें, गाळणें. [from, off, away, to].—*n.* उडी *f*, कुदी *f*.

SKIRMISH *O. E.* गोळागोळी *f*, चकमक *f*.—*v.* फटकाफटकी -गोळागोळी होणें -चालणें [with].

SKIRT*, the lower and loose part of a garment घेर, घोळ, झोळ; edge of any part of dress पदर, शेव; edge कांठ, किनारा, कड *f*, शेव.—*v.* शींव -शिमा असणें -धरणें. —*i.* शिवेवर असणें.

SKITTISH* *a.* shy बुजरा; frisky नाचऱ्या, कुलुल्या.

SKULK* *v. i.* lurk दडणें, लपणें; absent from duty कामावरून गैरहाजीर राहणें, काम चुकविणें [about, away, off, in, out].

SKULL *D.* कंवटी *f*, कवची *f*, करटी *f*.

SKY *D.* आभाळ *n*, आकाश *n*, अंतराळ *n*: the s. is overcast आभाळ आलें. -COLORED *a.* अस्मानी रंगाचा, अस्मानी, नीलवर्ण. -LARK कुकुडकुंभा, भारद्वाज. -LIGHT झारें *n*, धारें *n*, गवाक्ष *n*. -ROCKET बाण.

SLAB *W.* शिला *f*, शीळ *f*;—of a hand-mill तळी *f*;—for grinding condiments, medicaments, &c. पाटा.

SLABBER *v. i. Ger.* लाळ गाळणें -टाकणें.—*t.* लाळीनें ओला क. -भरीवणें. -ER लाळगाळ्या, लाळ्या.

SLACK* *a.* not tense ढिला, सैल; not holding fast खिळखिळीत, खिळखिळ्या; remiss ढिला, मळमळीत, सुस्त, गैदी: s. in duty; slow मंद, सुस्त, धिमा (pace). -EN *v.* ढिला -सैल -ढील क.; जोर -वेग कमी क.; slake भिजवणें, विरवणें (lime).—*i.* ढिला -सैल होणें; सुटणें, मोकळा होणें, विरणें (lime); languish ग्लानि येणें, लुंबणें. -NESS ढिलेपणा, शैथिल्य *n*; आळस, मंदाई *f*, सुस्ती *f*.

SLAKE *v. Icel.* quench विझविणें;—as thirst भागवणें; slack विरवणें, उमलविणें (lime). —*i.* विझणें.

SLAM *v. Icel.* धडकन -आदळून लावणें -बंद क. (a door).

SLANDER *F.* false tale or report maliciously uttered, and tending to injure the reputation of another चहाडी *f*, चुगली *f*, बालंट *n*, आळ; reproach कलंक, निंदा *f*.—*v.* तोहमत आणणें, आळ घेणें, चुगली -चहाडी क. -ER चुगलीखोर, चहाड, बालंट्या. -OUS *a.* चुगलीचा, कुभांड्या, अपवादक (word); चुगली सांगणारा, चुगलीखोर, तुफानी.

SLANT *a. Sw.* तिर्कस.—*v. i.* तिर्कस जाणें -फिरणें,

उतरता असणें.—*t.* उतरता क., ढाळ देणें.—*n.* ढाळ, उतार.

SLAP *Ger.* चपराक *f*, थापड *f*, चापटी *f* [at, on].—*v.* चपराक देणें -मारणें -भडकावणें.

SLASH *v. Icel.* धसकावणें, चपाचप तोडणें.—*n.* तरवार इ० चा वार -ची चीर -फाळा.

SLATE *F.* a kind of stone which readily splits into plates एक जातीचा मऊ दगड आहे, स्लेटीचा दगड; a thin plate of stone चीप *f*; a tablet for writing upon दगडी पाटी *f*, 'स्लेट' *f*.—SLATY *a.* कप्याचा, चिपाचा.

SLATTERN *Ger.* a woman who is negligent of her dress or house आडव्या सुडक्याची बायको *f*, भोंगळी बायको *f*, जोगम्मा *f*; to dress as a s. उभें नेसणें -लावणें.

SLAUGHTER *Icel.* extensive and unnecessary destruction of human life कत्तल *f*, काटाकाटी *f*, कंदन *n*; act of killing as a matter of business कापणें *n*, मारणें *n*, वध: s. of oxen for market.—*v.* काटणें, कत्तल उडवणें, काटाकाटी क.; कापणें, मारणें, कंदन क. -HOUSE जनावरें कापण्याची जागा *f*.

SLAVE *D.* a person who is held in bondage to another दास, गुलाम, बंदा; one who has lost the power of resistance दास, गुलाम: a s. to passions; one who labors like a slave गुलाम, भाडेकरी, हाडाचे मणी करणारा, खप्या, कबाडकष्ट करणारा; female s. दासी *f*, बटीक *f*, कुणबीण *f*.—*v. i.* कबाडकष्ट -गुलामगिरी क.; deal in slaves गुलामांचा व्यापार क. -RY दास्यत्व *n*, गुलामगिरी *f*.—SLAVISH *a.* गुलामाचा; such as becomes a slave गुलामा सारखा, गुलामास योग्य; servile खुशामतीचा, आर्जवी; laborious कष्टाचा, कबाडकष्टाचा.—SLAVER गुलामाच्या व्यापाराचें जहाज *n*; गुलामाचा व्यापार करणारा.

SLAVER *Ger.* लाळ *f*.—*v. i.* लाळ पडणें -गळणें; लाळीनें भरणें [at].

SLAY* *v.* मारणें, जिवें मारणें, प्राण घेणें. -ER मारणारा, वधकरणारा.

SLEDGE*, the hammer घण; *D.* a carriage drawn without wheels बिन चाकांची गाडी *f*; a vehicle moved on low wheels ठेंगण्या चाकांची गाडी *f*.

SLEEK *a. D.* smooth गुळगुळीत, साफ, सफाईदार.

SLEEP* *v. i.* take rest by a suspension of the voluntary exercise of the powers of the body and mind, and an apathy of the organs of sense निजणें, झोंप घेणें; be careless झोंप घेणें, डोळेझांक क., निष्काळजी -निश्चिंत असणें; to be dead मरणें, महानिद्रा लागणें (1 Thes. iv. 14); be in repose स्वस्थ राहणें, पडणें, झोंप घेणें: a question *sleeps* for the present; to s. composedly सावकाश निजणें.—*n.* निद्रा *f*, नीज *f*, झोंप *f*; s. in which the subject turns round and round चक्रीझोंप *f*. -ER निजणारा; a lazy person आळसी, अजगर; a sound s. कुंभकर्ण [a piece of timber or stone on or near the level of the ground, for the support of some superstructure]. -ING झोंप आलेला, निद्रायमाण, निद्रिस्त; occupied for sleeping निजायाचा, निजण्याचा (a car on a railway); s. partner पोटगडी.—*n.* निद्रावस्था *f*. -INESS झोंपाळूपणा; drowsiness झोंपेची गुंगी *f*, सुस्ती *f*.—SLEEPY *a.* झोंपाळू, निद्रालु; tending to induce sleep निद्राकर, झोंप आणणारा; overcome by sleep झोंपेची तार आलेला, झोंपेनें घेरलेला, निद्राग्रस्त.

SLEET*, fall of hail or snow mingled with rain गारांचा -स्नोचा पाऊस.

SLEEVE* बाही *f*, अस्तनी *f*; to laugh in one's s. पदर लावून गालच्या गालीं हसणें.

SLEIGHT *Icel.* हस्तलाघव, हातचलाखी *f*; s. of hand हातचलाखीचा खेळ.

SLENDER *a. D.* thin पातळ, सडपातळ, बारीक; weak निर्बळ, फुसका, अशक्त (constitu-

tion); slight थोडा, हलका, अल्प (hope); moderate थोडा, सुमाराचा (intelligence); inadequate थोडा, अपुरता, कोता (pittance); simple साधा (diet).

SLICE *Ger.* thin, broad piece फांक *f*, कापटी *f*, चिरोटी *f*, फोड *f*; piece cut off धपळी *f*, टिवळी *f*.—*v.* फांकी क., कापणें, फोडी पाडणें [off].

SLIDE* *v. i.* slip घसरणें, निसरणें; move over snow with a glib, uninterrupted motion बर्फा वरून घसरत जाणें; fall पडणें; pass inadvertently घसरणें, चुकून जाणें.—*t.* लोटणें, सारणें; चोरून शिरकवणें, खुपसणें (a word) [off, from, to, along, over].—*n.* घसरड *f*.

SLIGHT *a. Ger.* small बारीक, पातळ, किरकोळ; slender हलका, लहान, फुसका, अलबेला (structure); inconsiderable हलका, कळे नकळेसा (pain).—*n.* contempt अव्हेर, अनादर; neglect उपेक्षा *f*, कानाडोळा, अवगणना *f*.—*v.* तुच्छ मानणें, अनादर क.

SLIM *a. Ger.* पातळ, किरकोळ, बारीक.

SLIME* गाळ, रेबड *f*.—*v.* गाळानें भरणें, रेबडी लावणें [over].—SLIMY *a.* गाळाचा, रेबडीचा; viscous चिकचिकीत, गळगळीत; रेबडीनें भरलेला.

SLING *Ger.* instrument for throwing stones, consisting of a strap and two strings गोफण *f*; a kind of hanging bandage round the neck, in which a wounded arm is sustained ओळकंबें *n*;—as for a vessel शिंकें *n*;—for a weight or load नवघण;—for a basket शिंकरणी *f*.—*v.* गोफणीनें मारणें; शिंकाळणें.

SLINK* *v.* steal away चोरून जाणें; miscarry, as a beast गाभटणें [off].

SLIP* *v. i.* slide निसरणें, निसटणें; fall into error चुकणें, घसरणें; sneak चोरून निघून जाणें, झुकांडी देणें [away]; enter by oversight चुकीनें -नजरचुकीनें शिरणें; to be lost गमावणें.—*t.* सारणें, सरकावणें; हरवणें, घालवणें; omit गाळणें, सोडणें; cut कापणें, तोडणें, छाटणें (branches); let loose सोडणें, मोकळें क. (a hound); throw off अंगाबाहेर टाकणें -काढणें: a horse *slips* his bridle; miscarry गाभटणें; on अंगांत अडकवणें (a coat).—*n.* घसरणें *n*, घसरा, चळ, ढळ; a twig separated from the main stock कलम *n*, फांदी *f*; string by which a dog is held कुत्र्याची दोरी *f*; a long narrow piece पट्टी *f*;—of cloth पट्टी *f*, चिंधोटी *f*;—of bamboo कांब *f*, कांबीट *f*;—of metal कांब *f*;—of land पट्टी *f*, चिरोटी *f*; fault चूक *f*, चळ, ढळ; to give the s. झुकाटी देणें. -KNOT सरक -निसर -शेसगांठ *f*. -PER पायपोस, पैजार, मोचा. -BY *a.* घसरता, निसरडा; बुळबुळीत (substances); not affording firm confidence चंचळ, अस्थिर (promise); liable to slip घसराया-जोगा; a s. place घसरड *f*.—SLOP गरगट *n*, ढपळवणी *f*.

SLIT* चीर *f*, भेग *f*.—*v.* चिरणें, उभा कापणें; make a fissure in चीर -भेग पाडणें [up].

SLOAT *Ger.* a narrow piece of timber which holds together large pieces करळी *f*.

SLOOP *Ger.* एककाठी जहाज *n*.

SLOP *Ir.* puddle डबकें *n*, डबरा; mean liquor गरगट *n*, शंखवणी *f*; *pl.* मळकट पाणी *n*.

SLOPE*, a direction downward उतार, ढाळ; acclivity चढण *f*, चढाव.—*v.* ढाळ देणें, उतार क. [off, down, from].—*i.* उतरता होणें.—SLOPING *a.* उतरता, ढाळता.

SLOTH*, laziness आळस, सुस्ती *f*; an animal एक जनावर आहे, पर्णमृग. -FUL *a.* सुस्ती, आळशी, मंद.

SLOUCH *v. i. D.* मुंडी -मान खालीं करून चालणें. —*t.* खालीं क., पाडणें, लोंबवणें.

SLOUGH* दलदल *f*, रुतण *f*, कर्दम.—SLOUGHY दलदलीचा.

SLOUGH *Ger.* the cast skin of a serpent मेंग *f*, कांत *f*; *Med.*, the part that separates from a foul sore जळमट *n*, गलितमांस *n*.—*v.* मेंग टाकणें; जळमटें, खपली वगैरे निघणें [off].—SLOUGHY *a.* जळमटांचा.

SLOVEN *a. Ger.* नेभळ, भोंगळ. -LINESS नेभळेपणा, गैशीपणा, गाबाळीपणा. -LY *a.* भोंगळ, गैदी, गेबल्या; not neat हडगईचा, भांबळ्या.

SLOW* *a.* not quick in motion धिमा, मंदगति, मंद; late उशिरानें होणारा, दीर्घकालिक; not prompt मंद, जड, मठ: s. of speech; not hasty धिमा, गंभीर विचाराचा (Prov. xiv. 29); behind in time मागचा, विलंबित, हळू चालणारा, मंद (watch); not advancing मंद, हळू वाढणारा (growth); having no wit स्थूलबुद्धि, मंद. -LY *ad.* हलक्यानें, मंद, हळुहळु. -NESS मंदपणा, मंदाई *f*, मंदगति *f*; जडपणा, सुस्ती *f*, बुद्धिमांद्य *n*, मंदबुद्धि *f*; सावकाशी *f*, धिमाई *f*.

SLUBBER *v. D.* do lazily, imperfectly, or coarsely गडबडगुंडा क., ढकलणें, दपटणें; daub चोपडणें, लथडणें, लेपटणें; work *slubbered* over बिगार *f*, बिगारकाम *n*.

SLUGGARD *a. D.* आळशी, अजगर, आर.—SLUGGISH *a.* सुस्त, मंद, जड.

SLUICE *D.* flood-gate उघडी *f*, सांड *f*, सांडवा.

SLUMBER* *v. i.* sleep lightly हलकी झोंप -डुकली घेणें; sleep निजणें; to be in a state of inactivity निचेष्ट -उगी -स्तब्ध बसणें, झोंप घेणें.—*n.* हलकी झोंप *f*, कुतरझोंप *f*; झोंप *f*.

SLUR *v. D.* soil वट्टा -काळें -कलंक लावणें; pass lightly उडत उडत -छपावून सांगणें.—*n.* कलंक, डाग, काळोखी *f*; imposition ठकवणूक *f*, फसवणूक *f*.

SLUT *D.* जोगम्मा *f*, हिडशी बायको *f*.

SLY *a. D.* skilful चतुर, धूर्त; cunning कावेदार, मतलबी, धूर्त.

SMACK* *v. i.* kiss with violence मिटक्या मारून मुका घेणें; have a taste वास -लज्जत मारणें -असणें;—with the lips मिटकी मारणें.—*t.* मिटकी मारून मुका घेणें; crack कडकावणें, तडतडावणें (a whip) [with].—*n.* वास, लज्जत *f*; मिटक्याचा मुका; फटकारा, कडाखा; slap चपराक *f*, चापटी *f*.

SMALL* *a.* not large लहान; insignificant हलका, क्षुल्लक (subject); little in amount or degree थोडा, अल्प, हलका; weak बारीक, एकेरा (voice).—*n.*—of the back बगड *n*, चौक. -NESS लहानपणा; थोडकेपणा, हलकेपणा; बारीकपणा इ०. -POX देवी *f pl*, फोड्या *f pl*.

SMART *Ger.* local pain स्थाईक दुःख *n*, वेदना *f*; pungent pain of mind चटका, मनस्ताप.—*a.* तीक्ष्ण, तिखट; quick चंचळ, चलाख, चपळ; energetic झपाट्याचा, तडाख्याचा, कडक; witty नोकदार, खुबीचा, मार्मिक (reply); dashy चकपक, छानदार, ठाकठीक;—of persons चलाख, जलद, हुशार.—*v. i.* दुखणें, चुरचुरणें, चुणचुणणें; to be punished शिक्षा भोगणें -पावणें, चटका लागणें (Prov. xi. 15); to cause to s. for भोगणें, जाणवणें [with]. -LY *ad.* चलाखीनें, झपाट्यानें; चकपक, छानमारून, चापून चोपून. -NESS तिखटपणा, तीक्ष्णता *f*; चलाखी *f*, झटपट *f*; सफाई *f*, हुशारी *f*; कडाखा, सपाटा; चापचोपी *f*, छान *f*; नोक *f*, खुबी *f*.

SMASH *v. Ger.* चकणाचूर क. -करून टाकणें—*n.* चकणाचूर, चुराडा.

SMATTER *v. i. Ger.* talk superficially वरवर बोलणें; smack लज्जत -वास मारणें. -ER पुस्तकावरून ओढलेला, तोकपिट्या, खंडीखंडी पंडित. -ING ओरखडलेलें ज्ञान *n*, खंडपांडित्य *n*, वरवरची माहितगारी *f*.

SMEAR* *v.* daub लिपणें, माखणें; soil कलंक लावणें [over].

SMELL *v. Ger.* perceive by the nose हुंगणें, वासवेणें; to s. out हुंगणें, वासानें शोधून काढणें; to s. a rat माशी शिकणें [of, to].—*i.* वास असणें -येणें; have a particular tincture वासमारणें.—*n.* वास, गंध; ill-s. घाण *f*, कुवास; good s. सुगंध, सुवास; the power or sense of s. घ्राणेंद्रिय *n.* -FEAST परान्नरुचि. -ING घ्राणेंद्रिय *n.* -ING-BOTTLE वासाची -वास घेण्याची कुपी *f.*

SMELT *v. D.* रस क., गाळणें. -ER रस करून गाळणारा, धावड.

SMILE *v. i. D.* (*Skr. smi*, to laugh) गालीं हसणें, मंदहास्य क.; be propitious प्रसन्न होणें, फुलणें, खुलणें; sneer हसणें, नाक मुरडणें; look gay and joyous उल्लासी -आनंदी दिसणें: *smiling* spring; *smiling* countenance हास्यवदन *n*, प्रसन्नमुख *n*, मंदस्मित वदन *n* [on, at].

SMITE* *v.* strike मारणें, हाणणें, प्रहार क.; kill जिवें मारणें; put to rout in battle युद्धांत मोड क.; blast करपवणें; affect with passion मोहणें, मोहित क.; afflict दुःख देणें: off छेदणें, कापून टाकणें; out पाडणें, तोडणें (tooth).

SMITH* घड -ठोककाम करणारा; iron s. लोहार; gold s. सोनार; copper s. कांसार.—SMITHY घडकामाचें दुकान *n*, लोहारसाळ *f*, इ०.

SMOKE*, the exhalation, visible vapor, or substance that escapes from a burning body धूर, धूम्र; that which resembles smoke, as vapor or watery exhalations धूर, धुई *f*, धुकें *n*; a volume of s. धुराटी -डी *f.*—*v.i.* धूर निघणें; rage धुमसणें, धुसधुसणें, संतापणें; raise a dust by rapid motion (धांवत -जलद चालतांना) धूळ उडवणें -उधळणें; to s. tobacco तंबाखू पिणें -ओढणें; suffer भोगणें, सोसणें: some of you shall s. for it. —*t.* धुरावणें, धुरी -धूर देणें; तंबाखू ओढणें.—SMOKY *a.* emitting smoke धुराचा, धुरकट (fires); filled with smoke धुरानें भरलेला, धुरकटलेला, धुईचा (atmosphere); tarnished with smoke धूर लागलेला, धुरकट, धुरानें काळा झालेला (rafters).

SMOOTH* *a.* not rough गुळगुळीत, नितळ (glass); glossy गुळगुळीत, तुळतुळीत, मऊ (hair); gently flowing सुरळीत, सरळ, संत -झुळझुळा -सुळसुळा वाहणारा (stream); not harsh मृदु, गोडीगुलाबीचा, गोड; flattering आर्जवाचा, गोड (discourse); even सारखा, सपाट, बराबर; not obstructed निर्विघ्न, सोपा, सरळ.—*v.* गुळगुळीत क.; सारखा -बराबर क.; सोपा -सुरळीत क.; palliate हलका -कमी क. (fault).—*i.* आर्जव क. -LY *a.* सुरळीत, सरळ; गोडीगुलाबीनें, गोडगोड बोलून. -NESS गुळगुळीतपणा, सफाई *f*; सारखेपणा, सपाटी *f*; मऊपणा; लाघव *n*, लाडीगोडी *f.* -TONGUED *a.* गोडबोल्या.

SMOTHER* *v.* destroy the life of by suffocation दम -श्वास कोंडून मारणें; stifle दाबणें, दडपणें (a fire); suppress दाबणें, लपवून -दडपून ठेवणें, गिळणें (displeasure) [up].—*i.* गुदमरणें, घुसमटणें; burn slowly धुमसणें, हळुहळु जळणें.

SMOULDER *v. i. D.* धुमणें, धुमसणें.

SMUGGLE* *v.* import or export secretly and without paying duty जकात चुकवून व चोरून (माल) आणणें किंवा नेणें; convey, or introduce, clandestinely चोरून नेणें -आणणें [away, in, out, through].

SMUT*, dirt of soot, lampblack मस *f*, मशेरी *f*;—of corn अंगारा, काजळी *f*; obscene language विचकट -बीभत्स भाषण *n.* —*v.* मस लावणें, काळा क.; तांबारा पाडणें; tarnish कलंक लावणें [with].—*i.* मस जमणें

-होणें. -TY *a.* मस लागलेला, मसकट; काजळी -अंगारा लागलेला, कोळपलेला; विचकट, बीभत्स.

SNAFFLE *Ger.* सुतळ्या लगाम.

SNAIL*, the animal गोगलगाई *f*, पिकळी *f*; a slow moving person मुंगीच्या पायांनीं चालणारा, मदाड.

SNAKE* साप, सर्प. -STONE सर्प -नागमणी. —SNAKY *a.* सापाचा; cunning धूर्त्त.

SNAP *v. Ger.* break at once कटकन मोडणें, तटकन तोडणें; strike with a sharp sound पटकन मारणें; bite suddenly एकदम डसणें; break upon suddenly with sharp, angry words तुटून -घसरून आंगावर येणें; crack फटकारा मारणें; off तटकन तोडणें, लचका काढणें;—the fingers चुटकी वाजवणें.—*i.* तटकन मोडणें; तोंड टाकणें, डसायाला धांवणें -क.; खेंकणें, खेंकावणें [off].—*n.* चुटकी *f*, चटकी *f*, फटकारा. -PISH *a.* डसरा, डसका, चावरा; खिसखिशा, चिरडखोर, तिडतिडा.

SNARE *D.* trap सांपळा, फांस: fig. सांपळा, फांस.—*v.* फाशांत धरणें -पाडणें [with, by].

SNARL *v. i. D.* growl गुरगुरणें, गुरकावणें; speak roughly खेंकणें, खेंकावणें [at].

SNATCH *v. D.* seize hastily झोंबाडणें, हिसकून घेणें, झडप मारणें; seize and transport away धरून नेणें, पार क. [at, up, from].—*n.* हिसडा, आसडा, झोंबाडा.

SNEAK* *v.* steal away privately गुपचुप -चोरून निघून जाणें; crouch जीजी क., थुंकी झेलणें (along, about, off, in, into, out, away). —*n.* थुंकी झेलणारा, आर्जवी. -ING आर्जवी, जीजी करणारा.

SNEER *v. i. Pr. Eng.* show contempt by turning up the nose, or by a particular cast of countenance नाक वर क. -मुरडणें; show contempt by a covert expression झिटकारून -लावून -खोंचून बोलणें, ठोमणा मारणें. —*n.* नाकझाडणी *f*, लावून बोलणें *n*, उपरोध.

SNEEZE* *v. i.* शिंकणें, शिंक येणें.—*n.* a sudden and violent ejection of air, chiefly through the nose, with an audible sound शिंक *f*.

SNIFF *v. i. Ger.* सूं सूं क., नाकानें श्वास घेणें.

SNIP *v. D.* cut off कातरणें, कातरून घेणें; pilfer बुटेचोरी क.

SNIPE *D.* पाणलव्हा -लावा.

SNIVEL* *v. i.* नाक वाहणें, शेंबूड वाहणें -गळणें; cry or whine as children धुसमुसणें, पिरपिर लावणें, रडून शेंबूड गाळणें. -ER शेंबड्या, मुसमुसणारा.

SNOOD *Scot.* अगूळ *n, m, f.*

SNORE* *v. i.* घोरणें.

SNORT* *v. i.* खेसणें, फुरफुरणें.

SNOT* शेंबूड. -TY *a.* शेंबड्या, बरबरीत.

SNOUT *Ger.* long projecting nose of a beast जनावराचें तोंड *n*, मुसकट *n*; nose of a a man नाकाड *n*;—in contempt मुसकड *n*.

SNOW* बर्फ *n*, हीम *n*, 'स्नो.'—SNOWY *a.* बर्फासारखा, पांढराफटफटीत; abounding with snow हिमप्रचुर.

SNUB *v. D.* दटावणें, दबकावणें, धमकावणें. -NOSED *a.* नकटा, फेपट्या नाकाचा.

SNUFF *Ger.* the burnt part of a candlewick गूल *m, f*, काजळी *f*, कोजळी *f*; powdered tobacco तपकीर *f*.—*v. i.* कोजळणें; inhale श्वासा बरोबर घेणें; take offence नाक मुरडणें, रुसणें. -BOX तपकिरीची डबी *f*. -ER हुंगणारा; *pl.* कोजळी झाडण्याची कातर *f*. गुलतराश *f* (*H*).—SNUFFLE *v. i.* नाकांत बोलणें, गुणगुणणें.

SNUG* *v. i.* चिकटून निजणें, कुशींत शिरणें.—*a.* —of places सुटसुटीत, अटपसार, अटपता, सुबक;—of persons चिकटलेला, लगटलेला.

SO* *ad.* in that manner तसें, त्याप्रमाणें; in like manner असा, याप्रमाणें; very फार, इतका; s. forth इत्यादि; s. much as इतका;

s.-and-s. असा तसा, माफक; s. that इतकें कीं; s. then तर मग.—*conj.* असें असतां.

SOAK* *v.* steep भिजवणें, भिजूं घालणें; drench चिंबभिजवणें; draw in by the pores शोषणें, शोषून घेणें [through, in].—*i.* भिजत पडणें; मुरणें, जिरणें, भिनणें.

SOAP* साबू, साबण. -BERRY रिठा.—SOAPY *a.* साबणा सारखा; मऊ, गुळगुळीत; साबण लावलेला.—SUDS *pl.* साबणाचें पाणी *n.*

SOAR *v. i.* (*-aura,* the air) उडणें, उंच-वर जाणें, tower in thought उंच विषय धरणें -घेणें [over, above].—*n.* उड्डाण *n.*

SOB* *v.i.* रडणें, स्फुंदणें.—*n.* हुंदका, स्फुंदन *n,* रुदन *n* [for].

SOBER *a.* (*sobrius*) temperate in the use of spirituous liquors बेतानें पिणारा, मितप्राशी; not drunk सावध, अमल न चढलेला, हुशार: the sot may at times be s.; not mad विचारशील, स्थिर; self-controlled नियतवृत्ति, नियमी; not proceeding from passion विचाराचा; serious गंभीरवृत्ति.—*v.* अंमल-कैफ उतरणें, शुद्धीवर आणणें.—*i.* शुद्धीवर येणें, कैफ उतरणें. -LY *ad.* अंमला वांचून, कैफा वांचून; थंडाइनें, विचारपूर्वक. -MINDED *a.* स्थिर, विचारवान. -NESS.—SOBRIETY बेताचें पिणें *n,* मितप्राशन *n;* सावधपणा, बिनअमलीपणा; स्थिरबुद्धि *f,* गांभीर्य *n,* विचारशीलता *f.*

SOCIABLE, SOCIAL *a.* (*socius,* a companion) सोबतीचा भुकेला, स्नेहबुद्धि; मंडळीचा, संगतीचा; familiar खेळीमेळीचा, स्नेहाचा. -NESS, -ITY स्नेहबुद्धि *f,* मिलाफीपणा.—SOCIETY सोबत *f,* संगत *f;* community मंडळी *f,* पंगती *f,* पंगत *f,* लौकिक.

SOCK (*soccus,* a light shoe) पायाचा मोजा, पायमोजा.

SOCKET (do.) घर *n,* उथळें *n,* खुरशी *f;*—for a post तोळंबा.

SOD *Ger.* गवताळ -गवती जमीन *f;* a s. गवताच्या मुळासगट माती *f.*

SODA (*salsus,* salt) एक प्रकारचा क्षार आहे; subcarbonate of s. पापडखार; impure carbonate of s. सज्जीखार.

SODOMITE, inhabitant of Sodom सदोम गांवचा राहणारा; one guilty of sodomy गुदमैथुन करणारा, गुदमैथुनाचा दोषी; a male that submits to the crime of s. गंडिया.—SODOMY गुदमैथुन *n.*

SOFA *Ar.* 'कोच' *f,* 'सोफा', मंचक.

SOFT* *a.* not firm in resisting नरम, मऊ; not rough सफाईदार, बारीक (silk); agreeable to perceive or feel मृदु, मंद (air); pleasing to the eye दृष्टिरम्य, सुंदर (hues); mild सौम्य, मृदु, करुणार्द्र (form); not rough in sound मंजुळ, मधुर, हलका; *Gram.* घोषवत, सघोष (a letter); effeminate मनाचा कोवळा, नरम, मळमळीत; easy हलका, हलक्या हाताचा; not tinged with salts, so as to decompose soap गोडा (water); easily wrought सुबड, नरम (iron); quiet शांत (slumbers).—*ad.* हळू, सावकाश; -EN *v.* मऊ -नरम क.; mollify बेताचा -सुमारमाफक क.; make tender पाझरविणें, द्रवविणें [down].—*i.* मऊ -नरम होणें; पाझरणें, नरमावणें: the heart *softens* at the sight of woe. -LY *ad.* हलक्यानें, हळू, हलका; मंजुळ वाणीनें. -NESS मऊपणा, नरमपणा; फुसफुसीतपणा; मनाची नरमाई *f;* मंदत्व *n,* मार्दव *n;* मंजुळता *f,* मधुरता *f,* माधुर्य *n;* सौम्यपणा.

SOIL* *v.* make dirty on the surface मळवणें; tinge with anything extraneous डागपाडणें; manure खत घालणें [with, by].—*n.* मळ; डाग.

SOIL *v. F.* गुरांस पुष्कळ खायास घालून जुलाब देणें.

SOIL (*solum*, the upper stratum of the earth) माती *f*, काळी *f*, धरत्री *f*, जमीन *f*; country देश; manure खत *n*; inferior s. बरडजमीन *n*; white s. पांढर *f*, पांढरी *f*; red s. तांबड *f*.

SOIL (*sus*, a hog) a marshy or miry place to which a hunted boar resorts for refuge पारधी पाठीस लागलेल्या डुकराची आसऱ्याची जागा *f*; [streams or water sought for by any other game, as deer].

SOIREE *F.* an evening party संध्याकाळची (मिळालेली) मंडळी *f*.

SOJOURN *v. i. F.* कांहीं दिवस राहणें.—*n.* मुकाम; प्रवास, देशांतरवास. -EE कांहीं दिवस राहणारा, प्रवासी, उपरी. -ING प्रवास; मुकाम.

SOLACE *v.* (*solari*, to comfort) अश्वासन -धीर देणें; allay सांत्वन -समाधान -शमन क. [with].—*n.* सुख *n*, चैन *f*, आराम; सांत्वन *n*, समाधान *n*.

SOLANUM (*L.*) s. macrohizon डोरली *f*; s. Jacquini डोरली रिंगणी *f*; s. insanum डोरली वांगी *f*; its fruit डोरलें वांगें *n*.

SOLAR *a.* (*sol*, the sun) सूर्याचा, सूर्य संबंधी, सौर; measured by the progress of the sun सौर, सौरमानाचा (year); produced by means of the sun सूर्याच्या योगानें -उनानें उत्पन्न केलेला, in comp. सूर्य (salt). —*n.* a garret room माळी *f*, माळा.

SOLDER (*solidus*, firm) कस्तूर *n*, *m*. डाक.—*v.* कस्तूर क., डाक लावणें, झाळणें.

SOLDIER (*solidus*, a piece of money, the pay of a soldier) a man engaged in military service शिपाई, सैनिक; a private in military service शिपाई, 'सोजर'; a brave warrior योद्धा, वीर. -LY *a.* शिपाईगिरीचा, शिपाईगिरीस लायक.—SOLDIERY शिपाई लोक *pl*, लष्कर *n*; irregular s. शिवबंदी *f*.

SOLE*, bottom of the foot तळवा, पायाचा तळवा, तळपाय; bottom of a shoe जोड्याचा तळ; bottom of anything तळ, बूड *n*.—*v.* तळ लावणें -घालणें.

SOLE (*solea*) a fish लेफ *n*, *m*.

SOLE *a.* (*solus*) एकटा -ला; *Law*, single एकटा, सडा, अविवाहित. -LY *ad.* एकटा, एकाकी.

SOLECISM (*Gr. soloikos*, speaking incorrectly) अप्रयोग, अशुद्ध प्रयोग.

SOLEMN *a.* (*solemnis*, that which takes place every year) marked with religious rites and pomps धर्मसंस्कार -विधिपूर्वक; serious गंभीर, भरकूम; filled to awaken serious reflections धाक बसायाजोगा, दराऱ्याचा, इभ्रतीचा, गंभीरपणाचा; *Law*, made in form रीती प्रमाणें केलेला, कायदेशीर, यथाविधि, दस्तुरमाफक. -ITY गंभीरपणा, गांभीर्य *n*; धाक, जरब *f*, इभ्रत *f*; धर्म -देवकार्य *n*, उत्साह; कायदेशीरपणा, यथाशास्त्रता *f*. -IZE *v.* समारंभानें -यथाविधि -यथाशास्त्र क.; उत्साह -समारंभ क. (a feast); गंभीर क., गंभीरपणा आणणें (the mind).

SOLICIT *v.* (*sollicitus*, wholly moved) ask with earnestness विनवणें, विनंती क.; seek मागणें, याचना क. (a favor); invite बोलावणें [of, from]. -ATION विनवणी *f*, विनंती *f*; याचना *f*; बोलावणें *n*, आमंत्रण *n*. -OR मागणारा, याचक, विनवणारा; *Law*, वकील. -OUS *a.* चिंतेचा, काळजीचा, चिंताक्रांत -युक्त [about, for]. -UDE चिंता *f*, काळजी *f*, घोर.

SOLID *a.* (*solidus*) hard घट, अपवाही; not hollow भरींव; cubic घन; strong बळकट, खंबीर, कठीण (wall); substantial ऐवज-ऐपतदार (man); impenetrable अभेद्य.—*n.* भरींव वस्तु *f*, घन पदार्थ; *Geom.* घन; contents of a s. घनफळ *n*. -ITY घट्टपणा, घनता *f*; भरींवपणा; बळकटपणा, बळकटी *f*; जोर, ऐवज: s. of arguments. -IFY *v.* घट्ट क.—*i.* घट्ट होणें.

SOLILOQUY (*solus*, alone, *loqui*, to speak) आपल्याशीं बोलणें *n*, आत्मभाषण *n*.

SOLITARY *a*. (do.) living alone एकला राहणारा ;—reproachfully एकलकोंड्या ;—of places गैर वळणाचा -राबत्याचा ; gloomy भणभणीत, भयाण, उदास ; single एकच, एकटा (instance).—*n*. एकला राहणारा, वनवासी.

SOLITAIRE *F*. एकट्यानें खेळायाचा एक खेळ आहे.—SOLITUDE एकांतवास, भणभणीतपणा, भणभणाट ; आडरान *n*, अरण्य *n*.

SOLO *It*. एका गळ्यानें -एका वाद्यानें गायाचें गाणें *n* -वाजविणें *n*, एकाकी गीत *n* -स्वर.

SOLSTICE (*sol*, the sun, *sistere* to cause to stand) *Astron*. सूर्याची उत्तर किंवा दक्षिण गति *f*, अयन *n* ; summer s. उत्तरायण *n* ; winter s. दक्षिणायन *n*.

SOLVE *v*. (*solvere*) dissipate द्रवविणें, द्रव क., वितळविणें ; explain उलगडा क., फोडणें (a problem).—SOLUBLE *a*. द्रव करायाजोगा, द्राव्य; द्रव होण्याजोगा, विद्राव्य [in].—SOLUBILITY द्राव्यता *f* ; गलनीयता *f*.—SOLUTION द्रव करणें *n*, द्रावण *n* ; द्रव झाल्यामुळें एकरूप होणें *n* ; पाणी *n*, in comp. वणी : मिठवणी *n* ; उलगडा ;—of a doubt संशयनिवृत्ति *f*, शंकासमाधान *n* ;—of a difficult verse श्लोकलापनिका *f*.—SOLVENCY कर्ज फेडण्याची लायकी *f*.—SOLVENT *a*. द्रवकरणारा, द्रावक ; able to pay all just debts कर्ज फेडण्यास लायक, दार ; sufficient to pay all debts कर्ज फेडण्या पुरता : the estate is s.—*n*. द्रावक रस.

SOMBER, -BRE *a*. (*sub umbra*, under shade) dark काळासावळा ; gloomy उदास, भणभणीत.

SOME* *a*. more or less कांहीं, अल्पस्वल्प (water); more or fewer कोणी, कित्येक : s. two or three persons ; small quantity कांहीं, थोडासा : s. miles away ; certain कित्येक, कोणी : s. men believe one thing, and others another ; a part कांहीं, थोडें, थोडा : we consumed s. of our provisions. -BODY कोणी एक, कोणी तरी. -HOW *ad*. जसें तसें करून, जसातसा, जेमतेम. -THING कांहीं : there is s. in the wind ; कांहीं, किंचित : s. yet of doubt remains.—*ad*. कांहींसा. -TIME *ad*. केव्हांतरी, कधींतरी ; s. or other केव्हां नाहीं केव्हांतरी ; formerly पूर्वी.—*a*. पूर्वीचा.—*pl. ad*. केव्हां केव्हां, कधीं कधीं. -WHAT *ad*. कांहींसा, कांहीं, जरा, जरासा.—*n*. कांहीं, किंचित. -WHERE *ad*. कोठें, कोठेंतरी.

SOMERSAULT, -SET (*supra*, above, *saltus*, a leap) कोल्हाटी *f*, गोलांट *n*.

SOMNAMBULIST (*somnus*, sleep, *ambulare*, to walk) झोपेंत चालणारा, निद्राचारी.—SOMNAMBULISM झोपेंत फिरणें -चालणें *n*, निद्राभ्रमण *n*, निद्राचार.

SOMNIFEROUS *a*. (*-ferre*, to bring) झोंप आणणारा, निद्राकारी.

SOMNILOQUIST *a*. and *n*. (*-loqui*, to speak) झोपेंत बोलणारा, निद्रालापी.

SOMNOLENT *a*. (*somnus*, sleep) झोंपाळू, निद्राळू —SOMNOLENCY निद्राळूपणा ; *Med*., a state intermediate between sleeping and waking जागृतनिद्रा *f*.

SON* (*Skr. súnu*, from *sú*, to beget) a male child पुत्र, लेंक, मुलगा ; a male descendant पुत्रसंतान *n*, पुत्र, नंदन ; a pupil शिष्य, पुत्र ; a native of some specified place देशीय, पुत्र : *sons* of India ; produce of anything उपज : earth's tall *sons*, the cedar, oak, and pine ; [Jesus Christ, the Savior ;—called the S. of God, and the S. of man : the Father sent the *Son* to be the Savior of the world, 1 John iv. 14].—a legitimate s. औरस ; a s. lawfully adopted दत्त ; s. of a pregnant bride सहोड ; —of one's slave girl शिंदापोरगा. -IN-LAW जांवई, जामात. -LESS *a*. निपुत्र, निपुत्रिक. -SHIP पुत्रपणा, पुत्रत्व *n*.

Song*, that which is sung गाणें *n*, गायन *n*; a ballad गीत *n*; poem कविता *f*, कवन *n*; object of derision तिरस्कारपात्र *n*; a mere trifle कवडीमाल. -ster गाणारा, गवयी; a bird that sings गाणारें पांखरूं *n*, गायक पक्षी. -stress गाणारीण *f*.

Sonnet (*sonus*, sound) लघुकविता *f*, ख्याल, ध्रुपद, टप्पा इ०.

Sonorous *a*. (*sonare*, to sound) वाजणारा, नादाचा, सनाद खणखणीत, वाजता, डोर: metals are s. bodies; loud-sounding डोर, आवाजदार, गंभीर ध्वनिकर (voice).

Soon* *ad*. in a short time थोडक्या वेळानें, थोडक्यांत, लवकर, इतक्यांत; early लवकर; readily खुशीनें, संतोषानें: I would as s. go as stay जसा मी जाईन, &c.

Soot* घेरोसा, मस *f*, धुरकट *n*.—Sooty *a*. घेरोसा बसलेला, काळा, मळकटलेला.

Soothe* *v*. flatter मठारणें, थापटणें; assuage सांतवणें, उपशमन क.; please खुशी क. [by].—Soothing शांतवन *n*, उपशमन *n*; समजी *f*.

Sop*, anything steeped and softened in any liquid भिजवलेला तुकडा (भाकर इ०); anything given to pacify गूळखोबरें *n*.

Sophism, Sophistry (*Gr. sophos*, wise) [the doctrine or avowed mode of reasoning practised by a sophist]; any fallacy designed to deceive सिद्धांताभास, आभास. —Sophist [one of a class of men who taught eloquence, philosophy, and politics in ancient Greece, and who, by their fallacious but plausible reasoning, puzzled inquirers after truth, weakened the faith of the people, and drew upon themselves general hatred and contempt]; a fallacious reasoner सिद्धांताभासवादी, आभासवादी.

Soporific *a*. (*soper*, a heavy sleep, *facere*, to make) झोंप आणणारा, निद्राकारी.

Sorcerer (*sors*, *sortis*, a lot) जादूगीर -वाला, चेटकी. -ess जादुगिरीण *f*.—Sorcery जादू *f*, बीरमंत्र, चेटक *n*.

Sordes (*L*.) मळ, कीट.—Sordid *a*. base नीच, हलका, अधम; covetous कृपण, किरटा; कटु.

Sore* *a*. painful दुखापत झालेला, दुखरा; tender, as the mind मनांत दुखवलेला, वरमलेला; severe भारी, कठीण, जालीम.—*n*. an ulcer क्षत *n*, व्रण, खवंद *n*; a place in an animal body where the skin and flesh are ruptured or bruised, so as to be tender or painful दुखापत झालेली जागा *f*, दुःख *n*; grief दुःख *n*. -ly *ad*. फार, अतिशय, भारी. -ness भारीपणा, कठीणपणा, दुखरेपणा.

Sorrel* चुका, चुक्याची भाजी *f*.—*a*. *F*. तेल्याबोर, कुमाईत (horse).

Sorrow* खेद, दुःख *n*, शोक [for, at]—*v*. *i*. दुःख -खेद क. -वाटणें. -ful *a*. दुःखी, दिलगीर, खेदयुक्त; producing sorrow दुःखाचा, दुःखदायक -प्रद (accident); expressing grief दुःखसूचक -दर्शक.—Sorry *a*. दुःखी, खिन्न, कष्टी, श्रमी; melancholy उदास, भणभणीत; poor किलवाणा, नाकारा (excuse, grain); to be s. दुःख वाटणें; पश्चात्ताप होणें; s. article नासकें केंणें *n*, दमडीच्या मोलाचा.

Sort (*sors*, *sortis*, a lot) a kind जात *f*; manner रीत *f*, तऱ्हा *f*; degree of any quality प्रत *f*; pair जोड; *pl*. [*Print*. letters, points, marks, &c., that are either deficient or redundant in quantity].—*v*. प्रत लावणें; निवडणें, वेचणें; conjoin जोडणें, रचणें [out, with].—*i*. जमणें, जुळणें; have success सिद्धीस जाणें, यश येणें.

Sot* दारूबाज, कैफी, अमली, छाकटा.

Soul*, the spiritual, rational, immortal

part in man आत्मा, जीव, प्राण seat of real life or vitality जीव, चैतन्य *n*; energy जीव, तेज *n*, हिय्या, पाणी *n*; the leader पुढारी, प्रमुख; a human being जीव, मनुष्य; a disembodied spirit विदेही आत्मा; knowledge of s. आत्मज्ञान *n*; the whole s. सर्वात्मा, सर्वभाव, जीवभाव.

SOUND* *a.* entire धड, अव्यंग, निकोप, अभंग, साबीत; healthy निरोगी, धडाखडा; firm बळकट, खबरदार, मजबूत; founded in truth बरोबर, समर्पक, सयुक्तिक, न्यायाचा (argument, reasoning); heavy भारी, जबर (strokes, beating); fast गाढ, गरद, भारी (sleep); founded in right and law यथान्याय, रास्त (justice); without blemish निर्दोष, निखोड, बिनचूक (words); orthodox खऱ्या मार्गाचा, सत्पथवर्त्ती, यथाशास्त्र. -LY *ad.* मनापासून; गाढ, गरद; रगडून, कचकावून. -NESS निरोगीपणा; मजबुती *f*, साबुती *f*; सत्पथ; सत्पथानुसरण *n*; जीव, बळकटी *f*, ऐवज; गाढपणा, निबिडपणा, निबिडता *f*; निखोडपणा, निर्दोषत्व *n*.

SOUND*, the air-bladder of a fish भोत *n*.

SOUND*, the cuttle-fish समुद्रफेण.

SOUND* उथळ -अरुंद सामुद्रधुनी *f*.—*v.* तळ -पाणी मोजणें; test मन पाहणें, पुसून -खडा टाकून पाहणें.—*i.* गळानें -गळ टाकून तळ पाहणें.

SOUND (*sonus*, noise) नाद, आवाज, ध्वनि, शब्द; empty noise पोकळ आवाज; deep s. गंभीरनाद; prolonged s. दीर्घनाद; confused s. कलकल *f*, कलकलाट.—*v. i.* आवाज होणें, वाजणें; ध्वनि क.; be conveyed in sound गाजणें, वाजणें (1 Thes. i. 8).—*t.* वाजवणें, आवाज काढणें; utter audibly ऐकूं येईसें बोलणें (a note); order by sound आवाज करून (तुतारी -करणा वगैरे वाजवून) हुकूम देणें (a retreat); celebrate by sounds गाजविणें, डंका वाजविणें (one's name or deeds). -ING *a.* वाजवणारा, सनाद.

BOARD [a board or structure with a flat surface, suspended behind or over a pulpit to give distinctness and effect to a speaker's voice].

SOUP *F.* मास वगैरेचा रसा, 'सूप' *n*, सूप *n* (*Sanskr.*)

SOUR* *a.* acid अंबट; rancid खवट, खवचट peevish दाष्ट, खटयाळ, तुसडा; expressing discontent हिमटा, हिमट.—*v.* अंबट क.; खट्टु क.—*v. i.* अंबट होणें (the teeth or palate); अंबणें, खट्टु होणें.

SOURCE (*surgere*, to spring up) उगम, उद्भव, मूल *n*, झरा, खाण *f*, आगर *f*, घर *n*; a spring झरा.

SOUSE *v. F.* डुबकन डुबविणें [in].—*i.* झडप घालणें.

SOUTH* दक्षिण दिशा *f*, दक्षिण *f*; दक्षिणे कडचा देश, दक्षिण *f*.—*a.* दक्षिण दिशेचा, दक्षिणे कडचा, दक्षिण.—*v. i.* दक्षिणेकडे फिरणें -जाणें; पूर्वेपासून किंवा पश्चिमेपासून दक्षिणेकडे फिरणें, दक्षिणायन होणें; to come to the meridian मध्यान्हीस येणें;—said chiefly of the moon.—*ad.* दक्षिणेकडे, दक्षिणाभिमुख. -EAST आग्नेयी *f*, आग्नेयी दिशा *f*. -EASTERLY, EASTERN *a.* आग्नेयी दिशेचा -कडचा. -ERLINESS दक्षिणाभिमुखता *f*. -ERLY, -ERN *a.* दक्षिणेचा; दक्षिणेकडचा; दक्षिणेकडून येणारा. -ERNLY *ad.* दक्षिणेकडे. -ERNMOST *a.* फार दूर, दक्षिणेकडचा. -ERNWOOD दवणा. -WARD *ad.* दक्षिणेकडे. -WEST नैर्ऋति *f*.—*a.* नैर्ऋतीचा.

SOVEREIGN *a.* (*super*, above) chief मुख्य, प्रधान, सर, श्रेष्ठ; utmost पराकाष्ठेचा, महा, परम (influence).—*n.* प्रभु राजा किंवा राणी *f*; दाहा रुपयांच्या किमतीचें सोन्याचें नाणें आहे. -TY मुख्य सत्ता *f* -अधिकार.

Sow* (*Skr. sukar*) डुकरीण *f*.

Sow* *v.* scatter, as seed, upon the earth पेरणें; spread abroad पेरणें, फैलावणें; besprinkle शिंपडणें. -ER पेरणारा.

SPACE (*spatium*, room) जागा *f*; interval अंतर *n*, अवकाश; quantity of time मुद्दत *f*, कालावधि, कालमर्यादा *f*, अवधि *m f*; distance between lines ओळीच्या मधलें अंतर *n*, 'इस्पेस.'—SPACIOUS *a*. ऐसपैस, अघळपघळ; पसरट, अफाट, लांबरुंद (plain).

SPADE* खोरें *n*, कुदळ *f*.

SPAN*, the space from the end of the thumb to the end of the little finger when extended वीत *f*; brief portion of time अल्पकाल.—*v*. वितीनें मोजणें [round].

SPANCEL *Ger*. a rope to tie a cow's hind legs भाला *f*.

SPANGLE *Ger*. चमकी *f*, टिकली *f*.—*v*. चमक्या -टिकल्या लावणें -जडणें [with].

SPANIEL *F*. शिकारी कुत्रा.

SPANISH *a*. स्पेन देशांतला.—*n*. स्पेन देशांतील लोकांची भाषा *f*.

SPAR *D*. सोट, सोटा; बडगा; वासा इ०.

SPAR*—calcarious सफेद सुरमा; crystalized mineral बिलोर *n*.

SPAR* *v. i*. fight with prelusive strokes हातफळी खेळणें -चालणें; dispute भांडणें, वाद क. [with, at].

SPARE* *v*. use frugally हात राखून -आवरून खर्चणें -खर्च क.; part with reluctantly नाखुशीनें देणें -सोडणें; dispense with देणें; forbear सोडणें, माफ क.; treat tenderly दयेनें वागविणें; save राखणें, रक्षण क. [from].—*a*. scanty थोडा, अपुरा; superfluous फालतु, अत्रब, शिलकीचा; lean रोडका, कृश (men).—SPARING *a*. हात राखून खर्च करणारा, काटकसऱ्या; थोडा, in comp. अल्प, मित (diet); कांहीं, थोडा.

SPARK*, small particle of fire ठिणगी *f*, थिंगळी *f*; a sparkle चमकी *f*; gay man नट, नटवा, छानछोक; lover सोयरा, यार; a small portion कण, लेश.—SPARKLE *v. i*. ठिणग्या निघणें; झगझगणें, लखलखणें, चमकणें [with].—*n*. चमकी *f*.—SPARKLING *a*. झकझकीत, लखलखीत.

SPARROW* चिमणा, चिमणी *f*.

SPASM (*Gr. spaein*, to draw) पेटका, गोळा, बेडकी *f*, वळ. -ODIC *a*. बेडक्यांचा, गोळ्यांचा.

SPATTER *v*. (See SPIT) sprinkle शिंपडणें; defame कलंक लावणें [about].

SPAVIN *F*. घोड्याच्या पायावरचें वारूळ *n*.

SPAN* मांशाचीं अंडीं *n pl*; अंडीं घालणें -टाकणें *n*.

SPAR *D*. a long beam कडी *f*, खांड *n*, सर; *Naut*. डोलकाठी *f*, वगैरे.

SPEAK* *v. i*. express thoughts by words बोलणें, ह्मणणें, उच्चारणें; express opinions मत दर्शविणें, बोलणें; dispute बोलणें, वाद क., भांडणें; utter thoughts in a public assembly सभेंत बोलणें; make mention सांगणें, उल्लेख काढणें; sound नाद क., वाजवणें: make all your trumpets s.; with बोलणें, संभाषण क.; to s. quickly चुरचुर बोलणें.—*t*. बोलणें, तोंडावाटें काढणें, उच्चारणें; celebrate प्रसिद्ध क., गाजविणें (deeds); converse in बोलणें: to s. Latin; address बोलणें: he will s. thee fair; exhibit दाखविणें: let heavens wide circuit s. the Maker's high magnificence; express silently or by signs खुणांनीं दाखविणें, खुणावणें; communicate देणें, बोलणें: to s. peace to the troubled soul [to, of, about]. -ER बोलणारा; वक्ता; one who is the mouthpiece of others दुसऱ्याच्या वाटचा बोलणारा, मुख *n*. -ING बोलणें *n*.—SPEECH वाणी *f*, वाचा *f*; language भाषा *f*, बोली *f*; harangue अलंकारिक भाषण *n*, सभापांडित्य *n*; cleverness of s. वाग्चातुर्य *n*; elegance of s. शब्दलालित्य *n*; covert s. व्याजोक्ति *f*; bad s. दुरुक्ति *f*, दुर्भाषण *n*;

goddess of s. सरस्वति *f*, वाग्देवी *f*; part of s. *Gram.* शब्द. -LESS *a.* मुका, मोना, वाचाहीन; silent कुंठित, निरुत्तर.

SPEAR*, lance भाला, बरची *f*, शूल; spire सुळक्याचें शिखर *n*.—*v.* भाला मारणें -भोसकणें [with].—*i.* सुळक्या प्रमाणें वर येणें. कोंब फुटणें. -HEAD भाल्याची फाळ *f*. -MAN भालेकरी, शूलपाणी. -STAFF भालकाठी *f*.

SPECIAL *a.* (*species*, kind) जातीचा, प्रकारचा; particular विशेष, असाधारण; designed for a particular purpose मुद्दामचा, मुजरतचा, विशेष (an act of Parliament); limited मर्यादित, विशेष कारणाचा -विषयाचा (dictionary); chief in excellence उत्कृष्ट, लोकोत्तर. -LY *ad.* विशेषेंकरून, मुद्दाम, मुजरत. -ITY जातीयता *f*, जातित्व *n*; विशेषता *f*. असाधारणत्व *n*.—SPECIES जात *f*, प्रकार.—SPECIE सोनेंनाणें *n*, नगदी ऐवज.—SPECIFY *v.* तपशीलवार सांगणें -बोलणें -लिहिणें, प्रदर्शित क.—SPECIFIC *a.* विशेष, असाधारण; विशेष जातीचा; *Med.* हुकमी, हटकून -अवश्य गुण करणारा, अचूक; a s. medicine रामबाण; s. gravity विशेष गुरुत्व *n*.—*n.* उत्तम -हटकून गुण आणणारें औषध *n*.—SPECIMEN (*specere*, to look) मासला, नमुना, बानगी *f*.—SPECIOUS *a.* showy देखणाऊ, दर्शनी; plausible देखणाऊ, वरपंकी, वरघडीचा, सत्याभासाचा; s. argument लाघवी भाषण *n*.

SPECK*, spot ठिपका, डाग; very small thing कण;—in the eye फूल *n*.—SPECKLE *v.* ठिपका -डाग पडणें [with]. -LED *a.* ठिपकेदार, चित्रविचित्र.

SPECTACLE (*specere*, to behold) show तमाशा, खेळ, चमत्कार; *pl.* glasses to assist the sight उपनेत्र *n*, चश्मा; a sight पाहण्याचा पदार्थ, दृष्टिविषय.—SPECTATOR मौज पाहणारा, तमासगीर; beholder पाहणारा, द्रष्टा.—SPECTRE भूत *n*, प्रेत *n*, छाया *f*.—SPECTRUM *L.* दृश्यवस्तु *f*; [*Opt.*, the several colored and other rays of which light is composed, separated by the refraction of a prism or other means, and exhibited either as spread out on a screen or by direct vision].

SPECULATE *v.* (do.) contemplate तर्क-कल्पना क.; *Com.*, traffic with a view to great profit उलेंढालें -व्यापार उदीम क. [in, on].—SPECULATION तर्क, कल्पना *f*; उलेंढालें *n*.—SPECULATIVE *a.* विचारशील, मननशील; imaginary काल्पनिक, मानसिक; उल्याढाल्याचा, उलेंढालें करणारा.—SPECULATOR उलेंढालें करणारा, खटपट्या; कल्पक, परिकल्पक.

SPEECH, See under SPEAK.

SPEED* *v. i.* make haste त्वरा क.; prosper यश पावणें, चालणें.—*t.* त्वरा करवणें; hasten to a conclusion घाईनें शेवटास नेणें; kill ठार क. -मारणें.—*n.* त्वरा *f*, वेग; जलदी *f*, शिताबी, झटपट *f*; सिद्धि *f*, यश *n*.—SPEEDY *a.* त्वरित, शीघ्रगति; जलदीचा, त्वरेचा.

SPELL*, charm मंत्र, भारणी *f*; brief period अल्पकाळ, चुटका, त्रुटि *f*.—*v.* शब्दाचे वर्ण जोडणें; read वाचणें; मंत्र घालणें, भारणें [over]. -ING वर्णरचना *f* -न्यास.

SPEND* *v.* lay out खर्चणें; waste उडवणें, उधळणें, फत्रा क.; pass, as time काढणें, घालवणें, नेणें, खर्चणें; wear away भागवणें, शिगवणें [on, upon, for].—*i.* खर्चणें, खर्च क.; खपणें, उडणें, होणें. -THRIFT उडाऊ, दिवाळखोर.

SPERM (*sperma*) animal seed धात *f*, वीर्य *n*, शुक्र *n*; spawn माशाचीं अंडीं *n pl.* -ATIC *a.* धातीचा, शुक्राचा. -ATOCELL *Med.* a swelling of the spermatic vessel भेरगा, भेलगा.

SPHERE (*sphera*) globe गोल, वर्तुल *n*; province विषय, प्रकरण *n*, इलाखा; employment काम *n*; circuit of action, knowledge, or influence टप्पा, पोंच *f*, अटोका.—SPHERICAL

a. गोल, वाटोळा, वर्तुलाकार (body); गोलाचा, वर्तुलाचा; planetary ग्रहाचा.—SPHERICS, doctrine of the spheres गोलाध्याय, गोलशास्त्र *n.*—SPHEROID, body like a sphere गोलकल्प; oblate s. चपटगोल; prolate s. अंडाकारगोल, अंडगोल. -AL *a.* गोलकल्प, गोलप्राय.—SPHERULE लघुगोल, सूक्ष्मगोल; सूक्ष्मगोल कण, बारीक गोळा -गोळी *f.*

SPICE (*species*) मसाला; fig. धुणुक *f*, चुणुक *f.*—*v.* मसाला घालणें, चणचणीत क.—SPICY *a.* मसाल्याचा; मसालेदार, खमखमीत, खमंग.

SPIDER *D.* कांतीण *f*, कोळी, सुतेरा.

SPIKE (*spica*, a point) a sort of large nail खिळा, खीळ *f*, मेख *f*; an ear of corn कणीस *n*; a shoot कोंब.—as of a plantain tree मोना;—as of a top, goad, &c. आर *f*, आरी *f.*—*v.* खिळा मारणें -ठोकणें; खिळे बसविणें, खिळा मारून भोंक -तोंड बंद क.: to s. cannon. -NARD, an aromatic plant जटामांसी *f*; a fragrant essential oil नार्द *n.*

SPILL* *v.* suffer to fall or run out सांडणें, गाळणें, ओघळविणें; shed सांडणें, पाडणें, वाहवणें;—through shaking हिसळणें, उचंबळणें;—through turning over लवंडणें. —*i.* सांडणें, लवंडणें, गळणें इ०.

SPIN* *v.* draw out and twist into threads कांतणें, सूत काढणें; whirl चक्रावर धरणें, गरगरा फिरवणें (a top); spend by delays रेंगणें, रेंगत गमावणें: to s. out the day in idleness; shape as metal, by revolving as in a lathe, and pressing against it with a roller or hand-tool चरकावर धरणें, चरकावर धरून डौल देणें [round, about].—*i.* सूत काढणें; भोवणें, फिरणें; issue in a thread or small current तार निघणें; बारीक धार -चिरकांडी उडणें. -DLE चाती *f*, चात *n*; the tip or end of a plough which receives the plough नांगरखुंट *n.* -SHANKED, -SHANKS *a.* लांबटांग्या. -TREE मालकंगणी *f.* -NER सूत कांतणारा. -NING-WHEEL चरकी *f*, चरक; -STER सूत कांतणारीण *f*; *Law*, अविवाहित स्त्री *f.*

SPINE (*spina*) backbone पाठीचा कणा -दांडा; thorn कांटा; shin पायाचे पुढची नळी *f*, नडगें *n*; ridge कड *f*, कांठ.—SPINAL *a.* पाठीचे कण्याचा.

SPIRE (*spira*) winding line नागमोड *f*; steeple सुळका, शिखर *n*, कळस; blade of grass पात *n*;—of flame अग्निशिखा *f*, जोत *f.*

SPIRIT (*spirare*, to breathe) श्वास; life जीव, प्राण; soul आत्मा; energy पाणी *n*, हिमत *f*, रग *f*, धमक *f*; human soul after it has left the body कुडींतून निघालेला -विदेही आत्मा, आत्मा; a ghost भूत *n*, पिशाच *n*, प्रेत *n*; one who is lively जिवट, चपळ; disposition of the mind स्वभाव, प्रकृति *f*; mettle उत्साह, अवसान *n*, जीव, पाणी *n*; alcohol *f*, दारू *f*, मद्य *n*; liquid produced by distillation अर्क, आसव *n*; real meaning अर्थ, आशय, भावार्थ; Holy S. *Theol.* the Spirit of God, or the Third Person of the Trinity पवित्र आत्मा; rectified s. मद्यार्क; the Supreme S. परमात्मा; that is in good *spirits* रंगेल, रंगेला, खुशमर्जी; that is in low *spirits* दिलगीर, खिन्न; proof s. मंद मद्यार्क; s. of the times युगधर्म. -ED हिमतदार; तलख, रगदार इ०; स्वभावाचा, प्रकृतीचा, बुद्धीचा इ०, in comp. स्वभाव (उग्र स्वभाव). -LESS *a.* उदास, खिन्न; मेणचट, निर्वीर्य; dead मेलेला, मृत. -UAL *a.* अमूर्त्त, निराकार (being); not temporal धर्मकृत्याचा -प्रकरणाचा (functions); mental मानसिक, आत्मिक; pertaining to the moral feelings आत्मसंबंधी, आधिदैविक; proceeding from the Holy Spirit पवित्रआत्म्याचा; pure शुद्ध; divine ईश्वरी, दिव्य; s. mani-

festation of the Deity आत्मसाक्षात्कार; holy पवित्र, पारमार्थिक. -ITY अमूर्ति *f*, निराकारपणा, आत्मस्वरूपता *f*; परमार्थिकपणा, वैराग्य *n*; empty assumption of s. कोरडें वैराग्य *n*. —SPIRITUOUS *a*. जलाल, तीव्र, जालीम; tenuous बारीक, पातळ, सूक्ष्म.

SPIT *D*. iron prong on which meat is roasted मास भाजण्याची लोखंडी शीग *f*, शूल, सुळा; saliva थुंकी *f*, पींक.—*v*. सुळावर घालणें, गोवणें; थुंकणें [with].—*i*. थुकणें, थुंकी टाकणें; तडतडणें; rain शिंतोडणें, थुईथुई येणें [out, forth, at, on]. -BOX पिगदाणी *f*. -TLE थुंका, थुंकी *f*.

SPITE *D*. दावा, अकस [against].—*v*. अकसानें -चुरसीनें -मनोभंग क. -FUL *a*. अकसखोर, दावेदार, खुनसी.

SPLASH *v*. *D*. शिंतोडे उडविणें [about].—*i*. हिसळणें, उसळणें.

SPLEEN (*splen*) the milt पाणथरी *f*, तिल्ली *f*; anger राग; fit of anger रागाचा झटका, तैष. —SPLENETIC *a*. चिरडखोर.—SPLENIC *a*. प्लिहा संबंधी, पाणथरीचा.

SPLENDENT *a*. (*splendere*, to shine) तेजस्वी, तेजोमय.—SPLENDID *a*. शोभिवंत, कांतिमान, तेजोमय; grand शोभिवंत, भव्य, फक्कड, छानदार, बादशाही, मोठा (palace); heroic शौर्याचा, प्रतापाचा (victory).—SPLENDOR कांति *f*, तेज *n*; शोभा *f*, थाटमाट.

SPLICE *v*. *D*. गांठ दिल्यावांचून जोडणें, सांधणें.

SPLINTER *Ger*. a piece split off ढलपा, कपचा; *Surg*. भाली *f*, सांपळी *f*;—as entered into the flesh हीर, सराटा, सल *n*.

SPLIT *v*. *D*. cleave चिरणें, फाडणें, विदारणें; break into parts, as by discord फूट क., बिघाड पाडणें.—*i*. चिरणें, फाटणें; उखळणें, तडकणें.—*p*. *a*. चिरलेला, फोडींव, विदारित; —as reeds, sticks पिचका, पिंजट.—*n*. चीर *f*, फूट, भेग *f*, तडा.

SPOIL *v*. (*spoliare*) plunder, लुटणें; seize by violence जबरीनें घेणें; corrupt बिघडणें, नाश क.;—as children लाडकावणें.—*i*. लूट क.; बिघडणें, नासणें.—*n*. लूट *f*; slough of a serpent कांत *f*, भेंग *f*. -ER लुटणारा; बिघडणारा, नाशकरणारा.

SPOKE* चाकाची आर *f*, आरी *f*.

SPOKESMAN (See SPEAK) बोलणारा, मोहोरपी.

SPONGE*, a porous or fibrous substance, regarded as of the nature of a compound animal, found adhering to rocks, shells, &c., under water 'इस्पंज.'—*v*. स्पंजानें पुसणें -पुसून टाकणें; स्पंजानें साफ क. [off].—SPONGER परान्नरुचि -जीवी, परभाग्योपजीवी, उंडीबकाल, तेलंगभट.

SPONSOR (*spondere*, to engage one's self) surety जामीन; a god-father or godmother धर्मपिता किंवा माता *f* [for].

SPONTANEOUS *a*. (*sponte*, of free will) आत्मसंतोषाचा, स्वसंतोषाचा; produced without human labor सहज उत्पन्न, सहज (growth of wood); proceeding from internal impulse स्वाभाविक, स्वतःसिद्ध, स्वय (motion). -LY *ad*. आपखुशीनें; आपोआप, एःहवी.—SPONTANEITY आपखुशी *f*, स्वसंतोष.

SPOOL *D*.—of a weaver गणा, सूतकाडी *f*.

SPOON* चमचा, पळी *f*. -FUL *a*. चमचाभर. -MEAL चमच्यानें खाण्याचें अन्न *n*.

SPORT *Ger*. play खेळ, लीला *f*, क्रीडा *f*, मौज *f*; mockery थट्टा *f*, मस्करी *f*; game शिकार *f*.—*v*. *i*. खेळणें, रमणें; पारध क.; trifle खेळणें, गमणें, माशा मारीत बसणें [with]. -ER खेळ करणारा, कौतुकी, खिलाडू; पारधी. -FUL *a*. मौजी, खेळकर; थट्टेनें केलेला, क्रीडेचा, थट्टेचा (productions). -IVE *a*. मौजी, खेळकर, खिलाडू. -SMAN शिकारी, पारधी.

SPOT *D*. speck डाग, ठिपका; blemish डाग, कलंक; place स्थळ *n*, जागा *f*, स्थान *n*; small part of a different color from the

ground upon which it is ठिपका, बिबट *n.*; —on the body लासें *n*, डाग, ठिकें *n*; upon the s. जागचे जागीं.—*v.* डाग -ठिपके पाडणें; बट्टा लावणें [with]. -LESS *a.* निष्कलंक, निर्दोष. -TED, -TY *a.* ठिपके पाडलेला, ठिपक्यांचा, चित्रविचित्र, बुट्टेदार.

SPOUSE (*sponsus, sponsa*) नवरा किंवा बायको *f.*

SPOUT *D.* pipe नळी *f*, पन्हळ *f*; projecting mouth of a vessel तोंटी *f*; waterspout धोधाना, झोत *f.*—*v.* चिरकांडी उडवणें, फवारा टाकणें; mouth तोंड सोडणें, डौलानें बोलणें [out, up].—*i.* भळभळ सुटणें -वाहणें; डौलानें बोलणें.

SPRAIN *v.* (See EXPRESS) लचकणें.—*n.* लचक *f*, उसण *f.*

SPRAWN *v. i. D.* lie with the limbs stretched out हातपाय पसरून पडणें -निजणें, पाय खोडणें; spread irregularly, as vines, plants, or trees वांकडातिकडा पसरणें -फैलावणें; move when lying down लोळणें, गडबडा लोळणें.

SPRAG*, twig डाहळी *f*, टहाळी *f*; water flying in small particles शिंतोडा, तुषार, तुसार, फवारा.

SPREAD* *v.* extend पसरणें, फैलावणें, विस्तारणें; extend so as to cover something अंथरणें, पसरणें, टाकणें; divulge प्रगट क., फोडणें; propagate फैलावणें, पसरणें (a disease); emit सोडणें (fragrance); disperse पसरणें, विखरणें (manure); prepare मांडणें (पानें टाकणें -वाढणें), मेज घालणें, तयार क. (table) [out, over].—*i.* पसरणें, फैलावणें; —as an ulcer चरणें;—as branches, horns, &c. फांकणें;—report, &c. पसरणें, लांबणें; —as odors सुटणें, भडकणें.—*n.* विस्तार, फैलावा, पसारा, प्रसार.

SPRIG*, twig डाहळी *f*; lad पोर.

SPRIGHTLY *a.* (See SPIRIT) आनंदी, उल्लासी, आल्हादी.

SPRING* *v. i.* leap उडी मारणें; issue with speed and violence उसळणें, उडणें, जोरानें निघणें; start suddenly from a covert झडप -झेंप मारणें -घालणें; fly back उसळणें, उलटणें; bend वांकणें; shoot up फुटणें, उगवणें, निघणें; grow रुजणें, वाढणें; at उडणें, -वर उडी टाकणें; forth उडी टाकणें; in घुसणें, शिरणें; on, upon झडपणें, झडप टाकणें [out, back, forth, up, off, over, at, on, upon].—*t.* उडविणें;—a mine उडवणें; cause to open उघडणें, फोडणें; split चिरणें (mast); cause to close suddenly एकाएकी बंद क., मिटणें; bend वांकविणें; to s. a leak जहाजास गळती लागणें, झरा लागणें.—*n.* उडी *f*, उसळी *f*; elastic power लवचीकपणा; elastic body कळ *f*, कमान *f*; fountain झरा; origin झरा *f*, खाण *f*, जिव्हाळा; cause मूळ, झरा, उगम; vernal season वसंतऋतु, वसंत; the celebration of the return of s. वसंतोत्सव. -TIDE समुद्राची मोठी भरती *f*, उधान *n.*

SPRINKLE* *v.* scatter in drops शिंपणें, शिंपडणें; wash धुणें; purify शुद्ध -स्वच्छ क.—*i.* शिंपडणें, शिंतोडा टाकणें;—as rain थुई थुई पडणें.—*n.* शिडकाव, शिंतोडा.—SPRINKLING शिंपणें *n*, सिंचन *n*, प्रोक्षण *n*; शिंतोडा, छाटे *pl.*

SPRITE (See SPIRIT) भूत *n*, प्रेत *n*, छाया *f.*

SPROUT* *v. i.* shoot अंकुर फुटणें, मोड येणें; shoot into ramifications फांद्या फुटणें; grow वाढणें [out].—*n.* अंकुर, कोंब; scarcely evolved shoot डिरी *f*, बोंखरी, आंकरी *f.*

SPRUCE *a. Ger.* चाकचोप, लकलकीत, साखसुरत.

SPUR*, instrument having a rowel or little wheel, with sharp points, worn on a horseman's heels to prick a horse in order to hasten its speed आर *f*, कांटा; incitement उचल *f*, उत्तेजन *n*;—of a cock नांगी *f*, नखी *f.*—*v.* आर टोचणें; उत्तेजन देणें, पेटवणें, चेतवणें; कांटा चढवणें -लावणें: a *spurred* boot [upon, on].

SPURIOUS *a.* (*spurius*) not genuine खोटा नकली; adulterate भेळीचा, मिसळीचा; bastard रांडेचा, पोटकरणीचा.

SPURN* *v.* reject with disdain धिक्कारणें, झिडकावून टाकणें; kick लात मारणें [from].—*n.* धिक्कार, तिरस्कार, छी *f*, थू *f*.

SPURT, See SPRIT.

SPUTTER (See SPOUT) spit, as in rapid speaking लवकर बोलतांना बोलण्यांत थुंका उडवणें; fly off in particles तिडतिडणें, तटतटणें.

SPY (See ESPY) हेर, बातमीदार, गुप्तदूत [on].—*v.* हेरणें, पाहणें, हेरून काढणें [out].—*i.* पाहणें हेरणें.

SQUABBLE *v. i. Sw.* भांडणें, कलागत -कटकट क.—*n.* कटकट *f*, कलागत *f*.

SQUALID *a.* (*squalere*, to be foul) हिडीस, ओंगळ, बुरसा.

SQUALL *v. i. Sw.* टाहो फोडणें, किंकाळी मारणें [out].—*n.* टाहो, किंकाळी *f*; s sudden and violent gust of wind वाऱ्याचा झटका झपाटा, घुगी *f*.

SQUANDER *v. Ger.* उधळणें, उडवणें, फुंकणें, दवडणें [away]. -ER उधळ्या, उडाऊ.

SQUARE *a.* (*quadra*) having four equal sides and four right angles समचतुष्कोन, चौकोनी; just नीट, खरा, बराबर; even बराबर: to make the account s. तोंड मिळवणें; *squaring* an account खातेमिळवणी *f*; s. root वर्गमूळ *n*.—*n.* चौकोन, समचतुष्कोन; a square piece चौरस तुकडा, चौकट *f*; a pane of glass भिंग *n*, तावदान *n*; area of four sides चौक; an instrument for forming angles गुणा, काटकोना;—of troops कोट; *Geom.* मूळ *n*, वर्ग;—as in tables of figures कोष्टक *n*, घर *n*;—as on cloth चौकडी *f*.—*v.* चौकोनी -चौरस क., चौपाटणें; वर्ग -द्वीघात क.; turn squarely, as in dislike, anger रागानें -रुसून -कंटाळून फिरवणें, मुरडणें (shoulders); adjust सुधारणें, तोडणें, मिळवणें, बसवणें (account).—*i.* मिळणें, जमणें; at बकरकुदीवर येणें.

SQUASH *v. F.* चेंदणें, चेंदमेदा क.—*n.* रेबडी *f*, शेणसडा, शेण *n*.—SQUASHY *a.* गलगलीत, बिलबिलीत.

SQUAT *v. i. It.* उकडवा बसणें [on].—*a.* उकडवा; चपटा, चापट, थबकट, बसका;—the nose चपटा, फेंदरा.—*n.* उकडवा बसणें *n*, उकडूमांडी *f*. ?

SQUEAK, SQUEAL *v. i. Sw.* किंकाळी फोडणें, किंकळणें.

SQUEAMISH *a.* (See QUALMISH) मळमळ सुटलेला; fastidious चोखनळ, खंतखोर; easily disgusted तिरस्कारी.

SQUEEZE* *v.* press between two bodies चेंगरणें, चिरडणें; oppress जाचणें, गांजणें, तेल काढणें; force between close bodies जोरानें शिरकवणें -घालणें; out पिळून काढणें -घेणें; crush कुसकुरणें, चिवडणें [with].—*i.* खेटून -दाटून जाणें, दाटणें.—*n.* चेंचणी *f*, चेंचणें *n*, चिरडा.

SQUIB, *Eng.* फटाकडी *f*.

SQUILL (*squilla*) रानकांदा.

SQUINANCY (*synanche*) See, QUINCY.

SQUINT *a. D.* तिरवा -का पाहणारा, काणा.—*v. i.* तिरवें पाहणें [at].—*n.* तिरकें पाहणें *n*, काणी नजर *f*. -EYED *a.* काणा.

SQUIRE, See ESQUIRE.

SQUIRREL (*Gr. skia*, shade, *oura*, tail) खडी *f*, खार *f*; flying s. पंख्या.

SQUIRT *v. Ger.* पिचकारी मारणें -सोडणें [out, at].—*n.* चिरकांडी *f*, पिचकारी *f*, चिपनळी *f*, पिचकारी *f*.

STAB *v. Ger.* pierce with a pointed weapon भोंसकणें, ढुसणें; kill by the thrust of a pointed instrument सुरी वगैरेनें भोंसकून ठार मारणें; injure secretly or by slander अब्रू-

वर गुप्त घाला घालणें (reputation.)—*i.* दुसणें, दुसणी मारणें [at, with].—*n.* दुसकी *f*, दुसणी *f*; wound with a sharp pointed weapon भोसका.

STABLE *a.* (*stare*, to stand) fixed मजबूत, बळकट, खंबीर; durable टिकाऊ; constant स्थिर, धीर.—*n.* तबेला, पागा *f*, अश्वशाला *f*. -BOY मोतद्दार, पोरगा.—STABILITY मजबुती *f*, बळकटी *f*; टिकाऊपणा; स्थिरता *f*, धैर्य *n*.

STACK *D.* गंज, गंजी *f*, उडवी *f*;—of corn with the ears सुडी *f*;—of kadabá, grass वळई *f*.—*v.* गंज क. -रचणें; उडवी रचणें -घालणें; [s. of arms, *Mil.*, a number of muskets set up together, with the bayonets crossing one another, forming a sort of conical pile].

STAFF*, long piece of wood सोटा, सोडगा, दांडा; stick used in walking काठी *f*, दंड; pole borne as an ensign of authority छडी *f*, काठी *f*, वेत्र, वेत;—as of a flag, &c. काठी *f*, दांडा; [*Mil.*, an establishment of officers in various departments attached to an army, or to the commander of an army]; a corps of executive officers connected with some large establishment, who act in carrying out its designs कारभारी मंडळ *n*, कामदार मंडळी *f*: a newspaper has its editorial and reporting s.

STAG *Icel.* काळवीट.

STAGE *F.* raised floor मंचक, माळा;—of the theatre रंगभूमि *f* -शाला *f*, भूमिका *f*; drama नाटक *n*; distance between two places of rest on a road मजल *f*, टप्पा; degree of advancement in a journey मजल *f*; step of a process मजल *f*, पर्याय, ठेप *f*; station डांक *f*, चौकी *f*, टप्पा; *stage*-coach डांकेची गाडी *f*. -COACH डांकेची गाडी *f*. -PLAYER सोंगाडी, नाटकी.

STAGGER *v. i. D.* reel झोंके खाणें, झुकत चालणें; cease to stand firm डगमगणें, डळमळणें; hesitate संशय धरणें, नानूं कांकूं क., आशंकणें, डगणें [about, in, off, by].—*t.* झोंके खाववणें; विचार करायास लावणें, मनांत शंका उत्पन्न क.

STAGNANT *a.* (*stagnum*, a piece of standing water) कोंडलेला, जमलेला, सांठलेला (lake); dull मंद.—STAGNATE *v. i.* स्थिर होणें, गति खुंटणें; मंद होणें, मंदावणें: commerce *stagnates*.

STAIN *v.* (*tingere*, to tinge) blot डाग पाडणें; tinge रंग भरणें -देणें; impress with figures in colors different from the ground छाप मारणें, छिटुकणें इ०; tarnish बट्टा -कलंक लावणें; cause to seem inferior by comparison तुलना करून उणा आहेसा भासविणें-दाखविणें [with].—*n.* डाग, ठिपका; रंग; रंगाचा छिटका, छाप इ०; बट्टा, कलंक, डाग.

STAIR*, one step of a series पायरी *f*; *pl.* series of steps जिना, दादर; below s. खालच्या मजल्यांत, खालीं; flight of s. जिना, शिडी *f*; up s. माडीवर, वर.

STAKE*, post fixed in the ground खुंट, खुंटा, डांभा, मेख *f*;—for impaling criminals शूल; a pledge पण, पैज *f*;—at dice, &c. वळती *f*; piece of timber bifurcated मेढ *f*; to fasten to a s. मेखलणें, डांभणें; to be at s. पैज असणें; -वर असणें: my life is at s. प्राणावरची गोष्ट आहे.—*v.* खुंटा -मेख मारणें -पुरणें; पण घालणें -मांडणें.

STALE *a. Ger.* vapid from age फिका, पाणचट (beer); not new शिळा, बासा (bread); worn out जीर्ण; trite उष्टा, उच्छिष्ट.

STALE* *v. i.* मुतणें;—said of horses and cattle.

STALK* *v. i.* walk with high and proud steps उताणा -छाती काढून चालणें; walk in a sly manner चोरून -लपून चालणें.

STALK* देंठ, डेंख, तांत; dry s. of kadbá चिपाड *n*; s. of leguminous plants कांड *n*.

STALL* (*Skr. sthal,* to stand) station ठाण *n*, ठिकाण *n*; stable ठाण *n*, गोथळ *f*, गोठा, गुरें बांधण्याची जागा *f*; bench or shade where anything is exposed to sell दुकान *n*, चौरंग, पाल *n*, इ० [for].—*v.* गुरांस ठाणांत बांधणें; plunge into mire so as not to be able to proceed चिखलांत रुतविणें. -MAN मेणबाजारी.

STALLION* वळू घोडा.

STALWART, -WORTH* *a.* बळकट, धीट, घमशान.

STAMEN (*L.*) the filament and anther of a flower फुलांतील केंसर, पुष्पकेशर, तंतु; the male organ of flowers नरतंतु, उपकेशर; foundation पाया, आधार.—STAMIN, first principle of anything मूलतत्व *n*, बीज *n*; *pl.* whatever gives strength and solidity दम, पाणी *n*, जीव, कस *n*.

STAMMER* *v. i.* तोतरें -अडखळत -लागत बोलणें. -ER तोतरा.

STAMP *v. D.* strike downward with the foot पायानें ठोकणें -अपटणें; impress with some mark छापणें, शिक्का मारणें; form by impression छापणें, बेटणें, ठश्यानें करणें;—coins शिक्का मारणें -पाडणें [with, in, on].—*i.* भुई आपटणें, पायानें अपटणें.—*n.* ठसा, छाप, शिक्का; impression छाप, शिक्का, ठसा; form रूप *n*, आकार; postage s., receipt s. टपालची -पावतीची टिकिट *f*, 'स्टांप'; character छाप *f*, लक्षण *n*, गुण: the Bible bears the s. of a divine origin; of the right s. हाडाचा खरा; authority अधिकार, सत्ता; current value भाव, किंमत *f*, दर.

STANCH *v.* (See STAGNATE) राहविणें, थांबवणें, बंद क. (blood) [with].—*i.* बंदहोणें, राहणें.—*a.* धीर, स्थिर, मजबूत, सत्वधीर, खंबीर.

STANCHION *F., Arch.,* a piece of timber in the form of a stake used for support मोरवा.

STAND* *v.* remain at rest in an erect position उभा राहणें -असणें; rest on the feet उभा रहाणें -असणें;—continue upright उभा राहणें -असणें;—said of a tree; remain firm on a foundation उभा -खंबीर असणें (an edifice); hold a place जागीं -स्थळावर असणें, असणें: Paris *stands* on the Seine; halt उभा राहणें, थांबणें: I charge thee, s.; endure टिकणें, तगणें, राहणें. निभणें; be acquitted सुटणें, निरपराधी ठरणें: readers by whose judgment I would s. or fall; be steady स्थिर असणें, तळ -ठाण धरून राहणें (Esth. viii. 11); maintain moral rectitude सन्मार्गांत राहणें; maintain a position, order, or rank पायरी -दरजा संभाळणें: Christian charity *stands* first in the rank of gracious affections; be in some particular state असणें, स्थितींत असणें: sacrifices which *stood* only in meats and drinks; stagnate जमून -सांचून राहणें -असणें (water); *Law,* be as it is जसाचा तसा असणें; continue in force चालू असणें; appear in court कोर्टांत हजीर होणें; against अडथळा क., आडवा येणें; by जवळ उभा राहणें; तमाशा -मौज पाहत उभा असणें; हजीर असणें; एकीकडे असणें; अवमानून वगळणें -ठेवणें; धरून -चिकटून राहणें, न सोडणें: I will s. by my friend to the last; -च्या आधारावर असणें: this reply *standeth* by conjecture; fast राहणें, तळ धरणें, स्थिर -अढळ राहणें; firmly on -ची खातरी होणें; for उभा राहणें, उमेदवार असणें: how many s. for consulships; पक्षधरणें, वांटचा होणें -असणें: I s. wholly for you; दाखवणें, दर्शवणें, ठिकाणीं असणें; off दूर राहणें; मान्य -कबूल न होणें; स्नेह न जोडणें, दूर राहणें, -शीं सहवास न क.; टळटळीत -उठाव दिसणें; on एका रस्त्यावर -मार्गावर चालणें; one in लागणें, खर्च लागणें, पडणें: the coat *stands* him in ten rupees;

out बाहेर येणें, उमटणें; विरोध क., हट्टानें -दुराग्रहानें मान्य न होणें; to चिकटून -धरून असणें राहणें -बसणें; संगतवार -अनुसरून -लागून असणें: it *stands* to reason; together जमणें, मिळणें; under सोसणें, टिकणें; up उभा राहणें. उठून उभा राहणें; बोलायास -काम करायास उठणें; up for उभा राहणें, पक्ष -कैवार घेणें -धरणें; upon काळजी बाळगणें -धरणें; भिस्त बांधणें, अभिमान बाळगणें: we highly esteem and s. much upon our birth; with मिळणें, जमणें.—*t.* सोसणें, साहणें; withstand आडवें येणें, विरोध क.; admit मान्य होणें, कबूल क.:—fire शत्रूच्या गोळीच्या भडमारा खालीं टिकणें;—it आपली जागा -पक्ष मत संभाळणें -धरणें;—one's ground आपली जागा -लें ठाण संभाळणें; trial परीक्षेस -कसोटीस टिकणें -उतरणें.—*n.* ठाणें *n*, ठिकाण *n*; अड्डा, अखाडा; थांबणें *n*, तहकुबी *f*;—as for water-pots, &c. घडोंची *f*, घोडा;—for a lamp, &c. ठाणवी *f*, बसक *f*, चौकी *f*;—of a great gun फड; a small table टिवई *f*, 'स्टयांड'; to come to a s. खुंटणें, थकणें, उभा राहणें. -ARD, flag निशाण *n*, बावटा, पताक, *f*, झेंडा; rule प्रमाण, धडा; [proportion of weight of fine metal and alloy established by authority].—*a.* मोलाचें, किमतीचें; not of the dwarf kind उंच जातीचा (tree). -BEARER निशाणवाला -दार. -ING उभा राहणारा, उभा, खडा; टिकणारा, टिकाऊ; s. color पक्का रंग; stagnant सांचलेला (water); ठरलेला, काईम (rules).—*n.* उभा राहणें *n*; स्थान *n*, उभें राहाण्याची जागा *f*; टिकाव, स्थिति *f*; पदवी *f*; power to stand उभें राहण्याची शक्ति *f*; of long s. बहुत दिवसांचा. -ISH कलमदान *n*. -POINT मूळ *n*, आधार. -STILL तटस्थपणा, गतिभ्रंश.

STANZA (do.) श्लोक, कडवें *n*.

STAPLE* *a.* principal commodity of a country उदिमाचा मुख्य जिन्नस; raw material पोक्ता जिन्नस; thread of wool, cotton, &c. सूत *n*; loop of iron कोयंडा.—*a.* विशेष उदिमाचा, व्यापाराचा.

STAR* (*Skr. stri, tárá* for stárá) तारा, चांदणी *f*, नक्षत्र *n*; *Astron.* ग्रह; asterisk, as on cloth, &c. फुली *f*;—as on the forehead of a bullock, &c. चांद; fixed s. नक्षत्र *n*; falling s. उल्का *f*; falling of a s. उल्कापात; polar s. ध्रुव; s. under which one is born जन्मनक्षत्र *n*.—*v.* फुल्या -टिकल्या लावून शोभवणें. -BOARD उजवें बोडद *n*. -GAZER शकुन्या जोशी, तारे पाहून भाकीत सांगणारा. -LIGHT तारामकाश, नक्षत्रप्रभा *f*. -LESS *a.* नक्षत्रहीन (night). -RY *a.* नक्षत्रांचा, नाक्षत्र (light); नक्षत्रमय -व्याप्त; s. sky नक्षत्रमंडळ *n*; resembling stars तारा सारखा (eyes); s. host नक्षत्रगण.

STARCH *Ger.* खळ *f*, कलफ.—*v.* खळ लावणें.

STARE* *v. i.* टक लावून -डोळे पसरून पाहणें [at].

STARLING* शाळुंकी *f*, मैना *f*.

STARK *ad.* अगदीं, केवळ, शुद्ध; सळनळीत, उभा (naked).—*a.* केवळ, शुद्ध.

START *v. i. Ger.* move suddenly, as with a spring or leap, from surprise, pain, &c. डचकणें, बिचकणें; wince अंग चोरणें; begin चालू होणें, निघणें; after मागें लागणें, मागून जाणें; against विरोध क.; for उभा राहणें, उमेदवार असणें; up उसळणें, एकाएकी डचकून उठणें.—*t.* डचकविणें, चमकविणें; चालू क., वाटेस लावणें; दवडणें, पिटणें; dislocate सांधा उखळणें (a bone); produce suddenly to view पटकन पुढें आणणें, उहू काढणें -फोडणें (a subject) [at].—*n.* चमक *f*; निघणें *n*, चालणें *n*; a fancy हुक्की *f*, लहर *f*, उकळी *f*.—STARTLE *v. i.* डचकणें, बुजणें, चपापणें.—*t.* डचकवणें, बुजवणें, बिचकवणें [with, by, at].—*n.* धक्का, धडकी *f*, धडक *f*.

STARVE* *v. i.* perish or die with cold हिंवानें -थंडीनें मरणें; perish with hunger उपाशीं -उपासानें -भुकेनें मरणें; want गरज लागणें, तोटा -आभाव असणें, उणा पडणें.—*t.* उपाशीं मारणें; थंडीनें मारणें; उपाशीं मारून -अन्न-पाण्याची बंदी करून जिंकणें: to s. a garrison by surrender; deprive of force निर्बळ -बलहीन क.—STARVATION उपासमार, उपास, उपासमर *f*, उपाशीं मारणें *n*.

STATE (*status*, a standing) condition स्थिति *f*, अवस्था *f*, दशा *f*; grandeur थाट, डौल, डामडौल; ruling power or body सरकार *n*, हुजूर *n*; political body राज्य *n*, संस्थान *n*; s. paper सरकारी कागदपत्र *n*; s. affairs राजकार्य *n*, राज्यप्रकरण *n*; natural s. प्रकृति, स्वभाव; s. carriage रथ; s. trial राज्यप्रकरणी अपराध्यांची चौकशी *f*; s. prisoner सरकारी -सरकारविरुद्ध अन्याय केलेला कैदी; s. bed राजशय्या -मंचक.—*v.* सांगणें, निवेदन क. -LINESS थाट, डौल, इतमाम. -LY *a.* डौलाचा, थोर, थाटाचा.—*ad.* डौलानें, थाटानें. -MENT कलमवार लिहिणें *n*, कलमबंदी मजकूर सांगणें *n*, निवेदन *n*, कथन *n*; representation made हकीकत *f*, बयान *n*, कैफियत *f*, वाका;—as of costs, profits, &c. आकार. -ROOM दिवाणखाना, सदर *f*. -SMAN, a man versed in the art of government राजकार्यधुरंधर, राजनीतिकुशल, राजकारस्थानी; one employed in public affairs राज्यकारभारी, राज्यकारभारांतील असामी *f*.—STATED *a.* नेमलेला, नियमित.—STATION, place where anything stands जागा *f*; स्थळ *n*, ठिकाण *n*; place where railroad trains regularly come to a stand आगगाडीची थोप *f*, 'स्टेशन' *n*; place where the police of any precinct is assembled when not on duty पोलीसाचें ठाणें *n*, पोलीस स्टेशन *n*, गेट *n*; office जागा *f*, असामी *f*; rank पदवी *f*, दरजा; high station मरातब;—of bearers, &c. अड्डा, अखाडा, फड.—*v.* बसवणें, नेमणें, नेमणूक क. [at.] -ARY *a.* स्थिर, अचल, अढळ; not improving अवर्द्धमान. -ER कागद, पेनें, शाई वगैरे विकणारा. -ERY कागद शाई वगैरे लिहिण्याचें सामान *n*, 'स्टेशनरी' *f*. -MASTER ठाणेदार, स्टेशनमास्तर *n*.—STATISTIC, -AL *a.* देशस्थितिरीति संबंधी.—STATISTICS, a collection of facts arranged and classified, respecting the condition of the people in a state, their health, longevity, domestic economy, arts, property and political strength, &c. देशावस्था *f*, देशस्थितिरीति प्रकरण *n*.

STATICS (*Gr. statike*) पदार्थाच्या वजनाची विद्या *f*, भार -गुरुत्वविवरण *n*.

STATUE (*stare*, to stand) मूर्त्ति *f*, पुतळा.—*v.* पुतळा उभा क.; -चा पुतळा क.—STATUARY मूर्त्ति खोदणें *n*; one who makes statues मूर्त्तिकार; collection of statues मूर्त्तिसंग्रह -समुच्चय.—STATURE शरिराची उंची *f*, शरिराची काठी *f*.

STATUTE (do.) कायदा, कानू, ठराव. -BOOK कायद्याचें पुस्तक *n* -बूक *n*.—STATUTORY *a.* कायद्याचा, कायद्यानें स्थापलेला, विधिस्थापित.

STAVE *D.* thin, narrow piece of wood, of which casks are made पिपें करायाची फळी *f*; a metrical portion कडवें.—*v.* फोडणें, तोंड -भोंक पाडणें (a cask).

STAY *v. i.* (See STAND) राहणें, थांबणें; continue टिकणें, तगणें, चालणें; dwell राहणें, वस्ती क.; rely टेकणें, विश्वासणें; wait for खोळंबणें, वाट पाहणें.—*t.* राहविणें, थांबविणें; खोळंबा क., ठेवून घेणें; थोपविणें, धिरा देणें, संभाळणें.—*n.* स्थिति *f*, टिकाव; राहणें *n*, वस्ती *f*, वास्तव्य, *n*; खोळंबा, खोटी *f*; rope, &c., to steady ओढा, तणावा; टेका, धिरा, ओटंगण *n*; *pl.* kind of waistcoat stiffened with whalebone or other material worn by women एक प्रकारची कांचोळी *f*.

STEAD*, place which another had -ची जागा *f*,

-चें ठिकाण; bedstead खाट *f*, पलंग; in the s. of जागीं, ऐवजीं; to stand in s. -च्या कामीं -उपयोगीं पडणें; that is in the s. of वांटचा, होता. -FAST *a.* स्थिर, अचल; resolute निश्चयाचा, धिराचा, दृढनिश्चय. -FASTLY *ad.* निश्चयानें, धिरानें. -NESS अचलता *f*, स्थिरता *f*; नेट, निग्रह, मनस्थैर्य *n*.—STEADY *a.* स्थिर, अचल; निश्चयाचा, धिराचा; uniform एकधोरणी -तंत्री -सुती -मार्गी, साळसूद.—*v.* स्थिर क., स्थिरावणें.—*i.* स्थिर होणें -राहणें -असणें, थिरावणें; move steadily थंडाईनें -धिमेपणानें चालणें.

STEAL* *v.* take by theft चोरणें, चोरी क.; withdraw privily चोरपायांनीं निघून जाणें; win by address or gradual and imperceptible means चोरणें, हरणें; heart-*stealing* चित्तचोर; accomplish in a concealed manner चोरीनें क., चोरून लपून -लिकाचोरीनें क. [from].—*i.* चोरी क.; चोरपायांनीं -लपून जाणें. -ING चोरी *f*, चौर्य *n*; *pl* चोरीचा माल.

STEALTH चोरी *f*, चौर्य *n*; by s. चोरून. -ILY *ad.* चोरीनें, चोरून.—STEALTHY *a.* चोरीचा, चोरून केलेला.

STEAM*, water in the gaseous state वाफ *f*; mist formed by condensed vapor धुकें *n*, धुई *f*.—*v. i.* वाफ टाकणें -सुटणें -निघणें; move by the agency of steam वाफेच्या योगानें चालणें -फिरणें; rise in steamlike vapor धूर चढणें, वाफेसारखें वर चढणें.—*t.* वाफारा देणें -घेणें, वाफणें. -BOAT, -ER वाफेचें जहाज *n*, आगबोट *f*. -ENGINE वाफेचें यंत्र *n*.

STEALITE *F.* मालू, खडी *f*.

STEED* घोडा, वारू, लढाईचा घोडा, रणघोडा.

STEEL*, kind of iron तिखें *n*, पोलाद *n*; instrument made of steel तिख्याचें -पोलादी हातेर *n*; hardness कठिणपणा, तिखें *n*, कठीणता *f*; *Med.* एक औषध आहे.—*v.* धार -पाणी देणें -लावणें; कठीण क., निर्दय -कठोर क.; cause to resemble steel, as in smoothness, polish, or other qualities पोलादा सारखा गुळगुळीत -साफ वगैरे क. -TRAP लोखंडी सांपळा. -YARD तुळई *f*, तूळ *f*.

STEEP *v. D.* भिजत -भिजूं घालणें.—*a.* उभ्या चढाचा [in].—*n.* डगर *f*, कडा, उभासूळ.

STEEPLE* सुळक्याचें शिखर *n*.

STEER* *v.* govern आवरणें, दाबांत ठेवणें; guide मार्ग दाखविणें;—as a vessel सुकाणूनें चालवणें.—*i.* सुकाणूनें चालणें -फिरणें.—*t.* pursue a course अनुसरणें, रस्ता -मार्ग धरणें, उपाय क. [from, for, to, by]. -AGE सुकाणूनें गलबत चालवणें *n*. -SMAN सुकाणदार, सुकाण्या.

STELLAR *a.* (*stella*, star) तार्‍यांचा, नक्षत्रांचा, नाक्षत्र; full of stars नक्षत्रांनीं भरलेला, नक्षत्रमय -प्रचुर.

STEM,* body of a tree कांड *n*, कांडें *n*, खोड *n*;—of a plant देंठ, ताट *n*;—of a fruit or flower देंठ, डेंख; a descendant वंश, संतति *f*.—*v.* resist a current उभा -समोर -तोडत जाणें, ओघावर -धारेवर जाणें; oppose आडवा येणें, गतिरोध क., प्रतिबंध क.

STENCH* घाण *f*, दुर्गंधि *f*.

STEP* *v. i.* advance or recede by movement of the foot or feet पाऊल टाकणें -ठेवणें; walk a little distance चार पावलें चालून जाणें -येणें; walk slowly, gravely, or resolutely धिमेपणानें -हळू चालणें, भरकूम चालणें -पाऊल टाकणें; aside चार कदम चालून जाणें; retire from company मंडळींतून उठून जाणें; back मागल्या गोष्टीची आठवण क., मागें पाहणें, विचार क.; forth पुढें सरकणें -चालणें -येणें; in, into आंत येणें -जाणें; enter for a short time थोड्या वेळा करितां आंत जाणें, क्षणभर आंत येणें -जाणें: I just *stepped* into the house; obtain posses-

sion without trouble श्रमावांचून -सहज -आयता मिळणें : to s. into an estate; out लांब पाऊल टाकणें, भरकदम चालणें.—*n.* pace पाऊल *n*, पांवडा, कदम *n*; stair पायरी *f*, पायठणी *f*; space passed by the foot in walking or running पाऊल *n*, कदम *n*; small space or distance पाऊलभर वाट *f*, चार पावलांचें अंतर *n*; gradation पायरी *f*, पर्याय; progression चढ, बढती *f*; footstep पाऊल *n*, पद *n*; gait चालण्याची गति *f*, ढब *f*, पाऊल *n*; measure उपाय, तजवीज *f*; round of ladder शिडीची पायरी *f*, पावटा; *pl.* passage रस्ता, वाट *f*;—in dancing, fencing, &c. पाऊल *n*, पावटा; flight of *steps* शिडी *f*, जिना; first s. towards an object प्रथम चरण; s. by s. क्रमानें, पर्यायानें, पायरी पायरीनें, क्रमशः; wide s. ढेंग *n*. -BROTHER सावत्रभाऊ. -DAUGHTER सावत्र मुलगी *f*. -FATHER सावत्र बाप. -MOTHER सावत्र आई *f*, सापत्न माता *f*. -SON सावत्र मुलगा. -STONE पायरीचा धोंडा.

STERILE, STERILITY (*sterilis*) See BARREN.

STERLING *a. O. E.* इंग्लिश नाण्याचा; genuine चोख, हाडाचा खरा; s. money of the realm पोतेचाल *f* -चलन *f*.

STERN* *a.* austere निष्ठुर, कडवा, करडा (look); immoveable अचल, दृढ, खंबीर, स्थिर (virtue);—of countenance निष्ठुर मुद्रेचा.

STERN*, hind part of a ship वराम *n*.

STERNUM (*L.*) उरावें हाड *n*, उरोस्थि *n*.

STEW *v. F.* मंदागीवर -मवागीनें शिजवणें.—*n.* मंदागीवर शिजविलेला पदार्थ; confusion बचबच *f*, फटफजिती *f*; to be in a s. डगमगणें.

STEWARD* (घरचा) कारभारी, मोदी, कोठणीस, वाकनीस. -SHIP दिवाणगिरी *f*, कारभारीपणा, कोठनिसी *f*.

STICK*, a rod काठी *f*, छडी *f*; branch of a tree फांदी *f*, काठी *f*;—for fuel काडी *f*; a little s. काटूक *n*; s. of sealing wax लाखेची कांडी *f*;—for beating on tabors टिपरी *f*, टिपरू *n*; the bass-beating s. of the tabor called sambal डंका; the treble beating s. आकडी *f*; stab दुस्सी *f*, दुसकी *f*; *Print.*, an instrument on which types are composed in words, and the words arranged to the required length of the line 'इस्टिक' *f*.—*v.* दुसणें, खुपसणें; cause to remain by piercing खोंचून ठेवणें, खोवणें, घालणें, चढवणें; set लावणें, बसवणें; fix on a pointed instrument खुपसून -टोंचून ठेवणें; make to adhere चिकटवणें, डकवणें; out बाहेर -पुढें क. [with, on, into].—*i.* चिकटणें, डकणें, अडकणें; अडकून राहणें, फसणें, थकणें: a carriage *sticks* in the mud; cause difficulties or scruples कांक्षा आणणें, फणगडे फोडणें; adhere closely in friendship and affection स्नेहानें लगटून -चिकटून राहणें, -शीं जडून राहणें; at कांकूं -नानूं क., घुटमळणें; by चिकटून राहणें; स्थिर -खंबीर राहणें; out बाहेर येणें -निघणें; to चिकटून राहणें.—STICKLE *v. i.* आग्रह -हट्ट धरणें.—STICKY *a.* चिकट, चिकण, चिकचिकीत.

STIFF* *a.* rigid ताठ, ताठर; not soft nor hard कडक, कडकडीत, खडखडीत (paste); violent जोराचा, भारी, प्रचंड (gale); obstinate हट्टी, ताठ, दुराग्रही; formal आदराच्या आढ्यतेचा, खळबळीतपणा वेगळा, कोरडा (behavior). -NESS ताठपणा, ताठा; खडखडीतपणा; अप्रशस्तपणा; लवणभंजना निराळेपणा, ताठा. -EN *v.* ताठ क.; घट्ट क.—*i.* ताठ होणें; घट्ट होणें; हट्टी -कठीण होणें. -HEARTED, -NECKED *a.* हट्टी, ताठ मानेचा.

STIFLE *v. Icel.* choke दम -श्वास कोंडणें; quench विझवणें (flame); suppress दाबणें, गिळणें, पिणें (grief, a story, convictions).

STIGMA (*Gr. stigein*, to prick, to brand)

डाग, लास; mark of infamy कलंक, डाग. -TIZE *v.* डाग -कलंक लावणें [with].

STILL* *v.* stop थांबविणें, बंद क.; silence चूप -उगा क.; appease शांत -थंड क., शांतवणें [by, with].—*a.* निवात, निर्वात; स्थिर, अचल; निरुपद्रव, निवांत (a place).—*ad.* to this time अजून, आज पावेतों, अद्याप; always सर्वदा, नेहमी; by an additional degree अणखी; nevertheless तथापि, तरी; after that त्यानंतर, अणखी, मग. -BORN पोटांत मेलेला, मृतजात; a s. child मूढ गर्भ. -NESS सामसूम *n*, निवांतपणा; निरुपद्रवता *f*, स्वस्थता *f*.

STILL (See DISTILL) भबकारा, दारू -अर्क काढण्याचें यंत्र *n*.—*v.* अर्क काढणें; थेंबथेंब पाडणें.

STILT *D.* घोडेकाठी *f*, घोडा.

STIMULATE *v.* (*stimulus*, a goad) excite चेतवणें, उद्दीपन क., उत्तेजन देणें; *Med.* चेतना आणणें -वाढवणें [with, by, to].—STIMULANT *a.* उत्तेजक.—*n.* चेतना आणणारा; दीपक औषध *n*.

STING* *v.* pierce with a sting नांगी मारणें, डसणें, दंश क.;—as conscience चुरचुरणें, खवखव लागणें;—as speech झोंबणें;—as a scorpion ठणकाविणें; to s. to the quick वरमणें [by, with].—*n.* a short point with which some animals are armed नांगी *f*, कांटा; the thrust of a sting into the flesh दंश, डक; remorse चुरस *f*, चुरचुर *f*; point of an epigram दंश, नोक *f*, खोंच *f*.

STINGY* *a.* कृपण, हिमटा.

STINK* *v. i.* घाण -वास मारणें -येणें.—*n.* घाण *f*, दुर्गंधी *f*; intense s. दर्प, उग्रघ्राण *n*.

STINT* *v.* मोतादीवर ठेवणें, मेजलेला देणें;—the belly पोट बांधणें, उपास पाडणें [to, in].—*n.* मोताद *f*, मर्यादा *f*, इयत्ता *f*.

STIPEND (*stips, stipis*, gift, *pendere*, to pay out) नेमणूक *f*, मुशारा, वेतन *n*, पगार. -IARY *a.* वेतनी, पगारी.

STIPULATE *v. i.* (*stips, stipis*, a gift) ठराव -संकेत क. [for, with].—STIPULATION बोली *f*, वायदा, करार.

STIR* *v.* move हलवणें, चालवणें, सारणें; agitate चेतवणें, खाजवणें; up कालवणें, ढवळणें; चेतवणें, पेटवणें (strife); त्वरा क., गति वाढवणें [from, with].—*i.* हलणें, वळणें; खेळत -चालता असणें.—*n.* हालचाल *f*; गडबड *f*, हूल *f*, धामधूम *f*.

STIRRUP* रिकिबी *f*.

STITCH* *v.* form stitches in टाकेमारणें; unite जोडणें.—*n.* टांका, टांचा; local, sharp pain हूक *f*, उसण *f*, लचक *f*; double s. टीपदोरा; running s. उभादोरा; space between two double furrows in ploughed ground बीद *f*?

STOCK*, trunk कांड *n*, कांडें *n*, खोड *n*, सोट; post खांब, सोट; a stupid person टोणपा; handle दांडा, मूठ *f*, बुंधा;—of a musket दस्ता, कुंदा; race घराणें *n*, वंश, बुडखा, खुंट; capital पुंजी *f*, भांडवल *n*, मुद्दल *n*; share of a company सार्वजनिक भांडवलाचा हिस्सा; *pl.* shares of public debt सरकारानें घेतलेल्या कर्जाचे हिस्से *pl*; store बेगमी *f*, सांठपा; wealth in cattle गुरेंढोरें *n pl*, गोधन *n*; *pl*—for the feet and hands of criminals खोडा; हातखोडा, पायखोडा; dead s. शेतकीचीं आउतें *n pl*; paper s. कागद करायाचा मसाला; private s. घरभांडवल *n*, गांठचा पैसा; scanty s. तुटपुंजी *f*; common s. गणद्रव्य *n*; s. in hard cash नगदीभांडवल *n*;—of a good s. थळीचा, खाणीचा;—of horned beasts थळ, थळी *f*.—*v.* lay up बेगमी क., सांठवणें; store भरणें, पुरवणें; suffer to retain milk for twenty-four hours or more previous to sale, as cows दूध तुंबविणें -जमविणें. -ADE लकडकोट, मेढेकोट. -STILL *a.* गपचीप -चूप; to sit s. मौन्य धरून बसणें

नंदीसारखा -धोंड्यासारखा -(दगडाच्या) देवासारखा बसणें.

STOCKING* पायमोजा.

STOICK (*Gr. stoa*, porch) person not easily excited उदास, विरक्त, थंड; [a disciple of the philosopher Zeno, who founded a sect, and taught that men should be free from passion, unmoved by joy or grief, and submit without complaint to the unavoidable necessity by which all things are governed]. -ISM औदासीन्य *n*.

STOLE*, robe झगा, जामा; sucker ताणा; a shoot कोंब.

STOLID *a*. (*stolidus*) मूर्ख, टोणपा, मठ.

STOMACH (*Gr. stoma*, a mouth) the principal organ of digestion कोठा, पोट *n*, जठर *n*; appetite भूक *f*, क्षुधा *f*; desire इच्छा *f*, भूक *f*, वांच्छा *f*.—*v*. पोटीं घालणें, गिळणें (an affront). -IC, -AL *a*. रोचक, पाचक; कोठ्याचा, जठरसंबंधी.—*n*. *Med*. रोचक *n*, रोचक औषध *n*. -PUMP, a small pump or syringe with a flexible tube, for drawing liquids from the stomach, or for injecting them into it].

STONE*, mass of concreted, earthy, or mineral matter दगड, धोंडा; gem रत्न *n*, पाषाण, मणि; a monument erected to preserve the memory of the dead कबरेचा धोंडा; *Med*., calculous concretion in the kidneys or bladder मूतखडा; nut of a stone fruit अठळी *f*, अठी *f*; weight of fourteen pounds सातशेरी *f*; testicle अंड, आंड; torpidness and insensibility सुनेपणा, बधिरत्व *n*; philosopher's s. परीस; round rolling s. गुंडा; smooth roundish s. गोटा, गोटी *f*; s. for grinding condiments, &c. पाटा, शिळा *f*, सहाण *f*; to leave no s. unturned चहूंकडे दगड टाकून पाहणें.—*v*. दगड मारणें, धोंडमार क.; आंठ्या -ब्या काढणें; face with stones तोंडीं दगड बसविणें: to s. a well. -BLIND *a*. निपट अंधळा. -BOW गलूल. -CHATTER जंगली चिमणी *f*. -CUTTER धोंडफोड्या, पाथरवट. -FRUIT आंठीचें फळ *n*. -HAMMER सुतकी *f*, सुंबा. -HEARTED *a*. पाषाणहृदय. -HORSE वळू-अंडील घोडा. -PIT चिरेखाण *f*. -'S-CAST, THROW हातगुंड्याचा टप्पा. -WORK दगडी काम *n*, चिरेबंदी *f*, फरसबंदी *f*.—STONY *a*. दगडाचा, दगडी; खडकाळ (ground); कठीण, निर्दय, दगडा सारखा (heart).

STOOL*, seat without a back पाट, पिढें *n*, चौरंग, मोडा, बसक इ०; discharge from the bowels ढाळ, झाडा.

STOOP*, *v. i.* bend ओणवणें, वांकणें, लवणें; submit नमणें, वश होणें, हारघेणें; condescend नम्रता धरणें, अभिमान सोडणें; swoop झेंपझडप घालणें; alight from the wing उतरणें, बसणें.—*t.* वाकवणें, लववणें [down, forward].—*n*. लवणें *n*, नमणें *n*; नम्रता *f*; झडप *f*, झेप *f*.

STOP *v. D.* close बंद क.; obstruct खुंटवणें, अटकावणें, अडथळा क. (a way); shut in कोंडणें; restrain आवरणें, प्रतिबंध क.; suspend तहकूब क. [by, with].—*i.* थांबणें, उभा राहणें; राहणें, अटकणें.—*n*. उभें राहणें *n*, ठेप *f*, मुकाम; खोळंबा, खोटी *f*; गतिरोध; प्रतिबंध, अटकावा; cessation अवसान *n*, मोडा, मोडती *f*; mark of punctuation विराम चिन्ह *n*. -PAGE अटकाव, बंदी *f*. -PER उभा राहणारा; अटकाव करणारा; that which closes a hole in a vessel दट्टा, गुडदी *f*, बूच. -COCK पाणी सोडायाचा तोटी *f*. -PLE दट्टा, बूच.

STORAX (*L.*) शिलापुष्प *n*, शिलारस.

STORE*, hoard साठा, कुणगा, संग्रह; abundance समृद्धि *f*, चंगळ *f*, रेलचेल *f*; a warehouse वखार *f*, कोठार *f*, कोठी *f*; *pl* सामान

n, साहित्य *n*, 'स्टोर' *n*; in s. सांठा-स, संपहीं.—*v*. सांठा -बेगमी करून ठेवणें; supply पुरवणें; कोठींत -बखारींत ठेवणें [with]. -HOUSE बखार*f*, कोठी *f*. -KEEPER कोठनीस, बखारदार, 'स्टोर किपर.'

STORK* करकोंचा पक्षी; whitenecked s. कौरव.

STORM*, tempest वादळ *n*, तुफान *n*; commotion धांदल *f*, गडबड *f*, दंगा; adversity विपत्ति *f*, संकट *n*; assault on a fortification हल्ला, छापा.—*v*. हल्ला क.-करून घेणें [with].—*i*. कडकडणें, जळफळणें, तडफडणें; कडाख्यानें -जोरानें वाहणें -पडणें (wind, rain, &c).—STORMY *a*. वादळाचा, तुफानाचा; रागाचा; तडाख्याचा, कडाख्याचा, धांदलीचा.

STORY*, narration कथन *n*, बयाद *f*; history वृत्तांत, कथा *f*; short narrative गोष्ट *f*, कथा *f*, चुटका; fictitious narrative कहाणी *f*, कथा *f*, नक्कल *f*; idle s. बात *f*, गप *f*; —as in excuse तपसील, बयाणा. -TELLER कथेकरी, गोष्टी सांगणारा.

STORY ? मजला, तळ, खण; of one s. एकमजली; of two s. दुमजला -ली.

STOUT *a*. *D*. strong बळकट, भक्कम; robust धट्टाकट्टा, धडाखडा; bold धिट, धारिष्टाचा; obstinate हट्टी, दुराग्रही.

STOVE* चूल *f*.

STOW* *v*. तजविजीनें -सोयीनें भरणें -ठेवणें -घालणें [away]. -AGE तजविजीनें भरणें *n*; room for stowing कोठार *n*.

STRADDLE* *v*. *i*. पाय फांकून-फेंगडा चालणें -उभा राहणें.

STRAGGLE* *v*. *i*. rove इकडेतिकडे -रानोमाळ फिरणें -चालणें; shoot too far in growth अफाट-उफाड्यानें वाढणें; be dispersed फांकणें, पसरणें [about].—STRAGGLER सुटा, तुटक, अलग; पांगून -फटकून चालणारा -चाललेला; भटक्या, उनाड.

STRAIGHT* *a*. नीट, सरळ.—*ad*. तेव्हांच, लागलाच. -EN *v*. नीट -सरळ -उजू क.; reduce to difficulties संकटांत -पेचांत -अडचणींत घालणें -पाडणें. -FORWARD *a*. धोपट, नीट. -LY *ad*. नीट, सरळ. -WAY *ad*. तेव्हांच, लागलाच, तत्क्षणींच.

STRAIN *v*. (*stringere*, to bind tight) stretch ताणणें, ओढणें; put to the utmost strength ताण बसविणें -देणें; make tight तटतटीत क., ताणणें; filter गाळणें, छानणें; sprain लचकविणें, लचक भरवणें [by, with].—*i*. गळणें, पाझरणें; नेट क., कुंथणें.—*n*. नेट, ताण; लचक *f*; tendency वळण *n*, धोरण *n*; prolonged musical note दीर्घसूर; manner of conduct रहाळ *f*, रीत *f*, पर्याय.

STRAIT *a*. (*strictus*, tight) तंग, दाट; narrow अरुंद, अवघड; difficult कठीण, अवघड.—*n*. *Geog*. खाडी *f*, सामुद्रधुनी *f*; अडचण *f*, संकट *n*. -EN *v*. संकटांत -अडचणींत घालणें; तंग -अरुंद क. -LY *ad*. अडच, दाट; अवघड रीतीनें, दाट रीतीनें; सखत्. -ENED *a*. अडचणीचा, ओढगस्त; to be s. अवघडणें. -NESS अडचण *f*, संकोच; अरुंदपणा; तंग -अटसपणा, दाटपणा;—of purse, affairs, ओढ *f*, ओढगस्ती *f*, गिरीब -पदारी.

STRAKE* धांव *f*.

STRAND*, shore कांठ, किनारा, तीर; one of the twists of a rope पेंढ, वेंट *f*, *m*, पदर. —*v*. कांठावर -किनाऱ्यावर चढणें (a ship); दोरीचा पदर तोडणें.—*i*. किनाऱ्यावर आपटणें -आदळणें -चढणें.

STRANGE *a*. (*extraneous*, externally) परदेशचा, विदेशी; not domestic बाहेरचा, परका, दुसऱ्याचा (things); new नवा; this made David admire the law of God at that s. rate; odd विलक्षण, विचित्र, ताजूब, तऱ्हेवायीक: he is s. and peevish; wonderful चमत्कारिक, अपूर्व, विलक्षण: I perceive s.

alteration in me.—STRANGER परदेशी; परका, तिऱ्हाईत, अनोळखी; guest पाहुणा; *Law*, one not privy to an act, contract, or title अजाण, अपरिचित, तिऱ्हाईत; a mere intruder आगंतुक, घरघुशा.

STRANGLE *v.* (*strangulare*) suffocate गळा दाबून मारणें; suppress दडपणें, चेपणें [by, with].

STRANGURY (*stranx*, drop, *ouron*, urine) a difficulty in discharging urine मूत्रावरोध, मूत्रकृच्छ्र.

STRAP*, slip of leather वादी *f*;—for sharpening knives, razors, &c. थापटणें *n*, पलाटणें *n*.—*v.* वादीनें मारणें, वादीचा -वादीमार देणें; वादीनें -पट्टीनें बांधणें; पलाटणें, वादीवर घांसून धार आणणें.

STRATAGEM (*Gr. stratos*, an army, *agein*, to lead) व्यूह, कृति *f*, उपाय, युक्ति *f*.

STRATH *Gael.* थड *f* (गंगथड).

STRATUM (*L.*) थर, पदर, पडदा.—STRATIFY *v. i.* थर होणें -जमणें -बसणें.

STRATUS (*L.*) a form of clouds in which they are arranged in horizontal band or layer खर *f*.

STRAW*—of wheat काड *n*;—of rice पेंढा, तस *n*;—of legumes काड *n*; trifle काडी *f*, कणपट *n*, तनसडी *f*; it matters not a s. पायपोस तुटला.

STRAY *v. i.* (*extra*, without, *vagare*, to ramble) भटक्या मारीत फिरणें, भटकणें; deviate चुकणें, रस्ता सोडणें [away, about, from, to].—*a.* चुकार, बहकलेला, चुकलेला.—*n.* चुकार गुरूं *n*.

STREAK*, a line or long mark of a different color from the ground रेघोटी *f*, रेघ *f*.—*v.* विचित्र रंगाची पट्टी -रेघोट्या काढणें, विचित्र रंगाच्या पट्या काढणें, -पट्यांनीं रंगविणें [with].

STREAM*, current of water or other stream ओघ, धार *f*, प्रवाह;—on the earth, as a river or brook नदी *f*, ओढा, ओहळ;—as of rain or from a vessel धार *f*, पन्हळी *f*; tendency वळण *n*, ओढ *f*: the s. of opinions.—*v. i.* वाहणें, प्रवाह चालणें, लोटणें; radiate तेज फांकणें; extend ताणणें, पसरणें [from, forth, out]. -ER निशाण *n*, बावटा. -LET ओहळी *f*, मुतरी *f*.

STREET* गांवांतील रस्ता, मार्ग. -WALKER बाजारबसवी *f*.

STRENGTH*, ability बळ *n*, जोर *n*, शक्ति *f*; firmness जोर, मजबुती *f*, बळकटी *f*, कस, ऐवज;—of liquors, &c. तेज *n*, कस, दम; on or upon the s. of जोरावर, बळावर. -EN *v.* बळकट क., जोर आणणें; दृढ क., बळकटी देणें -आणणें; धीर -धैर्य देणें [by, with].—*i.* बळावणें, बळ धरणें.

STRENUOUS *a.* (*strenuus*, hard) उद्योगी, परिश्रमी; उद्योगाचा, परिश्रमाचा [in].

STRESS (from *distress*) force जोर, नेट; stretch ताण, ओढा.

STRETCH* *v.* extend लांब क., ताणणें, लांबवणें (a rope); expand पसरणें, विस्तारणें (wings); reach out पोंहचणें; make tense ताणणें, ताठ क.; strain ओढणें, ओढून -खेंचून आणणें (a muscle); exaggerate ओढणें, ओढून ताणून क. -आणणें: to s. the truth [out, to, forth].—*i.* पसरणें, पोंहचणें; सुटणें, पघळणें सैल होणें; मीठमिरची लावून सांगणें, फुगवणें —*n.* struggle तिडीक *f*, बळ *n*, नेट; ताण *f*, ओढ *f*; course धोरण *n*, वळण *n*; पोंच *f*, आवाका. -ER ओढणारा, ताणणारा; litter डोली *f*, पाळणा, तिरडी *f*, इ०; one of the rods in an umbrella ताणा.

STREW* *v.* scatter विखरणें, विखरून टाकणें; spread abroad पसरणें, फैलावणें (reports); cover by scattering something over अंथरणें, भरणें, विखरून भरणें, पसरणें [about, over].

STRIATED *a.* (*stria*) रेघांचा, रेषामय; खांचणींचा.

STRICT *a.* (*strictus*) tight ताठ; exact, सुती, ठाम, रेखलेला: rigorous कडकडीत, खणखणा, सक्त. -URE गुणदोष व्याख्या *f* -विवरण *n*; *Med.*, contraction गांठ *f*, चर्मतरंग.

STRIDE* ढेंग *n*, टांग *f*.—*v. i.* ढेंगा टाकणें, ढेंग टाकणें, ढेंग टाकत चालणें [over].—*t.* ढेंग टाकून पार जाणें, ओलांडणें.

STRIFE, See under STRIVE.

STRIKE*, *v.* hit with force मारणें, ठोकणें, हाणणें; give, as a blow प्रहार क., ठोका -ठोसा -टोला मारणें; impress छापणें, पाडणें (coin); thrust in आंत लोटणें -ढकलणें, घुसविणें, शिरकवणें; punish मारणें, शासन क.; cause to sound पिटणें, वाजवणें; lower उतरणें, खालीं पाडणें -क. (a sail, tent, flag); impress strongly चकित -चक्क -दंग क.: to s. with wonder, alarm, dread; make and ratify कायम क.;—as a bargain टाळी देणें; level, as a measure of grain, salt, &c. सपाट माप क.; run on, as a ship कांठावर जहाज चढविणें -आदळणें -आपटणें; affect in some particular manner वाटणें, लागणें, भासणें, दिसणें; [—a jury; *Law*, to constitute a special jury, ordered by a court, by each party striking out a certain number of names from a prepared list of jurors, so as to reduce it to the number of persons required by law];—an account बाकी -आढावा काढणें;—hands with हात हालवणें, हातास हात देणें -मिळवणें; करार -बोली क.; off हिशेबांतून खोडून टाकणें; बाद क.; *Print.* छापणें, छापून काढणें: to s. off a thousand copies of a book; मारणें, उडवणें, छेदणें: to s. off a man's head with a cimeter; खोडून -छाटून -तोडून टाकणें, छेकणें, फाटा देणें: to s. off what is superfluous; out घासून -घर्षणानें उत्पन्न क. -पाडणें, चकमकीनें पाडणें: to s. out sparks by steel; खोडणें, काढून टाकणें; काढणें, योजणें, कल्पणें (a plan); sail शीड गुंडाळणें -पाडणें -उतरणें; थांबणें, बंद क.; up वाजवूं लागणें, गाऊं -खेळूं -वाजवूं लागणें.—*i.* लागणें, धक्का बसणें; आदळणें, आपटणें; वाजणें; जमिनीवर चढणें; quit work in order to compel an increase, or to prevent a reduction of wages हरताळ पाडणें, कमी पगारामुळें काम सोडणें इ०; [lower a flag in token of respect, or to signify a surrender of the ship to an enemy]; break forth उदयास येणें, उगवणें: to s. into reputation; for एकाएकीं कामास लागणें -उद्युक्त होणें; in एकाएकीं आंत शिरणें -घुसणें; मावळणें, जिरणें (an eruption); मध्यें पडणें, मध्यें हात घालणें; in, with बाजू -पक्ष धरणें -मिळणें; out भटकणें; झांप -झेंप टाकणें; up वाद्य वाजवायास लागणें. —*n.* fullness of measure भरमाप *n*; कामाची बंदी *f*, हरताळ.—STRIKING *p.a.* affecting with strong emotions वेधक; surprising चमत्कारिक, विस्मयकारक.—STROKE ठोका, टोला, प्रहार;—with a stick फटका;—of calamity धक्का, चपेटा, गजब, घाला;—of deceit झोका, छक्कड *f*; touch हात, कसब *n*, छापी *f*, लाघव *n*: the boldest *strokes* of poetry;—in writing रेघ *f*, रेषा *f*; devious s. फटकार, फरकडा; touch of the pen or pencil टांक *n*; the sound of the clock घड्याळाचा ठोका;—of a swimmer झांप *f*, झेंप *f*.—*v.* वर हात फिरवणें, कुरवाळणें, गोंजारणें [down].

STRING*, small rope दोरी *f*, सुतळी *f*; ribbon फीत *f*; thread on which anything is filed हार *f*, माळ *f*; line of things माळ *f*, सर, हार *f*, कतार *f*;—of pearls लड *f*, लडी *f*, माळ *f*;—of a musical instrument तार *f*, तंतु; fibre, as of a plant शीर *f*, दोर, हीर; tendon of an animal body शीर *f*, नाडी *f*; cord of a bow चिल्ला, गुण; concatination of things सर, हार, माळ *f*, जाल *n*; s. of words शब्दजाल *n*;—as of drawers

नाडा, नाडी *f.*—*v.* ओवणें, गोवणें; तार लावणें -चढवणें; make tense ताणणें, ताठ क.;—*a.* a bow गुण चढवणें. -ED तारायुक्त, तंत्री, तारांचा; single s. एकतारी (a musical instrument).—STRINGY *a.* तारांचा, तंतुमय; दोराळ, दोर झालेला (root).

STRINGENT *a.* (*stringere*, to bind tight) कडक, कडकडीत (code).

STRIP* *v.* tear off काढणें, उस्कटणें, उस्तरणें, उधडणें: to s. clothes from a man's back; peel सोलणें, साल काढणें; make naked नागवणें, उघडा क.; bereave नागवणें, बुचाडणें; uncover उघडा क.; press out the last milk of, at a milking चिटणें, निचडून काढणें; pare off the surface of, as land, in strips जमिनीच्या पट्या पाडणें [of, off, away].—*n.* पट्टी *f*, चिंधोटी *f*. -LING पोरगा, पोंगडा.—STRIPE पट्टा, पट्टी *f*; stroke of a lash फटका, फटकारा.—*v.* फटके मारणें.—STRIPED पट्याचा, पटाईत.

STRIVE *v. i. D.* make efforts झटणें, उद्योग क.; contend झुंजणें, विरोध क.; against, compete स्पर्धा -बरोबरी क. [with, against].—STRIFE भांडण *n*, लटपट *f*, झटापट *f*; स्पर्धा *f*.

STROKE, See under STRIKE.

STROLL *v. i. Ger.* रपेट -सहल क. [about, away, around].—*n.* सहल *f*, रपेट *f*, फेरफटका.

STRONG*, *a.* having physical force बळकट, बलिष्ठ, जोरदार; solid मजबूत, कणखर, भक्कम (a thing); well fortified बंदोबस्ताचा, बळकट (fort); powerful पराक्रमी, बलिष्ठ (army, nation); having great wealth पैकेपूर, मातबर, ऐवजदार (company); violent प्रचंड, जोराचा, भारी (wind); robust दृढ, बळकट, सुदृढ, धस्मर (constitution); forcible जोराचा, बळकट, दृढ (argument); ardent तल्लख, कडक, कसदार (medicine, tea); intoxicating मादक, तलख (liquor); bright तेजदार, ठळक, चकचकीत (color); affecting the taste चरचरीत, चरमरीत, उग्र (flavor); solid जड, भारी (meat); firm स्थिर, बळकट: custom grows s. by time; vehement जोराचा, पराकाष्ठेचा, आक्रोशाचा (crying);—cloth, thread, &c. धनवट, धडोतीचा. -HOLD गढी *f*, किल्ला; निर्भयस्थान *n*. -LY *ad.* बळकट, जोरानें, मजबुतीनें; eagerly आस्थेनें, आवेशानें, कळकळीनें.

STROP, See STRAP.

STRUCTURE (*struere*, to construct) बांधा, रचना *f*, घडण *f*; edifice इमारत *f*, इमला.

STRUGGLE *v. i. Ger.* strive with contortions of the body तडफडणें, धडफडणें; use great efforts बळ क., झोंबाझोंबी क., धोशा पाडणें;—with difficulties, &c. गचकळ्या खाणें.—*n.* [with, against, for]. तडफड *f*, धडफड *f*, आपटाआपट *f*; झोंबाझोंबी *f*, धोशा, गटंगळ्या *f pl.*

STRUMPET (*stuprare*, to debauch) कसबीण *f*, बाजारबसवी *f*, उष्टीपत्रावळ *f*.

STRUT *v. i. D.* नखरा क., नटत -ठमकत -पत्राजीनें -उराडा काढून चालणें [about].—*n.* नखरा, अक्कड *f*, ठमका.

STUB* खुंट *n*, खोड *n*. -BY *a.* आडव्या आंगाचा, गिड्डा, चेंडू; टिल्लू.

STUBBLE *D.* गहूं वगैरे धान्याचा सड.

STUBBORN* *a.* refractory अडेल, हट्टी, दुराग्रही; stiff ताठ; persevering धिराचा, निश्चयाचा. -NESS हट्ट, दुराग्रह.

STUCCO *It.* चुन्याचा गिलावा, संदला.

STUD*, ornamental nail चमकी *f*, गुलमेख *f*; ornamental knob गुलमेख *f*.—*v.* चमक्या -गुलमेखा जडणें, जडित क.

STUD* घोड्यांची पागा *f*.

STUDY (*studere*) application of mind to books and learning विद्याभ्यास, व्यासंग,

अभ्यास; meditation मनन *n*, विचार, चिंतन *n*; contrivance युक्ति *f*, तजवीज *f*, उपाय; any particular branch of learning that is studied शिकण्याचा -अभ्यासाचा -अध्ययन विषय; apartment devoted to study शिकण्याची खोली *f*; [*Fine Arts*, a work undertaken for improvement in the art, and often left incomplete].—*v. i.* शिकणें, अभ्यास क.; विचार -मनन क.; be zealous झटणें, तिडकनें क.—*t.* शिकणें, अध्ययन क.; विचार क.; arrange by previous thought पूर्वी विचार -तजवीज करून ठेवणें; commit to memory पाठ क.—STUDENT शिकणारा, विद्यार्थी.—STUDIED *a.* शिक्षित, अभ्यासित; पढीक, विद्वान; पूर्वयोजित -रचित.—STUDIOUS *a.* अभ्यासी, व्यासंगी, उद्योगी; विद्याभ्यासी, विद्याव्यसनी. -NESS विद्याव्यासंग; उद्योग, व्यासंग, व्यवसाय.

STUFF *Ger.* cloth कापड *n*; material वस्तु *f*, द्रव्य *n*; essence तत्व *n*; nonsense भलतेंच, बडबड *f*; worthless matter ऐलपैल *n*, इळाखिळा; medicine औषध *n*.—*v.* crowd दाटी क., कोंदणें; fill full ठासून भरणें; obstruct कोंदणें, बंद क., बुजवणें; fill the skin of, for the purpose of preserving as a specimen गवत -मसाला वगैरे भरून ठेवणें.—*i.* कचकावून -रगडून -दपटून जेवणें. -ING पुरण *n*, भरण *n*; seasoning for meat पुरण *n*, मसाला.

STUMBLE *v. i. Ger.* trip in walking अडखळणें, ठेंचळणें; err चुकणें, घसरणें; light on by chance अवचित सांपडणें -मिळणें -भेटणें [about, down].—*t.* अडखळवणें, ठोकर खायास लावणें; confound गोंधळविणें, घोटाळ्यांत पाडणें.—*n.* ठेंच *f*, ठोकर *f*.—STUMBLING-BLOCK, -STONE अटकाव, अडखळण *n*.

STUMP *D.* stub खुंट *n*, खोड *n*;—of a limb थोट *n*, बोटूक *n*.—*v.* lop तोडणें, छाटणें.—*i.* टणटण चालणें.—STUMPY *a.* गिड्डा, ठेंगू; थोंटा, लांडा.

STUN* *v.* make senseless by a blow ठोक्यानें मूर्च्छित -बेसावध क.; overpower the sense of hearing -च्या कानठळ्या बसविणें; surprise completely चकित -दंग क. [with, by, at].

STUNT* *v.* वाढ खुंटवणें, खुरट क. [in].—*n.* खुरट -खुजेपणा; खुरट जनावर *n*, खुजा.

STUPID *a.* (*stupidus*) very dull जड, मंद, मूर्ख; heavy गुंग, सुस्त, धुंद; formed without skill ढोबळा, ठोंसर (things). -ITY जडपणा, मंदबुद्धि *f*, बेकुबी *f*; गुंगी *f*, धुंदी *f*, सुस्ती *f*;—STUPEFY *v.* जड -मंद -गुंग क.; गुंगी आणणें [by, with].—STUPEFACTION धुंदी *f*, गुंगी *f*, भूल *f*.—STUPEFACIENT *a.* गुंगी आणणारा.—*n. Med.* गुंगी आणणारें औषध *n*.—STUPENDOUS *a.* चकभूल करणारा, आश्चर्यकारक; of astonishing magnitude मोठा, महान्, अचाट, अवाढव्य.—STUPOR (*L.*) गुंगी *f*, धुंदी *f*; जडबुद्धि *f*, जाड्य *n*, बेकुबी *f*.

STURDY *a. F.* obstinate हट्टी, दुराग्रही, हेकड; violent जोराचा, बळकट (stroke); strong घटमूट, धटिंगण, दांडगा (lout); stout बळकट, दांडगा (tree).

STUTTER *v. i. Ger.* तोत्रें बोलणें [in].

STY* डुकरखाना -वाडा -वाडी *f*.—*v.* डुकरखान्यांत कोंडणें.

STY* रांजणवाडी *f*, आंजुरली *f*.

STYLE (*stylus*) mode of expressing thought in language, whether oral or written वाणी *f*, धाटी *f*, धरती *f*, लबक *f*, ढब *f*; fashion रीत *f*, चाल *f*, मोळा; title किताब, प्रतिष्ठा *f*, नांव *n*; mode of presentation, esp. in music or any of the fine arts कवितेची -गाण्याची सरणी *f* -थाकी *f*; —of a dial शंकु;—of a flower बोंड *n*, पोगी *f*;—for writing लेखणी *f*; pointed iron

सळई *f*, शलाका *f*.—*v*. ह्मणणें, नांव -किताब देणें.—STYLISH *a*. छानदार, विराजित.

STYPTIC *a*. (*stypticus*) रक्त बंद करणारा, रक्तावरोधी.—*n*. *Med*. रक्त बंद करणारें औषध *n*.

STYRAX (*L*.)—liquid शिलारस.

SUAVITY (*suavis*, sweet; *Skr*. *svâdu*) गोडी *f*, गुलाबी *f*, मधुरता *f*, माधुर्य *n*.

SUBACID *a*. (*sub* & *acid*) अंबटगोड, मधुराम्ल. —*n*. मधुराम्ल पदार्थ.

SUBALTERN (*sub*, under, *alternus*, one after another) हाताखालचा मनुष्य किंवा कामदार.

SUBAQUEOUS *a*. (*-aqua*, water) पाण्याखालचा; *Geol*., formed under water पाण्याखालीं झालेला -जमलेला (deposits).

SUBDIVIDE *v*. पोटभाग क., लहान लहान भाग क. [into].—SUBDIVISION वांटणीची वांटणी *f*, पोट वांटणी *f*, अंशांश.

SUBDUE *v*. (*ducere*, to lead) bring under जिंकणें, ताब्यांत आणणें, वश क., हस्तगत क. (enemies); overcome जिंकणें, मोडणें (opposition); tame वळवणें, वठणीस आणणें; soften हलका -नरम क. (ferocity); break, as land लागवडीस आणणें, बेनणें [by].

SUBJACENT *a*. (*-jacere*, to lie) खालचा, अधोवर्त्ती; being in a lower situation, though not directly beneath खालचा.

SUBJECT *a*. (do.) placed under खालचा; placed under the rule of हुकमी, खालचा, अधीन; liable जोगा, अधीन, वश: a country s. to extreme heat; to be s. unto -च्या आज्ञेंत हुकमांत -स्वाधीन असणें.—*n*. one who lives under the dominion of another प्रजा *f*, रयत *f*, दुसऱ्याच्या अधिकारांतला -राज्यांतला मनुष्य -ताबेदार; that on which any operation is performed पात्र *n*, अधिष्ठान *n*; *Gram*.—of a verb कर्त्ता;—of a proposition साध्य *n*;—of a predicate अनुवाद्य *n*; topic विषय, प्रकरण *n*, अर्थ; the mind मन *n*: thinking s.; [dead body for the purposes of dissection].—*v*. खालीं -अमलांत आणणें; जिंकणें, वश क.; स्वाधीन -पात्र -योग्य क.; make subservient कामास -उपयोगास लावणें; cause to undergo भोगायास -सोसायास लावणें [to]. -ION ताबेदारी *f*, पारतंत्र्य *n*, अधीनता *f*; योग्यता *f*, वशता *f*. -IVE *a*. विषयसंबंधी; मनासंबंधी, मनाचा; अधिकरणसंबंधी. -MATTER विषय, प्रस्ताव.

SUBJOIN *v*. खालीं जोडणें, दुमान्यास लावणें. —SUBJUNCTIVE *a*. खालीं जोडलेला -लिहिलेला; *Gram*. संशयार्थ (mood).

SUBJUGATE *v*. (*-jugum*, a yoke) जिंकणें, वश क.

SUBLET *v*. पोट भाड्यानें देणें [to].

SUBLIMATE (*sublimis*, high)—white रसकापूर.—SUBLIMATION फूल काढणें *n*.

SUBLIME *a*. (do.) उंच; grand उंच, प्रौढ, उमदा, नामी; elate अत्यानंदित, आल्हादित.—SUBLIMITY उंची *f*, थोरवी *f*, थोरी *f*;—of place उंची *f*;—of nature प्रौढी *f*, पोक्तपणा, भरकुमी *f*, उमदेपणा;—of language भाषणाची प्रौढी *f*;—of feeling consisting of a union of astonishment and awe at the contemplation of great scenes and objects वचक *f*, दरारा, भय *n*, इबरत *f*.

SUBLUNAR, -RY *a*. चंद्राखालचा; pertaining to this world इहलोकचा, ऐहिक, प्रापंचिक.

SUBMARINE *a*. समुद्रांतला.

SUBMAXILLARY *a*. (*-maxilla*, jaw-bone) glands लालोत्पादक पिंड *pl*.

SUBMERGE *v*. (*mergere*, to plunge) बुडवणें, मज्जन क.—*i*. बुडणें.—SUBMERSION बुडवणें *n*, मज्जन *n*.

SUBMIT *v*. (*mittere*, to send) yield वश असणें, आज्ञेंत राहणें -वागणें, मान्य होणें; refer दुसऱ्यावर सोपणें -घालणें -ठेवणें: to s. a question to the court.—*i*. दबणें, वश होणें, हार

येणें; आज्ञेंत -हुकमांत राहणें [to].—SUBMISSION वश होणें *n*, शरण जाणें *n*; ताबेदारी *f*, अधीनता *f*, आज्ञांकितपणा; confession of error अपराध कबूल क. -पदरीं घेणें.—SUBMISSIVE *a*. हुकूमबंदा, हुकमी, आज्ञांकित, विनयी.

SUBORDINATE *a*. (*ordinare*, to arrange) खालचे पायरीचा, खालचा; गौण, अप्रधान.—SUBORDINATION खालची पायरी *f*; गौणता *f*, अप्रधानता *f*.

SUBORN (*-ornare*, to furnish) cause to take a false oath खोटी शपथ घ्यायास लावणें, पैसा देऊन बघवणें; procure by indirect means वांकड्या मार्गानें मिळवणें.

SUBPŒNA (*-pœna*, punishment) *Law* कोर्डताचें साक्षीसमन *n*.

SUBSCRIBE *v*. (*-scribere*, to write) write underneath खालीं लिहिणें; sign with one's own hand स्वदस्तूरची सही क., सही क. -घालणें; attest by writing one's name beneath सही घालणें: clerks s. copies of records; promise to give, by writing one's name सही घालून देणें -कबूल क., वर्गणीदार होणें;—a sum of money पट्टीवर लिहिणें, वर्गणी घालणें [for, to].—*i*. कबूल -मान्य होणें; पुस्तक, वर्तमानपत्र इ० चा -ला वर्गणीदार होणें.—SUBSCRIBER सही करणारा; पट्टीवर लिहिणारा, वर्गणीदार.—SUBSCRIPTION सही करणें *n*; सही *f*, हस्ताक्षर *n*, स्वदस्तूर; वर्गणी *f*, पट्टी *f*, टीप *f*.

SUBSEQUENT *a*. (*-sequi*, to follow) मागून झालेला, मागचा, नंतरचा; मागून होणारा [to].—SUBSEQUENCE अनुगमन *n*, मागून येणें *n*.

SUBSERVE *v*. उपयोगास -कामास पडणें.—SUBSERVIENT *a*. उपयोगी, उपयुक्त [to].

SUBSIDE *v*. (*-sidere*, to settle) बसणें, खालीं जाणें, थिरावणें; become tranquil शांत होणें, उतार होणें;—as a swelling ओसरणें, उतरणें, जिरणें [to, into].—SUBSIDENCY बसणें, *n*, थिरावणें *n*, उतार, उपशमन *n*; ओसरी उतरणें *n*.—SUBSIDIARY *a*. कुमकेचा, सहकारी [to].—SUBSIDY कुमक *f*, पुरावा; aid in money पैक्याची कुमक *f*.

SUBSIST *v. i*. (*sistere*, to stand) असणें; continue राहणें, चालणें; be maintained with food and clothing निर्वाह -गुजारा चालणें; वाचणें, जगणें [on, upon].—*t*. सामग्री पुरवणें; अन्नाचा पुरावा क., खायास घालणें. -ENCE अस्तित्व *n*, असणें *n*; उपजीविका *f*, निर्वाह, गुजारा.

SUBSTANCE (do.) real or existing essence पदार्थ, वस्तु *f*, द्रव्य *n*; essential import तत्व *n*, तत्वार्थ; matter वस्तु *f*, द्रव्य *n*, मूर्त्ति *f*; estate ऐवज, ऐपत *f*, संपत्ति *f*; *Theol.*, the divine essence ईश्वरी तत्व *n*.—SUBSTANTIAL *a*. वास्तविक, खरा (good); ऐपतदार, गबरू, खंबीर (free-holder); stout ऐवजदार, घसमर, दलदपट, घट्ट, ठोंसर (cloth); मूर्त्तिमंत, मूर्त्त (agent). -LY *ad*. तत्वतः, वस्तुतः, खरोखर.—SUBSTANTIATE *v*. प्रतिपादणें, पुरवून -खरा करून देणें [by].—SUBSTANTIVE *a*. विशेष द्रव्यवाचक (verb).—*n*. नाम *n*, नांव *n*, विशेष्य *n*.

SUBSTITUTE *v*. (*-statuere*, to put) बदली देणें, -ठेवणें.—*n*. बदल्या, वांटचा, बदली [for].—SUBSTITUTION बदल -मोबदला देणें *n*; बदली *f*; [*Theol.*, the doctrine that Christ suffered vicariously, being substituted, as it were, for the sinner, and that his sufferings were expiatory]. -AL, -ARY *a*. बदलीचा.

SUBSTRATUM (*-sternere*, to strew) खालचा -तळचा थर; *Agric.*, the subsoil खालची माती *f*.—*Metaph.*, basis अधिकरण *n*, आधार.

SUBTERFUGE (*-fugere*, to flee) सोडवण *n*, फट *f*, खिडकी *f*.

SUBTERRANEAN, -EOUS *a.* (*-terra,* earth) जमिनींतला, भुईतला; s. passage तळवाट *f,* सुरुंग; a s. cavity भुंयार *n.*

SUBTILE *a.* (*-tela,* a web) thin बारीक, सूक्ष्म (air); delicate नाजूक, बारीक, तलम (line); acute तीक्ष्ण, तीव्र (pain); discerning सूक्ष्म -कुशाग्रबुद्धि; cunning धूर्त्त, चतुर, कावेबाज.—SUBTILITY बारीकपणा, बारकाई *f,* सूक्ष्मता *f*; कुशाग्रबुद्धि *f*; नाजकाई *f,* बारकाई *f*; धूर्त्तता *f,* कावेबाजी *f.*—SUBTLE *a.* शहाणा, चतुर, कुशळ; कावेबाज, धूर्त्त.

SUBTRACT *v.* (*-trahere,* to draw) काढणें, घेणें; deduct बाद -वजा क. [from]. -ION काढून घेणें *n*; *Math.* वजाबाकी *f.*

SUBURB (*-urbs,* a city) शहरा बाहेरची वाडी *f,* शिवार *n,* शहरपन्हा, वाडी *f,* उपनगर *n* [of, to].

SUBVERT *v.* (*-vertere,* to turn) पाडणें, मोडणें, लयास नेणें; corrupt बिघडणें, भ्रष्ट क. [by]. —SUBVERSION नाश, मोड, विध्वंस, लय. —SUBVERSIVE *a.* नाश -ध्वंसकारक.

SUCCEED *v.* (*-cedere,* to go) take the place of जागीं-स्थानीं-ठिकाणीं येणें, जागा घेणें; follow in order मागें -क्रमानें येणें; come after नंतर-पुढें येणें [in, at].—*i.* जागीं-ठिकाणीं येणें; ascend the throne after the removal or death of the occupant -च्या मागून गादीवर बसणें; obtain the object desired यश -जय मिळविणें, साधणें, फलप्राप्ति होणें, लाभणें, मनोरथ सिद्धीस जाणें; be acceptable मान्य -पसंत होणें.—SUCCEDANEUM (*L.*) बदली, वांटचा, बदल्या, अनुकल्प.—SUCCESS सिद्धि *f,* यश *n,* बरकत *f*; जय, फते *f,* सिद्धि *f.* -FUL *a.* शेवटास गेलेला, सफळ (affairs); विजयी, यशस्वी, कृतार्थ (person). -ION अनुक्रम, परंपरा *f,* क्रम; series हार *f,* माळका *f,* परंपरा *f*: s. of kings, events; lineage वंशावळी *f*; power or right to enter upon the office, rank, position, &c., held by another उत्तराधिकार, दायाधिकार. -AL *a.* पारंपरिक. -IVE *a.* लागोपाठचा, पाठोपाठचा. -IVELY *ad.* एकामागें एक, अनुक्रमानें. -OR स्थानीं -जागीं झालेला -आलेला; उत्तराधिकारी.

SUCCINT *a.* (*-cingere,* to gird) संक्षिप्त, थोडक्यांत आणलेला. -LY *a.* थोडक्यांत, संक्षेपानें.

SUCCOR *v.* (*-currere,* to run) मदतीस धांवण, मदत क., हात देणें.—*n.* मदत *f,* सहाय *n.*

SUCCULENT *a.* (*sugere,* to suck) रसरसीत, रसभरित, कसदार.—SUCCULENCE रसाळपणा.

SUCCUMB *v. i.* (*-cubare,* to lie down) दबणें, वांकणें [to].

SUCH* *a.* of that kind तसा, तसला; of this kind असा, असला; certain अमका, फलाणा.

SUCK* *v.* draw in with the mouth चोखणें; draw milk from, with the mouth स्तनपान क., लुंचणें, दूध पिणें; swallow up गिळणें, गरक क.; in शोषणें, शोषण क.; out चोखून रिकामा क.; up शोषणें.—*i.* स्तनपान क.; शोषणें इ०.—*n.* चोखणें *n,* चोषण *n*; थानचें दूध *n.* —SUCKLE *v.* दूध -थान पाजणें.—SUCKLING तान्हा, थानचा, अर्भक *n, m.*—SUCTION चोखणें *n,* चोषण *n.*

SUDDEN* *a.* happening without previous notice एकाएकींचा, आकस्मिक; hastily prepared घाईनें तयार केलेला, घाईचा; quick जलद, त्वरित.—*n.* अकस्मात झालेली गोष्ट *f*; on s. एकाएकीं, अकस्मात. -LY *ad.* एकाएकीं, अकस्मात.

SUDORIFIC (*-sudare,* to sweat) घाम आणण्याचें औषध *n.*—*a.* स्वेदोत्पादक, घाम आणणारा.

SUDS* *pl.* साबणाचें पाणी *n.*

SUE* *v. i.* entreat विनंती क.; prosecute फिर्याद क. [to, for, at].—SUIT, endeavor यत्न, प्रयत्न; courtship लग्नार्थ स्त्रीची आराधना *f,* -चे आर्जव *pl*; process at law खटला, मुकदमा, वाद; company of attendants परि-

वार, इतमाम, जिलीब *f*; set जोड, रंग, 'सूट' *n*;—of cloth जोड;—of cards बाजू *f*, रंग; to bring s. फिर्याद क., खटला चालविणें; original s. असल मुकदमा [to, for]. —*v.* fit साजणें, मिळणें, जमणें, बसणें; please मर्जीस उतरणें, उतरणें, पटणें, पसंत असणें; become शोभणें, साजणें.—*i.* जम -जवा बसणें, जुगणें, मिळणें. -ABLE *a.* लायक, योग्य [for, to]. -NESS योग्यता *f*, लायकी *f*; जम, जुवा. -OR विनंती करणारा; अर्जदार, फिर्यादी; लग्नासाठीं मागणी घालणारा -मागणारा.—SUITE स्वारी *f*, जिलीब *f*; series हार *f*, कतार *f*, माळका *f*: s. of rooms.

SUET (*sebum*) गुर्दावरची चरबी *f*.—SUETY *a.* चरबीचा; चरबी सारखा.

SUFFER *v.* (*-ferrere*, to bear) feel or endure with pain, annoyance, and the like दुःख -त्रास सोसणें -भोगणें; sustain सोसणें, टिकणें, निभावणें; be affected by सोसणें, खाणें, बसणें (damages); permit परवानगी देणें, जाऊं -होऊं देणें (Lev. xix. 17) [for, by, from, in].—*i.* दुःख -त्रास -क्लेश भोगणें; undergo punishment शिक्षा भोगणें; नुकसान -तोटा होणें;—a limb or member दुखवणें. -ABLE *a.* सोसायाजोगा, सहनीय. -ANCE सोसणें *n*, कंठणें *n*, भोग; patience सहनता *f*, सोसणूक *f*, क्षमा *f*; परवानगी *f*, अप्रतिबंध, कानाडोळा; misery दुःख *n*, कष्ट; bearing of pain दुःख भोगणें *n* -कंठणें *n*, भोग. -ER दुःख भोगणारा, दुःखी, कष्टी, श्रमी; सोसणारा, भोगणारा; होऊं देणारा, सहन करणारा इ०. -ING दुःख *n*, क्लेश, व्यथा *f*; दुःखानुभव, दुःखभोग.—*a.* दुःखी, दुःख भोगणारा.

SUFFICE *v. i.* (*-facere*, to make) पुरणें, पुरे होणें.—*t.* पुरे -तृप्त क. [for].—SUFFICIENCY पुरेपणा, पर्याप्ति *f*, पुरवठा; ability शक्ति *f*, योग्यता *f*, लायकी *f*; competence निर्वाहा पुरतें -त्यागभोगा पुरतें धन *n*; ample stock सामग्री *f*, बेगमी *f*; conceit अहंता *f*, मीपणा. —SUFFICIENT *a.* पुरा, पुरेसा, पर्याप्त; योग्य, लायक; amply s. पुष्कळ, विपुल [for]. -LY *ad.* पुरे, बस, पुरा.

SUFFOCATE *v.* (*faux, faucis*, the throat) श्वास -दम कोंडणें किंवा कोंडून मारणें; extinguish विझवणें (fire) [by, with].—SUFFOCATION दम कोंडणें *n*; कोंडमारा, श्वासावरोध.

SUFFRAGE (*suffragium*, vote) सम्मति *f*, अनुमति *f*.—SUFFRAGAN *a.* सहायकारी: a s. bishop.—*n.* सहायकारी बिशप.

SUFFUSE *v.* (*-fundere*, to pour) व्यापणें, भरणें. —SUFFUSION व्याप्ति *f*, व्यापणें *n*.

SUGAR *O. E.* (*Skr. sarkara*) साखर *f*; that which resembles sugar in taste साखरे सारखा गोड पदार्थ, साखर *f*; flattery गोडगोड गोष्टी *f pl*, साखर *f*, आर्जव, गूळखोबरें *n*.—*v.* साखर घालणें -पसरणें, साखरेंत घालणें, इ०; गोडगोड गोष्टी क., साखर पसरणें, वरपंगी बोलणें [with]. -CANDY खडीसाखर *f*. -CANE ऊंस. -MILL गुऱ्हाळ *n*, चरक. —SUGARY *a.* साखरेचा, गोड, मिष्ट; साखरेच्या सारखा; fond of sugar साखरेचा आवडता, गोडखाऊ; in comp. साखर.

SUGGEST *v.* (*-gerere*, to carry) introduce indirectly to the thoughts सुचवणें; insinuate व्यंगोक्तीनें सुचवणें, दर्शविणें [to]. -ION सूचना *f*; that which is suggested सुचविलेली गोष्टी *f*, सूचना *f*; *Law*, information without oath बिनशपथेची जबानी. *f*. -IVE *a.* सूचनेचा, सूचनात्मक.

SUICIDE (*sui*, of one's self, *cædere*, to kill) the act of designedly destroying one's life, committed by a person of years of discretion and of sound mind आत्महत्या *f*; one guilty of self-murder आत्महत्या करणारा, आत्महत्यारा, आत्मघातक -की.—SUICIDAL *a.* आत्मघाताचा, आत्मघातक.

SUIT, See under SUE.

SULKY* *a.* दुर्मुखलेला.—SULKS *pl.* खळ *f,* फुरगुट *n, m;* to take the s. हट्टास पेटणें, खळ घेणें.

SULLEN *a. O. E.* dismal काळोखीचा, अंधारीचा; malignant दुष्ट; cross दुर्मुखलेला; obstinate कुचर, घुम्या.

SULLY *v.* (See SOIL) मळवणें, मळीत क.; tarnish कलंक -डाग लावणें.

SULPHER (*L.*) गंधक; roll s. नळ्यागंधक. -OUS *a.* गंधकाचा; गंधकाच्या गुणाचा; गंधकयुक्त.—SULPHATE—of copper मोरचूत.

SULTRY* *a.* उकाड्याचा, गदमदण्याचा; उष्ण, गरम; to be s. गदमदणें, उकडणें.

SUM (*summa*) aggregate जमा *f,* बेरीज *f;* amount रकम *f;* substance सारांश, अर्थ, एकंदरी *f;* *Arith.* उदाहरण *n,* हिशोब.—*v.* एकंदर-गोळाबेरीज क.; up उपसंहार क. -MARY संक्षेप, सारांश, उपसंहार.—*a.* संक्षेपाचा, संक्षिप्त; अटपसार, अटपता (proceedings). -MARILY *ad.* संक्षेपानें; थोडक्या काळांत, लागलाच, ताबडतोब.

SUMMER* उन्हाळा, ग्रीष्मकाल;—s. friend सुखाचा -शाळु सोबती. -HOUSE बंगला, बारादारी *f.*

SUMMER *F.* दारकस *f,* दारपटी *f.*

SUMMIT (*summus,* highest) कळस, शिखर *n;* highest degree पराकाष्ठा *f,* सीमा *f,* हद्द *f,* कळस, शिखर *n*: the s. of fame.

SUMMON *v.* (*summonere,* to give a hint) call बोलावणें; cite by authority सत्तेनें बोलावणें; up उत्तेजित क.; call upon to surrender स्वाधीन होण्यास -शरण येण्यास सांगणें [to, for, up] *n.*—*pl.* सरकारी बोलावणें *n,* तलबनामा, 'समन्स' *n,* 'समान' *n.*

SUMPTUOUS *a.* (*sumptus,* cost) खर्चाचा; बहु मोलाचा; magnificent भडक, भळभळीत; s. dinner चमचमीत -चंगीळ जेवण *n.*

SUN* (*Skr. sûrya,* fr. *svar,* heaven) सूर्य; whatever resembles the sun in splendor and importance सूर्य, तेजोराशि; sunshine ऊन *n;* under the s. पृथ्वीवर, इहलोकीं.—*v.* उनांत ठेवणें -टाकणें -घालणें, सूर्यपुट देणें; orbit of the s. सूर्यमंडल *n;* the region of the s. सूर्यलोक; ray of the s. सूर्यकिरण *n;* worshipper of the s. सूर्योपासक, सौर. -BEAM सूर्यकिरण *n.* -BLINK तिरीप *f.* -BURNT *a.* उनानें काळवटलेला. -DAY आदितवार, रविवार; the Christian Sabbath ख्रिस्ती लोकांचा शाब्बाथ.—*a.* शाब्बाथ वाराचा. -DIAL छायायंत्र *n,* शंकुयंत्र *n.* -FLOWER सूर्यफूल *n.* -NY *a.* उनानें केलेला; उनानें रंगवलेला; सूर्यतप्त. -RISE सूर्योदय; the east उगवत *f,* पूर्व *f.* -SET सूर्यास्त; evening संध्याकाळ *f;* the west पश्चिम *f,* मावळत *f.* -SHINE ऊन *n,* निवर *n;* illumination प्रकाश, उजेड, रोशनाई *f.*—*a.* प्रकाशाचा, उनाचा; सूर्या सारखा, तेजःपुंज. -STONE अग्निगर्भ, सूर्यकांत. -STROKE उनाचा चटका, झळ *f;* उनाच्या चटक्यानें होणारा रोग.

SUNDER* *v.* तोडणें, वेगळा क. [in, from].—SUNDRY *a.* अनेक प्रकारचे, नाना प्रकारचे.—SUNDRIES *pl.* परचुरण *n,* किरकोळ.

SUP* *v.* घोट घेणें [up].—*i.* रात्रीचें जेवण क. [on, off]. -PER रात्रीचें जेवण *n;* Lord's s., the memorial sacrament of the communion प्रभुभोजन *n.*

SUPERABOUND *v.* (*super & abound*) बहुत -पुष्कळ असणें [in, with].—SUPERABUNDANT *a.* अतिशय, अधिक.—SUPERABUNDANCE विपुलता *f,* पुष्कळपणा; ऊरपूर *f,* महामूर *f.*

SUPERANNUATED *a.* म्हातारपणानें थकलेला, थकलेला, वयातीत: to be s. साठळणें.—SUPERANNUATION अति वयस्कता *f,* वार्धक्य *n,* साठी *f.*

SUPERB *a.* grand (*superbus*) मोठा, नामी, भव्य; elegant छानदार, भडक, झळक; showy देखाऊ, छानदार.

SUPERCARGO कबाडी गलबताची देखरेख करणारा.

SUPERCILIOUS *a.* (*-cilium,* eyelid) haughty दिमाखदार, तोरेदार; दिमाखाचा, माजुरी. -NESS दिमाख, तोरा, बदमस्ती *f,* पीळ.

SUPEREMINENT *a.* सर्वश्रेष्ठ, अतिश्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट.

SUPEREROGATORY *a.* (*-erogare,* pay out money from the public treasury after asking the consent of the people) अत्याचाराचा, कर्त्तव्यातिरिक्त, पाहिजे त्यापेक्षां अधिक केलेला.

SUPERFICIAL *a.* (*-facies,* make) lying on the surface वरचा, वरल्या आंगाचा; बाहेरील; shallow उपरटप्पी (scholar).—SUPERFICIES वरलें -बाहेरचें आंग *n;* *Civil Law,* everything on the surface of a piece of ground or of a building, so closely connected by art or nature as to constitute a part of it जमीन व तिजवरचीं झाडें वगैरे, घर व त्यावरची माडी वगैरे.

SUPERFINE *a.* फार बारीक, तलम (cloth).—SUPERFLUOUS *a.* (*-fluere,* to flow) अधिक, जास्त, फाजील, उपराळ.—SUPERFLUITY अधिकाई *f,* आधिक्य *n;* something that is beyond what is wanted गरजे बाहेरची वस्तु *f* -गोष्ट *f,* जिची गरज नाहीं ती वस्तु *f,* फालतु जिन्नस *f, m.*

SUPERHUMAN *a.* मनुष्यकृतीच्या पलीकडचा, अमानुष, अतिमानुष्य; s. power विभूति *f,* अमानुषशक्ति *f.*

SUPERINCUMBENT *a.* वर पडलेला, उपरिस्थ.

SUPERINDUCE *v.* ओढून वर आणणें -मिळवणें: long custom of sinning *superinduces* upon the soul new and absurd desires.

SUPERINTEND *v.* पाहणें, चौकशी क. -ठेवणें. -ENCE देखरेख *f,* चौकशी, पाहाणी *f.* -ENT देखरेख करणारा, पाहणीदार, चौकसनीस, 'सुपिंटेंडेंट.'

SUPERIOR *a.* (*super,* above) वरच, वरला; higher in rank or office वरचे पदवीचा -पायरीचा, वरिष्ठ, श्रेष्ठ; higher in excellence सरस, अधिक, श्रेष्ठ, उंच; beyond the power or influence of अनधीन, अस्वाधीन, -च्या वर, पलीकडे, अवश; s. planets, planets more distant from the sun than the earth बहिर्वर्त्ती.—*n.* वडील, श्रेष्ठ जन, ज्येष्ठ; —of a convent महंत, आश्रमगुरु. -ITY वरचा अधिकार, वरची पदवी *f;* वर्चस्व *n,* सरशी *f,* प्राधान्य *n,* श्रेष्ठत्व *n;* प्राबल्य *n,* चढ.

SUPERLATIVE *a.* (*-ferrelatum,* to carry) परमावधीचा, सर्वोत्कृष्ट, पराकाष्ठेचा; *Gram.* परमावधिवाचक; s. degree पराकाष्ठा कोटी *f.* [to].

SUPERNATURAL *a.* वरचा (regions); celestial आकाशीय, अलौकिक, अद्भुत, अमानुष.

SUPERNUMERARY *a.* (*numerus,* a number) नेमणुकी बाहेरचा, जास्ती, फालतु, जास्त; s. expense उपराळ -फाजील खर्च.

SUPERPOSE* *v.* (*-ponere,* to place) -वर ठेवणें.

SUPERSCRIBE *v.* (*-scribere,* to write) -वर लिहिणें; -वर पत्ता लिहिणें: to s. a letter. —SUPERSCRIPTION -वरचा लेख -पत्ता.

SUPERSEDE *v.* (*sedere,* to sit) replace -च्या जागीं दुसरा ठेवणें; make void माजी -रद्द क.; suspend कामावरून अमानत क., दुसरा पाठवून कामावरून काढणें [in, by].

SUPERSTITION (*superstitio,* a standing still over or by a thing; hence wonder, dread, esp. of the divine or supernatural) ignorant and irrational worship of the Supreme Deity अज्ञानभक्ति *f,* अन्यथा भक्ति *f;* excessive exactness in religious practice अति भक्ति *f,* कुभक्ति *f,* अत्याच्यार, भक्तिवेड *n;* worship of false gods खोटे देवाची भक्ति *f;*

false religion खोटा धर्म, अन्यथा -मिथ्या धर्म; belief in omens and prognostics शकुनभोळेपणा, शकुनादिकावर विश्वास.—SUPERSTITIOUS *a.* अत्याचारी, भक्तीचा वेडा; अतिश्रद्धामूलक; शकुनभोळा.

SUPERSTRUCTURE पायावरची इमारत *f*, जमिनीच्या वरचा इमला; वरचा थर.

SUPERVENE *v. i.* (*-venire*, to come) अणखी येणें, नवा येणें; happen घडणें, होणें.—SUPERVENIENT *a.* नवा आलेला.

SUPERVISE *v.* (*-videre*, to see) पाहणें, देखरेख -चौकसी क.—SUPERVISOR पाहणारा, देखरेख करणारा, चौकसनीस.

SUPINE *a.* (*super*, above) उताणा, उलथा; indolent सुस्त, निरुद्योगी.—*n. Gram.* कारक *n.* क्रियावाचक नाम *n.*

SUPPLANT *v.* (*-planta*, sole of the foot) remove by stratagem युक्तीनें -डोईवर पाय देऊन पाडणें; overthrow मोडणें, पाडणें, खालीं पाडणें, मोड क. [in].

SUPPLE *a.* (*-plicare*, to fold) pliant लवचीक, लवका, नरम; flattering आर्जवी, तोंडदेखला; compliant नरम.—*v.* लवचीक क.; नरम क.

SUPPLEMENT (See SUPPLY) पुरवणी *f*, पुरवणीबंद; that which completes पुरवठा *f*, भर *f*, भरती *f*. -ARY *a.* पुरवणीचा, भरतीचा.

SUPPLIANT *a.* (*supplex*, kneeling down) प्रार्थना -विनंती करणारा; expressive of humble supplication दैन्यवाणा, दीन प्रार्थनेचा, विनंतीचा; s. for protection शरणार्थ.—SUPPLICATE *v.* प्रार्थणें, विनवणें, पाय धरणें; entreat for -साठीं प्रार्थना क., मागणें; s. abjectly पदर पसरणें, मिन्नतवारीनें मागणें [for].—SUPPLICATION प्रार्थना *f*, विनंती *f*; मिन्नतवारी *f*, विनवणी *f*.

SUPPLY *v.* (*plere*, to fill) पुरवणें, पुरवठा क.; take the place of -ची जागा घेणें, -वाटचें काम क. [with, to].—*n.* पुरवणी *f*, पुरावा; matter supplied भर *f*, भरती *f*, पुरवठा, वेगमी *f*, साहित्य *n*, भरणा; [*pl.* amount of money provided, as by Parliament or Congress, to meet the annual national expenditures: to vote s.]

SUPPORT *v.* (*-portare*, to carry) bear by being under वाहणें, धरणें, नपडूं देणें, आधार हात -आश्रा देणें; sustain सोसणें, साहणें; assist मदत क., संभाळ क., पाठबळ देणें; maintain पोसणें, पाळणें (a family); carry on चालवणें, चालता ठेवणें (war, government); verify खरा करून देणें, पुरावा करून देणें; uphold by aid मदत क., पुस्ती देणें; अनकूल असणें, अनुमोदन देणें; attend, as an honorary assistant: a chairman *supported* by a vice-chairman;—spirit, courage, &c. दम -धैर्य -अवसान देणें [in, by.]—*n.* धरणें *n*, संभाळणें *n*; आधार, सांभाळ; सहाणें *n*, सोसणूक *f*; निर्वाह; पालन *n*, पोषण *n*; आधार, पाठबळ *n*, आश्वासन *n*; उपजीविका *f*, जिनगी *f* [for]. -ABLE *a.* धारण करायाजोगा; सोसण्याजोगा. -ER आधार देणारा, चालवणारा; पालक, पोषक, पालनवाला; पाठ देणारा, पाठिंबा, सारथी; स्थापना -पुष्टी करणारा. -LESS *a.* निराधार, निराश्रित.

SUPPOSE *v.* (*-pausare*, to pause) lay down without proof अटकळ क., मानणें; imagine कल्पिणें, मनांत आणणें; require to exist or be true आहेसा दाखवणें, गर्भित असणें, दर्शवणें: the existence of things *supposes* the existence of a cause of things.—SUPPOSITION कल्पना *f*, अटकळ *f*, भावना *f*, कल्पित गोष्ट *f*; doubt संशय.

SUPPRESS *v.* (*-premere*, to press) मोडणें, नाहींसा क.; conceal दडपणें, दाबणें, छपविणें; stop बंद क.;—an emotion गिळणें, पिणें. -ION मोडणें *n*, ध्वंस; छपावणी *n*, दाबादाबी *f*; as of urine मूत्रस्तंभन *n*, मूत्रावरोध.

SUPPURATE *v. i.* (*-pus*, matter) पिकणें, पुलणास

येणें.—SUPPURATION पुवळणी *f*, पुवाळणी *f*. —SUPPURATIVE *a*. पिकवणारा.

SUPREME *a*. (*supremus*) highest in authority मुख्य, श्रेष्ठ, वरिष्ठ; most excellent सर्वोत्कृष्ट; utmost पराकाष्ठेचा, बेहद (folly). —SUPREMACY मुख्य अधिकार, प्राधान्य *n*, वरिष्ठता *f*.

SURD (*surdus*) *Alg*. करणी *f*.

SURE *a*. *F*. confident beyond doubt निभ्रांत, निःसंशय; certain खचीत, निश्चयाचा; of certain actions अचूक; to be s. खचीत, निःसंशय; तर बरोक, बरें. -LY *ad*. खचीत निखालस. -TY खचित -निश्चितपणा; security जामीन, जिम्मेदार; monied s. मालजामीन; s. for a s. आडजामीन;—for good and peaceable conduct फिलजामीन;—for the personal appearance of any one when required to attend हाजीर जामीन, दर्शनप्रतिभू; a s. for confidence, one who engages for the general honesty and responsibility of another प्रत्ययप्रतिभू; a s. for the repayment of a loan or fulfilment of an engagement दानप्रतिभू; a s. who engages to give up property belonging to the debtor if he fails to pay the debt द्रव्यार्पणप्रतिभू. -SHIP जामीनकी *f*.

SURF *F*. कांठावर फुटणारी लाट *f*.

SURFACE (*F*. *sur*, *L*. *super*, & *face*) वरचा -बाहेरला भाग, पृष्ठभाग; outward appearance रूप *n*, बाहेरील देखावा, बाह्यरूप *n*; s. of the earth भूतल *n* -पृष्ठ *n*; on the s. वर.

SURFEIT *v*. *F*. ओकारी येईतों खावविणें -जेवायास -खायास घालणें; ओकारी येई तोंपर्यंत खाणें [with].—*n*. टेर *f*, चेल *f*, उपट *f*.

SURGE (*surgere*, to rise) मोठी लाट *f*.

SURGEON *O*.*E*. शस्त्रवैद्य; veterinary s. अश्ववैद्य.—SURGERY शस्त्रवैद्यकी *f*.—SURGICAL *a*. शस्त्रवैद्याचा -वैद्यकीचा.

SURLY *a*. *Ger*. sour दाट्ट, खाट्ट, खट्याळ.

SURMISE *v*. (*mettre*, to put) संशय -वहीम आणणें.—*n*. अंदेशा, वहीम.

SURMOUNT *v*. *F*. overcome पार पडणें, निभावणें; excel मागें टाकणें, चढ -तोड क.

SURNAME (*sur* & *name*) आडनांव *n*, उपनांव *n*, कूळ *n*; [*surnames* originally designated occupation, estate, place of residence, or some particular thing or event that related to the person: Robert *Smith*, William *Turner*]. [in, at, by] नांव *n*.—*v*. आडनांव देणें -ठेवणें.

SURPASS *v*. मागें टाकणें, चढ -तोड क.

SURPLICE (*-pellicum*, a robe) उपाध्याचा झगा.

SURPLUS (*-plus*, more) ऊर *f*, शिलक *f*, उपराळा.—*a*. फाजील, वर राहिलेला.

SURPRISE *v*. (*-prendere*, to take) take unawares एकाएकीं गांठणें, अकस्मात घेरणें; strike with wonder चकवणें, दंग क.; confuse घोटाळ्यांत पाडणें [by, with, in, at].—*n*. विस्मय *n*, आश्चर्य *n*; एकाएकीं गाठणें *n*. —SURPRISING *a*. चमत्कारिक, विस्मय -आश्चर्य उत्पन्न करणारा (patience). -LY *a*. आश्चर्य वाटण्याजोगा.

SURRENDER *v*. (*-rendre*, to render) yield to the power of another स्वाधीन -हवालीं क., सोडणें; yield to any influence वश -स्वाधीन होणें.—*i*. स्वाधीन -हवालीं होणें [to, up]. —*n*. त्याग, परित्याग, अधीनता *f*; शरण येणें *n*.

SURREPTITIOUS *a*. (*-rapere*, to snatch away) खोटा, कपटाचा, कृत्रिम.

SURROUND *v*. (*sur* & *round*) वेढा -घेरा घालणें, वेष्टणें [by, with]. -ING *a*. वेढणारा, वेष्टक; चहूंकडला, आसपासचा, भोंवतालचा,

SURTOUT *F*. वरून घालायाचा अंगरखा.

SURVEILLANCE (*-vigilare*, to watch) पाहरा, चौकी *f*, नजरबंदी *f*, नजरकैद *f*, दृष्टीची कैद *f*.

SURVEY *v*. (*-videre*, to see) पाहणें, निरखणें; examine with reference to condition,

value, &c. पाहणें, तपासणें; measure land, &c. पैमाशी क., जमीन मोजणें.—*n.* पाहणें *n*, टेहळणी *f*, अवलोकन *n*; पाहणी *f*, तपासणी *f*; पैमाशी *f*, जमीनमोजणी *f*. -ING जमीन मोजण्याची विद्या *f*. -OR पाहणारा, चौकसनीस; जमीन मोजणारा, 'सर्वेयर.'

SURVIVE *v.* (*vivere*, to live) मागें -पाठीमागें जगणें -वांचणें.—*i.* जगणें, वांचणें, टिकणें. —SURVIVAL मागें वांचणें *n*.—SURVIVOR मागें वांचणारा; *Law* उत्तराधिकारी.

SUSCEPTIBLE *a.* (*-capere*, to take) ग्राहक, ग्रहणसमर्थ; tender कोमळ, कोंवळा;—as of disease or injury गोडा, दुखरा, कोंवळा [of, to].—SUSCEPTIBILITY ग्राहकत्व *n*, ग्रहणशक्ति *f*.

SUSPECT *v.* (*-specere*, to look) imagine to exist कल्पना क.; imagine to be guilty upon slight evidence or without proof वहीम -अंदेशा येणें; doubt संशय -भ्रांति असणें [of, for].—SUSPICION वहीम, वहमा; संशय, भ्रांति *f*.—SUSPICIOUS *a.* संशयखोर, संशयी; indicating suspicion संशय आणणारा, वहिमाचा, संदेहजनक; doubtful शंकित, साशंक; liable to suspicion संशय येण्याजोगा, संदेहशील.

SUSPEND *v.* (*-pendere*, to hang) टांगणें, लोंबत ठेवणें; make to depend ठेवणें, गुंतवणें, अडकवणें: God hath *suspended* the promise of eternal life on the condition of faith and obedience; cease for a time तहकूब -महकूब क., थांबविणें; hold in a state undetermined तरंगत -मोहगम ठेवणें; debar from any privilege, from the execution from an office, or from the enjoyment of income तूर्त कामावरून -अधिकारावरून दूर क., अमानत ठेवणें, 'सस्पेंड' क.; to s. respiration दम कोंडणें -छाटणें [from, for].—SUSPENSE दुग्धा *f*, अनिश्चय; तहकुबी *f*, महकुबी *f*.—SUSPENSION टांगणें *n*, लोंबत ठेवणें *n*; तहकूब क., ठेवणें *n*, तहकुबी *f*; अमानत क. *n*, अमानती *f*.

SUSTAIN *v.* (*-tenere*, to hold) धरणें, संभाळणें; support पोसणें, पाळणें; suffer सोसणें, भोगणें; sanction मंजूर -कबूल क.: the court *sustains* the action; prove खरा -स्थापित क. [by, in].—SUSTENANCE उपजीविका *f*, अन्न *n*, पोटगी *f*, भक्ष.—SUSTENTATION संभाळ; आश्रय; अन्नसामोग्री *f*.

SUTLER *D.* फौजेबराबर चालणारा वाणी, लष्करी बनिया, *Hind.*

SUTURE (*suere, sutum*, to sew) शिवणें *n*; seam शिवण *f*, संधि, चाळा;—of the cranium कपालसंधि, चाल *f*.

SWAB *D.* बोळा *f*.—*v.* बोळ्यानें झाडणें -साफ क. -पुसणें [up].

SWADDLE* *v.* गुंडाळणें, लपेटणें [up].—SWADDLING-CLOTH बाळंतें *n*.

SWAGGER* *v. i.* मोठाल्या गोष्टी सांगणें, तोरा मिरवणें, ताल तोडणें [about, in, off].

SWALLOW* पाकोळी *f*? निळवी?

SWALLOW* *v.* take into the stomach गिळणें, ग्रासणें; absorb खाणें, गडप क., जिरवणें; up, receive implicitly अविचारानें -डोळे झांकून खरा मानणें -घेणें; गिळणें, उतरणें; appropriate खाणें, गिळंकृत क., डल्ला मारणें; occupy आटोपणें, व्यापणें (time); consume, खर्चणें; engage completely ग्रासणें, वेढणें, गडप क.; —words, letters, &c., in speaking खाणें [up].—*n.* throat अन्नमार्ग, गळा; voracity खादाडपणा; as much as is or can be swallowed at once घोट, बकाणा. -WORT मांदारवृक्ष, अर्क; gigantic s. रुई *f*.

SWAMP* दलदल *f*, पाणथळ *f*, रुतण *f*.

SWAN* राजहंस.

SWARD* गवती जमीन *f*.

Swarm* (*Skr. swar,* to sound) large number of small animals or insects घुंगट *n,* पेंव *n,* लोळ, थवा; any great number झुंड *f,* समुदाय, टोळी *f,* [with].—*v. i.* घोंघों क.;—bees, flies घूंघूं क., गोंगावणें; throng and move busily बुचबुचणें, लसलसणें, सुळसुळाट क. (maggots, fleas, &c.); be thronged गजबजणें, गजगजीत असणें, पेंव फुटणें.

Swarthy* *a.* काळसर, काळवट.

Swath*, line of grass or grain cut by the scythe in mowing पात *f.*

Swathe* *v.* गुंडाळणें, लपेटणें, वेष्टणें [with, in].—*n.* वेष्टण *n,* लपेटणें *n.*

Sway *v. D.* wield with the hand पेलणें, तोलणें, वाहिवाटणें, चालवणें; govern अमल -अधिकार क.; cause to incline झोंक देणें, कल देणें, मन वळवणें [with, over, by].—*i.* have weight कल -तोल -भार असणें -पडणें; lean कलणें, झुकणें.—*n.* वजन *n,* भारदस्ती *f;* अमल, अधिकार; कल, झोंक.

Swear* *v. i.* utter an oath शपथ वाहणें -घेणें; *Law,* give evidence on oath शपथेवर साक्षी देणें; use the name of God profanely देवाचे नांवानें व्यर्थ शपथ वाहणें, देवाचें नांव व्यर्थ घेणें.—*t.* शपथ घालणें -घेणें; शपथ घेऊन साक्षी ठेवणें [into, to, at].

Sweat* (*Skr. svedas*) moisture excreted from the skin घाम, घर्म; moisture issuing from any substance पाझर, निचरा, तेल *n;* toil कष्ट, मेहनत *f,* घाम.—*v. i.* घाम येणें -सुटणें;—copiously डगडगणें, दरारणें; निचरणें, पाझरणें, रेळणें; काबाडकष्ट -घाम येईतों काम क., हाडांचे मणी-रक्ताचें पाणी क.—*t.* घाम आणणें, स्वेदन क.; पाझरविणें; [to s. coin, remove a portion of a piece of coin, as by shaking it in a bag, so that the friction wears off some of the metal, and so that the diminution of the value is not readily perceived].

Sweep* *v.* clean by brushing झाडणें, केर काढणें; carry along or off by a long brushing stroke or force वाहवणें, लोटून नेणें: a flood *sweeps* away a bridge; carry off many at a stroke सपा उडवणें, धोशा पाडणें, झाडून नेणें; observe rapidly, as parts of a surface वरवर पाहणें, नजर चाळवणें [out, from, up, with].—*i.* सपाट्यानें चालणें -जाणें; pass with pomp डौलानें मिरवणें, मिरवत जाणें.—*n.* झपाटा, झटकारा; compass of a stroke अटोका, पोंहोंच *f:* a long s.; sweeper झाडू, झाडूवाला; large oar पतिंगा. -er झाडणारा; झाडू, भंगी, हलालखोर. -ings *pl.* गदळ, गाळ.

Sweet* *a.* saccharine साखरेचा, गोड, मिष्ट; fragrant सुवासिक, मधुर (odor); melodious सुस्वर, गोड, मधुर (voice); beautiful सुंदर, प्रसन्न (face); not salt गोड, गोडा, मिठा (water); not stale ताजा (butter); soft मऊ; obliging बोलून चालून गोड, उपकारी (manners).—*n.* गोड पदार्थ; *pl.* मिठाई *f;* सुख *n,* गोडी *f:* the *sweets* of domestic life; a darling जीवप्राण, प्राणसखा. -en *v.* गोड क. [with].—*i.* गोड होणें. -flag वेखंड *n.* -gum tree, the balsam शिलारस. -heart प्रिय, प्यार. -ish *a.* गोडसर. -meat मिठाई *f,* खाऊ. -ness गोडी *f,* मिष्टपणा, माधुर्य *n;* गोडीगुलाबी *f,* सौजन्य *n.* -potato,—the plant रताळी *f;* —the root रताळूं *n.* -root जेष्ठीमद *f.* -scented *a.* सुवासाचा, सुवासिक. -sop शिताफळा सारखें एक फळ आहे.

Swell* *v. i.* grow larger सुजणें, फुगणें, वाढणें;—as a river फुगणें, तुंबणें, फुगा येणें; —with anger फुगणें;—with pride फुगणें, चढणें, ताठणें;—with grief उमासा येणें; heave खळबळणें, उसळणें (billows); be enlarged वाढणें, जमणें, चढणें (debt); be turgid फुगणें, ताठणें, तमतमणें (words)

—*t.* सुजवणें, फुगारा आणणें; फुगवणें, तुंबवणें; चढवणें, माजवणें; फुगवणें, वाढवणें [up, with].—*n.* सूज *f*, फुगारा; हुंडका, उमाळा; नदी वगैरेचा फुगा; खळबळाट. -ING सूज *f*; हुंडका, उसासा, उमाळा; फुगारा, फुगवणी *f*.

SWELTER* *v. i.* उबणें, डगडगणें.

SWERVE *v. i. D.* चळणें, भकणें [from, to].

SWIFT* *a.* rapid चपळ, जलद; ready तयार, सिद्ध; speedy जलदीचा. -FOOT *a.* जलद चालणारा, पायसूट. -LY *ad.* जलदी, जलदीनें, लवकर, त्वरेनें. -NESS जलदी *f*, चलाखी *f*, त्वरा *f*.

SWIM* *v. i.* float तरणें, तरंगणें; move progressively in water by means of the hands and feet, or of fins पोहणें, पोहून जाणें; be dizzy भोवणें, फिरणें, तिरमिरणें: the head *swims;* be overflowed जलमय होणें, पाण्यानें भरणें, पोहणें: the earth *swims* in rain; abound रेळचेळ असणें, न्हाणें, पोहणें: they now s. in joy.—*t.* पोहणें, पोहून जाणें; immerse in water that the lighter parts may swim बुडविणें: to s. wheat for seed; cause or compel to swim पोहून नेणें, पोहायास घालणें: to s. a horse across a river. -MER तरंगणारा, पोहणारा. -MING तरंगणें *n*; पोहणें *n*; घेरी *f*, तिरमिरी *f*. -LY *ad.* तडाख्यानें, धडकून.

SWINDLE *v. D.* उपटणें, मुंडवणें, धुतारणें [out, of].—SWINDLER धुतारा, उपटया, उचल्या.

SWINE* डुकर *n*.

SWING* *v.* vibrate झोका घेणें -खाणें; practice swinging झोपा घेणें -खेळणें.—*t.* झोपा काढणें, झोके देणें; फिरवणें, खेळवणें, हालवणें: he *swings* his tail.—*n.* झोका, झेंप *f*, आंदोलन *n*;—as of a whip झपाटा, फटकारा, झटका; swinging line, seat, bed, &c. झोंपाळा, चौफाळा;—as erected at fairs रहाट पाळणा;—to swing devotees बगाड *n*; bent वेग, ओघ, भर; free अस्खलित गति *f*.

SWISS *F.* स्विट्झरलंड देशचा राहणारा; स्विस्-भाषा *f*.—*a.* स्विट्झरलंड देशचा; स्विस् लोकांचा.

SWITCH* डाहळी *f*, छडी *f*, शिपटी *f*.—*v.* छडीनें मारणें.

SWIVEL*, a ring which turns upon a pin फिरकी *f*; a small cannon which turns in a socket फिरकीची तोफ *f*, जेजाल *f*.

SWOON* मूर्च्छा *f*, कलम *f*.—*v. i.* मूर्च्छा येणें [away].

SWOOP (See SWEEP) झेंप *f*, झडप *f*.—*v.* झडप घालणें; catch up झेलणें; take with a sweep झेंप घालून घेणें [away, up].

SWORD* तलवार *f*, खड्ग *n*; belt of a s. पडदळें *n*; hilt of a s. परज *n*. -BLADE तलवारीचें पान *n*. -FISH एक जातीचा मत्स्य आहे. -LAW तलवारीचा अंमल; जबरीचा अंमल, जुलूम. -PLAYER पट्टा खेळणारा. -SMAN तलवार बाळगणारा; तलवारबहादूर.

SYCAMORE *Heb.* अंजिराच्या जातीचा एक मोठा वृक्ष आहे.

SYCOPHANT (*Gr. sukon,* a fig, *phainein,* to show) आर्जवी, खुशामती.—SYCOPHANCY आर्जव, खुशामत *f*.

SYLLABLE (*syllaba*) अक्षर *n*.—SYLLABIC *a.* अक्षरसंबंधी, अक्षराचा.—SYLLABUS सारांश, गोश्वारा, सार *n*.

SYLLOGISM (*syllogismus*) *Logic* अवयवघटित वाक्य *n*.—SYLLOGISTIC *a.* अवयवघटित वाक्याचा -संबंधी.

SYLVAN *a.* (*silvea, sylva,* a wood) रानटी, जंगली, वन्य; woody अरण्यमय, वृक्षमय, —*n.* वनदेवता *f*.

SYMBOL (*symbolus*) sign चिन्ह *n*, निशाणी *f*, खूण *f*; a letter which is significant अर्थसूचक अक्षर *n*; summary of the articles of religion धर्मसिद्धांतसार *n*. -IC, -AL *a.* खुणेचा, लाक्षणिक, सांकेतिक, प्रदर्शक, रूपक.

SYMMETRY (*Gr. sun,* with, *metron,* measure).

आकारशुद्धि *f*, अंगसंयोग, वळणशुद्धपणा.—SYMMETRICAL *a*. आकार -वळणशुद्ध, साखसुरत, सुभट.

SYMPATHY (*Gr. -pathos*, suffering) conformity of temperament प्रकृतीचा सारखेपणा, प्रकृतिसाम्य *n*, साधर्म्य *n*; commisseration दुसऱ्याचें दुःख -दरद जाणणें *n*, कळवळा. [with].—SYMPATHETIC, -AL *a*. समदुःखी.—SYMPATHIZE *v. i.* दुसऱ्याचें दुःख जाणणें, कळवळा येणें; समगुण -साधर्म्य असणें [with].

SYMPTOM (*Gr. ptoma*, a fall) खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; *Med.* लक्षण *n*.

SYNAGOGUE (*Gr. sun*, with, *agein*, to lead) a congregation of Jews met for the purpose of worship यहुदी लोकांची भजनसभा *f*; a place where the Jews meet for worship यहुदी लोकांची मशीद *f*, -चें भजनालय *n*, -सभास्थान *n*.

SYNCOPE (*L.*) *Gram.* मधल्या अक्षराचा लोप; *Med.*, a fainting fit मूर्च्छा *f*, मूर्च्छना *f*, कलम *f*.

SYNECDOCHE (*L.*) *Rhet.*, a figure or trope by which the whole of a thing is put for a part, or a part for the whole, the genus for the species or the species for the genus लक्षणा *f*.

SYNOD (*Gr. -hodos*, a way) सभा *f*, मजलस *f*; धर्मप्रकरणी सभा *f*, धर्मव्यवस्थापक सभा *f*.

SYNONYME (*Gr. onoma*, name) पर्याय शब्द, उपशब्द.—SYNONYMOUS *a*. एकार्थक.

SYNOPSIS (*Gr. -opsis*, a sight) गोषारा, सारांश; तक्ता, पत्रक *n*.

SYNTAX (*Gr. -tassein*, to put in order) *Gram.* वाक्यरचना *f*, पदयोजना *f*.

SYNTHESIS (*Gr. -thesis*, a placing) the putting of two or more things together, as in compound medicines संयोजन *n*, मीलन *n*, एकीकरण *n*; *Chem.*, the uniting of elements to form a compound तत्वांचें एकीकरण *n*, तत्वमीलन *n*; [*Logic*, the combination of separate elements of thought into a whole, as of simple into complex conceptions, species into genera, individual propositions into systems]; [*Surg.*, the operation by which divided parts are united].

SYRINGE (*Gr. surinx*, pipe) पिचकारी *f*, चिपनळी *f*.—*v.* पिचकारी मारणें; wash and cleanse by injection from a syringe पिचकारीनें धुणें -साफ क.

SYRUP, See SIRUP.

SYSTEM (*Gr. sun*, with, *histemi*, to place) scheme बेत, व्यवस्था *f*; method क्रम, पद्धत *f*, परिपाठ; totality of parts in the body, performing the same or an analogous or a connected function देहप्रकृति *f*, प्रकृति *f*, भाव, शरीर *n*. -ATIC, -AL *a*. बेताचा, व्यवस्थित; सृष्टिक्रमाचा. -ATIZE *v.* क्रम बांधणें -लावणें, व्यवस्था क. -ATIST व्यवस्था करणारा -लावणारा.

SYSTOLE (*Gr. -stellein*, to set) contraction of the heart and arteries for expelling the blood and carrying on the circulation हृत्पिंडसंकोच; *Gram.* दीर्घ अक्षर ऱ्हस्व करणें *n*.

T

TABASHEER *Per.* तबकीर *n*.

TABBY *a. Per.* बांडा, कसरा.—*v.* बांडा रंगवणें.

TABERNACLE (*taberna*, a shed, or hut) a slightly built or temporary habitation छप्पर *n*, खोपी *f*, मांडव इ०; a tent तंबू, राहुटी *f*; *Jewish antiq.*, a portable structure of wooden framework covered with curtains, which was carried through the wilderness in the Israelitish exodus as a place of sacrifice and worship मंडप; a place of worship भजनालय *n*.—*v.* राहणें, वस्ती क.: Christ *tabernacled* in the flesh.

TABLE (*tabula*, a board) पाटी *f*;—of metal

पत्रा; inscription कोरींव लेख, ताम्रपट, शिलालेख इ०; synopsis तक्ता, पत्रक *n*; *Math.* कोष्टक *n*; an article of furniture चवरंग, मेज *n*, 'टेबल' *n*; entertainment भोजन *n*, जेवण *n*, मेजवानी *f*; company assembled round a table पंगत *f*, भोजनमंडळी *f*; the board on which draughts is played पट; the game itself सारीपाट;—of a hill पठार *f*, तबकडी *f*; *Astron.* कुंडली *f*, the Lord's t. प्रभुभोजन *n*; to serve *tables* गरिबांस अन्न देणें -वांटणें; to turn the *tables* कालचक्र फिरवणें; t. expenses भोजनखर्च.—*v.* पत्रक -तक्ता क. -CLOTH मेजावरची चादर *f*, 'टेबल क्लाथ' *n*. -LAND डोंगरसपाटी *f*, माची *f*, पठार *n*, संथळ *n*. -SPOON मेजावरचा चमचा -ची पळी *f*.—TABLET, a small table लहान मेज *n*, बाजवट *n*; a flat surface for writing, engraving on पाटी *f*, पत्र *n*; *pl.* a kind of pocket memorandum book खिशांत ठेवायाची स्मरणवही *f*; a medicine in square form औषधाची वडी *f*.—TABULAR *a.* पत्रकाच्या -तक्त्याच्या तऱ्हेचा, तक्त्याच्या आकाराचा; तक्त्यांत मांडलेला.

TABOR *Ar.* मृदंग, पखवाज, तबला.—*v. i.* मृदंग वाजविणें. -INE खंजिरी *f*.

TACHYDROMUS ASIATICUS (*Gr. tachus*, fast, *dromos*, a running) a bird पोरचाळवणी *f*.

TACIT *a.* (*tacere*, to be silent) अर्थसिद्ध, ध्वनित, फलित. -LY *ad.* अर्थात, उगाच राहण्यानें. -URN *a.* अबोल्या, मोना, अल्पभाषी; t. person मुकाम्रसोबा, मुकी मण्यार *f*. -ITY अबोलेपणा, मौन्य *n*.

TACK *D.* a small, short, sharp-pointed nail चूक *f*, गुलमेख *f*.—*v.* टांचे -टांके मारणें; fasten जोडणें, जडणें; change the course of, as a ship हेरे घेणें, वाली येणें [to, up, on, together] -LING, cordage दोरखंडें *n pl*, दोर; harness सामान *n*, सरंजाम.

TACT (*tangere*, to touch) युक्ति *f*, कसब *n*, छाप *f*, शिताबी *f*. -IC,-AL *a.* कवाईतीचा.—*n. pl.* कवाईत *f*, सैन्यरचनेची विद्या *f*. -ILE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शनीय, स्पर्श्य.

TADPOLE (*pullus*, a young animal) बेडकीचें पोर *n*, बेडकुली *f*, बेंडकुळी *f*.

TAFFETA *Per.* तापता.

TAIL*, the part of an animal which terminates the body behind शेंपूट *n*, पुच्छ *n*; the back, lower, or inferior part of anything शेवट, शेव; anything hanging long शेंपूट *n*, शेंडी *f*; a train of attendants जिलीब *f*, लवाजिमा, शेंपूट *n*; a downy appendage to certain seeds तुरा; the t. of a comet धूमकेतूचें पुच्छ *n*; -ची शेंडी *f*; to turn t. मुठींत नाक धरणें, शेंपूट खालीं घालणें; to bristle up the t. शेंपूट फिंदारणें; to hang at the t. कासेस लामणें, दुमची पुरवणें.

TAILOR *F.* शिंपी, दरजी. -BIRD a species of—सुगरण *f*.

TAINT *v.* (*tingere*) stain कलंक लावणें, दूषित क.; corrupt बिघडणें, खराब क.; infect रोग लावणें; imbue, as with some extraneous matter which alters the sensible qualities of the substance विजातीय पदार्थ घालून गुण बदलणें [with].—*i.* दूषित होणें बिघडणें; लागणें, नासणें (meat).—*n.* दोष, विटाळ, बाध; कलंक, काळें *n*, काळवटी *f*. -ED दूषित; रोगन दिलेला -लावलेला;—as meat लागरा, लागट, लागलेला; कलंक लावलेला, सकलंक.

TAKE* *v.* lay hold of धरणें, पकडणें; obtain possession of by force घेणें, सई क., जिंकणें (a city); charm मोहणें, मोहित क. (Prov. vi. 25); elect निवडणें, निवडून घेणें: the sparrow *takes* a bush; require लावणें, लागणें, खाणें, घेणें: it *takes* so much cloth to make a coat; this man always *takes* time before he passes his judgmen

picture तसबीर काढणें -उतरणें; assume आपणावर घेणें: *I take* the liberty to say; accept घेणें, स्वीकारणें, ग्रहण क.; partake of घेणें, खाणें, पिणें, सेवन क. (food, a glass of wine); leap उडी मारून जाणें, उडणें (a fence); submit to ग्रहण क., मान्य होणें, वश होणें; endure सोसणें (a joke); allow कबूल क., मानणें: to t. a thing for granted; this I t. to be the man's motive; to t. men for spies; receive घेणें, खाणें, मारणें; to t. well गोड करून घेणें;—as breath, leave, revenge, &c. घेणें; to t. advantage of एकाएकीं गांठणें; सवड साधणें; to t. aim नेम धरणें; to t. air फुटणें, बाहेर पडणें, षट्कर्णी होणें; along नेणें;—arms हत्यारें घेऊन उठणें, लढाईस उठणें; away नेणें, घेऊन जाणें, हिरावणें, हरवणें;—breath थांबणें, दम -विसांवा घेणें;—care संभाळणें, जपणें;—care of पाहणें, देखरेख क., दिमतींत असणें;—down कमी क.; उतरणें, काढणें (pride); गिळणें, घेणें, पिणें (a potion); लिहून -टिपून -टांचून ठेवणें, मांडणें (a man's words); हल्ला क., -चढून जाणें;—effect लागू होणें, -गुण क.;—fire पेटणें, आग लागणें; from -पासून हरण क.; -चें घेणें; बाद -वजा क.; कमी -उणा क.; [-ground to the right or left, *Mil.*, to extend the line to the right or left];—heart मन मिळवणें; धीर धरणें, धीर -दिलासा मिळणें;—heed संभाळणें, जपणें, सावध असणें;—heed to संभाळणें;—hold of धरणें, पकडणें;—horse स्वार होणें, घोड्यावर बसणें; in कोंडणें, कुडणें; फसवणें; घोटाळ्यांत पाडणें; उमजणें, समजणें; गुंडाळून बांधणें, वळकटी -सुरळी क. (a sail); घेणें, आंत घेणें: a leaky vessel will t. in water; घेणें, वेळच्या वेळेस घेणें -पावणें (a newspaper);—in hand हातीं घेणें -धरणें;—in vain व्यर्थ बोलणें -घेणें (Ex. xx. 7.);—leave निरोप -आज्ञा घेणें;—notice पाहणें, लक्ष देणें; चर्चा क., बोलणें;—oath शपथ घेणें; off काढणें, उतरणें (a load); काढणें (one's hat); कापणें, कापून काढणें (a limb); नाश क., प्राण घेणें (life); व्यर्थ -रद्द क., खोडणें (the force of an argument); परत घेणें -बोलावणें; अंग काढणें; पिणें, घेणें (a glass of wine); विकत घेणें, खरेदी क.; नकल -ठाकी उतरणें (models); नकल क., सोंग आणणें, बतावणी क.; on अंगावर घेणें, -वर घेणें (responsibility); सोंग घेणें;—one's own course आपल्या इच्छेप्रमाणें चालणें -क.; out बाहेर काढणें, काढणें; वेगळा क.; वजा क.; काढणें, साफ क. (a stain from cloth);—a paper, &c. वर्गणीदार होऊन घेणें, घेणें;—part वांटून घेणें, विभागून घेणें; part with -शीं मिळणें;—place घडणें, घडून येणें, होणें; लागू होणें;—root रुजणें, मूळ धरणें; मुळावणें, स्थापित होणें;—sides पक्ष -बाजू धरणें;—the air वाऱ्यावर फिरणें, हवा खायास जाणें;—the field लढाईस जाणें, लढाई चालू क.;—to heart मनास लागणें, मनावर घेणें; up उचलणें; विकत घेणें; उसनें घेणें; उधार घेणें (goods); चालू क.; *Surg.* पट्टीनें बांधणें, पट्टी बांधणें; घेणें, खाणें, गुंतवणें (time); धरणें, पकडणें (a thief); कबूल क., विश्वासणें; निषेध क., कान उघडणें; झेलणें, धरणें; व्यापणें, वेढणें, अटपणें, घेणें, गुंतवणें (room); उचलणें, पत्करणें, हातीं धरणें आदरणें, पत्करणें (practice, opinion); लागणें, घेणें: this dictionary has *taken* up six years; पक्ष -कैवार घेणें, कर बसविणें; देणेंघेणें क., व्यवहार क.: to t. up a note at the bank; up arms लढाई चालू क., लढूं लागणें;—upon one's self आपणावर घेणें, पत्करणें; आपल्या कामीं लावणें; आपणास लावून घेणें, आपल्यावर घेणें (punishment).—*i.* fix or be fixed जडणें, लागणें, लागू होणें: the infection did not t.; gain reception चालणें, पटणें, मान्य

होणें: if the thing should t.; go जाणें, घेणें: the fox *took* to the hedge; after मागून जाणें, अनुसरणें, वळण घेणें; सारखा असणें, वळणावर -मोडणीवर जाणें; in with आश्रय धरणें; on सोंग घेणें; to सोकणें, सोकावणें; up वाटणें.—*n.* the quantity of fish captured at one catch एका खेपेस धरलेले मासे *pl*; [*Print.*, the quantity of copy taken in hand by a compositor at one time].—TAKING घेणें *n*, स्वीकार, ग्रहण *n*; धरणें *n*, अपहार; agitation तळमळ *f*, त्रेधा *f*, गडबड *f*.

TALC *Ar.* अभ्रक; calx of t. अभ्रक भस्म *n*; yellow t. पिंवळा अभ्रक.

TALE*, story गोष्ट *f*, कथा *f*, कहाणी *f*; reckoning गणती *f*, माप *n*, हिशेब; to be as a t. that is told नकल होणें; with full t. फडाचे मापानें, भरमापानें. -BEARER चुगल्या, चुगलीखोर, चहाड.

TALENT (*Gr. talanton*, a balance, *Skr. tul*, to bear, weigh) साडेसव्वीस शेरांचें एक वजन आहे; २४३७॥ रु० च्या किमतीचा तोडा -नाणें *n*; intellectual ability गुण; *pl* बुद्धि *f*, अक्कल *f*, प्राज्ञा *f*. -ED गुणी, बुद्धिमान.

TALISMAN *Ar.* ताईत, कवच *n*, पत्र *n*.

TALK *v. Sw.* speak freely बोलणें: to t. French; speak बोलणें, भाषण क.: to t. nonsense; consume in talking बोलण्यांत खर्चणें -गमावणें -दवडणें: to t. away an evening; over -विषयीं बोलणें (a matter).—*i.* बोलणें, गोष्ट क.: I will not t. with you; confer बोलणें, मसलत क.; prate वटवट -बडबड क., बकणें; of सांगणें, कथन क.; to बुद्धिवाद सांगणें, कान झाडणें, चार गोष्टी सांगणें -बोलणें: I will t. to my son respecting his conduct [about, of, with, to].—*n.* गोष्टी *f*, बाता *f*, संभाषण *n*; rumour गप *f*, बोलवा *f*; subject of discourse गोष्ट *f*, चर्चा *f*: this achievement is the t. of the whole town. -ATIVE *a.* बोलका, बहुभाष, वाचाळ, चावट. -ER बोलणारा, संभाषणकर्त्ता; वक्ता; वटवट करणारा, बडबड्या; mere t. तोंडचा शिपाई.

TALL *a. W.* उंच, उंच काठीचा -बांध्याचा.

TALLOW* चरबी *f*. -CANDLE चरबीची मेणबत्ती *f*. -CHANDLER चरबीच्या मेणबत्त्या विकणारा.

TALLY *F.* a stick with notches to mark numbers हिशेब ठेवण्या करितां खांडे पाडलेलें लांकूड *n*, सळई *f*; a match जोड, जवा.—*v. i.* जमणें, उतरणें, जुवा बसणें -मिळणें.—*t.* जमविणें, बसविणें [with].

TALLON *F.* पंजा, नख *n*.

TAMARIND *Ar.* the tree and fruit चिंच *f*.

TAMBOURINE *F.* डफ *n*, टमकी *f*, तंबुरी *f*.

TAME* *a.* domesticated माणसाळलेला, पाळलेला, पाळीव, ग्राम्य; subdued जिंकलेला; spiritless लेचापेचा, मेंगा, नामर्द; flat पचपचीत, पळपळीत (poem)—*v.* माणसाळणें, सवयीचा क.; वश क., वठणीस आणणें. -LY *ad.* नामर्दपणानें, मेंगेपणानें: to submit t. to oppression.—TAMABLE *a.* माणसाळावयाजोगा, वश करायाजोगा, वश्य.

TAMPER* *v. i.* meddle लुडबुडणें, बुचा-लांडाकार-भार क.; practice secretly वळवण्या करितां -फितवण्या करितां संधान -उद्योग चालवणें [with].

TAN *v. F.* impregnate with bark कमावणें, रांपवणें, तयार क. (leather); make brown काळा क.—*i.* काळसरणें, काळवटणें (the skin). -NER कातडें कमाविणारा, ढोर, चाम्हार. -PIT रावणी *f*, चांभाराची कुंडी *f*.

TANGENT (*tangere*, to touch) *Geom.* स्पर्शरेषा *f*; to fly off at a t. ओझरता जाणें.—TANGIBLE *a.* स्पर्श करायाजोगा, स्पर्शायाजोगा, स्पर्शनीय; capable of being realized मिळवायाजोगा, उत्पन्न करायाजोगा; readily apprehensible by the mind सहज समजा-

याजोगा, बुद्धिगम्य, सुगम.—TANGIBILITY स्पर्शाची योग्यता *f*, स्पर्शनीयता *f*.

TANGLE, See ENTANGLE—*n*. गुतागूत *f*, गुरफाटा, गळफाटा.

TANK (*stagnum*) तळें *n*.

TANTALIZE *v. F.* torment or tease by presenting pleasures which cannot be reached छळवणें, चालवणें, झुलवणें, आशेस लावणें [with, by].—TANTALIZATION चाळवणी *f*, झुलवणी *f*.

TANTAMOUNT *a.* (*tantus*, so much, and *amount*) बरोबर, समतोल -भाव [to].

TAP *v. F.* थापटणें, थोपटणें, थाप मारणें [with, at].—*n*. थाप *f*, थापटी *f*;—of the hand, upon a tabor छाप *f*, हात, थाप *f*.

TAP* *v.* पाणी दारू वगैरे पातळ पदार्थ काढण्या करितां (पिप, झाड, फोड इ० ला) भोंक -तोंड पाडणें.—*n*. भोंक *n*, तोंड *n*; पिपांतून दारू काढण्याची नळी *f*; a plug दट्टा, दट्ट्या; liquor which is measured out, as through a tap पिप वगैरेच्या तोंडांतून मोजून काढलेली दारू *f*. -ROOT मुळवा.

TAPE* फीत *f*, नवार *f*; लांब जंत, नाडीतंतु.

TAPER* बारीक मेणबत्ती *f*; a tapering form निमूळता आकार, गोपुच्छाकार.—*a*. निमूळता, चिंचोळा, शुंडाकृति.—*v. i.* बारकावणें, चिंचोळा असणें [off].

TAPESTRY (*tapete*) बुट्टीदार कापड *n*.

TAR* डांबर; a sailor खलाशी.—*v.* डांबर लावणें.

TARDY *a.* (*tardus*, slow) धिमा, सुस्त, मदाड, मंद; late मागस, मागून आलेला.—TARDINESS धिमेपणा, मंदाई *f*.

TARE *O. E.* निदण *n*.

TARE *F.* आभंड *n*, बारदान *n*.

TARGET*, a small shield ढाल *f*; a mark for marksmen to fire at in their practice निशाण *n*; t. practice चांदमारी *f*.

TARIFF *Ar.* जकातीचा निरखनामा.

TARNISH *v. F.* sully विटवणें, मळवणें, मजीत क.; destroy the purity of कलंक -बट्टा -डाग लावणें.—*i.* विटणें, मळणें, मजीत होणें.

TARRY *v. i. W.* stay behind मागें राहणें, राहणें; delay खोळंबणें, खोटी होणें, खोळंबून राहणें; abode राहणें, वस्ती क. [for, at, in].—*t.* खोळंबवणें, थांबवणें.—TARRIER थांबणारा, खोळंबा करणारा.

TARSAL *a. F.* घोट्याचा, गुडघ्याचा.

TARSUS (*L.*) घोटा.

TART* *a.* sour अंबट; sharp खरमरीत, चरमरीत (reply).

TART *a. F.* एक प्रकारचें पक्वान्न आहे.

TARTARUS (*Gr.*) *Gr. Myth.* यमलोक, नरक.

TASK (*taxare*, to rate) business imposed by another सोंपलेलें -मार्थी मारलेलें काम *n*, तोडून -वांटून दिलेलें काम *n*; business काम *n*; burdensome employment जड-अवघड-भारी काम *n*, जिकीर काम *n*; a lesson धडा; to take to t. धमकावणें, निषेध क., शब्दमार देणें.—*v.* काम नेमून देणें; oppress with severe burden पाठीवर धोंड देणें, काचणें. -MASTER काम नेमून देणारा, धडा घालून देणारा; overseer पाहणी करणारा, मुकदम.

TASSEL (*taxillus*, a little die) गोंडा, झुबका.

TASTE *v. F.* try by the touch of the tongue चाखणें, रुचि पाहणें, चव घेणें, स्वाद घेणें, जाणणें; try by eating a little मासल्या करितां खाणें-चाखणें, थोडेसें खाऊन पाहणें; essay अजमासणें, अनुभव घेणें, चाखणें, स्वाद जाणणें; partake of सेवन क., चव घेणें.—*i.* [of] चव घेणें; have a smack स्वाद असणें, वास -गंध -छटा येणें -मारणें.—*n*. स्वाद, रुचि *f*, चव *f*, चट *f*, गोडी *f*; intellectual relish अभिरुचि *f*, गोडी *f*; nice perception रसज्ञान *n*, रस, रसिकता *f*; small portion given as a specimen वानगी *f*, मासला; style शैली *f*, रीत *f*,

धाटणी *f*: the music composed in good t. [for]. -FUL *a.* रुचिकर, मजेदार, चवदार; exhibiting good taste मौजेचा, खुबीदार, छानदार, मजेदार. -LESS *a.* बेचव, निरस, फिका.

TATTLE *v. i. D.* prate बाता -गप्पा छाटणें, बकणें; tell tales चहाडी सांगणें, मुखरस पाघळणें [of, about].—TATTLER बाता छाटणारा, बडबड्या; चहाडखोर, चोंबडा.

TATTOO *v.* (?) गोंदणें.—*n.* गोंदलें *n.*

TAUNT *v. F.* लावून -खोचून बोलणें, ठोंमणा मारणें [with]. -ER लावून -टोचून बोलणारा. -ING ठोमणा, बोंचणी *f.* -LY *ad.* घालून पाडून, खोचून, उपरोधानें.

TAURUS (*L.*) वृषभरास *f.*

TAUTOLOGY (*Gr. tauto,* the same, *logos,* speech) पुनरुक्ति *f,* चर्वित चर्वण *n.*

TAVERN (*tabula,* a board) an inn पोचखाना, खाणावळीचें घर *n*; liquor-shop कलालाचें दुकान *n,* पिठें *n.*

TAW*, a marble to play with बट.

TAWDRY *a.* (from *St. Audrey*) दिखाऊ, पोशाकी, अहेरी.

TAWNY *a. F.* पिंगट, कपिल.

TAX (*taxare,* to value) a levy of any kind made upon property for the support of a government सरकारदेणें *n,* कर, दस्त, पट्टी *f*; a disagreeable duty खटखट *f,* पीडा *f,* लचांड *n*; charge दोष, बोल; t. on boats नजर गलबत *n*; house t. घरपट्टी *f,* उंबर, सारा; land t. सारा; *taxes* in money, not in kind नक्तीबाब *f*; t. on exports and imports जकात *f*; t. on shop-keepers and artificers of a village मोहतरफा.—*v.* कर -दस्त -पट्टी बसवणें; बोल लावणें, दोष ठेवणें: to t. a man with pride; [fix, or determine judicially, as the amount of cost on actions in court] [at, for, with]. -ABLE *a.* साऱ्याचा, कर बसविण्या -घेण्याजोगा (estate). -ATION कर -पट्टी बसवणें *n,* जमाबंदी *f.* -ER कर बसविणारा. -FREE *a.* गैर दस्त, दस्तीबाद.

TEA *Chin.* the leaves of a shrub चहा; decoction of the dried leaves of tea in boiling water चहा, चहापाणी *n*; the evening meal, at which tea is usually served संध्याकाळचें भोजन *n,* चहा. -CUP चहाचा प्याला. -POT चहादाणी *f.* -PLANT चहाचें झाड *n,* -चा रोप. -POY अडणी *f,* तिवयी *f.*

TEACH* *v.* impart the knowledge of शिकविणें, पढवणें;—in an ill-sense शिकविणें, कान फुंकणें, बीर भरणें; conduct through a course of studies शिकवणें, चालवणें (a school); accustom सवयी लावणें (Jer. ix. 5). —*i.* शिकवणें, शिक्षकाचें काम क., पंतोजीपणा क. -ER शिक्षक, शिकविणारा, पंतोजी, 'टीचर'; spiritual t. गुरु, आचार्य; t. of any of the arts वस्ताद. -ING शिकविणें *n*; उपदेश, शिक्षा *f.*—TEACHABLE *a.* शिकवायाजोगा -सारखा, शिक्षणीय; docile सुशिक्ष्य; सालस, गरीब.

TEAK (*Malbar, theka*) सागवान, साय, सायाचा वृक्ष.

TEAL *D.* पाणकोंबडा; cotton t. गिरजा *f.*

TEAM* जोत *n,* सांगड *f.*

TEAR* आसूं *n,* अश्रु *m, n,* नेत्रोदक *n*; flood of *tears* अश्रुधारा *f*; *tears* of affection प्रेमाश्रु *pl*;—of joy हर्षाश्रु *pl.* -DROP अश्रुबिंदु, टीप *n.*

TEAR* *v.* rend फाडणें, चिरणें, विदारणें; lacerate ओरखडणें, बोचकरणें; shatter तुकडे तुकडे -चुराडा -चकणाचूर क.: a state *torn* by factions; pull with violence तोडणें, ओढाताण क., ओढणें (the hair); up, off, away उपटणें, उचकटणें, उखळणें (a floor) [down, up, out, away, off, from].—*i.* rush with

violence धडकाऊन जाणें -चालणें; rage तडफडणें, धडफडणें.—*n.* चीर *f*, फाळा, भेग *f*.

TEASE* *v.* comb, as wool, or flax पिंजणें; scratch, as cloth in dressing for the purpose of raising a nap कापडावर फूल उठवण्या करितां खरवडणें; vex गांजणें, छळणें, जाचणें [by, with].

TEASEL* बिलोरी धोत्रा.

TEAT* आंचूळ *n*, आसड *n*; blind t. खुंट.

TECHNICAL *a.* (*Gr. techne*, an art) पारिभाषिक, लाक्षणिक, विशेष विद्येसंबंधी (phrases). -ITY पारिभाषिकत्व *n*, लाक्षणिकत्व *n*.

TEDIOUS *a.* (*tædet*, it disgusts) wearisome कंटाळा -त्रास येण्याजोगा; slow चेंगट, दीर्घसूत्री. -NESS चेंगटाई *f*, चेंगट -चावटपणा, दीर्घसूत्र *n*.

TEEM* *v. i.* bear प्रसविणें, विणें;—as a plant फळ देणें; conceive गर्भ धरणें; be full प्रचुरमय असणें, भरणें, ऊत येणें: his mind *teeming* with schemes [with].—*t.* प्रसविणें, विणें.

TEENS *pl.* (from *teen*, ten) [the years of one's age having the termination *teen*, beginning with thirteen, and ending with nineteen]: the young lady is in her *teens* ती तरुण बाई विशीच्या आंत आहे.

TEETH (*pl.* of *tooth*) दांत *pl.*—*v. i.* दांत फुटणें -येणें. -ING दांत येणें *n*, दंतस्फोट.

TEGUMENT (*tegere*, to cover) आवरण *n*, वेष्टन *n*. कातडी *f*, कोश, टरफल *n*, इ०.

TELEGRAPH (*Gr. tele*, far, far off, *graphein*, to write) विद्युत् -तारायंत्र *n*, टेलिग्राफ.—*v.* तारायंत्रांतून बातमी पाठविणें [to].—TELEGRAM तारायंत्रांतून पाठविलेली -आलेली बातमी *f*, तार *f*.

TELESCOPE (*Gr. -skopein*, to view) दुर्बीन *f*. TELESCOPIC,-AL *a.* दुर्बिनीचा; दुर्बिनींतून दिसणारा (stars); दूरचा -दूर पाहणारा, दूरदृष्टि (eye).

TELL* *v.* count मोजणें, गणणें; utter बोलणें, सांगणें, उच्चारणें; publish कळवणें, सांगणें, बाहेर काढणें (Gen. xii. 18); teach शिकवणें; inform खबर देणें, सांगणें: promised to t. me of; discover सांगणें, शोधून काढणें, उमगणें: the colors are so blended that I cannot t. where one ends and the other begins; to t. off मोजणें.—*i.* सांगणें, हिशेब देणें; take effect गुण येणें, कळून येणें; to t. heavily in the end अवघड -कठीण जाणें; to t. off चुगली क. -सांगणें. -TALE चुगलीखोर.

TEMERITY (*temere*, by chance) उतावळी *f*, घाई *f*, अविचार.

TEMPER *v.* (*tempus*, time) qualify, as by an ingredient मिसळून नेमस्त -बेताचा क., माफक क.; mollify नरमगरम क.; adjust बराबर -दुरुस्त -नीट क.; bring to a proper degree of hardness कठीण क. (iron); to t. hot water by pouring in cold विसळणें, विसळ घालणें [with, by].—*n.* मिसळीचा, नेमस्तपणा, मिसळ *f*; temperament प्रकृति *f*, देहस्वभाव; disposition प्रकृति *f*, मर्जी *f*, कदर *f*; moderation शांति *f*, संयम *n*; irritation चिडवणी *f*, खंवडाळणी *f*;—of metal पाणी *n*. -AMENT प्रकृति *f*, स्वभाव, तब्यत *f*; bilious t. पित्तप्रकृति *f*;—of equable t. समधात. -ANCE, habitual moderation in regard to the indulgence of the natural appetites and passions नेमस्तपणा, नियमितपणा, संयम *n*, नियंतृत्व *n*;—in eating नेमाचें -मोतादीचें खाणें *n*, मिताहार, अल्पाहार;—in drinking नेमाचें पिणें *n*, मितपान *n*. -ATE *a.* नेमस्त, नियमित, नियतवृत्ति; मितभोजी, मिताहारी; मितपानी, नेमानें पिणारा; not excessive परिमित, सौम्य (climate, heat); not violent शांत, थंड, सौम्य थंडाईचा (speech, language). -ATURE, degree of heat or cold उष्णशीतमान *n*, ऊनथंडीचें

प्रमाण *n*: the t. of the air; constitution तब्यत *f*, प्रकृति *f*.

TEMPEST (*tempestas*) वादळ *n*, तुफान *n*. -OUS *a*. वादळाचा, तुफानाचा, तुफानी.

TEMPLE (*templum*, a space marked out, a temple) देऊळ *n*, देवालय *n*.

TEMPLE (See TEMPER) कानपट्टी *f*, आंख.—TEMPORAL *a*. आंखाचा, कानपट्टीचा.

TEMPORAL *a*.(do.) काळाचा, काळसंबंधी; pertaining to the present world ऐहिक, प्रापंचिक; civil or political राज्यसंबंधी, मुलकी (power).—TEMPORARY *a*. दोन दिवसांचा, चालता, हंगामी, क्षणिक, क्षणभंगुर.—TEMPORIZE *v. i*. काळ -रंग -समय वागणें, समय पाहून वागणें, समयानुसरण क. [with].

TEMPT *v*. (*tentare*, to stretch) try यत्न क., झटणें; instigate चेतवणें, उठावणी क.; put to trial पारखणें, परीक्षा क.; entice to evil मोह घालणें, भुलवणें [with, by, to]. -ATION मोहणें *n*, मोह *n*, पापमोह; परीक्षा *f*, पारख *f*; state of being tempted परीक्षेची अवस्था *f*. -ER मोह घालणारा, मोहक; परीक्षक, पारखणारा, पारखी. -ING *a*. आकर्षक, मोहक. (pleasures).

TEN* *a*. दाहा.—*n*. दहांचा आंकडा, दहांची संख्या *f*, दहं *n*. -FOLD *a*. दहापट, दसपट.—TENTH दहावा. -LY *ad*. दहाव्यानें.

TENABLE *a*. (*tenere*, to hold) राखायाजोगा, धरून ठेवण्याजोगा, रक्षणार्ह; maintainable स्थापायाजोगा, चालायाजोगा, प्रतिपाद्य [by].—TENACIOUS *a*. holding fast चिकट, चिकटून -लगटून राहणारा; adhesive चिकट; holding stoutly to one's opinion or purpose चिकट, चिवट, आग्रही, दृढसंकल्प; t. of memory धारणाशक्तिविशिष्ट; of t. memory आठवणीचा बळकट; t. of life दुर्मर, जिवट. -NESS चिकटपणा, चिकटाई *f*.—TENACITY चिकटपणा, चिकटाई *f*; धारणा *f*, धारणाशक्ति *f*; आग्रहीपणा, निग्रह, चिकटपणा.—TENANT, *Law*, one who holds property of another आसामी *f*, कूळ *n*, सारेकरी, रयत *f*; a t. having no right of occupancy उपरी;—of a building भाडेकरी; occupant राहणारा; t. at will मनकुरी रयत *f*.—*v*. भाड्यानें राखणें घेणें. -RY रयत *f*, रयतावा.—TENANCY, भोगवटा, अधिकार, भोग; भाड्याचें घर *n*.

TEND *v*. (See ATTEND) राखणें, पाहणें, समाचार -घेणें; be attentive लक्ष देणें.—cattle or sheep राखणें, वळणें, चारणें.—*v. i*. move in a certain direction झुकणें, कल असणें, वळणें; aim रोख -धोरण -लक्ष असणें; contribute सहाय देणें -असणें -होणें [to, towards]. -ENCY कल, झोंक, ओढा, तोल, प्रवृत्ति *f*. -ER *v*. द्वावयास काढणें, पुढें ठेवणें; offer in words देऊं ह्मणणें, तोंडानें देऊं ह्मणणें.—*n*. ह्मटलेलें मोल proposal for performing a service advertised for कामकरण्याची अर्जी *f*, 'टेंडर' *n*; [a small vessel employed to attend a large one, for supplying her with provisions, &c.; a car attached to locomotives, to supply them with fuel and water].

TENDER *a*. (*tener*) delicate कोमळ, कोंवळा (plants); easily pained दुखरा, कोमळ, नरम (body); delicate सकुमार, नाजूक, कोमल (a woman); weak and feeble अशक्त, दुर्बळ; youthful तरुण, कोमल, कोंवळा: children are t.; compassionate दयाळू, दयार्द्र; dear आवडता, प्रिय; careful to save inviolate, or not to injure जपणारा, सावध, आस्थेवाईक: the civil authority should be t. of the honor of God and religion; gentle कोमलांतःकरण, कोमलचित्त; apt to give pain दुःखप्रद (subject); pathetic रसिक, मनोवेधक, द्रव आणणारा (expression). -HEARTED *a*. मनाचा कोंवळा, कोमलहृदय. -NESS कोमळपणा, नाजुकाई *f*, मृदुता *f*; हळवटपणा, नरमपणा; चित्ताची कोमलता *f*, कृपा *f*, करुणा *f*.—See the adj.

TENDON (*tendere*, to stretch) शीर *f*, स्नायूच्या शेंड्याकडचा रज्जाकार दृढकार, संधिबंधन *n*.

TENDRIL *F.* पागोरा, ताणा, तंतु.

TENEMENT (See TENABLE) house घर *n*, मकान *n*; *Law*, वतन *n*, मिरास *f*.

TENESMUS (*L.*) हगवणीची मुळमुळ *f*.

TENET (*tenere*, to hold) मत *n*, सूत्र *n*: religious *tenets*.

TENON (do.) कुसूं *n*, कूस *f*.

TENOR (do.) general course of thought विचाराचा रोख -चें धोरण *n*; purport अर्थ, आशय; *Mus.* मध्यसवन *n*; [a person who sings the tenor]; character गुण, लक्षण *n*; *Law*, exact copy of a writing, set forth in the words and figures of it यथामूलमत *f*, असल बरहुकूम नकल *f*, उतारा.

TENSE (*tempus*, time) *Gram.* काळ.

TENSE *a.* (*tendere*, to stretch) ताणलेला, ताठ. —TENSION ताठलेपणा, ताठा, ताण.

TENT (do.) तंबू, डेरा; *Surg.*—for a wound बत्ती *f*; rope of a t. ओढण *f*, तणावा; wall of a t. कनात *f*; porch of a t. तयारी *f*. -ER, -HOOK ताणण्याची अंकडी *f*; to be on the *tenters* जीव ओळकुंब्यांत असणें, चिमट्यांत सांपडणें, दुग्धा असणें.

TENUITY (*tenuis*, thin) पातळपणा, बारीकपणा, सूक्ष्मता *f*; rareness कमीपणा, कमताई *f*, दुर्मिलता *f*: t. of blood.—TENUOUS *a.* पातळ, बारीक, सूक्ष्म.

TENURE (*tenere*, to hold) right of holding, as property सत्ता *f*, स्वत्व *n*; manner of holding lands, tenements, &c. स्वत्वप्रकार. सत्ताप्रकार, कबज *n*; deed of t. पट्टा, सनद *f*.

TEPID *a.* (*tepere*, to be warm) कोमट, सोमट, मंदोष्ण, सोमाळा. -ITY कोमटपणा, कोमटाई *f*.

TERM (*termen*) limit मर्यादा *f*, सीमा *f*; limited time मुदत *f*, वायदा: a word शब्द, वाक्य *n*, संज्ञा *f*, नाम *n*; *pl.* conditions संकेत, प्रतिज्ञा *f*, अड *f*, अट *f*, शर्यत *f*; session न्यायाधिशांची बैठक *f*, न्यायसभेचा काल; *Logic*—of a syllogism अवयव;—of an arithmetical series पद *n*; first s. आदिपद *n*; last t. अंत्यपद *n*; to bring to *terms* कबूल करविणें; वाटेवर आणणें; to make *terms* करार -कबुलात क.; stated t. बंदी मुदत *f*; *pl.* बोलण्या चालण्याचा भाव; good t. with रहस्य *n*, बनाव; मैत्री *f*, सौमनस्य *n*, सूत *n*; ill t. वांकडें *n*, वैमनस्य *n*, वितुष्ट *n*; person on ill t. with वांकडा; lowest t. निदान *n*. —*v.* बोलणें, -ला नांव देणें -चें नांव ठेवणें.

TERMAGANT *F.* केकसामावसी *f*, कैदासीण *f*, कैकया *f*.

TERMES *pl.* (*L.*) वाळवी *f*, उदई *f*.

TERMINATE *v.* (See TERM) limit हद्द -सीमा घालणें -बांधणें; end संपवणें, शेवट क. [by, with, at, in].—*i.* संपणें, समाप्त होणें, उरकणें.—*n.* हद्द *f*, सीमा *f*, खूण *f*.—TERMINATION अंत, शेवट, अवधि; *Gram.* अंत्य वर्ण. —TERMINUS (*L.*) मर्यादा *f*; extreme point at either end of a piece of railway आगगाडीच्या रस्त्याची थोप *f*.

TERRACE (*terra*, the earth) a raised bank of earth ओटा; the flat roof of a house माळवद *n*, धाबें *n*.

TERRESTRIAL *a.* (do.) पृथ्वीचा, पृथ्वीवरचा; t. animals भूचर, स्थलचर; consisting of the earth मातीचा, पार्थिव, मृन्मय (globe); sublunary भूलोकचा, इहलोकचा; belonging to land जमिनीचा, खुश्कीचा: the t. parts of the earth.—TERRITORY अमलांतला देश, मुलूख.—TERRITORIAL *a.* अमलांतल्या देशाविषयींचा, मुलकी.

TERROR (*terrere*, to frighten) धास्ती *f*, भय *n*, दरारा; cause of fear भयाचें कारण *n*, भय *n*, भयहेतु.—TERRIBLE *a.* भयंकर, भयानक;

excessive भारी, जोराचा, जबरदस्त: t. coldness of the weather [to].—TERRIFY *v.* भेडावणें, भिवविणें, भय घालणें [by, with].—TERRIFIC *a.* भयंकर, भयानक.

TERSE *a.* (*tergere,* to rub off) elegantly concise नीट, नेटका, संस्कृत (language).

TERTIAN *a.* (*tertianus*) तिजांतरा, त्र्याहिक. —*n.* तिजांतरा ताप, त्र्याहिकज्वर.

TEST (*testa,* earthen vessel) a vessel in which refiners try metals मूस *f*; trial परीक्षा *f*, कसोटी *f*; means of trial कसोटी *f*, परीक्षासाधन *n*; touchstone कसोटी *f*, वरकल *m f n*; ground of admission or exclusion परीक्षा *f*, कसोटी *f*; distinction विचार, भेद; *Chem.*, a substance employed to detect any unknown constitute of a compound, by causing it to exhibit some characteristic property कसोटी *f*, परीक्षासाधन *n*.—*v.* परीक्षा क., पारखणें, कसोटीस लावणें : to t. gold सुलावणें.

TESTACEOUS *a.* (*testa,* a shell) शिंपल्याचा, शंखविशिष्ट ; t. animal शंखवासी जीव ; t. powders, *Med.* शंखभस्म *n*.

TESTAMENT (*testis,* a witness) a will मृत्युपत्र *n*; [one of the two general divisions of the canonical books of Sacred Scriptures]; Old T. जुना करार; New T. नवा करार. -ARY *a.* मृत्युपत्र संबंधी ; bequeathed by will मृतलेखदत्त.—TESTATE *a.* मृत्युपत्र केलेला ; a person is said to die t. मृत्युपत्र करून मरणें.—TESTATOR मृत्युलेख करणारा.

TESTER (*testa,* the skull) पलंगाचें छप्पर *n*;—over a pulpit, tomb, &c. छत्री *f*.

TESTICLE (*testis*) अंड, आंड; enlargement of the *testicles* कोश -अंडवृद्धि *f*, अंतर्गळ; having testicles अंडील.

TESTIFY *v. i.* (*testis,* a witness, *facere,* to make) साक्ष -शाहिदी देणें (John ii. 25); *Law,* make a solemn declaration under oath प्रतिज्ञेवर लिहून देणें -सांगणें इ० (Num. xxxv. 30) ; declare a charge दोष लावणें (Ps. i. 7.)—*t.* साक्ष भरणें -देणें; प्रतिज्ञा क., प्रतिज्ञेवर सांगणें [to].—TESTIMONY, a solemn declaration or affirmation made for the purpose of establishing or providing some facts साक्ष *f*, प्रतिज्ञापूर्वक साक्ष *f*; affirmation साक्ष *f*, पुरावा; profession कबुलात *f*; witness साक्षी ; the whole divine revelation ईश्वरी शास्त्र *n* (Ps. xix. 7).—TESTIMONIAL खातरीचा कागद -लेख -पत्र *n*, आब्रूपत्र *n*, 'सर्टिफिकिट' *n*.

TESTY *a. F.* खिसखिशा, तुसडा, खडतर, दाष्ट.

TETE-A-TETE *F.* भाषण *n*, संभाषण *n*, तोंडास तोंड *n*; [a form of sofa for two persons, so curved that they are brought face to face while sitting on different sides of the sofa].

TETHER *W.* चारणीची दोरी -सडक *f*, काहाडणी *f*. —*v.* चरायासाठीं दोरी लावून बांधणें.

TETRARCH (*Gr. tetra,* four, *archos*) लहानसा -चौथाईदार राजा.

TETTER*, a vesicular disease of the skin दाद *f*.

TEXT (*textus,* texture) a discourse or composition on which a note or commentary is written मूळग्रंथ, मूळ *n*; a verse or passage of Scripture as the subject of discourse, or in proof of a doctrine प्रतीक *n*, विधि, वचन *n*, शास्त्रवाक्य *n*. -UAL *a.* वचनांतील, वाचनिक. -URE, act of weaving विणणें *n*; that which is woven विणलेलें कापड *n*, विणपें *n*; connection of threads विणकर *f*, वीण *f*, सूतपोत *n*; disposition of parts रचना *f*, जुळणी *f*; of strong t. धनवट ; of fine t. तलम, तलमसुती ; of coarse t. जाडसुती, भरडसुती.

THAN* *conj.* पेक्षां, हून.

THANK* उपकार स्वीकार, कृतज्ञतादर्शन *n*; *pl* उपकारस्तुति *f*.—*v.* express gratitude to for a favor उपकार मानणें -दाखविणें, आभार

मानणें [for]. -FUL *a.* उपकारी, आभारी, कृतज्ञ. -FULLY *ad.* कृतज्ञतापूर्वक, उपकार मानून. -FULNESS उपकारीपणा, कृतज्ञता *f.* -LESS *a.* अनुपकाराचा, कृतघ्न. -WORTHY *a.* उपकार मानण्यास योग्य; meritorious लायक, योग्य.

THAT* *pro.* तो, ती *f,* तें *n*; which जो, जी *f,* जें *n.*—*conj.* जें, कीं.

THATCH* छप्पर, शाकारणी *f.*—*v.* शाकारणी -छप्परबंदी क., छप्पर घालणें. -ER छप्परबंद.

THAW* *v. i.* melt वितुळणें, पाझरणें (ice); become so warm as to melt ice and snow बर्फ वितळे इतकी उष्णता होणें (weather).—*n.* बर्फाच्या -गोठलेल्या पाण्याचा पाझर.

THE* *art.* तो, ती *f,* तें *n,* हा.

THEATRE (*Gr. theatron*) playhouse नाटकगृह *n*; a place of action or exhibition भूमि *f,* आखाडा, फड, रंगभूमि *f.*—THEATRICAL *a.* नाटकाचा, नाटक संबंधी.

THEE* *pron.* तुला; of t. तुझा.

THEFT* चोरी *f,* चौर्य *n*; a petty t. भुट्टेचोरी *f.*

THEIR* *pron.* त्यांचा; ह्यांचा.

THEISM (*Gr. theos,* God) belief or acknowledgment of the existence of a God, as opposed to *atheism* आस्तिक्य *n,* ईश्वर -आस्तिकवाद.—THEISTIC, -AL *a.* आस्तिक्य संबंधी, ईश्वरवादाचा.

THEIST आस्तिक, ईश्वरवादी.

THEME (*Gr. thema*) subject विषय, प्रकरण *n*; a short dissertation composed by a student निबंध, अल्पप्रबंध.

THEN* *ad.* at that time तेव्हां, त्या वेळीं -समयीं; afterward मग, नंतर (Matt. v. 24); therefore यास्तव; at another time दुसऱ्या वेळीं: now and t. कधीं कधीं; till t. तोंपर्यंत. —*conj.* तर, तरी, ह्मणजे, तसें झालें असतां, तर: if all this be so, t. man has a natural freedom.

THENCE* *ad.* from that place तेथून, तेथपासून, तिकडून; from that time तेव्हां पासून त्या वेळेपासून; for that reason तसें झालें असतां, ह्मणून, तशांत. -FORTH *ad.* तेव्हांपासून. -FORWARD *ad.* त्यापासून पुढें.

THEOCRACY (*Gr. theos,* God, *kratein,* to rule) government of a state by the immediate direction or administration of God ईश्वरकर्तृक राज्य *n.*—[THEOCRASY (*Gr. -crasis,* a mixing) a mixture of the worship of different gods, as of Jehovah and idols]. — THEOGONY (*Gr. -genos,* birth) देवोत्पत्ति *f,* देवसर्ग.

THEOLOGY (*Gr. -legein,* to speak) the science of God and his relation to his creatures ईश्वरविद्या *f,* अध्यात्मविद्या *f*; *Hind.* t. ब्रह्मविद्या *f* -ज्ञान *n,* वेदांत.—THEOLOGIAN परमार्थज्ञानी, ईश्वरविद्यावेत्ता; ब्रह्मज्ञानी.—THEOLOGICAL *a.* परमार्थविद्या -ईश्वरविद्या विषयक, ईश्वरविद्येचा; वेदांताचा

THEORY (*Gr. theorein,* to look at) speculation कल्पना *f,* अनुमान *n,* तर्क; exposition of the general principles of any science उपपत्ति *f,* शास्त्रार्थ, बीजनिर्देश; science distinguished from the art विद्या *f,* शास्त्र *n.*—THEORETICAL *a.* काल्पनिक, मनोमय, मानसिक.—THEORIST कल्पना काढणारा, उपपत्ति लावणारा.—THEORIZE *v. i.* कल्पना -तर्क काढणें -बसवणें -बांधणें -रचणें.

THERAPEUTICS *sing. & pl.* (*Gr. therapeuein,* to heal) *Med.* औषधाची योजना *f,* योजना *f.*

THERE* *ad.* तेथें, तिकडे; here and t. इकडे तिकडे, जागोजाग. -ABOUT, -ABOUTS *ad.* near that place आसपास, आगेमागें, आरतापरता; nearly सुमारें, त्या सुमारास: ten men or t. -AFTER *ad.* त्यानंतर, नंतर, तदनंतर; according to त्याप्रमाणें. -AT *ad.* त्या ठिकाणीं; on that account त्यामुळें. -BY *ad.* त्यावरून, त्यामुळें. -FORE *ad.* ह्मणून, मुळें, स्तव, सबब, करितां. -FROM *ad.* त्यापासून. -IN *ad.* त्यांत (त्याजागीं -वेळीं -गोष्टींत -बाबतींत). -INTO *ad.* त्या जागीं

-स्थळीं, त्यांत. -OF *ad.* तेथचा, तेथील (Gen. ii. 17). -ON *ad.* त्यावर, ह्यावर. -OUT *ad.* त्यावरून, त्यांतून. -TO *ad.* त्याला; ह्याला. UPON *ad.* त्यावर, त्यावरून; at once लागलाच. -WITH *ad.* त्यासुद्धां -सहित (Phil. iv. 11).

THERMOMETER (*Gr. thermé,* heat, *metron,* measure) शीतोष्णमापक यंत्र *n.*

THESIS (*L.*) a position or proposition which a person advances and offers to maintain, or which is actually maintained by argument पक्ष, प्रतिज्ञा *f,* सिद्धांत; theme विषय; [an essay presented by a candidate for a diploma].

THEY* *pron.* ते;—used indefinitely माणसें *pl,* लोक *pl*; t. say लोक ह्मणतात.

THICK* *a.* dense दाट (vapors); turbid गढूळ, गदळ (water); close दाट, गच्च (people); following in quick succession एका मागून -एकावर एक येणारा, दाट: favors came t. upon him; *Geom.* घन; having more depth or extent from one surface to its opposite than usual दाट, जाड (paper, cloth, plank);—voice दाटलेला, घोगरा; dull मंद, बहिरट: t. of hearing; intimate सलगीचा, खेळीमेळीचा; closely set दाट, घन, गच्च.—*n.* भर, ऐन *f,* जोर, in comp. भर: भर लढाई the t. of the fight. -LY *ad.* दाट, गच्च, जवळ जवळ; in quick succession पाठोपाठ, लागोपाठ. -EN *v.* जाड -घट्ट क., अटवणें, थिजवणें.—*i.* अटणें, आळणें, जमणें; दाटी होणें, दाटणें; become quick and animated तडखा -कडाखा होऊं लागणें, बितणें, जमणें. -ING मिळण *n,* मिळवण *n.* -ET झाडी *f,* जाळी *f,* झुडूप *n.* -NESS जाडपणा, जाडी *f*; स्थूलता *f*; दाटी *f,* दाटपणा; गाढपणा, निबिडपणा: the t. of trees; जाडी *f,* घनत्व *n*: t. of a board; मंदपणा, मांद्य *n,* जडपणा, जाड्य *n.* -SET *a.* अटस, घट्ट.

THIEF* चोर; a petty t. भुट्टेचोर.—THIEVISH *a.* चोरटा, चोरीच्या स्वभावाचा; चोरा सारखा; चोरीचा; चोर: t. practices चोरचाळे *pl.* —THIEVE *v. i.* चोरी -चोरचाळे क. [from].

THIGH* मांडी *f,* जांघ *f.*

THILL* गाडीची दांडी *f,* शेलें *n.* -HORSE धुरेचा घोडा, धुरकरी.

THIMBLE* अंगुस्तान *n.*

THIN* *a.* not thick पातळ, बारीक (paper); rare पातळ (milk); not close पातळ, तुरळ, क.: the grass is t.; not full बारीक, रोड, शुष्क, कृश, क्षीण (ears of corn); lean बारीक, कृशांग, पातळ आंगी, किडकिडीत: some animals are naturally t.; fine बारीक, सूक्ष्म (sound); flimsy विरविरीत, झिरझिरीत.—*v.* बारीक -पातळ क.; पातळ -विरळ क. -LY *ad.* पातळ, बारीक; विरळ, तुरळक, विसकळ. -NESS पातळपणा, बारकाई *f*; सूक्ष्मता *f,* इ०.—See the adj.

THINE* *pron.* तुझा.

THING* inanimate object वस्तु *f,* पदार्थ; a separate being, whether animate or inanimate व्यक्ति *f,* वस्तु *f*; event गोष्ट *f*; something कांहीं एक, कांहीं अंश; affair गोष्ट *f,* विषय, पदार्थ; *pl* चीज *f,* वस्त *f,* सामान *n,* वस्त्रपात्र *n.*

THINK* *v. i.* exercise the mind मनोव्यापार क., चिंतणें; remember आठवण क.: I would have sent the books, but I did not t. of it; reflect चिंतणें, विचार -ध्यान क. (Mark xiv. 72); form an opinion वाटणें, समजणें, भासणें: I t. it will rain to-morrow; intend मनांत येणें -असणें: I *thought* to promote thee to great honor; presume अभिमान बाळगणें, समजणें (Matt. iii. 9);—much of माननें, लेखणें [of].—*t.* कल्पणें, मनांत आणणें, कल्पना क.; माननें, लेखणें, मोजणें; design योजणें, बेत क. -ING विचारवंत, बुद्धिविशिष्ट. —*n.* विचार, कल्पना *f*; चिंतन *n,* चिंतना *f.*

THINK* *v. i.* दिसणें, भासणें, वाटणें: *methinks.*

THIRD* *a.* ordinal of three तिसरा; तिसऱ्या भागाचा.—*n.* तृतीयांश, तिसरा वांटा -भाग; [the sixtieth part of a second of time; *Law,* the third part of the estate of deceased husband which, by some local laws, the widow is entitled to enjoy during her life]. -LY *ad.* तिसऱ्यानें.

THIRST*, vehement desire for drink तहान *f,* तृषा *f*; eager desire सोस *f,* हव्यास, तृषा *f*; drought अवर्षण *n,* कोरड *n,* शोष. —*i.* for तहान लागणें; सोस -हव्यास लागणें: my soul *thirsteth* for the living God [for, after].—THIRSTY *a.* तहानेला, तहान लागलेला, तृषाक्रांत; parched भुकिस्त, निर्जल (Ps. lxiii.); हव्यासी, सोसी.

THIRTEEN* *a.* तेरा.—*n.* तेराचा आंकडा.—THIRTEENTH *a.* तेरावा; तेराव्या भागाचा. t. lunar day त्रयोदशी *f.*—*n.* तेरावा भाग.

THIRTY* *a.* तीस.—*n.* तिसांची संख्या *f.*—THIRTIETH *a.* तिसावा.—*n,* तिसावा भाग.

THIS* *pron.* हा, ही *f,* हें *n.*

THISTLE* उंटकटारा, कांटे धोत्रा इ० प्रकारचें कांटेझाड *n,* कांटाळी *f*?

THITHER* *ad.* तिकडे; hither and t. इकडे तिकडे.

THONG* वादी *f,* कातड्याची पट्टी *f* -चा पट्टा.

THORAX (*L.*) ऊर, छाती *f,* वक्षस्थल *n.*—THORACIC *a.* छातीचा, उराचा (arteries).

THORN*, a sharp process from the woody part of a plant कांटा, कंटक; a tree armed with thorns कांटेंझाड *n,* कंटकवृक्ष; trouble कांटा, सल *n.* -APPLE धोत्रा.—THORNY *a.* कांट्याचा, कांटेरा; जाचाचा, त्रासाचा, जिकिरीचा.

THOROUGH* *a.* passing through आरपार जाणारा -गेलेला, साद्यंत; complete पुरा, पूर्ण, पक्का (poet). -FARE हमरस्ता, रहदारीचा रस्ता; frequented street आल्या गेल्याचा -वहाता रस्ता. -LY *ad.* पुरतेपणीं, पक्केपणीं. -PACED *a.* पक्का, पुरा.

THOU* *pron.* (*Skr. tvam*) तूं.—*v.* अरेतुरे -हुमरी-तुमरी क.—*i.* अरेतुरे ह्मणणें.

THOUGH* *ad.* and *conj.* जरीं; as th. जसें कांहीं, जणूं कांहीं.

THOUGHT*, act of thinking मनन *n,* चिंतन *n.* विचार; serious consideration ध्यान *n,* मनन *n,* विचार; idea कल्पना *f,* तर्क, भास; intention मनांतील गोष्ट *f,* मनोदय, मनोगत *n,* कल्पना *f.* (Ps. lvi.5); concern काळजी *f,* चिंता *f*; evil t. कुकल्पना *f*; speed of t. मनोवेग; beyond t. अचिंत्य. -FUL *a.* विचारवान -शीलवत; ध्यानस्थ, मननशील, चिंतायुक्त, सचिंत. -FULNESS विचारीपणा, विचारशीलता *f*; ध्यानशीलता *f,* ध्याननिष्ठा *f.* -LESS *a.* अविचारी, निश्चिंत, निष्काळजी; stupid मूर्ख, विवेकहीन, अविचारी.

THOUSAND* *a.* हजार, सहस्र; consisting of a great number लाख, लक्ष, सहस्र; one of a t. लाखाचा मनुष्य, हजारांत एक.—*n.* सहस्र; by thousands हजारों, सहस्रशः.

THOWL*, a rowlock खुंट.

THRALDOM* गुलामगिरी *f,* दासत्व *n.*

THRASH* *v.* beat out grain from झोडणें, मळणी क., मळणें; beat soundly with a stick or whip झोडणें, चोपणें [out].—*i.* मळणी क.; drudge काबाड काम -कष्ट क., दगडफोड क. -ING-FLOOR खळें *n.*

THREAD*, a small twist of cotton drawn out to considerable length दोरा, धागा, सूत *n*; filament,—as of a flower तंतु, तार *f*; a line of gold or silver तंतु, तार *f*; something continued in a course सूत *n,* संविधान *n,* अनुसंधान *n*; spiral part of a screw वेढा; sacred t. of the Hindu जानवें *n,* यज्ञोपवीत *n*; t. investiture मुंज *f,* मुंजीबंधन *n.*—*v.* ओवणें, गोवणें; pass through, as a narrow way अरुंद वाटेनें पार जाणें.

THREAT* भेडावणें *n*, भेडसावणें *n*, धमकी *f*. -EN *v*. भय -धाक घालणें -दाखवणें, भेडसावणें, भेडावणें; exhibit the appearance of something evil or unpleasant as approaching to or towards रंग -राग -डौल दाखवणें: the clouds t. us with rain [with]. -ING भयप्रदर्शक -सूचक.

THREE* *a*. (*Skr. tri*) तीन.—*n*. तिनाचा आंकडा, तिनाची संख्या *f*. -FOLD *a*. तिप्पट, तिहेरी, त्रिगुण. -SIDED तिबाजू.

THRENODY (*Gr. threnos, odé*, song) a song of lamentation मरशा.

THRESH, See THRASH [out].

THRESHHOLD*, ground under a door दारवठा, उंबरा; outset आरंभ, उपक्रम.

THRICE* *ad*. तिनदां, त्रिवार, तीन वेळां; repeatedly वारंवार.

THRIFT* *a*.—See under THRIVE.

THRILL* *v*. pierce टोंचणें, वेधणें.—*i*. झणझणणें, घणघणणें, सणसणणें, भिरभिरणें: a sharp sound *thrills* in the ear;—as in the body शिसारी -शिरशिरी येणें [with, through]. —*n*. शिसारी *f*, शिरशिरी *f*, स्फुरण *n*.

THRIVE* *v*. *i*. prosper भरभराट असणें, जमणें, रंगास चढणें; grow पोसणें, जीवधरणें, वाढणें [upon, with].

THROAT*, fore part of the neck गळा, घसा, कंठ; pharynx घसा; up to the t. आकंठमर्याद.

THROB *v*. *i*. (*Gr. thorobein*, to make a noise) उडणें, ठणकणें; palpitate ऊर उडणें, धडकी बसणें [with].—*n*. ठणका, स्फुरण *n*.

THROE*, extreme pain अतिवेदना *f*; anguish of travail in childbirth वेण *f*, प्रसूतिवेदना *f*.—*v*. *i*. वेदना देणें, तिडका येणें.

THRONE (*thronus*) royal seat गादी *f*, सिंहासन *n*, राजासन *n*, तक्त *n*; sovereign power राज्याधिकार, गादी *f*; an exalted personage आर्य, महाराज.—*v*. गादीवर बसवणें; मोठ्या पदावर बसवणें, पदारूढ क.

THRONG* जमाव, दाटी *f*.—*i*. दाटी -भीड होणें; जमून येणें [in, together].—*t*. दाटी क.; दाटी करून -खेटून त्रास देणें.

THROUGH* *prep*. from end to end पार, आरपार; within आंत; by means of करून, करवी, मारफत; over the whole surface of भर, आंतून: to ride t. the country; in the way of passage मधून, वाटेंतून: to run t. a thicket, as a deer; from beginning to end पहिल्या पासून शेवट पर्यंत, साद्यंत, भर: t. the year.—*ad*. आरपार, पार; पहिल्या पासून शेवट पर्यंत, साद्यंत: to read a letter t.; to the end शेवटास, कडेस: to carry a project t.; to drop t. तुकडे तुकडे होऊन पडणें; नाश पावणें; to fall t. सुटणें, पडणें. -OUT—of time शेवट पर्यंत, भर, पर्यंत;—of space एथून तेथून, साद्यंत, भर.

THROW* *v*. hurl झोंकणें, झुगारणें, फेंकणें; overturn in wrestling चीत -जमीनदोस्त क.; venture at dice फांसा टाकून पाहणें, फांसा टाकणें; cast टाकणें, गाळणें; drive by violence आपटणें, आदळणें: a vessel *thrown* upon a rock; away घालवणें, दवडणें, उधळणें (time, money); वर्ज्य क., टाकणें; back उलट जाब देणें; वर्जणें, नाकारणें; by एकीकडे -सांदीकोंदीस टाकणें (a garment); down पाडणें, पाडून टाकणें (a wall); मान हलका क.; in आंत सोडणें, घालणें; दुसऱ्यापासीं ठेवणें; अजमासानें घालणें; सोडणें, टाकणें; off काढणें, उतरणें; दूर क., टाकणें, सोडणें: to t. all sense of shame; on लादणें;—one's self down अंग टाकणें, निजणें, लवंडणें;—one's self on ओठंगणें, टेंकणें; out सुचवणें, दर्शवणें (an observation); बाहेर टाकणें, फेंकणें; up सोडणें, टाकणें; ओकणें, उलटी क. [at, against, from, through].—*n*. टाकणें *n*, प्रक्षेप;—of dice डाव; distance which a missile is or may be thrown टप्पा, पल्ला.

THRUM *Icel.* वस्त्राच्या दशा *f pl.*—*v.* तारा तोडणें, अनाडीपणानें वाजवणें [on, upon].

THRUSH*—the bird मदनसारिका *f*; *Med.*, minute ulcers covered with a curd-like exudation, found in the mouth मुखमौक्तिक *n*.

THRUST* *v.* push ढकलणें, रेटणें; drive in खुपसणें, खोचणें; away ढकलणें, ढकलून देणें; in खोचून देणें; on पुढें चालवणें, रेटणें; one's self घुसणें, शिरणें; through भोसकणें, ढुसकणें; together दडपणें, चेपणें [with].—*i.* ढुसकी मारणें; आंत शिरणें, पुढें ढकलणें.—*n.* धक्का, धडकी *f*; खुपसणी *f*; ढुसणी *f*.

THUMB* हाताचा अंगठा; one under the t. of छापा खालचा गृहस्थ.—*v.* soil with the thumb or the fingers अंगठ्याचा डाग पाडणें; handle awkwardly अडाणी रीतीनें हातांत धरणें, हातळणें; play with the fingers बोटें चाळविणें: to t. over a tune.

THUMP *Ger.* धपका, धपाटा.—*v.* धपकन मारणें, अपटणें; बुकलणें, कुमलणें [with].—*i.* धप्पा देणें, थडकणें; धपकन पडणें -अदळणें -अपटणें [on].

THUNDER*, sound which follows the flash of lightning गडगडाट, मेघगर्जना *f*, मेघनाद; loud noise गर्जना *f*, गडगडाट.—*v. i.* गर्जणें, गर्जना क.; गडगडणें, गडबड क.—*t.* धडकावून -खणकावून बोलणें [at]. -BOLT वीज *f*, वज्र *n*. -STORM विजेचा पाऊस. -STRUCK दंग, थक्कीत, चकित.

THURSDAY* बृहस्पति -त वार, गुरुवार.

THUS* *ad.* in this manner असा, याप्रमाणें; to this degree इतका.

THWART* *ad.* आडवा.—*v.* मोडा घालणें, अडथळा क., आडवा येणें [in, by].—*i.* move across आडवा जाणें -फिरणें.

THY *pron. O. E.* तुझा. -SELF तूंच, आपण.

TIARA (*L.*) मुगूट, किरीट.

TIBIA (*L.*) नडगी *f*, नळी *f*.

TICK *F.* गोचीड; (prob. from *ticket*) उचापत *f*, उधार *n*.—*v. i.* उचापत देणें, उधार देणें. *D.* टिकटिक वाजणें -शब्द क.—*n.* टिकटिक शब्द.

TICKET *F.* written token चिट्ठी *f*, दाखला; lable चिट्ठी *f*, चकती *f*; as appended to show number and price अंकपट्टी *f*, बीज *n*; as in a lottery टीप *f*, 'टिकीट' *n*, *f*; a certificate or token of right of admission to a place of assembly, or to enter and be carried in a public conveyance दाखलेचिट्ठी *f*, 'टिकीट' *f*, *n*: a railroad t.; a theatre t.—*v.* चिट्ठ्या मारणें -लावणें; टिकिटीवरून ओळखणें; टिकीट देणें [with].

TICKLE* *v.* touch lightly and cause to laugh गुदगुली क.; please by slight gratification थोडक्यांत खुश क. [by, with].—*i.* गुदगुली होणें; गुदगुली क.—TICKLISH *a.* ज्यास गुदगुल्या लवकर होतात तो; unfixed डळमळीत, लटपटीत; difficult कठीण (times).

TIDE*, flux and reflux of the sea भरती *f*, ओहटी *f*; current ओघ, प्रवाह: t. of blood; tendency कल, झोक: time's t. कालदशा *f*; high t. समा; spring t. उधाण *n*; neap t. भांग.—TIDY *a.* चकपक, साखसुरत, ठाकठीक.—TIDINESS चापचोपी *f*, चकपक *f*.—TIDINGS खबर *f*, बातमी *f*, वार्ता *f*.

TIE* *v.* bind बांधणें, बांधून टाकणें, तांगडणें; knit गोवणें, ओवणें; fold गुंडाळणें, बांधणें, लपेटणें; restrain आवरणें, बांधणें, गोवणें; down बांधून ठेवणें, तांगडणें; up जखडणें, तांगडणें;—with a knot गांठ देणें -मारणें [with, to].—*n.* बंद, बंधन *n*, पाश; obligation moral or legal गांठ *f*, नातें *n*, धागादोरा;—as of husband and wife of the soul and body रेशमाची गांठ *f*; knot of hair बुचडा;—as of a necklace गळसरीचा दोरा.—TIED बद्ध, बांधलेला.

TIFFIN *P. E.* फराळ, उपहार, 'टिफिन' *f.*

TIGER (*tigris*) वाघ, व्याघ्र; tiger's skin व्याघ्रचर्म *n.*—TIGRESS वाघीण *f.*

TIGHT *a.* not loose ताठ, तंग; close घट्ट, गच्च, दाट;—as a garment तंग, अटस, अवळ; compact सुटसुटीत, अटोपसार, घट्ट; neat नीट, नीटनेटका. -EN *v.* अवळून बांधणें, अवळणें, ताणणें. -NESS ताठा, ताठपणा, ताण; तंग -अवळ -घट्टपणा; parsimoniousness कृपणपणा, चिकूपणा; stringency तंगचाई *f*: t. of the money market.

TILE* कऊल *n*, कौल *n.*—*v.* कौलें लावणें, शेकारणें [in].—TILING कौलार *n*, खपरेल *n*; tiles कवलें *n pl.*

TILL* *v.* नांगरणें. -AGE नांगरणी *f*, शेती *f*, लागवड *f.* -ER नांगरणारा, शेतकरी.

TILL* *prep.* पर्यंत, पावेतों; t. now आजपर्यंत.

TILT*, covering over the head भुरका, भुरकी *f*; covering for a cart, boat, &c. भुरका, पाल *n*, चांदवा, छत *n*, इ०; the military exercise भालेकरोली *f*; thrust ढुसणी *f*, खुपसणी *f.*—*v.* कलंडणें, कलंडून ओतणें; ढुसणें, खुपसणें; घणानें ठोकणें, घण मारणें [up, over].

TIMBER* इमारती -सुतारकामी लांकूड *n*;—of a house लांकडीकाम *n*, लांकूड *n.*

TIMBREL *Sp.* डफ *n*, खंजिरी *f.*

TIME*, portion of duration काळ, वेळ *m, f*; a proper time प्रसंग, वेळ *f*: there is a t. for every purpose; unmeasured duration काळ: space and t.; duration of one's life आयुष्य *n*: your t. is not your own; it belongs to God, to religion, to mankind; age काळ, युग *n*: ancient t.; allotted period वेळ, समय, मुदत *f*, अवधि *f*: the t. of life is short; delivery प्रसूतकाळ, वेळ *f*, दिवस *pl*: she was within one month of her t.; repetition वेळ, वेळा *f*, वार (दोनवेळां, त्रिवार); state of things at a particular period काल, दिवस *pl*: good *times*, hard *times*; at a certain t. एकदां, कोण्याएका काळीं; present life इहलोक -जन्म t. or eternity; tune ताल, गत *f*; *Gram.* काल; in the course of t. कालेंकरून, कालगतीनें; lapse of t. कालगति *f*, कालचक्र *n*; spirit of the t. कालमाहात्म्य *n*, युगधर्म; to kill t. काल लोटणें -ढकलणें; to spend t. rightly सत्कालक्षेप क.; for a long t. वाढवेळ; given t. नियमित काल; of t. immemorial कें काळचा, काळोकाळचा; the three *times* (past, present, and future) कालत्रय, कालत्रयीं; in the three *times* त्रिकाल; *times* are changed कालचक्र फिरलें, दिवस मागें पाहतात; up to that t. तावत्काल; to take one's t. सावकाशीवर घेणें; in good t. सुवेळीं, वेळेवारीं; unseasonable t. अवकाळ, गैरहंगाम; to consider t. and season वेळ अवेळ पाहणें; according to the t. समयानुसार; at some t. or other कधीं तरी; at *times* कधीं कधीं, कधींमधीं; hard *times* कठीण दिवस *pl*, कडू काळ; from t. to t. वारंवार, वेळोवेळां; to have t. पावणें; in t. and tune तालसुरीं; mean or common t. मध्य *n*, घन *n*; beat t. with a song तालधरणें: *Mus.*, quick द्रुत *n*, ओघ; slow t. ठाय *f*; with reference to repetition पट, गुण: five *times* पांचपट.—*v.* वेळ अवेळ पाहणें, वेळेवार क.; regulate as to time वेळ सांगणें -नेमणें -बांधणें; ascertain the t. of -ची वेळ मोजणें; measure, as in music ताल धरणें [to]. -HONORED *a.* फार दिवसांचा ह्मणून प्रतिष्ठित मानलेला. -KEEPER घड्याळ *n*, कालयंत्र *n*; a person who keeps, marks, or regulates the time, as of the departure of conveyances घड्याळजी ? 'टैम कीपर';—in musical performances ताल धरणारा, तालीं *a.* करी. -वेळेवरचा, वक्तशीर,—*ad.* वेळे-

वारीं, समयास, वेळेस. -SERVER काळ -रंग पाहून चालणारा, समयानुसारी, कालानुरोधी. -SERVING *a.* समयानुसरण *n.* -TABLE वेळापत्रक. *n,* 'टैम टेबल' *n.*

TIMID *a.* (*timere,* to fear) भित्रा, बुजरा, भ्याड. -ITY भित्रेपणा.—TIMOROUS *a.* भित्रा, भ्याड. भयशील ; भयाचा.

TIN*, the metal कथिल *n*; thin plates of iron covered with tin कल्हईचे लोखंडी पत्रे *pl,* टीन *n*; money पैका, पैसा.—*v.* कल्हई क. -लावणें.

TINCAL *Hind.* टांकणखार.

TINCTURE (*tingere,* to tinge) a shade of color छटा, वास, लकेर *f*; *Med.* अर्क.—*v.* छटा -चुणूक -लकेर आणणें -देणें; imbue the mind of मनांत भरणें [with].—TINGE *v.* छटा -लकेरी आणणें -देणें, -युक्त क. [with].—*n.* छटा, लकेरी *f,* धुनक *f*; color छाया *f,* रंग.

TINDER* पेटवणें *n,* चेतवणें *n,* गूल *m,f.*

TINGLE *v. i. W.* feel a kind of thrilling sensation भणभणणें, झणझणणें, सणसणणें; feel a short thrilling pain चुरचुरणें, सळकणें, चुणचुणणें; have a slight pricking sensation मुंग्या येणें, खरख-हुळहूळ सुटणें, खाज सुटणें [with].—TINKLE *v. i.* किणकिणणें, छणछण वाजणें.—TINKER जुनीं भांडीं विकणारा.

TINSEL *F.* shining material made for ornamental purposes खोटा कलाबतू, तोई *f*; बेगड इ० ; something having a false lustre बेगडी डागिणा.

TINT (*tingere,* to dye) *v.* रंग -छटा देणें [with].—*n.* रंग, छटा, लकेरी *f,* धमक *f.*

TINY *a. W.* चिंगुला, चिमकुला, चिमणा.

TIP *D.* अणी *f,* अणकुची *f,* बोंडी *f,* अग्र *n.* —*v.* अणीवर लावणें -चढवणें; टोपण -शेंबी बसविणें : to t. anything with gold [with]. —*Ger.* टिचणें, टिपणें. -CAT इटीदांडू.

TIPPLE *v. Ger.* दारू पिणें, निशाबाजी क.—TIPPLER दारूबाज, छाकटा.—TIPPLING-HOUSE कलालाचें दुकान *n.*—TIPSY *a.* झिंगलेला, मस्त ; झिंगल्या सारखा झालेला, झोकेखाणारा.

TIRE*, head-dress मुगूट ; attire पोशाक, आभरण *n*; iron band of a wheel धांव *f.*

TIRE* *v.* दमवणें, श्रमवणें [with].—*i.* दमणें, थकणें, श्रमणें.—TIRED श्रमलेला, भागलेला, श्रांत. -SOME *a.* श्रमाचा, कष्टाचा; tedious कंटाळा आणायाजोगा, त्रासदायक, जिकिरीचा, किचर.

TISSUE *F.* cloth interwoven with gold or silver जरीकापड *n*; connected series जाळें *n,* सुतार्डे *n,* रचना *f,* ग्रंथ : a t. of lies; *Anat.* शरीररचना *f.*—*v.* रचणें, विणणें.

TIT *Icel.* small horse तट्टू *n*; in contempt, a woman बायरूं *n*; a small bird लहान पक्षी, पांखरूं *n*; -t.-for-tat टीपास टीप, यमकाला यमक.

TITHE* दहावा हिस्सा, दशमांश.—*v. i.* दहावा हिस्सा देणें.—*t.* दहावा हिस्याचा कर बसविणें -घेणें (Luke xi. 42).

TITILLATE *v. i.* (*titillare*) गुदगुल्या होणें.

TITLE (*titulus*) name नांव *n*;—of a book ग्रंथनाम *n*; appellation of dignity किताब *n,* प्रतिष्ठानांव *n,* नांव *n*; claim दावा, हक, सत्ता *f*; t.-deeds कबाला, सनदा, खतें वगैरे कागदपत्र *n pl.*—*v.* नांव ठेवणें -देणें. -PAGE ग्रंथाच्या नांवाचें पत्र *n,* मलपृष्ठ *n,* 'टैटल पेज' *n,* मुखपत्र *n.*

TITTLE-TATTLE *Ic.* बकबक *f,* वटवट *f.*

TITULAR *a.* (See TITLE) नांवाचा, नामधारी (a king).

TO* *prep.* noting access स, ला, पासीं, जवळ, कडे;—nearness to कडे, जवळ, पासीं, प्रत : he is rising *to* wealth ;—extent पावेतों, तों, पर्यंत, तोंवर : to beat one *to* death ; they met us *to* the number of one hundred ;

—comparison हून, पेक्षां ताडून -लावून पाहिलें असतां: all that they did was piety *to* this;—addition अणखी, शिवाय, खेरीज: wisdom he has, and *to* his wisdom courage; accord प्रमाणें, सारखा: she has a husband *to* her mind;—apposition -शीं, वर: they engaged hand *to* hand; accompaniment वर: she sang *to* his guitar; *to*-day आज; *to* and fro इकडे तिकडे; मागें पुढें; *to* the face तोंडावर, समक्ष, रुबरू; *to* wit ह्मणजे; समजणें; as *to* विषयीं, संबंधी;—as a sign of a verb स, ला, साठीं.

Toad* मोठा बेडूक, चामडेडेरक. -stool कुत्र्याचें मूत *n*, अळंबें *n*.

Toast *v.*(*torrere*, to parch) भाजणें, भाजन क.; warm thoroughly गरम क., शेक देणें: to t. the feet; drink to the health, or in honor of -चें कुशल चिंतून किंवा -च्या सन्मानार्थ दारू पिणें.—*n.* विस्तवावर भाजलेली रोटी *f*, 'तोस्त'; [the name of any person, esp. a person of distinction, in honor of whom health is drunk; anything considered worthy to be commemorated in a similar way].

Tobacco (*Sp. tabaco*, from the Indian *tabaco*, the tube or pipe in which the Indians smoked the plant, transferred by the Spaniards to the herb itself) तंबाखु *f*.

To-day* *ad.* आज, आजच्या दिवसास -सीं.—*n.* आजचा दिवस.

Toddy *Hind.* ताडी *f*.

Toe* पायाचें बोट *n*; great t. पायाचा अंगठा; little t. पायाची करंगळी *f*; space between *toes* बेचक *n*; t. ornament जोडवें *n*.

Together* *ad.* in the same place एकत्र, एका ठिकाणीं; in the same time एकेवेळेस, बराबर; in or into union संगें, संगतीं, बराबर, सुद्धां; in concert एकमतानें, मिळून; t. with संगें, संगतीं, सहवर्त्तमान [with].

Toggle *Ger.* सुरसा.

Toil* *v. i.* कष्ट -मेहनत क., खपणें [for, at].—*t.* कष्टविणें, श्रमविणें.—*n.* कष्ट, श्रम, मेहनत *f*. -some *a.* कष्टाचा, श्रमाचा, मेहनतीचा.

Token*, sign खूण *f*, लक्षण *n*, चिन्ह *n*; memorial of friendship स्नेहाची ओळख *f*, यादगिरी *f*, आठवणूक *f*; [*Print.*, ten quires of paper].

Tolerate *v.* (*tollere*, to lift up) suffer to be or to be done without prohibition परवानगी -मोकळीक देणें, मनाई न क., सहन क., नको न ह्मणणें (opinions, practices).—Toleration, Tolerance परवानगी *f*, अप्रतिबंध, मोकळीक *f*.—Tolerable *a.* supportable सोसायाजोगा, सहनीय, सह्य; moderately good चालायाजोगा, कामचलाऊ, माफक (translation).—Tolerably *ad.* बरा, बराच.—Tolerant *a.* परवानगी देणारा, अडथळा न करणारा, सहिष्णु.

Toll* जकात *f*, दस्तुरी *f*; t.-gatherer नोकदार, जकातदार; t. paid by ships on clearing out of a port पाग. -booth जकातीचा नाका, जकातकट्टा, दस्तुरी *f*.

Toll *v. W.* राहून राहून घांट वाजविणें: to t. the funeral bell.—*i.* राहून राहून (घांट) वाजणें.—*n.* राहून राहून होणारा नाद, सावकाशीचा नाद.

Tomb *F.* grave प्रेताची खांच *f*, प्रेताचा खाडा, शवगर्ता *f*; monument erected to the memory of the dead थडगें *n*, कबर *f*, समाध *f*. -stone कबर *f*.

To-morrow (*to* & *morrow*) उद्यां, उदईक *f*.—*n.* उद्यांचा दिवस.

Tom-tit (*Tom* & *tit*) एक लहान पक्षी आहे.

Tom-tom, *Hind.* टिमकी *f*.

Tone (*tonus*, sound) नाद, स्वर, आवाज; accent स्वर; *Mus.* मूर्च्छना *f*; *Med.* सुभावना *f*, सद्भावना *f*, प्रकृतीचा ताळ; temper तब्यत

f, प्रकृति *f*; tenor बोलण्याचा रोख -चें धोरण *n*, शैली *f*; general style धाटणी *f*, धाटी *f*: a low t. of morals; prevailing color of a picture चित्राचा मुख्य रंग; to recover one's healthy t. from sickness, anger, hatred, &c. प्रकृति ताळ्यावर येणें.—TONIC *a.* स्वराचा; increasing strength शक्तिवर्द्धक; *Med.* रोचक, अग्निवर्द्धक.—*n. Med.* दीपन *n*, पाचक औषध *n*; *Mus.*, the key-tone or first tone of the scale अंशस्वर; quarter t. श्रुति *f*; half t. स्वरांश.

TONGS *pl.* सांडस, चिमटा, गावी *f*.

TONGUE*, the member जीभ *f*, जिव्हा *f*, रसना *f*; speech बोलणें *n*, भाषण *n*: much t. and much judgment seldom go together; power of articulate utterance वाचा *f*, वाचाशक्ति *f*, वाणी *f*; language बोली *f*, भाषा *f*; mother t. जन्मभाषा *f*; words शब्द *pl.*, बोलणें *n*, तोंड *n* (1 John iii. 18); a nation, as distinguished by language देश, लोक;—of flame or fire आगीचा लोळ, आगीवळा, झोत;—of a bell लोळा, लोळी *f*;—of a balance कांटा; to hold the t. तोंडास खीळ घालणें; to bridle the t. तोंड आटोपणें; tip of the t. जिव्हाग्र *n*; root of the t. जिव्हेचा कांदा; projection on the side of a board which fits into a groove कुसूं *n*; narrow strip of land, projecting from the main into a sea or a lake भूशलाका *f*; taper part of anything चिंचोळा भाग, गोपुच्छ *n*.—*v. i.* बोलणें; वटवट -बडबड क. -TIED *a.* बांधलेल्या जिभेचा, बद्धजिव्ह.

TONSIL (*tonsillæ*) अमृतकळा *f pl.*

TONSURE (*tonsura*) डोई क. *n*, केंस काढणें *n*; t. of the head of a child to form the shendi चौल *n*;—the ceremony जावळ *n*, जायवळ *n*.

TOO* *ad.* over फार, फारच, अति; also ही, पण, देखील.

TOOL*, instrument of manual operation हत्यार *n*, आऊत *n*, शस्त्र *n*; any instrument of use साधन *n*, उपकरण *n*, हत्यार *n*: person used as an instrument by another person,—a word of reproach हातगुंडा, ससाणा, कुत्रा.

TOOTH* दांत, दंत;—of a comb, wheel, &c. दांत, दांता; a prong कांटा; taste रुचि *f*, चव *f*: these are not dishes for thy dainty *tooth*; to show the *teeth* धमकावणें, धमकी दाखवणें; to cast in the *teeth* तोंडावर अपमान क.; to do in the *teeth* of नाकावर पाय देणें; to the teeth of तोंडावर. -ACHE दंतशूळ, दांतदुखी *f*. -BRUSH दांत घांसायाची कुंची *f*, दांतवण *n*, इ०. -PICK दांतकोरणें *n*. -POWDER दारशिणा, दांतवण *n*.

TOP*, highest part शेंडा, माथा, शिखर *n*, अग्र *n*; utmost degree कळस, सीमा *f*; highest rank वरची पायरी *f*, पदवी *f*, मुख्य -अग्रस्थान *n*: at the t. of one's class; chief person प्रमुख, शिरोमणि, अग्रगण्य: the t. of zealots; crown of the head टक्कल *n*, माथा; upper part of the plant शेंडा, माथा; t. of a mountain शिखर *n*.—*Ger.* भोंवरा; humming t. जंगीभोंवरा; a dint struck on a t. घुमा; the swift spinning of a t. upon one spot निधा.—*v.* वर उचलणें; rise to the top of माथ्यावर चढणें; surpass वरचढ होणें, मागें टाकणें; crop बोखा -डिचक्या तोडणें (trees); off पुरा क., कळस क.—*i.* उंच असणें; वर्चस्व असणें [by]. -KNOT बुचडा. -MOST *a.* अगदी वरचा, अग्रतम. -SY-TURVY *ad.* उलथा पालथा, उलटा सुलटा, खालवर.

TOPAZ (*topazon, Skr. tapus*, fire) a mineral पुष्पराग.

TOPIC (*topica*) विषय, प्रकरण *n*. -AL *a.* विषयाचा, प्रकरणाचा; local एकेदशी, विशेष स्थानाचा.

TOPOGRAPHY (*Gr. topas*, place, *graphein*, to describe) स्थानवर्णन *n*, विशेष स्थलवर्णन *n*.

TORCH *F.* मशाल *f*, दिवटी *f*, टेंभा. -BEARER मशालजी.

TORMENT *F.* अति पीडा *f*, यातना *f*, तीव्र वेदना *f*.—*v.* यातना देणें, पीडा क.; tease छळणें, गांजणें [with, by, for].

TORNADO *Sp.* तुफान *n*, प्रभंजन.

TORPID *a.* (*torpere*, to be stiff) numb बहिरा, सुना, निचेत; dull मंद, सुस्त.—TORPOR सुनेपणा, बधिरपणा; मंदपणा, सुस्ती *f*.

TORRENT (*torrens*, boiling) a violent or rapid stream मुसंडा, झोत, लोंढा; rapid flow ओघ, धार *f*, धारा *f*: t. of vices and follies.

TORRID *a.* (*torrere*, to parch) उनानें वाळलेला -करपलेला, रुक्ष (plain); dried with heat उनानें वाळलेला -करपलेला (plain); t. zone उष्ण कटिबंध.

TORT (*tortus*, twisted) *Law*, a wrongful act for which an action will lie अपकृत्य *n*.

TORTOISE (*tortus*, crooked) कांसव *n*, कूर्म *n*. -SHELL कचकडा, कांसवाची पाठ *f* -पाठीचें हाड *n*.

TORTURE (*torquere*, to twist) extreme pain अति दुःख *n*, वेदना *f*, व्यथा *f*, यातना *f*, हाल *pl*; severe pain inflicted judicially कठीण शिक्षा *f*, राखेचा तोबरा, मिरच्यांची धुरी *f* इ०—*v.* शरिरास फार दुःख -यातना देणें, हाल क.; अति क्रूर -भारी शिक्षा क., उरावर धोंड देणें, टिपऱ्या लावणें, चरकांत घालणें इ० [by, with].

TOSS *v.* *W.* throw with the hand टाकणें, उडवणें, फेंकणें;—the head कोलणें, वर क.; cause to rise and fall खालींवर क.: to be *tossed* on the waves; agitate खवळणें; harrass त्रास देणें, छळणें, कष्टी क., भागवणें; keep in play खेळवणें, चाळवणें.—*i.* तळमळणें, तडफडणें;—in passion धडफडणें, तडफडणें; to t. up, to throw a coin into the air and wager on what side it will fall छापतराजू खेळणें.—*n.* कोलणें *n*, फेंकणें *n*; उडवाउडव *f*, उलथापालथ *f*. -ING तळमळ *f*, तडफड *f*; t. and stamping wildly आदळआपट *f*, अदळाअदळ *f*.

TOTAL *a.* (*totus*, all) सर्व, सगळा; entire पूर्ण, पुरा, अखंड.—*n.* बेरीज *f*, जुमला, एकंदर आकार; grand t. of an account मखलाशी *f*. -ITY एकंदर जमा *f*, आकार; समग्रता *f*, परिपूर्णता *f*. -LY *ad.* अगदी, बिलकुल, तमाम.

TOTTER* *v.* *i.* vacillate डकडकणें, डळमळणें, लटपटणें; झोकत -झोके खात चालणें; shake कांपणें, लटलटणें [about].

TOUCH *v.* (*tangere*) come in contact with स्पर्श क., हात लावणें, शिवणें; perceive by the sense of feeling स्पर्शणें, स्पर्शज्ञान होणें: nothing but body can be *touched*; reach पावणें, पोंचणें: to t. the shores; concern संबंध असणें, लागणें: the quarrel *toucheth* none but thee alone; handle slightly हात -बोट लावणें, स्पर्श क.; meddle with हात घालणें: I have not *touched* the books; melt वेधणें, द्रवणें, कळवळा आणणें: the father was *touched* with what he said; make an impression on ठसा उठवणें, छाप मारणें: it is so hard that the file will not t. it; play on छडणें, वाजविणें: they *touched* their harps; perform, as a tune राग गाणें; afflict दुःख देणें, छडणें: we have not *touched* thee; up ओजवणें, सुधारणें [with].—*i.* लागणें, शिवणें, भिडणें: two spheres t. only at points; treat anything slightly in discourse गोष्ट -उहू काढणें [on, up]; at ओरवा -बंदर क.—*n.* contact स्पर्श; the sense of feeling स्पर्शेंद्रिय *n*, स्पर्श; power of exciting the affections चित्तवेधक -वेधण्याची शक्ति *f*, रस, भाव; emotion रस, भाव; stroke चटका, तडाखा; censure बोल, शब्द; single stroke on a drawing हात; feature स्वरूप *n*; act of the hand on a musical instrument वाद्यावर बोटांचा

-हाताचा चाळा; musical notes स्वर *pl*, मातृका *f pl*; a little धुनुक *f*, छाया: I have a *t.* of your conscience; hint सूचना *f*; taste पारख *f*, परीक्षा *f*, कस. -HOLE—of a fire-arm काना, कान, कोरप *n*. -STONE कसोटी *f*; —for gold वरकल *f*. -WOOD चेतवण *n*, पूड *f*. —TOUCHY *a*. चिरडखोर, शीघ्रकोपी; to be t. फुटाण्या सारखा उडणें.

TOUGH* *a*. not brittle वातड, चिवट; as wood, grass, &c. चिकण, निबर, टणक; tenacious चिवट, लोंचट; strong कणखर, टणक.

TOUR (*tornus*, turner's wheel) going round प्रदक्षिणा *f*; journey in a circuit परिभ्रमण *n*, फेरा, पर्यटण *n*. -IST पर्यटण करणारा, परिभ्रमणकारी.

TOURNAMENT *F*. mock fight भालेकरोली *f*.

TOW* तागाचें बुरकुल *n*.—*v*. दोरी लावून ओढणें. [along]. -AGE दोरी लावून ओढणें *n*.

TOWARD *prep*. (*to* & *ward*) कडे; with respect to विषयीं, वर, कडे.

TOWEL *F*. हातपुसणें *n*, रुमाल, फडकें *n*.

TOWER*, high building वाड्यावरला बंगला, महाल; citadel किल्ला;—of a castle बुरूज; —of a church, &c. घुमट, शिखर *n*.—*v.i*. दुसऱ्याहून वर -उंच होणें, -च्या वर चढणें [above].

TOWN* गांव *m n*, शहर *n*; the old t. कसबा; the walls or defences of a t. शहरपन्हा; the police, guards, &c., appointed to protect a t. शहरपन्हा. -CLERK कुळकरणी. -HALL सरकारवाडा, कचेरी *f*. —TOWNSMAN गांवकरी.

TOY *D*. plaything for children खेळणें *n*, खेळ; trifle खेळ, हलकी गोष्ट *f*; old story जुनी कहाणी *f*.—*v*. खेळणें, गमणें [with].

TRACE (*trahere*, to draw) track माग, छडा; vestige मागमूस, ठिकाणा.—*v*. follow by the track of थांग लावणें, छडा काढणें; mark out अंकणें, बेतणें; to t. letter of a copy in learning to write गिरवणें, घोटाळणें [out].

TRACHEA (*L*.) श्वासनळी *f*, नरडें *n*.

TRACK (See TRACE) माग, छडा; वाट *f*, रस्ता; —of a thing dragged, of a snake, &c. फरकंड *f*, फरपट *f*.—*v*. मार्ग काढीत जाणें; दोरीनें जहाज ओढणें [with].

TRACT (do.) region भेदान *n*, देश; short treatise अल्पप्रबंध, निबंध; a short treatise on practical religion धर्म संबंधी विषयाची चोपडी -निबंध, 'त्राक्ट' *n*; length लांबी *f*, विस्तार: t. of time. -ABLE *a*. docile हुकमी, कह्यांत वागण्याजोगा, वठण्याजोगा; feasible घडायाजोगा, साध्य.

TRADE (do.) commerce व्यापार, उदीम; occupation धंदा, व्यवहार, उद्योग; custom चाल *f*, रीत *f*, वहिवाट *f*: thy sin's not accidental, but a t.; company of men engaged in the same occupation धंदा, पेशा.—*v.i*. उदीम -व्यापार क. [for, with, in.] TRADER, TRADESMAN व्यापारी, उदमी.—TRADEWIND, a wind in the torrid zone, and often a little beyond it, which blows from the same quarter throughout the year; so called because of great advantage to navigators, and hence to trade].

TRADITION (*trans*, over, *dare*, to give) unwritten or oral delivery of opinions, doctrines, practices, rites, and customs from father to son, or from ancestors to posterity पूर्वी पासून चालत आलेलीं वाडवडिलांचीं मतें, चाली, विधि, आचार इ०, पूर्वसांप्रदाय; knowledge or belief transmitted without the aid of written memorials दंतकथा *f*; *Theol*., that body of doctrine and discipline, or any article thereof, supposed to have been put forth by Christ or his apostles and not committed to writing ख्रिस्ताचा किंवा त्या-

चे प्रेषितांचा परंपरागत चालत आलेला उपदेश, गुरुक्रम (2 Thes. ii. 15). -AL, ARY *a.* पूर्वीपासून चालत आलेला, परंपरागत -प्राप्त. -LY *ad.* लोकालोकीं, कर्णोपकर्णीं, परंपरेनें.

TRADUCE *v.* (*trans,* across, *ducere,* to lead) तुफान -तोहमत -आळ घेणें -घालणें.

TRAGEDY (*Gr. tragos,* a goat, *odé,* a song, either from the oldest tragedies being exhibited when a goat was sacrificed, or because a goat was the prize, or because the actors were clothed in goatskins) a drama that has a fatal issue दुःखपरिणामक नाटक *n*; a fatal and mournful event दुःखपरिणामक गोष्ट *f*.—TRAGICAL *a.* दुःखपरिणामक नाटक संबंधी; दुःखपरिणामक, दुरंत, दुःखाच्या शेवटाचा, ज्याचा शेवट दुःखानें होतो किंवा झाला असा.

TRAIL *v. D.* draw along the ground फरपटीत नेणें -ओढणें; tread down, as grass, by walking through चालतांना पायांखालीं तुडवणें, तुडवणें [along].—*i.* फरफटत जाणें; grow to great length, esp. when tender and creeping upon the ground, as a plant जमिनीवर वाढत जाणें, ताणा वाढणें.—*n.* ओढ *f*, फरकांडा; scent left on the ground by the animal pursued वास, वासाचा माग.

TRAIN (*traha,* a drag) that which draws along ओढण *f*; trap सांपळा; that which is drawn along ओढ *f*;—of a gown गोशा, झोळ, घोळ; tail of a bird सोगा; retinue जिलीब *f*, स्वारी *f*, खटलें *n*; series माळ *f*, शेज *f*, रांग *f*: the t. of ills; process अनुक्रम, पर्यायक्रम; line of gunpowder, laid to lead fire to a charge दारूची ओळ *f*, रंजक *f*; connected line of carriages on a railroad तांडा, कतार *f*, 'ट्रेन' *f*;—of artillery तोफखाना, तोफा *f pl*; t. of reasoning तर्कप्रबंध.—*v.* draw along ओढणें, फरफटणें; allure मोहणें; discipline शिकवणें, वळण लावणें; break, as oxen पेटविणें, वठणीस -वळणीस आणणें; up शिकवणें, वळण लावणें;—a horse, &c. शिकवणें, तालीम देणें. -ING शिक्षा *f*, अनुनयन *n*; वठवणें *n*, पेटवणी *f*.

TRAIT (*trahere,* to draw) mark लक्षण *n*, चिन्ह *n*; touch कसब *n*, हात, वस्तादी *f*.

TRAITOR (*tradere,* to betray) one guilty of treason राजद्रोही, फितुरी माणूस, फितूर; betrayer विश्वासघातकी. -OUS *a.* राजद्रोही; विश्वासघातकी; विश्वासघाताचा, दगलबाज.

TRAMMEL *F.* जाळें *n*, पाश; a kind of shackles used for regulating the motions of a horse, and making him amble खोडा, लोंढणें *n*, बेडी *f*.—*v.* अडकविणें, पायांत खोडा घालणें -गुतवणें [with, by].

TRAMP *v. D.* tread तुडविणें; cleanse, as clothes, by treading upon them in water कुचलून धुणें.—*i.* पाय झिजवणें, धांवाधांव क. —TRAMPLE *v.* तुडवणें, मर्दणें, खुंदलणें [down, under, on, upon].

TRANCE (*trans,* across, *ire,* to go) state in which the soul seems to have passed out of the body into another state of being, or to be wrapt into visions समाधि *f*, तन्मयावस्था *f*, देहातीत वृत्ति *f*; *Med.,* catalepsy फेंपरें *n*, अपस्मार.

TRANQUIL *a.* (*tranquillus*) स्वस्थ, शांत. -IZE *v.* स्वस्थ -शांत क. [by, with]. -ITY शांतपणा, शांति *f*, स्वस्थता *f*, निरुपद्रवता *f*.

TRANSACT *v.* (*trans,* across, *agere,* to act) करणें, वहिवाटणें, चालवणें. -ION वहिवाट *f*, आचरण *n*, निर्वाह; affair गोष्ट *f*, कार्य *n*, काम *n*; *Law,* adjustment of a dispute between parties by mutual agreement आपसांत तोडजोड *f* -समजी *f*.

TRANSCENDENT, -AL *a.* (*-scandere,* to climb) वरिष्ठ, श्रेष्ठ, उत्कृष्ट; going beyond the bounds of human knowledge मनुष्यज्ञानाच्या पलीकडचा, अमानुष.

TRANSCRIBE *v.* (*-scribere,* to write) प्रत क., नकल उतरणें [from, to].—TRANSCRIPT नकल *f,* प्रत *f.*

TRANSFER *v.* (*-ferre,* to bear) एका जाग्यापासून दुसऱ्या जाग्यावर नेणें, स्थलांतर क., बदली क., बदलणें; make over the possession of सोपणें, हवालणें, स्वाधीन क.; remove from one substance to another एका पदार्था वरून दुसऱ्यावर नेणें -उतरणें: to t. drawings to a lithographic stone [from, to]. -ABLE *a.* स्थलांतर करण्याजोगा, बदलण्याजोगा; negotiable एका पासून दुसऱ्यास देण्याजोगा, व्यवहार्य.

TRANSFIGURE *v.* (*-figurare,* to, from) रूप बदलणें, रूपांतर क.—TRANSFIGURATION रूप पालटणें *n,* रूपांतर *n.*

TRANSFIX *v.* आरपार भोसकणें -टोचणें, वेधणें [with].

TRANSFORM *v.* रूपांतर क.; transmute द्रव्यांतर क.: to t. lead into gold; *Theo.,* change the disposition and temper of, from a state of enmity to God and his law into the image of God, or into a disposition and temper conformed to the will of God पापी स्वभाव बदलणें, पवित्र क. (Rom. xii. 2); [*R. C. Ch.,* change, as the elements, bread and wine, into the flesh and blood of Christ]; among the mystics, change, as contemplative soul, into a divine substance, by which it is lost or swallowed up in the divine nature ईश्वरी तत्वांत मिळवणें, ब्रह्मरूप क.; सरूपता -मुक्ति देणें; *Math.* रूप देणें [from, to]. -ATION रूपांतर इ० क.; रूपांतर *n;* द्रव्यांतर *n;* स्वभावांतर *n,* नवा स्वभाव होणें *n,* पवित्रीकरण *n.*—See the verb.

TRANSFUSE *v.* pour, as liquor, out of one vessel into another एका पात्रांतून दुसऱ्या पात्रांत ओतणें; *Med.,* transfer, as blood, from the veins or arteries of one animal to those of another एका प्राण्याच्या शिरांतील रक्त दुसऱ्याच्या शिरांत नेणें -घालणें [from, to].

TRANSGRESS *v.* (*gradi,* to pass) उल्लंघणें, ओलांडणें, अतिक्रम क. [in].—*i.* हुकूम -आज्ञा मोडणें -तोडणें. -ION उल्लंघन *n,* अतिक्रमण *n,* अतिक्रम. -ER मर्यादा उल्लंघणारा, मर्यादेचें अतिक्रम करणारा; अपराधी, अन्यायी: the way of the t. is hard (Prov. xiii. 15).

TRANSIENT *a.* (See TRANCE) fleeting थोडा वेळ राहणारा, क्षणिक, चंचल; imperfect अपूर्ण.—TRANSIT आरपार जाणें *n;* *Astron.* क्रांति *f,* संक्रमण *n;* conveyance नेणें *n*: t. of goods through a country. -DUTY रहदारी *f,* जकात *f.*—TRANSITION संक्रमण *n,* संक्राति *f;* स्थलांतर *n.*—TRANSITIVE *a.* सकर्मक.—TRANSITORY *a.* क्षणभंगुर, क्षणिक, चंचल.

TRANSLATE *v.* (See TRANSFER) स्थलांतर क., जागा पालट क.; cause to remove from one part of the body to another शरिराच्या एका भागावरून दुसऱ्या भागावर नेणें (a disease); transform रूपांतर क.; remove, as by death मृत्युद्वारा नेणें; change to another condition, position, or office स्थित्यंतर -स्थलांतर-पदांतर क.: by faith Enoch was *translated,* that he should not see death (Heb. xi. 5); render into another language भाषांतर क. [from].—*i.* भाषांतर क.; भाषांतराच्या कामांत गुंतणें -असणें -लागणें.—TRANSLATION स्थलांतर *n;* भाषांतर *n,* तरजुमा.—TRANSLATOR भाषांतर करणारा -कर्त्ता.

TRANSLUCENT *a.* (*-lucere,* to shine) स्वच्छ, नितळ, निर्मळ; पारदर्शक.

TRANSMARINE *a.* समुद्रा पलीकडचा.

TRANSMIGRATE *v.* देशांतर क.—*i.* pass from one body or state into another देहांतर पावणें, जन्मांतर पावणें, दुसऱ्या जन्मास जाणें [from, to].—TRANSMIGRATION देहांतर *n;* the

passing of the soul into another body, according to the opinion of Pythagoras देहांतर *n*, जन्मांतर *n*, पुनर्जन्म, जन्ममरण *n*.

TRANSMIT *v.* (*-mittere*, to send) पाठविणें, धाडणें, पोंचवणें; suffer to pass through पार जाऊं देणें: metals t. electricity [from, to].—TRANSMISSION पाठवणें *n*, प्रेरण *n*.

TRANSMUTE *v.* (*mutare*, to change) द्रव्यांतर क., जात्यांतर क. [from, to].—TRANSMUTATION द्रव्यांतर *n*, जात्यांतर *n*.

TRANSPARENT *a.* (*-parere*, to appear) उजेडास वाट देणारा, पारदर्शक, प्रकाशभेद्य; clear निवळ, नितळ.—TRANSPARENCY प्रकाश-किरण-भेद्यता *f*; निवळपणा, स्वच्छता *f*.

TRANSPIRE *v. i.* (*-spirare*, to breathe) become public फुटणें, प्रसिद्ध होणें, बाहेर पडणें; happen घडणें, होणें.

TRANSPLANT *v.* remove and plant in another place एका ठिकाणाहून काढून दुसऱ्या ठिकाणीं लावणें, लावणी क.; remove and settle in another place दुसऱ्या ठिकाणीं नेऊन बसवणें [from, to]. -ATION रोपलावणी *f*, लावणी *f*; स्थलांतर *n*.

TRANSPORT *v.* (*-portare*, to carry) नेणें, वाहणें; carry into banishment हद्दपार क.; काळ्या पाण्यावर पाठवणें, देशपार क.; ravish with pleasure परमानंदित क.;—with ecstasy देहातीत वृत्ति क., देहभान उडवणें [from, to, for, with].

TRANSPOSE *v.* (*-ponere*, to put) जाग्याची उलटापालट क., स्थलांतर क. [from, to].—TRANSPOSITION जाग्याची अदलाबदल *f*, स्थानविनियम, स्थलांतर *n*.

TRANSUBSTANTIATION (*-substania*, substance) द्रव्यांतर *n*; [*Rom. Cath. Theol.*, the doctrine held by Roman Catholics that bread and wine in the eucharist is converted into the body and blood of Christ].

TRANSVERSE *a.* (*-vertere*, to turn) आडवा, वांकडा.

TRAP*, instrument for catching game फांस, सांपळा; stratagem डावपेंच, कचाट *n*; the play इटीदांडू [for].—*v.* सांपळ्यांत धरणें; पेंचांत धरणें, पकडणें [with, by, in].—*i.* सांपळा मांडणें *i.* -लावणें. -DOOR चोपदार *n*. -PINGS *pl.* मिरवणुकीचा पोशाक; घोड्याचा साज. -STICK दांडू, दांडा.

TRAP *Sw.* a heavy igneous rock एक जातीचा जड पाषाण आहे, कारदगड.

TRAPA BISPINOSA (*L.*) अतिकेशर.

TRAPEZIUM (*L.*) *Geom.* विषमचतुरस्र.

TRASH *Ger.* that which is worthless ऐलपैल *n*, खेर *f*; loppings of trees फांटीं *n pl.*—*v.* फांद्या तोडणें -साळणें.

TRAVAIL *v. i. F.* labor with pain कष्ट क., खपणें; suffer the pangs of childbirth प्रसूतिवेदना सोसणें, वेणा देणें.—*n.* श्रम, कष्ट; प्रसूतिवेदना *f*, वेण *f*.

TRAVEL *v. i.* (do.) walk चालणें; journey प्रवास -देशाटन क.; pass जाणें [from, to, for, in, by, with, through].—*t.* देशपर्यटन क.—*n.* मुशाफरी *f*, देशाटन *n*, प्रवास, फेरी *f*; *pl.* account by one who travels, of occurrences and observations made during a journey देशाटन वृत्तांत: a book of t. -LER मुशाफर, पांथस्थ, वाटसरू; देश फिरणारा, प्रवास करणारा.

TRAVERSE *a.* (See TRANSVERSE) आडवा.—*ad.* आडवा.—*v.* फिरणें, कंठणें; आडवा येणें, अटकाव क.; survey carefully पाहणी क., न्याहळणें, चौकसीनें पाहणें.

TRAY* तबकडी *f*, ताट *n*, खुमचा, तबक *n*, इ०; —of wood काठवट *f*.

TREACHEROUS *a. F.* विश्वासघातकी, दगलबाज; —to the state फितुरी *f*, निमकहराम.—TREACHERY विश्वासघात, दगलबाजी *f*, फितुरी *f*, दगा.

TREACLE (*theriaca*) काकवी *f*, बेरी *f*.

TREAD* *v. i.* set the foot पाय ठेवणें, पाऊल टाकणें : fools rush in where angels fear to t.; walk or go जाणें, चालणें; copulate, as birds जुळणें; on, upon तुडविणें; मागोमाग जाणें, लागोपाठ जाणें: year *treads* on year [on, upon, with].—*t.* वरून चालणें; press with the feet तुडवणें, पायानीं मळणें; crush under the foot पायाखालीं चिरडणें.—*n.* मळणी *f*; पाऊल *n*; gait चालण्याची ढब *f*, *f*, पावठा, पाऊल *n*, गति *f*; पक्ष्यांचें जुळणें *n*. -MILL गिरणी *f*.

TREASON (*tradere*, to give up) राजद्रोह, फितूर. -ABLE *a.* राजद्रोहाचा (act); सरकारासीं दुश्मनी करणारा, राजद्रोही (person).

TREASURE (*thesaurus*) wealth accumulated धन *n*, भांडार *n*, द्रव्य *n*; abundance विपुलता *f*, रेलचेल *f*, महामुरी *f*; that which is very much valued रत्न *n*, निधान *n*, दाणा, परीस; hidden or reserved t. डबुकलें *n*, गुप्तधन *n*, निधान *n*, डल्ला.—*v.* संचय क., द्रव्यसंचय क., जोडणें [up].—TREASURER खजीनदार; पोतनीस, कोशाधीश, भांडारी.—TREASURY जामदारखाना, खजीना, पोतें *n*, भांडार *n*, 'तिजोरी' *f*; t. bags of Government पोतें *n*; settlement of the accounts of the t. पोतेझाडा.

TREAT *v.* (*tractare*, to draw violently) handle चालवणें, वागवणें: to t. prisoners ill is the character of a barbarian; discourse on विषयावर बोलणें; entertain मेजवानी क. (a company) [with, to]; manage in the application of remedies उपचार-उपाय-चिकित्सा क.; subject to some action -वर क्रिया चालवणें;—carefully जोगवणें, संभाळणें; —considerately, leniently वागवून -संभाळून घेणें;—honorably सन्मान -संभावना क.; —roughly कुदळणें, गुधडणें, हेटाळणी क., खरडपट्टी काढणें [with, to].—*i.* विषय-प्रकरण चालवणें -सांगणें -लिहिणें [on, in]; negotiate तहाचें बोलणें क. [with, for]; मेजवानी क.—*n.* मेजवानी *f*. -MENT वागवणें *n*, वागणूक *f*, वहिवाट *f*; उपचार, चिकित्सा *f*, क्रिया *f*; औषधपाणी *n*.—TREATISE ग्रंथ, प्रबंध, निबंध.—TREATY तह, ठराव.

TREBLE *a.* (*trilpex*) तिप्पट, तिहेरी, त्रिगुण; *Mus.* तृतीय सवनाचा, किनरा.—*n.* तृतीय सवन *n*, उच्च सवन *n*, किनरी *f*, टीप *f*, टिपेचा सूर. —*v.* तिप्पट क.—*i.* तिप्पट होणें.

TREE* (*Skr. taru*) झाड *n*, वृक्ष; genealogical tree वंशवृक्ष.—*v.* झाडावर चढायास लावणें, झाडाकडे हांकून लावणें: the dog *trees* a squirrel; झाडावर ठेवणें: to t. a boat.

TREMBLE *v. i.* (*tremere*) लटलटणें, कांपणें, डळडळणें;—from fear, cold, &c. कांपरें सुटणें, हुडहुडी भरणें.—TREMENDOUS *a.* भयंकर; dreadful जोराचा, जबर, अनर्थाचा (wind). —TREMOR कापरें *n*, थरकांप, थरथराट —TREMULOUS *a.* डळडळीत, कंपित, सकंप.

TRENCH *F.* खंदक, चर.—*v.* खंदक खणणें; खळ्या -पाळ्या पाडणें. -ER काथवट *f*; food अन्न *n*, गोडगोड जेवण *n*, सुग्रास.

TREPIDATION (*trepidus*, trembling) कांपरा, थरकांप, शहारे *pl.*

TRESPASS *v.* (*trans*, over, and *pass*) pass over the boundary line of another's land दुसऱ्याच्या हद्दींत जाणें, -ची हद्द ओलांडणें; enter unlawfully upon the land of another कायद्याविरुद्ध दुसऱ्याच्या जमिनीवर जाणें; go too far अतिक्रमण क.; transgress हुकूम तोडणें; offend अपराध -आगळीक क. [on, upon].—*n.* सीमोल्लंघन *n*; अतिक्रमण *n*, अपराध, आगळीक *f*, अन्याय; criminal t. अन्यायाची आगळीक *f*.

TRET *F.* an allowance in weight for waste or refuse कडता, कसर *f*, कांटा इ०.

TRIAL (See TRY) See under TRY [for].

TRIANGLE (*tres*, three, *angulus*, angle) त्रि-

कोण, त्रिकोणाकृति.—TRIANGULAR *a.* त्रिकोणी, तिकोनी, त्रिकोण.

TRIBE (*tribus*) family कूळ *n*, वंश; a nation of savages रानटी लोक -लोकाचें गोत *n*; class वर्ग, जात *f*, गण.

TRIBULATION (*tribulare*, to press) क्लेश, दुःख *n*, संकट *n*, विपत्ति *f*.

TRIBUNAL (*L.*) seat of a judge न्यायाधिशाची गादी *f*, न्यायासन *n*, धर्मासन *n*; court of justice न्यायसभा *f*, कचेरी *f*, अदालत *f*.

TRIBUTE (*tribuere* to bestow) payment made in acknowledgment of submission खंडणी *f*, कारभार; personal contribution made in token of services rendered, or as that which is due or deserved देणगी *f*, इनाम *n*, बक्षीस *n*.—TRIBUTARY खंडणी -करभार देणारा, खंडणीदार.—*a.* खंडणी देणारा; inferior खालचा, गौण; yielding supplies of anything पुरविणारा, पुरवठा करणारा (streams).

TRICE *Sp.* पळ *n*, क्षण, त्रुटी *f*; in a t. क्षणांत, पळ मात्रांत, उभाउभी.

TRICK *D.* stratagem युक्ति *f*, हिकमत *f*; cunning contrivance कुलंगडें *n*, कंत्राट *n*; mischievous behavior खोड *f*, मस्ती *f*, चाळा; antic माकडचेष्टा *f pl*; पोरचेष्टा *f pl*; artifice कळा *f*, युक्ति *f*, गुरुकिल्ली *f*.—*v.* फसविणें [with, by, in].

TRICK *v. W.* सजवणें, नटवणें [out, out in].

TRICKLE *v.i. Ger.* ओघळणें, पाझरणें [down, off, along].

TRIDENT (*tri, & dens*, tooth) त्रिशूल -ळ.

TRIDUAN *a.* (*tri, & duis*, day) तीन दिवस राहणारा, त्र्याहिक.

TRIENNIAL *a.* (*-annus*, year) तीन वर्षे राहणारा-वर्षाचा; happening every three years तीन तीन वर्षांनीं होणारा, तिसाली, त्रैवार्षिक.

TRIFLE* *v. i.* खेळणें, गमणें, माशा मारीत बसणें [with].—*n.* हलकी -क्षुल्लक गोष्ट *f*, कसपट *n*, कःपदार्थ.—TRIFLING *a.* हलका, लहान, अल्प, एरशेर.

TRIFOLIATE *a.* (*tri, folium*, leaf) तिपानी, त्रिपर्ण, त्रिदल.

TRIFORM *a.* त्रिविध.

TRIFURCATED *a.* तीन बेचक्यांचा.

TRIGGER *Ger.* बंदुकीची कळ *f*, लबलबी *f*; t. guard पालखी *f* (*H*).

TRIGONOMETRY (*Ger. trigonon*, triangle, *metron*, measure) त्रिकोणमिति *f*.

TRILL *D. Mus.*, a shake or quiver of the voice in singing सरांटा.—*v.* सरांटा घेऊन गाणें, अळविणें.—*i.* कंप घेणें; trickle झुळझुळ वाहणें.

TRILLION (*tri, millio*) the number represented by a unit with eighteen cyphers annexed प्रयुत धन.

TRIM* *v.* निटावणें, दुरुस्त क., चकपक क.;—a boat सारख्या वजनाचा -समतोल -भार क.; clip सालणें, छाटणें [with, out].—*ad.* चकपक, नीट; t. and tidy नीटनेटका, साफसफा. -MER नीट करणारा; a time-server काल पाहून चालणारा; one who fluctuates between parties, so as to appear to favor either दोहों दरडींवर हात ठेवणारा. -MINING वस्त्रास लावलेली फीत *f*, डाल *f*, इ०.

TRINITY (*trinitas*, fr. *trini*, three each) *Theol.*, the union of the three persons (the Father, the Son, and the Holy Spirit) in one Godhead, so that all the three are one God as to substance, but three persons as to individuality देवत्रयैकत्व *n*.

TRINKET* डागिणा, नग, वस्त *f*.

TRINOCULOUS *a.* (*tri, oculus*, eye) त्रिनयन, तीन डोळ्यांचा.

TRINOMIAL *a.* (*Gr. -nemein,* to distribute) *Math.* त्रिपद *n.*

TRIO (*tres, tria,* three) त्रिकूट *n,* तिरकूट *n.*

TRIP *v. i. D.* move lightly चमकत -ठुमकत चालणें; take a brief or sudden journey फेरी क., येरझार -खेप क.; make a false step चुकून पाऊल पडणें; fail चुकणें, घसरणें, ठोकर खाणें; stumble अडखळणें, ठोकर खाणें, ठेंच खाणें.—*t.* उलथून पाडणें, ठोकर मारून पाडणें; catch धरणें, पकडणें [up].—*n.* ठोकर *f,* ठेंच *f;* अडखळण *n;* catch by which a wrestler supplants his antagonist पेंच; empty t. हेलपाटा, हिसका [round, about].

TRIPARTITE *a.* (*-pars, partis,* part) तीन भागांचा, त्रिखंड, त्रिभाग.

TRIPE *F.* अंतडें *n.*

TRIPETALOUS *a.* (*Gr. -pètalon,* a leaf) त्रिदल.

TRIPHTHONG (*Gr. -phoggos,* voice) a combination of three vowels in a single syllable, forming a single or compound sound त्र्यच्क *n.*

TRIPLE *a.* (*triplex*) तिप्पट, तिपदरी; of three strings तिपेडी, तिसुती.—*v.* तिप्पट क.—TRIPLICATE *a.* तिप्पट, तिहेरी.—*n.* दोन कागदां-पदार्थां सारखा तिसरा कागद -पदार्थ.

TRIPOD (*Gr. -podos,* a foot) तिवयी *f,* अडणी *f.*

TRISYLLABLE *a.* त्र्यक्षरी शब्द, तीन अक्षरी शब्द.

TRITE *a.* (*terere,* to rub) जुना, उष्टा, शिळा, बासा.

TRITURATE *v.* (do.) वाटणें, उगाळणें.

TRIUMPH (*triumphus*) joy for success जयाचा आनंद, जयानंद, जयोत्सव; victory जय, विजय [over].—*v.* जय मिळवणें, जयजयकार क., टाळ्या वाजविणें. -AL *a.* जयाचा, जयसमारंभाचा, in comp. जय, विजय (arch). -ANT *a.* जयोत्सव करणारा; जय पावलेला, जयवंत, विजयी, विजयशाली (church); [church t., the church in heaven, enjoying a state of triumph; her warfare with evil being over;—distinguished from *Church militant*].

TRIUMVERATE (*tres, trium,* three, *vir,* a man) त्रिकूट *n,* त्रय *n.*

TRIVET (*tri, pedis,* a foot) तिवई *f.*

TRIVIAL *a.* (*-viâ,* way) हलका, क्षुल्लक, क्षुद्र. -ITY हलकेपणा, क्षुद्रता *f.*

TRIWEEKLY *a.* अठवड्यांतून तिनदां निघणारा -होणारा (newspaper).

TROCHE (*trochæus*) a foot of two syllables गल, गलपद *n.*

TROGON भृंगराज.

TROLL *v. Ger.* roll लोटणें, फिरवणें, लोटून जाणें, लोटणें; send about भोंवताला पाठविणें (a drinking vessel); entice मोहणें, भुलवणें; fish in मासे धरणें [round].—*i.* लोटत जाणें; [fish with a rod whose line runs on a wheel or pulley, or by drawing the hook through the water] [for]. -OP भटकणारा; नगरभवानी *f,* भटकभवानी *f;* a slut नेभळी बायको *f.*

TROOP (*turba,* a crowd) मंडळी *f,* जमाव, थवा; *pl.* लष्कर *n,* सेना *f,* दळ *n;* cavalry रिसाला, 'तुरूप';—of monkeys साईर;—of pilgrims, beggars, &c. पोवा, झुंड *f.* -ER घोडेस्वार, बारगीर; a t. stationed on guard at a court of justice सदर बारगीर.

TROPE (*tropos*) a figure of speech which changes a word from its primary sense रूपकालंकार, रूपक *n.*

TROPHY (*Gr. tropé,* a turn) जयाची निशाणी *f,* जयचिन्ह *n.*

TROPIC (do.) दक्षिणोत्तरायनांची सीमा *f,* अयनांतर *n;*—of Cancer दक्षिणायन *n;*—of Capricorn उत्तरायन *n.* -AL *a.* क्रांतिवृत्तांतला.

TROT *v. i. F.* move with a jolting pace दुडकी चालीनें चालणें, दुडदुड चालणें; run धांवणें

[about, along, off, to].—*t.* तुरकी -दुडकी चालीवर घोडा चालविणें.—*n.* दुडकी चाल *f.*

TROUBLE *v.* (*turba,* a disorder) disturb गोंधळ क., हलवणें, गढुळणें; afflict दुःख -कष्ट देणें; give occasion for labor to श्रम -तसदी देणें: I will not t. you to deliver the letter [with, by, in].—*n.* कष्ट, क्लेश, विपत्ति *f*; that which afflicts पीडा *f,* त्रास, उपद्रव; to take the t. श्रम घेणें -क.; तसदी घेणें. -SOME *a.* जाच करणारा, उपद्रवकारक, श्रमकारक, त्रासकारक; जिकिरीचा, खडतर (work). -OUS *a.* संकटाचा, अरिष्टाचा.

TROUGH*—wooden डोण *f,* कोटंबा;—for watering cattle टांकी *f,* डोण *f.*

TROWEL (*trua,* a ladle) करणी *f,* थापी *f.*

TROWSERS *pl. F.* इजार *f,* पायजमा, तुमान *f.*

TROYWEIGHT *F.* सोनें रुपें इ० तोलायाचें वजन *n.*

TRUANT *a. F.* उनाड, उंडगा.

TRUCE*, armistice मुदतीचा तह, लढाईची तहकुबी *f*; intermission of action खंड, खाडा, तूट *f*; short quiet थोडासा विसांवा, अवसर, दम.

TRUCK *v. F.* अदलाबदली क. [with].—*n.* अदलाबदली *f,* विनियम; अदलाबदली करायाचा माल.

TRUCK (*Gr. troxos,* a wheel) a small wooden wheel not bound with iron बिनधांवेचें लांकडी चाक *n*; [a low carriage for carrying goods, stone, and other heavy articles; a swiveling carriage; t. system, the practice of paying workmen in goods instead of money].

TRUCKLE* *v. i.* नाक घांसणें, दांतीं तृण धरणें; पदर पसरणें [to].

TRUDGE* *v. i.* go on foot पायीं चालणें -जाणें, travel with labor तंगड्या तोडीत जाणें, पाय फांसटणें [on, along].

TRUE* *a.* conformable to fact खरा, सत्य; exact असल बरहुकूम, यथाप्रत (copy); faithful खरा, इमानी, प्रमाणिक (friend); genuine असल, खरा, चोख (Christian); unadulterated निर्भेळ, चोख;—as wood निबर. -HEARTED *a.* खरा, निष्कपट, सात्विक. -LY खरोखर, वास्तविक; मनापासून; यथातथ्य; बरोबर.—TRUTH खरेंपण *n,* सत्य *n*; real state of things खरी गोष्ट *f,* खरा मजकूर; fidelity विश्वासूपणा, इमान *n*; practice of speaking truth खरें बोलण्याची सवयी *f*: he is a man of t.; honesty प्रमाणिकपणा, सचोटी *f*; an established principle, fixed law, &c. सत्य सिद्धांत, सत्य*n,* सत्यता*f* (John xvii. 17); in t. खरोखर, वस्तुतः; [to do t., to practice what God commands]. -FUL *a.* सत्यशील; विश्वसनीय. -NESS खरेपणा, खरेंपण *n.*

TRUMP, *F.* करणा, तुतारी *f.*—*v.* करणा वाजविणें -फुंकणें; proclaim गाजवणें, फुंकणें [to]. -ER तुतारी वाजवणारा, करणेकरी. -FLOWER सागरगोटी *f*; seed of the t. गजगा, सागरगोटा; root of the t. पाहाडमूळ *n.*

TRUMP *v. F.* फसवणें, धत्तुरा दाखवणें, हातावर तुरी देणें. -ERY कवडीमाल, खेर *f.*

TRUNK (*truncus*) stem of a tree कांड *n,* खोड *n*; body of an animal धड *n*; main body पोट *n,* मुख्य भाग; chest पेटी *f,* संदूक *f*; watercourse पन्हळ; proboscis of an elephant सोंड *f*;—of an insect सोंड *f,* तोंड *n*; headless t. धड *n,* कबंध *n.*

TRUSS *F.* bundle गट्ठा, बिंडा; *Surg.*—for hernia दाब.—*v.* घट्ट बांधणें, आवळणें.

TRUST*, assured resting of the mind on the integrity, veracity, justice, and friendship, or the sound principle of another person विश्वास, भरवसा; worthy of t. विश्वासपात्र; violation of t. विश्वासघात; credit given खातरी *f,* पत *f*; assured

anticipation भरवसा, उमेद *f*; charge जिम्मा *f*, हवाला; tick उचापत *f*, उधार *n*; to buy upon t. उधार घेणें -आणणें; on t. हातावर, उधार; to sell upon t. उधार देणें. —*v.* विश्वासणें, भरवसा ठेवणें; सोंपणें, हवालणें; विश्वासणें, विसंबणें; माल उधार देणें -विकणें [in, with, to].—*i.* विश्वास धरणें, भरवसा ठेवणें; विश्वास-आशा-उमेद धरणें -बाळगणें; उधार विकणें, उधार देणें; in, to विश्वास-भरवसा ठेवणें: trust in the Lord and do good (Ps. xxxvii. 3). -EE जिम्मेदार, निसबतदार. -FUL *a.* विश्वास ठेवण्याजोगा, विश्वासयोग्य, विश्वासू.—TRUSTY *a.* खातरजमेचा, खात्रीचा.

TRY *v. F.* examine परीक्षा-पारख क.; purify, as metals शोधणें; put to the test कसणें, कसून पाहणें; examine judicially तपासणें, चवकसी क.; experience अनुभव-प्रचीति घेणें, -पाहणें; attempt हातीं घेणें, यत्न-उद्योग करून पाहणें; on घालून -नेसून पाहणें (a garment); to t. the eyes ताटकळवणें, ताटकळणें [into, by, at, in].—*i.* उद्योग-यत्न क. -करून पाहणें.

TUB *D.* पिप *n.*

TUBE (*tubus*) pipe नळी *f*, नळ, नळकांडें *n*; conduit पन्हळ, नळ; a vessel of animal body or plants नाडी *f*, धमनी *f*, शीर *f*, इ०. -ROSE गुलछडी *f*.—TUBULAR *a.* नलिकाकृति.

TUBERCLE (*tuber*) फोड, गांठ *f*, ग्रंथि *f*.—TUBERCULOUS *a.* गांठाळ, गांठीचा, ग्रंथिमय.

TUCK *W.* a long narrow sword तेगा? fold in a garment दुमड *f*, मुरडण *n*, चुणी *f*.—*v.* खोंचणें, खोवणें, मुरडून खोवणें; कापडांत गुंडाळून ठेवणें: to t. a child into a bed.

TUESDAY* मंगळवार.

TUFT *F.* bunch झुपका, पुंजका, गोंडा; cluster झुपका, घोंस;—of trees बेंट *n*.—*v.* गोंड्यानें -नीं शृंगारणें; वेगळाले झुपके क. -ED *a.* झुपकेदार, गोंडेदार, गोंडस.

TUG* *v.* श्रमानें-कष्टानें ओढणें.—*i.* कष्ट-श्रम क.

TUITION (*tueri*, to see) guardianship राखण *f*, रखवाली *f*; instruction शिकवणी *f*. शिक्षा *f*; payment for instruction शिकविण्या बदल पगार, शिकविणावळ *f*, गुरुदक्षिणा *f*.

TUMBLE* *v. i.* roll लोळणें, गडबडणें; roll down ढकलत -लोटत -गडबडत जाणें-कोसळणें; play mountebank tricks कोल्हांटी मारणें, कोल्हांट खेळ क.—*t.* पाडणें, लोटणें, ढकलून पाडणें, ढासळणें; rumple गुधडणें.—TUMBLER ढकलणारा, लोटणारा; कोल्हांटी, गोपाळ; drinking glass काचेचा पेला, 'टंब्लेर' *n*, 'ग्लास'; a variety of domestic pigeon लोटण *n*, गिरेबाज *n*.

TUMBRIL *F.* छकडा, छकडी गाडी *f*.

TUMID *a.* (*tumere*, to swell) सुजलेला, फुगलेला; bombastic ढबीचा, डौलाचा, आवाचा, फुगीर (style).

TUMOUR (do.) गलांड *n*, उबाळूं *n*, गळूं *n*, बेंड *n*;—on the spine देंटपुळी *f*.

TUMULT (do.) commotion गडबड *f*, गलबल *f*, दंगा; agitation क्षोभ, खळबळ *f*. -UOUS *a.* गडबडीचा, धांदलीचा (assembly); disorderly अव्यवस्थित (flight); violent तडाख्याचा, जोराचा, कडाक्याचा, दणक्याचा (speech).

TUNE (See TONE) स्वर, आवाज; *Mus.* सूर, तान *f*, चाल *f*; the state of giving the proper sound स्वरांचा मेळ, मिलाफ, स्वरैक्य *n*; harmony मिलाफ, जम, ऐक्य *n*.—*v.* लावणें, स्वर मिळवणें-जमवणें. -FUL *a.* सुस्वर, गोड.

TUNIC *a.* (*tunica*) integument वेष्टण *n*, आवरण *n*, पापुद्रा; [*R.C. Ch.*, a long undergarment worn by the officiating clergy].

TUP *Prov. Eng.* a ramp टपूर.

TUNNEL *F.* an artificial subterraneous; passage बोगदा -सुरंगाची वाट *f*, विवरमार्ग; funnel गळणें *n*, नरसाळें *n*; opening of a chimney for the passage of smoke धुराड्याचें तोंड *n*.—*v.* गळणीच्या आकाराचा क.; बोगदा पाडणें, विवर क.

TURBAN *Per.* पागोटें *n*.

TURBID *a.* (*turba*, tumult) गढूळ, गदळ, खडूळ. —TURBULENCE दांडगाई *f*, धांदल *f*, पुंडाई *f*. —TURBULENT *a.* बंडखोर, दांडगा, धांदल्या.

TURF*, sod गवताचा भुईतळ; -ची जमीन *f*; race-ground शर्यतीची जागा *f*; horse-racing घोड्याची शर्यत *f*, पैज *f*; lump of t. गवताचा गड्डा -पेंढ.

TURGID *a.* (*turgere*, to swell) See TUMID.

TURKEY विलायती कोंबडा, 'टर्की' *f*.

TURMERIC *F.* हळद *f*; scented t. अंबेहळद *f*; clove of t. हळकुंड *n*.

TURMOIL (*turn*, & *moil*) trouble तळमळ *f*, संताप, ताप; harassing labor खटपट *f*, दगदग *f*, अट्टाहास.

TURN*, *v.* form in a lathe कांतणें; shape डौल देणें, घडणें; cause to move upon a centre फिरवणें, भोंवडणें (a wheel, the head); cause to present a different side uppermost उलथणें, उलटणें, पालटणें (a board); direct otherwise फिरवणें, वळवणें, मुरडणें, कल देणें (the eyes, a horse, the attention); change from a given use फिरवणें, दुसऱ्या कामास लावणें, बदलणें: God will make these evils the occasion of greater good, by *turning* them to our advantage; transform रूप बदलणें, रूपांतर क.: to t. a worm into a winged insect; translate भाषांतर क.: to t. Greek into English; convert मन फिरवणें, बदलणें, -चा करणें: to t. a Hindoo to a Christian; to be turned of—च्या पलीकडे जाणें; to t. a corner कोपऱ्यास वळणें; aside वळणें, बाजूस फिरणें; to t. as milk, wine, &c. आंबवणें, आंबट क.; away चाकरीवरून काढणें, दूर क., घालवणें; निवारणें, टाळणें (evil); back परत क. -देणें; down घडी क., दुमडणें;—in the mind मनांत घोळणें, विचार क.; off घालवणें, हांकून लावणें; कमी क.; फिरवणें, वळवणें (the thoughts); पुरे क.—one's coat पक्ष बदलणें;—one's money or goods व्यापारांत मिळवणें -कमावणें -वाढणें; out काढून देणें, रद्द क.; चरणीस घालणें -सोडणें (cattle); उत्पन्न क., लाधणें; over पक्ष बदलणें; हवालणें, सोपणें (business); पुस्तकाचीं पानें चाळणें: to t. over a concordance; उलथणें, उलटणें, पालथा क. -पाडणें; to t. tail बेअदबी क., हेलना क.; to t. the back पळणें, पाठ दाखविणें -देणें; हिडसून टाकणें; to t. die फांसा उलटा टाकणें, नशीब फिरणें; to t. the edge of धार बसवणें; to t. the head of डोकें फिरवणें, वेड भरणें; to t. the scale तोल जास्ती क.; to t. the stomach of पोटांत कळमळ क.; to आश्रय धरणें; पाहणें, -कडे जाणें; upon परत टाकणें—*v. i.* फिरणें, भोंवणें; उलटणें, पतरणें, फिरणें: to t. from the road; बदलणें, मन फिरणें, बुद्धि पालटणें: to t. Mohamedan; रूप -धर्म -गुण पालटणें, द्रव्यांतर होणें, होणें: wood *turns* to stone लांकडाचा दगड होतो; चाकावर फिरणें; आंबणें, आंबट होणें; पोटांत कळमळणें -ढवळणें; [*Obstretics*, bring down the feet of a child in the womb, in order to facilitate delivery]; above तोंड फिरवणें: away मार्ग सोडणें; निघून जाणें; in आंत वांकणें -जाणें; बिऱ्हाडास -जेवणास आंत जाणें -उतरणें; निजायास जाणें; off फिरणें, फुटणें, वळणें: the road *turns* off to the left; on, upon उलट जाब देणें; अवलंबून राहणें; टणटण उडणें -बोलणें; out उखळणें, जाग्यावरून हालणें, पडणें, निघणें (a bone); बाहेर येणें; उठणें,

निजून उठणें; बाहेर पडणें, फुटणें, निघणें (a matter); over उलटणें, उलटा होणें;—from sickness चळवळणें; to t. to account कामास पडणें; up बाहेर पडणें, निघणें, उमगणें.—*n.* फिरणें *n*; परिभ्रमण *n*; फेरा, फेरी *f*; पालट, विकार: the *turns* of passions; bend विळखा, वेढा, वळसा; successive course पाळी *f*, पालट, बारी *f*: your *turn* will come to laugh at you again; opportune deed उपकार; ill t. वाईट *n*; convenience सोई *f*; डौल, आकार, वळण *n*;—of mind मनाचा कल, झोंक; निराळी तऱ्हा *f* -प्रकार; one round of a rope वेढा, वळसा; *pl. Med.* ऋतु, रज *n*; by *turns* पाळीपाळीनें, आळीपाळीनें; to take a t. आढी घेणें, विळखा घालणें; to make a t. वळणें; t. of life, *Med.* ऋतु बंद होण्याचा काळ. -COAT रंग पाहून चालणारा, दुरोखी, स्वपक्ष सोडणारा. -ER फिरविणारा; चरक -चाक फिरविणारा, कांतारी; लोटण कबूतर *n*; कसरती, पेहलवान. -ING वळसा, बांक; सन्मार्गापासून सुटणें *n*, विचलन *n*; कांतणें *n*, कांतीव काम करणें. -PIKE, -STILE, a revolving frame in a foot-path, preventing the passage of horses or cattle but admitting that of persons बेडें *n*.

TURNIP* सलगम *n*.

TURPENTINE (*terebinthus*, of the turpentine tree) देवदाराचें तेल *n*, नखतेल *n*, 'टरपेंतेल' *n*.

TURPITUDE (*turpis*) हलकेपणा, छिछोरीपणा, छिछोरी *f*.

TURRET (*turris*, tower) मनोरा.

TURTLE *F.* कांसव *n*, कूर्म *n*. -DOVE कबुतर *n*.

TUSK* सुळा दांत, सुळा; elephant's t. हस्तिदंत.

TUTELARY *a.* (*tueri*, to watch) राखणारा, रक्षण करणारा, रक्षक; t. deity आराध्य दैवत *n*, इष्टदेवता *f*.—TUTOR शिकविणारा, शिक्षक; *Law*, guardian पालनकर्त्ता.—*v.* शिकवणें; दिमतीस -दिमत असणें.

TWANG *v. i. Ger.* झणझण वाजणें.—*t.* झणझणां वाजविणें.—*n.* झणत्कार, झणत्कारा; nasal sound नाकांतला उच्चार -शब्द -स्वर, गेंगाणें -गुणगुण बोलणें *n*.

TWATTLE *v. i. Ger.* बडबडणें, वटवट क.

TWEEZERS *pl. F.* केंस वगैरे उपटण्याचा चिमटा.

TWELVE* *a.* बारा.—*n.* बाराचा अंकडा, बाराची संख्या *f*. -MONTH बारा महिने *pl*, वर्ष *n*; during t. बारमहा; of a t. बारमाही.—TWELFTH *a.* बारावा, बारा वाट्यांतला एक.—*n.* बारावा भाग, द्वादशांश.

TWENTY* *a.* वीस.—*n.* विसाचा अंकडा; विसांची संख्या *f*.

TWICE* *ad.* दोनदां, दोनवेळ; doubly दुप्पट, बेवार; t. born द्विज.

TWIG* डाहळी *f*, टहाळी *f*, शिपटी *f*, फोक.

TWILIGHT*—of evening तिनीसांज *f*;—of morning पांहट *f*, धुंदूक *f*, झुंजुमुंजु *n*; imperfect t. फुटकी तीनसांज *f*; height of t. भर तिनीसांजा *f pl*, कातरवेळ *f*.

TWIN* जुवळ, जुळा, आवळा जावळा; *pl. Astr.* मिथुन रास *f*; t. pair जोडपें *n*.

TWINE* *v.* twist together पिळणें, पीळ घालणें; wind about वेष्टणें, वेढणें.—*i.* घट्ट बसवणें; वेढाघालणें, वेष्टून जाणें.—*n.* वेढा, वेष्टन *n*, पिळा; सुतळी *f*, सडा.

TWINKLE* *v. i.* डोळा उघडणें, उघडझाप क., मिचकणें; sparkle लकलकणें, चमकणें.—*n.* quick motion of the eye स्फुरण *n*, निमेष, निमिष; time of a wink चिपडी *f*, पलख *n*.

TWIRL* *v.* गरगरां फिरवणें.—*i.* गिरकांडी देणें -मारणें, गरगरां फिरणें.—*n.* गिरकांडी *f*, गिरटी *f*.

TWIST* *v. i.* contort पिळणें, पिळवटणें, मुरगळणें; pervert वळवणें, ओढणें, विपरीत क. (meaning); wind गुंडाळणें, लपेटणें; weave विणणें; form by convolution वळणें; form into thread सूत काढणें, सूत वळणें.

TWIT* *v.* नाकांत काड्या घालणें, ठोमणा मारणें.

TWITCH* *v.* हिसकणें, हिसका देणें.—*n.* हिसडा, हिसका.

TWITTER *v. D.* चिंवचींव -किलकील -चुंचुं क. —*n.* चिंवचींव *f*, किलकील *f*, चिमचीम *f*.

TWO* (*L. duo, Skr. dwi*) द्वोन; in t. दोन तुकडे, द्विधड: c. in t.—*n.* दोहोंची संख्या *f*; दोहोंचा अंकडा. -FOLD *a.* दुप्पट; दोन प्रकारचा, द्विविध.—*ad.* दुप्पट. -EDGED दुधारी: the word of God is like a t. sword.

TYMPANITES (*L.*) वातोदर, कांसव्या रोग; to have t. पोटांत तडस भरणें.

TYPE (*typus*) stamp छाप, ठसा; symbol खूण *f*, चिन्ह *n*, लक्षण *n*; figure of something to come प्रतिरूप-बिंब *n*; *Med.*, symptom भावना *f*, स्वरूप *n*; *Printing* ठशाचें अक्षर *n*; raised letter, &c., cast in metal ठशाचें अक्षर *n* वगैरे, टैप.

The following lines show some of the different types :—

Nonpareil.

I will put my spirit within you.—Ezk. xxxvi. 27.

Brevier.

Resist the devil and he will flee from you.—Jas. iv. 7.

Bourgeois.

The Lord is my portion, saith my soul.—Lam. iii. 24.

Long Primer.

Consider the wondrous works of God.—Job xxxvii. 14.

Small Pica.

Be ye doers of the word, and not hearers only, deceiving yourselves.—Jas. i. 22.

Pica.

God is angry with the wicked every day.—Ps. vii. 11.

English.

Christ died for the ungodly.—Rom. v. 6.

Great Primer.

Believe on the Lord Jesus Christ and thou shalt be saved.—Acts xvi. 32.

—TYPICAL *a.* लाक्षणिक, सांज्ञिक, सांकेतिक.—TYPIFY *v.* प्रतिरूपाने दाखवणें, सुचवणें.

TYPHUS (*Gr. tuphos*, smoke) सन्निपातज्वर.

TYPOGRAPHY (See Type) छापण्याची कळा *f*, खिळेछाप.

TYRANT (*Gr. turannus*) absolute ruler मुखत्यार राजा, स्वतंत्र राजा; despotic and cruel ruler जुलमी राजा; cruel master जुलमी धनी *f*; oppressor जबरी -जुलूम -जाच करणारा.—TYRANNY स्वतंत्र राज्य *n*; जुलमी -बेदाद-राज्य *n*; जुलूम,जबरदस्ती *f*.—TYRANNICAL *a.* जुलमी, जबरदस्त, जालीम, जुलमाचा, कहराचा (power).—TYRANNIZE *v. i.* जुलूम -जबरी -सखती क.; जाचणें, गांजणें, कांचणें, पीडणें.

TYRO (*tiro*, a beginner) नवशिका, नूतनाभ्यासी.

TYTHE, See TITHE.

U

UBIQUITY (*ubique*, everywhere) व्याप्ति *f*, विश्वव्याप्ति *f*, सर्वसमीक्षता *f*, सर्वत्रता *f*.—UBIQUOUS *a.* सर्वत्र असणारा, सर्वव्यापक.

UDDER* (*Skr. údhar*) ओटी *f*, कास *f*; side of an u. पाखें *n*.

UGLY* *a.* deformed कुरूप, विद्रुप, बेडौल; ill-natured कुस्वभावाचा, कुबुद्धि.—UGLINESS कुरूपता *f*, बदसुरत *f*; कुस्वभाव.

ULCER (*ulcus*) *Med.* खट *n*, क्षत *n*, व्रण, फापर *n*. -ATE *v. i.* क्षत -व्रण पडणें.

ULTERIOR *a.* (*L.*) situated beyond पलीकडचा; further पुढचा (demands).

ULTIMATE *a.* (*ultimus*, last) शेवटचा, अंतिम,

निदानींचा (repose); final शेवटचा, शेवटील (truths); constituent मूळ-कारणभूत (element). -LY *ad.* शेवटीं, सरते शेवटीं, परिणामीं. —ULTIMATUM (*L.*) निदानींचा शब्द, शेवटचें म्हणणें *n.*

ULTRAMARINE *a.* (*ultra*, beyond, *marinus*, marine) समुद्रा पलीकडचा.

UMBER (*umbra*, shade) काव *f*?

UMBRA (*L.*) छाया *f.*—UMBRAGE छाया *f*; offence रुसवा, गैरमर्जी *f.*—UMBRAGEOUS *a.* छायेचा; छाया करणारा -देणारा (trees).—UMBRELLA छत्री *f*, छत्र *n*; u. borne over rájás, &c., in their procession अफतागिरी *f.*

UMPIRE (See Impair) तिऱ्हाईत, मध्यस्थ.

UNABLE *a.* अशक्त, असमर्थ.

UNACCENTED *a.* अनुदात्त, अस्वरित.

UNACCEPTABLE *a.* नापसंत, अमान्य [to].

UNACCOMPLISHED *a.* शेवटास न गेलेला, अपुरा, कच्चा.

UNACCOUNTABLE *a.* not to be accounted for ज्याचें कारण सांगतां येत नाहीं तो; mysterious गुढ, गहन; not responsible बिन मोसबी -जबाबदारीचा.

UNACCUSTOMED *a.* अनभ्यासी, अनभ्यस्त [to].

UNACQUAINTED *a.* गैर माहीत, गैर वाकब, अनभिज्ञ [to].

UNADVISED *a.* उतावळा, अविचारी, धसक्या; done without due consideration उतावळेपणाचा, अविचाराचा (measures).

UNAFFECTED *a.* निर्विकार; not real खरा, मनापासूनचा, अकृत्रिम (sorrow); destitute of affection गहींवर न आलेला, अजातद्रव, कठीण, विराग [by].

UNALTERABLE *a.* फिरवायास अयोग्य, अविकार्य.

UNANIMITY (*unus*, one, *animus*, mind) एकी *f*, ऐक्य *n*, एकमत *n.*—UNANIMOUS *a.* एकचित्त, एकदिल; formed with unanimity एकदिलाचा, एकोप्याचा, सर्वसंमताचा [in, for].

UNANSWERABLE *a.* दुरुत्तर, अनुत्तर, अखंडनीय.

UNAPPEASABLE *a.* असांत्वनीय, अशाम्य.

UNAPPROVED *a.* नापसंत, अमान्य.

UNAPT *a.* अनुपयोगी; अनुपयुक्त; dull मंदमति, जडबुद्धि [for].

UNARMED *a.* बिनहत्यार, उघडा, शस्त्रहीन, निरायुध.

UNASKED *a.* बिन पुसल्याचा -वांचूनचा, अयाचित [for].

UNASSUMING *a.* निरभिमानी, साळसूद, बिन दिमाखाचा, बाळबोध, साधा (manners).

UNATTAINABLE *a.* असाध्य, दुःसाध्य, अलभ्य

UNAUTHORIZED *a.* बिन हुकमी, हुकमा वांचूनचा, बिन सनदी.

UNAVAILING *a.* निरर्थक, निष्फळ.

UNAVOIDABLE *a.* अनिवार्य, अनिवार; necessary आवश्यक, अगत्याचा.

UNAWARE *a.* गैर माहीत; बेसावध, बेहोष [of].—UNAWARES *ad.* अकस्मात, एकाएकीं

UNBECOMING *a.* अयोग्य, अनुचित, अमर्याद गैरशिस्त [of].

UNBEGOTTEN *a.* न झालेला, अनुत्पन्न; eternal सनातन.

UNBELIEF अविश्वास; infidelity अश्रद्धा *f*, अभक्ति *f*, नास्तिक मत *n* [of].—UNBELIEVER अविश्वासी, अभक्त, नास्तिक.

UNBEND *v.* उतरणें, ढिला सोडणें -क, दोरी सोडणें (a bow); relax विसांवा देणें: to u. the mind from study.

UNBIASSED *a.* निष्पक्षपाताचा, उदासवृत्तीचा.

UNBIDDEN *a.* न सांगितलेला, हुकूम न दिलेला; spontaneous स्वतःसिद्ध, आपोआप; uninvited न बोलावलेला, अनामंत्रित, आगंतुक.

UNBLEMISHED *a.* निकोप, निष्कलंक, निर्दोष.

UNBLEST *a.* आशिर्वाद न पावलेला; wretched हतभाग्य, कपाळकरंटा, फुटक्या नशिबाचा [by].

UNBORN *a.* न जन्मलेला, अजात; future पुढला, पुढील (sorrow).

UNBOSOM *v.* विश्वासानें तोंडा बाहेर काढणें, पोटफोड क. [one's self].

UNBOUNDED *a.* अपार, अमर्याद (power); unrestrained अनिवार, बेकैद, बेलगाम (extravagance).

UNBRIDLED *a.* बिन लगामी, बेकैदी.

UNBUTTON *v.* गुंड्या काढणें -सोडवणें.

UNCEREMONIOUS *a.* बेमुरवतीचा; familiar खेळीमेळीचा, सलगीचा.

UNCERTAIN *a.* not certain अनिश्चित, संदेहयुक्त, संशयाचा (evils); insecure बेभरवशाचा, संकटांत, धोक्याचा: man, without the protection of a Superior Being is u. of everything that he hopes for; not sure of the direction बिन धोरणाचा, बेशिस्त, भलता, नेमावांचून; soon bent his bow, u. in his aim. -TY भ्रांतिवटपणा, संदेह, संशय, दुग्धा *f.*

UNCHANGEABLE *a.* निर्विकार, अविकारी.

UNCHARITABLE *a.* दोषदर्शी, दोष पाहणारा -पाहण्याचा (opinion).

UNCHASTE *a.* व्यभिचारी;—woman असाध्वी *f*, व्यभिचारिणी *f.*

UNCHRISTIAN *a.* ख्रिस्ती नव्हे तो; contrary to Christianity ख्रिस्ती धर्मा विरुद्ध, ख्रिस्तीधर्मबाह्य.

UNCIVIL *a.* रानटी, गव्हार; unpolite अशिष्ट, असभ्य, दांडगा [to].

UNCLE (*avunculus*, a maternal uncle) —paternal चुलता;—maternal मामा.

UNCLEAN *a.* मळका, मळीण; unholy अपवित्र, अशुद्ध;—ceremonially विटाळलेला, भ्रष्ट, अशुद्ध, अपवित्र, ओंवळा.

UNCLOTHE *v.* कापडें -वस्त्रें उतरणें -काढणें.

UNCOMELY *a.* न शोभेसा, अयोग्य (manners); असुंदर, साधारण, साधा (person).

UNCOMFORTABLE *a.* गैर सोयीचा, अडचणीचा, गैरलागी (seat); gloomy उदास, विषण्ण, उजाड (season).

UNCOMMON *a.* थोडा, विरळा; strange विलक्षण, असाधारण, अलौकिक (courage). -LY *ad.* फारच, अतिशय; क्वचित्, विरळ.

UNCONCERN अनास्था *f.*—UNCONCERNED *a.* निष्काळजी, बेपरवा, निश्चिंत.

UNCONDITIONAL *a.* बिन अटीचा, सरळ, अप्रतिबंधक.

UNCONNECTED *a.* अनन्वित, असंगत, विलग, विसंगत. -NESS अनन्वय, असंबंध.

UNCONQUERABLE *a.* अजिंक, अजेय.

UNCONSCIONABLE *a.* अयुक्तिक, अमर्याद, भलता -ती *f* -तें *n* (request); vast फार मोठा, अवजड.

UNCONSCIOUS *a.* अचेतन, निचेत, धुंद; अजाणता, अज्ञ; imperceptible इंद्रियागोचर, अव्यक्त [of].

UNCOURTEOUS *a.* बेमुरवत, बिन माणुसकीचा, असभ्य.

UNCOUTH *a.* अडाणी, हेंगाडा.

UNCOVER *v.* उघडणें, झांकण काढणें.

UNCREATED *a.* अनुत्पन्न, नित्य: God is u.; अद्याप उत्पन्न न झालेला (misery).

UNCTION (See ANOINT).—UNCTUOUS *a.* चिकण, स्निग्ध (earth).

UNCULTIVATED *a.* बिन लागवडीचा, पडीत, नाकीर्द; not civilized अशिक्षित, गव्हार, रानटी

UNDAUNTED *a.* निर्भय, निधाड, धीट.

UNDECAYING *a.* अविनाशी, अनश्वर, अक्षर.

UNDECEIVE *v.* भ्रांति उडवणें, डोळे -कान उघडणें.

UNDECIDED *a.* अनिश्चयाचा, निश्चय -ठराव -निवाडा न केलेला, अनिश्चित, डळमळीत. -LY अळमटळम, अनिश्चित.

UNDEFILED *a.* निर्मळ, अलिप्त, भ्रष्ट न झालेला, शुद्ध.

UNDEFINABLE *a.* अलक्ष्य, अनिर्वचनीय.

UNDEFINED *a.* मोघम, संदिग्ध, अस्पष्ट.

UNDENIABLE *a.* नाहीं -न म्हणायाजोगा, अबाधित.

UNDER* *prep.* (*Skr. antar*) below खालीं, खालतीं; in वारीं, खालीं (खेळण्यावारीं, कामावारीं); in relation to some thing or person that exceeds in rank or degree, in number, size, weight, &c. खालीं; there are several parishes u. twenty pounds; in relation to something that comprehends, that represents, that furnishes a cover, pretext, pretence, &c. निमित्तानें, मिषानें: u. the name of friendship; in subjection to ताब्यांत, खालीं; less than खालीं, कमी.—*a.* खालचा; subordinate आड (आडगडी); हाताखालचा, उप (उपगुरु).

UNDERDO *v.* पाहिजे त्यापेक्षां कमी क.; cook insufficiently कच्चा शिजविणें, बराबर न-शिजवणें, अर्धबाट क.

UNDERGO *v.* सोसणें, भोगणें, कंठणें.

UNDERHAND *ad.* लपून छपून.—*a.* चोरीचा, लपंडावाचा, in comp. चोर.

UNDERLIE *v.* खालीं असणें; be at the basis of -च्या मुळास असणें, -ला आधार असणें.

UNDERLINE *v.* -च्या खालीं रेघ काढणें -ओढणें.

UNDERLING हाताखालचा, बगल्या.

UNDERMINE *v.* पाया खणून काढणें -पाडणें -ढासळणें; ruin in an underhand way आंतून नाश क. गुप्त घाला घालणें.

UNDERMOST *ad.* सर्वांच्या खालचा; सर्वांहून हलका, अति कनिष्ठ.

UNDERNEATH *ad., prep.* खालीं.

UNDERPRICE *v.* हलकी -उणी किंमत क. -लावणें -समजणें.

UNDERSETTER धिरा.

UNDERSIGN *v.* खालीं सही क.; the *undersigned* खालीं सही करणारा.

UNDERSTAND *v.* (*under & stand*) apprehend समजणें, उमजणें; become informed of माहीतगार होणें, कळणें; imply गर्भित असणें, फलितार्थानें दाखवणें [from, by].—*i.* समज -बोध असणें; be informed by another दुसऱ्याकडून समजणें. -ING, knowledge बुद्धि *f*, ज्ञान *n*; harmony समजूत *f*, समजी *f*: to come to an u. with another; union of minds बनाव, रहस्य *n*, एकी *f*.

UNDERTAKE *v.* engage in उचलणें, हातीं घेणें, पत्करणें; take solemnly upon one's self प्रतिज्ञेनें -करारानें घेणें.—*i.* हातीं घेणें, पत्करणें; promise वचन देणें, कबूल क.; for जामीन राहणें -होणें.—UNDERTAKER पत्करणारा, हातीं घेणारा; one who takes the charge and management of funerals प्रेतक्रियेची खटपट करणारा.—UNDERTAKING पत्करणें *n*, पतकर; काम *n*, कार्य *n*, धंदा.

UNDERTENANT पोटभाडेकरी.

UNDERVALUE *v.* कमी किंमत क.; esteem lightly तुच्छ -हलका मानणें.

UNDERWOOD झाडझुडूप *n*, झाडी *f*.

UNDERWRITER विमेदार, विमेकरी.

UNDESERVING *a.* नालायक, गैरलायक, अयोग्य, अपात्र.

UNDESIGNING *a.* निष्कपट, निष्कृत्रिम.

UNDESIRED *a.* अनपेक्षित.—UNDESIRABLE *a.* अनपेक्ष; विचार करायास अयोग्य.

UNDETERMINED *a.* अनिश्चित, अळमळीत, न ठरलेला; not limited अमर्याद, अपार.

UNDIGESTED *a.* अजीर्ण, अपक्व, कच्चा.

UNDISCIPLINED *a.* अशिक्षित, गैरसाळ.

UNDISGUISED *a.* उघडा, बिन पडद्याचा, निष्कपट

UNDISTURBED *a.* निरुपद्रव, निष्कंटक, उपद्रवरहित; थंड, अव्यग्र, स्वस्थ.

UNDIVIDED *a.* अखंड, सलग, सबंध.

UNDO *v.* reverse फिरवणें, उलटवणें; annul रद्द

क.; loose उघडणें, उकलणें, उलगडणें; ruin, as in reputation, morals, and the like नाश क., अब्रू वगैरेचा नाश क.; bring to poverty भिकेस मिळविणें; make void नाहींसा -न केलासा क. [by, with].

UNDOUBTED *a.* निस्संशय, निस्संशयाचा.

UNDRESS *v.* वस्त्रें -पांघुरणें -काढणें, पोशाक उतरणें; अलंकार उतरणें; *Med.* जखमेवरून मलम -पट्टी वगैरे काढणें.

UNDUE *a.* नालायक, गैरशिस्त, अयोग्य (proceeding); excessive बेसुमार, बेहद्द, अमर्यादः u. regard to the externals of religion; not due न द्यायाचा (a debt).

UNDULATE *v. i.* (*undula,* a little wave) हेलकावणें, हेलकावा खाणें.—*t.* हेलकावा देणें, हेलकावणें.—UNDULATION हेलकावा, उतारचढ; आंदोलन *n.*

UNDUTIFUL *a.* बेहुकमी, आज्ञा न मानणारा, दांडगा, स्वधर्मविमुख.

UNDYING *a.* न मरणारा, अमर : the u. soul; imperishable अविनाशी, अनश्वर.

UNEASINESS अस्वास्थ्य *n,* असुख *n,* असमाधान *n.*—UNEASY *a.* अस्वस्थ, असमाधानी, बेआराम; stiff in manners खळबळीतपणा वेगळा, आदराच्या डौलाचा, करडा, रांठ इ०.

UNEMPLOYED *a.* रिकामा, खाली, निरुद्योगी.

UNENLIGHTENED *a.* तेजहीन, हीनतेज; न सुधारलेला, अज्ञान, गव्हार.

UNENTITLED *a.* अनाधिकारी.

UNEQUAL *a.* उंचनीच, अधिकउणा, असम, विषम; inferior हलका; insufficient अपुरता, कोंता, उणा [to]. -ED *a.* अप्रतिम, अद्वितीय, अपूर्व; inadequate असमर्थ, नालायक.

UNEQUIVOCAL *a.* स्पष्ट, व्यक्त; not of doubtful signification स्पष्ट, स्पष्ट अर्थाचा (words).

UNERRING *a.* अचूक; certain अचूकसंधानी, निभ्रांत [in].

UNESSENTIAL *a.* अनावश्यक, बिन जरुरीचा, गौण, अप्रधान.

UNEVEN *a.* उंचनीच; unequal असम, असदृश.

UNEXAMPLED *a.* अनुपम, अप्रतिम, अपूर्व.

UNEXCEPTIONABLE *a.* अबाध, निर्बाध, निर्दोष, चोख (character).

UNEXPECTED *a.* आकस्मिक, अकल्पित. -LY अकस्मात्, एकाएकीं.

UNEXPLORED *a.* अज्ञात, ज्याचा शोध केला नाहीं तो.

UNEXTINGUISHABLE *a.* न विझण्याजोगा, अशाम्य.

UNFADING *a.* अवीट, न विरणारा, न कोमणारा.

UNFAIR *a.* गैरवाजवी, खोट्या चालीचा, अप्रामाणिक [to].—UNFAITHFUL *a.* खोटा, बेइमान [to, in]. -NESS खोटेपणा, बेइमान *n;*—of a wife to her husband नवऱ्याशीं बेइमानी *f,* अपातिव्रत्य *n;*—of a husband to his wife बायकोशीं बेइमानीपणा.

UNFASHIONABLE *a.* लोकचालीविरुद्ध, लोकसंप्रदायविरुद्ध, गैर चालीचा -रीतीचा (dress, language).

UNFATHOMABLE *a.* तळ लागत नाहीं असा, अतळ, अगाध.

UNFAVORABLE *a.* अनिष्ट, अशुभ, अमंगळ; contrary उलटा, वांकडा; as wind समोरचा [to].

UNFEELING *a.* निर्दय, बेदर्द, कठीण, कठोर [to].

UNFEIGNED *a.* खरा, वास्तविक, निष्कपट.

UNFIT *a.* अयोग्य, अनुचित, नालायक, अनुपयुक्त. [for].—*v.* नालायक -अयोग्य क.

UNFIXED *a.* अनियमित, अनिश्चित.

UNFOLD *v.* उघडणें, उकलणें, पसरणें; reveal कळवणें, प्रगट क.

UNFORESEEN *a.* पूर्वी न पाहिलेला, अनपेक्षित [by].

UNFORGIVING *a.* असोशिक, दीर्घद्वेषी, अक्षम.

UNFORTUNATE *a.* हतभाग्य, दुर्दैवी (man); हतभाग्याचा, अपेशाचा, अरिष्टाचा (measures, affairs) [in]. -LY *a.* दुर्दैवें करून [for].

UNFOUNDED *a.* न स्थापलेला, अस्थापित; न बांधलेला; vain पोकळ, व्यर्थ (hopes); baseless निराधार, निर्मूळ, मिथ्या.

UNFRIENDLY *a.* अनिष्ट; शत्रुभावाचा [to].

UNFRUITFUL *a.* निष्फळ (tree); barren वांझ, वंध्या (female); not producing good works व्यर्थ, वृथा, सत्कर्महीन (life); not fertile नापीक, भरड, रुक्ष (soil).

UNFURL *v.* (गुंडाळलेला) सोडणें, मोकळा क., सुरळी सोडणें (sails).

UNGAINLY* *a.* अडाणी, बेढब, बेसुरत (figures).

UNGENEROUS *a.* कृपण, अप्रशस्त मनाचा, हिमटा [to].

UNGIRD *v.* कंबरबंद सोडणें, कमर सोडणें.

UNGODLY *a.* अधार्मिक, देवनिंदक, दुष्ट; polluted by sin भ्रष्ट, पापलिप्त.

UNGOVERNABLE *a.* अनिवार.

UNGRACEFUL *a.* बेढब, विशोभित [in].

UNGRACIOUS *a.* अनुपकारी, निर्दय; unpleasant नावडता; unacceptable अमान्य.

UNGRATEFUL *a.* कृतघ्न, अनुपकारी, निमकहराम; unpleasing नावडता, अरुचिकर; as sounds कर्कश [to].

UNGUENT (*ungere,* to anoint) उटणें *n,* उटी *f.*

UNHANDY *a.* आडमुठ्या, नाकसबी; not convenient अडचणीचा, गैरसोयीचा (posture).

UNHAPPY *a.* असुखी, दुःखी; children sometimes render their parents u.; unlucky हतभाग्य, दुर्दैवाचा; affairs have taken an u. turn; calamitous अनर्थाचा, अरिष्टाचा, अशुभ [in].

UNHEALTHY *a.* रोगी; habitually indisposed सदारोगी; abounding with disease रोगाचा, रोगप्रचुर, रोगी (season); insalubrious रोगी, रोग आणणारा (climate); not resulting from health वाईट प्रकृतीचा -पासून झालेला.

UNHEARD *a.* न ऐकलेला, अश्रुत; obscure सांदीकोंदीचा [of].

UNHESITATING *a.* बेशक, अकुंठित [in].

UNHINGE *v.* बिजागरी -सांधा उखळणें; displace जाग्यावरून उचलणें -उठवणें; render unstable अस्थिर -चंचल क. (the mind).

UNHORSE *v.* घोड्यावरून पाडणें; घोड्यावरून उतरायास लावणें.

UNHURT *a.* दुखापत न झालेला, अनाहत; नुकसानी शिवाय; safe and sound सुरक्षित, सलामत [by].

UNICORN (*unus,* one, *cornu,* a horn) एकशिंगी कल्पित जनावर *n.*

UNIDIOMATICAL *a.* भाषणसंप्रदायविरुद्ध, अप्रशस्त.

UNIFORM (*unus,* one, *forma,* form) एका तऱ्हेचा -जातीचा; not different सारखा, समान. —*n.* एका मंडळीचा धंद्याचे -लोकांचा शिपायांचा वगैरे सारखा पोशाक; military u. बाणगुसी *f.* -ITY समरूपता *f,* समसमानता *f,* बराबरी *f,* साम्य *n.*

UNIMAGINABLE *a.* कल्पने बाहेरचा, अतर्क्य, कल्पनातीत, अचिंत्य.

UNIMPAIRED *a.* साबीत, शाबूद, अक्षत, धड, निकोप.

UNINFORMED *a.* गैरमाहीत, अज्ञान, अजाण.

UNINHABITED *a.* उजाड, निर्जन, ओस, बेचिराग.

UNINSPIRED *a.* ईश्वरी प्रेरणा न झालेला, ईश्वरानें न प्रेरलेला [by].

UNINSTRUCTED *a.* अशिक्षित, अनक्षर.

UNINTELLIGENT *a.* बुद्धीचा जड -मंद.

UNINTELLIGIBLE *a.* समजायास कठीण, दुर्बोध, दुर्ज्ञेय.

UNINVITED *a.* न बोलावलेला, अनाहूत [by].

UNION (*unus,* one) junction जोड, संबंध, संधि; harmony एकी *f,* एकोपा, ऐक्य *n*; con-

federation कट, कूट ; [hypostatical u. *Theol.*, the personal union of the divine and human natures in Christ, that is, so as to constitute one person with two natures] [with].

UNIQUE *a.* (do.) अनन्य, असाधारण, एकमात्र.

UNIT (do.) एक, एकांक ; एकं.—UNITARIAN, one who denies the doctrine of the Trinity अत्रैक्य तत्ववादी, 'युनितेरियन.'—*a.* युनितेरियन मताचा.—UNITE *v.* जोडणें, मिळवणें ; join by legal or moral bond जोडणें, एक क. [with, in, together, against].—*i.* मिळणें, एक होणें ; एकचित्त -मत होणें, जुटणें. —UNITED जोडलेला, संयुक्त ; एकचित्त. -LY *ad.* मिळून, मिळणीनें.

UNISON (*-sonus*, a sound) मेळ, मिलाफ, जम; *Mus.* स्वरांचा मेळ, एकताल.—UNITY एकपणा, ऐक्य *n* ; concord ऐक्य *n*, एकी *f*; *Poet.* and *Rhet.* विषयांचें ऐक्य *n*, मिलाफ, संविधान *n*.

UNIPAROUS *a.* (*unus*, one, *parere*, to bring forth) producing one at a birth एकप्रसू.

UNISON, See under UNIT.

UNIVERSE (*unus*, one, *vertere*, to turn) all created things viewed as constituting one system or a whole विश्व *n*, जग *n*, सकल सृष्टि *f*, सृष्टि *f*; pervading the u. विश्वव्यापक ; lord of the u. विश्वेश्वर; soul of the u. जगदात्मा.—UNIVERSAL *a.* सर्व ठिकाणचा, सर्वांचा, सार्वजनिक, सार्वत्रिक (good) ; total सर्व, अखंड, सगळा (frame); comprising particulars सामान्य, साधारण (terms) ; u. Church, the whole Church of God in the world यावत् ख्रिस्ती मंडळी *f*, सार्वत्रिक मंडळी *f*. -ITY सर्वव्यापकत्व *n* ; सर्वसाधारण्य *n*, सर्वांचा संबंध. -LY *ad.* सर्वत्र, सर्व ठिकाणीं; सर्वांस, सर्वांनीं : God's laws are u. binding on his creatures.—UNIVERSITY, an assemblage of colleges established in any place with professors for instructing students in the science and other branches of learning, and where degrees are conferred पाठशाळा समाज, 'युनिवर्सिटी' *f*, शाळामंडळ *n*; a universal school, in which are taught all branches of learning, or the four faculties of theology, medicine, law, and the sciences and arts सर्व विद्यालय *n*, 'युनिवर्सिटी' *f*.

UNJUST* *a.* अन्यायी, अधर्मी (man); अन्यायाचा, अधर्माचा, गैरवाजवी ; in comp. अन्याय (actions) [to].

UNKIND *a.* उपकारशत्रु ; निर्दय, स्नेहहीन, कठीण मनाचा [to]. -NESS अवकृपा *f*.

UNKNOWN *a.* अज्ञात, अनोळखीचा ; u. quantity अव्यक्तराशि *f* [to].

